सत्यमेव जयते

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
# २०२५-२६















अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

सत्यमेव जयते

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
# २०२५-२६

DIRECTORATE OF ECONOMICS AND STATISTICS MAHA DES

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन

# प्रस्तावना

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, खंड १, परिच्छेद क्र. १३९ नुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' हे प्रकाशन राज्य विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सादर करण्यासाठी दरवर्षी तयार करते. सदर प्रकाशन २०२५-२६ या वर्षासाठी तयार करण्यात आले असून मालिकेतील हा ६५ वा अंक आहे.

२. या प्रकाशनात अर्थव्यवस्थेतील विविध सामाजिक-आर्थिक क्षेत्रांच्या स्थितीबाबतची माहिती व संदर्भासाठी शक्य त्या ठिकाणी निर्देशांक व स्थितीदर्शक कल देण्यात आले आहेत. हे प्रकाशन राज्याच्या महत्त्वाच्या सांख्यिकीची समयमालिकानिहाय अद्ययावत माहिती आणि भारतातील सर्व राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक उपलब्ध करुन देते. अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे या प्रकाशनात समाविष्ट केलेली काही आकडेवारी/ अंदाज अस्थायी स्वरुपातील आहेत.

३. राज्य व केंद्र शासनाचे संबंधित विभाग, कार्यालये व उपक्रम यांनी त्यांचेकडील उपयुक्त माहिती या संचालनालयास वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे हे प्रकाशन तयार करणे शक्य झाले, त्याबद्दल हे संचालनालय त्यांचे आभारी आहे.

डॉ. ज्योत्स्ना पडियार
आयुक्त
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन

मुंबई

दिनांक : ५ मार्च २०२६

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२६

## अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **राज्याचा संक्षिप्त आढावा** | **१** |
| अ. | **दृष्टीक्षेपात महाराष्ट्र** | **३** |
| ब. | **महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती** | **६** |
| १. | **राज्य अर्थव्यवस्था** | **९** |
| २. | **लोकसंख्या** | **१७** |
| ३. | **राज्य उत्पन्न** | **२३** |
| ४. | **किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था**<br>किंमती<br>सार्वजनिक वितरण व्यवस्था | **३९** |
| ५. | **लोकवित्त** | **६७** |
| ६. | **संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार** | **८७** |
| ७. | **कृषि व संलग्न कार्ये**<br>कृषि<br>सिंचन<br>फलोत्पादन<br>पशुसंवर्धन<br>मत्स्यव्यवसाय<br>वने व सामाजिक वनीकरण | **१०१** |
| ८. | **उद्योग आणि सहकार**<br>उद्योग<br>सहकार | **१४१** |
| ९. | **पायाभूत सुविधा**<br>ऊर्जा<br>वाहतूक व दळणवळण | **१६९** |
| १०. | **सामाजिक क्षेत्र**<br>शिक्षण<br>सार्वजनिक आरोग्य<br>महिला व बाल विकास<br>रोजगार व दारिद्र्य<br>गृहनिर्माण<br>पाणी पुरवठा आणि स्वच्छता<br>पर्यावरण संवर्धन<br>सामाजिक न्याय<br>मानव विकास आणि शाश्वत विकास ध्येये | **१९९** |
| | **व्याख्या सूची** | **२७९** |
| क. | **भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक** | **२८६** |
| ड. | **महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक** | **३०४** |

## परिशिष्टे


| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. २.१** | महाराष्ट्राची व भारताची जनगणनांवर आधारीत लोकसंख्या | २१ |
| **परि. २.२** | जनगणनांवर आधारीत राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या | २१ |
| **परि. ३.१** | मूळ किमतींनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक स्थूल राज्य मूल्यवृद्धी व बाजार किमतींनुसार सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न (चालू किमतींनुसार) | ३० |
| **परि. ३.२** | मूळ किमतींनुसार क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धी व बाजार किमतींनुसार वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न [स्थिर किमतींनुसार (पायाभूत वर्ष २०११-१२)] | ३१ |
| **परि. ३.३** | मूळ किमतींनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक निव्वळ राज्य मूल्यवृद्धी व बाजार किमतींनुसार सांकेतिक निव्वळ राज्य उत्पन्न (चालू किमतींनुसार) | ३२ |
| **परि. ३.४** | मूळ किमतींनुसार क्षेत्रनिहाय वास्तविक निव्वळ राज्य मूल्यवृद्धी व बाजार किमतींनुसार वास्तविक निव्वळ राज्य उत्पन्न [स्थिर किमतींनुसार (पायाभूत वर्ष २०११-१२)] | ३३ |
| **परि. ३.५** | मूळ किमतींनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक स्थूल देशांतर्गत मूल्यवृद्धी, बाजार किमतींनुसार सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्न व स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (चालू किंमतींनुसार) | ३४ |
| **परि. ३.६** | मूळ किमतींनुसार क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल देशांतर्गत मूल्यवृद्धी, बाजार किमतींनुसार वास्तविक स्थूल देशांतर्गत उत्पन्न व स्थूल राष्ट्रीय उत्पन्न [स्थिर किमतींनुसार (पायाभूत वर्ष २०११-१२)] | ३५ |
| **परि. ३.७** | मूळ किमतींनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक निव्वळ देशांतर्गत मूल्यवृद्धी, बाजार किमतींनुसार सांकेतिक निव्वळ देशांतर्गत उत्पन्न व निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (चालू किमतींनुसार) | ३६ |
| **परि. ३.८** | मूळ किमतींनुसार क्षेत्रनिहाय वास्तविक निव्वळ देशांतर्गत मूल्यवृद्धी, बाजार किमतींनुसार वास्तविक निव्वळ देशांतर्गत उत्पन्न व निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न [स्थिर किमतींनुसार (पायाभूत वर्ष २०११-१२)] | ३७ |
| **परि. ३.९** | सांकेतिक स्थूल जिल्हा उत्पन्न (चालू किमतींनुसार), वास्तविक स्थूल जिल्हा उत्पन्न [स्थिर किमतींनुसार (पायाभूत वर्ष २०११-१२)] दरडोई सांकेतिक निव्वळ जिल्हा उत्पन्न - चालू किमतींनुसार (दरडोई जिल्हा उत्पन्न) | ३८ |
| **परि. ४.१** | महाराष्ट्रातील ग्रामीण क्षेत्राकरिता गटनिहाय ग्राहक किंमत निर्देशांक | ५१ |
| **परि. ४.२** | महाराष्ट्रातील नागरी क्षेत्राकरिता गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक | ५२ |
| **परि. ४.३** | राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत  सरकार यांचेकडून राज्याकरीता ग्रामीण, नागरी व एकत्रित क्षेत्रासाठी परिगणित केलेले गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक | ५३ |
| **परि. ४.४** | महाराष्ट्र व अखिल भारताकरिता शेत मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक  व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | ५४ |
| **परि. ४.५** | अखिल भारतीय औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | ५५ |
| **परि. ४.६** | अखिल भारत स्तरावरील निरनिराळ्या महत्त्वाच्या ग्राहक किंमती निर्देशांकांवर आधारित चलनवाढ | ५६ |
| **परि. ४.७** | महाराष्ट्रातील केंद्रांसाठी औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | ५७ |
| **परि. ४.८** | महाराष्ट्रातील केंद्रांसाठी औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | ५८ |
| **परि. ४.९** | अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांक | ५९ |
| **परि. ४.१०** | जिल्हानिहाय शिधापत्रिका धारकांची संख्या (दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी) | ६० |
| **परि. ४.११** | केंद्र शासनाकडून राज्याला मिळालेले तांदूळ व गहू यांचे नियतन | ६१ |
| **परि. ४.१२** | अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांना तांदूळ व गहू यांचे वितरण | ६१ |
| **परि. ४.१३** | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अंत्योदय अन्न योजना कुटुंबांना सन २०२४-२५ करीता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण | ६२ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. ४.१४** | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत प्राधान्य कुटुंबांना सन २०२४-२५ करिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण | ६४ |
| **परि. ४.१५** | जिल्हानिहाय गोदामांची आणि रास्त भाव दुकानांची संख्या डिसेंबर २०२५ पर्यंत | ६६ |
| **परि. ५.१** | वित्तीय निर्देशकांची मालिका | ८१ |
| **परि. ५.२** | महसुली व भांडवली लेख्यांवरील जमेचा तपशील | ८२ |
| **परि. ५.३** | महसुली व भांडवली लेख्यांवरील विकास व विकासेतर खर्चाचा तपशील | ८३ |
| **परि. ५.४** | राज्य अर्थसंकल्पाचे आर्थिक व उद्देशानुसार करण्यात येणाऱ्या वर्गीकरणावर आधारीत अंतिम उपभोग्य बाबींवरील व भांडवल निर्मितीवरील खर्च | ८४ |
| **परि. ५.५** | वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे | ८५ |
| **परि. ६.१** | सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज | ९७ |
| **परि. ६.२** | जिल्हानिहाय वार्षिक पत आराखडा (२०२५-२६) | ९८ |
| **परि. ६.३** | जिल्हानिहाय प्रधान मंत्री जन-धन योजनेचा तपशील | ९९ |
| **परि. ७.१** | कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, एकूण वहितीचे क्षेत्र व सरासरी वहिती क्षेत्र | १३३ |
| **परि. ७.२** | राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी | १३४ |
| **परि. ७.३** | राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता | १३५ |
| **परि. ७.४** | राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक | १३८ |
| **परि. ७.५** | सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी | १३९ |
| **परि. ७.६** | राज्यातील पशुधन आणि कुक्कुटादी पक्षी | १४० |
| **परि. ८.१** | राज्यातील खनिजांचे उत्पादन | १६२ |
| **परि. ८.२** | राज्यातील उद्योगांच्या निवडक बाबी (वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत) | १६३ |
| **परि. ८.३** | भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक | १६५ |
| **परि. ८.४** | राज्यातील सहकारी संस्थांचा तपशील | १६६ |
| **परि. ९.१** | राज्यातील विजेची स्थापित क्षमता, निर्मिती व वापर | १९५ |
| **परि. ९.२** | राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील) | १९६ |
| **परि. ९.३** | जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील) | १९७ |
| **परि. ९.४** | राज्यातील मोटार वाहनांची संख्या | १९८ |
| **परि. १०.१** | माध्यम व शैक्षणिक स्तरनिहाय शाळांची संख्या, शिक्षकांची संख्या व विद्यार्थी संख्या | २६१ |
| **परि. १०.२** | विभागनिहाय व शैक्षणिक स्तरनिहाय संस्था, पटसंख्या व शिक्षकांची संख्या | २६२ |
| **परि. १०.३** | सन २०२४-२५ मधील डिसेंबर पर्यंत आरोग्य विज्ञान संस्थांची संख्या, प्रवेश क्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २६३ |
| **परि. १०.४** | सन २०२४-२५ मधील डिसेंबर पर्यंत तंत्रशिक्षण संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २६४ |
| **परि. १०.५** | सन २०२४-२५ मधील डिसेंबर पर्यंत कला, विज्ञान, वाणिज्य, इतर बिगर- कृषि अभ्यासक्रम, विधी, शिक्षणशास्त्र व ललित कला अभ्यासक्रमांकरीता एकूण संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २६५ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. १०.६** | सन २०२५-२६ मधील जानेवारी पर्यंत कृषि, पशु व मत्स्य विज्ञान अभ्यासक्रमांकरीता संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २६६ |
| **परि. १०.७** | राज्यातील उपलब्ध सार्वजनिक वैद्यकीय सुविधा | २६७ |
| **परि. १०.८** | राज्यातील जिल्हानिहाय वैद्यकीय सुविधा (डिसेंबर २०२५ अखेर) | २६८ |
| **परि. १०.९** | राज्याचे नमुना नोंदणी पाहणीवर आधारित जन्मदर, मृत्युदर, अर्भकमृत्युदर व एकूण जननदर | २६९ |
| **परि. १०.१०** | जनगणना २०११ नुसार कामगारांचे आर्थिक कार्यानुसार वर्गीकरण | २७० |
| **परि. १०.११** | राज्यातील विविध उद्योगांतील सरासरी दैनिक रोजगार | २७१ |
| **परि. १०.१२** | राज्यातील कार्यरत कारखाने व त्यातील रोजगार | २७२ |
| **परि. १०.१३** | राज्यातील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या, अधिसूचित केलेली रिक्त पदे व भरलेली पदे | २७३ |
| **परि. १०.१४** | कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांच्या चालू नोंदवहीत ऑक्टोबर २०२५ अखेर असलेल्या व्यक्तींची शैक्षणिक पात्रतेनुसार संख्या | २७४ |
| **परि. १०.१५** | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेल्या राज्यातील विविध कामांच्या वर्गीकरणानुसार पूर्ण झालेल्या कामांची संख्या व त्यावरील खर्च | २७५ |
| **परि. १०.१६** | राज्यातील औद्योगिक विवाद | २७६ |
| **परि. १०.१७** | राज्यातील जिल्हानिहाय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक | २७७ |
| **परि. १०.१८** | जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक २०११ | २७८ |

# राज्याचा संक्षिप्त आढावा

महाराष्ट्र राज्य हे विस्तीर्ण अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर स्थित असून देशाच्या पश्चिम व मध्य द्विपकल्पीय प्रदेशामध्ये वसलेले आहे. राज्याच्या पश्चिमेला ८७७.९७ किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा व सह्याद्रीच्या पर्वतरांगा, उत्तरेला सातपुडा पर्वतरांगा आणि पूर्वेला भामरागड-चिरोली-गायखुरी पर्वतरांगा या नैसर्गिक सीमा लाभल्या आहेत. राज्याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेस तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा ही राज्ये आहेत. प्रशासकीय सोयीसाठी राज्याची विभागणी ३६ जिल्हे व ६ महसुली विभागांमध्ये करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात उष्ण, पावसाळी व थंड असे उष्ण कटिबंधीय मोसमी हवामान आहे. मार्च महिन्यात उन्हाळ्याची सुरुवात होते, त्यानंतर जूनच्या सुरुवातीला पावसाळा येतो आणि नोव्हेंबरमध्ये हिवाळा येतो.

महाराष्ट्र राज्य लोकसंख्येनुसार देशात दुसऱ्या क्रमांकाचे तर क्षेत्रफळानुसार देशात तिसऱ्या क्रमांकाचे राज्य असून देशातील मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालेल्या राज्यांपैकी एक आहे. राज्य रस्ते, रेल्वे, हवाई, जल मार्गाने आणि मोनोरेल तसेच मेट्रोरेल सारख्या अत्याधुनिक वाहतूक व्यवस्थेद्वारे जोडले गेले आहे. नाविन्यपूर्ण अभियांत्रिकी रचना असलेला भारतातील सर्वात लांब सागरी सेतू अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू मुंबई येथे आहे.

सुविकसित पायाभूत सुविधा, मुबलक नैसर्गिक संसाधने, देशाच्या प्रमुख भागांशी संपर्क, कुशल मनुष्यबळ आणि दर्जेदार शिक्षण यामुळे महाराष्ट्र हे नवीन उद्योग स्थापित करण्यासाठी एक आदर्श राज्य आहे.

राज्याची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून राष्ट्रीयीकृत बँका, अग्रगण्य वित्त संस्था, कार्पोरेट संस्थांच्या व कंपन्यांच्या मुख्य कार्यालयांचे माहेरघर आहे. आशिया खंडातील सर्वात जुना शेअर बाजार, मुंबई शेअर बाजार हा देखील महाराष्ट्रात आहे.

महाराष्ट्राला समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभला असून उत्साही परंपरा आणि उत्सवांसाठी राज्य ओळखले जाते. राज्यात विविध चालीरिती व परंपरा यांचा संगम असून महाराष्ट्राला पारंपारिक लोकसंगीत व नृत्यासह उच्च दर्जाची संगीत नाट्य परंपरा आहे. महाराष्ट्रीय खाद्य संस्कृती प्रदेशानुसार बदलते. मालवणी (कोंकणी), कोल्हापूरी आणि वऱ्हाडी पाककृती या सुप्रसिद्ध प्रादेशिक पाककृती आहेत. सर्व प्रमुख धार्मिक सण राज्यात शांततेने व सौहार्दाने साजरे केले जातात.

अजंठा, वेरूळ व घारापुरी लेणी, १९ व्या शतकातील नव-गॉथिक शैलीतील सार्वजनिक इमारती व २० व्या शतकातील आर्ट डेको इमारती, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ही जागतिक वारसा स्थळे राज्यात आहेत. नाशिक जिल्ह्यातील नांदूर मधमेश्वर, बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर आणि ठाणे खाडी ही रामसर स्थळे आहेत. ही जागतिक वारसा स्थळे, वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेले गेट वे ऑफ इंडिया, विहार व चैत्य, वन्यजीव व पक्षी अभयारण्ये, समुद्र किनारे, गडकिल्ले, गुंफा, तलाव व धबधबे आणि रामसर स्थळे जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात.

सन २०२५ मध्ये युनेस्कोने 'मराठा लष्करी वारसा परिसर' यास जागतिक वारसा स्थळाचा दर्जा प्रदान केला असून यामध्ये महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी हे ११ किल्ले व तामिळनाडूतील जिंजी अशा एकूण १२ किल्ल्यांचा समावेश आहे.

भारतातील आधुनिक शिक्षण पद्धतीच्या विकासासाठी महाराष्ट्राची ओळख आहे. राज्यामध्ये आधुनिक व सुसज्ज पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, ज्यामध्ये आरोग्य सेवांचा देखील समावेश होतो. क्रीडा, कला, साहित्य व सामाजिक सेवा या क्षेत्रांमध्ये राज्याचे भरीव योगदान आहे. मनोरंजन क्षेत्रात जागतिक स्तरावर नावाजलेले बॉलीवूड हे देखील राज्याचा हिस्सा आहे.

देशाच्या शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचालीमध्ये पुरोगामी व प्रगतिशील महाराष्ट्र राज्याचा नेहमीच भरीव सहभाग राहिला आहे.

* * * * *

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| | बाब<br>(१) | १९६०-६१<br>(२) | १९७०-७१<br>(३) | १९८०-८१<br>(४) | १९९०-९१<br>(५) | २०००-०१<br>(६) | २०१०-११<br>(७) | २०२०-२१<br>(८) | २०२४-२५<br>(९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **भौगोलिक रचना -** क्षेत्र (हजार चौ. किमी) | ३०६ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ |
| | समुद्र किनाऱ्याची लांबी (किमी) | ७२० | ७२० | ७२० | ७२० | ७२० | ७२० | ७२० | ८७८ |
| २. | **प्रशासकीय रचना -** | | | | | | | | |
| | महसूली विभाग | ४ | ४ | ६ | ६ | ६ | ६ | ६ | ६ |
| | जिल्हे | २६ | २६ | २८ | ३१ | ३५ | ३५ | ३६ | ३६ |
| | तालुके | २२९ | २३५ | ३०१ | ३०३ | ३५३ | ३५५[@@] | ३५५[@@] | ३५५[@@] |
| | वस्ती असलेली गावे | ३५,८५१ | ३५,७७८ | ३९,३५४ | ४०,४१२ | ४१,०९५ | ४०,९५९ | ४०,९५९ | ४०,९५९ |
| | वस्ती नसलेली गावे | ३,०१६ | २,८८३ | २,४७९ | २,६१३ | २,६१६ | २,७०६ | २,७०६ | २,७०६ |
| | शहरे [#] | २६६ | २८९ | ३०७ | ३३६ | ३७८ | ५३४ | ५३४ | ५३४ |
| ३. | **जनगणनेनुसार लोकसंख्या-** (हजारात) | (१९६१) | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | (२०११) | (२०११) |
| | एकूण | ३९,५५४ | ५०,४१२ | ६२,७८४ | ७८,९३७ | ९६,८७९ | १,१२,३७४ | १,१२,३७४ | १,१२,३७४ |
| | पुरुष | २०,४२९ | २६,११६ | ३२,४१५ | ४०,८२६ | ५०,४०१ | ५८,२४३ | ५८,२४३ | ५८,२४३ |
| | स्त्रिया | १९,१२५ | २४,२९६ | ३०,३६९ | ३८,१११ | ४६,४७८ | ५४,१३१ | ५४,१३१ | ५४,१३१ |
| | ग्रामीण | २८,३९१ | ३४,७०१ | ४०,७९१ | ४८,३९५ | ५५,७७८ | ६१,५५६ | ६१,५५६ | ६१,५५६ |
| | नागरी | ११,१६३ | १५,७११ | २१,९९३ | ३०,५४२ | ४१,१०१ | ५०,८१८ | ५०,८१८ | ५०,८१८ |
| | अनुसूचित जाती | २,२२७ | ३,०२५ | ४,४८० | ८,७५८ | ९,८८२ | १३,२७६ | १३,२७६ | १३,२७६ |
| | अनुसूचित जमाती | २,३९७ | २,९५४ | ५,७७२ | ७,३१८ | ८,५७७ | १०,५१० | १०,५१० | १०,५१० |
| | लोकसंख्येची घनता (प्रति चौ. किमी) | १२९ | १६४ | २०४ | २५७ | ३१५ | ३६५ | ३६५ | ३६५ |
| | साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | ३५.१ | ४५.८ | ५५.८ | ६४.९ | ७६.९ | ८२.३ | ८२.३ | ८२.३ |
| | स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रति हजार पुरुष) | ९३६ | ९३० | ९३७ | ९३४ | ९२२ | ९२९ | ९२९ | ९२९ |
| | नागरी लोकसंख्येचे प्रमाण (टक्के) | २८.२ | ३१.२ | ३५.० | ३८.७ | ४२.४ | ४५.२ | ४५.२ | ४५.२ |
| ४. | **सांकेतिक राज्य उत्पन्न -** | | | | | | | | |
| | राज्य उत्पन्न (₹ कोटी) | २,२४९ | ५,७८० | १९,३७७ | ६८,८६१ | २,४३,५८४ | ९,५०,७७१ | २२,६१,७१९ | ४०,६५,५६५[+†] |
| | कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र (₹ कोटी) | ५८५ | १,०७८ | ३,७५६ | १२,३२६ | ३२,७११ | १,२२,९३२ | २,९०,३९४ | ४,२९,३८४[+††] |
| | उद्योग क्षेत्र (₹ कोटी) | ५५३ | १,७३२ | ६,२२४ | २२,५५४ | ६४,९४२ | २,६३,५१२ | ५,३५,०८२ | ८,८७,४६७[+††] |
| | सेवा क्षेत्र (₹ कोटी) | १,१११ | २,९६९ | ९,३९७ | ३३,९८१ | १,४५,९३१ | ५,६४,३२६ | ११,५७,७४३ | २१,६६,४०७[+††] |
| | दरडोई राज्य उत्पन्न (₹) | ५७६ | १,१६८ | ३,११२ | ८,८११ | २८,५४० | ८४,८५८ | १,८२,४५४ | ३,१७,८०१[+] |
| ५. | **पर्जन्य**-सरासरीशी तुलना (टक्के) | | | | | | १०२.३ | ११३.४ | ११६.८ |
| ६. | **कृषि** - (क्षेत्र हजार हेक्टर) | | | | | | | | |
| | निव्वळ पेरणी क्षेत्र | १७,८७८ | १७,६६८ | १८,२९९ | १८,५६५ | १७,८४४ | १७,४०६ | १६,६५० | १६,५७१[Φ] |
| | पिकांखालील स्थूल क्षेत्र | १८,८२३ | १८,७३७ | १९,६४२ | २१,८५९ | २१,६१९ | २३,१७५ | २३,८९९ | २४,२२४[Φ] |
| | स्थूल सिंचित क्षेत्र | १,२२० | १,५७० | २,४१५ | ३,३१९ | ३,८५२ | @ | @ | @ |
| | *त्यापैकी* लाभ क्षेत्र ^ | २२६[$] | ४२२ | ७१८ | १,०७६[$$] | १,७६४[##] | २,९५५[##] | ४,१६०[##!] | ४,०५५ |
| | स्थूल सिंचित क्षेत्राचे पिकांखालील एकूण स्थूल क्षेत्राशी प्रमाण (टक्के) | ६.५ | ८.४ | १२.३ | १५.२ | १७.८ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ७. | **प्रमुख पिकांखालील क्षेत्र -** (हजार हेक्टर) | | | | | | | | |
| | तांदूळ | १,३०० | १,३५२ | १,४५९ | १,५९७ | १,५१२ | १,५१६ | १,५६१ | १,६८२ |
| | गहू | ९०७ | ८१२ | १,०६३ | ८६७ | ७५४ | १,३०७ | १,१२६ | १,१८९ |
| | ज्वारी | ६,२८४ | ५,७०३ | ६,४६९ | ६,३०० | ५,०९४ | ४,०६० | २,३२० | १,६९२ |
| | बाजरी | १,६३५ | २,०३९ | १,५३४ | १,९४० | १,८०० | १,०३५ | ६८७ | ४४४ |
| | सर्व तृणधान्ये | १०,६०६ | १०,३२० | १०,९७६ | ११,१३६ | ९,८२४ | ८,९८५ | ७,०७९ | ६,७५० |
| | सर्व कडधान्ये | २,३४९ | २,५६६ | २,७१५ | ३,२५७ | ३,५५७ | ४,०३८ | ४,५९५ | ४,९८७ |
| | सर्व अन्नधान्ये | १२,९५५ | १२,८८६ | १३,६९१ | १४,३९३ | १३,३८२ | १३,०२३ | ११,६७४ | ११,७३६ |

उ.ना. उपलब्ध नाही @@ मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांमधील तीन तालुके वगळून # गणना शहरांसह + पहिले सुधारित अंदाज (पायाभूत वर्ष २०११-१२) $ १९६१-६२ $$ १९९१-९२

† बाजार किंमतींनुसार सांकेतिक निव्वळ राज्य उत्पन्न †† मूळ किंमतींनुसार सांकेतिक निव्वळ राज्य मूल्यवृद्धी ! अंदाजित ^ जलसंपदा विभागाकडून निर्मित लाभक्षेत्र

@ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि. २६ ऑगस्ट २०१६ रोजीच्या शासन निर्णया अन्वये माहिती संकलनाच्या पद्धतीबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत

## प्रकल्प कालव्यांवरील उपसा व धरणातून नदी नाल्यांमध्ये सोडलेल्या पाण्यामुळे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र समाविष्ट Φ सन २०२३-२४ या वर्षाकरीता

टीप : राज्य उत्पन्नाचे १९६०-६१ ते २०१०-११ चे अंदाज घटक खर्चावर आधारित आहेत

## अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब<br>(१) | १९६०-६१<br>(२) | १९७०-७१<br>(३) | १९८०-८१<br>(४) | १९९०-९१<br>(५) | २०००-०१<br>(६) | २०१०-११<br>(७) | २०२०-२१<br>(८) | २०२४-२५<br>(९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऊस क्षेत्र | १५५ | २०४ | ३१९ | ५३६ | ६८७ | १,०४१ | उ.ना. | उ.ना. |
| ऊस तोडणी क्षेत्र | १५५ | १६७ | २५८ | ४४२ | ५९५ | ९६५ | १,१४३ | १,१६७ |
| कापूस | २,५०० | २,७५० | २,५५० | २,७२१ | ३,०७७ | ३,९४२ | ४,५४५ | ४,१२३ |
| भूईमूग | १,०८३ | ९०४ | ६९५ | ८६४ | ४९० | ३९५ | ३०९ | २५० |
| ८. **प्रमुख पिकांचे उत्पादन -** (हजार टन) | | | | | | | | |
| तांदूळ | १,३६९ | १,६६२ | २,३१५ | २,३४४ | १,९३० | २,६९१ | ३,२९१ | ४,००३ |
| गहू | ४०१ | ४४० | ८८६ | ९०९ | ९४८ | २,३०१ | २,०७१ | २,४५४ |
| ज्वारी | ४,२२४ | १,५५७ | ४,४०९ | ५,९२९ | ३,९८८ | ३,४५२ | २,१८६ | १,८४६ |
| बाजरी | ४८९ | ८२४ | ६९७ | १,११५ | १,०८७ | १,१२३ | ९०६ | ५६५ |
| सर्व तृणधान्ये | ६,७५५ | ४,७३७ | ८,६४७ | १०,७४० | ८,४९७ | १२,३१७ | १२,२०१ | १३,४६८ |
| सर्व कडधान्ये | ९८९ | ६७७ | ८२५ | १,४४१ | १,६३७ | ३,०९६ | ४,४४४ | ५,२७४ |
| सर्व अन्नधान्ये | ७,७४४ | ५,४१४ | ९,४७२ | १२,१८१ | १०,१३४ | १५,४१३ | १६,६४६ | १८,७४३ |
| ऊस | १०,४०४ | १४,४३३ | २३,७०६ | ३८,१५४ | ४९,५६९ | ८५,६९१ | १,११,६४२ | १,०९,९७४ |
| कापूस (रुई)# | १,६७३ | ४८४ | १,२२४ | १,८७५ | १,८०३ | ७,४७३ | १०,११० | ७,३८५ |
| भुईमूग | ८०० | ५८६ | ४५१ | ९७९ | ४७० | ४७० | ४०७ | ३६१ |
| ९. **कृषि उत्पादनाचा निर्देशांक@-** | -- | -- | -- | १३६.५ | १२७.४ | २२३.८ | २८४.३ | २९४.४ |
| १०. **कृषि गणना -** | | (१९७०-७१) | (१९८०-८१) | (१९९०-९१) | (२०००-०१) | (२०१०-११) | (२०१५-१६) | (२०२१-२२)* |
| वहिती खातेदारांची संख्या (हजार) | -- | ४,९५१ | ६,८६३ | ९,४७० | १२,१३८ | १३,६९९ | १५,२८५ | १७,१११ |
| वहिती क्षेत्र (हजार हेक्टर) | -- | २१,१७९ | २१,३६२ | २०,९२५ | २०,१०३ | १९,७६७ | २०,५०६ | २१,०५८ |
| वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) | -- | ४.२८ | ३.११ | २.२१ | १.६६ | १.४४ | १.३४ | १.२३ |
| ११. **पशुधन गणना -** | (१९६६) | (१९७८) | (१९८७) | (१९९७) | (२००७) | (२०१२) | (२०१९) | (२०१९) |
| एकूण पशुधन (हजार) | २५,४४९ | २९,६४२ | ३४,२५५ | ३९,६३८ | ३५,९५५ | ३२,४८९ | ३३,०८० | ३३,०८० |
| एकूण कुक्कुटादी पक्षी+ (हजार) | ९,९०२ | १८,७५१ | २४,८३० | ३५,३९२ | ६४,८००@@ | ७७,७९५@@ | ७४,२९८@@ | ७४,२९८@@ |
| | | | | | | (२००३) | (२००३) | (२००३) |
| ट्रॅक्टर | १,४२७ | ३,२७४ | १२,९१७ | ३४,५२९ | ७९,८९३ | १,०५,६११ | १,०५,६११ | १,०५,६११ |
| १२. **वन क्षेत्र** (चौ. किमी) | | | | | | | (२०२१) | (२०२४) |
| | ६३,५४४ | ६२,३११ | ६४,२२२ | ६३,७९८ | ६१,९३५ | ६१,९३९ | ६१,९९२ | ६२,०१६ |
| १३. **औद्योगिक गुंतवणूक -** | | | | | | | (२०२०)$ | (२०२४)$$ |
| मंजूर प्रकल्प (संख्या) | -- | -- | -- | -- | -- | १६,६८६ | २०,९०९ | ३०,६१० |
| प्रस्तावित गुंतवणूक (₹ कोटी) | -- | -- | -- | -- | -- | ८,१०,८६४ | १४,२९,१४२ | २०,३६,५६७ |
| १४. **वीज -** (दशलक्ष कि. वॅ. तास) | | | | | | | | |
| एकूण निर्मिती | ३,२६८ | ७,९२५ | १७,८६४ | ३६,४३० | ६१,२०९ | ८३,०१७ | १,१५,०६० | १,४०,१७१ |
| एकूण वापर | २,७२० | ७,६५० | १४,०३४ | २९,९७१ | ४७,२८९ | ८७,३९६ | १,२४,६९१ | १,६६,२२४ |
| औद्योगिक वापर | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ४४,१०९ | ६५,४५९ |
| कृषि वापर | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | ३३,९२४ | ३८,४२८ |
| घरगुती वापर | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४६ | ३०,२२९ | ३७,२११ |

# कापसाचे उत्पादन १७० किलोची एक गासडी याप्रमाणे हजार गासड्यांमध्ये    @ पाया - त्रैवार्षिक सरासरी १९७९-८२ = १००    उ.ना. उपलब्ध नाही

$$ ऑगस्ट १९९१ जुलै २०२४    $ ऑगस्ट १९९१ ते ऑक्टोबर २०२०    @@ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये कुक्कुटपालन केंद्रामधील पक्षी समाविष्ट

+ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये टर्की, क्वेल व इतर कुक्कुटादी पक्षी समाविष्ट

* अस्थायी

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०२०-२१ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **१५. बँका- (अनुसूचित वाणिज्यिक)** | | (जून १९७१) | (जून १९८१) | (जून १९९१) | (जून २००१) | (जून २०१०) | (३१ मार्च २०२१) | (३१ मार्च २०२५) |
| बँक कार्यालये | उ.ना. | १,४७१ | ३,६२७ | ५,५९१ | ६,२९४ | ८,०३७ | १३,१६० | १४,३३१ |
| | | | | (मार्च १९९१) | (मार्च २००१) | | | |
| ग्रामीण लोकसंख्येसाठी बँक कार्यालये | उ.ना. | ४५० | १,३५५ | २,७४९ | २,२९४ | २,१७० | ३,१८६ | ३,३११ |
| **१६. शिक्षण+ -** | | | | | | | | |
| प्राथमिक शाळा | ३४,५९४ | ४४,५३५ | ५१,०४५ | ५७,७४४ | ६५,९६० | ७५,६९५ | १,०६,३३८ | १,०४,५२६ |
| विद्यार्थी (हजार) | ४,१७८ | ६,५३९ | ८,३९२ | १०,४२४ | ११,८५७ | १०,६२६ | १५,३९१ | १४,५०० |
| माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) | २,४६८ | ५,३१३ | ६,११९ | १०,५१९ | १५,३८९ | २१,३५७ | २८,५०५ | २९,६४१ |
| विद्यार्थी (हजारात) | ८५८ | १,९८५ | ३,३०९ | ६,२६० | ९,२६७ | १०,७११ | ६,५२४ | ६,३६२ |
| **१७. आरोग्य -** | | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | (२०२१) | (२०२४) |
| रुग्णालये | उ.ना. | २९९ | ५३० | ७६८ | ९८१ | १,३६८ | ५८६# | ५२८# |
| दवाखाने | उ.ना. | १,३७२ | १,७७६ | १,८९६ | १,६२९ | ३,०१२ | १,०२४# | ८५१# |
| दर लाख लोकसंख्येमागे खाटा | उ.ना. | ८८ | ११४ | १४४ | १०५ | १०३ | ५९.०५# | ७३.३४# |
| | | | | | | | (२०२०) | (२०२३) |
| जन्मदर@ | ३४.७ | ३२.२ | २८.५ | २६.२ | २०.७ | १६.७ | १५.० | १४.० |
| मृत्यूदर@ | १३.८ | १२.३ | ९.६ | ८.२ | ७.५ | ६.३ | ५.५ | ६.१ |
| अर्भक मृत्यूदर@ | ८६ | १०५ | ७९ | ६० | ४५ | २५ | १६ | १४ |
| **१८. वाहतूक -** | | | | | | | | |
| रेल्वे मार्गाची लांबी (किमी) | ५,०५६ | ५,२२६ | ५,२३३ | ५,४३४ | ५,४५९ | ५,९८४ | ६,२०४ | ६,२९६ |
| एकूण रस्त्यांची लांबी (किमी) † | ३९,२४१ | ६५,३६४ | १,४१,१३१ | १,७२,९६५ | २,१६,९६८ | २,४१,७१२ | ३,२३,११५ | ३,४५,८२२* |
| *त्यापैकी* पृष्ठांकित | २४,८५२ | ३५,८५३ | ६६,६१६ | १,३२,०४८ | १,७८,९९९ | २,२१,१८२ | २,५९,७१० | २,७३,२१६* |
| मोटार वाहने (हजार) | १०० | ३१२ | ८०५ | २,६४१ | ६,६०७ | १६,९९० | ३८,६३६++ | ४८,८२५++* |
| **१९. सहकार -** | | | | | | | | |
| प्राथमिक कृषि पतसंस्था | २१,४०० | २०,४२० | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २०,८९७ | २१,२८४* |
| सभासद (लाख) | २२ | ३८ | ५४ | ७९ | १०१ | १५० | १५३ | १५७* |
| सहकारी संस्थांची संख्या | ३१,५६५ | ४२,५९७ | ६०,७४७ | १,०४,६२० | १,५८,०१६ | २,२४,२४६ | २,१७,४१० | २,३३,५१३* |
| सभासद (लाख) | ४२ | ८६ | १४८ | २६९ | ४३० | ५३० | ५८१ | ६१५* |
| सहकारी संस्थांचे खेळते भांडवल (₹ कोटी) | २९१ | १,४८९ | ५,२१० | २४,२८४ | १,३४,४४० | २,४८,४३४ | ४,४९,९६६ | ५,२८,६७२* |
| **२०. स्थानिक स्वराज्य संस्था -** | | | | | | | | |
| जिल्हा परिषदा | २५ | २५ | २५ | २९ | ३३ | ३३ | ३४ | ३४++ |
| ग्रामपंचायती | २१,६३६ | २२,३०० | २४,२८१ | २५,८२७ | २७,७३५ | २७,९१३ | २७,८३२ | २७,८२९++ |
| पंचायत समित्या | २९५ | २९६ | २९६ | २९८ | ३२१ | ३५१ | ३५१ | ३५१++ |
| नगर परिषदा | २१९ | २२१ | २२० | २२८ | २२८ | २२२ | २४१ | २४७++ |
| महानगरपालिका | ३ | ४ | ५ | ११ | १५ | २३ | २७ | २९++ |
| नगर पंचायत | -- | -- | -- | -- | ३ | ४ | १२८ | १४७++ |
| कटक मंडळे | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ |

* अस्थायी @ नमुना नोंदणी पाहणी प्रमाणे उ.ना. उपलब्ध नाही † राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्ते

\# माहितीमध्ये फक्त शासकीय आरोग्य संस्थांचा समावेश आहे. ++ दि. १ जानेवारी २०२६ रोजी

\+ वर्ष २०११-१२ पासून सदर माहितीचा आधार बदलला असल्यामुळे सदर माहिती प्राथमिक शाळा (इयत्ता १ ते ८) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (इयत्ता ९ ते १२) या स्वरुपात प्राप्त झाली असून पूर्वीची माहिती प्राथमिक शाळा (१ ते ७) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (इयत्ता ८ ते १२) या स्वरुपात आहे. तसेच सदर माहितीचा आधार महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद आहे

# ब. महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| बाब<br>(१) | परिमाण<br>(२) | महाराष्ट्र<br>(३) | भारत<br>(४) | भारताशी तुलना (टक्केवारी)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| **१. लोकसंख्या (२०११)** | | | | |
| १.१ एकूण लोकसंख्या | हजार | १,१२,३७४ | १२,१०,८५५ | ९.३ |
| (अ) पुरुष | -"- | ५८,२४३ | ६,२३,२७० | ९.३ |
| (ब) स्त्रिया | -"- | ५४,१३१ | ५,८७,५८५ | ९.२ |
| १.२ (अ) ग्रामीण लोकसंख्या | हजार | ६१,५५६ | ८,३३,७४९ | ७.४ |
| (ब) ग्रामीण लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ५४.८ | ६८.९ | -- |
| १.३ (अ) नागरी लोकसंख्या | हजार | ५०,८१८ | ३,७७,१०६ | १३.५ |
| (ब) नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ४५.२ | ३१.१ | -- |
| १.४ स्त्री-पुरुष प्रमाण | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या | ९२९ | ९४३ | -- |
| १.५ लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धिदर (२००१-२०११) | टक्के | १६.० | १७.७ | -- |
| १.६ साक्षरता दर | -"- | ८२.३ | ७३.० | -- |
| १.७ अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लोकसंख्या | हजार | २३,७८६ | ३,०५,९२४ | ७.८ |
| १.८ एकूण काम करणारे | -"- | ४९,४२८ | ४,८१,८८९ | १०.३ |
| १.९ भौगोलिक क्षेत्र | लाख चौ. किमी | ३.१ | ३२.९ | ९.४ |
| **२. कृषि (२०२२-२३)** | | | | |
| २.१ निव्वळ पेरणी क्षेत्र | हजार हेक्टर | १६,४९१ | १,४०,७०५ | ११.७ |
| २.२ पिकांखालील स्थूल क्षेत्र | -"- | २४,४१५ | २,१९,३५७ | ११.१ |
| २.३ स्थूल सिंचित क्षेत्र | -"- | उ.ना. | १,२२,२९४ | -- |
| २.४ स्थूल सिंचित क्षेत्राची एकूण पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी | टक्के | उ.ना. | ५५.८ | -- |
| २.५ प्रमुख पिकांखालील क्षेत्र (२०२०-२१ ते २०२२-२३ या वर्षांची सरासरी) | | | | |
| (१) तांदूळ | हजार हेक्टर | १,६५२ | ४७,३१३ | ३.५ |
| (२) गहू | -"- | १,१२८ | ३१,२३१ | ३.६ |
| (३) ज्वारी | -"- | १,८४४ | ३,८०४ | ४८.५ |
| (४) बाजरी | -"- | ५३७ | ७,२६३ | ७.४ |
| (५) एकूण तृणधान्ये | -"- | ६,५९१ | १,०२,४४६ | ६.४ |
| (६) एकूण अन्नधान्ये (तृणधान्ये व कडधान्ये) | -"- | ११,३५६ | १,३१,४९२ | ८.६ |
| (७) ऊस क्षेत्र | -"- | उ.ना. | ५,६०० | -- |
| ऊस तोडणी क्षेत्र | -"- | १,४७१ | उ.ना. | -- |
| (८) कापूस | -"- | ४,३१२ | १२,६६२ | ३३.५ |
| (९) भूईमूग | -"- | २६७ | ५,१२४ | ५.२ |

उ.ना. उपलब्ध नाही

## महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती (पुढे चालू...)

| बाब<br>(१) | परिमाण<br>(२) | महाराष्ट्र<br>(३) | भारत<br>(४) | भारताशी तुलना (टक्केवारी)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| **३. पशुधन गणना** | | | | |
| ३.१ एकूण पशुधन (२०१९) | हजार | ३३,०८० | ५,३६,७६१ | ६.२ |
| ३.२ व्हील ट्रॅक्टर्स (२००३) | -"- | १०४ | २,३६१ | ४.४ |
| ३.३ सिंचनाकरिता वापरलेली डिझेल इंजिने व विद्युत पंप (२००३) | -"- | १,०८७ | १५,६८४ | ६.९ |
| **४. वने** | | | | |
| ४.१ एकूण वन क्षेत्र (२०२३) | चौ. किमी | ६१,९५२ | ७,७५,३७७ | ८.० |
| **५. उद्योग** | | | | |
| ५.१ थेट विदेशी गुंतवणूक$$ | ₹ कोटी | ६,९७,३०४ | २२,०८,५७८ | ३१ |
| ५.२ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग$ | संख्या (लाख) | ६३.८५ | ४६३.१७ | १४ |
| ५.३ एकूण निर्यात (२०२४-२५) | ₹ कोटी | ५,५७,२७० | ३७,०१,०७० | १५ |
| **६. वीज (२०२४-२५)** | | | | |
| ६.१ एकूण निर्मिती | दशलक्ष कि. वॅ. तास | १,४०,१७१ | १८,२४,२१४ | ७.७ |
| ६.२ एकूण वापर# | -"- | १,६६,२२४ | १४,२२,९४८ | ११.७ |
| ६.३ (अ) औद्योगिक वापर | -"- | ६५,४५९ | ४,७९,६१७ | १३.६ |
| (ब) औद्योगिक वापराची एकूण वापराशी टक्केवारी | टक्के | ३९.४ | ३३.७ | - |
| **७. बँका** (अनुसूचित वाणिज्यिक) (मार्च २०२५) | | | | |
| ७.१ बँक कार्यालये | संख्या | १४,३३१ | १,६३,७२१ | ८.८ |
| ७.२ ग्रामीण बँक कार्यालये (मार्च २०२५) | -"- | ३,३११ | ५५,९७५ | ५.९ |
| **८. राज्य / राष्ट्रीय उत्पन्न (२०२४-२५)** | | | | |
| ८.१ सांकेतिक (नॉमिनल) स्थूल राज्य उत्पन्न / सांकेतिक (नॉमिनल) स्थूल देशांतर्गत उत्पन्न† | ₹ कोटी | ४६,२२,१३८+ | ३,३०,६८,१४५* | १४.० |
| ८.२ सांकेतिक (नॉमिनल) उत्पन्न | ₹ कोटी | ४०,६५,५६५+ | २,९३,८७,८९२* | १३.८ |
| ८.३ चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न | ₹ | ३,१७,८०१+ | २,०५,३२४* | -- |

$$ ऑक्टोबर २०१९ ते मार्च २०२५ $ जुलै २०२० ते डिसेंबर २०२५ * अस्थायी अंदाज

+ पहिले सुधारित अंदाज # वितरण परवानाधारकांमार्फत ग्राहकांना केलेली वीज विक्री

† स्थूल राज्य उत्पन्न व स्थूल देशांतर्गत उत्पन्न बाजार किंमतीनुसार

# १ राज्य अर्थव्यवस्था





# १. राज्य अर्थव्यवस्था

१.१ राज्याची अर्थव्यवस्था देशातील सर्वात मजबूत आणि गतिशील अर्थव्यवस्था असून कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रांची वैविध्यपूर्ण रचना हा त्याचा आधार आहे. देशाची आर्थिक राजधानी मुंबई तसेच पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती या प्रमुख उदयोन्मुख विकासकेंद्रांमुळे राष्ट्रीय उत्पादन, गुंतवणूक आणि रोजगार यामध्ये राज्याचे योगदान लक्षणीय आहे. सुस्थापित उत्पादन समूह, वेगाने वाढणारे सेवा क्षेत्र आणि विस्तारित नवोन्मेष परिसंस्था यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त झाली आहे.

१.२ राज्यात गेल्या काही वर्षांत रस्ते, मेट्रो, बंदरे, विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर्स आणि लॉजिस्टिक्स या क्षेत्रांत झालेल्या भरीव गुंतवणुकीमुळे पायाभूत सुविधांच्या विकासाला वेग प्राप्त झाला आहे. व्यवसाय सुलभतेत सुधार, डिजिटल प्रशासनास प्रोत्साहन आणि क्षेत्रविशिष्ट वाढीस चालना यासारख्या सुधारणांमुळे राज्याची स्पर्धात्मक क्षमता वृध्दिंगत झाली आहे. शाश्वत विकास, औद्योगिक आधुनिकीकरण व सर्वसमावेशक वाढ यावरील धोरणात्मक लक्ष यामुळे राज्य देशांतर्गत आणि जागतिक गुंतवणूकदारांचे पसंतीचे स्थान होत आहे.

१.३ सलग पाचव्या वर्षीही राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीची गती कायम राहील असा अंदाज असून, चालू आर्थिक वर्षात ७.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. किंमतीची अनुकूल परिस्थिती तसेच चालू आर्थिक वर्षातील वस्तू व सेवा कराचे विक्रमी संकलन यामुळे या वाढीच्या गतीला लक्षणीय पाठबळ मिळाले आहे.

## राज्य उत्पन्न

१.४ सन २०२५-२६ च्या पुर्वानुमानानुसार, राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये सन २०२४-२५ च्या तुलनेत ७.९ टक्के वाढ अपेक्षित आहे, तर देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये ७.४ टक्के वाढ अपेक्षित आहे. सन २०२५-२६ मध्ये 'कृषि व संलग्न कार्ये', 'उद्योग' व 'सेवा' या क्षेत्रांच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित अनुक्रमे ३.४ टक्के, ५.७ टक्के व ९.० टक्के वाढ अपेक्षित आहे. पुर्वानुमानानुसार सन २०२५-२६ मध्ये सांकेतिक (चालू किंमतींनुसार) स्थूल राज्य उत्पन्न ₹ ५१,००,५९७ कोटी अंदाजित असून वास्तविक (सन २०११-१२ च्या स्थिर किंमतींनुसार) स्थूल राज्य उत्पन्न ₹ २८,८२,६९९ कोटी अंदाजित आहे.

१.५ पहिल्या सुधारित अंदाजांनुसार, सन २०२४-२५ चे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ₹ ४६,२२,१३८ कोटी अंदाजित आहे, तर दुसऱ्या सुधारित अंदाजांनुसार सन २०२३-२४ मध्ये ते ₹ ४१,१८,३७५ कोटी अपेक्षित आहे. सन २०२४-२५ चे वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न ₹ २६,७१,३६१ कोटी अंदाजित असून सन २०२३-२४ मध्ये ते ₹ २४,८८,५६० कोटी अपेक्षित आहे.

- पहिल्या सुधारित अंदाजांनुसार, सन २०२४-२५ मध्ये सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्नात राज्याच्या सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्नाचा हिस्सा सर्वाधिक (१४.० टक्के)
- सन २०२५-२६ च्या पुर्वानुमानानुसार, राज्याचे दरडोई उत्पन्न ₹ ३,४७,९०३ अंदाजित असून अखिल भारताकरिता ते ₹ २,१९,५७५ अपेक्षित

सांकेतिक व वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नाचे वृद्धिदर









## किंमती

१.६ माहे एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीसाठी राज्यातील ग्रामीण व नागरी क्षेत्राकरिता परिगणित सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३=१००) अनुक्रमे ४०१.८ व ३७६.७ होता. या कालावधीकरिता वर्ष-ते-वर्ष चलनवाढ ग्रामीण क्षेत्रासाठी २.० टक्के व नागरी क्षेत्रासाठी १.५ टक्के होती.

१.७ माहे सप्टेंबर २०२५ मध्ये करण्यात आलेल्या वस्तू व सेवा करांच्या दर सुधारणेमुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर सकारात्मक परिणाम झाला आहे. माहे जून ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्याच्या नागरी भागाकरिता 'खाद्यपदार्थ' गटाचा चलनवाढीचा दर जवळपास 'ऋण' राहिला आहे. माहे एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत 'खाद्यपदार्थ' गटाचा सरासरी चलनवाढीचा दर राज्यातील नागरी तसेच ग्रामीण भागासाठी एक टक्क्यांपेक्षा कमी राहिला आहे.







## सार्वजनिक वितरण

१.८ माहे डिसेंबर २०२५ पर्यंत, राज्यात एकूण २७०.८४ लाख (५८.६८ लाख पिवळी, १९०.१५ लाख केशरी आणि २२.०१ लाख शुभ्र) शिधापत्रिका धारक होते. राज्यात दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी ५१,६३६ रास्त भाव दुकाने कार्यरत होती. माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत, सुमारे १.५५ कोटी कुटुंबांनी 'आधार' आधारित बायोमेट्रिक अधिप्रमाणनाद्वारे शिधावस्तूंचा लाभ घेतला.

१.९ राज्यात माहे नोव्हेंबर २०२५ अखेर, १,८७४ शिवभोजन केंद्रे कार्यरत होती. सन २०२५-२६ मध्ये नोव्हेंबर पर्यंत, एकूण ४.०९ कोटी शिवभोजन थाळींचे वाटप करण्यात आले.

१.१० 'वन नेशन, वन रेशन कार्ड' योजना सुरु झाल्यापासून ऑक्टोबर २०२५ पर्यंत, महाराष्ट्रातील १.४० लाख शिधापत्रिका धारकांनी इतर राज्यातून आणि इतर राज्यातील १८.९७ लाख शिधापत्रिका धारकांनी महाराष्ट्रातून अन्नधान्याची उचल केली.

## लोकवित्त

१.११ 'वस्तू व सेवा कर' राज्याच्या महसुलाचा सर्वात महत्वाचा स्रोत असून राज्याचा स्वतःचा कर महसूल तसेच एकूण महसुली जमेत याचा सर्वात मोठा वाटा आहे. मागील चार वर्षांत राज्याच्या महसुली जमेचा स्थूल राज्य उत्पन्नातील हिस्सा जवळपास नऊ टक्क्यांपेक्षा अधिक राहिला आहे.

१.१२ अर्थसंकल्पीय अंदाजानुसार, सन २०२५-२६ करिता राज्याची महसुली जमा ₹ ५,६०,९६४ कोटी अपेक्षित असून सन २०२४-२५ (सुधारित अंदाज) करिता ₹ ५,३६,४६३ कोटी आहे. अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०२५-२६ करिता कर आणि करेतर महसूल अनुक्रमे ₹ ४,७७,४०० कोटी आणि ₹ ३३,०५२ कोटी अपेक्षित आहेत. केंद्र शासनाकडून मिळणारी सहायक अनुदाने ₹ ५०,५११ कोटी अपेक्षित आहेत. सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत प्रत्यक्ष महसुली जमा ₹ ३,७१,५७५ कोटी (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ६६.२ टक्के) होती.

१.१३ अर्थसंकल्पीय अंदाजानुसार, सन २०२५-२६ करिता राज्याचा महसुली खर्च ₹ ६,०६,८५५ कोटी अपेक्षित असून तो सन २०२४-२५ (सुधारित अंदाज) करिता ₹ ५,६२,९९९ कोटी आहे. सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत प्रत्यक्ष महसुली खर्च ₹ ३,६४,४१२ कोटी (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ६०.० टक्के) होता.

१.१४ अर्थसंकल्पीय अंदाजानुसार, सन २०२५-२६ करिता एकूण जमेतील भांडवली जमेचा हिस्सा २५.९ टक्के तर एकूण खर्चातील भांडवली खर्चाचा हिस्सा १९.९ टक्के अपेक्षित आहे.

१.१५ सोळाव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार, वित्त आयोगाच्या संदर्भ कालावधीत (२०२६-२७ ते २०३०-३१) एकूण केंद्रीय करांतील ६.४४१ टक्के हिस्सा राज्याला अनुज्ञेय आहे. तसेच, पाच वर्षांच्या संदर्भ कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्था व आपत्ती व्यवस्थापनासाठी राज्याला ₹ १,०९,२३९ कोटी सहायक अनुदाने प्राप्त होणे अपेक्षित आहे.

१.१६ 'महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम, २००६' मध्ये विहित केल्यानुसार, राज्याने मागील दहा वर्षांहून अधिक कालावधीत राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन टक्क्यांच्या मर्यादेत राखण्यासाठी प्रयत्न केले आहेत. तसेच राज्याचे कर्ज स्थूल राज्य उत्पन्नाच्या १७ ते १८ टक्के या मर्यादेत कायम राहिले आहे. सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राजकोषीय तूट, महसुली तूट व ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी असलेले प्रमाण अनुक्रमे २.७ टक्के, ०.९ टक्के आणि १८.३ टक्के अपेक्षित आहे.

१.१७ राज्याच्या सन २०२५-२६ च्या वार्षिक कार्यक्रमाकरिता एकूण निधी ₹ २,५४,५६० कोटी असून त्यापैकी जिल्हा वार्षिक कार्यक्रमाकरिताचा निधी ₹ २५,९०० कोटी आहे.

## संस्थांद्वारे वित्तपुरवठा

१.१८ दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी, राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकत्रित ठेवी आणि स्थूल कर्जे अनुक्रमे ₹ ५३.४० लाख कोटी आणि ₹ ५२.३९ लाख कोटी होती. राज्याचे कर्ज-ठेवी प्रमाण ९८.१ टक्के होते.

१.१९ सन २०२५-२६ करिता राज्याचा प्राधान्य क्षेत्रासाठीचा वार्षिक पत आराखडा ₹ ८.०६ लाख कोटी असून त्यामध्ये 'कृषि' क्षेत्राचा हिस्सा २४.९ टक्के आणि 'सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग' क्षेत्राचा हिस्सा ६६.१ टक्के आहे.




- दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी, अखिल भारत स्तरावर राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकत्रित ठेवी (२२.७ टक्के) व स्थूल कर्जे (२७.८ टक्के) यामध्ये राज्याचा हिस्सा सर्वाधिक
- राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील (प्रादेशिक ग्रामीण बँका वगळून) दरडोई ठेवी व दरडोई स्थूल कर्जे अनुक्रमे ₹ ४,१६,०९९ आणि ₹ ४,०८,२६१
- राज्यातील एकूण आयुर्विमा पॉलिसींमध्ये खाजगी क्षेत्राचा वाटा सन २०१४-१५ मधील २८.० टक्क्यांवरुन सन २०२४-२५ मध्ये ४७.० टक्के इतका वाढला
- सन २०२४-२५ मध्ये, बिगर-आयुर्विमा क्षेत्राने मागील वर्षाच्या तुलनेत १२.० टक्के वाढ नोंदविली

## कृषि व संलग्न कार्ये

१.२० मान्सून २०२५ मध्ये राज्यात सरासरी पावसाच्या १०९.१ टक्के पाऊस पडला. राज्यातील १४९ तालुक्यांमध्ये जास्त पाऊस, १८१ तालुक्यांमध्ये सरासरी पाऊस आणि २५ तालुक्यांमध्ये अपुरा पाऊस पडला.

१.२१ कृषि गणना २०२१-२२ च्या अस्थायी आकडेवारीनुसार, राज्यात वहिती खातेदारांची संख्या सुमारे १७१.११ लाख आहे तर सरासरी वहिती क्षेत्र १.२३ हेक्टर आहे.

१.२२ सन २०२५-२६ च्या खरीप हंगामामध्ये १५७.२७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली. मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्ये, ऊस व कापूस यांच्या उत्पादनात अनुक्रमे १०.६ टक्के, २२.० टक्के व ७.० टक्के वाढ अपेक्षित आहे, तर कडधान्ये व तेलबिया यांच्या उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत २८.२ टक्के व ४७.४ टक्के घट अपेक्षित आहे.

१.२३ सन २०२५-२६ च्या रब्बी हंगामामध्ये ६६.९८ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली. मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्ये व कडधान्यांच्या उत्पादनात अनुक्रमे २८.३ टक्के व २९.७ टक्के वाढ अपेक्षित आहे, तर तेलबियांच्या उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत १६.२ टक्के घट अपेक्षित आहे.

१.२४ सन २०२४-२५ मध्ये फलोत्पादन पिकांखालील क्षेत्र २५.१९ लाख हेक्टर अपेक्षित असून ३३९.७७ लाख मे. टन उत्पादन अपेक्षित आहे.

१.२५ मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) प्रकल्पांद्वारे दि. ३० जून, २०२४ पर्यंत ५७.१६ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली. सन २०२४-२५ मध्ये वापरलेली सिंचन क्षमता ४०.५५ लाख हेक्टर (अस्थायी) होती.

१.२६ दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी, मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) जलाशयांमध्ये उपयुक्त जलसाठा एकत्रितपणे ३७,५९७ दशलक्ष घनमीटर होता व तो एकूण जलसाठा क्षमतेच्या ८८.५ टक्के होता.

१.२७ सन २०२५-२६ मध्ये सप्टेंबरपर्यंत, अनुसूचित वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांच्याद्वारे ₹ ४३,८९४ कोटी पीक कर्जे अणि ₹ ६८,३१४ कोटी कृषि मुदत कर्जे वितरित करण्यात आली.

१.२८ अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या हानीपोटी चार लाख शेतकऱ्यांना १.८७ लाख हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ₹ ३३७.४२ कोटी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली. त्याचप्रमाणे अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या हानीपोटी ११६.४० लाख शेतकऱ्यांना ९४.८२ लाख हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ₹ ९,०२२.३८ कोटी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली.

१.२९ पशुगणना २०१९ नुसार, सुमारे ३.३१ कोटी पशुधनासह राज्य देशात सातव्या क्रमांकावर आहे तसेच सुमारे ७.४३ कोटी कुक्कुटादी पक्ष्यांसह राज्य देशात पाचव्या क्रमांकावर आहे.

१.३० सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत, सहकारी दुग्धशाळांचे सरासरी दैनिक दूध संकलन ४२.८७ लाख लिटर होते, तर सन २०२४-२५ मध्ये ते ४३.३७ लाख लिटर होते.

१.३१ सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत, सागरी व गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन अनुक्रमे २.९३ लाख मे. टन व १.४७ लाख मे. टन होते, तर सन २०२४-२५ मध्ये ते अनुक्रमे ४.६३ लाख मे. टन आणि २.६९ लाख मे. टन होते.

बेसिक ॲनिमल हस्बंडरी स्टॅटिस्टिक्स - २०२५ नुसार, सन २०२४-२५ मध्ये,

- राज्य मांस उत्पादनात ११.६ टक्के हिश्श्यासह देशात तिसऱ्या क्रमांकावर
- राज्यात दरडोई मांसाची उपलब्धता प्रतिवर्ष ९.५ किलो
- राज्य दूध उत्पादनात ६.७ टक्के हिश्श्यासह देशात पाचव्या क्रमांकावर
- राज्यात प्रति व्यक्ती दुधाची उपलब्धता प्रतिदिन ३५८ ग्रॅम
- राज्य अंडी उत्पादनात ५.५ टक्के हिश्श्यासह देशात सातव्या क्रमांकावर
- राज्यात दरडोई अंडी उपलब्धता प्रतिवर्ष ६५ अंडी

१.३२ माहे मार्च २०२५ अखेर राज्याचे वनक्षेत्र एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २०.२ टक्के होते.

१.३३ भारताचा वनस्थिती अहवाल, २०२३ नुसार, १४,५२५ चौ. किमी वृक्षाच्छादनासह (एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ४.७ टक्के) राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे.

१.३४ राज्यात ३१५.०९ चौ. किमी क्षेत्रावर कांदळवनाचे आच्छादन असून ते देशाच्या एकूण कांदळवन क्षेत्राच्या ६.३ टक्के आहे.

## उद्योग व सहकार

१.३५ महाराष्ट्राला एक अग्रगण्य जागतिक व्यवसाय केंद्र म्हणून सुस्थापित करण्यासाठी भरीव गुंतवणूक आकर्षित करणे, नवोन्मेषाला चालना देणे व तंत्रज्ञानाचा अवलंब वाढविणे या उद्दिष्टांकरिता 'महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण - २०२५' जाहीर करण्यात आले आहे.

१.३६ राज्यात डिसेंबर २०२५ पर्यंत उद्यम नोंदणी पोर्टल वर २५२.८४ लाख रोजगारासह ६३.८५ लाख (६२.११ लाख सूक्ष्म, १.५५ लाख लघु व ०.१८ लाख मध्यम) उपक्रम नोंदणीकृत होते.

१.३७ 'भारत पर्यटन डेटा कंपेंडियम २०२५' अहवालानुसार, सन २०२४-२५ मध्ये राज्यातील केंद्रीय संरक्षित व तिकीटे असलेल्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण स्मारकांना भेट देणाऱ्या देशांतर्गत पर्यटकांची संख्या ८८.६६ लाख आणि विदेशी पर्यटकांची संख्या १.०७ लाख होती.

१.३८ राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी सुमारे ६.१५ कोटी सभासद असलेल्या २.३३ लाख सहकारी संस्था होत्या त्यापैकी, ९.१ टक्के प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था, ९.३ टक्के बिगर-कृषि पतपुरवठा संस्था, ९.३ टक्के कृषि प्रक्रिया संस्था, ५७.२ टक्के गृहनिर्माण संस्था आणि ४.८ टक्के मजूर कंत्राटी संस्था होत्या.

- सन २०२४-२५ मध्ये देशाच्या एकूण निर्यातीत राज्यातून झालेल्या निर्यातीचा हिस्सा १५.० टक्के
- दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी, स्टार्टअप्समध्ये अखिल भारत स्तरावर राज्याचा हिस्सा सर्वाधिक (१७.० टक्के)
- माहे ऑक्टोबर २०१९ ते मार्च २०२५ या कालावधीत (३१.० टक्के हिश्श्यासह) देशातील थेट परकीय गुंतवणुकीमध्ये राज्य सर्वोच्च स्थानी
- राष्ट्रीय एक जिल्हा - एक उत्पादन पुरस्कार २०२४:
  - ओडीओपी उपक्रमाअंतर्गत राज्यास सुवर्ण पुरस्कार प्राप्त
  - जगप्रसिद्ध हापूस आंबा उत्पादनासाठी रत्नागिरी जिल्ह्यास कृषि श्रेणीत सुवर्ण पुरस्कार
- 'भारत पर्यटन डेटा कंपेंडियम २०२५' नुसार, सन २०२४ मध्ये राज्य परदेशी पर्यटक भेटींमध्ये पहिल्या क्रमांकावर व देशांतर्गत पर्यटक भेटींमध्ये सहाव्या क्रमांकावर

## पायाभूत सुविधा

१.३९ दि. ३१ मार्च २०२५ रोजी, राज्यात वीज निर्मितीची एकूण स्थापित क्षमता ४१,०१९ मेगावॅट असून त्यापैकी औष्णिक ऊर्जा, नवीकरणीय ऊर्जा, जलजन्य ऊर्जा आणि नैसर्गिक वायुजन्य ऊर्जेचा हिस्सा अनुक्रमे ५१.३ टक्के, ३४.४ टक्के, ७.५ टक्के आणि ६.८ टक्के होता.

१.४० सन २०२४-२५ मध्ये राज्यात एकूण १,४०,१७१ दशलक्ष युनिट वीज निर्मिती झाली. याशिवाय केंद्रीय क्षेत्राकडून ४५,००९ दशलक्ष युनिट वीज उपलब्ध झाली असून राज्यातील एकूण विजेचा वापर १,६६,२२४ दशलक्ष युनिट होता.

१.४१ सन २०२४-२५ मध्ये राज्यात विजेची सरासरी कमाल मागणी २३,३७४ मेगावॅट होती, तर त्यावेळी विजेचा पुरवठा २४,३३५ मेगावॅट होता.

१.४२ सन २०२४-२५ मध्ये महापारेषणची पारेषण हानी ३.२६ टक्के होती. सन २०२४-२५ साठी महावितरणची वितरण हानी आणि 'एकत्रित तांत्रिक व व्यावसायिक' हानी अनुक्रमे १५.१ टक्के व १५.२ टक्के होती.

१.४३ राज्यात मार्च २०२५ अखेर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी सुमारे ३.४५ लाख किमी होती.

१.४४ दि. १ जानेवारी २०२६ रोजी रस्त्यावरील वाहनांची संख्या राज्यात ५२८ लाख (१५३ वाहने प्रति किमी रस्ता लांबी) होती, तर दि. १ जानेवारी २०२५ रोजी ४८८ लाख (१४९ वाहने प्रति किमी रस्ता लांबी) होती.

१.४५ राज्यात नोंदणीकृत बॅटरी इलेक्ट्रीक वाहनांची संख्या डिसेंबर २०२५ अखेर, ९,२७,०६१ तर डिसेंबर २०२४ अखेर ६,४४,७७९ होती.

१.४६ सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रति दिन सरासरी १४,९२६ बस गाड्यांनी प्रतिदिन ५५.९० लाख प्रवासी वाहतूक केली.

१.४७ सन २०२४-२५ मध्ये राज्यातील मोठ्या व लहान बंदरांमधून झालेली एकत्रित मालवाहतूक २,३१२.५६ लाख मे. टन होती, तर ती सन २०२३-२४ मध्ये २,२९९.४९ लाख मे. टन होती.

- राज्य नवीकरणीय ऊर्जेच्या स्थापित क्षमतेनुसार राजस्थान आणि गुजरात नंतर देशात तिसऱ्या क्रमांकावर
- राज्यातील नवीकरणीय ऊर्जेच्या एकूण स्थापित क्षमतेमध्ये सन २०१५-१६ मधील ६,९७८ मेगावॅट वरून सन २०२४-२५ मध्ये १४,११३ मेगावॅट पर्यंत दुपटीपेक्षा अधिक वाढ
- सौर ऊर्जेच्या स्थापित क्षमतेच्या हिश्श्यात सन २०१५-१६ मधील ५.२ टक्क्यांवरून सन २०२४-२५ मध्ये ३८.९ टक्क्यांपर्यंत वाढ




- हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग (सुमारे ७०१ किमी) मुंबई ते नागपूर जून २०२५ पासून रहदारीसाठी खुला
- मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प- मेट्रो लाईन ३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) (३३.५ किमी लांबी)
  - ऑक्टोबर २०२५ पासून संपूर्ण कॉरिडॉर रहदारीसाठी खुला
  - सन २०२५-२६ मध्ये या मेट्रो मार्गावरील प्रतिदिन सरासरी प्रवासी संख्या ७८,९४३

१.४८ सन २०२४-२५ मध्ये राज्यातील विमानतळांवरून झालेली देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक अनुक्रमे ५४८.६१ लाख व १५९.५७ लाख होती तर ती सन २०२३-२४ मध्ये अनुक्रमे ५२४.७० लाख आणि १४६.०३ लाख होती.

१.४९ सन २०२४-२५ मध्ये राज्यातील विमानतळांवरून झालेली देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय मालवाहतूक अनुक्रमे २.८८ लाख मे. टन व ६.५९ लाख मे. टन होती तर ती सन २०२३-२४ मध्ये अनुक्रमे २.७९ लाख मे. टन व ५.९२ लाख मे. टन होती.

१.५० राज्यात दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी ११.३६ कोटी इंटरनेट ग्राहक, १२.७१ कोटी भ्रमणध्वनी जोडण्या, ५,२७२ सार्वजनिक वायफाय हॉटस्पॉट्स आणि २४,२६७ ॲक्सेस पॉईंट्स होते.

## सामाजिक क्षेत्र

१.५१ राज्यात दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी एकूण १,०४,५२६ प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) शाळांमध्ये १४५ लाख पटसंख्या होती आणि २९,६४१ माध्यमिक व उच्च माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) शाळांमध्ये ६३.६ लाख पटसंख्या होती.

१.५२ अखिल भारत उच्च शिक्षण पाहणी २०२३-२४ नुसार, राज्यात ८७ विद्यापीठे, ५,५७९ महाविद्यालये आणि २,४२६ स्वायत्त संस्था होत्या व त्यातील एकूण पटसंख्या ४५.३१ लाख होती.

- दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी, मुली-मुले समानता निर्देशांक -
  - प्राथमिक शिक्षणाकरिता ०.९३ व उच्च प्राथमिक शिक्षणाकरिता ०.९०
  - माध्यमिक शिक्षणाकरिता ०.८७ व उच्च माध्यमिक शिक्षणाकरिता ०.९२
  - उच्च शिक्षणाकरिता ०.८८

१.५३ माहे डिसेंबर २०२५ पर्यंत, राज्यात २,१३,५५१ ॲलोपॅथिक डॉक्टर्स, १,०५,९६६ आयुर्वेदिक डॉक्टर्स, ९,४६२ युनानी डॉक्टर्स आणि ९०,००६ होमिओपॅथी डॉक्टर्स नोंदणीकृत आहेत.

१.५४ एकात्मिक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत सुमारे ६.५० लाख लाभार्थी असून ₹ २,७९७.४३ कोटी खर्च झाला.

१.५५ राज्याच्या सन २०२५-२६ (अअं) मध्ये लिंगभाव अर्थसंकल्पाचा हिस्सा ८.५ टक्के होता तर सन २०२४-२५(सुअं) मध्ये तो ८.६ टक्के होता.

- सन २०२३ मध्ये,
  - जन्मदर - १४
  - मृत्यूदर - ६.१
  - अर्भक मृत्यूदर - १४
  - नवजात शिशु मृत्यूदर - ११
  - पाच वर्षाखालील बालकांचा मृत्यूदर - १६
  - एकूण जननदर - १.४
- सन २०२१ ते सन २०२३ करिता माता मृत्यूप्रमाण - ३६

१.५६ राज्याच्या सन २०२५-२६ (अअं) मध्ये बाल अर्थसंकल्पाचा १३.३ टक्के हिस्सा होता तर तो सन २०२४-२५ (सुअं) मध्ये १२.९ टक्के होता.

१.५७ माहे मार्च २०२५ पर्यंत, राज्यात एकूण १४,५८,७४५ महिला स्वयंसहायता गट होते.

१.५८ माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये सुमारे ६.० टक्के (० ते ५ वर्षे वयोगटातील) बालके मध्यम कमी वजनाची आणि ०.९ टक्के बालके तीव्र कमी वजनाची होती.

१.५९ माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये सुमारे १८.० टक्के (० ते ५ वर्षे वयोगटातील) बालकांची वाढ मध्यम तीव्र प्रमाणात आणि १४.४ टक्के बालकांची वाढ अति तीव्र प्रमाणात खुंटली होती.

१.६० दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी, ई-श्रम पोर्टलवर नोंदविलेल्या राज्यातील कामगारांची संख्या १.८३ कोटी असून त्यापैकी ५५.८ टक्के महिला होत्या.




- नियतकालिक श्रमबल पाहणी २०२३-२४ नुसार, १५ वर्ष व त्यावरील वयोगटातील व्यक्तींसाठी,
  - श्रमशक्ती सहभाग दर - ५९.० टक्के (सन २०१८-१९ मध्ये ५३.३ टक्के)
  - महिला श्रमशक्ती सहभाग दर - ४०.१ टक्के (सन २०१८-१९ मध्ये ३१.६ टक्के)
  - कामगार लोकसंख्या प्रमाण - ५७.० टक्के (सन २०१८-१९ मध्ये ५०.६ टक्के)
  - बेरोजगारी दर - ३.३ टक्के (सन २०१८-१९ मध्ये ५.० टक्के)

१.६१ माहे डिसेंबर २०२५ पर्यंत, प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत एकूण ८.७५ लाख घरे पूर्ण करण्यात आली.

१.६२ माहे डिसेंबर २०२५ पर्यंत, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत एकूण १६.०५ लाख घरे पूर्ण करण्यात आली.

१.६३ जल जीवन अभियानाअंतर्गत जानेवारी २०२६ पर्यंत, राज्यातील ९०.३ टक्के कुटुंबे, ९८.५ टक्के शाळा, ८१.३ टक्के ग्रामपंचायत इमारती, ८३.५ टक्के आरोग्य केंद्रे व ९१.६ टक्के अंगणवाड्यांना वैयक्तिक नळ जोडणी पुरविण्यात आली.

१.६४ राज्यामध्ये अटल भूजल योजनेअंतर्गत एकूण ३३,९२२ संरचनांची कामे पूर्ण झाली.

१.६५ राज्यातील ४०,२४७ गावांपैकी ३४,५८४ गावांना स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत ओडीएफ+ घोषित केले आहे.

१.६६ स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत, माहे डिसेंबर २०२५ पर्यंत ४२ शहरे ओडीएफ, ८२ शहरे ओडीएफ+, २५७ शहरे ओडीएफ++ आणि ३० शहरे वॉटर+ म्हणून घोषित करण्यात आली.

१.६७ सन २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणास अनुकूल तंत्रज्ञान असलेल्या ३१४ उद्योगांना ई - कचऱ्याचे भाग सुटे करणे / पुनश्चक्रण करणे यासाठी मान्यता दिली असून त्यांची एकूण क्षमता प्रतिवर्ष ६,५४,०६२ मे. टन आहे.

* * * * *

# २ लोकसंख्या





# २. लोकसंख्या

२.१ जनगणना ही स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावर मानवी संसाधने, लोकसंख्याशास्त्र, संस्कृती आणि आर्थिक संरचना याविषयी मूलभूत आकडेवारी प्रदान करते. राष्ट्राच्या भविष्यास आकार आणि दिशा देण्यासाठी ही आकडेवारी महत्वाची आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार, भारताची लोकसंख्या १२१.०९ कोटी व राज्याची लोकसंख्या ११.२४ कोटी होती जी अखिल भारतीय लोकसंख्येच्या ९.३ टक्के होती.

**प्रक्षेपित लोकसंख्या**

२.२ प्रक्षेपित लोकसंख्या म्हणजे भूतकाळातील आकडेवारीचा वापर करून काही विशिष्ट गृहितकांवर आधारित भविष्यातील लोकसंख्येचा केलेला अंदाज आहे. संसाधने, सेवा व पायाभूत सुविधांचे भविष्यकालीन नियोजन करण्यासाठी शासन व विविध संस्था यांना लोकसंख्या विषयक आकडेवारीची आवश्यकता असल्याने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय लोकसंख्या आयोगाने राज्यनिहाय अंदाजित लोकसंख्या 'प्रक्षेपित लोकसंख्या' म्हणून प्रकाशित केली आहे. या अहवालानुसार, दि. १ मार्च २०२६ रोजी अखिल भारताची व राज्याची प्रक्षेपित लोकसंख्या अनुक्रमे १४२.५९ कोटी व १२.९३ कोटी आहे. निवडक राज्यांची प्रक्षेपित लोकसंख्या तक्ता २.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता २.१ निवडक राज्यांची प्रक्षेपित लोकसंख्या**

(कोटी)

| राज्य | दि. १ मार्च २०२६ रोजीची प्रक्षेपित लोकसंख्या | | |
|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण |
| आंध्र प्रदेश | ३.३१ | २.०६ | ५.३७ |
| बिहार | ११.५७ | १.६६ | १३.२३ |
| छत्तीसगड | २.२४ | ०.८८ | ३.१२ |
| गुजरात | ३.६९ | ३.७२ | ७.४१ |
| कर्नाटक | ३.७४ | ३.१६ | ६.९० |
| मध्य प्रदेश | ६.३४ | २.६३ | ८.९७ |
| **महाराष्ट्र** | **६.५५** | **६.३८** | **१२.९३** |
| राजस्थान | ६.१० | २.२६ | ८.३६ |
| तामीळनाडू | ३.४८ | ४.२७ | ७.७५ |
| तेलंगणा | १.९३ | १.९३ | ३.८६ |
| उत्तर प्रदेश | १८.३५ | ५.९४ | २४.२९ |
| पश्चिम बंगाल | ६.२३ | ३.८२ | १०.०५ |
| **अखिल भारत** | **९१.२४** | **५१.३५** | **१४२.५९** |

*आधार* : 'भारत आणि राज्यांसाठी प्रक्षेपित लोकसंख्या २०११-२०३६', राष्ट्रीय लोकसंख्या आयोग, भारत सरकार

२.२.१ राज्याची प्रक्षेपित लोकसंख्या व लोकसंख्येची घनता तक्ता २.२ मध्ये दिली आहेत.

**तक्ता २.२ राज्याची प्रक्षेपित लोकसंख्या व लोकसंख्येची घनता**

(दि. १ मार्च रोजी)

| वर्ष | लोकसंख्या (कोटी) | | | लोकसंख्येची घनता |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | एकूण | |
| २०११$ | ५.८२ | ५.४१ | ११.२४ | ३६५ |
| २०१६ | ६.१६ | ५.७१ | ११.८७ | ३८६ |
| २०२१ | ६.४७ | ५.९७ | १२.४४ | ४०४ |
| २०२६ | ६.७३ | ६.२० | १२.९३ | ४२० |
| २०३१ | ६.९५ | ६.४० | १३.३५ | ४३४ |
| २०३६ | ७.१२ | ६.५६ | १३.६८ | ४४४ |

टीप : आकडे संक्षिप्तामध्ये दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही. $ २०११ च्या जनगणनेनुसार

*आधार* : १) भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

२) 'भारत आणि राज्यांसाठी प्रक्षेपित लोकसंख्या २०११-२०३६', राष्ट्रीय लोकसंख्या आयोग, भारत सरकार

२.२.२ महसूल विभागनिहाय लोकसंख्या तक्ता २.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता २.३ महसूल विभागनिहाय लोकसंख्या**

(कोटी)

| महसूल विभाग | जनगणना २०११ | | | | दि. १ मार्च २०२६ रोजीची प्रक्षेपित लोकसंख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | एकूण | हिस्सा (टक्के) | पुरूष | स्त्री | एकूण | हिस्सा (टक्के) |
| कोकण | १.५१ | १.३५ | २.८६ | २५.४ | १.७१ | १.५५ | ३.२६ | २५.२ |
| १७ | दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | १,२५,९३० | १,९७,२१५ | २,१९,१७८ | २,२०,९६७ | २,३७,९०९ | २,६२,१८८ | २,८५,३३८ | |
| १८ | वित्तीय सेवा | ४,८०,२२६ | ७,५८,१७० | ७,८४,५३६ | ८,२४,२९४ | ८,३१,३०५ | ९,०३,३६८ | ९,७२,८७४ | ४०,८८,०७२† |
| १९ | स्थावर मालमत्ता, राहत्या घरांची मालकी व व्यावसायिक सेवा | १०,५०,६५१ | १९,५६,०५१ | २१,१३,७०८ | २१,२९,८३६ | २२,९१,५४२ | २५,५५,९०९ | २८,४१,७१२ | |
| २० | सार्वजनिक प्रशासन व संरक्षण | ४,९१,१५५ | ७,२२,७७३ | ७,६२,५३१ | ७,५७,८८६ | ७,८०,८४६ | ८,०३,३४३ | ८,४९,३८१ | २१,७५,६२८† |
| २१ | इतर सेवा | ५,३४,८२७ | ९,०२,७०५ | ९,६९,८७३ | ८,४३,४०८ | ९,४०,८५३ | १०,३३,०१७ | ११,४९,१८० | |
| **२२** | **तृतीय / सेवा क्षेत्र (उप-बेरीज - १३ ते २१)** | **३९,६९,९७५** *(१००.०)* | **६८,७८,४५६** *(१७३.३)* | **७३,२०,७०७** *(१८४.४)* | **६७,०९,३१३** *(१६९.०)* | **७३,२४,९२६** *(१८४.५)* | **८०,८१,३७७** *(२०३.६)* | **८८,०७,६८३** *(२२१.९)* | **९४,४०,५२९** *(२३७.८)* |
| **२३** | **एकूण स्थूल मूल्यवृद्धी (५+१२+२२)** | **८१,०६,९४६** *(१००.०)* | **१,२७,३३,७९८** *(१५७.१)* | **१,३२,३६,१००** *(१६३.३)* | **१,२६,८७,३४५** *(१५६.५)* | **१,३८,७६,८४०** *(१७१.२)* | **१,४८,७८,०२८** *(१८३.५)* | **१,६१,५१,४७७** *(१९९.२)* | **१,७१,८७,४४६** *(२१२.०)* |
| २४ | उत्पादित वस्तू व सेवांवरील कर | ८,९०,०६० | १४,९५,६४४ | १५,५५,८०७ | १३,६५,११६ | १५,७९,५७२ | १७,३७,९५३ | १८,७८,१३२ | १६,०९,५०९† |
| २५ | वजा उत्पादित वस्तू व सेवांवरील अनुदान | २,६०,६७७ | २,३६,५२७ | २,५७,२६७ | ३,५७,५९१ | ४,३४,५६६ | ४,५१,०६८ | ३,७९,०१७ | |
| **२६** | **स्थूल देशांतर्गत उत्पन्न (जी.डी.पी) (२३+२४-२५)** | **८७,३६,३२९** | **१,३९,९२,९१४** | **१,४५,३४,६४१** | **१,३६,९४,८६९** | **१,५०,२१,८४६** | **१,६१,६४,९१३** | **१,७६,५०,५९१** | **१,८७,९६,९५५** |
| २७ | परदेशातून प्राप्त प्राथमिक उत्पन्न | (-)७६,८२४ | (-)१,५२,४४० | (-)१,४१,७४१ | (-)२,००,८९३ | (-)१,९३,९२६ | (-)२,२५,५३८ | (-)२,४५,९५३ | (-)२,७३,८२२ |
| **२८** | **स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (जी.एन.आय) (२६+२७)** | **८६,५९,५०५** | **१,३८,४०,४७४** | **१,४३,९२,९००** | **१,३४,९३,९७६** | **१,४८,२७,९२०** | **१,५९,३९,३७६** | **१,७४,०४,६३८** | **१,८५,२३,१३३** |
| **२९** | **दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (₹)** | **७०,९८०** | **१,०४,२९९** | **१,०७,३३०** | **९९,५५६** | **१,०८,३४५** | **१,१५,२६१** | **१,२४,७६४** | **१,३१,५५६** |

+ पहिले सुधारित अंदाज     * अस्थायी अंदाज     † विभागणी उपलब्ध नाही

टीप - कंसातील आकडे स्थूल मूल्यवृद्धीशी टक्केवारी दर्शवितात. आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* - राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार

# परिशिष्ट ३.७

## मूळ किंमतींनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक निव्वळ देशांतर्गत मूल्यवृद्धी, बाजार किंमतींनुसार सांकेतिक निव्वळ देशांतर्गत उत्पन्न व निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न

## (चालू किंमतींनुसार)

(₹ कोटी)

| अ.क्र. | उद्योग | २०११-१२ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४+ | २०२४-२५* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | पिके | ९,००,९७५ | १५,०८,३६९ | १६,९७,५०४ | १८,५५,७७८ | २०,४६,३७८ | २१,६९,०७८ | २३,८५,७४१ | उ. ना. |
| २ | पशुधन | ३,२२,१८५ | ८,७१,९३१ | ९,६७,३३१ | ११,०१,४०२ | १२,२४,११५ | १३,४८,०२६ | १४,८७,६२८ | उ. ना. |
| ३ | वन संवर्धन व ओंडके पाडणे | १,२३,०७० | २,५२,७११ | २,६७,२१९ | २,८१,७२३ | २,९४,१४२ | ३,४१,०२१ | ३,४७,३१८ | उ. ना. |
| ४ | मासेमारी व जल संवर्ध | ६०,०३९ | १,९७,०५६ | २,१८,७५० | २,२६,३३३ | २,६२,४५३ | ३,०१,६९६ | ३,४२,९६५ | उ. ना. |
| **५** | **कृषि व संलग्न कार्ये** | **१४,०६,२६८** | **२८,३०,०६७** | **३१,५०,८०४** | **३४,६५,२३७** | **३८,२७,०८८** | **४१,५९,८२१** | **४५,६३,६५२** | उ. ना. |
| | **(उप-बेरीज-१+२+३+४)** | *(१९.६)* | *(१८.६)* | *(१९.४)* | *(२१.८)* | *(२०.२)* | *(१९.३)* | *(१९.०)* | उ. ना. |
| ६ | खाणकाम व दगड खाणकाम | २,२९,१८६ | ३,१८,५०७ | २,९४,७०३ | २,५८,००५ | ३,६६,९७४ | ४,३२,१५२ | ४,४६,९८८ | उ. ना. |
| **७** | **प्राथमिक क्षेत्र (उप-बेरीज - ५+६)** | **१६,३५,४५४** | **३१,४८,५७४** | **३४,४५,५०७** | **३७,२३,२४२** | **४१,९४,०६२** | **४५,९१,९७३** | **५०,१०,६४०** | उ. ना. |
| ८ | वस्तुनिर्माण | ११,४६,९२८ | २३,८५,९४१ | २२,४८,७६५ | २३,२३,०८४ | २८,५६,६९९ | २८,७९,४१४ | ३२,३६,०४१ | उ. ना. |
| ९ | वीज, वायू , पाणीपुरवठा व इतर उपयोगिता सेवा | १,२३,८११ | ३,०५,५९९ | ३,४९,१७५ | ३,३५,९२८ | ३,९१,२२४ | ४,०४,२७८ | ५,४७,१९९ | उ. ना. |
| १० | बांधकाम | ७,३८,१७८ | १२,६२,२१४ | १२,७५,३४४ | १२,४२,०७९ | १६,९८,०२७ | १९,७०,५०६ | २१,८१,४३० | उ. ना. |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज - ८+९+१०)** | **२०,०८,९१७** | **३९,५३,७५४** | **३८,७३,२८४** | **३९,०१,०९२** | **४९,४५,९५०** | **५२,५४,१९९** | **५९,६४,६६९** | उ. ना. |
| **१२** | **उद्योग** | **२२,३८,१०३** | **४२,७२,२६१** | **४१,६७,९८७** | **४१,५९,०९६** | **५३,१२,९२३** | **५६,८६,३५१** | **६४,११,६५७** | उ. ना. |
| | **(उप-बेरीज - ६+११)** | *(३१.१)* | *(२८.१)* | *(२५.७)* | *(२६.२)* | *(२८.०)* | *(२६.४)* | *(२६.६)* | उ. ना. |
| १३ | व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे | ८,३८,११४ | २०,०३,७०३ | २१,७९,३३२ | १६,८३,९२५ | २१,१४,७१२ | २६,२८,६०६ | २८,६९,२४५ | उ. ना. |
| १४ | रेल्वे | ४८,५३१ | ८७,४२२ | ९५,५२१ | ८७,२१७ | ९६,६०३ | १,०६,१६३ | १,१४,३८९ | उ. ना. |
| १५ | परिवहन (रेल्वे व्यतिरिक्त) | २,८८,०६३ | ५,५७,५५३ | ५,७८,६०२ | ४,१६,४१० | ६,७९,७९१ | ७,५३,६०६ | ८,३०,३७६ | उ. ना. |
| १६ | साठवण | ४,३५२ | १६,९५५ | १७,९४३ | १८,८१२ | १९,०९८ | २१,२५५ | २४,३९५ | उ. ना. |
| १७ | दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | १,०२,७७६ | १,६७,०५२ | १,९०,४०७ | २,०७,४९३ | २,४९,६७१ | २,९५,५२६ | ३,२४,४४७ | उ. ना. |
| १८ | वित्तीय सेवा | ४,७३,३९९ | ९,२०,४३३ | १०,०४,३८५ | १०,५८,४६४ | ११,४२,५९० | १४,१८,८५१ | १५,६१,३१३ | उ. ना. |
| १९ | स्थावर मालमत्ता, राहत्या घरांची मालकी व व्यावसायिक सेवा | ८,९७,८९७ | २१,५३,९६८ | २३,८४,७६८ | २४,३१,०२४ | २८,८६,३०१ | ३४,६२,४९७ | ३९,२०,९८२ | उ. ना. |
| २० | सार्वजनिक प्रशासन व संरक्षण | ४,०५,५९२ | ९,१३,०५५ | १०,१०,९१५ | १०,५६,२६३ | ११,४५,४७६ | १२,५४,४९७ | १३,९६,६११ | उ. ना. |
| २१ | इतर सेवा | ४,८६,६७७ | १२,६८,३६९ | १४,३६,८४२ | १२,८६,४७० | १४,९४,५२६ | १७,३०,२८४ | २०,३५,४१० | उ. ना. |
| **२२** | **तृतीय / सेवा क्षेत्र** | **३५,४५,४००** | **८०,८८,५१०** | **८८,९८,७१६** | **८२,४६,०७६** | **९८,२८,७६८** | **१,१६,७१,२८५** | **१,३०,७७,१६८** | उ. ना. |
| | **(उपबेरीज - १३ ते २१)** | *(४९.३)* | *(५३.२)* | *(५४.९)* | *(५२.०)* | *(५१.८)* | *(५४.३)* | *(५४.४)* | उ. ना. |
| **२३** | **एकूण निव्वळ मूल्यवृद्धी** | **७१,८९,७७१** | **१,५१,९०,८३८** | **१,६२,१७,५०७** | **१,५८,७०,४१०** | **१,८९,६८,७८०** | **२,१५,१७,४५७** | **२,४०,५२,४७७** | **२,६३,४१,७७९** |
| | **(५+१२+२२)** | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* |
| २४ | उत्पादित वस्तू व सेवांवरील कर | ८,९०,०६० | २०,४३,५६८ | २०,७९,७४२ | २१,५६,३८५ | २६,३९,३४७ | २९,९१,०१४ | ३३,५३,३३६ | ३०,४६,११३† |
| २५ | वजा उत्पादित वस्तू व सेवांवरील अनुदान | २,६०,६७७ | ३,१९,०२८ | ३,५७,२६६ | ५,१३,२८६ | ६,७७,५३२ | ७,४७,२३९ | ६,४३,२६८ | |
| **२६** | **निव्वळ देशांतर्गत उत्पन्न (एन.डी.पी)(२३+२४-२५)** | **७८,१९,१५४** | **१,६९,१५,३७८** | **१,७९,३९,९८२** | **१,७५,१३,५०९** | **२,०९,३०,५९५** | **२,३७,६१,२३२** | **२,६७,६२,५४४** | **२,९३,८७,८९२** |
| २७ | परदेशातून प्राप्त प्राथमिक उत्पन्न | (-)७६,८२४ | (-)२,०२,३२४ | (-)१,९३,११४ | (-)२,६६,६८७ | (-)२,७७,८०८ | (-)३,७०,३०७ | (-)४,१२,१७० | (-)४,७८,२९७ |
| **२८** | **निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (एन.एन.आय)(२६+२७)** | **७७,४२,३३०** | **१,६७,१३,०५४** | **१,७७,४६,८६८** | **१,७२,४६,८२१** | **२,०६,५२,७८६** | **२,३३,९०,९२५** | **२,६३,५०,३७४** | **२,८९,०९,५९५** |
| **२९** | **दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (₹)** | **६३,४६२** | **१,२५,९४६** | **१,३२,३४१** | **१,२७,२४४** | **१,५०,९०६** | **१,६९,१४५** | **१,८८,८९२** | **२,०५,३२४** |

\+ पहिले सुधारित अंदाज      * अस्थायी अंदाज      † विभागणी उपलब्ध नाही      उ.ना. - उपलब्ध नाही

टीप - कंसातील आकडे निव्वळ मूल्यवृद्धीशी टक्केवारी दर्शवितात. आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

*आधार* - राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार

# परिशिष्ट ३.८
## मूळ किंमतींनुसार क्षेत्रनिहाय वास्तविक निव्वळ देशांतर्गत मूल्यवृद्धी, बाजार किंमतींनुसार वास्तविक निव्वळ देशांतर्गत उत्पन्न व निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न
## [स्थिर किंमतींनुसार (पायाभूत वर्ष २०११-१२)]

(₹ कोटी)

| अ.क्र. | उद्योग | २०११-१२ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४+ | २०२४-२५* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | पिके | ९,००,९७५ | ९,२६,२०३ | ९,७९,३५१ | ९,९९,९९३ | १०,२७,८०० | ११,०४,६७२ | ११,०३,५३९ | उ. ना. |
| २ | पशुधन | ३,२२,१८५ | ५,३३,१६८ | ५,७३,५५३ | ६,०९,०२० | ६,४७,८२२ | ६,७९,९०२ | ७,१६,५३८ | उ. ना. |
| ३ | वन संवर्धन व ओंडके पाडणे | १,२३,०७० | १,६२,१४५ | १,७२,०५८ | १,८१,९७१ | १,८२,९१३ | १,८५,२७६ | १,८८,११३ | उ. ना. |
| ४ | मासेमारी व जल संवर्ध | ६०,०३९ | १,११,३८६ | १,१५,८७८ | १,१९,५९४ | १,३६,७७५ | १,४७,८३६ | १,५६,१०० | उ. ना. |
| **५** | **कृषि व संलग्न कार्ये** | **१४,०६,२६८** | **१७,३२,९०२** | **१८,४०,८३९** | **१९,१०,५७८** | **१९,९५,३१०** | **२१,१७,६८७** | **२१,६४,२८९** | उ. ना. |
| | **(उप-बेरीज-१+२+३+४)** | *(१००.०)* | *(१२३.२)* | *(१३०.९)* | *(१३५.९)* | *(१४१.९)* | *(१५०.६)* | *(१५३.९)* | उ. ना. |
| ६ | खाणकाम व दगड खाणकाम | २,२९,१८६ | २,८०,८५४ | २,७०,२५४ | २,४२,८५५ | २,५९,०३५ | २,६७,७६४ | २,७५,१३९ | उ. ना. |
| **७** | **प्राथमिक क्षेत्र (उप-बेरीज - ५+६)** | **१६,३५,४५४** | **२०,१३,७५६** | **२१,११,०९३** | **२१,५३,४३३** | **२२,५४,३४५** | **२३,८५,४५१** | **२४,३९,४२९** | उ. ना. |
| ८ | वस्तुनिर्माण | ११,४६,९२८ | १९,६७,८३२ | १८,७९,८२९ | १९,३५,०८६ | २१,४८,२९३ | २०,८३,६८१ | २३,७३,२०५ | उ. ना. |
| ९ | वीज, वायू , पाणीपुरवठा व इतर उपयोगिता सेवा | १,२३,८११ | १,७२,३३० | १,७१,३३२ | १,५२,६५६ | १,७५,७२५ | २,०४,२३५ | २,२६,१९८ | उ. ना. |
| १० | बांधकाम | ७,३८,१७८ | ९,४३,६६० | ९,४८,२५७ | ८,८७,२१५ | १०,७२,८३९ | ११,६८,१४८ | १२,९०,६७२ | उ. ना. |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज - ८+९+१०)** | **२०,०८,९१७** | **३०,८३,८२३** | **२९,९९,४१८** | **२९,७४,९५७** | **३३,९६,८५७** | **३४,५६,०६४** | **३८,९०,०७५** | उ. ना. |
| **१२** | **उद्योग** | **२२,३८,१०३** | **३३,६४,६७६** | **३२,६९,६७२** | **३२,१७,८१२** | **३६,५५,८९२** | **३७,२३,८२८** | **४१,६५,२१४** | उ. ना. |
| | **(उप-बेरीज - ६+११)** | *(१००.०)* | *(१५०.३)* | *(१४६.१)* | *(१४३.८)* | *(१६३.३)* | *(१६६.४)* | *(१८६.१)* | उ. ना. |
| १३ | व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे | ८,३८,११४ | १६,००,०३० | १७,११,२१८ | १३,१२,२८३ | १४,७६,१७५ | १६,९०,८६४ | १८,३१,२८९ | उ. ना. |
| १४ | रेल्वे | ४८,५३१ | ६२,५५२ | ५१,२६८ | ३३,४७८ | ४४,८३७ | ५५,०४८ | ५७,६८० | उ. ना. |
| १५ | परिवहन (रेल्वे व्यतिरिक्त) | २,८८,०६३ | ४,३४,५१० | ४,४०,९१८ | ३,११,७७४ | ४,२१,३३१ | ४,५१,५५८ | ४,६५,२६० | उ. ना. |
| १६ | साठवण | ४,३५२ | १२,४७८ | १२,५५८ | १२,२०० | १६,४०७ | १५,३२४ | १७,६३४ | उ. ना. |
| १७ | दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | १,०२,७७६ | १,२२,४३३ | १,३६,५९२ | १,३१,९८३ | १,४१,५७९ | १,५७,३५५ | १,७०,५७२ | उ. ना. |
| १८ | वित्तीय सेवा | ४,७३,३९९ | ७,४०,६६७ | ७,६५,७९३ | ८,०१,९९४ | ८,०८,०३९ | ८,७८,७४२ | ९,४६,३५१ | उ. ना. |
| १९ | स्थावर मालमत्ता, राहत्या घरांची मालकी व व्यावसायिक सेवा | ८,९७,८९७ | १६,२२,९७६ | १७,५७,३७१ | १७,४८,५४५ | १८,८३,१०० | २१,२१,८५८ | २३,८४,७०६ | उ. ना. |
| २० | सार्वजनिक प्रशासन व संरक्षण | ४,०५,५९२ | ६,१०,१२७ | ६,४४,७९९ | ६,३४,५८३ | ६,५२,२८४ | ६,६९,७८० | ७,०७,७१८ | उ. ना. |
| २१ | इतर सेवा | ४,८६,६७७ | ८,१५,९९२ | ८,७३,८९३ | ७,३९,३५६ | ८,२६,१०० | ९,०८,०२० | १०,११,७९७ | उ. ना. |
| **२२** | **तृतीय / सेवा क्षेत्र** | **३५,४५,४००** | **६०,२१,७६४** | **६३,९४,४१०** | **५७,२६,१९५** | **६२,६९,८५२** | **६९,४८,५५०** | **७५,९३,००६** | उ. ना. |
| | **(उप-बेरीज - १३ ते २१)** | *(१००.०)* | *(१६९.८)* | *(१८०.४)* | *(१६१.५)* | *(१७६.८)* | *(१९६.०)* | *(२१४.२)* | उ. ना. |
| **२३** | **एकूण निव्वळ मूल्यवृद्धी** | **७१,८९,७७१** | **१,११,१९,३४३** | **१,१५,०४,९२२** | **१,०८,५४,५८६** | **१,१९,२१,०५२** | **१,२७,९०,०६५** | **१,३९,२२,५१०** | **१,४८,१५,५१२** |
| | **(५+१२+२२)** | *(१००.०)* | *(१५४.७)* | *(१६०.०)* | *(१५१.०)* | *(१६५.८)* | *(१७७.९)* | *(१९३.६)* | *(२०६.१)* |
| २४ | उत्पादित वस्तू व सेवांवरील कर | ८,९०,०६० | १४,९५,६४४ | १५,५५,८०७ | १३,६५,११६ | १५,७९,५७२ | १७,३७,९५३ | १८,७८,१३२ | १६,०९,५०९† |
| २५ | वजा उत्पादित वस्तू व सेवांवरील अनुदान | २,६०,६७७ | २,३६,५२७ | २,५७,२६७ | ३,५७,५९१ | ४,३४,५६६ | ४,५१,०६८ | ३,७९,०१७ | |
| **२६** | **निव्वळ देशांतर्गत उत्पन्न (एन.डी.पी) (२३+२४-२५)** | **७८,१९,१५४** | **१,२३,७८,४५९** | **१,२८,०३,४६२** | **१,१८,६२,११०** | **१,३०,६६,०५८** | **१,४०,७६,९५०** | **१,५४,२१,६२४** | **१,६४,२५,०२१** |
| २७ | परदेशातून प्राप्त प्राथमिक उत्पन्न | (-)७६,८२४ | (-)१,५२,४४० | (-)१,४१,७४१ | (-)२,००,८९३ | (-)१,९३,९२६ | (-)२,२५,५३८ | (-)२,४५,९५३ | (-)२,७३,८२२ |
| **२८** | **निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (एन.एन.आय) (२६+२७)** | **७७,४२,३३०** | **१,२२,२६,०१९** | **१,२६,६१,७२२** | **१,१६,६१,२१७** | **१,२८,७२,१३२** | **१,३८,५१,४१२** | **१,५१,७५,६७१** | **१,६१,५१,१९९** |
| **२९** | **दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (₹)** | **६३,४६२** | **९२,१३३** | **९४,४२०** | **८६,०३४** | **९४,०५४** | **१,००,१६३** | **१,०८,७८६** | **१,१४,७१०** |

\+ पहिले सुधारित अंदाज    * अस्थायी अंदाज    † विभागणी उपलब्ध नाही    उ.ना. - उपलब्ध नाही

टीप - कंसातील आकडे स्तंभ (३) शी टक्केवारी दर्शवितात. आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

*आधार* - राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार

# परिशिष्ट ३.९
## सांकेतिक स्थूल जिल्हा उत्पन्न (चालू किंमतींनुसार), वास्तविक स्थूल जिल्हा उत्पन्न [स्थिर किंमतींनुसार (पायाभूत वर्ष २०११-१२)] दरडोई सांकेतिक निव्वळ जिल्हा उत्पन्न - चालू किंमतींनुसार (दरडोई जिल्हा उत्पन्न)

| अ. क्र. | जिल्हा | सांकेतिक स्थूल जिल्हा उत्पन्न (₹ कोटी) | | | | वास्तविक स्थूल जिल्हा उत्पन्न (₹ कोटी) | | | | दरडोई सांकेतिक निव्वळ जिल्हा उत्पन्न (₹) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४++ | २०२४-२५+ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४++ | २०२४-२५+ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४++ | २०२४-२५+ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | मुंबई# | ६,०७,७१० | ७,२२,५७६ | ८,१९,५६० | ९,१३,३१६ | ४,०४,३२८ | ४,५३,६९३ | ४,९७,३२८ | ५,३२,७०१ | ३,५४,३८९ | ४,१७,५९२ | ४,७१,०५४ | ५,१७,८७५ |
| २ | ठाणे$ | ४,४८,२३० | ५,३२,८९२ | ६,०३,२८८ | ६,७२,५०२ | २,९७,६१८ | ३,३३,४१८ | ३,६५,२९८ | ३,९१,५२२ | ३,०२,६८५ | ३,५७,४०२ | ४,०३,०६४ | ४,४४,२८३ |
| ३ | रायगड | ८२,१६४ | ९७,२०४ | १,०८,२७७ | १,२०,६८७ | ५४,१७० | ६०,४४३ | ६५,७३४ | ७०,२०१ | २,४६,५२४ | २,९०,६५१ | ३,२३,०२८ | ३,५७,५८१ |
| ४ | रत्नागिरी | ३८,६३१ | ४४,०१३ | ४९,०१२ | ५४,९०७ | २४,४९४ | २६,५१२ | २८,८७२ | ३१,१७५ | १,९६,८७९ | २,२३,२६१ | २,४८,२८६ | २,७७,००२ |
| ५ | सिंधुदुर्ग | २२,८०० | २६,४०७ | २७,९५९ | ३०,७१४ | १४,००४ | १५,३०४ | १६,५५८ | १७,४९४ | २,२७,३६० | २,६२,४५४ | २,७६,०२९ | ३,०२,००१ |
| | **कोकण विभाग** | **११,९९,५३४** | **१४,२३,०९३** | **१६,०८,०९६** | **१७,९२,१२७** | **७,९४,६१४** | **८,८९,३७०** | **९,७३,७९१** | **१०,४३,०९३** | **३,१३,१८२** | **३,६८,८७६** | **४,१५,०८५** | **४,५७,३६१** |
| ६ | नाशिक | १,५४,९२४ | १,७९,४३३ | १,९८,५६४ | २,३४,७५३ | १,०२,७९८ | १,१४,२३८ | १,२१,६५२ | १,३३,९७८ | २,००,८८२ | २,३१,१३३ | २,५४,९५४ | ३,००,२६० |
| ७ | धुळे | ३९,१६९ | ४५,९७६ | ४९,४९४ | ५५,८५१ | २४,९९९ | २७,७०६ | २९,४६२ | ३२,१५९ | १,५४,४८४ | १,८०,५५६ | १,९३,५५९ | २,१७,१८८ |
| ८ | नंदुरबार | २०,९१७ | २४,५१४ | २६,३१६ | २९,६७९ | १३,७३४ | १५,२१६ | १६,०३० | १७,२३० | १,०४,५९९ | १,२२,१२७ | १,३०,७०७ | १,४६,८०७ |
| ९ | जळगाव | ७५,६७३ | ९०,८४१ | ९८,८७५ | १,११,५८१ | ४९,७६७ | ५७,२३४ | ५९,८५४ | ६५,२७१ | १,४३,६२२ | १,७१,८८३ | १,८६,३९५ | २,०९,१५८ |
| १० | अहिल्यानगर | १,०७,८४४ | १,१७,०३२ | १,३०,६१३ | १,४२,०३३ | ६८,१३४ | ७३,३०२ | ७८,५१० | ८३,००८ | १,९६,६०९ | २,११,२७१ | २,३५,५१६ | २,५४,४८३ |
| | **नाशिक विभाग** | **३,९८,५२७** | **४,५७,७९६** | **५,०३,८६२** | **५,७३,८९७** | **२,५९,४३३** | **२,८७,६९५** | **३,०५,५०७** | **३,३१,६४६** | **१,७३,२९५** | **१,९७,७८०** | **२,१७,०८८** | **२,४६,०२४** |
| ११ | पुणे | ३,६०,१४३ | ४,२०,५९१ | ४,७९,३५८ | ५,३४,६९५ | २,३८,१०७ | २,६३,९५४ | २,८९,६१३ | ३,०९,५५६ | २,९२,९०३ | ३,३९,५४९ | ३,८६,२८१ | ४,२६,७२० |
| १२ | सातारा | ७०,४२३ | ८१,३०२ | ९०,५२८ | १,००,२६० | ४५,९२० | ५०,४४८ | ५४,५०१ | ५७,७६० | १,९२,७२४ | २,२१,५७५ | २,४६,४५७ | २,७१,४१८ |
| १३ | सांगली | ७१,२११ | ८३,३३७ | ९०,८७९ | १,०५,७७८ | ४५,२६२ | ५०,०६७ | ५३,३१७ | ५९,५६६ | २,०७,३८२ | २,४१,६५८ | २,६२,६२३ | ३,०४,२३३ |
| १४ | सोलापूर | १,०८,१८४ | १,२२,४०९ | १,३९,३८१ | १,५७,०७९ | ७२,३०१ | ७८,२४६ | ८५,९१४ | ९०,९०३ | २,०२,४९४ | २,२७,१८२ | २,५८,३६७ | २,८९,५५८ |
| १५ | कोल्हापूर | १,०७,६९३ | १,२४,६५१ | १,४०,७३० | १,५८,८१९ | ७१,०५४ | ७७,८८८ | ८५,०३८ | ९२,७२३ | २,२२,६३६ | २,५६,२४४ | २,८९,१८१ | ३,२४,४४४ |
| | **पुणे विभाग** | **७,१७,६५४** | **८,३२,२९१** | **९,४०,८७५** | **१०,५६,६३०** | **४,७२,६४४** | **५,२०,६०३** | **५,६८,४६२** | **६,१०,५०७** | **२,४२,३५१** | **२,७९,२७८** | **३,१५,२८२** | **३,५१,५३०** |
| १६ | छत्रपती संभाजीनगर | ८६,१०० | ९९,३८६ | १,१३,९९८ | १,३३,१०५ | ५५,९२३ | ६१,४४५ | ६७,७५९ | ७३,१४६ | १,८३,४४६ | २,१०,१९५ | २,४०,८८८ | २,७९,९३० |
| १७ | जालना | ३४,४२२ | ४०,७४१ | ४२,४७० | ४७,०८५ | २१,३५२ | २४,४७९ | २५,८५१ | २७,३४५ | १,४५,४४० | १,७१,५१९ | १,७७,६६३ | १,९५,९४० |
| १८ | परभणी | ३०,९१६ | ३७,९७४ | ४०,५८८ | ४४,२६३ | २०,०१४ | २३,२३२ | २४,१४९ | २५,२२७ | १,३५,७५७ | १,६६,४५४ | १,७६,९८८ | १,९१,५४६ |
| १९ | हिंगोली | १७,३०६ | १९,३८२ | २०,८०८ | २४,५३५ | १०,७५१ | ११,६३७ | १२,११० | १३,२११ | १,२२,२८८ | १,३५,९६३ | १,४५,४४७ | १,७१,२४९ |
| २० | बीड | ४१,९१२ | ५०,८०१ | ५६,३५८ | ६२,९७१ | २६,१८३ | ३०,९०५ | ३३,५९० | ३५,६९१ | १,३३,०३५ | १,६०,९५१ | १,७८,२५४ | १,९८,१९२ |
| २१ | नांदेड | ५७,२५६ | ६७,६१२ | ७६,३२५ | ८१,४३१ | ३६,६५४ | ४१,२१६ | ४५,०४० | ४६,३१७ | १,३७,५५४ | १,६१,७८१ | १,८२,४७८ | १,९३,०१५ |
| २२ | धाराशिव | ३१,२९५ | ३५,२४२ | ३७,९९९ | ४२,४०४ | १९,०७९ | २१,१२६ | २२,१५७ | २३,८५२ | १,५७,७५१ | १,७६,५६६ | १,८९,८०० | २,१०,७७३ |
| २३ | लातूर | ४८,०५९ | ५२,८९३ | ५९,५२६ | ६७,८९९ | ३०,५६४ | ३२,६९२ | ३६,११८ | ३९,३२२ | १,६०,५६९ | १,७५,०१८ | १,९६,८४४ | २,२३,६०० |
| | **छत्रपती संभाजीनगर विभाग** | **३,४७,२६६** | **४,०४,०३१** | **४,४८,०७२** | **५,०३,६९३** | **२,२०,५२०** | **२,४६,७३२** | **२,६६,७७४** | **२,८४,११२** | **१,५०,६५५** | **१,७४,३३७** | **१,९२,९०८** | **२,१५,६९७** |
| २४ | बुलढाणा | ३९,०७८ | ४०,५७४ | ४३,८१५ | ५३,७३८ | २४,१२८ | २५,०४५ | २६,३५१ | २९,८२७ | १,२४,४६९ | १,२७,५६० | १,३७,२७८ | १,६८,४६६ |
| २५ | अकोला | ३६,४५० | ४१,८७५ | ४६,१९५ | ५०,५७४ | २३,२२५ | २५,५८२ | २७,५०९ | २८,९६८ | १,५९,४५४ | १,८१,८५७ | १,९९,९०८ | २,१७,००९ |
| २६ | वाशिम | १६,७५७ | १७,६२१ | १९,४२७ | २३,५१४ | १०,४३३ | ११,१६७ | ११,९८८ | १३,८५१ | १,१६,२३६ | १,२०,८६८ | १,३२,९७२ | १,६०,९२५ |
| २७ | अमरावती | ५३,७६५ | ५८,७१२ | ७०,१७८ | ७८,०२१ | ३५,०८३ | ३७,४४४ | ४२,८७२ | ४५,६३६ | १,४९,०९२ | १,६१,०४१ | १,९२,९१० | २,१२,९११ |
| २८ | यवतमाळ | ४३,०९२ | ४७,१९४ | ५४,६५२ | ६१,६३७ | २७,३७० | २९,२८२ | ३२,७८५ | ३५,३९७ | १,२७,२६७ | १,३८,२२० | १,६०,१६२ | १,७९,८५७ |
| | **अमरावती विभाग** | **१,८९,१४१** | **२,०५,९७७** | **२,३४,२६८** | **२,६७,४८३** | **१,२०,२३९** | **१,२८,५१९** | **१,४१,५०४** | **१,५३,६७९** | **१,३६,३८७** | **१,४७,०३२** | **१,६७,१२०** | **१,८९,९११** |
| २९ | वर्धा | २९,७७९ | ३३,५०३ | ३६,८६४ | ४१,६१९ | १८,८०५ | २०,३९९ | २२,२१६ | २३,८४१ | १,८५,१५९ | २,०६,७२९ | २,२६,५५५ | २,५४,३९० |
| ३० | नागपूर | १,५५,५६५ | १,८३,१४३ | २,०६,५६५ | २,३०,७५० | १,०२,९९५ | १,१४,९४८ | १,२५,८०७ | १,३४,३२६ | २,५३,२६४ | २,९५,९८१ | ३,३२,६२८ | ३,६७,८०५ |
| ३१ | भंडारा | २१,४१९ | २५,३८३ | २८,६९६ | ३१,७५७ | १३,९५८ | १५,६१४ | १७,१४५ | १८,२२२ | १,४६,३३७ | १,७२,९९७ | १,९५,३९८ | २,१५,१०० |
| ३२ | गोंदिया | २२,५६० | २६,८१२ | ३०,४६२ | ३३,५७९ | १४,८९० | १६,८१४ | १८,२९१ | १९,३२४ | १,३८,७६४ | १,६४,६०३ | १,८७,१९९ | २,०५,२२७ |
| ३३ | चंद्रपूर | ४८,४५३ | ५७,५४० | ६२,३५१ | ७०,१९२ | ३१,५८८ | ३५,३९४ | ३७,९६३ | ४०,८३२ | १,७६,०६४ | २,०८,३०५ | २,२४,५२८ | २,५१,२६४ |
| ३४ | गडचिरोली | १३,९२३ | १५,८४३ | १८,२६४ | २०,४१० | ९,१६० | ९,९४८ | ११,१०० | ११,७७८ | १,०७,७२५ | १,२१,९४६ | १,४०,७४४ | १,५६,६०६ |
| | **नागपूर विभाग** | **२,९१,६९९** | **३,४२,२२४** | **३,८३,२०२** | **४,२८,३०८** | **१,९१,३९६** | **२,१३,११८** | **२,३२,५२१** | **२,४८,३२३** | **१,९५,५३५** | **२,२८,१९७** | **२,५४,८७४** | **२,८२,७९२** |

# मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा    $ पालघर अंतर्भूत    ++ दुसरे सुधारित अंदाज    + पहिले सुधारित अंदाज

टीप - १) आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही

२) सुधारीत पायाभूत वर्ष २०११-१२ च्या कार्यपद्धती व परिभाषा मधील बदलामुळे स्थूल जिल्हा उत्पन्न अंदाजांची पायाभूत वर्ष २००४-०५ मालिकेतील परिगणित करण्यात आलेल्या अंदाजाशी तुलना करता येत नाही. *आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

# ४ किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था





# ४. किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था

४.१ सतत परिवर्तित होत असलेल्या अर्थव्यवस्थेत किंमतीतील चढ-उताराचा घरगुती उपभोग पध्दती, उत्पादनविषयक निर्णय तसेच एकूणच जनतेच्या क्रयशक्तीवर लक्षणीय परिणाम होत असतो. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतींतील सातत्यपूर्ण अस्थिरता ही केवळ देशांतर्गत मागणी-पुरवठा परिस्थितीमुळेच नव्हे, तर जागतिक आर्थिक व भू-राजकीय घडामोडी तसेच हवामानविषयक अनिश्चितता यामुळेही प्रभावित होत असते. किरकोळ व घाऊक पातळीवरील किंमतींच्या चढउताराचे अंदाज घेण्यासाठी शासन ग्राहक किंमत निर्देशांक आणि घाऊक किंमत निर्देशांक यांच्या माध्यमातून किंमतींचे नियमितपणे निरीक्षण करते.

४.२ शासन प्राधान्याने ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी तसेच आर्थिक वाढ कायम राखण्यासाठी किंमतींतील स्थिरता सुनिश्चित करित असते. यासाठी शासन संतुलित बाजार हस्तक्षेप, राखीव साठ्याचे प्रभावी व्यवस्थापन आणि जीवनावश्यक वस्तुंचे लक्ष्यित वितरण यांसारख्या सक्रिय धोरणांचा अवलंब करते. सार्वजनिक वितरण प्रणाली गरीब व दुर्बल घटकांतील कुटुंबांना परवडणाऱ्या किंमतीत अन्नधान्य उपलब्ध करून अन्नसुरक्षा सुनिश्चित करणारे एक महत्त्वाचे सामाजिक सुरक्षा कवच आहे.

## किंमती निर्देशांक

### ग्राहक किंमत निर्देशांक

४.३ ग्राहक किंमत निर्देशांक हा घरगुती उपभोग्य वस्तू व सेवांच्या किंमतींतील कालानुरुप बदल मोजणारा एक महत्त्वाचा व्यापक आर्थिक निर्देशक असून किरकोळ किंमतींतील चलनवाढ मोजण्यासाठी हा प्राथमिक निर्देशक मानला जातो. किंमतींतील स्थैर्याचे निरीक्षण करण्याकरिता भारतीय रिझर्व्ह बँक व शासनास ग्राहक किंमत निर्देशांकाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. तसेच कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याचे निर्धारण करण्यासाठी देखील याचा वापर करण्यात येतो.

४.४ सन १९६२ पासून अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन राज्यातील ग्रामीण व नागरी क्षेत्रांकरिता स्वतंत्र ग्राहक किंमत निर्देशांक दरमहा परिगणित करते. राष्ट्रीय स्तरावर, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांचेमार्फत सर्व राज्ये व अखिल भारताकरिता मासिक ग्राहक किंमती निर्देशांक (ग्रामीण, नागरी व एकत्रित) प्रकाशित केला जातो. याव्यतिरिक्त, विशिष्ट लोकसमूहांसाठी महागाईच्या स्थितीचे अधिक सुस्पष्ट चित्र उपलब्ध होण्यासाठी श्रम केंद्र, भारत सरकार यांचेमार्फत औद्योगिक कामगारांकरिता, शेत मजूर तसेच ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक दरमहा परिगणित करण्यात येतात.

#### राज्याकडून परिगणित करण्यात येणारा ग्राहक किंमत निर्देशांक

४.५ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत राज्याच्या ग्रामीण व नागरी क्षेत्रांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३=१००) दरमहा परिगणित केले जातात. याकरिता ग्रामीण क्षेत्रातील ६८ केंद्रांमधून १०६ वस्तू व सेवा आणि नागरी क्षेत्रातील ७४ केंद्रांमधून १२७ वस्तू व सेवा यांच्या साप्ताहिक किरकोळ किंमती संकलित केल्या जातात.

४.५.१ माहे एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ग्रामीण आणि नागरी क्षेत्रांकरिता सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक अनुक्रमे ४०१.८ व ३७६.७ होता तर गतवर्षी याच कालावधीमध्ये तो ३९४.१ आणि ३७१.१ होता. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये ग्रामीण आणि नागरी क्षेत्रांकरिता 'खाद्यपदार्थ' गटासाठी सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक अनुक्रमे ४१३.२ आणि ४०५.७ होता तर गतवर्षी याच कालावधीमध्ये तो ४११.१ आणि ४०६.२ होता. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये ग्रामीण आणि नागरी क्षेत्रांकरिता 'इंधन, वीज व दिवाबत्ती' गटासाठी सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक अनुक्रमे ७२५.७ आणि ६८८.६ होता. तर, गतवर्षी याच कालावधीमध्ये तो ७२९.८ आणि ६८९.० होता.

४.५.२ माहे एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकांवर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ ग्रामीण आणि नागरी क्षेत्रांकरिता अनुक्रमे २.० टक्के व १.५ टक्के होती. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत 'खाद्यपदार्थ' गटासाठी सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकांवर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ ग्रामीण क्षेत्राकरिता ०.५ टक्के व नागरी क्षेत्राकरिता (-) ०.१ टक्के होती. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत 'इंधन, वीज व दिवाबत्ती' गटाच्या सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकांवर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ ग्रामीण क्षेत्राकरिता (-) ०.६ टक्के व नागरी क्षेत्राकरिता (-) ०.१ टक्के होती. सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकांवर (२००३=१००) आधारित राज्यातील गटनिहाय वर्ष-ते-वर्ष चलनवाढ तक्ता ४.१ मध्ये दिली आहे. सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकांवर (२००३=१००) आधारित राज्यातील 'खाद्यपदार्थ' गटातील उपगटांसाठी वर्ष-ते-वर्ष चलनवाढ तक्ता ४.२ मध्ये दिली आहे. ग्रामीण क्षेत्राकरिता गटनिहाय ग्राहक किंमत निर्देशांक परिशिष्ट ४.१ मध्ये व नागरी क्षेत्राकरिता परिशिष्ट ४.२ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ४.१ सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकांवर (२००३=१००) आधारित राज्यातील गटनिहाय वर्ष-ते-वर्ष चलनवाढ**

(टक्के)

| गट | २०२४-२५ | | २०२५-२६@ | |
|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी |
| खाद्यपदार्थ | ६.३ | ५.८ | ०.५ | (-)०.१ |
| पान, सुपारी व मादक पदार्थ | ५.८ | ५.४ | ४.० | ५.३ |
| इंधन, वीज व दिवाबत्ती | ४.६ | (-)०.१ | (-)०.६ | (-)०.१ |
| कापड, बिछाना व पादत्राणे | ४.० | ४.४ | २.४ | २.६ |
| संकीर्ण | ४.९ | ४.० | ८.७ | ५.५ |
| **चलनवाढ - ग्राहक किंमत निर्देशांक** | **५.६** | **४.१** | **२.०** | **१.५** |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन @ एप्रिल ते डिसेंबर २०२५

**तक्ता ४.२ सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकांवर (२००३=१००) आधारित राज्यातील 'खाद्यपदार्थ' गटातील उपगटांसाठी वर्ष-ते-वर्ष चलनवाढ**

(टक्के)

| खाद्यपदार्थ गटाचा उपगट | ग्रामीण | | नागरी | |
|---|---|---|---|---|
| | एप्रिल ते डिसेंबर २०२४ | एप्रिल ते डिसेंबर २०२५ | एप्रिल ते डिसेंबर २०२४ | एप्रिल ते डिसेंबर २०२५ |
| तृणधान्ये व उत्पादने | १.५ | ४.१ | २.१ | ४.३ |
| कडधान्ये व उत्पादने | १४.८ | (-)१०.८ | १४.४ | (-)१३.१ |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | ३.७ | ३.३ | ३.६ | ३.६ |
| खाद्य तेल | (-)२.२ | २.९ | (-)०.६ | ०.७ |
| अंडी, मांस व मासे | ३.१ | ५.३ | ४.० | ३.७ |
| भाज्या व फळे | १९.८ | (-)३.० | १६.९ | (-)६.४ |
| मसाले व मसाल्याचे पदार्थ | १८.२ | (-)६.६ | १५.८ | (-)१०.५ |
| इतर खाद्यपदार्थ | ३.१ | ४.२ | ३.८ | ५.३ |
| **खाद्यपदार्थ गट** | **७.४** | **०.५** | **६.९** | **(-)०.१** |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

**आलेख ४.१ : राज्यातील ग्राहक किंमत निर्देशांकावर (२००३=१००) आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ -ग्रामीण**




**आलेख ४.२ : राज्यातील ग्राहक किंमत निर्देशांकावर (२००३=१००) आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ -नागरी**



४.५.३ राज्यात ग्राहक किंमत निर्देशांकाचे पायाभूत वर्ष २००३ वरुन २०२५ करण्याची प्रक्रिया सुरू असून यात उप-राज्यस्तरीय (महसूल विभागनिहाय) ग्राहक किंमत निर्देशांक परिगणित करण्याचे प्रस्तावित आहे. पायाभूत वर्ष बदल करण्याच्या प्रक्रियेत 'कुटुंबाचा उपभोग्य बाबींवरील खर्च पाहणी २०२३-२४' मधील माहितीचा वापर करून वस्तू व सेवांकरिताचे भारांक निश्चित करण्यात आले आहेत. नवीन ग्राहक किंमत निर्देशांक मालिकेसाठी ग्रामीण भागात १९२ बाजारपेठा व नागरी भागात २३९ बाजारपेठा निश्चित करण्यात आल्या आहेत. यामध्ये महसूल विभागनिहाय निवडलेल्या वस्तू व सेवांची संख्या वेगवेगळी असून संपूर्ण राज्यात ३५० पेक्षा अधिक वस्तू व सेवांचा समावेश असेल. माहे जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीसाठी पायाभूत वर्षाचे भावसंकलन पूर्ण करण्यात आले आहे.

## केंद्र शासनाच्या यंत्रणांद्वारे परिगणित करण्यात येणारे ग्राहक किंमती निर्देशांक

४.६ अखिल भारत स्तरावर ग्रामीण, नागरी व एकत्रित क्षेत्रांसाठी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांचे मार्फत ग्राहक किंमत निर्देशांक (पायाभूत वर्ष २०१२=१००) दरमहा परिगणित केले जातात. ग्राहक किंमत निर्देशांक परिगणित करण्यासाठी देशातील १,१८१ ग्रामीण व १,११४ नागरी केंद्रांमधून वस्तू व सेवांच्या किंमतींचे संकलन नियमितपणे करण्यात येते, यापैकी ६६ ग्रामीण व ८६ नागरी केंद्रे राज्यातील आहेत. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत अखिल भारत स्तरावरील सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक ग्रामीण क्षेत्राकरिता १९७.५, नागरी क्षेत्राकरिता १९४.० व एकत्रित क्षेत्राकरिता १९५.९ होता तर गतवर्षी याच कालावधीमध्ये तो अनुक्रमे १९५.०, १८९.९ व १९२.६ होता. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ग्रामीण, नागरी व एकत्रित क्षेत्रांसाठी सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकांवर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ अनुक्रमे १.३ टक्के, २.२ टक्के व १.७ टक्के होती. सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकांवर (२०१२=१००) आधारित अखिल भारत स्तरावरील गटनिहाय वर्ष-ते-वर्ष चलनवाढ तक्ता ४.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ४.३ सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकांवर (२०१२=१००) आधारित अखिल भारत स्तरावरील गटनिहाय वर्ष-ते-वर्ष चलनवाढ**

(टक्के)

| गट | २०२४-२५ | | | २०२५-२६@ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकत्रित | ग्रामीण | नागरी | एकत्रित |
| खाद्यपदार्थ व पेये | ६.९ | ६.५ | ६.७ | (-)१.० | (-)०.५ | (-)०.८ |
| पान, तंबाखू व मादक पदार्थ | २.६ | २.७ | २.७ | २.६ | २.६ | २.६ |
| कापड व पादत्राणे | २.६ | २.९ | २.७ | २.० | २.५ | २.२ |
| निवास | ला.ना. | २.८ | २.८ | ला.ना. | ३.० | ३.० |
| इंधन व वीज | (-)०.९ | (-)५.१ | (-)२.५ | १.९ | ३.२ | २.४ |
| संकीर्ण | ४.२ | ४.० | ४.१ | ५.६ | ५.१ | ५.४ |
| **चलनवाढ - ग्राहक किंमत निर्देशांक (सर्वसाधारण)** | **५.०** | **४.१** | **४.६** | **१.३** | **२.२** | **१.७** |
| **चलनवाढ - खाद्यपदार्थ ग्राहक किंमत निर्देशांक** | **७.४** | **७.१** | **७.३** | **(-)१.७** | **(-)१.७** | **(-)१.७** |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार    ला.ना. लागू नाही    @ एप्रिल ते डिसेंबर २०२५

**आलेख ४.३ : अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांकावर (२०१२=१००) आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ**



४.६.१ राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय यांनी राज्याकरिता एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीकरिता परिगणित केलेला सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक ग्रामीण भागाकरिता १९५.५, नागरी भागाकरिता १९०.७ व एकत्रित क्षेत्राकरिता १९२.३ होता. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ग्रामीण, नागरी व एकत्रित क्षेत्रांकरिता सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकांवर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ अनुक्रमे १.१ टक्के, २.६ टक्के व २.१ टक्के होती. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांचेकडून राज्याकरिता ग्रामीण, नागरी व एकत्रित क्षेत्रासाठी परिगणित केलेले गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.३ मध्ये दिले आहेत.

४.६.२ राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय ग्राहक किंमत निर्देशांकाच्या पायाभूत वर्षात सुधारणा करीत आहे (२०२४ = १००). याअंतर्गत वस्तुसूची व त्यांचे भारांक निश्चित करण्यासाठी 'कुटुंबाचा उपभोग्य बाबींवरील खर्च पाहणी २०२३-२४' मधील माहितीचा वापर करण्यात आला आहे. ग्राहक किंमत निर्देशांक अंदाजात अचूकता, सुसंगतता आणि कार्यपद्धतीतील पारदर्शकता वाढवून अधिक प्रतिसादक्षम आर्थिक धोरणनिर्मितीस पाठबळ देण्याच्या उद्देशाने ही सुधारणा करण्यात येत आहे. पायाभूत वर्ष २०२४ नुसार, अखिल भारतीय स्तरावर माहे जानेवारी २०२६ साठी ग्राहक किंमत निर्देशांक (अस्थायी) ग्रामीण भागाकरिता १०४.६, नागरी भागाकरिता १०४.३ आणि एकत्रित क्षेत्राकरिता १०४.५ इतका होता. जानेवारी २०२६ मधील वर्ष-ते-वर्ष चलनवाढ २.८ टक्के (अस्थायी) इतकी होती. तर ग्रामीण आणि नागरी भागाकरिता वर्ष-ते-वर्ष चलनवाढ (अस्थायी) अनुक्रमे २.७ टक्के आणि २.८ टक्के इतकी होती.

## गाभा चलनवाढ

४.७ गाभा चलनवाढ ही एकूण ग्राहक किंमत निर्देशांकातून 'खाद्यपदार्थ' आणि 'इंधन, वीज व दिवाबत्ती' यांसारखे अत्यंत अस्थिर गट वगळून किंमतींचा दीर्घकालीन कल मोजते. ही अर्थव्यवस्थेतील तात्पुरत्या धक्क्यांपेक्षा अंतर्निहित व सातत्यपूर्ण महागाईचा प्रभाव प्रतिबिंबित करते. हंगामी बदल तसेच पुरवठा-साखळीतील अडथळ्यांचा गाभा चलनवाढीवरील तुलनेने कमी परिणाम होत असल्याने, मागणी-आधारित किंमत दबाव तसेच मध्यम ते दीर्घकालीन चलनवाढीचे मूल्यांकन करण्यासाठी गाभा चलनवाढ एक महत्त्वपूर्ण निर्देशक ठरते. गाभा चलनवाढीच्या विश्लेषणातून अर्थव्यवस्थेतील चलनवाढीच्या गतीशीलतेचे सर्वसमावेशक आकलन होते जे संरचनात्मक व मागणीच्या दबावाचे प्रतिबिंब दर्शविते. किंमत स्थैर्य राखण्यासाठी मुद्रा धोरण ठरविताना धोरणकर्ते गाभा चलनवाढीचे बारकाईने निरीक्षण करतात.

आलेख ४.४: राज्यातील ग्राहक किंमती निर्देशांकावर (२००३=१००) आधारित वर्ष-ते-वर्ष गाभा चलनवाढ




आलेख ४.५ : अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांकावर (२०१२=१००) आधारित वर्ष-ते-वर्ष गाभा चलनवाढ



## इतर ग्राहक किंमती निर्देशांक

४.८ शेत मजूर व ग्रामीण मजुरांकरिताचे ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे कृषी आणि ग्रामीण क्षेत्रातील मजुरांच्या किमान वेतनाचे (किमान वेतन कायदा, १९४८ अंतर्गत) निर्धारण आणि सुधारणा करणे यासाठी मार्गदर्शक ठरतात.

४.८.१ माहे जुलै २०२५ मध्ये श्रम केंद्र, भारत सरकार यांनी शेत मजूर व ग्रामीण मजुरांकरिताचे ग्राहक किंमती निर्देशांकाचे पायाभूत वर्ष १९८६-८७=१०० वरून २०१९=१०० असे सुधारित केले आहे. सुधारित मालिकेमध्ये देशातील ७८७ केंद्रांमधून किंमती संकलित केल्या जातात, ज्यापैकी ५० केंद्रे ही राज्यातील आहेत. सुधारित उपभोग पद्धती व विस्तारित वस्तुसूचीसह अद्ययावत शेत मजूर व ग्रामीण मजुरांकरिताच्या ग्राहक किंमती निर्देशांकांच्या माध्यमातून ग्रामीण राहणीमान अधिक चांगल्या प्रकारे प्रतिबिंबित होते.

४.८.२ पायाभूत वर्ष २०१९=१०० नुसार अखिल भारताकरिता माहे एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीकरिता शेत मजूर व ग्रामीण मजुरांसाठीचे सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे १३५.८ आणि १३६.० होते तर वर्ष-ते-वर्ष चलनवाढ अनुक्रमे १.६ टक्के व १.७ टक्के इतकी होती.

४.८.३ माहे एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत राज्यासाठी शेत मजूर व ग्रामीण मजुरांसाठीचे सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे १३१.८ व १३२.१ असून वर्ष-ते-वर्ष चलनवाढ अनुक्रमे ०.५ टक्के व ०.६ टक्के इतकी होती. अखिल भारत व राज्यासाठीचे शेत मजूर व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.४ मध्ये दिले आहेत.

आलेख ४.६: अखिल भारतीय शेत मजुरांकरिता ग्राहक किंमत निर्देशांकावर (२०१९=१००) आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ




आलेख ४.७: अखिल भारतीय ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमत निर्देशांकावर (२०१९=१००) आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ



४.९ औद्योगिक कामगारांकरिताचा ग्राहक किंमत निर्देशांक हा उद्योगातील कामगारांची किमान मजुरीची निश्चिती व सुधारणा यासाठी तसेच शासकीय कर्मचारी व औद्योगिक क्षेत्रातील कामगारांसाठी महागाई भत्ता दर निश्चित करण्यासाठी वापरला जातो. श्रम केंद्र, भारत सरकार यांचेकडून औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमत निर्देशाक (पायाभूत वर्ष २०१६=१००) परिगणित केला जातो. याकरिता राज्यातील मुंबई, सोलापूर, नागपूर, पुणे, नाशिक, ठाणे या ६ केंद्रांसहीत देशातील ८८ केंद्रांमधून निवडक वस्तू व सेवा यांच्या किरकोळ किंमती संकलित केल्या जातात. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीसाठी अखिल भारताकरिता औद्योगिक कामगारांकरिता सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक १४६.४ असून २.८ टक्क्यांची वर्ष-ते-वर्ष चलनवाढ दर्शवितो. औद्योगिक कामगार ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ एप्रिल २०२५ मध्ये २.९ टक्क्यांवरून डिसेंबर २०२५ मध्ये ३.१ टक्के इतकी वाढली. अखिल भारतीय औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमत निर्देशांक परिशिष्ट ४.५ मध्ये व अखिल भारत स्तरावरील निरनिराळ्या महत्त्वाच्या ग्राहक किंमत निर्देशांकांवर आधारित चलनवाढ परिशिष्ट ४.६ मध्ये दिली आहे. मुंबई, सोलापूर, नागपूर, पुणे, नाशिक आणि ठाणे या केंद्रांकरिता एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीकरिता औद्योगिक कामगारांकरिताचा सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक अनुक्रमे १३५.९, १५३.०, १४७.३, १३७.८, १४६.० आणि १३८.६ होता. महाराष्ट्रातील केंद्रीय केंद्रांसाठीचे औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमत निर्देशांक परिशिष्ट ४.७ मध्ये दिले आहेत.

४.९.१ श्रम केंद्र, भारत सरकार यांचेमार्फत महाराष्ट्रातील सहा केंद्रांकरिता परिगणित केल्या जाणाऱ्या औद्योगिक कामगारांकरिताच्या ग्राहक किंमत निर्देशांकाव्यतिरिक्त कामगार आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत राज्यातील अकोला, कोल्हापूर, जळगाव, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर या पाच केंद्रांसाठी स्वतंत्रपणे दरमहा औद्योगिक कामगारांकरिताचे ग्राहक किंमत निर्देशांक (पायाभूत वर्ष २००१=१००) परिगणित केले जातात. माहे एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीकरिता अकोला, कोल्हापूर, जळगाव, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर या केंद्रांसाठी औद्योगिक कामगारांकरिता सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक अनुक्रमे ५०४.२, ४५७.३, ४८८.२, ५५२.२, ४८४.९ होते. महाराष्ट्रातील राज्य केंद्रांसाठीचे औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमत निर्देशांक परिशिष्ट ४.८ मध्ये दिले आहेत.

आलेख ४.८: अखिल भारतीय औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमत निर्देशांकावर (२०१६=१००) आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ




## अखिल भारतीय घाऊक किंमत निर्देशांक

४.१० आर्थिक सल्लागार यांचे कार्यालय, उद्योग संवर्धन आणि आंतरिक व्यापार विभाग, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचे मार्फत दरमहा घाऊक किंमत निर्देशांक (पायाभूत वर्ष २०११-१२ =१००) परिगणित केला जातो. 'प्राथमिक वस्तू', 'इंधन व शक्ती' आणि 'उत्पादित वस्तू' या तीन प्रमुख गटांसाठी घाऊक किंमत निर्देशांक परिगणित केले जातात.

४.१०.१ माहे एप्रिल २०२५ मध्ये सर्व वस्तुंकरिता घाऊक किंमत निर्देशांक १५४.२ होता, त्यात वाढ होऊन डिसेंबर २०२५ मध्ये तो १५७.० (अस्थायी) झाला. याच कालावधीत 'प्राथमिक वस्तू' गटातील घाऊक किंमत निर्देशांक १८५.४ वरून १९४.२ (अस्थायी) वाढला. 'इंधन व शक्ती' या गटाकरिता तो १४५.७ वरून १४८.३ (अस्थायी) वाढला. तर 'उत्पादित वस्तू' गटाकरिता तो १४४.९ वरून १४५.६ (अस्थायी) वाढला. 'खाद्यपदार्थ निर्देशांक' एप्रिल २०२५ मध्ये १९०.७ वरून डिसेंबर २०२५ मध्ये १९६.० (अस्थायी) वाढला. अखिल भारतीय घाऊक किंमत निर्देशांक परिशिष्ट ४.९ मध्ये दिले आहेत.

४.१०.२ माहे एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये सरासरी घाऊक किंमत निर्देशांकांवर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ ०.१ टक्के होती. तथापि, घाऊक किंमत निर्देशांकांवर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ एप्रिल २०२५ मधील ०.९ टक्क्यांवरून डिसेंबर २०२५ मध्ये ०.८ टक्के (अस्थायी) इतकी घटली. 'प्राथमिक वस्तू' गटाकरिता ती एप्रिल २०२५ मधील (-)०.९ टक्क्यांवरून डिसेंबर २०२५ मध्ये ०.२ टक्के (अस्थायी) इतकी वाढली. 'इंधन व शक्ती' गटाकरिता ती एप्रिल २०२५ मधील (-)३.८ टक्क्यांवरून डिसेंबर २०२५ मध्ये (-)२.३ टक्के (अस्थायी) इतकी वाढली. 'उत्पादित वस्तू' गटाकरिता ती एप्रिल २०२५ मधील २.६ टक्क्यांवरून डिसेंबर २०२५ मध्ये १.८ टक्के (अस्थायी) इतकी घटली. घाऊक किंमत निर्देशांकांवर आधारित 'खाद्यपदार्थ' निर्देशांक करिता वर्ष-ते-वर्ष चलनवाढ एप्रिल २०२५ मधील ३.३ टक्क्यांवरून डिसेंबर २०२५ मध्ये शून्य टक्के (अस्थायी) इतकी घटली.

**आलेख ४.९: अखिल भारतीय घाऊक किंमत निर्देशांकावर (२०११-१२=१००) आधारित प्रमुख गटाकरिता वर्ष-ते-वर्ष चलनवाढ**




**आलेख ४.१० अखिल भारतीय घाऊक किंमत निर्देशांकावर (२०११-१२=१००) आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ**



## गृह किंमत निर्देशांक

४.११ घर ही कुटूंबाच्या जीवनमानाचा दर्जा दर्शविणारी एक महत्त्वाची मालमत्ता आहे. सूक्ष्म आर्थिक स्तरावर स्थावर मालमत्ता आणि पत बाजार विषयी विश्लेषणात्मक अभ्यासासाठी धोरणकर्ते घरांच्या किमतींचा मागोवा घेतात.

४.११.१ भारतीय रिझर्व्ह बँक घरांच्या किंमतींचा नियमितपणे मागोवा घेत असून, राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे आणि नागपूर या चार शहरांसह देशातील १८ शहरांसाठी त्रैमासिक गृह किंमत निर्देशांक परिगणित करते.

४.११.२ संबंधित राज्य शासनाच्या नोंदणी प्राधिकरणांकडील घरांच्या खरेदी-विक्री नोंदणी माहितीच्या आधारे बाजारातील घरांच्या किंमतीतील काळानुरुप चढउतार मोजण्यासाठी सदर निर्देशांक तयार करण्यात आला आहे. शहरनिहाय गृह किंमत निर्देशांकांची सरासरी ही अखिल भारतीय स्तरावरील गृह किंमत निर्देशांक दर्शवितो. सन २०२५-२६ च्या पहिल्या दोन तिमाहींसाठी अखिल भारतीय सरासरी गृह किंमत निर्देशांक पायाभूत वर्ष (२०२२-२३=१००) करिता ११३.० (अस्थायी) इतका असून, मागील वर्षातील त्याच कालावधीतील १०९.८ च्या तुलनेत वाढ दर्शवितो. सन २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत मुंबई, ठाणे, पुणे आणि नागपूरचा या शहरांचा गृह किंमत निर्देशांक (अस्थायी) अनुक्रमे १०६.०, १११.६, ११२.३ आणि ११२.७ असा होता, तर याच कालावधीत अखिल भारत स्तरावर हा निर्देशांक ११२.७ असा होता.

आलेख ४.११ : राज्यातील शहरांसाठीचा गृह किंमत निर्देशांक (२०२२-२३=१००)



# सार्वजनिक वितरण व्यवस्था

४.१२ सार्वजनिक वितरण प्रणाली समाजातील वंचित घटकांना अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी जीवनावश्यक वस्तूंचा वाजवी दरात नियमित पुरवठा करून महत्त्वाची भूमिका बजावते. ही प्रणाली खरेदी, साठवणूक, वाहतूक आणि 'रास्त भाव दुकानांच्या' जाळ्याद्वारे सवलतीच्या दरात धान्याचे वितरण अशी महत्त्वाची कामे करते. रास्त भाव दुकानांचे संनियंत्रण केंद्र आणि राज्य शासनाद्वारे संयुक्तपणे केले जाते.

## सार्वजनिक वितरण व्यवस्था - पायाभूत सुविधा

४.१३ राज्यात दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी एकूण ५१,६३६ कार्यरत रास्त भाव दुकाने होती. त्यापैकी ५,४२७ दुकाने आदिवासी भागात तर २८ फिरती होती. अन्नधान्य वितरणासाठी सर्व रास्त भाव दुकानांमध्ये ई-पॉईंट ऑफ सेल (ePoS) उपकरणे स्थापित करण्यात आली आहेत. मालकी प्रकारानुसार रास्त भाव दुकानांची संख्या तक्ता ४.४ मध्ये दिली आहे. दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी आधार संलग्न शिधापत्रिका धारकांची एकूण संख्या २.७१ कोटी होती. शिधापत्रिकेच्या प्रकारानुसार शिधापत्रिका धारकांची संख्या तक्ता ४.५ मध्ये दिली आहे आणि जिल्हानिहाय शिधापत्रिका धारकांची संख्या परिशिष्ट ४.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता ४.४ मालकी प्रकारानुसार रास्त भाव दुकानांची संख्या**

(दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी)

| मालकीचा प्रकार | रास्त भाव दुकाने (संख्या) |
|---|---|
| वैयक्तिक | |
| सर्वसाधारण | २९,३८२ |
| अनुसूचित जाती | ३०२४ |
| अनुसूचित जमाती | २८१० |
| माजी सैनिक | १५७ |
| महिला स्वयंसहाय्य गट | ६५४८ |
| पुरुष स्वयंसहाय्य गट | २०० |
| ग्रामपंचायत | ३१४ |
| नागरी स्थानिक संस्था | ४१८ |
| सहकारी संस्था | ७,९२५ |
| इतर | ८३२ |
| **एकूण** | **५१,६३६** |

*आधार* : अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

**तक्ता ४.५ शिधापत्रिकेच्या प्रकारानुसार शिधापत्रिका धारकांची संख्या**

(दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी) (लाख)

| वर्ष | पिवळी | | केशरी | | | अन्नपूर्णा | शुभ्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दारिद्र्य रेषेखालील | अंत्योदय अन्न योजना | प्राधान्य कुटुंब | प्राधान्य कुटुंब शेतकरी | बिगर प्राधान्य कुटुंब | | | |
| २०२३ | ३६.७१ | २४.८३ | ९४.५९ | ८.६६ | ७५.५२ | नगण्य | २२.५२ | २६२.८३ |
| २०२४ | ३३.५८ | २५.३२ | १०६.५५ | ७.३१ | ७०.३८ | ०.०० | २२.०७ | २६५.२० |
| २०२५ | ३३.५२ | २५.१६ | ११०.२३ | ६.६४ | ७३.२८ | ०.०० | २२.०१ | २७०.८४ |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे एकूण बेरजा जुळतीलच असे नाही.

*आधार* : अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

४.१४ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणाच्या संनिरीक्षणासाठी राज्यात विविध स्तरावर दक्षता समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. अन्नधान्याचा नियमित पुरवठा व गुणवत्तेची खात्री करण्यासाठी आणि गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी रास्त भाव दुकानांची निरीक्षणे घेणे ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. सन २०५-२६ मध्ये माहे ऑक्टोबर पर्यंत २८,८९६ निरीक्षणे घेण्यात आली, या निरीक्षणांदरम्यान ५८ रास्त भाव दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले, ७२ रास्त भाव दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले व एकूण ₹ ४५.३३ लाख दंड वसूल करण्यात आला. दक्षता समित्यांची संख्या तक्ता ४.६ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ४.६ दक्षता समित्यांची संख्या**

(दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी)

| स्तर | दक्षता समित्या (संख्या) |
|---|---|
| महानगरपालिका | ६४ |
| नगरपालिका | २५० |
| जिल्हा | ३२ |
| तालुका | ३२४ |
| गाव | २९,४०३ |
| **एकूण** | **३०,०७३** |

*आधार* : अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३

४.१५ नागरिकांना किफायतशीर दरामध्ये पुरेशा प्रमाणात दर्जेदार अन्नधान्य मिळण्याची सुनिश्चिती करून अन्न व पोषणविषयक सुरक्षा प्रदान करण्यासाठी 'राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३' अधिनियमित करण्यात आला. या अधिनियमाची अंमलबजावणी राज्यात दि. १ फेब्रुवारी २०१४ पासून करण्यात येत असून सुमारे ६२.३ टक्के लोकसंख्या अनुदानित दराने अन्नधान्य मिळण्यास पात्र आहे.

४.१६ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अंत्योदय अन्न योजना कुटुंब आणि प्राधान्य कुटुंब असे लाभार्थ्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. अंत्योदय अन्न योजनेतील कुटुंब प्रति शिधापत्रिका प्रतिमाह ३५ किलो अन्नधान्य तर प्राधान्य कुटुंब प्रति व्यक्ति प्रतिमाह पाच किलो अन्नधान्य मिळण्यास पात्र आहेत. लाभार्थ्यांना तांदूळ, गहू आणि भरड धान्ये अनुक्रमे ₹ तीन, ₹ दोन आणि ₹ एक प्रति किलो या दराने देण्यात येतात. केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार दि. १ जानेवारी २०२४ ते दि. ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत अन्नधान्य मोफत वितरीत करण्यात येत आहे. दि. ३१ डिसेंबर २०२६ रोजी राज्यात अंत्योदय अन्न योजनेचे २५.१६ लाख व प्राधान्य कुटुंब योजनेचे ११६.८७ लाख शिधापत्रिका धारक आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाअंतर्गत अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण तक्ता ४.७ मध्ये दिले आहे. केंद्र शासनाकडून राज्याला मिळालेले तांदूळ व गहू यांचे नियतन व अधिकृत रास्त भाव दुकानांना तांदूळ व गहू याचे वितरण अनुक्रमे परिशिष्ट ४.११ व ४.१२ मध्ये दिले आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत सन २०२४-२५ करिता अंत्योदय अन्न योजना कुटुंब व प्राधान्य कुटुंब यांचेकरिता जिल्हानिहाय अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना करण्यात आलेले वितरण अनुक्रमे परिशिष्ट ४.१३ व परिशिष्ट ४.१४ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.७ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण**

(लाख मे. टन)

| लाभार्थी | वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण |
| अंत्योदय अन्न योजना कुटुंब | २०२३-२४ | ६.५९ | ६.१८ | ६.२२ | ३.६८ | ३.४१ | ३.४५ |
| | २०२४-२५ | ६.३५ | ६.०३ | ६.०३ | ४.२१ | ३.७८ | ३.६० |
| | २०२५-२६+ | ३.९३ | १.८९ | ३.५९ | २.२१ | २.०९ | २.०४ |
| प्राधान्य कुटुंब | २०२३-२४ | २२.२६ | १९.८१ | १९.९७ | १२.४४ | ११.०९ | ११.२१ |
| | २०२४-२५ | २१.४० | १९.०७ | १८.७४ | १४.१७ | १२.६१ | १२.१२ |
| | २०२५-२६+ | १२.२६ | ७.२७ | १२.३८ | ७.४६ | ६.६६ | ६.६८ |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबर पर्यंत

४.१७ राज्य शासनाने या अधिनियमांतर्गत प्राधान्य कुटुंबाचे लाभ १४ अवर्षणप्रवण जिल्ह्यांतील (छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा जिल्हा) सर्व दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिका धारक शेतकरी कुटुंबांना दिले आहेत. माहे एप्रिल २०२४ पासून ₹ १७० इतकी रोख रक्कम प्रति लाभार्थी प्रति माह याप्रमाणे लाभार्थ्यांच्या खात्यात थेट हस्तांतरित करण्यात येत आहे. सन २०२५-२६ मध्ये सप्टेंबर पर्यंत २६.१८ लाख लाभार्थ्यांवर ₹ ४५ कोटी खर्च झाला.

४.१८ किमान आधारभूत किंमत योजने अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या भरड धान्याचे (ज्वारी, मका, रागी, इत्यादी) वितरण राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत राज्यातील लाभार्थ्यांना करण्यात येते. भरड धान्यांचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण तक्ता ४.८ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.८ भरड धान्यांचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण**

('००० मे. टन)

| वर्ष | ज्वारी | | | मका | | | रागी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण |
| २०२४-२५ | २०६ | १३४.६५ | १३४.६५ | ८१ | ०.०२ | ०.०२ | ९२ | ०.२७ | ०.२७ |
| २०२५-२६+ | ८५ | ०.८१ | - | ६६ | १२.७ | १२.७ | ३ | ०.०५ | -- |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

४.१९ रक्तक्षय व सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता या समस्यांचे निराकरण करुन पोषण सुरक्षेसाठी केंद्र शासन 'तांदूळाचे पोषणतत्व गुणसंवर्धन व त्याचे सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाटप' ही योजना राबवित आहे. सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत लाभार्थ्यांना २७ लाख मे. टन पोषणतत्व गुणसंवर्धीत तांदूळ वाटप करण्यात आला आहे.

## साखरेचे वितरण

४.२० राज्यात साखरेचे वाटप केवळ अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिका धारकांना करण्यात येते. केंद्र शासनाने राज्यास प्रति माह २,५०५ मे. टन साखरेचे नियतन निश्चित केले आहे. प्रत्येक कुटुंबास एक किलो साखर प्रति माह ₹२० प्रति किलो दराने पुरविली जाते. साखरेचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण तक्ता ४.९ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.९ साखरेचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण**

(लाख मे. टन)

| वर्ष | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | ०.२७ | ०.२६ | ०.२६ |
| २०२४-२५ | -- | -- | -- |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## शिधापत्रिका धारक आस्थापनांना अन्नधान्य वितरण

४.२१ केंद्र शासनाकडून कल्याणकारी संस्था व वसतिगृहे योजनेअंतर्गत आस्थापनांना अन्नधान्याचे नियतन मंजूर करण्यात येते. सन २०२५-२६ मध्ये सप्टेंबर अखेर आधार संलग्न सार्वजनिक वितरण प्रणालीवर नोंदणीकृत आस्थापनांची संख्या ३,६९६ असून लाभार्थी संख्या ४.१५ लाख आहे. शिधापत्रिका धारक आस्थापनांकरिता अन्नधान्याचे नियतन, उचल व वितरण तक्ता ४.१० मध्ये दिले आहेत

**तक्ता ४.१० शिधापत्रिका धारक आस्थापनांकरिता अन्नधान्याचे नियतन, उचल व वितरण**

('००० मे. टन)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | वितरण | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | वितरण |
| २०२३-२४ | १०.८१ | ८.२३ | १२.७३ | १८.९४ | १५.४० | १२.५६ |
| २०२४-२५ | १५.३० | १३.०० | १४.२७ | १६.३७ | १३.८१ | १४.१९ |
| २०२५-२६+ | ८.२८ | ७.५३ | ७.३६ | ८.२० | ७.२२ | ७.३५ |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + सप्टेंबर पर्यंत

## विकेंद्रित पद्धतीने खरेदी

४.२२ किमान आधारभूत किंमतीनुसार धान व भरड धान्यांची विकेंद्रित पद्धतीने खरेदी बिगर आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित मार्फत आणि आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित मार्फत करण्यात येते. धान खरेदी प्रक्रिया आणि धान उत्पादक शेतकऱ्यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने करण्यात येते. सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत राज्यातील २.१२ लाख शेतकऱ्यांकडून ₹ १७१०.७५ कोटी किंमतीचे ७.२२ लाख मे. टन धान्य खरेदी करण्यात आले. धान आणि भरड धान्यांची खरेदी तक्ता ४.११ मध्ये दिली आहे.

**तक्ता ४.११ धान आणि भरड धान्यांची खरेदी**

('००० मे. टन)

| वर्ष | धान | भरडधान्य | | |
|---|---|---|---|---|
| | | ज्वारी | मका | रागी |
| २०२४-२५ | १५९२.६७ | १३४.६५ | ०.०२ | ०.२६ |
| २०२५-२६+ | ७२२.१४ | ०.८१ | १२.७ | ०.०५ |

+ डिसेंबर पर्यंत

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

४.२३ 'वन नेशन, वन रेशन कार्ड' ही योजना राज्यात दि. १ जानेवारी २०२० पासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या लाभांची देशव्यापी उपलब्धता सुनिश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना देशभरातील कोणत्याही ई-पीओएस (ePoS) सक्षम रास्त भाव दुकानातून स्वस्त अन्नधान्य घेता येते. सन २०२५-२६ मध्ये, ऑक्टोबरपर्यंत १.५५ कोटी कुटुंबांनी आधारबेस बायोमेट्रिक अधिप्रमाणाद्वारे शिधा वस्तूंचा लाभ घेतला आहे. 'वन नेशन, वन रेशन कार्ड' योजना सुरु झाल्यापासून ऑक्टोबर २०२५ पर्यंत महाराष्ट्रातील १.४० लाख शिधापत्रिका धारकांनी इतर राज्यातून आणि इतर राज्यातील १८.९७ लाख शिधापत्रिका धारकांनी महाराष्ट्रातून अन्नधान्याची उचल केली.

## गोदामे

४.२४ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करावयाच्या अन्नधान्याची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांमधून करण्यात येते आणि त्याची साठवणूक राज्याच्या स्वत: च्या अथवा भाड्याने घेतलेल्या गोदामांमध्ये करण्यात येते. माहे डिसेंबर २०२५ अखेर राज्य शासनाकडे एकूण ६५१ गोदामे असून त्यांची साठवणूक क्षमता ७.९३ लाख मे.टन आहे. राज्य शासनाने नाबार्डच्या अर्थसहाय्याने नवीन गोदामे बांधकाम करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. माहे डिसेंबर २०२५ अखेर एकूण १.३४ लाख मे. टन क्षमतेच्या ८३ गोदामांच्या बांधकामाकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. जिल्हानिहाय गोदाम आणि रास्त भाव दुकानांची संख्या परिशिष्ट ४.१५ मध्ये देण्यात आली आहे.

## शिवभोजन योजना

४.२५ राज्यातील गरीब व गरजू जनतेला किफायतशीर दरात भोजन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने शिवभोजन योजना जानेवारी २०२० मध्ये सुरु केली. राज्यात नोव्हेंबर २०२५ अखेर एकूण १,८७४ शिवभोजन केंद्रे कार्यरत होती. सन २०२४-२५ मध्ये ६.३३ कोटी शिवभोजन थाळींचे वाटप करण्यात आले व ₹ २११.७० कोटी खर्च झाला. सन २०२५-२६ मध्ये नोव्हेंबर अखेर ४.०९ कोटी शिवभोजन थाळींचे वाटप करण्यात आले व ₹ ५६.२३ कोटी खर्च झाला.

## राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग

४.२६ राज्यातील ग्राहकांच्या तक्रारी निवारण्यासाठी राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग तसेच ४१ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग स्थापन करण्यात आले आहेत. दि. ९ ऑक्टोबर २०२५ पर्यंत एकूण ४.७४ लाख ग्राहक तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी ३.५९ लाख तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.

* * * * *

# परिशिष्ट ४.१

## महाराष्ट्रातील ग्रामीण क्षेत्राकरिता गटनिहाय ग्राहक किंमत निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३ = १००)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी व मादक पदार्थ | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वर्ष-ते-वर्ष चलनवाढ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **५२.८५** | **२.१५** | **१०.६७** | **८.५३** | **२५.८०** | **१००.००** | -- |
| २०१५-१६ | २६२ | ३२५ | ४४६ | १३५ | २०५ | २५८ | २.८ |
| २०१६-१७ | २७१ | ३५२ | ४६३ | १३७ | २०९ | २६६ | ३.२ |
| २०१७-१८ | २७० | ४१० | ४९८ | १३९ | २०८ | २७० | १.७ |
| २०१८-१९ | २७२ | ४४४ | ५१३ | १४३ | २१३ | २७५ | १.७ |
| २०१९-२० | ३०९ | ४५० | ५३४ | १४७ | २१९ | २९९ | ८.७ |
| २०२०-२१ | ३२८ | ४६९# | ५६७ | १५२# | २२९# | ३१६# | ५.२# |
| | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ (सुअं) | २०२५-२६ (अअं) |
| केंद्रीय करांतील हिस्सा | २८,०८६ | ३३,७१५ | ३७,२०३ | ४१,९५३ | ३६,१९७ | ३६,४७९ | ५४,२६३ | ५९,९०३ | ७१,२६२ | ८१,१६३ | ८९,७२६ |
| भारत सरकारकडून प्राप्त अनुदाने | १६,८९९ | २१,६५३ | २१,८२३ | ३३,६६२ | ४३,७२५ | ५२,७३३ | ३८,७६० | ५१,४१४ | ३६,०४५ | ५७,६९२ | ५०,५११ |
| कर्जे व अग्रिमे | ५८४ | ६२७ | १६८ | ३३९ | ९३७ | १४,९९६ | १८,६२५ | १०,२३६ | १०,६४६ | १६,६९२ | ११,३६९ |
| **एकूण** | **४५,५६९** | **५५,९९५** | **५९,१९४** | **७५,९५४** | **८०,८५९** | **१,०४,२०८** | **१,११,६४८** | **१,२१,५५३** | **१,१७,९५३** | **१,५५,५४७** | **१,५१,६०६** |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## तक्ता ५.८ भारत सरकारकडून निवडक राज्यांना हस्तांतरीत वित्तीय संसाधनांचा तपशील

(₹ कोटी)

| राज्य | केंद्रीय करांतील हिस्सा | | भारत सरकारकडून प्राप्त अनुदाने | | कर्जे व अग्रिमे | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ (सुअं) | २०२३-२४ | २०२४-२५ (सुअं) | २०२३-२४ | २०२४-२५ (सुअं) | २०२३-२४ | २०२४-२५ (सुअं) |
| आंध्र प्रदेश | ४५,७११<br>(४.०) | ५२,०८०<br>(४.०) | ३४,७०२<br>(६.६) | २१,९६६<br>(३.२) | ५,०११<br>(३.५) | १६,२४४<br>(८.१) | ८५,४२४<br>(४.७) | ९०,२९१<br>(४.१) |
| बिहार | १,१३,६०४<br>(१०.१) | १,२९,४३५<br>(१०.०) | २६,१२५<br>(४.९) | ५३,३८२<br>(७.८) | १०,६७२<br>(७.५) | १२,९२१<br>(६.५) | १,५०,४०१<br>(८.४) | १,९५,७३८<br>(९.०) |
| छत्तीसगड | ३८,४८२<br>(३.४) | ४४,०००<br>(३.४) | ११,०९२<br>(२.१) | १३,५००<br>(२.०) | ३,७९१<br>(२.७) | ६,८००<br>(३.४) | ५३,३६५<br>(३.०) | ६४,३००<br>(३.०) |
| गुजरात | ३९,२८४<br>(३.५) | ४४,७५८<br>(३.५) | २५,५५७<br>(४.८) | १८,८४०<br>(२.७) | ५,४९०<br>(३.९) | १३,०००<br>(६.५) | ७०,३३१<br>(३.९) | ७६,५९८<br>(३.५) |
| कर्नाटक | ४१,१९३<br>(३.६) | ४६,९३३<br>(३.६) | १५,५२८<br>(२.९) | १६,०००<br>(२.३) | ५,९४६<br>(४.२) | ६,८५५<br>(३.४) | ६२,६६६<br>(३.५) | ६९,७८८<br>(३.२) |
| मध्य प्रदेश | ८८,६६५<br>(७.८) | १,०१,०२०<br>(७.८) | ३४,७११<br>(६.६) | ४२,९७७<br>(६.२) | १५,०७२<br>(१०.६) | १५,३००<br>(७.७) | १,३८,४४८<br>(७.७) | १,५९,२९८<br>(७.३) |
| **महाराष्ट्र** | **७१,२६२<br>(६.३)** | **८१,१६३<br>(६.३)** | **३६,०४५<br>(६.८)** | **५७,६९२<br>(८.४)** | **१०,६४६<br>(७.५)** | **१६,६९२<br>(८.४)** | **१,१७,९५३<br>(६.६)** | **१,५५,५४७<br>(७.१)** |
| राजस्थान | ६८,०६३<br>(६.०) | ७७,५४८<br>(६.०) | २२,४४८<br>(४.३) | ३७,६७५<br>(५.५) | १०,९५९<br>(७.७) | १३,४४०<br>(६.७) | १,०१,४७०<br>(५.६) | १,२८,६६२<br>(५.९) |
| तामीळनाडू | ४६,०७२<br>(४.१) | ५२,४९२<br>(४.१) | २५,३४२<br>(४.८) | २०,५३८<br>(३.०) | १४,९९५<br>(१०.५) | १०,७२५<br>(५.४) | ८६,४०९<br>(४.८) | ८३,७५५<br>(३.८) |
| तेलंगणा | २३,७४२<br>(२.१) | २७,०५०<br>(२.१) | ९,९३४<br>(१.९) | १९,८३६<br>(२.९) | १,९४८<br>(१.४) | २,५००<br>(१.३) | ३५,६२४<br>(२.०) | ४९,३८६<br>(२.३) |
| उत्तर प्रदेश | २,०२,६२०<br>(१७.९) | २,३०,८५५<br>(१७.९) | ५५,८०३<br>(१०.६) | ९४,३९०<br>(१३.७) | १९,७५४<br>(१३.९) | २१,५३९<br>(१०.८) | २,७८,१७६<br>(१५.५) | ३,४६,७८३<br>(१५.९) |
| पश्चिम बंगाल | ८४,९७२<br>(७.५) | ९६,०१०<br>(७.५) | २२,०७२<br>(४.२) | २८,४३१<br>(४.१) | ७,९५२<br>(५.६) | १५,११०<br>(७.६) | १,१४,९९६<br>(६.४) | १,३९,५५१<br>(६.४) |
| **अखिल भारत** | **११,२९,७६१** | **१२,८८,५३४** | **५,२७,९३१** | **६,८८,१०४** | **१,४२,५१८** | **१,९९,६१०** | **१८,००,२१०** | **२१,७६,२४८** |

टीप : कंसातील आकडे अखिल भारताच्या एकूण आकडेवारीशी टक्केवारी दर्शवितात. आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

*आधार* : भारतीय रिझर्व बँक

५.७.२ पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यांना ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता सन २०२१-२२ व २०२२-२३ करिता ६७:३३ या प्रमाणात तर सन २०२३-२४ व २०२४-२५ करिता ६६:३४ या प्रमाणात आणि सन २०२५-२६ करिता ६५:३५ या प्रमाणात अनुदाने प्राप्त होणे अपेक्षित आहे. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता मूलभूत अनुदाने (मुक्त) व बद्ध अनुदाने यांचे प्रमाण ४०:६० आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे दशलक्ष व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली शहरे आणि दशलक्षपेक्षा कमी लोकसंख्या असलेली शहरे असे दोन गटांत वर्गीकरण करण्यात आले आहे. दशलक्षपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांना मूलभूत अनुदाने (मुक्त) व बद्ध अनुदाने ४०:६० या प्रमाणात प्राप्त होणे अपेक्षित आहे. दशलक्ष व जास्त लोकसंख्या

असलेल्या शहरांमधील परिसर हवेची गुणवत्ता, नागरी भागातील पेयजल पुरवठा, स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन या बाबींमधील कामगिरीशी निगडीत अनुदान 'दशलक्ष व जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांकरिताच्या आव्हान निधी' मधून त्या शहरांना प्राप्त होणे अपेक्षित आहे.

५.७.३ पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधीतील केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रमाण ७५:२५ आहे. त्यानुसार भारत सरकारकडून संदर्भ कालावधीत राज्याला ₹ १७,८०३ कोटी अनुदान प्राप्त होणे अपेक्षित आहे, ज्यापैकी पहिल्या चार वर्षात राज्याला ₹ १३,८८७ कोटी निधी प्राप्त झाला. पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त सहायक अनुदाने व झालेला खर्च तक्ता ५.९ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ५.९ पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार प्राप्त सहायक अनुदाने व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| तपशील | २०२१-२२ | | २०२२-२३ | | २०२३-२४ | | २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्राप्त | खर्च | प्राप्त | खर्च | प्राप्त | खर्च | प्राप्त | खर्च |
| **१. पंचायत राज संस्था** | **४,२६७.१६** | **४,२६७.१६** | **३,६९६.७१** | **३,७६८.७१** | **३,६२९.२०** | **३,६२९.२०** | **३,१६९.७१** | **२,२१८.८०** |
| १. मूलभूत अनुदाने (मुक्त) | १,७२२.८० | १,७२२.८० | १,४७६.९३ | १,४७६.९३ | १,४५१.६९ | १,४५१.६९ | १,२६७.८८ | ९२५.५५ |
| २. बद्ध अनुदाने | २,५४४.३६ | २,५४४.३६ | २,२१९.७८ | २,२९१.७८ | २,१७७.५१ | २,१७७.५१ | १,९०१.८३ | १,२९३.२५ |
| **२. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था** | **२,१२१.००** | **२,१२०.४०** | **२,१४४.५४** | **२,१४४.३४** | **५३९.२८** | **५३९.२८** | **०.००** | **०.००** |
| १. दशलक्ष व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली शहरे, *त्यापैकी,* | १,१९९.०० | १,१९९.०० | १,१८१.६४ | १,१८१.६४ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| अ. परिसर हवा | ४००.०० | ४००.०० | ३२१.०० | ३२१.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ब. परिसर हवा गुणवत्तेकरिता प्रोत्साहनपर अनुदान | ०.०० | ०.०० | ४१.३४ | ४१.३४ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| क. स्वच्छता व घन कचरा व्यवस्थापन | ७९९.०० | ७९९.०० | ८१९.३० | ८१९.३० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २. दशलक्षपेक्षा कमी लोकसंख्या असलेली शहरे, *त्यापैकी,* | ९२२.०० | ९२१.४० | ९६२.९० | ९६२.७० | ५३९.२८ | ५३९.२८ | ०.०० | ०.०० |
| अ. मूलभूत अनुदाने (मुक्त) | ३६८.८० | ३६८.२० | ३८२.२० | ३८२.०० | २१५.७१ | २१५.७१ | ०.०० | ०.०० |
| ब. बद्ध अनुदाने | ५५३.२० | ५५३.२० | ५८०.७० | ५८०.७० | ३२३.५७ | ३२३.५७ | ०.०० | ०.०० |
| **३. स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता आरोग्यसंबंधी अनुदान (ग्रामीण व नागरी)** | **१,३३०.७१** | **१,३३०.७१** | **५५६.६८** | **५५६.६८** | **५३६.०५** | **५३६.०५** | **५७२.२९** | **५७२.२९** |
| **४. राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधी (केंद्रीय हिस्सा)** | **३,२२२.००** | **२,५७७.६०** | **३,३८३.००** | **२३०४.९९** | **३,५५२.००** | **२,०३०.२०** | **३,७२९.९५** | **३,१३२.३२** |
| अ. राज्य आपत्ती प्रतिसाद निधी | २,५७७.६० | २,५७७.६० | २७०६.४० | २३०४.९९ | २,८४१.६० | २,०१९.५९ | २,९८४.०० | २,९९७.३७ |
| ब. राज्य आपत्ती निवारण निधी | ६४४.४० | ०.०० | ६७६.६० | ०.०० | ७१०.४० | १०.६१ | ७४५.९५ | १३४.९५ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

सोळाव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार, सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांच्या संदर्भ कालावधीत राज्याला पुढील प्रकारे अनुदान प्राप्त होणे अपेक्षित आहे:

- स्थानिक स्वराज्य संस्था आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी एकूण ₹ १,०९,२३९ कोटी
- ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना ६०:४० तर मूलभूत आणि कामगिरीवर आधारित अनुदान ८०:२० या प्रमाणात
- आपत्ती व्यवस्थापनासाठी केंद्र आणि राज्य यांच्यामध्ये ७५:२५ या प्रमाणात एकूण ₹ २९,६१९ कोटींचे अनुदान

## प्रत्यक्ष महसुली जमा

५.८ सन २०२५-२६ मध्ये डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष महसुली जमा आणि कर महसूल सन २०२५-२६ (अअं) च्या अनुक्रमे ६६.२ टक्के व ७०.१ टक्के होते. डिसेंबर २०२५ अखेर राज्य वस्तू व सेवा कर आणि विक्री, व्यापार, इत्यादींपासूनचा महसूल अर्थसंकल्पीय अंदाजांच्या अनुक्रमे ७६.२ टक्के व ६१.० टक्के होता. डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष महसुली जमा तक्ता ५.१० मध्ये दिली आहे.

## महसुली खर्च

५.९ सन २०२५-२६ (अअं) नुसार एकूण खर्चात महसुली खर्चाचा हिस्सा ८०.१ टक्के अपेक्षित आहे. महसुली खर्चात विकास खर्चाचा हिस्सा ६६.७ टक्के अपेक्षित आहे. सामाजिक सेवांवर (शिक्षण, पाणीपुरवठा, आरोग्य व कुटुंब कल्याण, इत्यादी) होणाऱ्या खर्चाचा विकास खर्चातील हिस्सा ६१.६ टक्के तर एकूण महसुली खर्चातील हिस्सा ४१.१ टक्के अपेक्षित आहे. महसुली खर्चाचा तपशील तक्ता ५.११ मध्ये दिला आहे. महसुली व भांडवली लेख्यावरील विकास व विकासेतर खर्चाचा तपशील परिशिष्ट ५.३ मध्ये दिला आहे.

५.९.१ सन २०२५-२६ (अअं) नुसार वेतन, निवृत्तीवेतन आणि व्याज यांवरील अनिवार्य खर्चाचा हिस्सा महसुली खर्चामध्ये ५१.५ टक्के तर महसुली जमेच्या ५५.७ टक्के अपेक्षित आहे. घटकनिहाय महसुली खर्चाचा तपशील तक्ता ५.१२ मध्ये दिला आहे.

### तक्ता ५.१० डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष महसुली जमा

(₹ कोटी)

| बाब | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|
| **अ) कर महसूल (१ + २)** | **३,००,२४८** | **३,३४,५०३** |
| १) स्वत:चा कर महसूल (१ ते १०) | २,४३,४२१ | २,६९,०२४ |
| १. विक्री, व्यापार, इत्यादीवरील कर | ४१,३२४ | ४२,९२४ |
| २. राज्य वस्तू व सेवा कर | १,१९,५५० | १,३४,२०५ |
| ३. मुद्रांक व नोंदणी शुल्क | ४०,८८९ | ४४,२१६ |
| ४. राज्य उत्पादन शुल्क | १७,५३७ | २०,२३९ |
| ५. विजेवरील कर व शुल्क | ८,०७९ | ११,६६९ |
| ६. जमीन महसूल | २,७१६ | १,८७५ |
| ७. वाहनांवरील कर | ९,८८० | १०,९९५ |
| ८. उत्पन्न व खर्चावरील इतर कर | २,०६६ | २,१२५ |
| ९. माल व प्रवासी कर | ३४५ | १० |
| १०. विक्रेय वस्तू व सेवा यांवरील इतर कर व शुल्क | १,०३६ | ७६६ |
| २) केंद्रीय करांतील हिस्सा | ५६,८२७ | ६५,४७९ |
| **ब) करेतर महसूल (१ + २)** | **३४,८५१** | **३७,०७३** |
| १) करेतर महसूल (केंद्रीय अनुदाने वगळून) | १४,९२२ | १५,२११ |
| २) भारत सरकारकडून प्राप्त अनुदाने | १९,९२९ | २१,८६१ |
| **एकूण (अ+ब)** | **३,३५,०९९** | **३,७१,५७५** |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

*आधार* : प्रधान महालेखापाल यांचे कार्यालय (महाराष्ट्र), भारत सरकार

### तक्ता ५.११ महसुली खर्चाचा तपशील

(₹ कोटी)

| वर्ष | विकास | विकासेतर | एकूण |
|---|---|---|---|
| २०१९-२० | २,००,२५५ | १,००,०५० | ३,००,३०५ |
| २०२०-२१ | २,०६,७५६ | १,०३,८५४ | ३,१०,६१० |
| २०२१-२२ | २,२७,९४१ | १,२१,७४५ | ३,४९,६८६ |
| २०२२-२३ | २,७७,०२४ | १,३०,५९१ | ४,०७,६१४ |
| २०२३-२४ | ३,०४,४७६ | १,३९,८७५ | ४,४४,३५० |
| २०२४-२५ (सुअं) | ३,९९,८९३ | १,६३,१०६ | ५,६२,९९९ |
| २०२५-२६ (अअं) | ४,०४,७१८ | २,०२,१३६ | ६,०६,८५५ |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

### तक्ता ५.१२ घटकनिहाय महसुली खर्चाचा तपशील

(₹ कोटी)

| वर्ष | वेतन व मजुरी# | निवृत्ती वेतन | व्याज | अर्थसहाय्य | सहायक अनुदाने (वेतनेतर) | इतर | एकूण महसुली खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९-२० | १,००,८०६ | ३६,०८० | ३३,५६१ | २८,३८६ | ६९,८२९ | ३१,६४३ | ३,००,३०५ |
| | (३३.६) | (१२.०) | (११.२) | (९.५) | (२३.२) | (१०.५) | (१००.०) |
| २०२०-२१ | ९९,६११ | ४१,१९४ | ३६,९७० | ४०,८६२ | ६८,९२९ | २३,०४४ | ३,१०,६१० |
| | (३२.१) | (१३.३) | (११.९) | (१३.१) | (२२.२) | (७.४) | (१००.०) |
| २०२१-२२ | १,०७,७७६ | ४९,११५ | ४०,१५८ | २९,१३७ | ८३,२५४ | ४०,२४६ | ३,४९,६८६ |
| | (३०.८) | (१४.०) | (११.५) | (८.३) | (२३.८) | (११.६) | (१००.०) |
| २०२२-२३ | १,२४,३२५ | ५४,५७२ | ४१,६८९ | ४३,१५९ | १,००,१९६ | ४३,६७३ | ४,०७,६१४ |
| | (३०.५) | (१३.४) | (१०.२) | (१०.६) | (२४.६) | (१०.७) | (१००.०) |
| २०२३-२४ | १,३४,०५४ | ५६,६०२ | ४५,६५२ | ४८,०५४ | १,१३,३०६ | ४६,६८२ | ४,४४,३५० |
| | (३०.२) | (१२.७) | (१०.३) | (१०.८) | (२५.५) | (१०.५) | (१००.०) |
| २०२४-२५ (सुअं) | १,४६,०३७ | ६०,०३८ | ५४,६८७ | ६०,६२३ | १,७८,०९४ | ६३,५२० | ५,६२,९९९ |
| | (२५.९) | (१०.७) | (९.७) | (१०.८) | (३१.६) | (११.३) | (१००.०) |
| २०२५-२६ (अअं) | १,७२,७६० | ७५,१३७ | ६४,६५९ | ५८,५२८ | १,७०,५४६ | ६५,२२५ | ६,०६,८५५ |
| | (२८.५) | (१२.४) | (१०.७) | (९.६) | (२८.१) | (१०.७) | (१००.०) |

टीप : कंसातील आकडे महसुली खर्चाशी टक्केवारी दर्शवितात आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही # सहायक अनुदाने (वेतन) समाविष्ट

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## अर्थसहाय्ये

५.१० सन २०२५-२६ (अअं) नुसार अर्थसहाय्यांवरील एकूण खर्च ₹ ५८,५२८ कोटी अपेक्षित आहे. सन २०२५-२६ (अअं) नुसार महत्वाच्या निवडक अर्थसहाय्यांचा तपशील तक्ता ५.१३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.१३ सन २०२५-२६ (अअं) नुसार महत्वाच्या निवडक अर्थसहाय्यांचा तपशील**

(₹ कोटी)

| तपशील | रक्कम |
|---|---|
| कृषीपंप ग्राहकांना वीज दर सवलत (सर्वसाधारण) (कार्यक्रम) | १५,००० |
| एकत्रित प्रोत्साहन योजनेंतर्गत प्रोत्साहनपर रक्कम (अनिवार्य) | ६,४०० |
| नमो शेतकरी महासन्मान निधी योजना (१०० टक्के राज्य योजना) (कार्यक्रम) | ६,०६० |
| प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत विम्याच्या हप्त्यासाठी अर्थसहाय्य (अनिवार्य) | ५,००० |
| प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (कार्यक्रम) | ३,३२३ |
| आस्थापना- परिवहन आयुक्त (अनिवार्य) | २,५०० |
| प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (राज्य हिस्सा ४० टक्के) (कार्यक्रम) | २,२१५ |

*आधार*: वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## प्रत्यक्ष महसुली खर्च

५.११ सन २०२५-२६ मध्ये डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष महसुली खर्च अर्थसंकल्पीय अंदाजांच्या ६०.० टक्के तर विकास खर्च अर्थसंकल्पीय अंदाजांच्या ६२.० टक्के होता. एकूण प्रत्यक्ष विकास खर्चात सामाजिक सेवांवर झालेला खर्च ६७.० टक्के होता. डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष महसुली खर्चाचा तपशील तक्ता ५.१४ मध्ये दिला आहे.

## भांडवली जमा

५.१२ भांडवली जमेमध्ये (i) राज्याचे देशांतर्गत ऋण आणि भारत सरकारकडील कर्जे व आगाऊ रकमा हे सरकारी ऋण लेखे (ii) राज्य शासनाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा (वसुली), (iii) लोकलेख्याच्या निव्वळ जमा रकमा आणि (iv) इतर निव्वळ भांडवली जमा जसे की, आंतरराज्यीय तडजोड, आकस्मिकता निधी व त्याचे विनियोजन, इत्यादी बाबींचा समावेश होतो. सन २०२५-२६ (अअं) नुसार एकूण जमेमध्ये भांडवली जमेचा हिस्सा २५.९ टक्के अपेक्षित आहे. देशांतर्गत ऋण हा भांडवली जमेचा प्रमुख घटक असून ते ₹ १,४४,०३४ कोटी (भांडवली जमेच्या ७३.४ टक्के) अपेक्षित आहे. भांडवली जमेचा तपशील तक्ता ५.१५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.१४ डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष महसुली खर्चाचा तपशील**

(₹ कोटी)

| बाब | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|
| **१. विकास खर्च** | | |
| अ. सामाजिक सेवा | १,३६,३२१ | १,६८,१९१ |
| ब. आर्थिक सेवा | ४२,०५१ | ५४,७५७ |
| क. स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज संस्थांना सहायक अनुदाने व अंशदाने | २५,३०९ | २७,९८३ |
| **एकूण (अ + ब + क)** | **२,०३,६८१** | **२,५०,९३०** |
| **२. विकासेतर खर्च** | | |
| अ. सर्वसाधारण सेवा | ७१,७११ | ७६,४९१ |
| ब. व्याज प्रदाने व ऋण सेवा | ३४,९८८ | ३६,९९२ |
| **एकूण (अ + ब)** | **१,०६,६९९** | **१,१३,४८२** |
| **३. एकूण महसुली खर्च (१ + २)** | **३,१०,३८०** | **३,६४,४१२** |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही
*आधार :* प्रधान महालेखापाल यांचे कार्यालय (महाराष्ट्र), भारत सरकार

**तक्ता ५.१५ भांडवली जमेचा तपशील**

(₹ कोटी)

| वर्ष | सरकारी ऋण लेख्याकडून जमा | राज्य शासनाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा (वसुली) | इतर भांडवली जमा (निव्वळ) | लोकलेखा (निव्वळ) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २०१९-२० | ५७,१५३ | १,६१५ | (-)९,००० | ३२,९५१ | ८२,७१९ |
| २०२०-२१ | १,१८,५१६ | १,६१२ | ९,००० | (-)५,३७४ | १,२३,७५४ |
| २०२१-२२ | ९०,५८७ | १,१७९ | ० | १७,३२५ | १,०९,०९१ |
| २०२२-२३ | ९४,७०२ | ६४३ | ० | ४,९२३ | १,००,२६८ |
| २०२३-२४ | १,२५,९८८ | ७४२ | ० | १४,८७२ | १,४१,६०१ |
| २०२४-२५ (सुअं) | १,६१,१३८ | २,६९३ | ० | २८,३०६ | १,९२,१३७ |
| २०२५-२६ (अअं) | १,५५,४०३ | २,८२२ | ० | ३७,९३६ | १,९६,१६१ |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही
*आधार*: वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## भांडवली खर्च

५.१३ सन २०२५-२६ (अअं) नुसार एकूण खर्चातील भांडवली खर्चाचा हिस्सा १९.९ टक्के अपेक्षित आहे. एकूण भांडवली खर्चापैकी सर्वात जास्त खर्च आर्थिक सेवांवर (७४.१ टक्के) अपेक्षित असून आर्थिक सेवांपैकी रस्ते व पूल बांधणी यावर सर्वाधिक (४६.८ टक्के) खर्च अपेक्षित आहे. भांडवली खर्चाचा तपशील तक्ता ५.१६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.१६ भांडवली खर्चाचा तपशील**

(₹ कोटी)

| वर्ष | विकास | विकासेतर | एकूण |
|---|---|---|---|
| २०१९-२० | ३८,३८५ | ३९,९७६ | ७८,३६१ |
| २०२०-२१ | ३२,०२९ | ५९,०८७ | ९१,११५ |
| २०२१-२२ | ४९,१०६ | ३६,०३३ | ८५,१४० |
| २०२२-२३ | ६६,३०८ | ४४,९९५ | १,११,३०३ |
| २०२३-२४ | ७७,५४८ | ४०,८१७ | १,१८,३६४ |
| २०२४-२५ (सुअं) | १,०९,०३१ | ५७,२४६ | १,६६,२७७ |
| २०२५-२६ (अअं) | ९३,१६६ | ५७,५५६ | १,५०,७२१ |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

**आलेख ५.७ : महसुली जमा व महसुली खर्च**




**आलेख ५.८ : भांडवली जमा व भांडवली खर्च**




५.१४ महसुली खर्चाचे भांडवली नियतव्ययाशी प्रमाण (रेको) हा एक निर्देशक आहे जो शासनाच्या महसुली खर्चाची भांडवली मालमत्तेवरील खर्चाशी तुलना करतो. हा निर्देशक शासनाच्या दैनंदिन परिचालन खर्च आणि दीर्घकालीन गुंतवणूकीमधील संतुलनाचे मूल्यांकन करतो. सन २०२५-२६ (अअं) वगळता, कोवीड काळानंतर हा निर्देशक सातत्याने कमी होत असून राज्याने भांडवली मालमत्तेच्या निर्मितीला तसेच एकूण खर्चाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यास प्राधान्य दिले असल्याचे सूचित करते. खर्चाच्या गुणवत्तेत झालेल्या सुधारणांचा अर्थव्यवस्थेवर अनेक पटींनी परिणाम होतो.

**आलेख ५.९ : महसुली खर्चाचे भांडवली नियतव्ययाशी प्रमाण (रेको)**



## आर्थिक व उद्देशानुसार राज्य अर्थसंकल्पाचे वर्गीकरण

५.१५ अर्थ व सांख्यिकी संचालनालय दरवर्षी स्थूल राज्य उत्पन्नाचे अंदाज तयार करते ज्यामध्ये 'सार्वजनिक प्रशासन व संरक्षण' या क्षेत्राचे अंदाज समाविष्ट असतात. 'सार्वजनिक प्रशासन व संरक्षण' या क्षेत्रात राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था व राज्यातील स्वायत्त संस्थांचा समावेश होतो. यासंदर्भात, राज्य अर्थव्यवस्थेत 'सार्वजनिक प्रशासन व संरक्षण' या क्षेत्रात होणारी स्थूल मूल्यवृद्धी, भांडवल निर्मिती इत्यादीचे अंदाज तयार करण्यासाठी राज्य अर्थसंकल्पाचे विश्लेषण करणे अत्यावश्यक आहे.

५.१५.१ राज्य अर्थसंकल्पाचे आर्थिक व उद्देशानुसार वर्गीकरण ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये राज्याच्या अर्थव्यवस्थेतील प्रमुख क्षेत्रांशी असलेल्या संबंधांनुसार अर्थसंकल्पीय तरतूदींचे पुनर्वर्गीकरण करून जमा व खर्चाचे समुच्छे निश्चित केले जातात. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्य अर्थसंकल्पाचे आर्थिक व उद्देशानुसार वर्गीकरण करण्यात येते. आर्थिक वर्गीकरणात प्रत्येक अर्थसंकल्पीय व्यवहाराचे त्याच्या आर्थिक स्वरुपानुसार पुनर्वर्गीकरण केले जाते, तर उद्देशानुसार करण्यात येणाऱ्या वर्गीकरणामध्ये विशिष्ट उद्देशावर होणारा खर्च दर्शविला जातो. राज्य अर्थसंकल्पाचे आर्थिक आणि उद्देशानुसार करण्यात येणाऱ्या वर्गीकरणाद्वारे विविध क्षेत्रांमधील सरकारच्या खर्चाचे अर्थपूर्ण चित्र प्राप्त होते. राज्य अर्थसंकल्पाचे आर्थिक व उद्देशानुसार करण्यात येणाऱ्या वर्गीकरणावर आधारित अंतिम उपभोग्य बाबींवरील व भांडवल निर्मितीवरील खर्च परिशिष्ट ५.४ मध्ये दिला आहे.

## तुटीचे कल

५.१६ सन २०२५-२६ (अअं) नुसार महसुली तूट, राजकोषीय तूट व प्राथमिक तूट अनुक्रमे ₹ ४५,८९१ कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या ०.९ टक्के), ₹ १,३६,२३५ कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या २.७ टक्के), ₹ ७१,५७६ कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या १.४ टक्के) अपेक्षित आहे. एकत्रित वित्तीय सुधारणे संदर्भातील 'महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम, २००६' यास राज्य बांधील आहे. सन २०२५-२६ (अअं) नुसार राजकोषीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण नियमांमध्ये विहीत केलेल्या मर्यादेत (स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन टक्के) अपेक्षित आहे. पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यासाठी राजकोषीय तूट आणि कर्जाकरिता निश्चित केलेल्या मर्यादा तक्ता ५.१७ मध्ये दिल्या आहेत. निवडक राज्यांकरिता राजकोषीय तुटीची स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी तक्ता ५.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ५.१७ पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यासाठी राजकोषीय तूट आणि कर्जाकरिता निश्चित केलेल्या मर्यादा**

(टक्के)

| वर्ष | राजकोषीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण | ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण |
|---|---|---|
| २०२०-२१ | ४.५ | २५.७ |
| २०२१-२२ | ४.० | २६.० |
| २०२२-२३ | ३.५ | २७.५ |
| २०२३-२४ | ३.० | २८.१ |
| २०२४-२५ | ३.० | २८.५ |
| २०२५-२६ | ३.० | २८.५ |

*आधार*: १५ व्या वित्त आयोगाचा सन २०२१-२६ करिताचा अहवाल

**तक्ता ५.१८ निवडक राज्यांकरिता राजकोषीय तुटीची स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी**

(टक्के)

| राज्य | २०२३-२४ | २०२४-२५ (सुअं) |
|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ४.४ | ४.६ |
| बिहार | ४.२ | ९.२ |
| छत्तीसगड | ४.६ | ४.१ |
| गुजरात | १.० | १.९ |
| कर्नाटक | २.६ | २.९ |
| मध्य प्रदेश | ३.३ | ४.२ |
| **महाराष्ट्र** | **२.२** | **२.९** |
| राजस्थान | ४.३ | ४.१ |
| तामीळनाडू | ३.३ | ३.३ |
| तेलंगणा | ३.४ | २.९ |
| उत्तर प्रदेश | ३.२ | ३.४ |
| पश्चिम बंगाल | ३.३ | ४.० |

*आधार*: संबंधित राज्य सरकारचे अर्थसंकल्पीय दस्तावेज

**आलेख ५.१० : राजकोषीय तुटीची स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी**




## ऋणस्थिती

५.१७ ऋणभारामध्ये राज्याच्या परतावा न केलेली संचित कर्जे व इतर दायित्वे यांचा समावेश होतो. सन २०२५-२६ (अअं) नुसार राज्याच्या ऋणभारात मागील वर्षाच्या तुलनेत ११.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. तथापि, ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण (१८.३ टक्के) 'महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम, २००६' नुसार राज्यासाठी विहीत करण्यात आलेल्या मर्यादेत (स्थूल राज्य उत्पन्नाच्या २५.० टक्के) अपेक्षित आहे. सन २०२५-२६ (अअं) नुसार एकूण ऋणभारामध्ये देशांतर्गत ऋणाचे प्रमुख योगदान असून ₹ ७,३९,८५९ कोटी (७९.४ टक्के) अपेक्षित आहे. ऋणभार व व्याज प्रदाने तक्ता ५.१९ मध्ये तर वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे परिशिष्ट ५.५ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ५.१९ ऋणभार व व्याज प्रदाने**

| वर्ष | ऋणभार | | व्याज प्रदाने | | |
|---|---|---|---|---|---|
| | रक्कम (₹ कोटी) | स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी | रक्कम (₹ कोटी) | स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी | महसुली जमेशी टक्केवारी |
| २०१९-२० | ४,५१,११७ | १७.० | ३३,५६१ | १.३ | ११.९ |
| २०२०-२१ | ५,१९,०८६ | १९.९ | ३६,९७० | १.४ | १३.७ |
| २०२१-२२ | ५,७६,८६८ | १८.३ | ४०,१५८ | १.३ | १२.० |
| २०२२-२३ | ६,२९,२३५ | १७.२ | ४१,६८९ | १.१ | १०.३ |
| २०२३-२४ | ७,१८,५०७ | १७.४ | ४५,६५२ | १.१ | १०.६ |
| २०२४-२५ (सुअं) | ८,३९,२७५ | १८.२ | ५४,६८७ | १.२ | १०.२ |
| २०२५-२६ (अअं) | ९,३२,२४२ | १८.३ | ६४,६५९ | १.३ | ११.५ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

**आलेख ५.११ : कर्जाचा दर**



## वार्षिक कार्यक्रम २०२५-२६

५.१८ वार्षिक कार्यक्रम २०२५-२६ करिता एकूण निधी ₹ २,५४,५६० कोटी असून सन २०२४-२५ करिता ₹ १,९२,००० कोटी होता. एकूण निधीमध्ये सामाजिक व सामूहिक सेवा क्षेत्राचा सर्वाधिक हिस्सा (४५.८ टक्के) असून त्याखालोखाल परिवहन व दळणवळण क्षेत्राचा हिस्सा (१३.७ टक्के) आहे. वार्षिक कार्यक्रम २०२५-२६ मध्ये जिल्हा योजनांचा हिस्सा ₹ २५,९०० कोटी असून तत्सम निधी सन २०२४-२५ मध्ये ₹ २३,५२८ कोटी होता. क्षेत्रनिहाय वार्षिक कार्यक्रमाचा तपशील तक्ता ५.२० मध्ये तर क्षेत्रनिहाय जिल्हा वार्षिक कार्यक्रमाचा तपशील तक्ता ५.२१ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.२० क्षेत्रनिहाय वार्षिक कार्यक्रमाचा तपशील**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष खर्च | हिस्सा टक्के | अपेक्षित खर्च | हिस्सा टक्के | एकूण निधी | हिस्सा टक्के |
| कृषि व संलग्न कार्ये | १२,८१० | ७.३ | २९,१८६ | ९.८ | २१,२७६ | ८.४ |
| ग्रामविकास | ७,२३५ | ४.१ | ८,९०७ | ३.० | १३,५५८ | ५.३ |
| विशेष क्षेत्र विकास | ३१९ | ०.२ | ३२७ | ०.१ | ४३९ | ०.२ |
| पाटबंधारे आणि पूरनियंत्रण | १४,८१२ | ८.५ | १८,१९३ | ६.१ | १८,१५९ | ७.१ |
| ऊर्जा | १५,१७० | ८.७ | २५,८८२ | ८.६ | २४,८८९ | ९.८ |
| उद्योग व खनिजे | १,४२७ | ०.८ | २,४८३ | ०.८ | १,९०७ | ०.७ |
| परिवहन व दळणवळण | ३०,४२७ | १७.४ | ३८,१५९ | १२.८ | ३४,७५६ | १३.७ |
| विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | ३२२ | ०.२ | ७१ | ०.० | ३०८ | ०.१ |
| सर्वसाधारण आर्थिक सेवा | १,८४१ | १.१ | ३,१८८ | १.१ | ३,४१२ | १.३ |
| सामाजिक व सामूहिक सेवा | ७८,१७७ | ४४.७ | १,५५,४७९ | ५२.१ | १,१६,४८२ | ४५.८ |
| सर्वसाधारण सेवा | ८,४४७ | ४.८ | १०,९३७ | ३.७ | १३,८३५ | ५.४ |
| इतर कार्यक्रम | ३,८४३ | २.२ | ५,७०५ | १.९ | ५,५३८ | २.२ |
| **एकूण** | **१,७४,८२८** | **१००.०** | **२,९८,५१७** | **१००.०** | **२,५४,५६०** | **१००.०** |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन

**तक्ता ५.२१ क्षेत्रनिहाय जिल्हा वार्षिक कार्यक्रमाचा तपशील**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष खर्च | हिस्सा टक्के | अपेक्षित खर्च | हिस्सा टक्के | एकूण निधी | हिस्सा टक्के |
| कृषि व संलग्न कार्ये | १,९६४ | ९.७ | २,०५१ | ८.७ | २,३१८ | ९.० |
| ग्रामविकास | १,६६४ | ८.३ | १,३६७ | ५.८ | १,५६६ | ६.० |
| पाटबंधारे आणि पूरनियंत्रण | ८१४ | ४.० | ९६६ | ४.१ | ९८० | ३.८ |
| ऊर्जा | १,१८६ | ५.९ | १,३३० | ५.६ | १,४७५ | ५.७ |
| उद्योग व खनिजे | २२ | ०.१ | २७ | ०.१ | ३६ | ०.१ |
| परिवहन व दळणवळण | २,०३७ | १०.१ | २,२४९ | ९.६ | २,३२७ | ९.० |
| सर्वसाधारण आर्थिक सेवा | ४८४ | २.४ | ७६५ | ३.३ | ९४८ | ३.६ |
| सामाजिक व सामूहिक सेवा | ९,६५७ | ४७.९ | ११,४९८ | ४८.९ | १२,४०७ | ४७.९ |
| सर्वसाधारण सेवा | १,६५६ | ८.२ | २,६२९ | ११.२ | २,९१७ | ११.३ |
| इतर कार्यक्रम | ६७६ | ३.४ | ६४६ | २.७ | ९२५ | ३.६ |
| **एकूण** | **२०,१६१** | **१००.०** | **२३,५२८** | **१००.०** | **२५,९००** | **१००.०** |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन

## राज्याने दिलेल्या हमी

५.१९ राज्याच्या अदत्त हमींची सन २०२४-२५ अखेरची रक्कम ₹ १,२९,४५८ कोटी (एकूण महसुली जमेच्या २४.१ टक्के) आहे. सर्वाधिक अदत्त हमी उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभागाच्या (४०.१ टक्के) असून त्या खालोखाल नगर विकास विभागाच्या (३०.२ टक्के) असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (२६.० टक्के) आहेत. सन २०२४-२५ मध्ये राज्य शासनाने दिलेल्या हमी तक्ता ५.२२ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ५.२२ सन २०२४-२५ मध्ये राज्य शासनाने दिलेल्या हमी**

(₹ कोटी)

| विभागाचे नाव | वर्षाच्या प्रारंभीची अदत्त हमीची रक्कम | अतिरिक्त हमी | | वर्षात वगळलेल्या रकमा (मागणी केलेल्या रकमां व्यतिरिक्त) | वर्षात आवाहनीत व दिलेल्या रकमा | वर्षअखेरीस अदत्त हमीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्षभरात | ठोक हमी देण्यात आल्यामुळे वर्षामध्ये प्राप्त झालेल्या कर्जाच्या रकमा व सुधारित व्याज दरामुळे बदललेल्या रकमा | | | |
| | (अ) | (ब) | (क) | (ड) | (ई) | (अ) + (ब) + (क) - (ड) - (ई) |
| उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) | २८,९१२.४० | ३५,४६८.६९ | ०.०० | १२,४७५.५० | ०.०० | ५१,९०५.५९ |
| नगरविकास | २९,१००.०० | १२,०००.०० | ०.०० | २,०००.०० | ०.०० | ३९,१००.०० |
| सार्वजनिक बांधकाम | १८,६४०.०० | १५,०००.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ३३,६४०.०० |
| सहकार, पणन व वस्त्रोद्योग | ३,५४३.१२ | ५७.१४ | ०.०० | ४६.१४ | ०.०० | ३,५५४.१२ |
| अल्पसंख्यांक विकास | ४९६.९८ | ०.०० | ०.०० | २.७३ | ०.०० | ४९४.२५ |
| गृह (परिवहन) | ४२०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ४२०.०० |
| सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | २५५.०० | ०.०० | ०.०० | ५८.५९ | ०.०० | १९६.४१ |
| आदिवासी विकास | ५०.०० | १००.०० | ०.०० | ५७.५४ | ०.०० | ९२.४६ |
| दिव्यांग कल्याण विभाग | ६९.५० | ०.०० | ०.०० | १३.८८ | ०.०० | ५५.६२ |
| पाणी पुरवठा व स्वच्छता | २०.०३ | ०.०० | ०.०० | २०.०३ | ०.०० | ०.०० |
| **एकूण** | **८१,५०७.०३** | **६२,६२५.८३** | **०.००** | **१४,६७४.४१** | **०.००** | **१,२९,४५८.४५** |

*आधार*: वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## सहावा राज्य वित्त आयोग

५.२० स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत शिफारशी करणेकरिता सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. सहाव्या राज्य वित्त आयोगाचा संदर्भ कालावधी दिनांक १ एप्रिल २०२६ पासून ते ३१ मार्च २०३१ पर्यंत आहे. आयोगाकडे पुढील बाबींसाठी शिफारशी करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे:

- राज्याकडून वसूल करण्यात यावयाच्या कर, शुल्क, पथकर आणि फी यांच्यापासून मिळणाऱ्या व संविधानाच्या भाग नऊ व नऊ-अ अन्वये, पंचायती व नगरपालिका यांच्यात विभागून द्यावयाच्या निव्वळ उत्पन्नाचे राज्य, पंचायती व नगरपालिका यांच्यात विभागणी करणे व अशा उत्पन्नातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व स्तरांवरील त्यांच्या त्यांच्या हिश्श्यांचे वाटप करणे
- पंचायती किंवा यथास्थिती, नगरपालिका यांच्याकडे अभिहस्तांकित करण्यात येतील, किंवा यथास्थिती, पंचायती किंवा नगरपालिका यांच्याकडून ज्यांचे विनियोजन करण्यात येईल असे कर, शुल्क, पथकर व फी निर्धारीत करणे
- पंचायती किंवा यथास्थिती, नगरपालिका यांना राज्याच्या एकत्रित निधीमधून देण्यात यावयाची सहाय्यक अनुदाने
- स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निधी व्यवस्थापनासाठी चांगल्या कार्यपद्धती
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या चांगल्या आर्थिक व्यवस्थापनासाठी इतर काही संबंधित बाबी

* * * * *

# परिशिष्ट ५.१
## वित्तीय निर्देशकांची मालिका

(₹ कोटी)

| | बाब | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५# | २०२५-२६## |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१.** | **महसुली जमा (अ + ब)** | **२,८३,१९०** | **२,६९,४६८** | **३,३३,३१२** | **४,०५,६७८** | **४,३०,५९६** | **५,३६,४६३** | **५,६०,९६४** |
| | अ) कर महसूल | २,२५,१६७ | २,००,७५९ | २,७५,२४५ | ३,३७,४८७ | ३,७३,६९३ | ४,४८,६३१ | ४,७७,४०० |
| | ब) करेतर महसूल | ५८,०२२ | ६८,७०९ | ५८,०६६ | ६८,१९१ | ५६,९०३ | ८७,८३३ | ८३,५६४ |
| **२.** | **महसुली खर्च त्यापैकी** | **३,००,३०५** | **३,१०,६१०** | **३,४९,६८६** | **४,०७,६१४** | **४,४४,३५०** | **५,६२,९९९** | **६,०६,८५५** |
| | अ) व्याज प्रदाने | ३३,५६१ | ३६,९७० | ४०,१५८ | ४१,६८९ | ४५,६५२ | ५४,६८७ | ६४,६५९ |
| | ब) प्रशासकीय सेवा | २६,८३१ | २५,७०५ | ३०,११८ | ३४,१५७ | ३५,८८७ | ४३,२९३ | ५६,९८६ |
| | क) निवृत्ती वेतन व संकीर्ण सर्वसाधारण सेवा | २७,९७० | ३२,५५० | ३८,७८९ | ४३,३९१ | ४३,०२४ | ४६,६९८ | ६१,३८३ |
| **३.** | **महसुली तूट (२ - १)** | **१७,११६** | **४१,१४२** | **१६,३७४** | **१,९३६** | **१३,७५४** | **२६,५३५** | **४५,८९१** |
| **४.** | **भांडवली जमा** | **८२,७१९** | **१,२३,७५४** | **१,०९,०९१** | **१,००,२६८** | **१,४१,६०१** | **१,९२,१३७** | **१,९६,१६१** |
| | **४.१) निव्वळ भांडवली जमा त्यापैकी** | **५८,०९४** | **६६,१६८** | **७३,०५८** | **५५,४७३** | **१,००,७८४** | **१,३४,८९२** | **१,३८,६०५** |
| | अ) कर्जाची वसुली | १,६१५ | १,६१२ | १,१७९ | ६४३ | ७४२ | २६९३ | २८२२ |
| | ब) इतर भांडवली जमा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | क) कर्जे व इतर दायित्वे | ५६,४७९ | ६४,५५५ | ७१,८७९ | ५४,८३० | १,००,०४२ | १,३२,१९८ | १,३५,७८३ |
| **५.** | **भांडवली खर्च** | **७८,३६१** | **९१,११५** | **८५,१४०** | **१,११,३०३** | **१,१८,३६४** | **१,६६,२७७** | **१,५०,७२१** |
| **६.** | **एकूण जमा (१ + ४)** | **३,६५,९०९** | **३९३,२२२** | **४,४२,४०२** | **५,०५,९४६** | **५,७२,१९८** | **७,२८,६०१** | **७,५७,१२५** |
| **७.** | **एकूण खर्च (२ + ५)** | **३,७८,६६७** | **४,०१,७२५** | **४,३४,८२५** | **५,१८,९१७** | **५,६२,७१५** | **७,२९,२७६** | **७,५७,५७६** |
| **८.** | **आकस्मिकता निधीकडे विनियोजन** | **१५,३५०** | **१,५००** | **०** | **२००** | **०** | **०** | **०** |
| **९.** | **अर्थसंकल्पीय तूट (७ — ६ - ८)** | **(-) २,५९३** | **७,००३** | **(-) ७,५७७** | **१२,७७२** | **(-) ९,४८३** | **६७५** | **४५१** |
| **१०.** | **राजकोषीय तूट (९ + ४ क)** | **५३,८८६** | **७१,५५९** | **६४,३०२** | **६७,६०२** | **९०,५५९** | **१,३२,८७३** | **१,३६,२३५** |
| **११.** | **प्राथमिक तूट (१०-२ (अ))** | **२०,३२५** | **३४,५८८** | **२४,१४४** | **२५,९१३** | **४४,९०७** | **७८,१८६** | **७१,५७६** |
| **१२.** | **ऋणभार** | **४,५१,११७** | **५,१९,०८६** | **५,७६,८६८** | **६,२९,२३५** | **७,१८,५०७** | **८,३९,२७५** | **९,३२,२४२** |
| | **स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी (पायाभूत वर्ष २०११-१२)** | | | | | | | |
| **१.** | **महसुली जमा** | **१०.७** | **१०.३** | **१०.६** | **११.१** | **१०.५** | **११.६** | **११.०** |
| | अ) कर महसूल | ८.५ | ७.७ | ८.८ | ९.२ | ९.१ | ९.७ | ९.४ |
| | ब) करेतर महसूल | २.२ | २.६ | १.८ | १.९ | १.४ | १.९ | १.६ |
| **२.** | **महसुली खर्च त्यापैकी** | **११.३** | **११.९** | **११.१** | **११.१** | **१०.८** | **१२.२** | **११.९** |
| | अ) व्याज प्रदाने | १.३ | १.४ | १.३ | १.१ | १.१ | १.२ | १.३ |
| | ब) प्रशासकीय सेवा | १.० | १.० | १.० | ०.९ | ०.९ | ०.९ | १.१ |
| | क) निवृत्ती वेतन व संकीर्ण सर्वसाधारण सेवा | १.१ | १.२ | १.२ | १.२ | १.० | १.० | १.२ |
| **३.** | **महसुली तूट** | **०.६** | **१.६** | **०.५** | **०.१** | **०.३** | **०.६** | **०.९** |
| **४.** | **भांडवली जमा** | **३.१** | **४.७** | **३.५** | **२.७** | **३.४** | **४.२** | **३.८** |
| | **४.१) निव्वळ भांडवली जमा त्यापैकी** | **२.२** | **२.५** | **२.३** | **१.५** | **२.४** | **२.९** | **२.७** |
| | अ) कर्जाची वसुली | ०.१ | ०.१ | ०.० | ०.० | ०.० | ०.१ | ०.१ |
| | ब) इतर भांडवली जमा | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| | क) कर्जे व इतर दायित्वे | २.१ | २.५ | २.३ | १.५ | २.४ | २.९ | २.७ |
| **५.** | **भांडवली खर्च** | **२.९** | **३.५** | **२.७** | **३.०** | **२.९** | **३.६** | **३.०** |
| **६.** | **एकूण जमा** | **१३.८** | **१५.१** | **१४.१** | **१३.८** | **१३.९** | **१५.८** | **१४.८** |
| **७.** | **एकूण खर्च** | **१४.३** | **१५.४** | **१३.८** | **१४.२** | **१३.७** | **१५.८** | **१४.९** |
| **८.** | **आकस्मिकता निधीकडे विनियोजन** | **०.६** | **०.१** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** |
| **९.** | **अर्थसंकल्पीय तूट** | **(-) ०.१** | **०.३** | **(-) ०.२** | **०.३** | **(-) ०.२** | **०.०** | **०.०** |
| **१०.** | **राजकोषीय तूट** | **२.०** | **२.७** | **२.०** | **१.८** | **२.२** | **२.९** | **२.७** |
| **११.** | **प्राथमिक तूट** | **०.८** | **१.३** | **०.८** | **०.७** | **१.१** | **१.७** | **१.४** |
| **१२.** | **ऋणभार** | **१७.०** | **१९.९** | **१८.३** | **१७.२** | **१७.४** | **१८.२** | **१८.३** |

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही  # सुधारित अंदाज  ## अर्थसंकल्पीय अंदाज

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट ५.२

## महसुली व भांडवली लेख्यावरील जमेचा तपशील

(₹ कोटी)

| | बाब | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५# | २०२५-२६## |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(अ)** | **एकूण महसुली जमा (१ + २ + ३ + ४)** | **२,८३,१९०** | **२,६९,४६८** | **३,३३,३१२** | **४,०५,६७८** | **४,३०,५९६** | **५,३६,४६३** | **५,६०,९६४** |
| **(१)** | **राज्याचा स्वत:चा कर महसूल (१ ते ११)** | **१,८८,९७१** | **१,६४,२८०** | **२,२०,९८२** | **२,७७,५८४** | **३,०२,४३१** | **३,६७,४६७** | **३,८७,६७४** |
| | (१) राज्य वस्तू व सेवा कर | ८२,६०२ | ६९,९४९ | ९७,३०५ | १,२१,२५६ | १,४१,९७९ | १,६७,९०५ | १,७६,११९ |
| | (२) विक्री व्यापार इत्यादींवरील कर | ३७,७८६ | ३३,१६० | ४५,९२४ | ५४,५६८ | ५३,३८० | ६७,३७५ | ७०,३७५ |
| | (३) मुद्रांक व नोंदणी शुल्क | २८,७०७ | २५,४२८ | ३५,५९४ | ४५,२८६ | ५०,८२४ | ६०,००० | ६३,५०० |
| | (४) राज्य उत्पादन शुल्क | १५,४२८ | १५,०८९ | १७,२२१ | २१,५०७ | २३,३२२ | ३०,५०० | ३२,५७५ |
| | (५) विजेवरील कर व शुल्क | ९,६१९ | ८,३५४ | ८,३८४ | १४,७२१ | १२,६७२ | १४,१८० | १६,०१६ |
| | (६) वाहनांवरील कर | ८,४६७ | ६,६५५ | ९,०८० | ११,७४० | १२,९६९ | १४,८७५ | १५,६०६ |
| | (७) जमीन महसूल | २,१५५ | २,०६३ | ३,०६५ | २,४३१ | २,६९० | ५,००० | ५,५०० |
| | (८) उत्पन्न व खर्च यावरील इतर कर | २,५०२ | २,४७४ | २,६५२ | २,९३१ | २,९५३ | ३,७७३ | ४,०२५ |
| | (९) माल व प्रवासी कर | ७७३ | १३ | ३९४ | १,५८२ | ४९८ | १,७६० | १,७६० |
| | (१०) विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क | ९३२ | १,०९७ | १,३६४ | १,५६२ | १,१४३ | २,०९९ | २,१९८ |
| **(२)** | **करेतर महसूल (१ + २)** | **१४,२९७** | **१५,९७५** | **१९,३०७** | **१६,७७६** | **२०,८५८** | **३०,१४०** | **३३,०५२** |
| | (१) व्याजाच्या जमा रकमा | ३,२७१ | २,२८६ | २,६१७ | २,४३० | २,३२९ | ३,१५० | ३,३०८ |
| | (२) इतर करेतर महसूल | ११,०२६ | १३,६८९ | १६,६९० | १४,३४६ | १८,५२९ | २६,९९० | २९,७४५ |
| **(३)** | **केंद्रीय करांतील हिस्सा (१ ते ८)** | **३६,१९७** | **३६,४७९** | **५४,२६३** | **५९,९०३** | **७१,२६२** | **८१,१६३** | **८९,७२६** |
| | (१) निगम कर | १२,३५० | १०,९८० | १५,१२८ | २०,१२५ | २१,४१६ | २२,८३८ | २५,०९१ |
| | (२) केंद्रीय वस्तू व सेवा कर | १०,२७८ | १०,८९४ | १६,०१७ | १६,९५१ | २१,६५४ | २३,५०७ | २६,१५९ |
| | (३) निगम करांव्यतिरिक्त इतर उत्पन्नावरील कर | ९,६७७ | ११,२५२ | १६,५२० | १९,६३४ | २४,७३३ | २९,१२६ | ३३,४७८ |
| | (४) जकात | २,२९६ | १,९७० | ३,९११ | २,३५८ | २,५०० | ४,९०२ | ४,१३६ |
| | (५) केंद्रीय उत्पादन शुल्क | १,५९६ | १,२३१ | २,०५७ | ७४० | ९४६ | ७८८ | ८५९ |
| | (६) सेवा कर | ० | १५२ | ६२८ | ९५ | १३ | ३ | ३ |
| | (७) संपत्ती कर | १ | ० | ३ | ० | ० | ० | ० |
| | (८) एकात्मिक वस्तू व सेवा कर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **(४)** | **केंद्र शासनाकडून सहायक अनुदाने** | **४३,७२५** | **५२,७३३** | **३८,७६०** | **५१,४१४** | **३६,०४५** | **५७,६९२** | **५०,५११** |
| **(ब)** | **एकूण भांडवली जमा (१ + २ + ३ + ४)** | **८२,७१९** | **१,२३,७५४** | **१,०९,०९१** | **१,००,२६८** | **१,४१,६०१** | **१,९२,१३७** | **१,९६,१६१** |
| **(१)** | **सरकारी ऋण लेख्यांकडून जमा (अ+ब)** | **५७,१५३** | **१,१८,५१६** | **९०,५८७** | **९४,७०२** | **१,२५,९८८** | **१,६१,१३८** | **१,५५,४०३** |
| | (अ) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण | ५६,२१७ | १,०३,५२० | ७१,९६१ | ८४,४६६ | १,१५,३४२ | १,४४,४४६ | १,४४,०३४ |
| | (ब) केंद्र सरकारकडून कर्जे व आगाऊ रकमा | ९३७ | १४,९९६ | १८,६२५ | १०,२३६ | १०,६४६ | १६,६९२ | ११,३६९ |
| **(२)** | ***राज्य शासनाकडून कर्जे व आगाऊ रकमा (वसुली)*** | **१,६१५** | **१,६१२** | **१,१७९** | **६४३** | **७४२** | **२,६९३** | **२,८२२** |
| **(३)** | ***इतर भांडवली जमा (निव्वळ)*** ‡ | **(-) ९,०००** | **९,०००** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| **(४)** | **लोक लेखा (निव्वळ) (अ + ब + क + ड)** | **३२,९५१** | **(-) ५,३७४** | **१७,३२५** | **४,९२३** | **१४,८७२** | **२८,३०६** | **३७,९३६** |
| | (अ) अल्पबचत, भविष्य निर्वाह निधी इ. (निव्वळ) | १,७६७ | ७४० | ९६७ | ५७६ | ५२७ | (-) ८९४ | (-) १,१२५ |
| | (ब) राखीव निधी (निव्वळ) (१ + २) | ३,६१९ | ६०१ | (-) ८ | २५१ | १,७३९ | ३२३ | १२२ |
| | (१) व्याजी | ३,७८२ | ६५८ | १५६ | ७१२ | २,११४ | १,१०९ | ८५९ |
| | (२) बिनव्याजी | (-) १६३ | (-) ५७ | (-) १६४ | (-) ४६१ | (-) ३७५ | (-) ७८७ | (-) ७३७ |
| | (क) नागरी ठेवी (निव्वळ) (१ + २) | ५,२०४ | ६,००६ | २,६०४ | ३,७२२ | १०,०७९ | (-) ६,५०३ | (-) ४,६८० |
| | (१) व्याजी | ५,८८७ | ५,६७४ | २,१०५ | १,१७० | १,४६२ | (-) ६,३३० | (-) ४,६१४ |
| | (२) बिनव्याजी | (-) ६८३ | ३३२ | ४९८ | २,५५२ | ८,६१७ | (-) १७३ | (-) ६६ |
| | (ड) इतर | २२,३६२ | (-) १२,७२१ | १३,७६२ | ३७३ | २,५२८ | ३५,३८० | ४३,६१८ |
| | **एकूण जमा (अ + ब)** | **३,६५,९०९** | **३,९३,२२२** | **४,४२,४०२** | **५,०५,९४६** | **५,७२,१९८** | **७,२८,६०१** | **७,५७,१२५** |

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही # सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

‡ यात आंतरराज्यीय तडजोड (निव्वळ), आकस्मिकता निधीमध्ये केलेले विनियोजन (निव्वळ) आणि आकस्मिकता निधी (निव्वळ) यांचा समावेश आहे

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

# ०परिशिष्ट ५.३

## महसुली व भांडवली लेख्यावरील विकास व विकासेतर खर्चाचा तपशील

(₹ कोटी)

| | बाब (१) | २०१९-२० (२) | २०२०-२१ (३) | २०२१-२२ (४) | २०२२-२३ (५) | २०२३-२४ (६) | २०२४-२५# (७) | २०२५-२६## (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(अ)** | **महसुली खर्च (१ + २)** | **३,००,३०५** | **३,१०,६१०** | **३,४९,६८६** | **४,०७,६१४** | **४,४४,३५०** | **५,६२,९९९** | **६,०६,८५५** |
| **(१)** | **विकास खर्च (अ + ब + क)** | **२,००,२५५** | **२,०६,७५६** | **२,२७,९४१** | **२,७७,०२४** | **३,०४,४७६** | **३,९९,८९३** | **४,०४,७१८** |
| | **(अ) सामाजिक सेवा (१ ते ८)** | **१,२२,९४७** | **१,२२,०२३** | **१,४२,५२३** | **१,६३,३२९** | **१,८९,२२४** | **२,५३,६८०** | **२,४९,३३७** |
| | (१) शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती | ६२,३५७ | ६२,२०९ | ६८,५५४ | ८१,२११ | ९१,६४८ | ९५,५२३ | १,०५,४७४ |
| | (२) आरोग्य व कुटुंब कल्याण | १३,५७६ | १६,१०२ | १९,४५५ | १८,६६३ | २०,१७९ | २८,९०७ | २७,१६५ |
| | (३) पाणीपुरवठा व स्वच्छता, गृहनिर्माण आणि नगरविकास | १२,२०५ | १२,८९९ | १६,६८५ | २२,२५१ | २९,५२१ | ३४,३९१ | ३०,४६४ |
| | (४) माहिती व प्रसारण | १३० | ८६ | १३४ | १३५ | २४७ | ४२८ | ६५७ |
| | (५) अ.जा., अ.ज. व इ.मा.व. यांचे कल्याण | १३,६५५ | १०,७३९ | १६,४६४ | १८,७४६ | २२,८७२ | २९,०९६ | २४,४४७ |
| | (६) कामगार व कामगार कल्याण | ९१४ | १,०७६ | १,२९० | १,५०९ | १५९३ | ३,६९३ | २,६८८ |
| | (७) समाज कल्याण व पोषण | १९,९९७ | १८,८६१ | १९,८१८ | २०,५८६ | २२,९०२ | ६१,३१५ | ५८,०१३ |
| | (८) इतर | ११४ | ५२ | १२४ | २२८ | २६३ | ३२६ | ४२८ |
| | **(ब) आर्थिक सेवा (१ ते ९)** | **५६,०४३** | **६४,३३६** | **५९,४५५** | **८०,८२०** | **८३,३६३** | **१,१०,३१४** | **१,१९,५५०** |
| | (१) कृषि व संलग्न सेवा | २०,६६६ | ३१,८८८ | १७,६९८ | २६,८२६ | ३१,०१५ | ३९,८०२ | ३२,२७७ |
| | (२) ग्राम विकास | ८,२४० | ९,८४७ | ९,१०३ | १४,३५२ | १४,९२४ | २४,२०१ | ३०,५५६ |
| | (३) विशेष क्षेत्र कार्यक्रम | १ | १ | १ | १ | १ | २ | २ |
| | (४) पाटबंधारे व पूर नियंत्रण | २,१७० | २,०४३ | २,२२० | २,३१२ | २,३८८ | २,५९० | ३,१०१ |
| | (५) ऊर्जा | ११,२२१ | ९,८६५ | १२,१८७ | १३,८८५ | १३,४८५ | २०,२४० | २५,८११ |
| | (६) उद्योग व खनिजे | ३,६७३ | २,६९७ | ५,८७४ | ६,८७९ | ७,३०४ | ७,०६९ | ८,१६० |
| | (७) वाहतूक आणि दळणवळण | ७,१८५ | ५,१६० | ८,६८९ | १२,०९२ | १०,६४८ | ११,४४८ | १३,२०५ |
| | (८) विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | १८६ | २१५ | ३०६ | ७८३ | ९७२ | १,२९२ | १,०७८ |
| | (९) सर्वसाधारण आर्थिक सेवा | २,७०२ | २,६२१ | ३,३७७ | ३,६९० | २,६२६ | ३,६७१ | ५,३६१ |
| | **(क) स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज संस्था यांना सहायक अनुदाने व अंशदाने** | **२१,२६४** | **२०,३९६** | **२५,९६३** | **३२,८७४** | **३१,८८९** | **३५,८९९** | **३५,८३२** |
| **(२)** | **विकासेतर खर्च (अ + ब)** | **१,००,०५०** | **१,०३,८५४** | **१,२१,७४५** | **१,३०,५९१** | **१,३९,८७५** | **१,६३,१०६** | **२,०२,१३६** |
| | **(अ) सर्वसाधारण सेवा (१ ते ५)** | **६२,४९०** | **६५,८८४** | **७६,५८७** | **८७,४०२** | **९१,२२३** | **१,०६,४१८** | **१,३२,४७८** |
| | (१) राज्यांची अंगे | ४,३२२ | ३,३६० | ३,२९३ | ३,८१५ | ५,४१३ | ८,६६२ | ७,५२८ |
| | (२) आर्थिक सेवा | ३,३६७ | ४,२७० | ४,३८७ | ६,०३९ | ६,८९७ | ७,७६५ | ६,५८१ |
| | (३) प्रशासकीय सेवा | २६,८३१ | २५,७०५ | ३०,११८ | ३४,१५७ | ३५,८८७ | ४३,२९३ | ५६,९८६ |
| | (४) निवृत्ती वेतन आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा | २७,९७० | ३२,५५० | ३८,७८९ | ४३,३९१ | ४३,०२४ | ४६,६९८ | ६१,३८३ |
| | **(ब) व्याज प्रदाने व ऋण सेवा** | **३७,५६१** | **३७,९७०** | **४५,१५८** | **४३,१८९** | **४८,६५२** | **५६,६८७** | **६९,६५९** |
| **(ब)** | **भांडवली खर्च (१ + २)** | **७८,३६१** | **९१,११५** | **८५,१४०** | **१,११,३०३** | **१,१८,३६४** | **१,६६,२७७** | **१,५०,७२१** |
| **(१)** | **विकास खर्च (अ + ब)** | **३८,३८५** | **३२,०२९** | **४९,१०६** | **६६,३०८** | **७७,५४८** | **१,०९,०३१** | **९३,१६६** |
| | (अ) महसुली लेख्याबाहेरील भांडवली खर्च | ३६,४१६ | २९,६८७ | ४६,६७० | ६१,६४४ | ७२,५७३ | ९५,०२२ | ८४,४५७ |
| | (ब) राज्य शासनाने दिलेली कर्जे वआगाऊ रकमा | १,९७० | २,३४२ | २,४३६ | ४,६६४ | ४,९७४ | १४,००९ | ८,७०८ |
| **(२)** | **विकासेतर खर्च (अ + ब + क)** | **३९,९७६** | **५९,०८७** | **३६,०३३** | **४४,९९५** | **४०,८१७** | **५७,२४६** | **५७,५५६** |
| | (अ) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण | २३,६०७ | ५६,६१६ | ३४,९१८ | ४३,७६४ | ३८,२६९ | ५५,४७० | ५६,००६ |
| | (ब) केंद्र शासनाकडून घेतलेली कर्जे व आगाऊ रकमा | १,०१९ | ९७१ | १,११५ | १,०३१ | २,५४८ | १,७७५ | १,५५० |
| | (क) आकस्मिकता निधीकडे विनियोजन | १५,३५० | १,५०० | ० | २०० | ० | ० | ० |
| | **एकूण खर्च (अ + ब)** | **३,७८,६६७** | **४,०१,७२५** | **४,३४,८२५** | **५,१८,९१७** | **५,६२,७१५** | **७,२९,२७६** | **७,५७,५७६** |

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही # सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ५.४

## राज्य अर्थसंकल्पाचे आर्थिक व उद्देशानुसार करण्यात येणाऱ्या वर्गीकरणावर आधारित अंतिम उपभोग्य बाबींवरील व भांडवल निर्मितीवरील खर्च

(₹ कोटी)

| विवरण | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५# | २०२५-२६## |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **अ. उपभोग्य बाबींवरील खर्च** | | | | | | | |
| १ कर्मचाऱ्यांची भरपाई (१.१ +१.२) | ६३,१५३ | ६५,९३४ | ७५,१६८ | ८५,५२३ | ८८,२५२ | ९९,८३० | १,२५,५६२ |
| १.१ वेतन आणि मजूरी | ३७,४२१ | ३५,९१२ | ३९,२३४ | ४५,१०२ | ४८,१११ | ५६,३९५ | ६८,८१८ |
| १.२ निवृत्तीवेतन | २५,७३२ | ३०,०२२ | ३५,९३४ | ४०,४२१ | ४०,१४० | ४३,४३५ | ५६,७४३ |
| **२ वस्तू आणि सेवांची निव्वळ खरेदी (२.१ + २.२ - २.३)** | १९,२४२ | १४,०८७ | १०,१३३ | १४,२७६ | १३,४४६ | २४,६८५ | २३,६७९ |
| २.१ खरेदी | १६,६०३ | १७,६३२ | १३,८९१ | १३,७३० | १५,४३० | २६,७६८ | २७,७११ |
| २.२ देखभाल | ७,२६४ | ३,५१५ | ४,७९५ | ६,५०५ | ५,९३९ | ७,९९६ | ७,१८० |
| २.३ विक्री | ४,६२५ | ७,०६० | ८,५५३ | ५,९५९ | ७,९२३ | १०,०८० | ११,२१२ |
| **एकूण उपभोग्य बाबींवरील खर्च** | **८२,३९६** | **८०,०२०** | **८५,३००** | **९९,८००** | **१,०१,६९८** | **१,२४,५१५** | **१,४९,२४१** |
| **ब. भांडवल निर्मितीवरील खर्च** | | | | | | | |
| १. इमारती | २,६२९ | २,७९८ | ४,३२३ | ६,४२८ | १०,१०४ | १२,४६१ | १५,७१५ |
| २. रस्ते व पूल | ११,५६६ | ९,३९२ | १७,९५५ | १६,२३७ | २०,५४५ | २७,२२५ | २२,३०३ |
| ३. इतर भांडवली खर्च@ | ७,१९४ | १२,३१२ | १४,४३५ | १३,९०४ | १४,५४४ | १८,४७३ | १८,९९१ |
| ४. दळणवळणाची साधनसामग्री | ११२ | १०० | १०४ | ११९ | ३०४ | ४२९ | ४८२ |
| ५. यंत्रसामग्री आणि साधनसामग्री | १,३१९ | १,००२ | १,४०८ | २,९१७ | २,३८१ | ७,२०५ | ५,०७८ |
| ६. लागवडीखालील मत्ता$ | ५ | ६ | ९ | ५ | ४ | ६ | ५ |
| **७. एकूण नवीन भांडवल निर्मितीवरील खर्च (१ ते ६)** | **२२,८२५** | **२५,६१०** | **३८,२३४** | **३९,६१०** | **४७,८८२** | **६५,७९९** | **६२,५७५** |
| ८. साठ्यातील बदल | ० | ० | ० | (-) ४,२४४ | (-) ५,१११ | (-) ३,४०३ | (-) ३,४४३ |
| **९. स्थूल भांडवल निर्मिती (७+८)** | **२२,८२५** | **२५,६१०** | **३८,२३४** | **३५,३६७** | **४२,७७१** | **६२,३९६** | **५९,१३२** |

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही. # सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

@ यामध्ये संशोधन व विकास यावरील खर्च समाविष्ट आहे

$ यामध्ये पशुधन समाविष्ट आहे

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ५.५

## वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे

(₹ कोटी)

| बाब | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५# | २०२५-२६## |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(एक) ऋण प्राप्ती (१ + २ + ३) (व्याजी)** | **४३,९६३** | **६८,००१** | **५७,७८२** | **५२,३६६** | **८९,२७३** | **९७,७७८** | **९२,९६८** |
| १) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण (निव्वळ) | ३२,६१० | ४६,९०४ | ३७,०४३ | ४०,७०३ | ७७,०७२ | ८८,९७५ | ८८,०२८ |
| २) केंद्र शासनाकडून प्राप्त कर्जे व आगाऊ रकमा (निव्वळ) | (-) ८२ | १४,०२५ | १७,५१० | ९,२०४ | ८,०९८ | १४,९१७ | ९,८१९ |
| ३) व्याजी बंधने (अ+ब+क) | ११,४३५ | ७,०७२ | ३,२२८ | २,४५९ | ४,१०२ | (-) ६,११४ | (-) ४,८७९ |
| अ) भविष्य निर्वाह निधी (निव्वळ) | १,७६६ | ७४० | ९६७ | ५७६ | ५२७ | (-) ८९४ | (-) १,१२५ |
| ब) राखीव निधी (निव्वळ) | ३,७८२ | ६५८ | १५६ | ७१२ | २,११४ | १,१०९ | ८५९ |
| क) नागरी ठेवी (निव्वळ) | ५,८८७ | ५,६७४ | २,१०५ | १,१७० | १,४६२ | (-) ६,३३० | (-) ४,६१४ |
| **(दोन) ऋण प्राप्ती (१ + २) (बिनव्याजी)** | **१२,५१६** | **(-) ३,४४६** | **१४,०९७** | **२,४६४** | **१०,७७०** | **३४,४२०** | **४२,८१५** |
| १) लोकलेख्यातील निव्वळ जमा@ | २१,५१६ | (-) १२,४४६ | १४,०९७ | २,४६४ | १०,७७० | ३४,४२० | ४२,८१५ |
| २) इतर भांडवली जमा (निव्वळ)$ | (-) ९,००० | ९,००० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण कर्जे व इतर दायित्वे (एक + दोन)** | **५६,४७९** | **६४,५५५** | **७१,८७९** | **५४,८३०** | **१,००,०४२** | **१,३२,१९८** | **१,३५,७८३** |

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही. # सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

@ लोकलेख्याच्या निव्वळ जमेमध्ये राखीव निधी, ठेवी, निलंबन व संकीर्ण आणि वित्त प्रेषणे इ. बिनव्याजी बंधने यांचा समावेश आहे

$ यामध्ये आंतरराज्यीय तडजोड (निव्वळ), आकस्मिकता निधीमध्ये केलेले विनियोजन (निव्वळ) आणि आकस्मिकता निधी (निव्वळ) यांचा समावेश आहे

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

# ६ संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार





# ६. संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार

६.१ आर्थिक विकासाला गती देण्यासाठी मजबूत आणि एकसंघ वित्तीय व्यवस्था आवश्यक आहे. वित्तीय प्रणाली व्यक्ती आणि व्यवसायांच्या कर्जाच्या गरजा पूर्ण करते, विमा संरक्षण देते, बचतीला प्रोत्साहन देते आणि गुंतवणूक व भांडवल निर्मिती सुलभ करते. वित्तीय संस्थांमध्ये बँका आणि विमा कंपन्या, म्युच्युअल फंड व भांडवली बाजार अशा नॉन-बँकिंग वित्तीय संस्थांचा समावेश होतो. ह्या वित्तीय संस्था अतिरिक्त निधीचा उत्पादक हेतूंसाठी प्रभावीपणे वापर करून भांडवल निर्मितीत मध्यवर्ती भूमिका बजावतात. वित्तीय सेवा उत्पादनात महाराष्ट्र देशात आघाडीवर असून, राष्ट्रीय वित्तीय सेवा क्षेत्रातील राज्याचा सरासरी वाटा सुमारे २४ टक्के आहे.

## बँकिंग संस्था

६.२ भारतीय बँकिंग प्रणालीतील एक महत्त्वाचा घटक असलेल्या अनुसूचित वाणिज्यिक बँकांचे त्यांच्या कार्यप्रणालीनुसार सार्वजनिक क्षेत्रातील बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, खाजगी बँका, विदेशी बँका, इत्यादी वर्गीकरण करण्यात आले आहे. दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी देशातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण बँकिंग कार्यालयांपैकी ९.६ टक्के कार्यालये राज्यात कार्यरत होती. राज्यातील बँकिंग कार्यालयांच्या वर्गीकरणानुसार, सार्वजनिक क्षेत्रातील बँका ५३ टक्के, खाजगी बँका ३५ टक्के, लघु वित्त बँका सहा टक्के, प्रादेशिक ग्रामीण बँका पाच टक्के आणि विदेशी बँका एक टक्का आहेत. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे तक्ता ६.१ मध्ये दिली आहेत आणि त्याची मालिका परिशिष्ट ६.१ मध्ये दिली आहे.

आलेख ६.१ : राज्यातील दि. ३१ मार्च रोजीची बँक कार्यालयांची संख्या




**तक्ता ६.१ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे**

(दि. ३० सप्टेंबर रोजी)

| तपशील | ग्रामीण | | निम-नागरी | | नागरी | | एकूण$ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०२४# | २०२५# | २०२४# | २०२५# | २०२४# | २०२५# | २०२४# | २०२५# |
| बँक कार्यालये (संख्या) | २,८४० | २,८८३ | ३,१०१ | ३,२२५ | ७,४५५ | ७,७१८ | १३,३९६ | १३,८२६ |
| ठेवी (₹ '००० कोटी) | १२४.१७ | १४०.५० | २६०.७५ | २९०.६२ | ४,५३३.९३ | ४,९०८.८५ | ४,९१८.८४ | ५,३३९.९७ |
| कर्जे (₹ '००० कोटी) | ८३.७५ | ९२.८० | १९३.९२ | २१९.२४ | ४,४९२.२५ | ४,९२७.३३ | ४,७६९.९३ | ५,२३९.३७ |
| कर्ज - ठेवी प्रमाण (टक्के) | ६७.५ | ६६.१ | ७४.४ | ७५.४ | ९९.१ | १००.४ | ९७.० | ९८.१ |

*आधार* : भारतीय रिझर्व्ह बँक # तिमाही २ नुसार $ प्रादेशिक ग्रामीण बँका वगळून

६.३ दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी देशातील एकूण ठेवी आणि स्थूल कर्जे यामध्ये राज्याचा हिस्सा सर्वाधिक असून तो अनुक्रमे २२.७ टक्के व २७.८ टक्के होता. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या (प्रादेशिक ग्रामीण बँका वगळून) एकूण दरडोई ठेवी व

दरडोई कर्जे दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी अनुक्रमे ₹ ४,१६,०९९ व ₹ ४,०८,२६१ होते, तर देशस्तरावर सदर आकडेवारी अनुक्रमे ₹ १,६६,७९२ व ₹ १,३३,५५१ होती. बँक गटनिहाय राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे तक्ता ६.२ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ६.२ बँक गटनिहाय राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे**

(दि. ३० सप्टेंबर रोजी)

| बँक गट | बँक कार्यालये (संख्या) | | ठेवी (₹ '००० कोटी) | | कर्जे (₹ '००० कोटी) | | कर्ज - ठेवी प्रमाण (टक्के) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०२४# | २०२५# | २०२४# | २०२५# | २०२४# | २०२५# | २०२४# | २०२५# |
| सार्वजनिक क्षेत्रातील बँका | ७,५९१ | ७,६८४ | २,३७९.९३ | २,५६६.४२ | २,०७३.२९ | २,३४९.४९ | ८७.१ | ९१.५ |
| विदेशी बँका | १११ | ११३ | ४८०.०७ | ५०४.४४ | २३९.१८ | २४६.८३ | ४९.८ | ४८.९ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका@ | ७५० | ७४७ | २२.८५ | २०.९० | १५.५२ | १६.७७ | ६७.९ | ८०.२ |
| खाजगी बँका | ४,७९१ | ५,११४ | २,०२१.६० | २,२२०.११ | २,४२३.७८ | २,६००.०७ | ११९.९ | ११७.१ |
| लघु वित्त बँका | ८९७ | ९०८ | ३६.२२ | ४७.१९ | ३३.६८ | ४२.९९ | ९३.० | ९१.१ |
| पेमेंट बँका | ६ | ७ | १.०३ | १.८१ | ०.०० | ०.०० | ०.० | ०.० |
| **सर्व** | **१३,३९६$** | **१३,८२६$** | **४,९१८.८४$** | **५,३३९.९७$** | **४,७६९.९३$** | **५,२३९.३७$** | **९७.०$** | **९८.१$** |

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक # तिमाही २ नुसार $ प्रादेशिक ग्रामीण बँका वगळून @ दि. ३१ मार्च रोजी







६.४ राज्यात प्रति लाख लोकसंख्येमागे ऑटोमेटेड टेलर मशीनची (एटीएम) संख्या दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी २१ होती, तर ती देशस्तरावर १८ होती. राज्यातील एकूण २७,३०७ एटीएम पैकी नागरी भागात ६३ टक्के, निमनागरी भागात २२ टक्के आणि ग्रामीण भागात १५ टक्के एटीएम होते.

६.५ दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी राज्यातील एकूण ठेवींमध्ये चालू खाते, बचत खाते आणि मुदत ठेवींचे प्रमाण अनुक्रमे १३.२ टक्के, १७.३ टक्के आणि ६९.५ टक्के होते. एकूण ठेवींमध्ये ग्रामीण, निमनागरी आणि नागरी भागातील ठेवींचे प्रमाण अनुक्रमे २.६ टक्के, ५.५ टक्के आणि ९१.९ टक्के होते. खाते प्रकारानुसार राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी तक्ता ६.३ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ६.३ खाते प्रकारानुसार राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी**

(दि. ३० सप्टेंबर रोजी)

| खाते प्रकार | ठेवी (₹ '००० कोटी) २०२५ | | | | मागील वर्षाच्या तुलनेत एकूण ठेवींच्या मध्ये शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | निम-नागरी | नागरी | एकूण | |
| चालू | ७.८९ | २६.२५ | ६६८.७८ | ७०२.९२ | ६.२ |
| बचत | ६६.४३ | १२०.०६ | ७४०.३० | ९२६.७९ | ५.३ |
| मुदत ठेवी | ६६.१८ | १४४.३१ | ३,४९९.७७ | ३,७१०.२५ | ९.९ |
| **सर्व** | **१४०.५०** | **२९०.६२** | **४,९०८.८५** | **५,३३९.९७** | **८.६** |

टीप : आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक

६.६ एकूण येणे कर्जापैकी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा वाटा ४५.७ टक्के होता तर खाजगी बँकांचा वाटा ४८.८ टक्के होता. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील येणे कर्जे तक्ता ६.४ मध्ये दिली आहेत.

६.७ भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांनुसार, अनुसूचित वाणिज्यिक बँका त्यांच्या कर्जाचे विशिष्ट प्रमाण प्राधान्य क्षेत्राला वाटप करतात. समाजातील असुरक्षित वर्गांना कर्ज उपलब्ध करून देणे आणि उच्च रोजगार निर्मिती क्षमता दर्शविणाऱ्या आर्थिक क्षेत्रांना संसाधनांचा पुरेसा प्रवाह सुनिश्चित करणे आणि त्याद्वारे गरिबी निर्मूलनास हातभार लावणे हा प्राधान्य क्षेत्राला कर्ज देण्यामागील उद्देश आहे. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या अग्रिमांपैकी येणे कर्जे तक्ता ६.५ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ६.४ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील येणे कर्जे**

(दि. ३० सप्टेंबर रोजी)

| बँक गट | येणे कर्ज (₹ '००० कोटी) | | मागील वर्षाच्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०२४ | २०२५ | |
| सार्वजनिक क्षेत्रातील बँका | २,१४०.१३ | २,४३५.३२ | १३.८ |
| विदेशी बँका | २४३.६३ | २५२.०० | ३.४ |
| खाजगी बँका | २,४२४.५९ | २,६००.४३ | ७.३ |
| लघु वित्त बँका | ३३.६९ | ४२.९९ | २७.६ |
| **सर्व** | **४,८४२.०३** | **५,३३०.७४** | **१०.१** |

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक

**आलेख ६.४ : राज्यातील दि. ३० सप्टेंबर नुसार व्यवसाय गटानुसार अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील येणे कर्जे**




**तक्ता ६.५ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या अग्रिमांपैकी येणे कर्जे**

(दि. ३१ मार्च रोजी)

| प्राधान्य क्षेत्र | खाते संख्या ('०००) | | येणे कर्ज (₹ '००० कोटी) | |
|---|---|---|---|---|
| | २०२४ | २०२५* | २०२४ | २०२५* |
| कृषि व संलग्न कार्ये | १०,३२९ | १०,३४८ | ७८४.८१ | ८६०.२९ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | २,९६६ | २,८६८ | ६२२.६२ | ६४३.१३ |
| शिक्षण | १८१ | १८३ | ६.७२ | ७.१५ |
| गृहनिर्माण | १,५१२ | १,४८४ | २१९.१३ | २११.८४ |
| निर्यात | १ | १ | १४.९५ | १३.६७ |
| इतर | १,६१८ | १,१३८ | ११.९५ | ९.३२ |
| **सर्व** | **१६,६०७** | **१६,०२१** | **१,६६०.१८** | **१,७४५.३९** |

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक * अस्थायी

## वार्षिक पत आराखडा

६.८ ग्रामीण भागातील आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी गावपातळीवर बँक कर्जाची उपलब्धता महत्त्वाची आहे. विकासाचे प्राधान्य क्षेत्र आणि दुर्लक्षित क्षेत्रांना पुरेसा आणि वेळेवर कर्जपुरवठा होत असल्याची वार्षिक पत आराखडा हमी देते. राज्यस्तरीय बँकर्स समितीची संयोजक बँक राज्याचा वार्षिक पत आराखडा तयार करून संनियंत्रित करते. बँक ऑफ महाराष्ट्र ही राज्याची संयोजक बँक म्हणून घोषित करण्यात आली आहे. सन २०२५-२६ साठी राज्याची प्राधान्य क्षेत्रासाठी वार्षिक पत आराखडा ₹ ४४.७६ लाख कोटीचा असून त्या अंतर्गत प्राधान्य क्षेत्रासाठी आराखडा ₹ ८.०६ लाख कोटी आहे. वार्षिक पत आराखडा अंतर्गत प्राधान्य क्षेत्रासाठी राज्यात वितरित केलेले कर्ज तक्ता ६.६ मध्ये तर जिल्हानिहाय वार्षिक पत आराखडा परिशिष्ट ६.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.६ वार्षिक पत आराखडा अंतर्गत प्राधान्य क्षेत्रासाठी राज्यात वितरित केलेले कर्ज**

(₹ '००० कोटी)

| प्राधान्य क्षेत्र | २०२४-२५ | | | २०२५-२६+ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लाभधारक (लाख) | लक्ष्य | साध्य | लाभधारक (लाख) |
| कृषि | १७७.३४ | १७७.२० | ८२.३९ | २००.७२ | ११२.२० | ४९.१४ |
| सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग | ४४०.२३ | ४८७.३२ | १५.१६ | ५३२.७४ | ३९४.६३ | ८.४५ |
| इतर | १०७.६१ | ५३.५८ | १२.०९ | ७२.६९ | ३५.१३ | ६.२४ |
| **सर्व** | **७२५.१८** | **७१८.१०** | **१०९.६४** | **८०६.१५** | **५४१.९६** | **६३.८३** |

*आधार*: राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य + सप्टेंबर पर्यंत

## सूक्ष्म वित्त पुरवठा

६.९ सूक्ष्म वित्त पुरवठ्याद्वारे मर्यादित बँकिंग सेवा उपलब्ध असणाऱ्या बेरोजगार किंवा ज्यांचे उत्पन्न कमी आहे अशा व्यक्ती आणि समुदायांना आर्थिक सहाय्य दिले जाते. नाबार्ड द्वारे राज्यात १९९२ पासून 'स्वयंसहाय्य गट बँक जोडणी कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. राज्यातील 'स्वयंसहाय्य गट बँक जोडणी कार्यक्रमाचा' तपशील तक्ता ६.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.७ राज्यातील स्वयंसहाय्य गट बँक जोडणी कार्यक्रमाचा तपशील**

(दि. ३१ मार्च २०२५ रोजी)

| बँक प्रकार | तपशील | एकूण स्वयंसहाय्य गट | | केवळ महिलांचे स्वयंसहाय्य गट | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | रक्कम (₹ कोटी) | संख्या | रक्कम (₹ कोटी) |
| सहकारी | बचत | ४,०१,३३२ | ६७७.१९ | ३,७७,३२० | ६३८.७४ |
| | कर्जवाटप | २०,१६८ | ४०७.०४ | २०,११२ | ४०५.५० |
| | थकीत कर्जे | २८,५८७ | ४३७.१६ | २८,०२० | ४३२.५७ |
| प्रादेशिक ग्रामीण | बचत | १,६९,६३३ | ६७०.१९ | १,५८,५५१ | ६३५.३६ |
| | कर्जवाटप | १७,८२१ | ४९७.५१ | १७,६२५ | ४९२.२० |
| | थकीत कर्जे | ४२,०६२ | ६६१.८१ | ४०,६२३ | ६४५.३५ |
| सार्वजनिक क्षेत्रातील वाणिज्यिक | बचत | ८,३७,३४७ | २,१९९.८८ | ६,२१,८८४ | १,४८५.१८ |
| | कर्जवाटप | २,०४,३२५ | ६,५३१.५० | १,९६,४०० | ६,३२९.३९ |
| | थकीत कर्जे | ३,१२,४८९ | ७,७९५.३१ | २,८४,९२४ | ७,३६६.२४ |
| खाजगी क्षेत्रातील वाणिज्यिक | बचत | ३,०४,९२२ | ५५०.०१ | ३,००,९९० | ५३९.२९ |
| | कर्जवाटप | ९८,९०९ | ४,५३५.७१ | ९८,८८८ | ४,५३४.९१ |
| | थकीत कर्जे | १,६६,८४९ | ४,७२८.६३ | १,६५,९३२ | ४,७२१.२५ |

*आधार* : राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक

## वित्तीय समावेशन

६.१० वित्तीय समावेशनाचा उद्देश समाजातील सर्व घटकांना, विशेषतः वंचित आणि अल्प उत्पन्न गटांना बँकिंग, पतपुरवठा, विमा आणि निवृत्तीवेतन यासारख्या आवश्यक वित्तीय सेवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे आहे. प्रधानमंत्री जन धन योजना, अटल पेंशन योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना इत्यादी काही योजना वित्तीय समावेशनासाठी राबविण्यात येत आहेत.

६.१०.१ **प्रधानमंत्री जन धन योजना:** प्रधानमंत्री जन धन योजनेद्वारे बँक खाती, रक्कम हस्तांतरण, पतपुरवठा, विमा, निवृत्तीवेतन इत्यादी वित्तीय सेवा प्रदान केल्या जातात. राज्यात दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत प्रधानमंत्री जन धन योजनेअंतर्गत एकूण ३.६९ कोटी बँक खाती उघडण्यात आली असून या खात्यांमध्ये एकूण ₹ १७,९०० कोटी रक्कम शिल्लक होती. एकूण खात्यांपैकी २.६० कोटी खाती (७०.४ टक्के) ग्रामीण/निम - नागरी भागातील होती. या योजनेअंतर्गत सुमारे २.६१ कोटी 'रुपे कार्ड' चे वाटप करण्यात आले. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी वित्तीय समावेशनाअंतर्गत पुरविलेल्या बँकिंग सुविधांचा तपशील तक्ता ६.८ मध्ये दिला आहे व जिल्हानिहाय प्रधानमंत्री जन धन योजनेचा तपशील परिशिष्ट ६.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.८ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी वित्तीय समावेशनाअंतर्गत पुरविलेल्या बँकिंग सुविधा**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२३ | २०२४ | २०२५* |
|---|---|---|---|
| गावात असलेली बँकींग केंद्रे^ (संख्या) | ७८,८९४ | ७१,९७० | ६९,९२४ |
| किमान ठेव बचत बँक खाते | | | |
| संख्या ('०००) | ४४,३८७ | ४५,२४४ | ४७,०२६ |
| रक्कम (₹ कोटी) | १५,९६३.६३ | १९,०१०.६० | २२,३७५.८४ |
| ओव्हर ड्राफ्ट उचललेली रक्कम (₹ कोटी) | ५३.९४ | ५२.२६ | ५१.३१ |
| किसान क्रेडिट कार्ड | | | |
| संख्या ('०००) | ४,०३६ | ४,१५७ | ४,२१८ |
| येणे रक्कम (₹ कोटी) | ५१,७७५.७२ | ५६,४८८.१८ | ६३,१२८.९८ |

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक ^ शाखा व व्यवसाय प्रतिनिधी केंद्रांसह * अस्थायी

६.१०.२ **प्रधानमंत्री मुद्रा योजना:** प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा प्रमुख उद्देश सूक्ष्म उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी वित्तीय सहाय्य उपलब्ध करून देणे आहे. उत्पन्न निर्मिती उपक्रमांमध्ये गुंतलेल्या बिगरशेती सूक्ष्म आणि लघु उद्योगांना सुलभ कर्ज उपलब्ध करण्याची मूलभूत गरज या योजनेतून भागविण्यात येते. मुद्रा योजनेअंतर्गत नियमित 'शिशु', 'किशोर' आणि 'तरुण' या प्रकारांव्यतिरिक्त २०२४-२५ मध्ये 'तरुण प्लस' हा नवीन प्रकार सुरू करण्यात आला. ज्यामध्ये 'तरुण' प्रकारांतर्गत यशस्वीरित्या कर्ज परतफेड केलेल्या उद्योजकांसाठी मुद्रा कर्जाची मर्यादा सध्याच्या ₹ १०.०० लाखांवरून ₹ २०.०० लाख करण्यात आली आहे. दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत राज्यातील १२.६७ लाख लाभार्थ्यांना एकूण ₹ २०,०२० कोटींचे कर्ज वाटप करण्यात आले. या योजनेअंतर्गत देश पातळीवर वितरित करण्यात आलेल्या एकूण कर्जाच्या रकमेत राज्याचा हिस्सा ९.८ टक्के होता. प्रधानमंत्री मुद्रा योजनेची राज्यातील प्रगती तक्ता ६.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.९ प्रधानमंत्री मुद्रा योजनेची राज्यातील प्रगती**

| प्रकार | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| **शिशु (₹ ५०,००० पर्यंत)** | | | |
| खाते संख्या | ३५,२५,६३२ | २४,६०,२०८ | ४,७०,९०७ |
| मंजूर कर्जे (₹ कोटी) | ११,७०८ | ८,८८१ | १,८०३ |
| वितरीत कर्जे (₹ कोटी) | ११,६८५ | ८,८५८ | १,७८७ |
| **किशोर (₹ ५०,००० ते ₹ ५ लाख)** | | | |
| खाते संख्या | १५,९७,३२९ | १७,८०,७६६ | ६,९८,३१६ |
| मंजूर कर्जे (₹ कोटी) | १८,३६४ | २२,०२७ | ९,२६४ |
| वितरीत कर्जे (₹ कोटी) | १८,२२१ | २१,७६३ | ९,०२८ |
| **तरुण (₹ ५ लाख ते ₹ १० लाख)** | | | |
| खाते संख्या | १,५७,०१८ | २,२०,५६६ | ९५,७२५ |
| मंजूर कर्जे (₹ कोटी) | १३,००३ | २०,२२७ | ९,१५२ |
| वितरीत कर्जे (₹ कोटी) | १२,८६८ | १९,९६६ | ८,८४७ |
| **तरुण प्लस** (₹ १० लाख ते ₹ २० लाख)** | | | |
| खाते संख्या | लागू नाही | १,२५१ | २,४५५ |
| मंजूर कर्जे (₹ कोटी) | लागू नाही | १७७ | ३६० |
| वितरीत कर्जे (₹ कोटी) | लागू नाही | १७६ | ३५८ |
| **सर्व** | | | |
| खाते संख्या | ५२,७९,९७९ | ४४,६२,७९१ | १२,६७,४०३ |
| मंजूर कर्जे (₹ कोटी) | ४३,०७५ | ५१,३१२ | २०,५७९ |
| वितरीत कर्जे (₹ कोटी) | ४२,७७४ | ५०,७६३ | २०,०२० |

*आधार* : राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य ** २०२४-२५ मध्ये सुरु + सप्टेंबर पर्यंत

६.१०.३ **प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना:** भारतातील कारागीर समुदायाच्या कल्याणासाठी आणि सक्षमीकरणासाठी दि. १७ सप्टेंबर २०२३ रोजी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना सुरू करण्यात आली. ही योजना कारागिरांना कौशल्य विकास प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य प्रदान करते. राज्यात दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ४९,१६२ लाभार्थ्यांना ₹ ४३३.८० कोटी रकमेची कर्जे मंजूर करण्यात आली असून त्यापैकी, ₹ ३२४.४१ कोटी रक्कम ३७,५४७ लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली आहेत.

## ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी

६.११ भारत सरकारने चालू असलेल्या ग्रामीण पायाभूत सुविधा प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्यासाठी सन १९९५-९६ मध्ये ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी सुरू केला. राज्य शासनाच्या महामंडळांना सध्या चालू असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कर्ज पुरवठा करणे हा ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीचा प्रमुख उद्देश आहे. सद्यस्थितीत या योजनेअंतर्गत कृषी व संलग्न क्षेत्र, ग्रामीण दळणवळण आणि सामाजिक क्षेत्र या तीन ढोबळ श्रेणींमध्ये वर्गीकृत ३९ अनुज्ञेय कार्यांना वित्तीय सहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीअंतर्गत राज्यात मंजूर व वितरित कर्जे तक्ता ६.१० मध्ये दिली आहेत.

**तक्ता ६.१० ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीअंतर्गत राज्यात मंजूर व वितरित कर्जे**

(दि. १ जानेवारी २०२६ रोजी)

| टप्पे | वर्ष | सद्यस्थिती | मंजूर कर्जे (₹ कोटी) | वितरित कर्जे (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|
| I – XXVI | १९९५-२०२१ | पूर्ण | १९,७०४.१५ | १७,४९१.४७ |
| XXVII - XXX | २०२२-२०२५ | चालू | ७,१५३.५३ | ४,३०३.२४ |
| XXXI | २०२५-२०२६ | चालू | ०.०० | ०.०० |

*आधार* : राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक

## भांडवली बाजार

६.१२ बचतींना दिर्घकालीन गुंतवणुकीत रूपांतरीत करून अर्थव्यवस्थेसाठी भांडवल निर्मितीला चालना देणारा भांडवली बाजार हा वित्तीय व्यवस्थेचा एक महत्त्वाचा स्तंभ आहे. कंपन्या आणि सरकार यांना भांडवल उभारण्यासाठी एक संरचित व्यासपीठ प्रदान करून भांडवली बाजार आर्थिक वाढ, पायाभूत सुविधा विकास आणि रोजगार निर्मितीला समर्थन देतो. तसेच गुंतवणूकदारांना संपत्ती निर्मितीच्या संधी देतो.

६.१२.१ **प्राथमिक बाजार:** प्राथमिक बाजार कंपन्यांना भांडवल उभारण्यासाठी समभाग आणि बाँड्स, बहुतेकदा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावाद्वारे (आय. पी. ओ.) प्रथमच थेट गुंतवणूकदारांना उपलब्ध करून देतो. प्राथमिक बाजारात उभारणी केलेल्या रकमेचा तपशील तक्ता ६.११ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.११ प्राथमिक बाजारात उभारणी केलेल्या रकमेचा तपशील**

| समभाग प्रकार | महाराष्ट्र समभाग (संख्या) | | महाराष्ट्र उभारणा केलेली रक्कम (₹ कोटी) | | अखिल भारत समभाग (संख्या) | | अखिल भारत उभारणा केलेली रक्कम (₹ कोटी) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| इक्वीटी | १४२ | १०५ | ५८,९९६ | ५१,१८२ | ४६४ | ३५४ | २,१०,१९० | १,६३,३९० |
| ऋण | १६ | ९ | ३,५०१ | २,५२७ | ४३ | २९ | ८,१४९ | ६,५०३ |
| **एकूण** | **१५८** | **११४** | **६२,४९७** | **५३,७०९** | **५०७** | **३८३** | **२,१८,३३९** | **१,६९,८९३** |

*आधार* : सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया + नोव्हेंबर पर्यंत

६.१२.२ **दुय्यम बाजार:** दि. ३१ मार्च २०२५ रोजी मुंबई शेअर बाजार व राष्ट्रीय शेअर बाजाराचे बाजार भांडवल अनुक्रमे ₹ ४१३ लाख कोटी आणि ₹ ४११ लाख कोटी होते. माहे नोव्हेंबर २०२५ अखेर मुंबई शेअर बाजार व राष्ट्रीय शेअर बाजाराचे बाजार भांडवल अनुक्रमे ₹ ४७४ लाख कोटी आणि ₹ ४७२ लाख कोटी होते. राष्ट्रीय व मुंबई शेअर बाजार मर्यादित यांची उलाढाल तक्ता ६.१२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१२ राष्ट्रीय व मुंबई शेअर बाजार मर्यादित यांची उलाढाल**

(₹ '००० कोटी)

| शेअर बाजार | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय | २०,१०३ | २८,१२८ | १६,८०७ |
| मुंबई | १,६२९ | १,९३४ | १,२६६ |

*आधार* : सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया + नोव्हेंबर पर्यंत

६.१२.३ **स्थावर मिळकत गुंतवणूक संस्था आणि पायाभूत गुंतवणूक संस्था:** स्थावर मिळकत गुंतवणूक संस्था आणि पायाभूत गुंतवणूक संस्था ही नाविन्यपूर्ण संसाधने असून गुंतवणूकदारांकडून निधी गोळा करतात व एकत्रित रक्कम अनुक्रमे स्थावर मालमत्ता आणि पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करतात. स्थावर मिळकत गुंतवणूक संस्था आणि पायाभूत गुंतवणूक संस्थांद्वारे उभारणी केलेल्या रकमांचा तपशील तक्ता ६.१३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.१३ स्थावर मिळकत गुंतवणूक संस्था आणि पायाभूत गुंतवणूक संस्थांद्वारे उभारणी केलेल्या रकमांचा तपशील**

| संस्था | महाराष्ट्र उभारणा रक्कम (₹ कोटी) | | अखिल भारत उभारणा रक्कम (₹ कोटी) | |
|---|---|---|---|---|
| | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| स्थावर मिळकत गुंतवणूक संस्था | ० | ४,८०० | ४,७२८ | ५,८०० |
| पायाभूत गुंतवणूक संस्था | ६,०७५ | ७,७४८ | ७,६५३ | ८,०९३ |
| एकूण | **६,०७५** | **१२,५४८** | **१२,३८१** | **१३,८९३** |

*आधार* : सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया + नोव्हेंबर पर्यंत

## विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र

६.१३ मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया (एमसीएक्स), नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेटिव्ह एक्सचेंज लिमिटेड (एनसीडीईएक्स), हे भारतातील कमोडिटी डेरिव्हेटिव्ह्जच्या व्यापारातील प्रमुख विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र (कमोडिटी एक्सचेंज) असून राष्ट्रीय शेअर बाजार व मुंबई शेअर बाजार हे काही मर्यादित विक्रेय वस्तू व्यापार क्षेत्रात विनिमय करतात. एमसीएक्स विक्रेय वस्तूंमध्ये, प्रामुख्याने सोने, बेस मेटल आणि ऊर्जा उत्पादनांच्या विक्रीस चालना देते. एनसीडीईएक्स केंद्रांमध्ये अन्नधान्य, डाळी, तेलबिया, मसाले, इत्यादी कृषी उत्पादनांचे व्यवहार होतात. एमसीएक्स प्रमाणेच, मुंबई शेअर बाजारात देखील सोने, धातू आणि ऊर्जा वस्तूंच्या

डेरिव्हेटिव्ह्जचे व्यवहार मोठ्या प्रमाणात होतात. तर राष्ट्रीय शेअर बाजारात प्रामुख्याने एमसीएक्सशी साधर्म्य असलेल्या निवडक विक्रेय वस्तूंच्या डेरिव्हेटिव्ह्जची उलाढाल होते. विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र यांची उलाढाल तक्ता ६.१४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१४ विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र यांची उलाढाल**

| विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र | समाविष्ट विक्रेय वस्तू (संख्या) | | | उलाढाल (₹ '००० कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| एमसीएक्स | २६ | १४ | १८ | २७,६५५.०० | ४९,५१२.६९ | ६८,१२५.६१ |
| एनसीडीईएक्स | २१ | २० | २० | २०६.०० | १२.४३ | २१.९२ |
| मुंबई शेअर बाजार | १४ | ११ | ८ | ३६.०० | ०.२८ | ०.०० |
| राष्ट्रीय शेअर बाजार | १० | ९ | १० | २०२.०० | १३०५.२१ | ९६०.९१ |

*आधार* : सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया + नोव्हेंबर पर्यंत

## संयुक्त भांडवली संस्था

६.१४ संयुक्त भांडवली संस्था पूरक उद्योग, व्यापार आणि व्यापाराशी संबंधित उपक्रमांचा विकास करून रोजगाराच्या महत्त्वपूर्ण संधी निर्माण करतात. भारतातील एकूण संयुक्त भांडवली संस्थांपैकी दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सुमारे १८.९ टक्के कंपन्या राज्यातील होत्या तर भरणा केलेल्या भाग भांडवलामध्ये राज्याचा हिस्सा २३.५ टक्के होता. संयुक्त भांडवली संस्था व त्यांचे भरणा केलेले भाग भांडवल तक्ता ६.१५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ६.१५ संयुक्त भांडवली संस्था व त्यांचे भरणा केलेले भाग भांडवल**

| बाब | महाराष्ट्र | | | | अखिल भारत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था (संख्या) | | भरणा केलेले भाग भांडवल (₹ '००० कोटी) | | संस्था (संख्या) | | भरणा केलेले भाग भांडवल (₹ '००० कोटी) | |
| | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| खाजगी | ३,३५,५६६ | ३,५८,२१० | ५८६.८० | ६३४.६७ | १७,७७,३९३ | १९,१५,३२४ | २,४०३.३३ | २,५९०.८७ |
| सार्वजनिक | १७,०५१ | १७,२६२ | ९३२.६१ | ९३८.१५ | ७३,५३९ | ७४,३५२ | ३,७८३.६४ | ४,०९१.२१ |
| **सर्व** | **३,५२,६१७** | **३,७५,४७२** | **१,५१९.४१** | **१,५७२.८२** | **१८,५०,९३२** | **१९,८९,६७६** | **६,१८६.९७** | **६,६८२.०९** |

*आधार* : कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, केंद्र शासन + नोव्हेंबर पर्यंत

## म्युच्युअल फंड

६.१५ म्युच्युअल फंड ही व्यावसायिकरित्या व्यवस्थापित केलेली गुंतवणूकीची माध्यमे आहेत ज्यात गुंतवणूकदारांकडून निधी गोळा केला जातो आणि स्टॉक, बाँड आणि इतर सिक्युरिटीजच्या माध्यमातून वैविध्यपूर्ण गुंतवणूक केली जाते. महाराष्ट्रात नोंदणीकृत कार्यालय असलेल्या म्युच्युअल फंड एजन्सीकडून सन २०२५-२६ दरम्यान माहे नोव्हेंबर पर्यंत निव्वळ ₹ ४,१४,५६७ कोटी रक्कमेची उभारणी केली असून संपूर्ण भारतातून ₹ ७,९१,५३३ कोटी रक्कम उभारण्यात आली होती. म्युच्युअल फंडाद्वारे उभारणी केलेली रक्कम तक्ता ६.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१६ म्युच्युअल फंडाद्वारे उभारणी केलेली रक्कम**

(₹ '००० कोटी)

| वर्ष | उभारणा रक्कम | |
|---|---|---|
| | नवीन म्युच्युअल फंड | अस्तित्वातील म्युच्युअल फंड |
| २०२३-२४ | ६६.३६ | ११,३८१.८५ |
| २०२४-२५ | १०८.४९ | १३,५९४.८६ |
| २०२५-२६+ | ५०.९७ | ९,९३०.६८ |

*आधार* : असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंडस इन इंडिया + नोव्हेंबर पर्यंत

६.१५.१ सिस्टीमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी) हा मोठ्या प्रमाणात एकरकमी गुंतवणूक करण्याऐवजी नियमित अंतराने (उदा. आठवड्याने किंवा मासिक) म्युच्युअल फंडांमध्ये निश्चित रक्कम गुंतवण्याचा एक शिस्तबद्ध मार्ग आहे. हे कालांतराने संपत्ती निर्माण करण्यास, रुपयाच्या मूल्याचे सरासरी करण्याद्वारे जोखीम व्यवस्थापन करण्यास मदत करते. सन २०२५-२६ मध्ये माहे नोव्हेंबर पर्यंत देशभरात ११.६२ कोटी एसआयपी खाती सक्रिय होती ज्यांची व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता (एयूएम) ₹ १६.५२ लाख कोटी होती. यापैकी एकूण फोलिओच्या २० टक्के, २.३३ कोटी एसआयपी फोलिओ हे महाराष्ट्रातील आहेत. एसआयपी द्वारे उभारणी केलेली रक्कम तपशील तक्ता ६.१७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१७ एसआयपी द्वारे उभारणी केलेली रक्कम**

(₹ '००० कोटी)

| वर्ष | सक्रिय एसआयपी खाती (संख्या) ('०००) | एसआयपी योगदान (₹ '००० कोटी) |
|---|---|---|
| २०२३-२४ | १६,५७४ | ४९.३६ |
| २०२४-२५ | २२,२२० | ६९.४९ |
| २०२५-२६+ | २३,३२३ | ५३.८८ |

*आधार* : असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंडस इन इंडिया + नोव्हेंबर पर्यंत

## निवृत्तीवेतन

६.१६ उत्पादक गुंतवणुकीसाठी दीर्घकालीन बचत एकत्रित करून वृद्धापकाळातील उत्पन्नाची सुरक्षितता सुनिश्चित करण्यात निवृत्तीवेतन निधी (पेन्शन फंड) महत्त्वाची भूमिका बजावतात. देशात या प्रणालीमध्ये पेन्शन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाद्वारे नियंत्रित केल्या जाणाऱ्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ) आणि राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (एनपीएस) तसेच असंघटित क्षेत्रासाठी सामाजिक सुरक्षा योजना प्रदान करण्याऱ्या वैधानिक योजनांचा समावेश आहे. हे निधी स्थिर, दीर्घकालीन संसाधने प्रदान करून भांडवल बाजार विकासाला सहाय्यभूत ठरतात. महाराष्ट्रात निवृत्तीवेतन निधींमध्ये राज्य सरकारी कर्मचारी, एनपीएस ग्राहक आणि कल्याणकारी योजनांचे लाभार्थी अंतर्भूत असून त्यामुळे निवृत्तीनंतरच्या सुरक्षिततेला पाठबळ मिळते. राज्यात विविध प्रकारांमध्ये निवृत्तीवेतन निधींची नोंदणी तक्ता ६.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१८ राज्यात विविध प्रकारांमध्ये निवृत्तीवेतन निधींची नोंदणी**

(संख्या)

| प्रकार | वर्ष | |
|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ |
| अटल पेन्शन योजना | १०,५२,४०५ | १०,०६,८६४ |
| एनपीएस सर्व रहिवासी | १,२२,४६१ | १,४४,७३९ |
| एनपीएस व्यवसाय क्षेत्र | २५,१३५ | २६,५७१ |

*आधार :* पेन्शन निधी नियामक आणि विकास प्राधिकरण

६.१७ एनपीएसमध्ये माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत राज्य शासनाचे एकूण ६,४०,१७७ सदस्य होते. यामध्ये एकूण योगदान ₹ ७७९.५६ कोटी होते त्यापैकी नियोक्ता आणि कर्मचाऱ्यांचे योगदान अनुक्रमे ₹ ४५४.७८ कोटी आणि ₹ ३२४.७८ कोटी होते.

## विमा

६.१८ विविध अनपेक्षित घटनांमुळे उद्भवणाऱ्या आर्थिक जोखमींपासून व्यक्तींचे संरक्षण करणारे ‘विमा’ हे सर्वात प्रभावी जोखीम व्यवस्थापन साधन आहे. मालमत्तेचे नुकसान व हानीपासून संरक्षण करणे आणि व्यक्ती व व्यवसायांसाठी आर्थिक सुरक्षा जाळे प्रदान करण्याव्यतिरिक्त, विमा क्षेत्र बचतीला प्रोत्साहन देऊन विकासासाठी दीर्घकालीन भांडवल पुरवठा करते. सन २०२४-२५ मध्ये राज्यातील एकूण आयुर्विमा व्यवसायात आयुर्विमा महामंडळाचा वाटा ५६.४ टक्के होता तर खाजगी क्षेत्रातील विमा कंपन्यांचा वाटा ४३.६ टक्के होता. सन २०२४-२५ या वर्षासाठी देशाच्या एकूण नवीन आयुर्विमा प्रिमियम मध्ये राज्याचा वाटा २८.० टक्के होता. नव्याने उतरविण्यात आलेल्या वैयक्तिक आयुर्विमा पॉलिसींचा तपशील तक्ता ६.१९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.१९ नव्याने उतरविण्यात आलेल्या वैयक्तिक आयुर्विमा पॉलिसींचा तपशील**

| तपशील | | संख्या ('०००) | | | प्रिमियम (₹ कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
| **महाराष्ट्र** | खाजगी | १,१६० | १,३०६ | १,४८९ | ४०,५५५ | ४१,६९२ | ४८,६०८ |
| | भारतीय आयुर्विमा महामंडळ | २,१०६ | १,८४३ | १,७११ | ७३,००६ | ६६,७२९ | ६२,८५४ |
| | **एकूण** | **३,२६६** | **३,१४९** | **३,२००** | **१,१३,५६१** | **१,०८,४२१** | **१,११,४६३** |
| **अखिल भारत** | खाजगी | ८,०४८ | ८,७९२ | ९,२५३ | १,३८,४७६ | १,५४,९६६ | १,७०,९५३ |
| | भारतीय आयुर्विमा महामंडळ | २०,४६५ | २०,४३० | १७,८१५ | २,३१,९२२ | २,२२,५२३ | २,२६,६७० |
| | **एकूण** | **२८,५१३** | **२९,२२२** | **२७,०६८** | **३,७०,३९८** | **३,७७,४८९** | **३,९७,६२३** |

टीप : आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

*आधार :* विमा नियामक व विकास प्राधिकरण

**आलेख ६.५ : राज्यातील आयुर्विमा पॉलिसींचा क्षेत्रनिहाय हिस्सा**




६.१८.१ सन २०२४-२५ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत बिगर-आयुर्विमा प्रिमियमच्या संकलनात १२ टक्के वाढ नोंदवली आहे. देशात उतरविण्यात आलेल्या एकूण बिगर आयुर्विमा प्रिमियममध्ये राज्याचा वाटा २५ टक्के होता. उतरविण्यात आलेल्या बिगर-आयुर्विमा प्रिमियमचा तपशील तक्ता ६.२० मध्ये दिला आहे.

**आलेख ६.६ : सन २०२४-२५ मध्ये राज्यात उतरविण्यात आलेल्या घटकनिहाय बिगर - आयुर्विमा प्रिमियम**




**तक्ता ६.२० उतरविण्यात आलेल्या बिगर-आयुर्विमा प्रिमियमचा तपशील**

(₹ कोटी)

| वर्ष | विमा घटक | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आग | मोटार | | वैयक्तिक अपघात | आरोग्य | पीक | संकीर्ण# | |
| | | स्वहानी | तृतीय पक्ष | | | | | |
| **महाराष्ट्र** | | | | | | | | |
| २०२२-२३ | ५,५०५ | ४,५६० | ६,७६६ | २,२२२ | २६,३४९ | ५,८३४ | ७,८६८ | ५९,१०४ |
| २०२३-२४ | ५,४५४ | ५,०१७ | ६,९१२ | २,७८७ | ३१,२५८ | ९,६०० | ८,०६५ | ६९,०९३ |
| २०२४-२५ | ५,७३७ | ५,९२३ | ८,१७६ | २,२८५ | ३४,१९४ | ११,१६२ | ९,६१७ | ७७,०९५ |
| **अखिल भारत** | | | | | | | | |
| २०२२-२३ | २३,९३२ | ३१,७८३ | ४९,४९७ | ७,०३६ | ८९,४९२ | ३२,०१५ | २३,१४० | २,५६,८९५ |
| २०२३-२४ | २५,६५६ | ३७,३२५ | ५४,४५६ | ७,७७१ | १,०७,६८१ | ३०,७२८ | २६,०६७ | २,८९,६८४ |
| २०२४-२५ | २४,२६३ | ४०,१३५ | ५८,९५८ | ८,५७६ | १,१७,५०५ | ३०,०९१ | २८,१४३ | ३,०७,६७१ |

# कर्ज, विदेशी वैद्यकीय, प्रवास, सागरी मालवाहतूक, एव्हिएशन, अभियांत्रिकी, इत्यादी समाविष्ट

*आधार :* विमा नियामक व विकास प्राधिकरण

* * * * *

# परिशिष्ट ६.१

## राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्ज

(₹ कोटी)

| वर्ष | दि. ३१ मार्च नुसार | | | | | | एकूण ठेवी | एकूण कर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | | निमनागरी | | नागरी / महानगर | | | |
| | ठेवी | कर्ज | ठेवी | कर्ज | ठेवी | कर्ज | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १९८१@ | ३०९ | २२६ | ७१४ | ३८४ | ६,५६८ | ५,३२१ | ७,५९० | ५,९३१ |
| १९९१ | १,७३७ | १,२९८# | २,३६१ | १,२०१# | ३४,२२८ | २५,२१५# | ३८,३२६ | २७,७१४ |
| २००१ | ६,८०४ | ४,७७१# | ९,९७९ | ३,९६९# | १,५५,७०६ | १,४०,२५०# | १,७२,४८९ | ४३,४८५ |
| २०११ | २८,२११ | २०,२७३# | ४८,०११ | २७,४६७# | १३,७७,०६५ | ११,५८,८५९# | १४,५३,२८६ | १२,०६,५९९ |
| २०१५ | ५६,२१४ | ४४,५७८ | ९५,६८८ | ६०,४७९ | १९,८१,८१५ | १८,७१,००० | २१,३३,७१८ | १९,७६,०५७ |
| २०१६ | ६१,८२४ | ५२,८१७ | १,०२,०२६ | ६७,६६० | २०,१३,७४६ | २१,१४,८२७ | २१,७७,५९६ | २२,३५,३०४ |
| २०१७ | ६३,५९७ | ४६,७४० | १,२८,१२३ | ७७,९२० | १९,७१,९३५ | २१,७४,९१९ | २१,६३,६५४ | २२,९९,५८० |
| २०१८ | ७०,१०४ | ४९,३८४ | १,३९,३१२ | ८४,८७५ | १९,५५,३२५ | २१,९६,३२२ | २२,८९,३०१ | २४,०४,७६६ |
| २०१९ | ७७,२७६ | ५२,२४२ | १,५६,९०० | ९२,२०५ | २३,१५,७६७ | २५,७०,३६२ | २५,४९,९४३ | २७,१४,८०९ |
| २०२० | ९१,७०९ | ५३,९२९ | १,८३,७८० | ९६,४५९ | २४,७९,४७९ | २६,७५,८३३ | २७,५४,९६८ | २८,२६,२२० |
| २०२१ | ९९,०६२ | ६२,२९३ | १,९६,५५१ | १,११,४०८ | २७,५७,८४१ | २७,२२,०४१ | ३०,५३,४५४ | २८,९५,७४२ |
| २०२२ | १,०३,६८० | ६६,५५९ | २,०८,३९७ | १,२५,३८५ | ३१,८८,९०२ | २९,९०,९६२ | ३५,००,९७९ | ३१,८२,९०६ |
| २०२३ | १,१३,०६९ | ७६,८४८ | २,२२,८२२ | १,४६,१५० | ३५,८७,०१६ | ३६,४४,३५६ | ३९,२२,९०८ | ३८,६७,३५४ |
| २०२४ | १,२९,३८१ | ८७,०१२ | २,५९,५२२ | १,९२,००२ | ४२,७८,९४४ | ४३,१९,७१३ | ४६,६७,८४७ | ४५,९८,७२७ |
| २०२५ | १,४५,६८९ | ९७,८६८ | २,८५,२८२ | २,१५,१९२ | ४८,०२,९९५ | ४७,३८,२७७ | ५२,३३,९६६ | ५०,५१,३३७ |

| वर्ष | दरडोई ठेवी (₹) | दरडोई कर्ज (₹) | एकूण बँक कार्यालयांची संख्या | | | दर लाख लोकसंख्येमागे बँकींग कार्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामीण व निमनागरी | नागरी / महानगर क्षेत्रातील | एकूण | |
| (१) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) |
| १९८१@ | १,२०४ | ९४० | २,०३० | १,५९७ | ३,६२७ | ५.८ |
| १९९१ | ३,४११ | २,४६६ | ३,३६४ | २,४११ | ५,७७५ | ७.३ |
| २००१ | १७,८०५ | ४,४८९ | ३,३९५ | ३,१०३ | ६,४९८ | ६.७ |
| २०११ | १,८४,१०७ | १,५२,८५६ | ३,८९३ | ४,९२३ | ८,८१६ | ७.८ |
| २०१५ | १,८१,९८८ | १,६८,५४१ | ५,५५५ | ५,७२९ | ११,२८४ | ९.६ |
| २०१६ | १,८१,३८३ | १,८६,१९० | ५,७५३ | ६,०३६ | ११,७८९ | ९.८ |
| २०१७ | १,७८,१०१ | १,८९,२८९ | ५,८२२ | ६,३६९ | १२,१९१ | १०.० |
| २०१८ | १,८६,२२३ | १,९५,६१९ | ५,९०८ | ६,४०९ | १२,३१७ | १०.० |
| २०१९ | २,०७,४२५ | २,२०,८३६ | ५,९९५ | ६,५०६ | १२,५०१ | १०.२ |
| २०२० | २,२३,४३९ | २,२९,२१३ | ६,२६४ | ६,८५० | १३,११४ | १०.६ |
| २०२१ | २,४५,३८१ | २,३२,७०७ | ६,३३२ | ६,८२८ | १३,१६० | १०.६ |
| २०२२ | २,७८,९८० | २,५३,६३४ | ६,३४१ | ६,८७९ | १३,२२० | १०.५ |
| २०२३ | ३,१०,१९५ | ३,०५,८०२ | ६,४४१ | ७,१५१ | १३,५९२ | १०.७ |
| २०२४ | ३,६६,३९३ | ३,६०,९६७ | ६,५५४ | ७,३७५ | १३,९२९ | १०.९ |
| २०२५ | ४,०७,८३९ | ३,९३,६०९ | ६,७०६ | ७,६२५ | १४,३३१ | ११.२ |

# येणे कर्ज

@ वर्षाच्या जून महिन्यातील अखेरच्या शुक्रवारची स्थिती

टीप - आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

*आधार* - भारतीय रिझर्व्ह बँक

## परिशिष्ट ६.२

## जिल्हानिहाय वार्षिक पत आराखडा (२०२५-२६)

(₹ कोटी)

| अ. क्र. | जिल्हा | प्राधान्य क्षेत्र | | | | | बिगर प्राधान्य क्षेत्र | एकूण योजना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कृषि व संलग्न कार्ये | | बिगर शेती क्षेत्र | इतर प्राधान्य क्षेत्र | एकूण | | |
| | | एकूण कर्ज | त्यापैकी, पीक कर्ज | | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | मुंबई शहर | २८,१६९ | ३६९ | १,९१,५०० | २२,००० | २,४१,६६९ | २५,४०,००० | २७,८१,६६९ |
| २ | मुंबई उपनगर | १२,३२७ | १०१ | १,१०,२२५ | ११,४४८ | १,३३,९९९ | ५,१२,०३७ | ६,४६,०३७ |
| ३ | ठाणे | ४,३०० | ६०० | ३५,००० | ५,५०० | ४४,८०० | १,००,००० | १,४४,८०० |
| ४ | पालघर | १,०९७ | ४०० | ४,७०० | १,६५० | ७,४४७ | ८,००० | १५,४४७ |
| ५ | रायगड | २,२२५ | ६२५ | ५,७०० | २,२०० | १०,१२५ | ५१,००० | ६१,१२५ |
| ६ | रत्नागिरी | २,४२० | ९२५ | १,८५० | ९०० | ५,१७० | २,५०० | ७,६७० |
| ७ | सिंधुदुर्ग | १,२५० | ६०० | १,००० | ३०० | २,५५० | ३,००० | ५,५५० |
| ८ | नाशिक | १०,४०३ | ४,५०० | १७,२०० | ३,००० | ३०,६०३ | २२,००० | ५२,६०३ |
| ९ | धुळे | २,७०० | १,२८० | १,९६० | ४०० | ५,०६० | २,५०० | ७,५६० |
| १० | नंदुरबार | १,५०७ | ९०१ | ६०० | १५० | २,२५७ | १,२०० | ३,४५७ |
| ११ | जळगाव | ८,५०० | ४,५०० | ४,४९९ | ८९९ | १३,८९८ | ५,००० | १८,८९८ |
| १२ | अहिल्यानगर | १२,०२७ | ७,७२७ | ५,५०० | ७०० | १८,२२७ | १६,८०० | ३५,०२७ |
| १३ | पुणे | १८,७९९ | ७,३०० | ६५,२०० | ८,१९९ | ९२,१९८ | २,७०,००० | ३,६२,१९७ |
| १४ | सातारा | ६,३०० | ३,८०० | ३,३०० | ४,३०० | १३,९०० | ६,००० | १९,९०० |
| १५ | सांगली | ६,६०० | ३,४०० | ४,९०० | ६०० | १२,१०० | १२,००० | २४,१०० |
| १६ | सोलापूर | ९,८०० | ५,२०० | ४,८०० | ७०० | १५,३०० | ७,१०० | २२,४०० |
| १७ | कोल्हापूर | ७,३०० | ३,९०० | १२,५०० | ९०० | २०,७०० | २१,५०० | ४२,२०० |
| १८ | छत्रपती संभाजीनगर | ५,६०० | २,४०० | ९,७०० | १,४०१ | १६,७०१ | १६,८०० | ३३,५०१ |
| १९ | जालना | २,७७० | १,८२० | १,९०० | २०० | ४,८७० | २,९०० | ७,७७० |
| २० | परभणी | ३,५१० | २,२६० | १,६५० | २०० | ५,३६० | २,४०० | ७,७६० |
| २१ | हिंगोली | २,१०० | १,४२५ | ६५० | २०० | २,९५० | १,२०० | ४,१५० |
| २२ | बीड | ३,२१० | २,४१० | २,१५० | ३०० | ५,६६० | २,२०० | ७,८६० |
| २३ | नांदेड | ४,५३३ | २,५३३ | २,५०० | ५०० | ७,५३३ | ४,००० | ११,५३३ |
| २४ | धाराशिव | ३,०६५ | २,२८० | १,००० | २०० | ४,२६५ | १,५०० | ५,७६५ |
| २५ | लातूर | ५,२५० | ३,१०० | ३,२५० | ७०० | ९,२०० | ४,१०० | १३,३०० |
| २६ | बुलढाणा | ३,७०० | २,००० | १,९०० | ३०० | ५,९०० | ४,२०० | १०,१०० |
| २७ | अकोला | ३,२०० | १,५०० | २,५०० | ४०० | ६,१०० | २,९०० | ९,००० |
| २८ | वाशिम | २,५४६ | १,६५० | ९५० | २५० | ३,७४६ | १,००० | ४,७४६ |
| २९ | अमरावती | ३,९५० | २,१०० | ३,७०० | ५०० | ८,१५० | ४,१०० | १२,२५० |
| ३० | यवतमाळ | ३,९५० | २,४०० | १,८०० | ४५० | ६,२०० | ३,१०० | ९,३०० |
| ३१ | वर्धा | २,६०० | १,२०० | १,९०० | २०० | ४,७०० | १,६०० | ६,३०० |
| ३२ | नागपूर | ८,३०० | १,९०० | २२,००० | २,००० | ३२,३०० | ३१,००० | ६३,३०० |
| ३३ | भंडारा | १,५१२ | ८९५ | ७७० | २०० | २,४८२ | ९०० | ३,३८२ |
| ३४ | गोंदिया | २,०५५ | ७५५ | १,५०० | २०० | ३,७५५ | १,२०० | ४,९५५ |
| ३५ | चंद्रपूर | २,४५० | १,२५० | २,१०० | ४५० | ५,००० | ३,३०० | ८,३०० |
| ३६ | गडचिरोली | ७०० | ४१५ | ३९० | २०० | १,२९० | १,६०० | २,८९० |
| | **महाराष्ट्र राज्य** | **२,००,७२६** | **८०,४२१** | **५,३२,७४५** | **७२,६९६** | **८,०६,१६८** | **३६,७०,६३८** | **४४,७६,८०६** |

टीप - आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

*आधार* - राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य

# परिशिष्ट ६.३

## जिल्हानिहाय प्रधान मंत्री जन-धन योजनेचा तपशील

(३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत)

| अ. क्र. | जिल्हा | उघडण्यात आलेली एकूण खाती | देण्यात आलेली एकूण रुपे कार्ड | किमान शिलकीची मर्यादा नसलेली खाती | एकूण ठेवी (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | मुंबई शहर | ६,१८,९६१ | ५,२१,४३५ | ८१,८२४ | ३७०.८८ |
| २ | मुंबई उपनगर | १०,४१,६९९ | ८,५१,६२८ | १,३८,७२४ | ५७१.४१ |
| ३ | ठाणे | १६,१३,९८० | १२,२७,३०८ | २,०४,२१२ | ८२७.८६ |
| ४ | पालघर | ९,८८,०८३ | ६,७३,२९१ | ६७,२७८ | ५०९.८८ |
| ५ | रायगड | ६,७३,८१४ | ४,६०,३७७ | ७०,०२० | ४१७.४० |
| ६ | रत्नागिरी | ४,०१,०८८ | २,५२,६७२ | ३४,४०७ | २६३.४६ |
| ७ | सिंधुदुर्ग | २,००,५७४ | १,३९,२२३ | १८,९४५ | १४५.५० |
| ८ | नाशिक | २४,११,००५ | १५,९१,१८२ | १,७०,४४३ | १,३२९.९५ |
| ९ | धुळे | ८,८७,५१६ | ६,१७,६४९ | ८५,६६९ | ३०३.४९ |
| १० | नंदुरबार | ८,०५,३६९ | ५,९४,३४१ | ६१,२७१ | २४३.५९ |
| ११ | जळगाव | १६,२२,९३७ | ११,५८,८७३ | १,१८,०१८ | ६२४.१३ |
| १२ | अहिल्यानगर | १७,२४,३२६ | १२,८५,३६९ | १,१६,३७० | ९२६.३२ |
| १३ | पुणे | २०,८१,१२० | १४,६५,२८९ | २,११,१६२ | १,४४३.८३ |
| १४ | सातारा | ८,९१,७५५ | ६,१४,५०९ | ६९,६६७ | ४०५.०७ |
| १५ | सांगली | ९,६६,५८३ | ६,८९,६२२ | ९५,५८६ | ३७१.१३ |
| १६ | सोलापूर | १७,५९,६४६ | १३,५४,०७५ | १,३२,५१८ | ८६५.६३ |
| १७ | कोल्हापूर | १४,७३,२४५ | १०,७५,१०२ | १,१९,५४५ | ६३५.४७ |
| १८ | छत्रपती संभाजीनगर | १५,६४,६४९ | १०,२०,८७३ | १,४६,०४९ | ७०३.२१ |
| १९ | जालना | ८,५८,३७४ | ५,०६,७२७ | ६४,९०४ | ३२७.४९ |
| २० | परभणी | ९,१०,६८३ | ५,५३,१५४ | ८२,९४७ | ३३०.८५ |
| २१ | हिंगोली | ६,५८,६७३ | ४,१२,३५७ | ६०,५१९ | २३२.४९ |
| २२ | बीड | १२,७७,४९३ | ८,३४,४८९ | १,०४,०३१ | ७६०.३९ |
| २३ | नांदेड | १५,२३,७८७ | १०,३३,२७६ | १,४०,९१९ | ५६४.७८ |
| २४ | धाराशिव | ७,४२,२५१ | ४,७८,००६ | ७०,४५३ | ४६१.१० |
| २५ | लातूर | ९,५५,५६४ | ६,७४,६४९ | ९१,३२० | ४०७.१० |
| २६ | बुलढाणा | ९,४३,७८३ | ७,०८,९०२ | ४५,०९० | २९९.७१ |
| २७ | अकोला | ६,४९,२६० | ४,३२,२३८ | ४३,३९० | २१५.५९ |
| २८ | वाशिम | ४,४०,५५५ | ३,२०,३८३ | २६,५७५ | १३०.४२ |
| २९ | अमरावती | ९,४९,७९८ | ६,६६,९६९ | ६२,५९० | ३६५.४५ |
| ३० | यवतमाळ | १२,३७,००७ | ८,६८,६४७ | ९१,०६९ | ३५४.१७ |
| ३१ | वर्धा | ३,७९,९८५ | २,८९,४५६ | २८,३७९ | २११.०९ |
| ३२ | नागपूर | १४,४८,०४३ | ११,४५,२०६ | १,०७,२०३ | ८६७.२४ |
| ३३ | भंडारा | ५,१८,५७७ | ३,९३,०४७ | २५,९८३ | ३५६.०३ |
| ३४ | गोंदिया | ६,८१,५२५ | ४,६१,७८७ | ४१,५०९ | ४०७.१७ |
| ३५ | चंद्रपूर | ७,०२,३२९ | ५,०१,५९३ | ३८,८९० | ४१३.८९ |
| ३६ | गडचिरोली | ३,४३,२६५ | २,४८,४८७ | १५,५१९ | २३७.०२ |
| | **महाराष्ट्र राज्य** | **३,६९,४७,३०२** | **२,६१,२२,१९१** | **३०,८२,९९८** | **१७,९००.१७** |

टीप - आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

*आधार* - राज्यस्तरीय बँकर्स समितीचे निमंत्रक, बँक ऑफ महाराष्ट्र

# ७ कृषि व संलग्न कार्ये





# ७. कृषि व संलग्न कार्ये

## कृषि

७.१ शेती आणि संलग्न कार्ये जसे की पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय आणि वनीकरण राज्याच्या अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. हे क्षेत्र लोकसंख्येच्या मोठ्या घटकाला, विशेषतः ग्रामीण भागातील जनतेला उपजीविका व रोजगार उपलब्ध करून देते आणि अन्न व पोषण सुरक्षा सुनिश्चित करण्यामध्ये मोलाचे योगदान देते.

७.२ शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक असून तो लोकसंख्येच्या मोठ्या भागाला उपजीविका प्रदान करतो. अन्न सुरक्षा, रोजगार आणि ग्रामीण विकासामध्ये याची भूमिका महत्वाची आहे. मात्र, हवामान बदल, जमीन आणि पाण्याची टंचाई, निविष्ठांचा (बियाणे, खते इ.) वाढता खर्च आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यांमुळे शेतीसमोर आव्हाने वाढत आहेत. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शासन शेतीचे उत्पादन वाढविणे, हवामान बदलास अनुकूल व शाश्वत शेतीला चालना देणे, सिंचन व्यवस्था आणि जलसंधारणात सुधारणा करणे तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे यांसाठी विविध योजना राबवित आहे. त्याच प्रमाणे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी प्रोत्साहित करणे, शेतकरी गटांना बळकट करणे आणि बाजारपेठ उपलब्धतेत सुलभता आणणे या सारखेही प्रयत्न केले जात आहेत.

## मान्सून २०२५

७.३ राज्यात मोसमी पावसाचे आगमन दि. २५ मे २०२५ रोजी झाले. राज्यात जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये अनुक्रमे ९९.८ टक्के, ८७.९ टक्के, १०४.२ टक्के, १६४.५ टक्के आणि ११४.१ टक्के पाऊस झाला. मान्सून २०२५ मध्ये ऑक्टोबर पर्यंत सरासरी पावसाच्या तुलनेत राज्यात १०९.१ टक्के पाऊस झाला. राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी (मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हे वगळून) १४९ तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस, १८१ तालुक्यांमध्ये सरासरी पाऊस आणि २५ तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. पडलेल्या पावसाच्या प्रमाणानुसार तालुक्यांचे वर्गीकरण तक्ता ७.१ मध्ये दिले आहे. विभागनिहाय सरासरी आणि प्रत्यक्ष पडलेला पाऊस तक्ता ७.२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१ पडलेल्या पावसाच्या प्रमाणानुसार तालुक्यांचे वर्गीकरण**

| पावसाची वर्गवारी (सरासरीशी टक्केवारी) | तालुक्यांची संख्या# | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जून | | जुलै | | ऑगस्ट | | सप्टेंबर | | ऑक्टोबर | | जून-ऑक्टोबर | |
| | २०२४ | २०२५ | २०२४ | २०२५ | २०२४ | २०२५ | २०२४ | २०२५ | २०२४ | २०२५ | २०२४ | २०२५ |
| १२० व अधिक | १४८ | ९१ | २५७ | ८० | १०६ | १४४ | १६३ | २७९ | १५१ | १६४ | २०३ | १४९ |
| १०० - १२० | ४५ | ५९ | ५६ | ४५ | ३९ | ६३ | ७२ | ४६ | ३१ | ४६ | ३६ | ११५ |
| ८० - १०० | ७३ | ७२ | ३५ | ८० | ७१ | ६३ | ७१ | १९ | ३९ | ४७ | ३२ | ६६ |
| ६० - ८० | ४२ | ६६ | ५ | ९६ | ८५ | ६७ | ३४ | ८ | ५५ | ४४ | २८ | २३ |
| ४० - ६० | ३७ | ५१ | २ | ४० | ४८ | १६ | १३ | ३ | ३७ | ३९ | ३५ | २ |
| २० - ४० | १० | १६ | ० | १४ | ६ | २ | २ | ० | २१ | १४ | २० | ० |
| ० - २० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २१ | १ | १ | ० |

# मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील तालुके वगळून

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## तक्ता ७.२ विभागनिहाय सरासरी आणि प्रत्यक्ष पडलेला पाऊस

(मिमी)

| कालावधीतील पाऊस | | | विभाग | | | | | | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कोकण# | नाशिक | पुणे | छत्रपती संभाजीनगर | अमरावती | नागपूर | | |
| | | **सरासरी** | **६६२.५** | **१३९.७** | **१९८.६** | **१३४.०** | **१४७.६** | **१८७.१** | **२०७.६** | |
| जून | २०२४ | प्रत्यक्ष | ६२९.४ | १६० | २११.१ | १८३.३ | १६३.७ | १३१.१ | २२१.५ | (१०६.७) |
| | २०२५ | प्रत्यक्ष | ६६६.५ | १४१.३ | २२१.२ | १०५.९ | १५८.९ | १३१.३ | २०७.१ | (९९.८) |
| | | **सरासरी** | **१,०६३.८** | **२१८.५** | **३२७.२** | **१८६.२** | **२३९.६** | **३६२.३** | **३३०.९** | |
| जुलै | २०२४ | प्रत्यक्ष | १,५६३.२ | २२५.४ | ४२२.२ | २३०.२ | ३२४ | ६५१.५ | ४८१.४ | (१४५.५) |
| | २०२५ | प्रत्यक्ष | ८२८.२ | १२३.६ | १९५.० | १७९.१ | २१०.८ | ४८८.८ | २९०.८ | (८७.९) |
| | | **सरासरी** | **७६६.३** | **१९७.४** | **२४७.५** | **१९३.३** | **२३१.७** | **३४७.८** | **२८६.०** | |
| ऑगस्ट | २०२४ | प्रत्यक्ष | ५९८.४ | २५७.५ | २५३.८ | १६०.९ | १९९.८ | २३७.२ | २५८.८ | (९०.५) |
| | २०२५ | प्रत्यक्ष | ८१२.९ | १६७.१ | १९४.० | २९६.८ | २६०.१ | २७३.९ | २९८.१ | (१०४.२) |
| | | **सरासरी** | **३७५.५** | **१५१.५** | **१७१.७** | **१६६.०** | **१३०.९** | **१७५.३** | **१७९.७** | |
| सप्टेंबर | २०२४ | प्रत्यक्ष | ४१५.७ | १४५.६ | १३५.८ | २३०.१ | १७५.९ | २२७.७ | २०७.६ | (११५.५) |
| | २०२५ | प्रत्यक्ष | ४५८.८ | २६४.१ | २२०.६ | ३५९.० | २३४.४ | २९४.० | २९५.६ | (१६४.५) |
| | | **सरासरी** | **१०८.६** | **५३.१** | **९६.५** | **७१.३** | **५७.५** | **५३.४** | **७१.१** | |
| ऑक्टोबर | २०२४ | प्रत्यक्ष | १६६.५ | ९५.६ | १०७.९ | ८१ | ५९.२ | २८ | ८६.७ | (१२१.९) |
| | २०२५ | प्रत्यक्ष | ११९.१ | ८१.९ | ६५.३ | ९७.२ | ५५.६ | ८१.३ | ८१.१ | (११४.१) |
| | | **सरासरी** | **२,९७६.७** | **७६०.२** | **१,०४१.५** | **७५०.८** | **८०७.३** | **१,१२५.९** | **१,०७५.३** | |
| **जून ते ऑक्टोबर** | **२०२४** | **प्रत्यक्ष** | **३,३७३.४** | **८८४.१** | **१,१३१.४** | **८८५.५** | **९२२.६** | **१,२७५.५** | **१,२५६.०** | **(११६.८)** |
| | **२०२५** | **प्रत्यक्ष** | **२,८८५.५** | **७७८.०** | **८९६.१** | **१,०३८.०** | **९१९.८** | **१,२६९.३** | **१,१७२.७** | **(१०९.१)** |

# मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून

टीप : कंसातील आकडे प्रत्यक्ष पडलेल्या पावसाची सरासरी पावसाशी टक्केवारी दर्शवितात

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

**आलेख ७.१ : राज्यात पडलेल्या पावसाची सरासरी पावसाशी टक्केवारी**



आलेख ७.२ : राज्यात पडलेल्या पावसाची सरासरी पावसाशी टक्केवारी




आलेख ७.३ : पडलेल्या पावसानुसार तालुक्यांची संख्या (सरासरीशी टक्केवारी)




## वहिती खाती

७.४ पहिली कृषि गणना सन १९७०-७१ मध्ये झाली. ११ वी नविनतम कृषि गणना सन २०२१-२२ मध्ये झाली. प्राथमिक आकडेवारीनुसार राज्यातील वहिती खातेदारांची संख्या सुमारे १७१.११ लाख, वहिती क्षेत्र सुमारे २१०.५८ लाख हेक्टर व वहिती खात्याची सरासरी १.२३ हेक्टर आहे. राज्यातील वहिती खात्यांच्या आकडेवारीची समय मालिका परिशिष्ट ७.१ मध्ये दिली आहे.

आलेख ७.४ : राज्यातील वहिती खातेदारांचा आकारवर्गानूसार वाटा




आलेख ७.५ : राज्यातील आकारवर्गानूसार वहिती क्षेत्र



> ➢ महिला वहिती खातेदारांचे प्रमाण १९९५-९६ मध्ये १२.९ टक्के वरून २०२१-२२ मध्ये २०.६ टक्के वाढले आहे
>
> ➢ तसेच महिलांच्या सरासरी वहिती क्षेत्रामध्ये १.५८ हेक्टर वरून १.१८ हेक्टर बदल याच कालावधीत झाला आहे

## नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई

७.५ माहे जानेवारी ते मे २०२५ या कालावधीत अवेळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीसाठी एकूण चार लाख शेतकऱ्यांना सुमारे १.८७ लाख हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ₹ ३३७.४२ कोटी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली. तसेच माहे जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीसाठी एकूण ११६.४० लाख शेतकऱ्यांना सुमारे ९४.८२ लाख हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ₹ ९,०२२.३८ कोटी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली.

## जमिनीचा वापर

७.६ सन २०२३-२४ च्या जमीन वापराच्या आकडेवारीनुसार, राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी (३०७.५८ लाख हेक्टर) एकूण पिकांखालील स्थूल क्षेत्र २४२.२४ लाख हेक्टर व पिकांखालील निव्वळ क्षेत्र १६५.७१ लाख हेक्टर (५३.९ टक्के) होते. राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी परिशिष्ट ७.२ मध्ये दिली आहे.

**आलेख ७.६ : राज्यातील वहिती खातेदारांची संख्या व वहिती खात्यांची सरासरी**




**आलेख ७.७ : राज्यातील जमिनीचा वापर - सन २०२३-२४**




## कृषि उत्पादन

७.७.१ **खरीप पिके:** सन २०२५-२६ च्या खरीप हंगामात १५७.२७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली व ती मागील वर्षीच्या १५८.१७ लाख हेक्टर च्या तुलनेत ०.६ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षीच्या तुलनेत अनुक्रमे मका व ऊस व पिकांच्या क्षेत्रात ३०.२ टक्के व १७.६ टक्के इतकी लक्षणीय वाढ अपेक्षित आहे, तर कडधान्ये, तेलबिया आणि कापूस पिकांच्या क्षेत्रात घट अपेक्षित आहे. प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र आणि उत्पादन तक्ता ७.३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.३ प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे. टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२४-२५ | २०२५-२६ (अस्थायी) | शेकडा बदल# | २०२४-२५ | २०२५-२६ (अस्थायी) | शेकडा बदल# |
| तांदूळ | १,५२१.४१ | १,५१८.८२ | (-) ०.२ | ३,५६६.५७ | ३,४०१.१६ | (-) ४.६ |
| ज्वारी | ११०.३९ | ८३.१७ | (-) २४.७ | १२६.१६ | ७०.५४ | (-) ४४.१ |
| बाजरी | ४०३.५४ | ३२२.८४ | (-) २०.० | ५२८.८९ | ३६५.२४ | (-) ३०.९ |
| नाचणी | ६८.६७ | ५९.५८ | (-)१३.२ | ९५.९२ | ८०.७६ | (-)१५.८ |
| मका | १,११५.६७ | १,४५२.४८ | ३०.२ | २,९८९.५७ | ४,१७२.६४ | ३९.६ |
| इतर तृणधान्ये | ३३.३५ | ३१.७६ | (-) ४.८ | १८.४२ | १४.७२ | (-) २०.१ |
| **एकूण तृणधान्ये** | **३,२५३.०३** | **३,४६८.६५** | **३.८** | **७,३२५.५३** | **८,१०५.०६** | **१०.६** |
| तूर | १,२२६.८२ | १,२२६.४४ | नगण्य | १,६२९.९१ | १,१५४.०५ | (-) २९.२ |
| मूग | २३८.६१ | २११.३२ | (-) ११.४ | १६२.१० | १२६.७५ | (-) २१.८ |
| उडीद | ३९१.०८ | ३७८.२६ | (-) ३.३ | ३५९.५८ | २४६.७० | (-) ३१.४ |
| इतर कडधान्ये | ७१.२८ | ६८.५८ | (-) ३.८ | ७४.५४ | ७१.४१ | (-) ४.२ |

**तक्ता ७.३ प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे. टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२४-२५ | २०२५-२६ (अस्थायी) | शेकडा बदल# | २०२४-२५ | २०२५-२६ (अस्थायी) | शेकडा बदल# |
| **एकूण कडधान्ये** | **१,९२७.७९** | **१,८८४.६०** | **(-) २.२** | **२,२२६.१३** | **१,५९८.९१** | **(-) २८.२** |
| **एकूण अन्नधान्ये** | **५,१८०.८२** | **५,३५३.२५** | **३.३** | **९,५५१.६६** | **९,७०३.९७** | **१.६** |
| सोयाबीन | ५,१७५.६३ | ४,९९४.७९ | (-) ३.५ | ९,४४४.४१ | ४,९०२.१५ | (-) ४८.१ |
| भूईमूग | १५०.२२ | १३७.१२ | (-) ८.७ | २१७.१० | १७९.८८ | (-) १७.१ |
| तीळ | ४.६६ | ३.५८ | (-) २३.१ | १.२४ | ०.९७ | (-) २१.८ |
| कारळ | ३.८३ | ३.१४ | (-) १८.० | ०.८१ | ०.८७ | ७.४ |
| सुर्यफूल | ९.२९ | ६.७३ | (-) २७.६ | ४.१८ | ३.१६ | (-) २४.४ |
| इतर तेलबिया | २.४७ | १.७२ | (-) ३०.६ | ०.७९ | ०.६३ | (-) २०.३ |
| **एकूण तेलबिया** | **५,३४६.१०** | **५,१४७.०८** | **(-) ३.७** | **९,६६८.५३** | **५,०८७.६६** | **(-) ४७.४** |
| कापूस (रुई)@ | ४,१२२.९८ | ३,८५४.७३ | (-) ७.० | ७,३८४.६८ | ७,९००.६० | ७ |
| ऊस** | १,१६७.०४ | १,३७१.८७ | १७.६ | १,०९,९७४.४२ | १,३४,११९.११ | २२ |
| **एकूण** | **१५,८१६.९४** | **१५,७२६.५७** | **(-) ०.६** | - | - | - |

@ १७० किलोची एक गासडी याप्रमाणे कापसाचे उत्पादन '००० गासड्यांमध्ये ** तोडणी क्षेत्र # परिगणना प्रत्यक्ष आकडेवारीवर आधारित

टीप : १) सन २०२४-२५ ची आकडेवारी अंतिम पुर्वानुमानावर व २०२५-२६ ची आकडेवारी द्वितीय पुर्वानुमानावर आधारीत आहे

२) आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.७.२ **रब्बी पिके:** सन २०२५-२६ च्या रब्बी हंगामात सुमारे ६६.९८ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली व ती मागील वर्षीच्या (६२.७९ लाख हेक्टर) तुलनेत ६.७ टक्के जास्त आहे. मागील वर्षीच्या तुलनेत तृणधान्य व कडधान्य क्षेत्रात वाढ तर तेलबियांच्या क्षेत्रात घट अपेक्षित आहे. प्रमुख रब्बी पिकांचे क्षेत्र आणि उत्पादन तक्ता ७.४ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४ प्रमुख रब्बी पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे. टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२४-२५ | २०२५-२६ (अस्थायी) | शेकडा बदल# | २०२४-२५ | २०२५-२६ (अस्थायी) | शेकडा बदल# |
| ज्वारी | १,५४६.३६ | १,३८९.९१ | (-) १०.१ | १,६९०.२४ | १,६८७.७१ | (-) ०.१ |
| गहू | १,१८८.९३ | १,४९६.६० | २५.९ | २,४५४.११ | ३,२३९.४५ | ३२ |
| मका | ४२३.०३ | ६५७.९२ | ५५.५ | १२८३.१२ | २०३६.६० | ५८.७ |
| इतर तृणधान्ये | १२.२८ | १६.६२ | ३५.३ | ४.९७ | ६.६१ | ३३.० |
| **एकूण तृणधान्ये** | **३,१७०.६०** | **३,५६१.०६** | १२.३ | **५,४३२.४४** | **६,९७०.३७** | **२८.३** |
| हरभरा | २,८७३.०२ | २,८९२.०१ | ०.७ | २,९६१.५९ | ३,८१०.१३ | २८.७ |
| इतर कडधान्ये | १६०.९९ | १८२.२३ | १३.२ | ८०.६६ | १३४.४७ | ६६.७ |
| **एकूण कडधान्ये** | **३,०३४.०१** | **३,०७४.२४** | **१.३** | **३,०४२.२५** | **३,९४४.६०** | **२९.७** |
| **एकूण अन्नधान्ये** | **६,२०४.६१** | **६,६३५.३०** | **६.९** | **८,४७४.६९** | **१०,९१४.९७** | **२८.८** |
| तीळ | १.४० | १.५८ | १२.९ | ०.४६ | ०.८४ | ८२.६ |
| करडई | ४२.३९ | ३०.८८ | (-) २७.२ | २५.७६ | १९.४४ | (-) २४.५ |
| सुर्यफूल | २.१९ | १.३७ | (-) ३७.४ | १.२७ | ०.८९ | (-) २९.९ |
| जवस | ५.१९ | ५.०१ | (-) ३.५ | १.६५ | २.०३ | २३.० |
| इतर तेलबिया | २३.५९ | २३.७३ | ०.६ | ९.५१ | ९.१७ | (-) ३.६ |
| **एकूण तेलबिया** | **७४.७६** | **६२.५७** | **(-) १६.३** | **३८.६५** | **३२.३७** | **(-) १६.२** |
| **एकूण** | **६,२७९.३७** | **६,६९७.८६** | **६.७** | - | - | - |

# परिगणना प्रत्यक्ष आकडेवारीवर आधारित

टीप : १) सन २०२४-२५ ची आकडेवारी अंतिम पुर्वानुमानावर व २०२५-२६ ची आकडेवारी द्वितीय पुर्वानुमानावर आधारीत आहे

२) आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.७.३ **उन्हाळी पिके:** सन २०२४-२५ च्या उन्हाळी हंगामा मध्ये ५.१५ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली तर सन २०२५-२६ मध्ये ४.३२ लाख हेक्टर क्षेत्र पेरणीचा लक्षांक निर्धारीत करण्यात आला आहे.

७.७.४ मागील सहा दशकांमध्ये राज्यातील पीक उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. राज्यातील प्रमुख पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता यांची समय मालिका परिशिष्ट ७.३ मध्ये दिली आहे. राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक (आधार: त्रैवार्षिक १९७९-८२) परिशिष्ट ७.४ मध्ये दिले आहेत.

**आलेख ७.८ : राज्यातील प्रति हेक्टर उत्पादन**




७.८ **फलोत्पादन:** सन २०२४-२५ मध्ये राज्यात फलोत्पादन पिकांखालील अंदाजित क्षेत्र २५.१९ लाख हेक्टर असून त्यामध्ये मागील वर्षीच्या (२१.७४ लाख हेक्टर) तुलनेत १५.९ टक्क्यांनी वाढ झाली. अंतिम पुर्वानुमानानुसार, राज्यात सन २०२४-२५ मध्ये विविध फळपिकांखालील क्षेत्र ८.९७ लाख हेक्टर होते, त्यापैकी आंबा फळपिकाखालील क्षेत्र सर्वाधिक (१.६७ लाख हेक्टर) त्याखालोखाल, संत्री/मँडरिन (१.४८ लाख हेक्टर), केळी (१.४१ लाख हेक्टर), द्राक्षे (१.१९ लाख हेक्टर), डाळिंब (१.०७ लाख हेक्टर) व मोसंबी (०.८० लाख हेक्टर) या फळपिकांचे क्षेत्र होते. सन २०२४-२५ मध्ये भाजीपाला पिकाखालील क्षेत्र १२.६७ लाख हेक्टर होते, त्यापैकी कांदा पिकाखालील क्षेत्र सर्वाधिक (६.९२ लाख हेक्टर) व त्याखालोखाल टोमॅटो (०.५५ लाख हेक्टर) आणि हिरवी मिरची (०.४३ लाख हेक्टर) या भाजीपाला पिकांचे क्षेत्र होते. फलोत्पादन पिकांखालील क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.५ फलोत्पादन पिकांखालील क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे. टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ | शेकडा बदल | २०२३-२४ | २०२४-२५ | शेकडा बदल |
| फळे | ८७४.१२ | ८९६.५६ | २.६ | १४,९७२.३० | १६,८४०.६९ | १२.५ |
| भाजीपाला | ९४६.३४ | १,२५५.६० | ३२.७ | १५,०६४.०० | १४,९८१.५२ | (-) ०.५ |
| फळबाग पिके | २२६.३९ | २२२.४६ | (-) १.७ | ४१०.८१ | ३४४.४१ | (-) १६.२ |
| मसाल्याची पिके | ११३.९३ | १३०.७२ | १४.७ | १,७५३.७१ | १,७३३.७६ | (-) १.१ |
| फुले@ | १२.१६ | १३.३४ | ९.७ | ७०.९८ | ७०.६६ | (-) ०.५ |
| सुगंधी आणि औषधी वनस्पती | ०.८६ | ०.९१ | ५.८ | २.७२ | ५.७१ | १०९.९ |
| **एकुण फलोत्पादन पिके** | **२,१७४.११** | **२,५१९.५९** | **१५.९** | **३२,२७४.५१** | **३३,९७६.७५** | **५.३** |

@ देठासह व देठविरहीत फुले समाविष्ट

टीप: सन २०२३-२४ ची आकडेवारी अंतिम अंदाजावर व २०२४-२५ची आकडेवारी तृतीय अंदाजावर आधारीत आहे.

*आधार*: फलोत्पादन क्षेत्र उत्पादन माहिती प्रणाली, भारत सरकार

७.९ **सेंद्रिय शेती**: देशाअंतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून सेंद्रिय पिकांच्या उत्पादनांची मागणी वाढत आहे. राज्यात सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. अखिल भारतात सेंद्रिय शेती उत्पादनामध्ये राज्य ३० टक्के हिश्श्यासह प्रथम क्रमांकावर आहे. सेंद्रिय शेतीखालील क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.६ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.६ सेंद्रिय शेतीखालील क्षेत्र व उत्पादन**

| वर्ष | क्षेत्र ('००० हेक्टर) | | उत्पादन ('००० मे. टन) | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत |
| २०२२-२३ | १,२८४ | ५,३९२ | ७९० | २,९५३ |
| २०२३-२४ | १,००१ | ७,८२८ | १,१६१ | ३,५५० |
| २०२४-२५ | ९६७ | ३,९६८ | १,४०० | ४,६९९ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## सुधारित बियाणे

७.१० महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) आणि राष्ट्रीय बीज निगम या दर्जेदार बियाणांचे उत्पादन व वितरण करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील संस्था असून दर्जेदार बियाण्यांचे उत्पादनात आणि वितरणात सुमारे २० टक्के योगदान करत आहेत. सुधारित बियाण्यांचे खरीप आणि रब्बी हंगामासाठी केलेले वितरण तक्ता ७.७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.७ सुधारित बियाण्यांचे खरीप व रब्बी हंगामासाठी केलेले वितरण**

('००० क्विंटल)

| वितरक संस्था | हंगाम | २०२३ | २०२४ | २०२५# | २०२५ च्या तुलनेत २०२४ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| सार्वजनिक | खरीप | २३८ | ३०७ | २४६ | (-) १९.९ |
| | रब्बी | ३५० | २८० | ४२७ | ५२.५ |
| | **एकूण** | **५८८** | **५८७** | **६७३** | **१४.६** |
| खाजगी | खरीप | १,६६० | १,६२५ | १,६७० | २.८ |
| | रब्बी | ६५७ | ८५२ | १,०४१ | २२.२ |
| | **एकूण** | **२,३१७** | **२,४७७** | **२,७११** | **९.४** |
| **एकूण** | खरीप | १,८९८ | १,९३२ | १,९१६ | (-) ०.८ |
| | रब्बी | १,००७ | १,१३२ | १,४६८ | २९.७ |
| | **एकूण** | **२,९०५** | **३,०६४** | **३,३८४** | **१०.४** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # बियाण्यांची अपेक्षित उपलब्धता

## खते व किटकनाशके

७.११ रासायनिक खतांचा वापर तक्ता ७.८ मध्ये व किटकनाशकांचा वापर तक्ता ७.९ मध्ये दिला आहे. नत्र (N), स्फुरद (P) व पालाश (K) या रासायनिक खतांचा विभागनिहाय वापर तक्ता ७.१० मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.८ रासायनिक खतांचा वापर**

(लाख मे. टन)

| वर्ष | रासायनिक खतांचा वापर | | |
|---|---|---|---|
| | खरीप | रब्बी | एकूण |
| २०२३-२४ | ४४.५६ | २०.०१ | ६४.५७ |
| २०२४-२५ | ४४.३० | २८.२० | ७२.५० |
| २०२५-२६# | ४५.३३ | ३१.५० | ७६.८३ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित

आलेख ७.१ : रासायनिक खतांचा प्रति हेक्टर वापर



**तक्ता ७.९ किटकनाशकांचा वापर**

(मे. टन)

| वर्ष | किटकनाशके | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रासायनिक | | | प्रति हेक्टर वापर (कि. ग्रॅ.) | जैविक | | | प्रति हेक्टर वापर (कि. ग्रॅ.) |
| | खरीप | रब्बी | एकूण | | खरीप | रब्बी | एकूण | |
| २०२३-२४ | ६,१०३ | २,६१५ | ८,७१८ | १.३२ | १,७२० | ८९१ | २,६११ | ११.७१ |
| २०२४-२५ | ५,७८६ | २,४८० | ८,२६६ | १.१९ | १,०३२ | ५,३४४ | १,५६६ | ७.०३ |
| २०२५-२६# | ७,०७३ | ३,०३१ | १०,१०४ | १.४६ | ८५३ | ३६५ | १२१८ | ५.०६ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित

**तक्ता ७.१० नत्र, स्फुरद व पालाश रासायनिक खतांचा विभागवार वापर**

('०० मे. टन)

| विभाग | रासायनिक खते | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०२४-२५ | | | | २०२५-२६# | | | |
| | नत्र | स्फुरद | पालाश | एकूण | नत्र | स्फुरद | पालाश | एकूण |
| कोकण | २९९ | ५४ | ४३ | ३९७ | ३०१ | ५५ | ५७ | ४१३ |
| नाशिक | ४,३२२ | २,३७१ | १,४३१ | ८,१२४ | ४,६५८ | २,५९५ | १,८८१ | ९,१३४ |
| पुणे | ३,९२३ | १,९१५ | १,११२ | ६,९५० | ४,५३७ | २,४२२ | १,७१६ | ८,६७५ |
| छत्रपती संभाजीनगर | ४,८१७ | ३,१७२ | १,०५२ | ९,०४१ | ४,८४० | ३,५५४ | १,५७८ | ९,९७२ |
| अमरावती | २,२८७ | १,६५७ | ४५८ | ४,४०२ | २,६३८ | २,०४० | ८०८ | ५,४८६ |
| नागपूर | २,३३३ | १,३१५ | १८० | ३,८२७ | २,१२१ | १,३५१ | २८२ | ३,७५४ |
| **महाराष्ट्र** | **१७,९८१** | **१०,४८४** | **४,२७७** | **३२,७४२** | **१९,०९४** | **१२,०१८** | **६,३२२** | **३७,४३५** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित

# सिंचन

७.१२ राज्याच्या जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील लाभक्षेत्रातील सिंचित क्षेत्र सन २०२४-२५ मध्ये ४०.५५ लाख हेक्टर आहे. पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र तक्ता ७.११ मध्ये दिले आहे. लघु सिंचन प्रकल्पांची संख्या (स्थानिक क्षेत्र), निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र तक्ता ७.१२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.११ पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र**

| तपशील | जलसंपदा विभागाचे प्रकल्प | | |
|---|---|---|---|
| | मोठे व मध्यम | लघु | एकूण |
| दि. ३० जून २०२४ रोजी पूर्ण व प्रगती पथावरील प्रकल्पांची संख्या | ४०७ | ३,२२९$ | ३,६३६ |
| **सिंचन क्षमता (लाख हेक्टर)** | | | |
| (i) दि. ३० जून २०२४ पर्यंत निर्मित सिंचन क्षमता | ४३.५५ | १३.६२ | ५७.१६ |
| (ii) २०२४-२५ मधील कालवा व नदीद्वारे सिंचित क्षेत्र* | १९.०४ | ७.५७ | २६.६० |
| (iii) २०२४-२५ मधील लाभ क्षेत्रातील विहिरींद्वारे सिंचित क्षेत्र* | ११.७१ | २.२४ | १३.९४ |
| **(iv) २०२४-२५ मधील एकूण सिंचन क्षेत्र (ii+iii)*** | **३०.७५** | **९.८०** | **४०.५५** |

$ प्रकल्प संख्येमध्ये महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळांच्या उपसा सिंचन योजना समाविष्ट * अस्थायी

*आधार*: जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, महाराष्ट्र शासन, छत्रपती संभाजीनगर

**तक्ता ७.१२ लघु सिंचन प्रकल्पांची (स्थानिक क्षेत्र) संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र**

| तपशील | कोल्हापूर बंधारे | उपसा जलसिंचन योजना | इतर महत्वाचे प्रकार | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | लघु पाटबंधारे | पाझर तलाव | इतर$ | |
| दि. ३० जून २०२५ रोजी प्रकल्पांची संख्या | | | | | | |
| अ) पूर्ण | १५,०९८ | २,९११ | ३,११६ | २४,३०२ | ७६,०१८ | १,२१,४४५ |
| ब) प्रगतीपथावरील | २,१२२ | १०८ | ७०१ | ९७४ | ५,०४७ | ८,९५२ |
| **सिंचन क्षमता (लाख हेक्टर)** | | | | | | |
| (i) जून २०२४ पर्यंत निर्मित | ४.०९ | ०.४३ | ३.२० | ७.०३ | ६.३१ | २१.०६ |
| (ii) जून २०२५ पर्यंत निर्मित | ४.२२ | ०.४३ | ३.२८ | ७.०३ | ६.७४ | २१.७० |
| (iii) २०२४-२५ मध्ये वापरलेली | १.४३ | ०.१५ | १.१२ | ३.५२ | ३.१६ | ९.३८ |

$ वळण बंधारा, साठवण बंधारा, माजी माल गुजारी तलाव, गाव तलाव, सिमेंट नाला बंधारे, इत्यादी समाविष्ट

टीप : प्रत्यक्ष वापरात आलेली सिंचन क्षमता निर्मित सिंचन क्षमतेच्या ३५ टक्के आणि अप्रत्यक्ष सिंचन योजनांसाठी ५० टक्के गृहीत धरण्यात आली आहे.

*आधार*: अपर आयुक्त जलसंधारण यांचे कार्यालय, पुणे, महाराष्ट्र शासन

७.१२.१ **जलाशयांतील साठा:** मोठ्या, मध्यम आणि लघु पाटबंधारे (राज्यक्षेत्र) जलाशयांमध्ये दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी एकूण उपयुक्त जलसाठा ३७,५९७ दशलक्ष घनमीटर होता व तो प्रकल्प आराखड्यानुसार जलसाठा क्षमतेच्या सुमारे ८८.५ टक्के होता. उपयुक्त जलसाठा, सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र तक्ता ७.१३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१३ उपयुक्त जलसाठा, सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र**

| वर्ष | प्रकल्प आराखड्यानुसार जलसाठा क्षमता (दलघमी) | १५ ऑक्टोबर रोजी उपयुक्त जलसाठा (दलघमी) | उपयुक्त जलसाठ्याची टक्केवारी | निर्मित सिंचन क्षमता (३० जून अखेर) (लाख हेक्टर) | प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र (१ जुलै ते ३० जून) (लाख हेक्टर) | प्रत्यक्ष सिंचित क्षेत्राची निर्मित सिंचन क्षमतेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २०२२-२३ | ४३,४७७ | ३४,४७९ | ७९.३ | ५५.६० | ४२.३३ | ७६.१ |
| २०२३-२४ | ४३,७४२ | ३२,५९६ | ७४.५ | ५६.३३ | ३९.२७ | ६९.७ |
| २०२४-२५* | ४२,४७६ | ३७,५९७ | ८८.५ | ५७.१६ | ४०.५५ | ७०.९ |

दलघमी : दशलक्ष घनमीटर *अस्थायी

*आधार*: जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य लेखापरिक्षक, जल व सिंचन, महाराष्ट्र शासन , छत्रपती संभाजीनगर

७.१२.२ **पाणी वापर संस्था:** शेतकऱ्यांद्वारे सिंचन प्रणालीचे व्यवस्थापन करणे या उद्देशाने राज्यात जलसंपदा विभागाअंतर्गत ५६.६६ लाख हेक्टर लागवडीयोग्य लाभक्षेत्रासाठी एकूण १२,७३१ पाणी वापर संस्था माहे डिसेंबर २०२५ अखेर स्थापन झाल्या आहेत. त्या क्षेत्रापैकी सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर ९.१८ लाख हेक्टर क्षेत्रासाठी २,२३२ पाणी वापर संस्थांची 'महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा, २००५' अंतर्गत व ०.९७ लाख हेक्टर क्षेत्रासाठी २८४ पाणी वापर संस्थांची 'महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६०' अंतर्गत नोंदणी झाली आहे. सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी परिशिष्ट ७.५ मध्ये दिली आहे.

## कृषि पंपांचे विद्युतीकरण

७.१३.१ राज्यात माहे मार्च २०२५ पर्यंत एकूण ५१.२६ लाख कृषि पंपांचे विद्युतीकरण करण्यात आले व सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर २,७४,६१४ कृषि पंपांचे विद्युतीकरण करण्यात आले.

७.१३.२ **सौर कृषि पंप**: केंद्र आणि राज्य शासनाच्या सौर कृषि पंप योजनेअंतर्गत राज्यात डिसेंबर २०२५ पर्यंत ७,३७,०९२ सौर कृषि पंप बसविण्यात आले. योजनानिहाय बसविण्यात आलेले सौर कृषि पंपांचा तपशिल तक्ता ७.१४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१४ योजनानिहाय बसविण्यात आलेले सौर कृषि पंपांचा तपशिल**

| योजनेचे नांव | बसविण्यात आलेले सौर कृषि पंप+ |
|---|---|
| अटल सौर कृषि पंप योजना | १२,६६२ |
| मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजना | १,००,००० |
| पीएम कुसुम घटक ब योजना | ४,६४,९९२ |
| मागेल त्याला सौर कृषि पंप योजना (AIIB बँक लोन कॉम्पोनंट) | १,५९,४३८ |

*आधार*: उर्जा विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर २०२५ पर्यंत

# कृषि वित्त पुरवठा

७.१४ शेतकऱ्यांना शासनाकडून विविध बँका तसेच सहकारी संस्थांमार्फत अल्प मुदतीचे कर्ज, पतपुरवठा, इत्यादींद्वारे आर्थिक सहाय्य पुरविले जाते. राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ही संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि अनुसूचित वाणिज्यिक बँका यांच्यामार्फत अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज पुरविते. सन २०२५-२६ करीता राज्याचा प्राधान्य क्षेत्रासाठी वार्षिक कर्ज आराखडा ₹ ८.०६ लाख कोटी आहे. यामध्ये कृषि आणि संलग्न कार्ये क्षेत्राचा प्राधान्य क्षेत्रामधील हिस्सा २५.८६ टक्के आहे. अनुसूचित वाणिज्यिक बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका यांनी दिलेल्या कर्जाचा तपशील तक्ता ७.१५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१५ अनुसूचित वाणिज्यिक बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्त सहकारी बँका व प्रादेशिक ग्रामीण बँका यांनी दिलेली कर्जे**

(₹ कोटी)

| कर्जाचा प्रकार | अनुसूचित वाणिज्यिक बँका | | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | | प्रादेशिक ग्रामीण बँका | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| पीक कर्ज | ४१,५०३ | २१,७०१ | २३,८८५ | १९,०४२ | ३,८०२ | ३,१५१ | ६९,१९० | ४३,८९४ |
| कृषि मुदत कर्ज | १,०५,९०३ | ६७,४८८ | १,१६८ | ६१७ | ९३९ | २०९ | १,०८,०१० | ६८,३१४ |
| **एकूण** | **१,४७,४०६** | **८९,१८९** | **२५,०५३** | **१९,६५९** | **४,७४१** | **३,३६०** | **१,७७,२००** | **१,१२,२०८** |

टीप – आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही + सप्टेंबर पर्यंत

*आधार* : राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य

७.१४.१ राज्यात निम्न स्तरावर कृषि वित्त पुरवठा करण्याशी थेट संबंधित असणाऱ्या प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था शेतकरी सभासदांना अल्प मुदतीची पीक कर्जे उपलब्ध करून देतात. सन २०२४-२५ मध्ये, प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थाद्वारे ३०.०७ लाख सभासद शेतकऱ्यांना ₹ २३,४०७ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले. सन २०२५-२६ साठी पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट ₹ २५,८०२ कोटी निश्चित करण्यात आले असून त्यापैकी प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांमार्फत माहे सप्टेंबर २०२५ अखेर खरीप हंगामात २३.६३ लाख सभासद शेतकऱ्यांना ₹ १८,९६५ कोटी व रब्बी हंगामात माहे नोव्हेंबर २०२५ अखेर ०.९२ लाख सभासद शेतकऱ्यांना ₹ ७९७ कोटींचे पीक कर्ज वाटप केले आहे.

७.१४.२ **किसान क्रेडिट कार्ड योजना**: राज्यात सन २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने ३०.११ लाख किसान क्रेडिट कार्डांचे वाटप केले. सन २०२४-२५ मध्ये कार्डधारकांना मंजूर केलेल्या कर्जाची रक्कम ₹ २५,५८४ कोटी होती तर सन २०२५-२६ मध्ये नोव्हेंबर पर्यंत ₹ २२,६०३ कोटी होती. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने शेतकऱ्यांना वितरीत केलेल्या किसान क्रेडिट कार्ड संलग्न कृषि कर्जाचा तपशिल तक्ता ७.१६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१६ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकांनी शेतकऱ्यांना दिलेली किसान क्रेडिट कार्ड संलग्न कृषि कर्जे**

| वर्ष | लघु मुदतीची कर्जे | | दीर्घ मुदतीची कर्जे | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शेतकऱ्यांची संख्या ('०००) | रक्कम (₹ कोटी) | शेतकऱ्यांची संख्या ('०००) | रक्कम (₹ कोटी) | शेतकऱ्यांची संख्या ('०००) | रक्कम (₹ कोटी) |
| २०२३-२४ | ३,१२० | २३,४६५ | १४ | २७३ | ३,१३४ | २३,७३८ |
| २०२४-२५ | २,९६८ | २४,५७० | ४३ | १,०१४ | ३,०११ | २५,५८४ |
| २०२५-२६+ | २,६३८ | २२,०६४ | २८ | ५३९ | २,६६६ | २२,६०३ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित + नोव्हेंबर पर्यंत

# पीक विमा आणि आर्थिक सहाय्य

७.१५.१ **प्रधानमंत्री पीक विमा योजना:** नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी ही योजना राज्यात सन २०१६ पासून राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा तपशील तक्ता ७.१७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१७ प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा तपशील**

| वर्ष | सहभागी झालेल्या शेतकऱ्यांची संख्या (लाख) | क्षेत्रफळ (लाख हेक्टर) | विम्याची रक्कम (₹ कोटी) | विमा हप्ता (₹ कोटी) | नुकसान भरपाईसाठी प्रस्तावित शेतकऱ्यांची संख्या (लाख) | नुकसान भरपाई दिलेल्या शेतकऱ्यांची संख्या (लाख) | प्रस्तावित भरपाई (₹ कोटी) | प्रत्यक्ष भरपाई (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०२३-२४ | २४२.५४ | १६३.२५ | ७४,९८६.०३ | १०,१४१.१२ | १३२.१७ | १२९.२२ | ८,५६७.२४ | ८२५८.१* |
| २०२४-२५ | २२३.०८ | १५२.५९ | ७१,९३६.१५ | ९,७४७.५४ | ९८.५४ | ९२.६९ | ४९०८.२२ | ४७५८.६* |
| २०२५-२६+ | १०८.३१ | ६९.८२ | ३६,२३०.६६ | २,४५४.२५ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |

* अस्थायी उ.ना. उपलब्ध नाही + डिसेंबर पर्यंत

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.१५.२ **हवामानावर आधारीत फळपीक विमा योजना:** राज्यात (हवामानावर आधारीत फळपीक विमा योजना) द्राक्षे, आंबा, डाळिंब, केळी, संत्री, मोसंबी, पेरू, चिक्कू, लिंबू, काजू, सीताफळ आणि स्ट्रॉबेरी या फळ पिकांसाठी राबविण्यात येत आहे. हवामानावर आधारीत फळपीक विमा योजनेचा तपशील तक्ता ७.१८ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१८ हवामानावर आधारीत फळपीक विमा योजनेचा तपशील**

| वर्ष | सहभागी झालेल्या शेतकऱ्यांची संख्या (लाख) | क्षेत्रफळ (लाख हेक्टर) | विम्याची रक्कम (₹ कोटी) | विमा हप्ता (₹ कोटी) | नुकसान भरपाईसाठी प्रस्तावित शेतकऱ्यांची संख्य (लाख) | प्रस्तावित भरपाई (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|
| २०२१-२२ | २.८५ | २.०९ | २,५७९.२४ | ७३०.५५ | २.३३ | ९४०.३० |
| २०२२-२३ | ३.३८ | २.४७ | ३,१०९.३९ | ९४९.३६ | २.२९ | १,१४१.६८ |
| २०२३-२४ | २.९७ | २.१८ | २,७२६.८७ | ८९१.३५ | २.५० | १,०३९.५५ |
| २०२४-२५+ | २.३४ | १.७१ | २,६६४.६२ | ७६९.९३ | ०.२० | ५८.९८ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

७.१५.३ शासनाकडून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. शेतकऱ्यांसाठी विविध आर्थिक सहाय्य योजनांचा तपशील तक्ता ७.१९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१९ विविध अर्थ सहाय्य योजनांचा तपशील**

| अ.क्र. | योजनेचे नाव | तपशील | वर्ष | लाभार्थी शेतकरी (संख्या) | झालेला खर्च (₹ कोटी)) |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना | जमिनीची उत्पादकता वाढविण्याच्या उद्देशाने ०.०४ हेक्टर ते ६.०० हेक्टर पर्यंत क्षेत्र असलेल्या अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना नवीन विहीर, जुन्या विहिरींची दुरुस्ती, शेतीची उपकरणे इत्यादी सुविधांसाठी १०० टक्के अनुदानाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य | २०२४-२५<br>२०२५-२६, ऑक्टोबर पर्यंत | ६,८९०<br>४,४९५ | ९७.७९<br>१.०० |
| २ | बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना | जमिनीची उत्पादकता वाढविण्याच्या उद्देशाने ०.०४ हेक्टर ते ६.०० हेक्टर पर्यंत क्षेत्र असलेल्या अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना नवीन विहीर, जुन्या विहिरींची दुरुस्ती, शेतीची उपकरणे इत्यादी सुविधांसाठी १०० टक्के अनुदानाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य | २०२४-२५<br>२०२५-२६, ऑक्टोबर पर्यंत | २,९५२<br>२,८७९ | ६५.४६<br>०.३० |

**तक्ता ७.१९ विविध अर्थ सहाय्य योजनांचा तपशील**

| अ.क्र. | योजनेचे नाव | तपशील | वर्ष | लाभार्थी शेतकरी (संख्या) | झालेला खर्च (₹ कोटी)) |
|---|---|---|---|---|---|
| ३ | डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना | अल्प मुदतीच्या तीन लाखा पर्यंतच्या पीक कर्जाची दरवर्षी दि. ३० जूनपर्यंत नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी तीन टक्के व्याज सवलत योजना | २०२३-२४ | १२.१० (लाख) | ३६८ |
| ४ | प्रधानमंत्री किसान सन्मान निधी | अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांच्या उत्पन्नास जोड देण्यासाठी पात्र शेतकरी कुटुंबांना तीन समान हप्त्यात प्रति वर्ष ₹ ६,००० अनुदान | योजनेच्या सुरवातीपासून माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत | ११९.४१ (लाख) | ३७,५०१.९० |
| ५ | नमो शेतकरी महासन्मान निधी योजना | प्रधानमंत्री किसान योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या आर्थिक सहाय्याव्यतिरिक्त पात्र शेतकरी कुटुंबांना तीन समान हप्त्यात प्रति वर्ष ₹ ६,००० अनुदान | योजनेच्या सुरवातीपासून माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत | ९३.०३ (लाख) | १३,०२३.०६ |
| ६ | प्रधानमंत्री किसान मानधन योजना | अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना वृद्धापकाळात संरक्षण व सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या उद्देशाने ऐच्छिक व अंशदान आधारित दरमहा ₹ ३,००० निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येत आहे. दि. १ ऑगस्ट २०१९ रोजी १८ ते ४० वर्षे वयोगटातील शेतकरी या योजनेत सहभागी होण्यास पात्र असून वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत त्यांना दरमहा ₹ ५५ ते ₹ २०० इतकी रक्कम निवृत्तीवेतन फंडामध्ये जमा करावयाची आहे. शेतकऱ्यांच्या योगदानाएवढी रक्कम भारत सरकार निवृत्तीवेतन फंडात जमा करते | माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत | ८०,७१० | -- |

## कृषि पणन

७.१६ 'महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३' अंतर्गत कृषि उत्पन्न बाजार समित्या राज्यात स्थापन करण्यात आल्या आहेत. राज्यात ३०४ कृषि उत्पन्न बाजार समित्या व ६२६ उपबाजार समित्या कार्यरत आहेत. माहे नोव्हेंबर २०२५ पर्यंत एकूण १,८७३ थेट पणन परवाने दिले आहेत. याशिवाय १०९ खाजगी बाजारांना परवाने देण्यात आले आहेत. राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य तक्ता ७.२० मध्ये दिले आहे परवाने दिले आहेत.

७.१६.१ **किमान आधारभूत किंमत योजना:** शेतमालाला हमी आणि शेतकऱ्यांना खात्रीशीर बाजार उपलब्ध करुन देणे व त्यांना किंमतीतील चढउतारामुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देऊन शेतीव्यवसाय आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य करणे यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून भारत सरकार निवडक पिकांच्या किमान आधारभूत किंमती पेरणी हंगामापूर्वी जाहीर करते. या योजने अतंर्गत, शेतमालाची खरेदी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, राष्ट्रीय कृषि सहकारी पणन महासंघ व महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ यांचेमार्फत केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या निवडक पिकांच्या किमान आधारभूत किंमती तक्ता ७.२१ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ७.२० राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य**

| वर्ष | राशि (लाख मे. टन) | मूल्य (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०२३-२४ | २४१.०० | ५७,९३७ |
| २०२४-२५ | २२०.४० | ६७,५०४ |
| २०२५-२६+ | १२९.७३ | ४०,४७२ |

*आधार*: महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ + नोव्हेंबर २०२५ पर्यंत

**तक्ता ७.२१ भारत सरकारने जाहीर केलेल्या निवडक पिकांच्या किमान आधारभूत किंमती**

(₹ / क्विंटल)

| पीक | किमान आधारभूत किंमती | | |
|---|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
| भात/धान (साधारण वाजवी प्रत) | २,१८३ | २,३०० | २,३६९ |
| भात/धान (प्रत-अ) | २,२०३ | २,३२० | २,३८९ |
| ज्वारी (संकरित) | ३,१८० | ३,३७१ | ३,६९९ |
| ज्वारी (मालदांडी) | ३,२२५ | ३,४२१ | ३,७४९ |
| गहू | २,१२५ | २,२७५ | २,४२५ |
| मका | २,०९० | २,२२५ | २,४०० |

७.१६.२ **इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नाम):** ई-नाम हे देशभरात लागू असलेले डिजिटल प्लॅटफॉर्म सन २०१६ पासून सुरु करण्यात आले आहे. ई-नाम मार्फत कृषि उत्पन्न बाजार समित्यांशी संबंधित सर्व माहिती व सेवांसाठी एक खिडकी सुविधा उपलब्ध केली असून त्यामध्ये कृषि उत्पादनांच्या आवक व किंमती, खरेदी विक्री देकार, व्यापार संधींना प्रतिसाद देण्याची सुविधा आहे. राज्यातील १३३ कृषि उत्पन्न बाजार समित्या ई-नाम अंतर्गत कार्यरत आहेत. माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत, ₹ २२,६७० कोटी किंमतीच्या सुमारे ६१२ लाख क्विंटल कृषि उत्पादनाचे ई-लिलाव करण्यात आले व ₹ ५२५.१३ कोटी रक्कमेचे ई-भरणा करण्यात आले. कृषि मालाची गुणवत्ता तपासणी व प्रमाणिकरणासाठी १३१ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये गुणवत्ता निर्धारण प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत.

## कृषी क्षेत्रात माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर

७.१७ राज्य शासनाने कृषि क्षेत्रात एक सक्षम डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण केली असून कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व प्रगत डिजीटल तंत्रज्ञान यांचे एकात्मिकरण करून राज्याला अग्रस्थानी नेले आहे. अग्रीस्टॅक, महाअग्रीटेक, महावेध, कृषी विपणन माहिती नेटवर्क, पीक कीड सर्वेक्षण आणि सल्लागार प्रकल्प (CROPSAP), शेतकरी शाळा (FFS) आणि महाडीबीटी (MahaDBT) यांसारख्या प्रमुख उपक्रमांनी विश्वसनीय डेटा संकलन आणि व्यवस्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. काही निवडक डिजिटल प्रणालीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

७.१७.१ **महा कृषी-एआय (Maha Agri-AI) धोरण** : राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून कृषि क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी 'महाराष्ट्र कृषि कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण (महा कृषी-एआय) २०२५-२९' प्रसिद्ध केले आहे.

७.१७.२ **महाॲग्रीटेक प्रकल्प:** महाॲग्रीटेक प्रकल्पाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना अचूक सल्ला देणारी व मार्गदर्शन करणारी एकात्मिक वेब पोर्टल व मोबाईल ॲप्लिकेशन प्रणाली विकसीत करणे हा आहे. या प्रकल्पाअंतर्गत विविध पिकांच्या अचूक मोजणीसाठी सॅटेलाइट इमेजिंग आणि ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर, लागवड केलेल्या पिकांचे आरोग्य सर्वेक्षण, पिकांच्या काढणीपश्चात उत्पन्नाचा अंदाज व विविध संगणकीकृत प्रणालींच्या परस्पर जोडणीद्वारे माहितीचे एकत्रीकरण यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

७.१७.३ **ॲग्रीस्टॅक (AgriStack) योजना** : भारत सरकारने शासकीय सेवा शेतकऱ्यांना सुलभ व प्रभाविपणे उपलब्ध करून देण्यासासाठी 'ॲग्रीस्टॅक' योजना सुरू केली असून या योजनेअंतर्गत माहिती आधारीत निर्णय प्रक्रियेसाठी शेतकरी नोंदणी, पीक पेरणी नोंदणी आणि भौगोलिक संदर्भ असलेले जमिनीचे नकाशे तयार करण्यात येत आहे. राज्यात १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत, १.२५ कोटी शेतकरी आयडी (Farmer ID) तयार करण्यात आले आहेत.

**तक्ता ७.२१ भारत सरकारने जाहीर केलेल्या निवडक पिकांच्या किमान आधारभूत किंमती**

(₹ / क्विंटल)

| पीक | किमान आधारभूत किंमती | | |
|---|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
| बाजरी | २,५०० | २,६२५ | २,७७५ |
| हरभरा | ५,३३५ | ५,४४० | ५,६५० |
| तूर | ७,००० | ७,५५० | ८,००० |
| मूग | ८,५५८ | ८,६८२ | ८,७६८ |
| उडीद | ६,९५० | ७,४०० | ७,८०० |
| मसूर | ६,००० | ६,४२५ | ६,७०० |
| बार्ली | १,७३५ | १,८५० | १,९८० |
| सूर्यफूल | ६,७६० | ७,२८० | ७,७२१ |
| सोयाबीन | ४,६०० | ४,८९२ | ५,३२८ |
| भूईमुगाच्या शेंगा | ६,३७७ | ६,७८३ | ७,२६३ |
| कापूस (मध्यम धागा) | ६,६२० | ७,१२१ | ७,७१० |
| कापूस (लांब धागा) | ७,०२० | ७,५२१ | ८,११० |
| कारळे | ७,७३४ | ८,७१७ | ९,५३७ |
| नाचणी | ३,८४६ | ४,२९० | ४,८८६ |
| तीळ | ८,६३५ | ९,२६७ | ९,८४६ |
| मोहरी | ५,४५० | ५,६५० | ५,९५० |
| करडई | ५,६५० | ५,८०० | ५,९४० |
| ताग | ५,०५० | ५,३३५ | ५,६५० |
| खोबरे (तुकडा) | १०,८६० | ११,१६० | ११,५८२ |
| खोबरे (गोटा) | ११,७५० | १२,००० | १२,१०० |

*आधार* : पणन संचालनालय, महाराष्ट्र शासन

**महा कृषी-एआय धोरणांतर्गत प्रमुख उपक्रम:**

- कृषी एआय नवोन्मेष आणि इनक्युबेशन केंद्र (Agricultural AI Innovation and Incubation Centre) स्थापन करणे
- सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा निर्मिती
- एआय-आधारित 'रिमोट सेन्सिंग' आणि 'जिओस्पेशियल इंटेलिजन्स' इंजिन विकसन व अंमलबजावणी
- उपग्रह तंत्रज्ञान आणि भौगोलिक माहितीच्या आधारे पिकांची स्थिती, जमिनीचा ओलावा आणि इतर भौगोलिक घटकांचे विश्लेषण करणा-या प्रणालीचे विकसन व अंमलबजावणी
- कृषी आणि अन्न उत्पादनांच्या खरेदी-विक्रीसाठी एआय-आधारित प्लॅटफॉर्म विकसित करणे
- जागतिक कृषी एआय परिषद आणि गुंतवणूकदार शिखर परिषदचे आयोजन

**महाविस्तार**

महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला शास्त्रीय आणि रिअल-टाइम (तात्काळ) कृषी सल्ला सेवा मराठी भाषेत उपलब्ध करून देऊन सक्षम करण्यासाठी एआय (AI) ॲप आणि चॅटबॉट विकसित करण्यात आले आहे.

## राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध कृषि विकास योजना

७.१८ **प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना:** प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून, स्थानिक गरजांवर आधारित कृषि आणि संलग्न कार्ये क्षेत्रातील प्रकल्पांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी राज्यांना लवचिकता देऊन शाश्वत कृषी विकासाला चालना देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत प्रकल्पनिहाय काही प्रमुख योजनांची माहिती खाली दिली आहे.

७.१८.१ **प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना-प्रति थेंब अधिक पीक:** पाण्याचा अधिक कार्यक्षम व पुरेपुर वापर करुन व पाण्याच्या प्रत्येक थेंबातून अधिक उत्पादन मिळण्याच्या उद्देशाने ही सूक्ष्म सिंचन योजना राज्यात राबविण्यात येत आहे. सन २०१८-१९ पासून ते ऑक्टोबर २०२५ पर्यंत ९.५७ लाख शेतकऱ्यांचे एकूण ११.३५ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले व याकरिता ₹ ३,१५३.४३ कोटी खर्च झाला.

७.१८.२ **मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना-सूक्ष्म सिंचन:** शेतकऱ्यांना शाश्वत सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना राज्यात सन २०१९-२० पासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे राष्ट्रीय कृषि विकास योजना - प्रति थेंब अधिक पीक योजनेच्या अनुज्ञेय अनुदानाव्यतिरिक्त पूरक अनुदान दिले जाते. योजना सुरू झाल्यापासून माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत ७.९१ लाख शेतकऱ्यांना ₹ १,२१९.५८ कोटीं पूरक अनुदान मिळाले आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना व मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेअंतर्गत वितरीत केलेल्या अनुदानाचा तपशील तक्ता ७.२२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.२२ प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना व मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेअंतर्गत वितरीत केलेले अनुदान**

| वर्ष | तुषार सिंचन संच | | ठिबक सिंचन संच | | अनुदान (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | |
| २०२३-२४ | ९०,८९९ | ७४,५६३.०७ | १,५६,४८५ | १,६४,३१३.१६ | ८८९.२६ |
| २०२४-२५* | ५,०८१ | ४,९९८.१२ | ६,०८३ | ७,०९९.४१ | ४१.२६ |
| २०२५-२६* | ३३ | २८.९८ | ३२ | ३८.७६ | ०.१९ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

७.१८.३ **कृषि यांत्रिकीकरण उपअभियान:** सन २०१४-१५ पासून राज्यात कृषि यांत्रिकीकरण उपअभियान राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना सुधारित कृषि अवजारे खरेदीसाठी अनुदान देणे व कृषि अवजारे बँका स्थापन करणे हे या उपअभियानाचे घटक आहेत. कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाअंतर्गत लाभार्थी संख्या व अनुदानाची माहिती तक्ता ७.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२३ कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाअंतर्गत लाभार्थी संख्या व अनुदान**

| वर्ष | कृषि औजारे | | कृषि औजारे बँका | | एकूण अनुदान (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या | अनुदान (₹ कोटी) | संख्या | अनुदान (₹ कोटी) | |
| २०२३-२४ | २३,२३५ | १६३.४६ | ७९ | ४.३१ | १६७.७७ |
| २०२४-२५ | ७,२३३ | ५४.८३ | २५ | ०.९९ | ५५.८२ |
| २०२५-२६+ | ८,९५३ | ५६.४१ | ३९ | १.७० | ५८.११ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबर पर्यंत

७.१८.४ **कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम:** कोरडवाहू शेतीची जोखीम कमी करण्यासाठी कृषि आधारित उत्पन्न निर्मितीच्या संधी उपलब्ध करणे व उपलब्ध नैसर्गिक संसाधने तसेच विविध उपायांद्वारे निर्माण झालेल्या संसाधनांचा इष्टतम वापर करून कोरडवाहू शेती शाश्वत करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. सन २०२४-२५ मध्ये ६,४१७ लाभार्थ्यांवर ₹ २२.१८ कोटी खर्च झाला असून सन २०२५-२६ मध्ये माहे ऑक्टोबर पर्यंत २,९१९ लाभार्थ्यांसाठी ₹ ८.७६ कोटी खर्च झाला.

७.१८.५ **मृद आरोग्य व्यवस्थापन आणि मृद आरोग्य पत्रिका वितरण:** प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत जमिनीचे आरोग्य जोपासणे व उत्पादकता वाढविणे आणि मृद आरोग्य व्यवस्थापन व मृद आरोग्य पत्रिका वितरण ही दोन उपअभियाने राबविण्यात येत आहेत. मृद व पाण्याचे नमुने तपासण्याकरिता राज्यात ३२ मृद चाचणी प्रयोगशाळा व पाच खत नमुना चाचणी प्रयोगशाळा स्थापित करण्यात आल्या आहेत. मृद आरोग्य स्थितीबाबत जागरुकता निर्माण करणे व मृद आरोग्य सुधारण्यासाठी उपाययोजना सुचवणे या उद्देशाने शेतकऱ्यांना तीन वर्षातून एकदा मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात येते. सन २०२४-२५ मध्ये ४.९५ लाख मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात आले असून सन २०२५-२६ जानेवारी पर्यंत ७.४३ लाख मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात आले.

७.१८.६ **परंपरागत कृषि विकास योजना:** या योजनेची उद्दीष्टे (i) रासायनिक खते, कीटकनाशके इत्यादींचा वापर न करता सेंद्रीय शेतीपद्धत वाढवून जमिनीची सुपीकता व आरोग्य सुधारणे (ii) रासायनमुक्त, सुरक्षित, आरोग्यदायी व पौष्टिक सेंद्रीय उत्पादन करणे, (iii) नैसर्गिक व सेंद्रीय उत्पादन मूल्य साखळी विकसित करणे व (iv) शेतकरी उत्पादक गट आणि शेतकरी कंपनी स्तरावर जैविक निविष्ठा संसाधन केंद्राची स्थापना करणे ही आहेत. या योजनेअंतर्गत एकूण २० हेक्टर क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांचा गट तयार करून त्या गटाला सलग तीन वर्षे लाभ दिला जातो. सन २०२४-२५ मध्ये ₹ २४.९४ कोटी खर्च झाला तर सन २०२५-२६ मध्ये ऑक्टोबर पर्यंत ₹ १५.९८ कोटी खर्च झाला.

७.१८.७ **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना:** सन २०२२-२३ पासून राज्यात प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत ही योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये शेतकऱ्यांना रोगमुक्त दर्जेदार भाजीपाल्याचे उत्पादन व त्यांची निर्यात यासाठी प्रोत्साहीत करण्यात येते. रोपवाटिका स्थापनेसाठी किमान ०.४० हेक्टर जमीन असलेले व पाण्याचा कायमस्वरूपी स्रोत असलेले शेतकरी या योजनेअंतर्गत पात्र आहेत. सन २०२५-२६ ऑक्टोबर पर्यंत ३२ रोपवाटिकांसाठी ₹ ७८.०५ लाख खर्च झाला.

७.१९ **विस्तार सुधारणांसाठी राज्य विस्तार कार्यक्रमांना सहाय्य:** कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था (आत्मा) मार्फत शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञानाचा प्रसार करून विस्तार प्रणाली शेतकरी संचलित व शेतकरी उत्तरदायी करणे हा या योजनेचा उद्देश आहे. प्रशिक्षण, कृषि प्रात्यक्षिके, शेतकऱ्यांचा अभ्यासदौरा, शेतकरी गट निर्मिती व त्यांची क्षमतावृध्दी, शेतीशाळा, किसान गोष्टी, कृषि प्रदर्शने, शेतकरी मेळावा, शेतकरी मित्र, इत्यादी या योजनेचे घटक आहेत. सन २०२४-२५ मध्ये अंदाजित ₹ ५९.२३ कोटी खर्च झाला व सन २०२५-२६ ऑक्टोबर पर्यंत ₹ ३३.०२ कोटी खर्च झाला.

७.२० **राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान आणि राष्ट्रीय तेलबिया अभियान: क्षेत्र** व उत्पादकता वाढवून तसेच सुपीकता व उत्पादकता पुनर्स्थापित करुन तांदूळ, गहू, डाळी, तृणधान्ये, पौष्टिक तृणधान्ये, भरडधान्ये आणि तेलबियांच्या उत्पादनात कायमस्वरुपी वाढ करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान आणि राष्ट्रीय तेलबिया अभियान योजनेअंतर्गत राज्याचा घटकनिहाय खर्च तक्ता ७.२४ मध्ये दिला आहे.

७.२१ **कृषि उन्नती योजना-ग्राम बीजोत्पादन कार्यक्रम:** किफायतशीर किंमतीत दर्जेदार व प्रमाणित बियाणे उपलब्ध करून देणे तसेच उत्पादन वाढविण्याच्या उद्देशाने कृषि उन्नती योजनेअंतर्गत ग्राम बीजोत्पादन कार्यक्रम राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रति शेतकरी एक एकर क्षेत्रापर्यंत प्रमाणित बियाणे पुरविले जातात. या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये ८,४०४.५ मे. टन बियाणे २,११,७९७ शेतक-यांना वितरीत केले असून ₹ ३५.७५ कोटी खर्च झाला तसेच सन २०२४-२५ मध्ये ११,४५८.५ मे.टन बियाणे ३,३९,५५० शेतक-यांना वितरीत केले असून त्याकरिता ₹ ३०.९३ कोटी खर्च झाला आहे.

**तक्ता ७.२४ राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान आणि राष्ट्रीय तेलबिया अभियान योजनेअंतर्गत राज्याचा घटकनिहाय खर्च**

(₹ कोटी)

| घटक | झालेला खर्च | | |
|---|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| भात | ६.०६ | ६.३५ | २.६२ |
| गहू | १.५६ | १.७३ | ०.४८ |
| कडधान्ये | १०७.३० | १०८.२१ | ४१.८९ |
| टिआरएफए कडधान्ये | ११.०९ | १०.५५ | ०.७१ |
| भरड तृणधान्ये (मका) | ३.७६ | ८.४२ | २.५२ |
| पोषक तृणधान्ये | १०६.०३ | १०९.७५ | २४.०६ |
| नगदी पिके (ऊस व कापूस) | ७.३८ | ६.८७ | १.११ |
| तेलबिया व तेलताड | ६३.०० | १००.५० | ६२.७८ |
| **एकूण** | **३०६.१८** | **३५२.३८** | **१३६.१७** |

टिआरएफए - टारगेटींग राईस फॅलो एरिया + ऑक्टोबर पर्यंत

*आधार*: कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.२२ **पीक कीटक सर्वेक्षण सल्लागार प्रकल्प (क्रॉपसॅप):** या प्रकल्पाचा उद्देश (i) प्रशिक्षण व भेटीद्वारे कीड व रोग व्यवस्थापनाविषयी शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे व माहिती देणे, (ii) कीड व रोगाचा प्रादुर्भाव होण्यापूर्वी उपाययोजना करणे शक्य व्हावे म्हणून पूर्वसूचना देणे व (iii) मोफत एसएमएसद्वारे माहिती व शास्त्रशुध्द सल्ला देणे हा आहे. सन २०२४-२५ मध्ये ₹ १४.७८ कोटी खर्च झाला तर सन २०२५-२६ मध्ये ऑक्टोबर पर्यंत ₹ ३.०७ कोटी खर्च झाला.

७.२३ **राष्ट्रीय फलोत्पादन अभियान:** फलोत्पादनाखालील क्षेत्र व उत्पादकता वाढवणे आणि त्याचे काढणी पश्चात व्यवस्थापन या मुख्य उद्देशाने केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान सन २००५-०६ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. सन २०१५-१६ पासून राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान राबविण्यात येत आहे. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत भौतिक व आर्थिक प्रगती तक्ता ७.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२५ राज्यातील एकात्मिक फलोत्पादन विकास अभियाना अंतर्गत भौतिक व आर्थिक प्रगती**

(सुरवातीपासून ऑक्टोबर २०२५ पर्यंत)

| घटक | परिमाण | भौतिक प्रगती | आर्थिक प्रगती (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| गुणवत्तापूर्ण लागवड सामग्री व बियाणे निर्मितीकरिता उच्च तंत्रज्ञान आधारीत रोपवाटिका व उती संवर्धन प्रयोगशाळा उभारणी | संख्या | १,९८७ | ४०.५३ |
| आंबा, पेरू, संत्री इ. सघन लागवड तसेच द्राक्षे, केळी, पपई, मसाला पिके, व फूल पिके इ. लागवडीचे क्षेत्र विस्तार | हेक्टर | ३,११,०८३.९५ | ४८९.७०१ |
| आळंबी प्रकल्पांची स्थापना | संख्या | ४१ | ३.४६ |
| जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन | हेक्टर | ४९,५१४.०६ | ५४.१० |
| सामूहिक शेततळे उभारणे व शेततळ्यांचे अस्तरीकरण | संख्या | २८,६८० | ५६०.९२ |
| संरक्षित शेती अंतर्गत हरितगृह, शेडनेट हाउस, प्लास्टिक मल्चिंग, पक्षी/ किटक प्रतिरोधक जाळे इ. ची उभारणी | संख्या | ९,७४३ | ४९१.३४ |
| काढणी पश्चात व्यवस्थापनास चालना देण्यासाठी अंतर्गत पॅकहाउस, पिकवणी कक्ष, कांदा साठवण चाळ,शितसाठवणूक गृहे,पूर्वशीतिकरण गृहे इत्यादिची उभारणी | हेक्टर | २१,३५०.६५ | |
| एकात्मिक कीड / अन्नद्रव्ये व्यवस्थापनास प्रोत्साहन | संख्या | २०,७०९ | ३९०.४९ |
| | हेक्टर | ४४,४५३ | २१.८७ |
| सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन | हेक्टर | १५,५२९ | २१.२५ |
| मधुमक्षिका पालनास प्रोत्साहन | संख्या | १०,९८३ | १.४२ |
| फलोत्पादन यांत्रिकीकरणास प्रोत्साहन | संख्या | ३४,७२१ | १६१.९९ |
| मनुष्यबळ विकास अंतर्गत शेतक-यांचे प्रशिक्षण/ अभ्यासदौरे | संख्या | ३,०८,१७९ | ४३.४८ |
| इंडो-इस्त्राईल / इंडो-डच प्रकल्प | संख्या | ६ | ४५.३९ |
| नाविन्यपूर्ण घटक | संख्या | १०,५६१ | २०.२० |
| इतर | - | - | १५५.३८ |
| अभियान व्यवस्थापन (प्रशासकीय खर्च) | - | - | १०३.७२ |
| **सर्व घटक** | | | **२,६०५.२४** |

टीप : आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.२४ **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड योजना:** ही योजना सन २०११-१२ पासून राज्यातील ३४ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जॉब कार्ड धारक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे व त्यांच्या स्वत:च्या लागवडीयोग्य किंवा पडीक शेतजमिनीत दोन हेक्टरपर्यंत फळबाग लागवड करून रोजगार निर्मिती करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. सन २०२४-२५ मध्ये ४५,९५५.७६ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली. तर सन २०२५-२६ मध्ये ऑक्टोबर पर्यंत २९,०४५.५८ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली.

७.२५ **भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना:** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत नोंदणी नसलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. ही योजना सन २०१८-१९ पासून राज्यात राबविण्यात येत असून १०० टक्के अनुदान देण्यात येते. योजनेच्या सुरूवातीपासून माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत ६८,७१२ लाभार्थी शेतकऱ्यांनी ५९,८४४ हेक्टरवर फळपिकांची लागवड केली असून त्यावर **₹** ३८१.३९ कोटी खर्च झाला.

७.२६ **फळे, भाजीपाला आणि फुलांची निर्यात:** द्राक्षे, केळी, डाळिंब, संत्री व आंबा ही राज्यातून निर्यात होणारी प्रमुख फळे आहेत. फळे, भाजीपाला व फुले यांची निर्यात आणि निर्यातीचे मूल्य तक्ता ७.२६ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.२६ फळे, भाजीपाला व फुले यांची निर्यात आणि निर्यातीचे मूल्य**

| उत्पादन | निर्यात | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | राशि (मे. टन) | मूल्य (₹ कोटी) | राशि (मे. टन) | मूल्य (₹ कोटी) | राशि (मे. टन) | मूल्य (₹ कोटी) |
| द्राक्षे | महाराष्ट्र | ३,२४,६४१ | ३,३९५ | २,५६,९९७.२९ | २,९८९.९१ | ५२,५४४.७७ | ५६५.३३ |
| | भारत | ३,४३,९८२ | ३,४६१ | २,७१,२५३.६१ | ३,०४९.९९ | ५९,५५५.१८ | ५९५.८९ |
| केळी | महाराष्ट्र | ४,८९,४३१ | १,५३२ | ७,१९,१४३.६४ | २,८९२.०२ | ३,१७,३९०.७१ | १,२९०.७१ |
| | भारत | ५,९६,३५८ | २,०७० | ८,२७,७०१.८५ | ३,२०३.७९ | ३,७४,४५२.२६ | १,४९६.९९ |
| डाळिंब | महाराष्ट्र | ५६,४०७ | २,४११ | ५५,३१९.८४ | ४८५.०९ | २२,१३७.३४ | २०९.२० |
| | भारत | ७२,०११ | ४०६ | ७२,०१७ | ७१८.२५ | ३०,८४३.७० | ३३४.३९ |
| संत्री | महाराष्ट्र | ५७,४९३ | १३७ | ९२,६५१.५८ | ५९४.७० | ७,८१२.४२ | १२२.८० |
| | भारत | ६९,८६२ | १६९ | १,२२,७०२.४० | ८७०.६२ | ३२,०३०.४५ | ३३९.७४ |
| आंबा | महाराष्ट्र | २५,२०३ | ४१५ | २१,८७६.७१ | ३६५.८३ | २०,१७३.५७ | ३३८.९१ |
| | भारत | ३२,१०४ | ४९५ | २९,९३८ | ४७३.८१ | ३०,१८७.७५ | ४३६.३९ |
| कांदा | महाराष्ट्र | १४,८६,२४१ | ३,२६१ | ९,८२,३१३.०० | ३,१७८.७ | ४,५४,३५८.८७ | १,०३१.४६ |
| | भारत | १७,१७,४३९ | ३,९२३ | ११,४७,७१९.६५ | ३,८३२.१६ | ६,०१,१८४.२४ | १,३४३.३८ |
| इतर भाजीपाला (कांदा वगळता) | महाराष्ट्र | १,२०,८४८ | ८४१ | ९७,३६८.७८ | ७९७.९० | ३९,३४७ | ३१३.६२ |
| | भारत | ९,१८,१०८ | २,९३८ | ९,१२,३८० | ३,०८४ | ३,२७,९६५ | १२७० |
| गुलाबाची फुले | महाराष्ट्र | ३८६ | २७ | ४५१.५९ | २९.०६ | १०७.१७ | ५.२३ |
| | भारत | १,१६० | ५४ | १,२३०.१२ | ५३.६३ | ३७२.३१ | ११.४५ |
| गुलाबाची रोपे | महाराष्ट्र | २३ | २.१ | ३१.०० | २.२७ | १८.३२ | १.२६ |
| | भारत | ८३ | ३.४ | ५६६.३८ | ४.६५ | २३७.०२ | १.९४ |
| मनुके | महाराष्ट्र | ४५,४३६ | ४८२ | ४५,३८२.०६ | ५८४.२९ | ५,१२९.७८ | ८१.२० |
| | भारत | ४७,७५१ | ५१२ | ४६,७३८.६१ | ६०७.८१ | ५,४०७.१६ | ८६.५२ |
| आंब्याचा गर | महाराष्ट्र | २१,६२१ | २१३ | २१,३५८.६५ | २०९.३६ | ४,०१३.१९ | ५२.१० |
| | भारत | ६०,९०० | ६२४ | ६३,२५२.७४ | ६८१.०५ | २६,४५५ | २६८.४६ |
| इतर प्रक्रिया केलेली फळे व भाजीपाला$ | महाराष्ट्र | १,३२,८८४ | १,६२५ | १,१६,९६८.८३ | १,५४०.८२ | ४८,२२५ | ६१८.१३ |
| | भारत | ४,८९,२१६ | ५,६५९ | ६,१४,९५९ | ७,५९१.६ | ३,१२,८३९ | ३,६८९.५० |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन $ आंब्याचा गर वगळता + ऑक्टोबर पर्यंत

७.२६.१ **शीतगृहे:** खाजगी क्षेत्रात शीतगृहांच्या उभारणीसाठी अनुदान दिले जाते. राज्यात माहे ऑक्टोबर २०२५ अखेर ४.२३ लाख मे. टन फळ साठवणूक क्षमता असलेली १८८ खाजगी शीतगृहे आहेत.

७.२७ **पाणलोट विकास कार्यक्रम:** नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करून कृषि उत्पादकता वाढवणे हा पाणलोट विकास कार्यक्रमाचा उद्देश आहे. राज्यातील बहुतांश क्षेत्र पावसावर अवलंबून असल्याने कोरडवाहू जमिनीची उत्पादकता वाढविणे, मातीची धूप थांबविणे, जमिनीतील ओलाव्याचे संवर्धन करणे व पाण्याचे संवर्धन करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. पुर्ण झालेली व प्रगतीपथावरील सूक्ष्म पाणलोट कामांचा तपशील तक्ता ७.२७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.२७ पूर्ण झालेली व प्रगतीपथावरील सूक्ष्म पाणलोटांची कामे**

(मार्च २०२५ पर्यंत)

| योजना | सूक्ष्म पाणलोट कामांची संख्या | | योजनेच्या सुरवातीपासून झालेला खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| | निवडलेले | पूर्ण | |
| १. विदर्भ पाणलोट विकास अभियान | १,०३२ | १,०३२ | ३६५.३६ |
| २. मराठवाडा पाणलोट विकास अभियान | २८५ | २८५ | १३७.३४ |
| ३. नदी खोरे प्रकल्प | २७१ | २२६ | ५८०.८० |
| ४. पश्चिम घाट विकास कार्यक्रम | १६० | १६० | १३७.१९ |
| ५. राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम | १,०२८ | ९५६ | २९०.५९ |
| ६. गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम | १२,५८३ | १२,०७३ | ३,२८०.०० |
| ७. नाबार्ड सहाय्यित ग्रामीण पायाभूत सुविधा विकास कार्यक्रम | ३६४ | ३६४ | ८६.८७ |
| ८. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम | १५,६१२ | १४,९३५ | ३,११६.०० |
| ९. जलयुक्त शिवार अभियान | २२,५८६ | २२,५८१ | ९,७३१.३२ |
| १०. विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम | ५८८ | ५८८ | ३१८.३६ |
| ११. इतर योजना (डीपीएपी, हरियाली, जवाहर, आश्वासित, इत्यादी) | ५,६८० | ५,६८० | - |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.२७.१ **जलयुक्त शिवार अभियान २.०:** राज्यात माहे जानेवारी २०२३ पासून जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्यात येत आहे. या अभियानात (i) निवडलेल्या गावांमध्ये मृद व जलसंधारणाची कामे करणे (ii) निवडक गावांमध्ये पाणलोट विकासाची कामे करणे (iii) जलसाक्षरता आणि (iv) पाणलोट क्षेत्राचा शाश्वत विकास या बाबींचा समावेश आहे. योजनेच्या सुरवातीपासून डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण १,०८,८११ कामे पूर्ण झाली असून त्यावर ₹ १,८०७.२५ कोटी खर्च झाला.

७.२७.२ **मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना- वैयक्तिक शेततळे:** नद्या, नाले, तलाव, विहिरी, बोअर इत्यादी जलस्त्रोतांमधून पाणी उपसण्यासाठी व शेतकऱ्यांच्या शेततळ्यांमध्ये साठवण्यासाठी पायाभूत सुविधांच्या निर्मितीला प्रोत्साहन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत, वैयक्तिक लाभार्थ्यांना शेततळ्याच्या आकारानुसार किमान ₹ १४,४३३ व कमाल ₹ ७५,००० रकमेचे अनुदान दिले जाते. सन २०२३-२४ मध्ये १५,४०६ लाभार्थ्यांना ₹ १०५.३८ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले. तर सन २०२४-२५ ऑक्टोबर पर्यंत ४,०७८ लाभार्थ्यांना ₹ २९.०९ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले.

७.२८ **डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान:** सेंद्रिय शेती/विषमुक्त शेतीला चालना देण्याच्या उद्देशाने ही समूह आधारीत योजना राज्यात सन २०१९-२० पासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या गटांना सलग तीन वर्षे लाभ दिला जातो. सन २०२४-२५ मध्ये ४,७२७ नवीन गट तयार करण्यात आले असून त्यासाठी ₹ ५२.७३ कोटी खर्च झाला.

७.२९ **राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान:** नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही गट-आधारित योजना राज्यात २०२५-२६ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. (१) निसर्गावर आधारित शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे, (२) शेतावरच तयार केलेल्या नैसर्गिक निविष्ठांचा वापर करणे, (३) जमिनीचे आरोग्य सुधारणे आणि (४) शेतकरी ते शेतकरी विस्तार धोरणांचा अवलंब करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. सन २०२५-२६ मध्ये ऑक्टोबर पर्यंत, एकूण १,७०९ गट निवडण्यात आले आहेत. यामध्ये २,१३,६२५ शेतकऱ्यांचा समावेश असून ८५,४५० हेक्टर क्षेत्र योजनेखाली आणले आहे व ₹ ४६.१५ कोटी रुपये खर्च झाला आहे.

७.३० **मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प:** राज्यात स्मार्ट प्रकल्प दि. २३ मार्च २०२० पासून राबविण्यात येत आहे. प्रकल्पाचे उद्दिष्ट महाराष्ट्रातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी केंद्रित सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक कृषि मूल्य साखळींच्या विकासास पाठबळ देणे आहे. या प्रकल्पाच्या सुरवातीपासून ऑक्टोबर २०२५ पर्यंत ₹ ८९३ कोटी खर्च झाला असून हा प्रकल्प ३४ जिल्ह्यांतील १४,११५ गावांतील सुमारे ७.५० लाख शेतक-यांना ७१९ समुदाय आधारित संस्थांमार्फत लाभ मिळाला.

७.३१ **नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (हवामान प्रतिरोधक शेती प्रकल्प-पोक्रा):** राज्यातील निवडक १६ जिल्ह्यांमध्ये हवामान प्रतिरोधक शेती आणि अल्प भूधारक शेतक-यांचा नफा वाढविण्यासाठी राज्य शासनाकडून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. हा प्रकल्प राज्यातील ५,२२० गावांमध्ये राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत शेतकऱ्यांना वैयक्तिक सहाय्य व शेतकरी उत्पादक संस्था/शेतकरी गट/स्वयंसहायता गट यांना आर्थिक सहाय्य, तसेच मृद आणि जलसंधारणाची कामे, शेत शाळा, क्षमता वर्धन, कृषि-हवामान सल्लागार सेवा इत्यादींसाठी अर्थसहाय्य पुरविण्यात आले. प्रकल्पाच्या सुरूवातीपासून मार्च २०२५ पर्यंत ₹ ५,०४०.६२ कोटी खर्च झाला. प्रकल्पांतर्गत ४.९२ लाख शेतकऱ्यांना ₹ ४,०३९.४३ कोटी अनुदान वितरित करण्यात आले.

७.३२ **दहा हजार शेतकरी उत्पादक संस्थांची निर्मिती व प्रोत्साहन:** भारत सरकार ही योजना सन २०२०-२१ पासून राबवित आहे. या योजनेची उद्दिष्टे (i) शाश्वत उत्पन्नाभिमुख शेतीच्या विकासास चालना देण्यासाठी सर्वसमावेशक पध्दतीला प्रोत्साहन देणे, (ii) संसाधनांच्या कार्यक्षम, किफायतशीर आणि शाश्वत वापराद्वारे उत्पादकता वाढवणे, (iii) नवीन शेतकरी उत्पादक संस्थांना कृषि उपक्रम व्यवस्थापनाच्या सर्व बाबींमध्ये पाच वर्षांपर्यंत सहाय्य आणि (iv) आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य आणि आत्मनिर्भर होण्यासाठी कृषि शेतकरी उत्पादक संस्थांची उद्योजकता कौशल्ये विकसित करण्यासाठी क्षमता वर्धन करणे ही आहेत. योजनेच्या सुरवातीपासून सन सप्टेंबर २०२५ पर्यंत ५८९ शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करण्यात आल्या.

७.३३ **प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन योजना:** ही योजना राज्यात 'एक जिल्हा एक उत्पादन' तत्त्वावर राबविण्यात येत आहे. राज्यासाठी ३०,२३४ सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे सक्षमीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. योजनेच्या सुरुवातीपासून ऑक्टोबर २०२५ पर्यंत २०,६८७ मंजूर प्रकल्पांना ₹ ५७९.६६ कोटी अनुदान वितरित करण्यात आले.

७.३४ **मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना:** राज्यात सन २०१७-१८ पासून मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना राबविण्यात येत आहे. कृषि उत्पादनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्पांना प्रोत्साहन देणे, निर्यातीला प्रोत्साहन देणे, कृषि व अन्न प्रक्रिया करण्यासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करणे व ग्रामीण भागात लघु आणि मध्यम कृषि व अन्न प्रक्रिया प्रकल्पाव्दारे रोजगार निर्मिती करणे हे या योजनेचे प्रमुख उद्देश आहेत. योजना सुरू झाल्यापासून माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत ७५२ प्रकल्पांसाठी ₹ २७२.६४ कोटी अनुदान वितरित करण्यात आले.

७.३५ **जिल्हा कृषि महोत्सव:** कृषि क्षेत्रातील उत्पादन ते प्रक्रिया यामधील नवीन तंत्रज्ञानाबद्दल शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करणे, प्रगतीशील शेतकरी, उद्योजक व शास्त्रज्ञ यांच्या अनुभवांची देवाणघेवाण व पुरवठा साखळी विकसित करून थेट विपणन संबंध प्रस्थापित करणे, या उद्देशाने राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये जिल्हा कृषि महोत्सव आयोजित केले जातात. कृषि महोत्सव आयोजित करण्यासाठी प्रति जिल्हा ₹ २० लाख अनुदान वितरीत करण्यात येते. कृषि प्रदर्शने, परिसंवाद/कार्यशाळा, धान्य महोत्सव, थेट विपणन, खरेदीदार व विक्रेते यांचे संमेलन, शेतक-यांचा उत्सव इत्यादी या महोत्सवाचे प्रमुख घटक आहेत. सन २०२४-२५ मध्ये आठ जिल्ह्यांमध्ये जिल्हा कृषि महोत्सवांचे आयोजन करण्यात आले व ₹ ४.९३ कोटी निधी खर्च झाला. सन २०२५-२६ मध्ये ऑक्टोबर पर्यंत दोन जिल्ह्यांमध्ये ₹ ०.४० कोटी खर्च झाला.

# संलग्न कार्ये

७.३६ पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय आणि वनीकरण यासारख्या संलग्न उपक्रम महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यात महत्वाची भूमिका बजावत असून सन २०२४-२५ च्या पहिल्या सुधारित अंदाजांनुसार या उपक्रमांचा कृषि आणि संलग्न कार्ये क्षेत्रातील राज्याच्या सकल देशांतर्गत उत्पादनात सुमारे ३८ टक्के हिस्सा आहे. हे उपक्रम कृषी उत्पन्नात वाढ, रोजगार संधी निर्मिती आणि अन्न सुरक्षा वाढवतात तसेच लहान आणि अल्प भूधारक शेतकरी, भूमिहीन मजूर आणि महिलांसाठी अन्नसुरक्षा सुनिश्चित करून ग्रामीण आर्थिक विकासास चालना आणि दारिद्र्य निर्मूलनास हातभार लावतात. कृषि संलग्न उपक्रमांना बळकटी व प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकार विविध विकास योजना राबवित आहे.

## पशुसंवर्धन

७.३७ **२० वी पशुगणना २०१९:** २० व्या पशुगणना २०१९ दरम्यान, प्रथमच जातनिहाय आणि ग्रामीण/ नागरी क्षेत्रनिहाय पशुधनाबाबत माहिती संकलित करण्यात आली. या पशुगणनेनुसार राज्यातील एकूण पशुधन संख्या ३.३१ कोटी असून, पशुगणना २०१२ च्या तुलनेत यामध्ये १.८ टक्के वाढ झाली आहे. एकूण पशुधनाच्या दृष्टीने राज्याचा राष्ट्रीय पातळीवर सातवा क्रमांक आहे. राज्यातील एकूण कुक्कुटादी पक्ष्यांची संख्या ७.४३ कोटी असून राज्य देशात पाचव्या क्रमांकावर आहे. अखिल भारताच्या तुलनेत, राज्यातील पशुधन व कुक्कुटादी पक्ष्यांचे प्रमाण अनुक्रमे ६.२ टक्के व ८.७ टक्के आहे. पशुगणना २०१९ नुसार निवडक राज्यांमधील पशुधन व कुक्कुटादी पक्षी यांची माहिती तक्ता ७.२८ मध्ये तसेच विभागनिहाय पशुधन व कुक्कुटादी पक्षी यांची माहिती तक्ता ७.२९ मध्ये दिली आहे.

आलेख ७.१० : पशुधन हिश्श्याच्या टक्केवारीतील बदल (२०१२ च्या तुलनेत २०१९ ची पशुगणना)




**तक्ता ७.२८ पशुगणना २०१९ नुसार निवडक राज्यांमधील पशुधन आणि कुक्कुटादी पक्षी**

('०००)

| राज्य | पशुधन | | | | कुक्कुटादी पक्षी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गाई व बैल | म्हशी व रेडे | मेंढ्या व शेळ्या | इतर@ | परसबाग | व्यावसायिक |
| आंध्रप्रदेश | ४,६०१ | ६,२१९ | २३,१४९ | ९९ | २२,२६७ | ८५,५९५ |
| बिहार | १५,३९८ | ७,७२० | १३,०३५ | ३८८ | ९,०७४ | ७,४५१ |
| छत्तीसगड | ९,९८४ | १,१७५ | ४,१८६ | ५२८ | ८,५६० | १०,१५२ |
| गुजरात | ९,६३४ | १०,५४३ | ६,६५५ | ६१ | ४,२१९ | १७,५५३ |
| कर्नाटक | ८,४६९ | २,९८५ | १७,२२० | ३३९ | ११,०४५ | ४८,४४८ |
| मध्यप्रदेश | १८,७५१ | १०,३०७ | ११,३८९ | १९० | ९,४३५ | ७,२२४ |
| **महाराष्ट्र** | **१३,९९३** | **५,६०४** | **१३,२८५** | **१९८** | **२२,११३** | **५२,१८४** |
| राजस्थान | १३,९३८ | १३,६९३ | २८,७४४ | ४२६ | १,९३४ | १२,६८८ |
| तामीळनाडू | ९,५१९ | ५१९ | १४,३८९ | ७४ | २१,२६४ | ९९,५१६ |
| तेलंगणा | ४,२३२ | ४,२२६ | २३,९९८ | १८५ | १७,५४३ | ६२,४५५ |
| उत्तरप्रदेश | १९,०२० | ३३,०१७ | १५,४६५ | ५११ | ४,४६० | ८,०५५ |
| पश्चिम बंगाल | १९,०७८ | ६३१ | १७,२३२ | ५४२ | ५९,१०६ | १८,२१६ |
| **अखिल भारत** | **१,९३,४६३** | **१,०९,८५२** | **२,२३,१४६** | **१०,३००** | **३,१७,०७३** | **५,३४,७३६** |

*आधार* : पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग, भारत सरकार

@ डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट व गाढवे समाविष्ट

**तक्ता ७.२९ पशुगणना २०१९ नुसार महाराष्ट्रातील विभागनिहाय पशुधन आणि कुक्कुटादी पक्षी**

('०००)

| पशुवैद्यकीय विभाग | पशुधन | | | | | एकूण कुक्कुटादी पक्षी |
|---|---|---|---|---|---|---|
| | गुरे | म्हशी | मेंढ्या व शेळ्या | इतर@ | एकूण | |
| मुंबई | ८३९ | ३४२ | ३४८ | ७ | १,५३६ | १०,७९४ |
| नाशिक | ३,५१० | ८८३ | ४,०३८ | ४७ | ८,४७८ | २०,९९५ |
| पुणे | २,५५३ | २,१८४ | ३,३१६ | ३८ | ८,०९१ | ३०,६२६ |
| छत्रपती संभाजीनगर | १,७५७ | ५३४ | १,५९१ | २८ | ३,९१० | २,६१० |
| लातूर | १,३५५ | ७५६ | ९९० | २२ | ३,१२३ | १,९९३ |
| अमरावती | १,९२४ | ४५६ | १,५८४ | २६ | ३,९९० | २,९९२ |
| नागपूर | २,०५५ | ४४९ | १,४१८ | ३० | ३,९५२ | ४,२८८ |
| **राज्य** | **१३,९९३** | **५,६०४** | **१३,२८५** | **१९८** | **३३,०८०** | **७४,२९८** |

*आधार:* पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

@ डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट व गाढवे समाविष्ट

**आलेख ७.११ : राज्यातील पशुधन व कुक्कुटादी पक्षी**




७.३७.१ **२१ वी पशुगणना २०२४:** भारत सरकारच्या निर्देशानुसार, राज्यात २५ नोव्हेंबर २०२४ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत २१ वी पशुगणना घेण्यात आली. या पशुगणनेत प्रथमच मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे माहिती संकलित करण्यात आली आहे. या पशुगणनेत भटकी कुत्री, भटकी जनावरे यांचा समावेश करण्यात आला असून प्रथमच पशुपालक समुदायांकडील जनावरांचाही समावेश करण्यात आला आहे.

७.३८ **राज्य शासकीय पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा:** राज्य शासनाकडून व्यापक पशुवैद्यकीय संस्थांच्या जाळ्यामार्फत गावपातळीपर्यंत पशुवैद्यकीय आरोग्य सेवा पुरविण्यात येत असून पशुरोग प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्य शासकीय पशुवैद्यकीय आरोग्य सेवांच्या पायाभूत सुविधांचा तपशील तक्ता ७.३० मध्ये दिला असून उपचार व लसीकरणाबाबतचा तपशील तक्ता ७.३१ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.३० राज्य शासकीय पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा**

(डिसेंबर २०२५ पर्यंत)

| पशुवैद्यकीय विभाग | जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालये# | तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालये | पशुवैद्यकीय चिकित्सालये | मुख्यमंत्री पशुचिकित्सा पथक | पशु स्वास्थ्य व रोगनियंत्रण फिरते पथक | एकूण | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | ६ | ४१ | ४७८ | ७ | ५ | ५३७ | ५ |
| नाशिक | ५ | ४९ | ८३२ | १० | २२ | ९१८ | ५ |
| पुणे | ६ | ५१ | ९९२ | २० | ११ | १,०८० | ५ |
| छत्रपती संभाजीनगर | ४ | ३३ | ४३७ | ५ | ११ | ४९० | ४ |
| लातूर | ५ | ३५ | ४४४ | ९ | ७ | ५०० | ४ |
| अमरावती | ६ | ५१ | ५६२ | ७ | १७ | ६४३ | ५ |
| नागपूर | ७ | ५७ | ६९४ | १५ | ७ | ७८० | ६ |
| **राज्य** | **३९** | **३१७** | **४,४३९** | **७३** | **८०** | **४,९४८** | **३४** |

# पशुवैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न सहा सर्वचिकित्सालये मुंबई, परभणी, नागपूर, शिरवळ (सातारा), उदगीर (लातूर) आणि अकोला समाविष्ट (खात्याची पुनर्रचना व आकृतीबंध शासन निर्णय दि. १० ऑक्टोबर २०२४ नुसार)

*आधार*: पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.३१ पशुवैद्यकीय उपचार आणि लसीकरणाबाबतचा तपशील**

('०००)

| तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| सामान्य उपचार | ९,३२९ | १४,१८५ | ८,७५३ |
| खच्चीकरण | ४५१ | ४५१ | ३०२ |
| मोठी शस्त्रक्रिया | ३२ | ३६ | २५ |
| लघु शस्त्रक्रिया | १६३ | १६३ | १२२ |
| लसीकरण (कुक्कुटादी पक्ष्यांसह) | ५६,४८८ | ८५,८९६ | ५८,३४४ |

*आधार*: पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

+ डिसेंबर पर्यंत

७.३९ **कृत्रिम रेतन:** पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असलेल्या गोठीत वीर्य प्रयोगशाळांमध्ये वीर्य नळ्या तयार करण्यात येवून राज्यातील ३४ जिल्ह्यातील कृत्रिम रेतन केंद्रांमार्फत पशुवैद्यकीय संस्थांना वितरित करण्यात येतात. कृत्रिम रेतन विषयक माहिती तक्ता ७.३२ मध्ये दिली आहे.

७.४० **राष्ट्रीय गोकुळ अभियान**: गोवंशाच्या जनुकीय उन्नतीस चालना देणे आणि दूग्धोत्पादन व उत्पादकता वाढविणे तसेच रोगमुक्त व उच्च जनुकीय गुणवत्तेचे वळू उपलब्ध करून देणे या उद्दिष्टांसाठी राज्यात सन २०१४-१५ पासून राष्ट्रीय गोकुळ मिशनची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०२४-२५ मध्ये या मिशनअंतर्गत ₹ ९७.५४ कोटी इतका खर्च झाला असून राष्ट्रीय गोकुळ अभियानाचा तपशील तक्ता ७.३३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.३२ कृत्रिम रेतन विषयक माहिती**

('०००)

| तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| **१) गायी** | **१,६३७** | **२,१६२** | **१,३३७** |
| विदेशी | २१२ | ३०२ | १७४ |
| संकरीत | ९८७ | १,३३२ | ८१३ |
| देशी | ४३८ | ५२८ | ३५० |
| **जन्मलेल्या वासरांची संख्या** | **४७८** | **५२०** | **३५८** |
| संकरीत | ३४२ | ३७७ | २५४ |
| देशी | १३६ | १४३ | १०४ |
| **२) म्हशी** | **७३०** | **८८६** | **५५९** |
| **जन्मलेल्या रेडकांची संख्या** | **२२१** | **२२५** | **१४३** |

*आधार :* पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

+ डिसेंबर पर्यंत

**तक्ता ७.३३ राष्ट्रीय गोकुळ अभियानाचा तपशील**

(२०२४-२५) (₹ कोटी)

| उपक्रम | खर्च |
|---|---|
| दोन वळू माता प्रक्षेत्रांचे बळकटीकरण आणि प्रत्येक वळू माता प्रक्षेत्रावर ६०० उच्च वंशावळीच्या गवळाऊ गाई व पंढरपुरी म्हशींची खरेदी, ब्रीडर्स संघटनांची स्थापना, प्रशिक्षण, व्यवस्थापकीय खर्च, जैव विघटनशील हातमोज्यांची खरेदी, कृत्रिम रेतन उपकरणे खरेदी, इत्यादी | २६.९३ |
| राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम | १६.२१ |
| पशुसंजीवनी (जनावरांची ओळख पटविण्यासाठी टॅग व टॅग ॲप्लीकेटर खरेदी, टॅबलेट खरेदी व संगणकीकरण, पशुआरोग्य पत्रिकांची छपाई, इत्यादी) | ३.८२ |
| MAITRI कर्मचारी यांचे मुलभूत प्रशिक्षण | ७.३१ |
| उच्च अनुवांशिक गुणवत्तेच्या वळूंची वीर्य खरेदी | २.६३ |
| तीन गोठीत रेतमात्रा प्रयोगशाळांचे बळकटीकरण | २४.३५ |
| शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र साकुड (बीड) ची स्थापना | १६.०४ |
| राष्ट्रीय डिजिटल पशुधन अभियान अंतर्गत वीर्य मात्रा खरेदी व माहिती तंत्रज्ञान व्यक्तीचे वेतन | ०.२५ |
| **एकूण** | **९७.५४** |

*आधार*: पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.४१ **पशुधन विमा योजना:** सन २००६-०७ पासून राज्यात महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत पशुधन विमा योजना राबविण्यात येत आहे. नैसर्गिक आपत्ती, अपघात अथवा रोगांमुळे पशुधनाचा आकस्मिक मृत्यू झाल्यास पशुपालकांना होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून संरक्षण देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत पशुधन विमा योजनेसाठी भारत सरकारने सन २०२४ मध्ये सुधारित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

७.४२ **कुक्कुट विकास:** राज्य शासनाने कुक्कुट विकासासाठी छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नागपूर आणि पुणे या ४ ठिकाणी खालील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रे स्थापन केली आहेत.

- शासनमान्य दराने शेतकऱ्यांना सुधारित जातींची कुक्कुट पिल्ले, तलंगा आणि उबवणुकीची अंडी तयार करून पुरवठा करणे
- विविध कुक्कुटपालन योजनांतर्गत लाभार्थ्यांना सुधारित जातीची एक दिवसीय कुक्कुट पिल्ले, अंडी, नर मादी पक्षी व तलंगांचे वाटप करणे
- ग्रामीण भागात कुक्कुटपालन व्यवसाय करण्यासाठी सुधारित जातींच्या पक्ष्यांचा पुरवठा करणे
- शेतकरी, महिला बचत गट, सुशिक्षित बेरोजगार युवक, विद्यार्थी इत्यादींना कुक्कुटपालन व्यवसायासाठी प्रशिक्षण देणे
- शेतकऱ्यांना कुक्कुटपालन व्यवसाय करण्यासाठी तांत्रिक सल्ला व प्रोत्साहन देणे

७.४२.१ मध्यवर्ती उबवणी केंद्रांमार्फत सन २०२४-२५ मध्ये ४५,००० तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर १७,८९० कुक्कुट पक्ष्यांचा पुरवठा करण्यात आला.

७.४३ **राजे यशवंतराव होळकर महामेष योजना:** भटक्या जमाती-क प्रवर्गातील लाभार्थ्यांमध्ये मेंढीपालनास प्रोत्साहन देण्यासाठी राजे यशवंतराव होळकर महामेष योजना राज्यामध्ये २०१७ पासून राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत सन २०१९-२० पासून डिसेंबर २०२५ अखेर एकूण ३,०८१ मेंढी गटांचे तितक्याच लाभार्थ्यांना वाटप, २३९ लाभार्थ्यांना मेंढी पालनासाठी पायाभूत सुविधा, ३५३ लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीच्या नर मेंढ्यांचे वाटप, ६६ लाभार्थ्यांना संतुलित खाद्य पुरवठा तसेच २ लाभार्थ्यांना गासड्या बांधणी यंत्र खरेदीसाठी अनुदान देण्यात आले.

७.४४ **पशुपालक शेतकऱ्यांसाठी किसान क्रेडिट कार्ड योजना:** दुग्धजन्य प्राणी, कुक्कुटादी पक्षी तसेच शेळी-मेंढी पालनासाठी शेतकऱ्यांना अल्प मुदतीचे कर्ज सुविधा उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत पात्र पशुपालक शेतकऱ्यांना एकूण ८५,८८५ किसान क्रेडिट कार्ड वितरित करण्यात आली आहेत.

७.४५ **पशुसंवर्धनासाठीच्या योजना:** राज्यातील पशुधनाची उत्पादकता, उद्योजकता आणि ग्रामीण रोजगारामध्ये वाढ करून शाश्वत पशुसंवर्धन विकासाला चालना देण्यासाठी राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये प्राण्यांचे आरोग्य व विमा संरक्षण सुनिश्चित करणे; पशुवैद्यकीय सेवा, कर्ज आणि दर्जेदार निविष्ठांची सुलभ उपलब्धता तसेच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मेंढी, शेळी आणि वराह पालनास बळकटी देणे या बाबींचा समावेश आहे. निवडक पशुसंवर्धन योजनांचा तपशील तक्ता ७.३४ मध्ये दिला आहे.

**तक्ता क्र. ७.३४ निवडक पशुसंवर्धन योजनांचा तपशील**

(₹ कोटी)

| योजनेचे नाव | उद्दिष्ट | लाभाचा प्रकार | वर्ष | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय पशुधन अभियान | रोजगार निर्मिती आणि उद्योजकतेला चालना देणे, प्रति पशु उत्पादकता वाढवणे आणि असंघटित व संघटित क्षेत्रांमध्ये दुवा प्रस्थापित करणे | शेतकऱ्यांना मेंढ्या, शेळ्या, कुक्कुटपालन आणि वराह यांचा सवलतीच्या दरात पुरवठा | २०२४-२५<br>२०२५-२६ (डिसेंबर पर्यंत) | ११३<br>९५ | २२.१८<br>११.६१ |
| राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम | लाळ्या खुरकुत आणि ब्रुसेलोसिसचे प्रभावी नियंत्रण आणि निर्मूलन | जनावरांना मोफत लसीकरण | २०२४-२५<br>२०२५-२६ (डिसेंबर पर्यंत) | लाळ्या खुरकुत: ३६७.४५ लाख; ब्रुसेलोसिस: ६.४१ लाख<br>लाळ्या खुरकुत: १५३ लाख; ब्रुसेलोसिस: ०.२९ लाख | ३९.२८<br>१२.४३ |
| विदर्भ आणि मराठवाडा विभागातील दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी विशेष प्रकल्प | १९ जिल्ह्यांमध्ये दूध उत्पादन वाढविणे | दुभती जनावरे, वासरे, पूरक पशुखाद्य वाटप; कडबा कुट्टी यंत्र आणि मुरघाससाठी अनुदान | २०२५-२६ (डिसेंबर पर्यंत) | ३३,५४३ | ०.२० |
| मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना | फिरत्या पशुवैद्यकीय चिकित्सालयांमार्फत दुर्गम, डोंगराळ आणि आदिवासी गावांतील पशुधनांना घरोघरी पशुवैद्यकीय सेवा पुरवणे | पशुवैद्यकीय सेवा | २०२४-२५<br>२०२५-२६ (डिसेंबर पर्यंत) | ३.१७ लाख पशुधन<br>२.५३ लाख पशुधन | ७.१७<br>२.७७ |
| वैरण विकास योजना | पशुधनासाठी सकस चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करणे | पशुपालकांना सवलतीच्या दरात बियाणे आणि ठोंबे वाटप | २०२४-२५<br>२०२५-२६ (डिसेंबर पर्यंत) | १,२४,५७३<br>८४,४५० | ४०.२६<br>१९.४८ |
| **महाराष्ट्र गोसेवा आयोगाअंतर्गत योजना** | | | | | |
| सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना | दूध उत्पादन, शेतीची कामे, प्रजनन किंवा ओझे वाहण्यासाठी अयोग्य असलेल्या गाई आणि वळूंचे संगोपन व त्यांना निवारा उपलब्ध करणे | गोशाळांना अनुदान | २०२४-२५<br>२०२५-२६ (डिसेंबर पर्यंत) | १५१ गोशाळा<br>१२५ गोशाळा | २०.९९<br>८.९९ |
| गोशाळांमधील देशी गाईंच्या संगोपनासाठी अनुदान | गोशाळांची आर्थिक व्यवहार्यता सुधारणे | गोशाळांमधील देशी गाईंसाठी अनुदान | २०२४-२५<br>२०२५-२६ (डिसेंबर पर्यंत) | ५५९ गोशाळांमधील ५६,८३१ गाई<br>६१७ गोशाळांमधील ६५,७४४ गाई | २५.४४<br>९.८६ |
| **राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजना** | | | | | |
| शेळी आणि मेंढी गट वाटप | शेळी आणि मेंढी पालनास अनुदान सहाय्याद्वारे प्रोत्साहन देणे | शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात शेळी आणि मेंढी गटाचा पुरवठा | २०२४-२५ | १,२८९ | ९.९८ |
| कुक्कुटपालन | कुक्कुटपालनास अनुदान सहाय्याद्वारे प्रोत्साहन देणे | शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात पक्ष्यांचा पुरवठा | २०२४-२५ | १७५ | २.९५ |
| दुधाळ जनावरांचे वाटप | पशुपालनास प्रोत्साहन देणे, उद्योजकता विकासाला चालना देणे आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे | शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात दुधाळ जनावरांचा पुरवठा | २०२४-२५ | ५८४ | ७.८५ |

*आधार :* पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.४६ **प्रमुख पशुधन उत्पादने:** सन २०२४-२५ मध्ये पशुधन उत्पादनाअंतर्गत राज्य व राष्ट्रीय स्तरावरील दरडोई उपलब्धता आणि अखिल भारतीय स्तरावरील उत्पादनानुसार क्रमवारी खालीलप्रमाणे आहे:

- **दुध:** ३५८ ग्रॅम प्रतिदिन, राष्ट्रीय सरासरी: ४८५ ग्रॅम प्रतिदिन (पाचवा क्रमांक)
- **अंडी:** ६५ अंडी प्रतिवर्ष, राष्ट्रीय सरासरी: १०६ अंडी प्रतिवर्ष (सातवा क्रमांक)
- **मांस:** ९.५ किलो प्रतिवर्ष, राष्ट्रीय सरासरी: ७.५ किलो प्रतिवर्ष (तिसरा क्रमांक)

आलेख ७.१२: दुधाची दरडोई उपलब्धता




आलेख ७.१३ : दरडोई अंडी उपलब्धता




आलेख ७.१४ : दरडोई मांस उपलब्धता




७.४६.१ सन २०२४-२५ मध्ये राज्यातील पशुधन व कुक्कुटादी पक्ष्यांपासून मिळणारे उत्पादन तक्ता ७.३५ मध्ये आणि निवडक राज्यांमधील पशुधन व कुक्कुटादी पक्ष्यांपासून मिळणारे उत्पादन तक्ता ७.३६ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.३५ राज्यातील पशुधन व कुक्कुटादी पक्ष्यांपासून मिळणारे उत्पादन**

| वर्ष | मांस ('००० मे. टन) | दूध ('००० मे. टन) | अंडी (कोटी) | लोकर ('००० कि. ग्रॅ) |
|---|---|---|---|---|
| २०२१-२२ | १,१३८<br>(१२.३) | १४,३०५<br>(६.२) | ७०२<br>(५.४) | १,५८५<br>(४.८) |
| २०२२-२३ | १,१२४<br>(११.५) | १५,०४२<br>(६.५) | ७३८<br>(५.३) | १,५९२<br>(४.७) |
| २०२३-२४ | १,१५७<br>(११.३) | १६,०४५<br>(६.७) | ७७९<br>(५.५) | १,६०१<br>(४.८) |
| २०२४-२५ | १,२१४<br>(११.६) | १६,६२६<br>(६.७) | ८२२<br>(५.५) | १,६४२<br>(४.८) |

टीप : कंसातील आकडे अखिल भारताशी टक्केवारी दर्शवितात

*आधार*: आधारभूत पशुपालन सांख्यिकी २०२५, पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभाग, भारत सरकार

**तक्ता ७.३६ सन २०२४-२५ मध्ये निवडक राज्यांमधील पशुधन व कुक्कुटादी पक्ष्यांपासून मिळणारे उत्पादन**

| राज्य | मांस ('००० मे. टन) | दूध ('००० मे. टन) | अंडी (कोटी) | लोकर ('००० कि. ग्रॅ) |
|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | १,१३८ | १३,९४६ | २,७३९ | ० |
| बिहार | ४२१ | १३,३९८ | ३७८ | १७८ |
| छत्तीसगड | ६४ | २,१६२ | २४८ | ७७ |
| गुजरात | ३८ | १९,२९४ | २०६ | २,१५० |
| कर्नाटक | ४५२ | १३,८९८ | ९९५ | ६४७ |
| मध्यप्रदेश | १५४ | २२,५९६ | ३०७ | ३४८ |
| **महाराष्ट्र** | **१,२१४** | **१६,६२६** | **८२२** | **१,६४२** |
| राजस्थान | २३९ | ३६,७४१ | ३२३ | १६,५४३ |
| तामीळनाडू | ८०२ | ११,४४३ | २,३३१ | २ |
| तेलंगणा | १,१०१ | ५,९३५ | १,९३५ | ० |
| उत्तरप्रदेश | १,२८१ | ३८,८१५ | ६११ | ८३८ |
| पश्चिम बंगाल | १,३०८ | ७,९५४ | १,५९८ | ७७४ |
| **अखिल भारत** | **१०,५०५** | **२,४७,८७०** | **१४,९११** | **३४,५७४** |

*आधार*: आधारभूत पशुपालन सांख्यिकी २०२५, पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभाग, भारत सरकार

**पशुसंवर्धनास कृषि समकक्ष दर्जा**: राज्य शासनाने पशुसंवर्धन व्यवसायाला कृषि समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय ऑक्टोबर २०२५ मध्ये घेतला असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या निर्णयामुळे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि शेळीपालनात गुंतलेल्या लाखो पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**लाभ:**

- ➢ पशुसंवर्धन व्यवसायासाठी कृषी दराने वीज दर आकारणी
- ➢ ग्रामपंचायत करांसह इतर कर आकारणीत कृषी दरांप्रमाणे एकसमानता
- ➢ पशुसंवर्धन व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जावर व्याज सवलत
- ➢ कृषी क्षेत्राप्रमाणे सौर पंप व इतर सौर ऊर्जा प्रणाली उभारणीसाठी पात्रता

## दुग्धव्यवसाय

७.४७ दुग्धव्यवसाय हा कृषिपूरक व्यवसाय असून त्यामध्ये ग्रामीण कुटुंबांच्या पोषण मूल्याचा स्तर उंचावण्याबरोबरच अतिरिक्त उत्पन्न व रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची मोठी क्षमता आहे. महाराष्ट्रातील दूध उत्पादन सन २०१५-१६ मधील १०१.५२ लाख मेट्रिक टनावरून सन २०२४-२५ मध्ये १६६.२६ लाख मेट्रिक टन झाले असून गेल्या दहा वर्षांत त्यात ६३.८ टक्के वाढ झाली आहे. याच कालावधीत दुधाची दरडोई उपलब्धता प्रतिदिन २३९ ग्रॅमवरून ३५८ ग्रॅम झाली असून ४९.८ टक्के वाढ दर्शवते. राज्यातील दूध उत्पादन आणि दुधाची दरडोई उपलब्धता तक्ता ७.३७ मध्ये आणि विभागनिहाय दूध उत्पादन तक्ता ७.३८ मध्ये दिले आहे.

**आलेख ७.१५ : सहकारी व शासकीय दुग्ध शाळांव्दारे होणारे सरासरी दैनिक दूध संकलन**



**तक्ता ७.३७ दूध उत्पादन आणि दुधाची दरडोई उपलब्धता**

| वर्ष | दूध उत्पादन (लाख मे. टन) | | दुधाची दरडोई उपलब्धता (ग्रॅम प्रतिदिन) | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| २०२१-२२ | १४३.०५ | २,२२०.६९ | ३१५ | ४४६ |
| २०२२-२३ | १५०.४२ | २,३०५.७७ | ३२९ | ४५९ |
| २०२३-२४ | १६०.४५ | २,३९२.९९ | ३४७ | ४७१ |
| २०२४-२५ | १६६.२६ | २,४७८.७० | ३५८ | ४८५ |

*आधार :* आधारभूत पशुपालन सांख्यिकी २०२५,
पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभाग, भारत सरकार

**तक्ता ७.३८ राज्यातील विभागनिहाय दूध उत्पादन**

(लाख मे. टन)

| विभाग | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|
| कोकण | ४.६८ | ४.८० | ५.४० |
| नाशिक | ४१.५१ | ४५.०९ | ४४.७१ |
| पुणे | ६८.५७ | ७३.४० | ७७.२५ |
| छत्रपती संभाजीनगर | २२.३९ | २३.४७ | २४.४५ |
| अमरावती | ६.२५ | ६.२५ | ६.७४ |
| नागपूर | ७.०० | ७.४४ | ७.७१ |
| **राज्य** | **१५०.४२** | **१६०.४५** | **१६६.२६** |

*आधार:* पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.४८ राज्यात मार्च २०२५ अखेर सहकार क्षेत्रांतर्गत प्रतिदिन ८३.२५ लाख लिटर क्षमतेचे ६८ दुग्ध प्रक्रिया प्रकल्प आणि प्रतिदिन २०.६६ लाख लिटर क्षमतेची ४४ शीतकरण केंद्रे होती. सन २०२४-२५ मध्ये सहकारी दुग्धशाळांद्वारे होणारे दुधाचे सरासरी दैनिक संकलन ४३.३७ लाख लिटर होते आणि सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर हे संकलन ४२.८७ लाख लिटर होते.

**आलेख ७.१६ : निवडक राज्यातील सन २०२४-२५ मधील दुधाची दरडोई उपलब्धता व दुध उत्पादन**




## मत्स्य व्यवसाय

७.४९ राज्याला ८७७.९७ किमी लांबीचा सागरी किनारा लाभला असून सागरी मासेमारी योग्य क्षेत्र १.१२ लाख चौ. किमी आहे. तसेच मासे उतरविण्यासाठी सागरी किनाऱ्यावर १७३ मासेमारी केंद्रे आहेत. राज्यात १५,४७० सागरी मासेमारी नौका कार्यान्वित असून त्यापैकी १३,८३१ यांत्रिकी नौका आहेत.

७.४९.१ राज्यात ४.०० लाख हेक्टर क्षेत्र गोड्या पाण्यातील व ०.१७ लाख हेक्टर क्षेत्र निमखाऱ्या पाण्यातील मत्स्यशेतीसाठी उपलब्ध आहे. एकूण ३४ मत्स्य व कोळंबी बीज उत्पादन केंद्रे राज्यात कार्यरत असून त्यांची गोड्या पाण्यातील वार्षिक उत्पादन क्षमता १८०.२५ कोटी मत्स्यबीज इतकी आहे. मत्स्य उत्पादन व निर्यात याची माहिती तक्ता ७.३९ मध्ये दिली आहे.

**आलेख ७.१७ : एकूण मत्स्य उत्पादन व निर्यात**



**तक्ता ७.३९ मत्स्य उत्पादन व निर्यात**

| बाब | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| **मत्स्य उत्पादन** (लाख मे. टन) | | | |
| सागरी | ४.३५ | ४.६३ | २.९३ |
| गोड्या पाण्यातील | २.६५ | २.६९ | १.४७ |
| **एकूण** | **७.००** | **७.३२** | **४.४०** |
| **मत्स्य उत्पादनाचे एकूण मूल्य** (₹ कोटी) | | | |
| सागरी | ७,००२ | ९,१२१ | उ.ना. |
| गोड्या पाण्यातील | ३,३४५ | ३,५५४ | उ.ना. |
| **एकूण** | **१०,३४७** | **१२,६७५** | |
| **मत्स्यनिर्यात** | | | |
| उत्पादन (लाख मे. टन) | २.४६ | २.२३ | उ.ना. |
| मूल्य (₹ कोटी) | ६,५८२ | ७,३४३ | उ.ना. |

*आधार:* मत्स्य आयुक्तालय, महाराष्ट्र शासन    उ.ना. - उपलब्ध नाही    + डिसेंबर पर्यंत

७.४९.२ राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत सन २०१६-१७ पासून ₹ १०७ कोटी किंमतीच्या सहा मासेमारी जेट्टींच्या विकासाचे काम हाती घेण्यात आले आहे. यापैकी चार जेट्टींची कामे पूर्ण झाली आहेत व दोन प्रकल्प रद्द करण्यात आले असून ते अन्य योजनेअंतर्गत राबविण्याचे प्रस्तावित आहे. पूर्ण झालेल्या चार प्रकल्पांवर आतापर्यंत ₹ ८९.१० कोटी इतका खर्च झाला आहे.

७.४९.३ ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी या योजनेअंतर्गत ₹ १९४.४३ कोटी रक्कमेच्या १४ जेट्टी विकसित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यापैकी पाच जेट्टींची कामे पूर्ण झाली आहेत, चार जेट्टींची कामे अंतिम टप्प्यात आहेत, दोन जेट्टींची कामे प्रगतीपथावर असून तीन प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत.

७.५० **प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना:** भारत सरकारने मे, २०२० पासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी ही योजना सुरु केली होती आणि त्यास सन २०२५-२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यातील मत्स्य उत्पादन आणि मत्स्यपालकांचे उत्पन्न दुप्पट करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत लाभार्थी-केंद्रित उपक्रमांमध्ये मत्स्यबीज उत्पादन, तलावातील मत्स्यपालन, पाणी पुनर्वापर आधारित मत्स्यपालन, जलाशयातील व समुद्रातील पिंजरा पद्धतीद्वारे मत्स्यपालन, निविष्ठा अनुदान, शेवाळ व शिंपले संवर्धन, शोभिवंत मत्स्यपालन आणि मत्स्य वाहतूक व्यवस्था इत्यादी बाबींचा समावेश आहे.

७.५०.१ प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत पिंजरा पद्धतीद्वारे राज्यातील मत्स्य उत्पादन वाढविण्यासाठी मत्स्यपालन योजना राबविली जात आहे. नील क्रांती योजना आणि इतर विनाअनुदानित योजनांतर्गत ३,०३७ पिंजरा संवर्धन प्रकल्प उभारण्यात आले आहेत. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेच्या प्रारंभापासून डिसेंबर २०२५ पर्यंत राज्यातील १०५ जलाशयांमध्ये गोड्या पाण्यातील मत्स्यपालनासाठी एकूण १०,०८० पिंजरे बसविण्यात आले आहेत. प्रति पिंजरा वार्षिक सरासरी २ मेट्रिक टन मत्स्य उत्पादनाच्या आधारे या पिंजरा संवर्धन उपक्रमांतून अंदाजे २६,२३४ मेट्रिक टन मत्स्य उत्पादन अपेक्षित आहे. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत महत्त्वाच्या कार्यांचा तपशील तक्ता ७.४० मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४० प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत महत्त्वाच्या कार्यांचा तपशील**

(२०२४-२५) (₹ कोटी)

| कार्याचा तपशील | लाभार्थी संख्या | खर्च |
|---|---|---|
| लहान /मध्यम /मोठ्याआकाराचे पाणी पुन:वापर मत्स्यपालन प्रणालीची स्थापना | ४ | ०.०३ |
| शीतगृह / बर्फ कारखाना (किमान १०/२०/३०/५० टन क्षमता) स्थापना करणे | ९ | ०.०० |
| मत्स्य खाद्य कारखाना (२/८/२० टन क्षमता) उभारणी | ३ | ०.१० |
| नवीन मत्स्य संगोपन तलाव बांधकाम | ३८ | २.३२ |
| मत्स्य, कोळंबी, पंगॅशियस, तिलापीया इत्यादी संवर्धनाकरीता निविष्ठा अनुदान | १४ | ०.०३ |
| खुल्या समुद्रातील पिंजरा मत्स्यसंवर्धन (१००-१२० घन मीटर) | १४ | ०.३० |
| मत्स्यउद्योजक कुटुंबाना पोषण व उपजिवीकेस सहाय्य | ६६५ | ०.२० |
| इतर उपक्रम (प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना व गट अपघात विमा योजना) | २,११,२४२ | ५.२५ |

*आधार:* मत्स्य आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.५१ 'वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२' अंतर्गत संरक्षित असलेल्या देवमासा, शार्क, डॉल्फिन, सागरी कासव इत्यादी समुद्रातील प्राण्यांची जाळे कापून सुटका करण्यासाठी राज्यातील मच्छिमारांना संयुक्त नुकसान भरपाई योजनेच्या माध्यमातून प्रोत्साहित केले जाते. सन २०२४-२५ मध्ये ८७ सागरी कासवांची सुटका केल्याबद्दल ₹ ९.६१ लाख इतकी नुकसान भरपाई मच्छिमारांना दिली असून सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर ४९ सागरी कासवांची सुटका केल्याबद्दल ₹ ५.०० लाख इतकी नुकसान भरपाई दिली आहे.

७.५२ **मच्छीमारांकरिता किसान क्रेडीट कार्ड:** मत्स्यपालन, कोळंबी पालन आणि मासेमारी इत्यादीसाठी मच्छिमारांना अल्प मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण १६,७९६ किसान क्रेडिट कार्ड वाटप करण्यात आले असून पात्र मच्छिमारांना ₹ ६३.७८ कोटींचे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## रेशीम उत्पादन

७.५३ मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीची क्षमता असलेला रेशीम उद्योग हा एक महत्त्वाचा कृषि आधारित उद्योग असून ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी याचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. तुती रेशीम विकास कार्यक्रम राज्यातील २४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येतो. तुती लागवडीखालील क्षेत्र आणि रेशीम उत्पादन तक्ता ७.४१ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४१ तुती लागवडीखालील क्षेत्र आणि रेशीम उत्पादन**

| बाब | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| लागवडीखालील क्षेत्र | | | |
| एकूण (एकर) | १८,६०७ | २०,९१० | २२,७८५ |
| जुने (एकर) | १३,०६३ | १५,६३८ | १८,२१३ |
| नवीन (एकर) | ५,५४४ | ५,२७२ | ४,५७२ |
| लाभार्थी (शेतकरी) | १७,५२१ | १९,२८८ | २०,९३८ |
| रोग विरहित अंडीपुंजांचा पुरवठा (लाख) | ७०.९७ | ७९.४८ | ५६.०० |
| कोश उत्पादन (मे. टन) | ४,९०२.७० | ५,४०९.०० | ३,९०३.५५ |
| कच्चे रेशीम उत्पादन (मे. टन) | ७५४.२६ | ८३२.०० | ६००.५५ |
| रोजगार निर्मिती (लाख मनुष्य दिवस) | ८२.९३ | ९१.५२ | ६६.०६ |

*आधार*: रेशीम संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

७.५३.१ राज्यातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया या चार जिल्ह्यांमध्ये टसर रेशीम विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. टसर रेशीम उद्योग हा वनसंपत्तीवर आधारित असल्यामुळे तो ग्रामीण आदिवासी कुटुंबांना उपजीविकेची अतिरिक्त संधी उपलब्ध करून देतो. टसर वृक्ष लागवडीखालील क्षेत्र आणि रेशीम उत्पादन तक्ता ७.४२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४२ टसर वृक्ष लागवडीखालील क्षेत्र आणि रेशीम उत्पादन**

| बाब | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| टसर वृक्ष क्षेत्र | | | |
| उपलब्ध ऐन/अर्जुन वृक्ष क्षेत्र (हेक्टर) | १८,८६६ | १८,८६६ | १८,८६६ |
| वापरलेले ऐन/अर्जुन वृक्ष क्षेत्र (हेक्टर) | ५,८०३ | ६,८८० | ५,२०३ |
| लाभार्थी (संख्या) | १,३५५ | १,५५० | १,२६६ |
| रोग विरहित अंडीपुंजांचा पुरवठा (लाख) | ५.८१ | ६.८८ | ५.२० |
| कोश उत्पादन (लाख) | १८२.७९ | १९१.५९ | ५७.१४ |
| कच्चे रेशीम उत्पादन (मे. टन) | ९.९६ | १०.४४ | ३.११ |
| रोजगार निर्मिती (लाख मनुष्य दिवस) | १४.९४ | १५.६६ | ४.५७ |

*आधार*: रेशीम संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

# वने

७.५४ सन २०२४-२५ अखेर, राज्याचे एकूण वनक्षेत्र ६२ हजार चौ. किमी पेक्षा जास्त असून ते राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या २०.२ टक्के आहे. राज्यातील वनक्षेत्र हे वन विभाग (५५,८५०.८७ चौ. किमी), महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळ (३,५४८.३६ चौ. किमी), वन विभागाच्या ताब्यात असलेले खाजगी वनक्षेत्र (१,१८४.६७ चौ. किमी) आणि महसूल विभाग (१,४३२.५२ चौ. किमी) असे विभागले गेले आहे. सन २०२३-२४ च्या जमीन वापराच्या आकडेवारीनुसार राज्यातील आकारमानात सर्वात मोठे असलेल्या कृषि क्षेत्रानंतर वनक्षेत्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. वनपरिमंडळनिहाय वनक्षेत्राचे वर्गीकरण तक्ता ७.४३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४३ वनपरिमंडळनिहाय वनक्षेत्राचे वर्गीकरण**

(दि. ३१ मार्च २०२५ रोजी)

| वनपरिमंडळ | वन क्षेत्र (चौ. किमी) | | | | एकूण वनक्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण | |
| गडचिरोली | ११,२१०.४९ | १,४०३.०५ | २६४.३३ | १२,८७७.८७ | २०.८ |
| नागपूर | ४,४९०.६६ | २,१५५.२१ | १,१०७.१६ | ७,७५३.०३ | १२.५ |
| धुळे | ६,१४८.१० | ५७.०६ | २२३.२७ | ६,४२८.४३ | १०.४ |
| ठाणे | ४,४५२.७५ | १,१६५.९५ | ३०१.५१ | ५,९२०.२१ | ९.६ |
| नाशिक | ५,०४७.९२ | २००.४८ | ३८.४० | ५,२८६.८० | ८.५ |
| अमरावती | ५,०५२.६९ | १४.०७ | १८.०६ | ५,०८४.८२ | ८.२ |
| चंद्रपूर | ३,८४१.६६ | ८७५.०८ | १२६.४५ | ४,८४३.१९ | ७.८ |
| कोल्हापूर | ३,४९३.९३ | २४९.२९ | ७९२.८५ | ४,५३६.०७ | ७.३ |
| यवतमाळ | ३,३८१.९६ | ५.३९ | ९६.८३ | ३,४८४.१८ | ५.६ |
| छत्रपती संभाजीनगर | २,९३४.८० | ६८.६४ | १८१.११ | ३,१८४.५५ | ५.१ |
| पुणे | २,४७८.९९ | ०.०३ | १३८.२५ | २,६१७.२७ | ४.२ |
| **राज्य** | **५२,५३३.९५** | **६,१९४.२५** | **३,२८८.२२** | **६२,०१६.४२** | **१००.०** |

*आधार*: प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

७.५४.१ भारतीय वन स्थिती अहवाल, २०२३ नुसार राज्यातील एकूण वनाच्छादन ५०,८५९ चौ. किमी असून, २०२१ च्या अहवालाच्या तुलनेत त्यात ५४.४७ चौ. किमी ने घट झाली आहे. राज्याचे वनाच्छादन एकूण भौगोलिक क्षेत्राच्या १६.५ टक्के असून ते राष्ट्रीय वन धोरण, १९८८ मध्ये निश्चित केलेल्या ३३ टक्के उद्दिष्टाच्या तुलनेत कमी आहे. राज्याच्या एकूण वनाच्छादनापैकी १९.४ टक्के क्षेत्र अति घनदाट वने, ४२.४ टक्के क्षेत्र मध्यम घनदाट वने आणि ३८.२ टक्के क्षेत्र खुली वने या गटात वर्गीकृत आहेत. निवडक राज्यांचे वनाच्छादन तक्ता ७.४४ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४४ निवडक राज्यांचे वनाच्छादन**

(चौ. किमी)

| राज्य | भौगोलिक क्षेत्र | एकूण वनाच्छादन | भौगोलिक क्षेत्राशी एकूण वनाच्छादनाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | १,६२,९२३ | ३०,०८५ | १८.५ |
| बिहार | ९४,१६३ | ७,५३२ | ८.० |
| छत्तीसगड | १,३५,१९२ | ५५,८१२ | ४१.३ |
| गुजरात | १,९६,२४४ | १५,०१७ | ७.७ |
| कर्नाटक | १,९१,७९१ | ३९,२५४ | २०.५ |
| मध्यप्रदेश | ३,०८,२५२ | ७७,०७३ | २५.० |
| **महाराष्ट्र** | **३,०७,७१३** | **५०,८५९** | **१६.५** |
| राजस्थान | ३,४२,२३९ | १६,५४८ | ४.८ |
| तामीळनाडू | १,३०,०६० | २६,४५० | २०.३ |
| तेलंगणा | १,१२,०७७ | २१,१७९ | १८.९ |
| उत्तरप्रदेश | २,४०,९२८ | १५,०४६ | ६.२ |
| पश्चिम बंगाल | ८८,७५२ | १६,८३२ | १९.० |
| **अखिल भारत** | **३२,८७,४६९** | **७,१५,३४३** | **२१.८** |

*आधार*: भारतीय वन स्थिती अहवाल, २०२३

७.५५ **वृक्षाच्छादन:** वृक्षाच्छादन म्हणजे अभिलिखित वनक्षेत्राबाहेरील एक हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रावर पसरलेले वृक्षांचे समूह आणि विखुरलेले वृक्ष होय. गेल्या दशकात महाराष्ट्राच्या वृक्षाच्छादनात लक्षणीय वाढ झाली असून भारतीय वन स्थिती अहवाल, २०२३ नुसार १४,५२५ चौ. किमी वृक्षाच्छादनासह महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे. वनाच्छादन, वृक्षाच्छादन आणि कार्बन ग्रहणबाबतचा तपशील तक्ता ७.४५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४५ वनाच्छादन, वृक्षाच्छादन आणि कार्बन ग्रहण**

(चौ. किमी)

| वर्ष | अभिलिखित वनक्षेत्र | वनाच्छादन | | | | झाडी/ झुडपे | वृक्षाच्छादन | कार्बन ग्रहण (दशलक्ष टन) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अति घनदाट | मध्यम घनदाट | खुली वने | एकूण | | | |
| २०१३ | अंतर्गत | ८,३६९ | १५,९६२ | १३,१३२ | ३७,४६३ | | | |
| | बाहेरील | ३५१ | ४,८०८ | ८,०१० | १३,१६९ | | | |
| | **एकूण** | **८,७२०** | **२०,७७०** | **२१,१४२** | **५०,६३२** | **४,१५७** | **९,१४२** | **उ.ना.** |
| २०१५ | अंतर्गत | ८,३६१ | १५,९३९ | १३,१४३ | ३७,४४३ | | | |
| | बाहेरील | ३५१ | ४,८०८ | ८,०२६ | १३,१८५ | | | |
| | **एकूण** | **८,७१२** | **२०,७४७** | **२१,१६९** | **५०,६२८** | **४,१५७** | **९,५५८** | **उ.ना.** |
| २०१७ | अंतर्गत | ८,०२७ | १४,१६८ | ११,५९६ | ३३,७९१ | | | |
| | बाहेरील | ७०९ | ६,४८४ | ९,६९८ | १६,८९१ | | | |
| | **एकूण** | **८,७३६** | **२०,६५२** | **२१,२९४** | **५०,६८२** | **४,१६०** | **९,८३१** | **४९३** |
| २०१९ | अंतर्गत | ८,२०० | १४,४७७ | ११,९६२ | ३४,६३९ | | | |
| | बाहेरील | ५२१ | ६,०९५ | ९,५२३ | १६,१३९ | | | |
| | **एकूण** | **८,७२१** | **२०,५७२** | **२१,४८५** | **५०,७७८** | **४,२५६** | **१०,८०६** | **४४१** |
| २०२१ | अंतर्गत | ८,४९८ | १५,१०४ | १२,५२३ | ३६,१२४ | | | |
| | बाहेरील | ३०४ | ५,५१७ | ८,९६८ | १४,७८९ | | | |
| | **एकूण** | **८,८०२** | **२०,६२१** | **२१,४९१** | **५०,९१३** | **४,२४७** | **१२,१०८** | **४५२** |
| २०२३ | अंतर्गत | ९,५३९ | १५,८२७ | १०,७४५ | ३६,१११ | | | |
| | बाहेरील | ३२७ | ५,७५० | ८,६७१ | १४,७४८ | | | |
| | **एकूण** | **९,८६६** | **२१,५७७** | **१९,४१६** | **५०,८५९** | **३,६४६** | **१४,५२५** | **४६५** |

*आधार :* भारतीय वन स्थिती अहवाल, २०२३ — उ.ना. उपलब्ध नाही

७.५६ **वन्यजीव, राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये:** राज्यातील संरक्षित वन्यजीव क्षेत्राच्या जाळ्यामध्ये एकूण ८८ अधिसूचित क्षेत्रांचा समावेश असून त्याचे एकूण क्षेत्रफळ ११,०९१.७४ चौ. किमी आहे. राज्यातील संरक्षित वन्यजीव क्षेत्राचा तपशील तक्ता ७.४६ मध्ये दिला आहे.

७.५६.१ राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणामार्फत दर चार वर्षांनी व्याघ्र गणना करण्यात येते. भारतातील वाघांची स्थिती, २०२२ या अहवालानुसार राज्यातील वाघांची अंदाजित संख्या ४४४ आहे तर ती २०१८ च्या अहवालानुसार ३१२ होती. वन्यजीव प्रकल्पांचे क्षेत्र आणि त्यावर झालेला खर्च तक्ता ७.४७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४६ राज्यातील संरक्षित वन्यजीव क्षेत्र**

| वन्यजीव क्षेत्र | संख्या | क्षेत्र (चौ. किमी) |
|---|---|---|
| राष्ट्रीय उद्याने | ६ | १,२६९.२७ |
| अभयारण्ये | ५४ | ७,९४४.५६ |
| संवर्धित राखीव क्षेत्रे | २८ | १,८७७.९१ |

*आधार:* प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.४७ वन्यजीव प्रकल्पांचे क्षेत्र आणि त्यावर झालेला खर्च**

| प्रकल्प | क्षेत्र (चौ. किमी) | | खर्च (₹ कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|
| | गाभा | बफर | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
| **व्याघ्र प्रकल्प** | | | | | |
| मेळघाट | १,५००.४९ | १,२६८.०४ | ४.७९ | ७.०० | १३.७१ |
| ताडोबा-अंधारी | ६२५.८२ | १,१०१.७७ | ४.१६ | ८.१० | १२.५८ |
| पेंच | ४४०.९९ | ४८२.८१ | ३.३२ | ७.२७ | ८.५५ |
| सह्याद्री | ५११.८७ | ५६५.४५ | १.६५ | २.७५ | ६.६४ |
| नवेगाव-नागझिरा | ६५३.६७ | १,२४१.२७ | ३.९९ | ९.५२ | १०.४१ |
| बोर | १६७.५३ | ६४८.७३ | १.६१ | ३.०७ | ६.८२ |
| **हत्ती प्रकल्प, कोल्हापूर** | **क्षेत्र निर्दिष्ट नाही** | | **०.४७** | **७.६०** | **११.८९** |

*आधार:* प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, महाराष्ट्र शासन

७.५७ **वनोत्पादन:** वनांपासून इमारती व जळाऊ लाकूड आणि बांबू, तेंदूपत्ता, डिंक, गवत यांसारखी गौण वनोत्पादने मिळतात. राज्यातील वनोत्पादन व मूल्य तक्ता ७.४८ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४८ वनोत्पादन व मूल्य**

(₹ कोटी)

| वनोत्पादने | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६@ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य |
| **(अ) मुख्य उत्पादने****** | | | | | | |
| इमारती लाकूड (लाख घन मीटर) | १.५९ | ५३३.०२ | १.४२ | ३८८.८५ | १.७९ | ५४५.०६ |
| जळावू लाकूड (लाख घन मीटर) | २.०९ | ५९.३९ | २.३९ | ६७.९५ | २.६४ | ७७.६६ |
| **एकूण (अ)** (लाख घन मीटर) | **३.६८** | **५९२.४१** | **३.८१** | **४५६.८०** | **४.४४** | **६२२.७२** |
| **(ब) गौण उत्पादने** | | | | | | |
| बांबू** (लाख मे. टन) | ०.३५ | २२.२६ | ०.३० | १५.७० | ०.५३* | १६.६४* |
| तेंदू पत्ता (लाख स्टँडर्ड बॅग्ज) | १.६२* | ३८.०५* | २.०३* | ४२.१९* | २.५५ | ४५.६० |
| गवत (मे.टन) | ९५०* | ०.१२* | ९५०* | ०.१२* | उ.ना. | उ.ना. |
| डिंक (क्विंटल) | १,६८५* | ०.१२* | २,४४५* | ०.४१* | उ.ना. | उ.ना. |
| इतर (लाख, हिरडा, शिकेकाई इत्यादी) | उ.ना. | १.९५ | उ.ना. | २.५१ | उ.ना. | उ.ना. |
| **एकूण (ब)** | | **६२.५०** | | **६०.९३** | | **६२.२४** |
| **एकूण (अ+ब)** | | **६५४.९१** | | **५१७.७३** | | **६८४.९६** |

* अस्थायी ** वनविकास मंडळाची आकडेवारी समाविष्ट उ.ना. - उपलब्ध नाही @ अंदाजित १ स्टँडर्ड बॅग - (५० तेंदू पत्त्यांचे १००० बंडल)

*आधार :* प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, महाराष्ट्र शासन

७.५८ **वृक्ष लागवड:** राज्यातील वृक्ष लागवड कार्यक्रम प्रामुख्याने वन विभाग, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ आणि सामाजिक वनीकरण संचालनालयामार्फत राबविण्यात येतो. सन २०२४-२५ मध्ये वृक्ष लागवडीसाठी ₹ १५१.६३ कोटी खर्च झाला. वृक्ष लागवडीखालील क्षेत्र आणि झालेला खर्च तक्ता ७.४९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४९ वृक्ष लागवडीखालील क्षेत्र आणि झालेला खर्च**

| वर्ष | वन विभाग | | वन विकास महामंडळ | | सामाजिक वनीकरण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | लांबी@ (किमी) | खर्च (₹ कोटी) |
| २०२०-२१ | ७,२३४ | ४६.७० | २,३६१ | १७.५७ | ३,३०२ | १,२२४ | ५१.९२ |
| २०२१-२२ | १०,६९८ | ९८.७६ | ११,८३५ | १२.६५ | ७,४१३ | ७,२३८ | २३८.०१ |
| २०२२-२३ | १८,१६४ | १५६.७७ | २,५२३ | २५.४५ | ५,५५७ | ६,४७७ | २१३.२२ |
| २०२३-२४ | १६,३३९ | १६४.७४ | १,९३२ | १८.८३ | ४,६८४ | ४४३ | ४५.०७ |
| २०२४-२५ | ७,५१९ | ७९.८९ | २,४८० | २१.७९ | १,१०० | १,९४१ | ४९.९६ |

आधार *:* प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, महाराष्ट्र शासन @ रस्त्यालगतच्या वृक्ष लागवडीचा समावेश

## सामाजिक वनीकरण

७.५९ पारंपारिक वन क्षेत्राबाहेरील वृक्ष लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध सामाजिक वनीकरण योजना राबविण्यात येतात. या उपक्रमांतर्गत सामुदायिक जमिनींवर तसेच रस्ते, लोहमार्ग, कालवे आणि तत्सम सार्वजनिक जागांच्या कडेला रोपांची लागवड केली जाते. वृक्ष लागवडीच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध संस्था, ग्रामपंचायती आणि व्यक्तींना देखील रोपांचा पुरवठा केला जातो. सामाजिक वनीकरणांतर्गत प्रमुख योजनांचा तपशील तक्ता ७.५० मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.५० सामाजिक वनीकरणांतर्गत प्रमुख योजनांचा तपशील**

| योजना | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|
| सामुदायिक जमिनीवर रोपांची लागवड (लाख रोपे) | ४५.२१ | १९.९५ | १३४.१९ |
| अ) गट लागवड (हेक्टर) | ४,१४४.०० | ८४७.१७ | १,३८२.६१ |
| ब) रस्ते/लोहमार्ग/ कालवे यांच्या कडेने लागवड (किमी) | ७,५०३.०० | ३८१.०३ | १,५४१.२० |
| ग्रामपंचायती, संस्था व वैयक्तिक वृक्ष लागवडीसाठी पुरविलेली रोपे (लाख रोपे) | २१५.४९ | १०४.२३ | १५७.३८ |
| महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना (लाख रोपे) | | | |
| अ) शेतबांध लागवड | १७.५४ | ८.१९ | १२.२२ |
| ब) कृषी वन लागवड | १०५.०१ | ७.९८ | ४.६३ |
| कन्या वनसमृद्धी योजना (लाख रोपे) | १.५७ | ०.७६ | ०.४४ |

*आधार* : प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र शासन

७.६० **कांदळवन संवर्धन:** भारतीय वन स्थिती अहवाल, २०२३ नुसार राज्यात एकूण ३१५.०९ चौ. किमी कांदळवन क्षेत्र असून ते देशातील एकूण कांदळवन क्षेत्राच्या ६.३ टक्के आहे. कांदळवन संवर्धनास बळकटी देण्यासाठी भारतीय वनकायदा, १९२७ च्या कलम २० नुसार सुमारे ११,५४८ हेक्टर कांदळवनास राखीव वने म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**आलेख ७.१८ : कांदळवन आच्छादन क्षेत्र**




७.६०.१ पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील १९९ गावांचा समावेश असलेल्या संपूर्ण किनारपट्टीवरील स्थानिक समुदायांच्या सक्रिय सहभागासह सन २०१७ पासून राज्यात कांदळवन संवर्धन व उपजीविका निर्मिती योजना राबविण्यात येत आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेअंतर्गत खेकडा पालन, पिंजऱ्यातील मत्स्य शेती, कालवे व शिंपले पालन, शोभिवंत मत्स्यपालन, पर्यावरणपूरक पर्यटन आणि कांदळवन लागवड यांसारख्या उपजीविकेच्या उपक्रमांचा विस्तार करण्यासाठी ₹ १०.६४ कोटी निधीची तरतूद करण्यात आली होती व १९२ हेक्टर क्षेत्रावर कांदळवन लागवड करण्यात आली आणि विविध उपजीविकेच्या उपक्रमांद्वारे लाभार्थ्यांनी ₹ २.७३ कोटी नफा मिळवला. सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत ४०५.४६ हेक्टर क्षेत्रावर कांदळवन लागवड करण्यात आली असून या उपजीविकेच्या उपक्रमांतून लाभार्थ्यांनी ₹ २.९८ कोटी उत्पन्न मिळवले आहे.

**आलेख ७.१९ : कांदळवन आच्छादन क्षेत्राची जिल्हानिहाय विभागणी**




* * * * *

# परिशिष्ट ७.१

## कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, एकूण वहितीचे क्षेत्र व सरासरी वहिती क्षेत्र

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती खातेदारांची संख्या ('००) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ | २०२१-२२* |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ६,८३४ | ९,९१४ | १६,६७२ | २७,४६२ | ३१,६५८ | ३६,४५७ | ४३,७२२ | ५१,९०८ |
| २ | ०.५ - १.० | ५,५८५ | ९,३४५ | १६,०७५ | २५,५९५ | २९,५२५ | ३०,६३३ | ३४,४३६ | ४१,५२१ |
| ३ | १.० - २.० | ८,७८३ | १५,४०९ | २७,२७६ | ३६,०५६ | ४१,५०३ | ४०,५२३ | ४३,३९२ | ५१,१७१ |
| ४ | २.० - ३.० | ६,२६६ | १०,२७५ | १३,९६९ | १५,७९१ | १७,०२० | १५,४६३ | १६,९६४ | १५,३१८ |
| ५ | ३.० - ४.० | ४,६०६ | ६,५८३ | ७,२८९ | ६,९४९ | ७,४९६ | ६,१२८ | ६,३०६ | ५,२१९ |
| ६ | ४.० - ५.० | ३,५७६ | ४,६०१ | ४,४६९ | ३,७८० | ४,०३७ | ३,१४२ | ३,३५३ | २,५५३ |
| ७ | ५.० - १०.० | ८,७१५ | ९,३१६ | ७,२४१ | ४,८७३ | ५,२१४ | ३,९६४ | ३,९८४ | २,८३० |
| ८ | १०.० - २०.० | ४,१८० | २,८१९ | १,५३० | ७७३ | ६२२ | ५९० | ५७६ | ४६३ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | ९६१ | ३६३ | १७६ | ९७ | ८१ | ८९ | १२१ | १२६ |
| | **एकूण** | **४९,५०६** | **६८,६२५** | **९४,६९७** | **१,२१,३७६** | **१,३७,१५६** | **१,३६,९८९** | **१,५२,८५४** | **१,७१,१०७** |

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती एकूण क्षेत्र ('०० हेक्टर) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ | २०२१-२२* |
| (१) | (२) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | १,६३४ | २,६३० | ४,११९ | ७,३२८ | ७,७४० | ९,१८० | १०,२७८ | १२,२१० |
| २ | ०.५ - १.० | ४,१४२ | ७,१०३ | १२,०५७ | १९,१५९ | २०,२७४ | २२,६८० | २४,२०९ | ३०,७५० |
| ३ | १.० - २.० | १२,८४२ | २३,३३७ | ३९,८३३ | ५१,२७१ | ५२,४७६ | ५७,३९१ | ५७,७११ | ७१,९०७ |
| ४ | २.० - ३.० | १५,३८६ | २५,३६३ | ३३,६८९ | ३७,४१४ | ३७,५४२ | ३६,६८१ | ३८,८४४ | ३५,९५४ |
| ५ | ३.० - ४.० | १५,९२० | २२,८१५ | २५,१०८ | २३,६७६ | २३,७५६ | २०,९७४ | २१,४१२ | १७,८१९ |
| ६ | ४.० - ५.० | १५,९६१ | २०,५५६ | १९,८६४ | १६,७१७ | १६,७१७ | १३,९०१ | १४,७७८ | ११,२६८ |
| ७ | ५.० - १०.० | ६१,२१३ | ६३,९३७ | ४८,७०० | ३२,०८४ | ३२,१३५ | २६,०२७ | २६,२१६ | १८,४७५ |
| ८ | १०.० - २०.० | ५६,३०२ | ३७,२१३ | १९,७४९ | ९,९६१ | ६,७७६ | ७,५२४ | ७,२५१ | ५,९७४ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २८,३९४ | १०,६६२ | ६,१२९ | ३,४१८ | २,६३४ | ३,३१४ | ४,३६५ | ६,२२७ |
| | **एकूण** | **२,११,७९४** | **२,१३,६१६** | **२,०९,२४८** | **२,०१,०२८** | **२,००,०५०** | **१,९७,६७२** | **२,०५,०६४** | **२,१०,५८५** |

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती सरासरी क्षेत्र (हेक्टर) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ | २०२१-२२* |
| (१) | (२) | (१७) | (१८) | (१९) | (२०) | (२१) | (२२) | (२३) | (२४) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ०.२४ | ०.२७ | ०.२५ | ०.२७ | ०.२४ | ०.२५ | ०.२४ | ०.२४ |
| २ | ०.५ - १.० | ०.७४ | ०.७६ | ०.७५ | ०.७५ | ०.६९ | ०.७४ | ०.७० | ०.७४ |
| ३ | १.० - २.० | १.४६ | १.५१ | १.४६ | १.४२ | १.२६ | १.४२ | १.३३ | १.४१ |
| ४ | २.० - ३.० | २.४६ | २.४७ | २.४१ | २.३७ | २.२१ | २.३७ | २.२९ | २.३५ |
| ५ | ३.० - ४.० | ३.४६ | ३.४७ | ३.४४ | ३.४१ | ३.१७ | ३.४२ | ३.४० | ३.४२ |
| ६ | ४.० - ५.० | ४.४६ | ४.४७ | ४.४४ | ४.४२ | ४.१४ | ४.४२ | ४.४१ | ४.४२ |
| ७ | ५.० - १०.० | ७.०२ | ६.८६ | ६.७३ | ६.५८ | ६.१६ | ६.५७ | ६.५८ | ६.५४ |
| ८ | १०.० - २०.० | १३.४७ | १३.२० | १२.९१ | १२.८९ | १०.८९ | १२.७५ | १२.५९ | १२.९४ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २९.५५ | २९.३७ | ३४.८२ | ३५.२४ | ३२.५२ | ३७.२४ | ३६.०७ | ५०.६८ |
| | **एकूण** | **४.२८** | **३.११** | **२.२१** | **१.६६** | **१.४६** | **१.४४** | **१.३४** | **१.२३** |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

* अस्थायी

## परिशिष्ट ७.२

## राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी

(क्षेत्र '००० हेक्टर)

| वर्ष | भौगोलिक क्षेत्र | वनांखालील क्षेत्र | मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | मशागत न केलेले इतर क्षेत्र | | | पडीत जमिनी | | पिकांखालील क्षेत्र | | पिकांखालील स्थूल क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नापिक व मशागतीस अयोग्य जमीन | बिगर-शेती वापराखाली आणलेली जमीन | मशागतीयोग्य पडीत जमीन | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | किरकोळ झाडे, झुडपे यांच्या समूहा खालील क्षेत्र | चालू पड | इतर पड | निव्वळ पेरणी क्षेत्र | दुसोटा / तिसोटा क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १९८६-८७ | ३०,७५८ | ५,३५० | १,६७९ | १,१५२ | १,०४४ | १,३६७ | १९६ | ९०९ | १,०५७ | १८,००४ | २,३२० | २०,३२४ |
| १९९०-९१ | ३०,७५८ | ५,१२८ | १,६२२ | १,०९१ | ९६६ | १,१२५ | ३०१ | ८९८ | १,०६३ | १८,५६५ | ३,२९५ | २१,८५९ |
| १९९५-९६ | ३०,७५८ | ५,१४८ | १,५४४ | १,३४९ | ९६० | १,१६६ | २९२ | १,०७२ | १,२४८ | १७,९८० | ३,५२४ | २१,५०४ |
| २०००-०१ | ३०,७५८ | ५,१५० | १,५४४ | १,३६४ | ९५९ | १,१६८ | ३२७ | १,१२६ | १,२७६ | १७,८४४ | ३,७७५ | २१,६१९ |
| २००५-०६ | ३०,७५८ | ५,२१२ | १,७२० | १,४०७ | ९१४ | १,२५२ | २४९ | १,३२७ | १,२०४ | १७,४७३ | ५,०८३ | २२,५५६ |
| २०१०-११ | ३०,७५८ | ५,२१६ | १,७३१ | १,४४९ | ९१९ | १,२४२ | २५० | १,३६६ | १,१७९ | १७,४०६ | ५,७६९ | २३,१७५ |
| २०११-१२ | ३०,७५८ | ५,२१० | १,७२८ | १,४५० | ९१९ | १,२४३ | २५० | १,३७८ | १,१९१ | १७,३८५ | ५,७२० | २३,१०६ |
| २०१२-१३ | ३०,७५८ | ५,२०७ | १,७२१ | १,४५५ | ९१६ | १,२४४ | २५० | १,४१७ | १,२०० | १७,३४३ | ५,७७२ | २३,११५ |
| २०१३-१४ | ३०,७५८ | ५,२०५ | १,७२३ | १,४६० | ९१५ | १,२४२ | २४९ | १,४०१ | १,१९२ | १७,३६८ | ६,०१२ | २३,३८० |
| २०१४-१५ | ३०,७५८ | ५,२०१ | १,७२७ | १,४८२ | ९१९ | १,२४९ | २४९ | १,३९९ | १,१८८ | १७,३४४ | ५,९२९ | २३,२७३ |
| २०१५-१६ | ३०,७५८ | ५,१९४ | १,७३१ | १,५२१ | ८८७ | १,२४९ | २५१ | १,४७७ | १,२५५ | १७,१९१ | ५,६७१ | २२,८६३ |
| २०१६-१७ | ३०,७५८ | ५,१९४ | १,८२२ | १,६४२ | ९२४ | १,३५१ | २५३ | १,४०१ | १,२५७ | १६,९१० | ६,३१४ | २३,२२४ |
| २०१७-१८ | ३०,७५८ | ५,२१९ | १,८३४ | १,६५० | ९२३ | १,२८७ | २५६ | १,३६५ | १,२६२ | १६,९४२ | ६,३२६ | २३,२६८ |
| २०१८-१९ | ३०,७५८ | ५,१७४ | १,८४९ | १,६९२ | ९२४ | १,३२३ | २७२ | १,४४८ | १,२६० | १६,८१५ | ६,३९७ | २३,२१२ |
| २०१९-२० | ३०,७५८ | ५,२२२ | १,८८२ | १,७१२ | ९३५ | १,३५३ | २७३ | १,४४४ | १,२१५ | १६,७२२ | ६,८४८ | २३,५७० |
| २०२०-२१ | ३०,७५८ | ५,२०७ | १,९५१ | १,७२६ | ९३४ | १,३६५ | २७२ | १,४३८ | १,२१४ | १६,६५० | ७,२४८ | २३,८९८ |
| २०२१-२२ | ३०,७५८ | ५,२०९ | १,९७५ | १,७४४ | ९४३ | १,३६४ | २७४ | १,४५५ | १,२०३ | १६,५९० | ७,५५८ | २४,१४९ |
| २०२२-२३ | ३०,७५८ | ५,१९९ | १,९८५ | १,७६८ | ९६३ | १,४१२ | २६८ | १,४७७ | १,१९५ | १६,४९१ | ७,९२४ | २४,४१५ |
| २०२३-२४ | ३०,७५८ | ५,१८५ | १,९८८ | १,७८३ | ९४२ | १,४१२ | २७५ | १,४४३ | १,१५८ | १६,५७१ | ७,६५३ | २४,२२४ |

टीप - २०१०-११ ते २०२३-२४ चे आकडे अस्थायी आहेत.

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ७.३

## राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे. टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अ. क्र. | वर्ष | तांदूळ | | | गहू | | | ज्वारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | १,३०० | १,३६९ | १,०५४ | ९०७ | ४०१ | ४४२ | ६,२८४ | ४,२२४ | ६७२ |
| २ | १९७०-७१ | १,३५२ | १,६६२ | १,२२९ | ८१२ | ४४० | ५४२ | ५,७०३ | १,५५७ | २७३ |
| ३ | १९८०-८१ | १,४५९ | २,३१५ | १,५८७ | १,०६३ | ८८६ | ८३४ | ६,४६९ | ४,४०९ | ६८१ |
| ४ | १९९०-९१ | १,५९७ | २,३४४ | १,४६७ | ८६७ | ९०९ | १,०४९ | ६,३०० | ५,९२९ | ९४१ |
| ५ | २०००-०१ | १,५१२ | १,९३० | १,२७७ | ७५४ | ९४८ | १,२५६ | ५,०९४ | ३,९८८ | ७८३ |
| ६ | २०१०-११ | १,५१६ | २,६९१ | १,७७५ | १,३०७ | २,३०१ | १,७६१ | ४,०६० | ३,४५२ | ८५० |
| ७ | २०२०-२१ | १,५६१ | ३,२९१ | २,१०९ | १,१२६ | २,०७१ | १,८३९ | २,३२० | २, १८६ | ९४२ |
| ८ | २०२३-२४ | १,६९३ | ४,०२७ | २,३७९ | १,०४७ | १,९८८ | १,८९९ | १,७४० | १,७७५ | १,०२० |
| ९ | २०२४-२५ | १,६८२ | ४,००३ | २,३८० | १,१८९ | २,४५४ | २,०६४ | १,६९२ | १,८४६ | १,०९१ |

| अ. क्र. | वर्ष | बाजरी | | | इतर तृणधान्ये | | | सर्व तृणधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) |
| १ | १९६०-६१ | १,६३५ | ४८९ | २९९ | ४८० | २७२ | ५६७ | १०,६०६ | ६,७५५ | ६३७ |
| २ | १९७०-७१ | २,०३९ | ८२४ | ४०४ | ४१४ | २५४ | ६१४ | १०,३२० | ४,७३७ | ४५९ |
| ३ | १९८०-८१ | १,५३४ | ६९७ | ४५४ | ४५१ | ३४० | ७५४ | १०,९७६ | ८,६४७ | ७८८ |
| ४ | १९९०-९१ | १,९४० | १,११५ | ५७५ | ४३२ | ४४३ | १,०२५ | ११,१३६ | १०,७४० | ९६४ |
| ५ | २०००-०१ | १,८०० | १,०८७ | ६०४ | ६६४ | ५४४ | ८१९ | ९,८२४ | ८,४९७ | ८६५ |
| ६ | २०१०-११ | १,०३५ | १,१२३ | १,०८६ | १,०६८ | २,७४९ | २,५७५ | ८,९८५ | १२,३१७ | १,३७१ |
| ७ | २०२०-२१ | ६८७ | ९०६ | १,३१७ | १,३८५ | ३,७४७ | २,७०६ | ७,०७९ | १२,२०१ | १,७२४ |
| ८ | २०२३-२४ | ४०४ | २४६ | ६०८ | १,४५३ | २,५९२ | १,७८३ | ६,३३८ | १०,६२९ | १,६७७ |
| ९ | २०२४-२५ | ४४४ | ५६५ | १,२७२ | १,७४२ | ४,६०० | २,६४० | ६,७५० | १३,४६८ | १,९९५ |

| अ. क्र. | वर्ष | तूर | | | हरभरा | | | मूग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) | (२७) | (२८) | (२९) |
| १ | १९६०-६१ | ५३० | ४६८ | ८८३ | ४०२ | १३४ | ३३३ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ६२७ | २७१ | ४३२ | ३१० | ८७ | २८१ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | ६४४ | ३१९ | ४९५ | ४१० | १३७ | ३३५ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | १,००४ | ४१९ | ४१७ | ६६८ | ३५५ | ५३२ | ० | ० | ० |
| ५ | २०००-०१ | १,०९६ | ६६० | ६०२ | ६७६ | ३५१ | ५१९ | ७१४ | २४४ | ३४१ |
| ६ | २०१०-११ | १,३०२ | ९७६ | ७५० | १,४३८ | १,३०० | ९०४ | ५५४ | ३७२ | ६७२ |
| ७ | २०२०-२१ | १,३४० | १,४५० | १,०८२ | २,२३१ | २,३९७ | १,०७४ | ४०१ | २०७ | ५१७ |
| ८ | २०२३-२४ | १,१२९ | १,००८ | ८९३ | २,६८८ | २,८३६ | १,०५५ | २०० | ७६ | ३८० |
| ९ | २०२४-२५ | १,२२७ | १,६३० | १,३२९ | २,८७३ | २,९६२ | १,०३१ | २५९ | १६६ | ६४० |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ७.३ (पुढे चालू)

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे. टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अ. क्र. | वर्ष | उडीद | | | इतर कडधान्ये | | | सर्व कडधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३०) | (३१) | (३२) | (३३) | (३४) | (३५) | (३६) | (३७) | (३८) |
| १ | १९६०-६१ | ० | ० | ० | १,४१७ | ३८७ | २७३ | २,३४९ | ९८९ | ४२१ |
| २ | १९७०-७१ | ० | ० | ० | १,६२९ | ३१९ | १९६ | २,५६६ | ६७७ | २६४ |
| ३ | १९८०-८१ | ० | ० | ० | १,६६१ | ३६९ | २२२ | २,७१५ | ८२५ | ३०४ |
| ४ | १९९०-९१ | ० | ० | ० | १,५८५ | ६६७ | ४२१ | ३,२५७ | १,४४१ | ४४२ |
| ५ | २०००-०१ | ५७४ | २०५ | ३५७ | ४९७ | १७७ | ३५६ | ३,५५७ | १,६३७ | ४६० |
| ६ | २०१०-११ | ४८२ | ३२९ | ६८२ | २६२ | ११९ | ४५५ | ४,०३८ | ३,०९६ | ७६७ |
| ७ | २०२०-२१ | ३५६ | २२७ | ६३६ | २६६ | १६३ | ६१३ | ४,५९५ | ४,४४४ | ९६७ |
| ८ | २०२३-२४ | २६० | १०३ | ३९६ | १७२ | १०० | ५८१ | ४,४५० | ४,१२३ | ९२७ |
| ९ | २०२४-२५ | ३९३ | ३६१ | ९१७ | २३५ | १५६ | ६६६ | ४,९८७ | ५,२७४ | १,०५८ |

| अ. क्र. | वर्ष | सर्व अन्नधान्ये | | | भूईमूग | | | सोयाबीन | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३९) | (४०) | (४१) | (४२) | (४३) | (४४) | (४५) | (४६) | (४७) |
| १ | १९६०-६१ | १२,९५५ | ७,७४४ | ५९८ | १,०८३ | ८०० | ७३९ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | १२,८८६ | ५,४१४ | ४२० | ९०४ | ५८६ | ६४९ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | १३,६९१ | ९,४७२ | ६९२ | ६९५ | ४५१ | ६४८ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | १४,३९३ | १२,१८१ | ८४६ | ८६४ | ९७९ | १,१३२ | २०१ | १९० | ९४७ |
| ५ | २०००-०१ | १३,३८२ | १०,१३३ | ७५७ | ४९० | ४७० | ९५८ | १,१४२ | १,२६६ | १,१०९ |
| ६ | २०१०-११ | १३,०२३ | १५,४१३ | १,१८३ | ३९५ | ४७० | १,२९० | २,७२९ | ४,३१६ | १,५८१ |
| ७ | २०२०-२१ | ११,६७४ | १६,६४६ | १,४२६ | ३०९ | ४०७ | १,३१८ | ४,२९० | ६,२६४ | १,४६० |
| ८ | २०२३-२४ | १०,७८७ | १४,७५२ | १,३६८ | २२६ | २८५ | १,२५७ | ५,११५ | ६,६७१ | १,३०४ |
| ९ | २०२४-२५ | ११,७३६ | १८,७४३ | १,५९७ | २५० | ३६१ | १,४४१ | ५,१७८ | ९,४४६ | १,८२४ |

| अ. क्र. | वर्ष | करडई | | | इतर तेलबिया | | | सर्व तेलबिया | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (४८) | (४९) | (५०) | (५१) | (५२) | (५३) | (५४) | (५५) | (५६) |
| १ | १९६०-६१ | ३३१ | ० | ० | ४५४ | ० | ० | १,८६८ | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ४०६ | १०२ | २५२ | ४०८ | ६५ | १५९ | १,७१८ | ७५३ | ४३८ |
| ३ | १९८०-८१ | ४८० | १७४ | ३६३ | ६०५ | १०३ | १७० | १,७८० | ७२८ | ४२६ |
| ४ | १९९०-९१ | ६३४ | २५८ | ४०८ | १,१२७ | ४५५ | ४०४ | २,८२६ | १,८८२ | ६६६ |
| ५ | २०००-०१ | २९६ | १२२ | ४१२ | ६३१ | २४१ | ३८२ | २,५५९ | २,०९९ | ८२० |
| ६ | २०१०-११ | १७३ | ९४ | ५४४ | ३३१ | १७६ | ५३२ | ३,६२८ | ५,०५६ | १,३९४ |
| ७ | २०२०-२१ | २१ | १२ | ५६९ | १०५ | ३६ | ३४३ | ४,७२५ | ६,७१९ | १,४२२ |
| ८ | २०२३-२४ | ४१ | ३२ | ७७१ | ६७ | २० | ३०३ | ५,४४९ | ७,००८ | १,२८६ |
| ९ | २०२४-२५ | ४२ | २६ | ६०८ | ८६ | ३५ | ४०५ | ५,५५७ | ९,८६७ | १,७७६ |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ७.३ (समाप्त)

क्षेत्र '००० हेक्टर

उत्पादन '००० मे.टन

**नगदी पिके**

उत्पादकता प्रति हेक्टर किलो

| अ. क्र. | वर्ष | ऊस | | | कापूस (रुई) | | | तंबाखू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तोडणी क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता (मे. टनांत) | क्षेत्र | उत्पादन (गासड्यात ) | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (५७) | (५८) | (५९) | (६०) | (६१) | (६२) | (६३) | (६४) | (६५) |
| १ | १९६०-६१ | १५५ | १०,४०४ | ६७ | २,५०० | १,६७३ | ११४ | २५ | १२ | ४८० |
| २ | १९७०-७१ | १६७ | १४,४३३ | ८७ | २,७५० | ४८४ | ३० | १२ | ५ | ४४८ |
| ३ | १९८०-८१ | २५८ | २३,७०६ | ९२ | २,५५० | १,२२४ | ८२ | १२ | ८ | ६४८ |
| ४ | १९९०-९१ | ४४२ | ३८,१५४ | ८६ | २,७२१ | १,८७५ | ११७ | ८ | ८ | १,०३९ |
| ५ | २०००-०१ | ५९५ | ४९,५६९ | ८३ | ३,०७७ | १,८०३ | १०० | ८ | ९ | १,१४८ |
| ६ | २०१०-११ | ९६५ | ८५,६९१ | ८९ | ३,९४२ | ७,४७३ | ३२२ | १ | १ | ९९४ |
| ७ | २०२०-२१ | १,१४३ | १,११,६४२ | ९८ | ४,५४५ | १०,११० | ३७८ | ०.६ | १.२ | २,०१५ |
| ८ | २०२३-२४ | १,४३७ | १,१२,६२७ | ७८ | ४,२८७ | ८,९१८ | ३५४ | ०.६९ | ०.७९ | १,१३९ |
| ९ | २०२४-२५ | १,१६७ | १,०९,९७४ | ९४ | ४,१२३ | ७,३८५ | ३०४ | १.० | २.० | २,५९६ |

टीप - (१) कापसाचे उत्पादन १७० किलो/गासडी याप्रमाणे '००० गासड्यांमध्ये.

(२) ऊसाची उत्पादकता मेट्रीक टन / हेक्टर

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट ७.४

## राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक

(त्रैवर्षीय सरासरी - पाया: १९७९-८२ = १००)

| गट/पिके | भार | १९८२-८३ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०२०-२१ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| **१. अन्नधान्ये** | | | | | | | | | |
| **(अ) तृणधान्ये** | | | | | | | | | |
| (१) तांदुळ | ९.४९ | ८७.४ | १०६.१ | ८७.४ | १२२.१ | १४९.० | १७९.५ | १८२.४ | १८१.३ |
| (२) गहू | ५.९२ | ८०.६ | ९३.९ | ९७.९ | २३७.७ | २१४.० | २३७.७ | २०५.४ | २५३.५ |
| (३) ज्वारी | २२.१६ | ९५.५ | १२१.१ | ८१.४ | ७०.५ | ४४.६ | ३१.४ | ३५.६ | ३७.१ |
| (४) बाजरी | ३.०८ | ६४.२ | १५४.३ | १५०.५ | १५५.५ | १२५.४ | ८०.२ | ३४.० | ७८.२ |
| (५) बार्ली | ०.०२ | ३७.७ | १७.० | १३.२ | १८८.७ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| (६) मका | ०.४६ | ३६.९ | १०५.२ | २५३.८ | २,१८०.५ | ३,००६.७ | ३,२५८.३ | २,०५२.९ | ३७५२.५ |
| (७) नाचणी | ०.८५ | ९२.० | ९८.४ | ६०.८ | ५५.५ | ४४.४ | ५१.८ | ५३.२ | ४५.३ |
| (८) कोद्रा | ०.०५ | ७३.७ | ६६.६ | ४३.६ | २३.६ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| (९) इतर तृणधान्ये | ०.१९ | ७६.७ | १५०.८ | १६२.५ | २६.१ | १००.७ | ६७.८ | ९४.७ | ८६.८ |
| **एकूण - तृणधान्ये** | **४२.२२** | **८८.५** | **११५.७** | **९१.९** | **१३४.२** | **१३०.२** | **१३२.८** | **११४.८** | **१४३.६** |
| **(ब) कडधान्ये** | | | | | | | | | |
| (१) हरभरा | १.४७ | ७८.४ | २१५.८ | २१३.३ | ७९०.७ | १,४५८.० | १,८०८.७ | १७२४.८ | १८०१.१ |
| (२) तूर | ५.४५ | ९६.१ | १०५.२ | १६६.० | २४५.३ | ३६४.५ | २१५.९ | २५३.४ | ४०९.७ |
| (३) इतर कडधान्ये | ३.५२ | ११२.५ | १६०.० | १५०.० | १९६.५ | १४३.१ | १३५.३ | ६६.९ | १६३.७ |
| **एकूण - कडधान्ये** | **१०.४४** | **९९.२** | **१३९.२** | **१६७.३** | **३०५.६** | **४४४.०** | **४१३.०** | **३९७.७** | **५२२.६** |
| **एकूण - अन्नधान्ये** | **५२.६६** | **९०.६** | **१२०.४** | **१०६.८** | **१६८.२** | **१९२.४** | **१८८.४** | **१७०.९** | **२१८.८** |
| **२. अन्नधान्येतर** | | | | | | | | | |
| **(अ) तेलबिया** | | | | | | | | | |
| (१) भूईमूग | ७.२३ | ७१.४ | १५८.९ | ७६.२ | ७४.३ | ६६.१ | ५४.३ | ४६.२ | ५८.६ |
| (२) तीळ | ०.५७ | ९४.२ | २२३.७ | ८८.९ | ५८.९ | १९.२ | १२.५ | १७.९ | ४०.० |
| (३) मोहरी, राई आणि जवस | ०.७८ | ७३.४ | ८६.५ | ३०.८ | ५.१ | ११.१ | १९.१ | १५.५ | १८.९ |
| (४) एरंडी | ०.०१ | २५.० | १६६.७ | ३५८.३ | ३३३.३ | ३५९.० | ८८.० | ८९.४ | ६५.४ |
| (५) सूर्यफूल | ०.५७ | ७६.८ | ६०९.८ | ३५२.३ | २६७.३ | २४.५ | २९.१ | ४.८ | १६.५ |
| **एकूण - तेलबिया** | **९.१६** | **७३.३** | **१८४.८** | **९०.६** | **७९.८** | **५६.२** | **४७.२** | **३९.३** | **५१.४** |
| **(ब) तंतू पिके** | | | | | | | | | |
| (१) कापूस | ९.८९ | ११०.४ | १२८.६ | १२३.६ | ५१२.३ | ६९३.१ | ५८९.० | ६११.४ | ५०६.३ |
| (२) अंबाडी | ०.०४ | ४४.५ | ३८.० | ३६.५ | २६.४ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| **एकूण - तंतू पिके** | **९.९३** | **११०.१** | **१२८.२** | **१२३.२** | **५१०.४** | **६९०.४** | **५८६.७** | **६०८.९** | **५०४.२** |
| **(क) संकीर्ण** | | | | | | | | | |
| (१) ऊस | २५.९७ | ११४.३ | १५८.२ | १८६.९ | २९७.२ | ४२१.० | ५११.८ | ४२४.६ | ४६१.६ |
| (२) तंबाखू | ०.१४ | ६८.३ | ११७.३ | १३८.१ | ३२.७ | १७.७ | ३३.२ | ११.७ | ३१.७ |
| (३) बटाटा | ०.२२ | ८४.२ | १२०.९ | १२१.९ | उ.ना. | उ.ना. | ४६९.० | ६५०.३ | ५३५.३ |
| (४) मिरची | १.९२ | १०७.१ | १०२.२ | ८२.० | उ.ना. | उ.ना. | ५२५.२ | ७३२.४ | ८०८.२ |
| **एकूण - संकीर्ण** | **२८.२५** | **११३.३** | **१५३.९** | **१७९.०** | **२७३.४** | **३८७.०** | **५१०.०** | **४४५.२** | **४४०.४** |
| **एकूण - अन्नधान्येतर** | **४७.३४** | **१०४.९** | **१५४.५** | **१५०.२** | **२८५.६** | **३८६.६** | **४३६.५** | **४०१.०** | **३७८.५** |
| **सर्व पिके** | **१००.००** | **९७.४** | **१३६.५** | **१२७.४** | **२२३.८** | **२८४.३** | **३०४.९** | **२७९.८** | **२९४.४** |

टीप - २०१६-१७ ते २०२४-२५ चे निर्देशांक अस्थायी आहेत. उ.ना. उपलब्ध नाही.

*आधार*- कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन.

## परिशिष्ट ७.५

## सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी

(₹ कोटी)

| वर्ष | पाणीपट्टी आकारणी | | | वसुली | | | वर्ष अखेर शिल्लक थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| २०००-०१ | ७४.४८ | ३६२.६० | ४३७.०८ | ४१.२३ | १५३.९९ | १९५.२२ | २२३.३९ | ५७१.३० | ७९४.६९ |
| २००१-०२ | ८४.७२ | ३६८.८३ | ४५३.५५ | ४३.५७ | २०८.१२ | २५१.६९ | २६४.५४ | ७३२.०१ | ९९६.५५ |
| २००२-०३ | ८३.१७ | ३६०.६८ | ४४३.८५ | ४२.०२ | ३३५.५० | ३७७.५२ | ३०३.७९ | ७५१.९९ | १,०५५.७८ |
| २००३-०४ | ९३.०३ | ३६०.२६ | ४५३.२९ | ४२.८९ | ३३५.२० | ३७८.०९ | ३७६.६३ | ३५३.०६ | ७२९.६९ |
| २००४-०५ | ७८.६९ | ४१८.४४ | ४९७.१३ | ४५.७८ | ४०२.५७ | ४४८.३५ | ४१५.५९ | ३७८.५९ | ७९४.१८ |
| २००५-०६ | ६८.२५ | ३५०.२८ | ४१८.५३ | ६४.०३ | ३४९.४५ | ४१३.४८ | ४१०.१८ | २८२.०९ | ६९२.२७ |
| २००६-०७ | ९०.७० | ४०८.७५ | ४९९.४५ | ७४.७२ | ४२०.२६ | ४९४.९८ | ४२७.०१ | २४५.८२ | ६७२.८२ |
| २००७-०८ | ११०.३५ | ५६३.८९ | ६७४.२४ | ७०.४७ | ५५६.५४ | ६२७.०१ | ४७३.७० | २७५.२० | ७४८.९० |
| २००८-०९ | ११२.९५ | ६९५.३७ | ८०८.३२ | ७१.०५ | ६०२.११ | ६७३.१६ | ५३१.१० | ४६६.३८ | १,००४.६१ |
| २००९-१० | ९५.०० | ७१५.११ | ८१०.११ | ६९.९४ | ७३२.६९ | ८०२.६३ | ५६१.७७ | ४६६.३८ | १,०२८.१५ |
| २०१०-११ | ९६.२४ | ६७०.४६ | ७६६.७० | ७९.०३ | ६६६.८७ | ७४५.९० | ७४५.९० | ४६८.६२ | १,०४७.९० |
| २०११-१२ | १०९.७३ | ५४१.०६ | ६५०.७९ | ७९.१३ | ५४१.१३ | ६२०.२६ | ६०८.८७ | ४६१.७४ | १,०७०.६१ |
| २०१२-१३ | ८२.९८ | ६७०.१२ | ७५३.१० | ६३.१० | ४४३.०५ | ५०६.१५ | ६१८.७८ | ६५६.५२ | १,२७५.३० |
| २०१३-१४ | ७०.३७ | ५३६.६७ | ६०७.०४ | ५७.५७ | ४५७.२० | ५१४.७७ | ६३१.४९ | ७२८.२४ | १,३५९.७३ |
| २०१४-१५ | ७८.१५ | ५९३.५९ | ६७१.७४ | ६१.९७ | ५७४.५३ | ६३६.५० | ६४८.२९ | ६९५.८० | १,३४४.०९ |
| २०१५-१६ | ८०.०४ | ६६०.१३ | ७४०.१६ | ४९.१६ | ५२३.४२ | ५७२.५९ | ६७९.०२ | ८३५.१३ | १,५१४.१५ |
| २०१६-१७ | ७३.०५ | ६९०.४७ | ७६३.५२ | ५९.४८ | ५१३.४३ | ५७२.८९ | ६९३.९९ | १,०१०.२९ | १,७०४.२८ |
| २०१७-१८ | ९३.७२ | ७३५.०६ | ८२८.७८ | ७४.३० | ६१३.८४ | ६८८.१४ | ७१४.०० | १,१३५.१९ | १,८४९.१९ |
| २०१८-१९ | १०५.७९ | १,०३०.९५ | १,१३६.७४ | ७८.२७ | ९६५.८७ | १,०४४.१४ | ७४९.०७ | १,१९८.५२ | १,९४७.५९ |
| २०१९-२० | ११४.०३ | १,१९५.६९ | १,३०९.७२ | ५९.९७ | ९०८.३४ | ९६८.३१ | ८०९.४० | १,५९३.७१ | २,४०३.११ |
| २०२०-२१ | १३०.५७ | १,००४.०३ | १,१३४..६० | ९३.७१ | ९०१.४४ | ९९५.१५ | ८४६.६२ | १,६९७.८९ | २,५४४.५१ |
| २०२१-२२ | १८०.८८ | १,४७१.२९ | १,५९८.१७ | १०१.७६ | १,०५८.३६ | १,१६०.१२ | ९२२.४२ | २,०५९.१७ | २,९८१.५९ |
| २०२२-२३ | १७२.८२ | २,२११.२७ | २,३८३.८९ | १०३.३७ | १,४४८.१८ | १,५५१.५५ | ९९८.२८ | २,८२२.८६ | ३,८२१.१४ |
| २०२३-२४ | ४५७.४० | २,९७७.७४ | ३,४३५.१४ | १०५.५० | १,९८२.४३ | २,०८७.९३ | १,३४८.५९ | ३,८३४.४० | ५,१८२.९९ |
| २०२४-२५* | १८५.४३ | ३,०५२.६६ | ३,२३८.०९ | ११८.६४ | २,२१४.७० | २,३३३.३४ | १,४१५.३८ | ४,६७२.३६ | ६,०८७.७४ |

*आधार*—मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, छत्रपती संभाजी नगर

* अस्थायी

## परिशिष्ट ७.६

## राज्यातील पशुधन आणि कुक्कुटादी पक्षी

('०००)

| पशुधन गणना वर्ष | गाई-बैल | म्हशी -रेडे | मेंढ्या व शेळ्या | इतर पशुधन + | एकूण पशुधन | दर शंभर हेक्टर चराई व कुरण क्षेत्रामागे शेळ्या, मेंढ्या (संख्या) | दर शंभर हेक्टर निव्वळ पिकांखालील क्षेत्रामागे पशुधन (संख्या) | दर लाख लोकसंख्ये मागे पशुधन | एकूण कुक्कुटादी पक्षी $ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १९६१ | १५,३२८ | ३,०८७ | ७,२७३ | ३६० | २६,०४८ | ५१२ | १४४ | ६६ | १०,५७८ |
| १९६६ | १४,७२९ | ३,०४२ | ७,३२६ | ३५२ | २५,४४९ | ५२२ | १४० | ५७ | ९,९०२ |
| १९७२ | १४,७०५ | ३,३०१ | ८,०३८ | ३१७ | २६,३६१ | ४९१ | १६४ | ५२ | १२,२१७ |
| १९७८ | १५,२१८ | ३,८९९ | १०,१९९ | ३२६ | २९,६४२ | ६५० | १६२ | ५१ | १८,७५१ |
| १९८२ | १६,१६२ | ३,९७२ | १०,३७६ | ४०९ | ३०,९१९ | ६७३ | १७५ | ४८ | १९,८४५ |
| १९८७ | १६,९८३ | ४,७५५ | १२,०६८ | ४४९ | ३४,२५५ | ९५० | १८९ | ४८ | २४,८३० |
| १९९२ | १७,४४१ | ५,४४७ | १३,०१६ | ४८९ | ३६,३९३ | ९४० | २०२ | ४६ | ३२,१८७ |
| १९९७ | १८,०७१ | ६,०७३ | १४,८०२ | ६९२ | ३९,६३८ | १,१०४ | २२३ | ५० | ३५,३९२ |
| २००३ | १६,७३८ | ६,०८४ | १३,६२४ | ६१२ | ३७,०५८ | १,०१६ | २१३ | ३६ | ३४,५९६ |
| २००७ | १६,१८४ | ६,०७३ | १३,३०१ | ३९७ | ३५,९५५ | १,०६४ | २०६ | ३७ | ६४,७५६@ |
| २०१२ | १५,४८४ | ५,५९५ | ११,०१६ | ३९४ | ३२,४८९ | ८८५ | १८७ | २९ | ७७,७९५@ |
| २०१९ | १३,९९३ | ५,६०४ | १३,२८५ | १९८ | ३३,०८० | ९७३ | १९९ | २६ | ७४,२९८@ |

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

+ इतर पशुधन यामध्ये डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट व गाढवे यांचा समावेश.

$ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये टर्की, क्वेल व इतर कुक्कुटादी पक्षी.

@ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये पोल्ट्रीफार्म मधील पक्षी समाविष्ट आहे.

*आधार* - पशुधन गणना

# ८ उद्योग आणि सहकार





# ८. उद्योग आणि सहकार

८.१ महाराष्ट्र हे भारतातील अग्रगण्य औद्योगिक व आर्थिक केंद्र असून, उद्योजकता, नवोपक्रम आणि सहकाराची समृध्द परंपरा सातत्याने पुढे नेत आहे. नवकल्पना आणि धोरणात्मक गुंतवणूकीसह औद्योगिक पाया अधिक बळकट करून प्रगत आणि सक्षम राज्य म्हणून महाराष्ट्राने स्वत:ला स्थापित केले आहे. उद्योग आणि सहकार क्षेत्राला मजबूत करून आर्थिक वाढ आणि विकासाला चालना देणे हे शासनाच्या धोरणांचा व उपक्रमाचा उद्देश आहे.

## उद्योग

८.२ भक्कम पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ, प्रगत धोरणे आणि उद्योगस्नेही वातावरण यामुळे राज्याचे औद्योगिक क्षेत्र देशातील महत्त्वाच्या औद्योगिक केंद्रांपैकी एक मानले जाते. वाहन उद्योग, अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान आधारित सेवा, औषधनिर्माण, वस्त्रोद्योग, इलेक्ट्रॉनिक्स, लॉजिस्टिक्स आणि अन्न प्रक्रिया उद्योग यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये राज्याने औद्योगिक पाया विकसित केला आहे. व्यवसाय सुलभीकरण, एकल खिडकी मंजूरी प्रणाली, औद्योगिक पार्कसची उभारणी, लॉजिस्टिक्स व वस्त्रोद्योग केंद्रांचा विकास आणि उदयोन्मुख क्षेत्रांना प्रोत्साहन यासारखे उपक्रम यांमुळे राज्यात औद्योगिक वातावरण तयार होण्यास मदत झाली आहे. राज्याचे औद्योगिक क्षेत्र देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांना आकर्षित करत असून राज्याने देशात थेट परकीय गुंतवणूकीत आपले अव्वल स्थान कायम राखले आहे.

८.३ 'वस्तुनिर्माण', 'बांधकाम' तसेच 'वीज, वायू, पाणीपुरवठा व इतर उपयोगिता सेवा' या उपक्षेत्रांमधील योगदानासह राज्याने 'उद्योग' क्षेत्रात मागील पाच वर्षात सातत्यपूर्ण वाढ नोंदविली आहे. सन २०२५-२६ च्या पुर्वानुमानानुसार, 'उद्योग' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धिमध्ये ५.७ टक्के वाढ अपेक्षित असून ती सन २०२४-२५ च्या पहिल्या सुधारित अंदाजामध्ये ४.३ टक्के आहे. सन २०२५-२६ मध्ये 'उद्योग', क्षेत्राची सांकेतिक स्थूल राज्य मुल्यवृद्धी ₹ ११,०९,१९४ कोटी अपेक्षित असून ती सन २०२४-२५ च्या पहिल्या सुधारित अंदाजानुसार ₹ १०,३५,९४१ कोटी इतकी आहे. 'उद्योग' क्षेत्रातील उपक्षेत्रांपैकी 'वस्तुनिर्माण' क्षेत्राचा वाटा सर्वाधिक असून, सन २०२५-२६ मध्ये या क्षेत्रात ५.९ टक्के वाढ अपेक्षित आहे.

### धोरणात्मक उपक्रम:

८.४ **महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण - २०२५:** आधुनिक तंत्रज्ञानाधारित वस्तू निर्माणावर लक्ष केंद्रित करणे, मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती, शाश्वत विकास आणि आत्मनिर्भरतेला प्रोत्साहन तसेच व्यवसायासाठी सुलभ वातावरण निर्मितीद्वारे महाराष्ट्राला गुंतवणूकीसाठी एक विश्वासार्ह जागतिक हब बनविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण - २०२५ जाहीर केले आहे.

**महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण - २०२५ ची मुख्य उद्दिष्टे :**

- राज्यातील सर्व क्षेत्रांतील गुंतवणूकक्षम प्रकल्प एकत्रित करणारे 'इन्वेस्ट महाराष्ट्र' हे एकसंध डिजीटल व्यासपीठ स्थापन करणे
- स्थूल राज्य मूल्यवृध्दिमध्ये उद्योग क्षेत्राचा हिस्सा सन २०२४ मधील २५ टक्के वरून सन २०३६ मध्ये २७ टक्के आणि सन २०४७ मध्ये ३० टक्के पर्यंत वाढविणे
- वस्तुनिर्माण क्षेत्राचा हिस्सा सन २०२५ मधील १३.८ टक्के वरून सन २०४७ पर्यंत २० टक्के पर्यंत वाढविणे
- वस्तुनिर्माण व सेवा क्षेत्रात अंदाजे ५० लाख रोजगार निर्मिती करणे
- प्रादेशिक विकासाला प्रोत्साहन आणि दरडोई उत्पन्न वाढ
- महाराष्ट्राला एक अग्रगण्य जागतिक व्यवसाय केंद्र म्हणून प्रस्थापित करणे

८.४.१ राज्याने विद्यमान औद्योगिक विकास उपक्रमांना बळकटी देण्यासाठी सन २०२५ मध्ये विविध प्रगतीशील क्षेत्रांसाठी धोरणे तयार केली आहेत.

- महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण - २०२५
- महाराष्ट्र रत्ने व आभूषणे धोरण - २०२५
- महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी (AVGC-XR) धोरण २०२५
- महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र धोरण २०२५
- महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५
- महाराष्ट्र नवोपक्रम, उद्योजकता आणि नवोन्मेष धोरण २०२५
- महाराष्ट्र जहाजबांधणी आणि जहाज पुनर्वापर धोरण २०२५
- महाराष्ट्र कृत्रिम वाळू (एम - सँड) प्रचालन धोरण २०२५
- महाजेनकोचे ॲश धोरण, २०२५

८.५ **व्यवसाय सुलभीकरण उपक्रम:** व्यवसाय सुधार कृती आराखडा (बीआरएपी) २०२४ च्या आठव्या आवृत्तीनुसार, व्यवसाय नोंदणी, बांधकाम परवाना सुलभता आणि व्यवसायासाठी जमीनीची सुलभ उपलब्धता या तीन व्यवसाय केंद्रित सुधारणा क्षेत्रात महाराष्ट्राला 'टॉप अँचिव्हर' म्हणून सन्मानित करण्यात आले. राज्य बीआरएपी २०२५ ची अंमलबजावणी करीत असून, यामध्ये एकल खिडकी प्रणाली तसेच जिल्हास्तरीय व्यवसाय सुधार कृती आराखड्यांचा समावेश आहे.

८.६ **एकल खिडकी प्रणाली:** राज्य शासनाने गुंतवणूकदारांच्या एकात्मिक सुलभता सोयीसाठी महाराष्ट्र उद्योग व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र (मैत्री) स्थापित केला आहे. गुंतवणुकीविषयी सर्व सेवा व माहिती एकाच ठिकाणी मैत्री पोर्टलमार्फत उपलब्ध करुन दिली जाते. उद्योजकांना उद्योगांशी संबंधित १४ विभागांकडून देण्यात येणाऱ्या एकूण १२८ सेवा 'मैत्री पोर्टल २.०' मार्फत उपलब्ध करून दिल्या जात आहे. मैत्री कक्षामार्फत माहे नोव्हेंबर २०२५ अखेर एकूण प्राप्त ३,८१,३७९ अर्जांपैकी ३,६४,७७० अर्जांचा निपटारा करण्यात आला. तर नोव्हेंबर २०२५ अखेर एकूण ३,२२८ प्राप्त झालेल्या तक्रारींपैकी ३,१५९ तक्रारींचे निराकरण करण्यात आले.

## राज्यातील औद्योगिक गुंतवणूक

८.७ औद्योगिक उद्योजक निवेदनपत्राचा (आयईएम) वापर व्यवसाय स्थापन करण्यासाठीचा आणि व्यावसायिक उत्पादनास सुरुवात केल्याबाबतचा अहवाल नोंदविण्यासाठी केला जातो. या निवेदनपत्राच्या 'भाग अ' मध्ये गुंतवणूकीची इच्छुकता आणि इतर तपशील नोंदविले जातात तर व्यवसाय सुरू करण्याबाबत व गुंतवणूक इत्यादी माहिती 'भाग ब' द्वारे कळवली जाते. दोन्ही बाबी भारत सरकारच्या 'जीटुबी' पोर्टलद्वारे ऑनलाइन दाखल आणि स्विकृत केल्या जाऊ शकतात. राज्यात जानेवारी २०२२ ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत, ₹ २,१४,७५४ कोटी अपेक्षित गुंतवणूकीसह ६३८ औद्योगिक प्रकल्पांची त्यांचे प्रकल्प स्थापन करीत असल्याबाबत भाग अ स्विकृतीनुसार नोंद झाली आहे, तर निवेदनपत्राच्या भाग ब स्वीकृतीनुसार ५५२ औद्योगिक प्रकल्पांनी ₹ १,१५,२३३ कोटीच्या गुंतवणूकीसह व्यवसाय सुरू केल्याची नोंद केली आहे.

८.७.१ निवडक राज्यांमधील औद्योगिक उपक्रम आणि अपेक्षित गुंतवणूक (आयईएम भाग अ स्वीकृतीनुसार) तक्ता ८.१ मध्ये दिली आहे आणि निवडक राज्यांमधील मंजूर औद्योगिक उपक्रम आणि गुंतवणूक (आयईएम भाग ब स्वीकृतीनुसार) तक्ता ८.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१ निवडक राज्यांमधील औद्योगिक उपक्रम आणि अपेक्षित गुंतवणूक (आयईएम भाग अ स्विकृतीनुसार)**

| राज्य | २०२२ | | २०२३ | | २०२४+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उपक्रम (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) | उपक्रम(संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) | उपक्रम (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) |
| आंध्र प्रदेश | ५४ | १६,१३७ | ५१ | १२,२३८ | २६ | २८,४७४ |
| बिहार | ७ | १,३०५ | ८ | ८५० | ३ | ३६५ |
| छत्तीसगड | ३५ | ७,४४३ | ४२ | १०,१९६ | २० | २५,४०४ |
| दिल्ली | २२ | १५,१०२ | २४ | ३,२८५ | १७ | ५,६२७ |
| गुजरात | १९१ | १,००,०८९ | १९० | ६२,५३५ | ११२ | ६३,९४१ |
| हरियाणा | ३८ | ३,३०२ | ६० | १८,९११ | २७ | २४,९८४ |
| कर्नाटक | १०३ | ७०,६९५ | ६६ | २१,०९७ | ३८ | १३,०५८ |
| मध्य प्रदेश | ७५ | ११,९५६ | ६१ | २२,१६३ | ४७ | ५,४०१ |
| **महाराष्ट्र** | **२३२** | **३८,९८६** | **२६४** | **५९,५५१** | **१४२** | **१,१६,२१७** |
| ओडीशा | ५५ | ७२,३४५ | ५० | २,१०,८३७ | ३० | ६७,९४७ |
| पंजाब | २६ | ३,७८९ | २६ | २,९४० | ११ | ३७३ |
| राजस्थान | ४५ | २२,१५५ | ६० | १६,२८९ | २४ | १२,७९१ |
| तामीळनाडू | ६८ | ९,३८३ | ९४ | २०,०१० | ३३ | ४,००१ |
| तेलंगणा | ३४ | ५,८८७ | ५९ | १३,२४२ | २५ | ४,०६८ |
| उत्तर प्रदेश | ७१ | १०,३७५ | ७० | २१,५७७ | ३४ | १८,८३६ |
| पश्चिम बंगाल | २६ | ४,५३२ | ३७ | ६,४८६ | २२ | २०,९०३ |
| **अखिल भारत** | **१,१८५** | **४,२४,१०१** | **१,२६७** | **५,१०,८५२** | **६६३** | **४,१८,३५६** |

\+ ऑगस्ट पर्यंत

*आधार:* उद्योग व आंतरिक व्यापार संवर्धन विभाग, भारत सरकार यांचा आयईएम सांख्यिकी अहवाल, सप्टेंबर २०२५

**तक्ता ८.२ निवडक राज्यांमधील औद्योगिक उपक्रम आणि गुंतवणूक (आयईएम भाग ब स्विकृतीनुसार)**

| राज्य | २०२२ | | २०२३ | | २०२४+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उपक्रम (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) | उपक्रम (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) | उपक्रम (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) |
| आंध्र प्रदेश | ४६ | ४५,२१७ | ४९ | १०,५३६ | ४९ | १०,८८८ |
| बिहार | ४ | ६४६ | ११ | १,२५७ | ७ | १,३३२ |
| छत्तीसगड | २७ | २,७६६ | १७ | १,३१० | २५ | १७,५१८ |
| दिल्ली | ० | ० | ७ | २,९२४ | ५ | १२० |
| गुजरात | १५४ | ३९,२५९ | १८० | ६१,४०७ | १४० | ३३,७८९ |
| हरियाणा | २० | २,८९१ | ३७ | ६,६५२ | २७ | ३,४२७ |
| कर्नाटक | ५७ | ८,०४२ | ४१ | ६,३६८ | ३० | ४,१५८ |
| मध्य प्रदेश | ५३ | ७,१५३ | ६७ | १२,८०१ | ७७ | १६,१४० |
| **महाराष्ट्र** | **२०१** | **३५,६७५** | **१८९** | **५२,२०१** | **१६२** | **२७,३५७** |
| ओडीशा | २२ | ३७,२६६ | २९ | २५,१३८ | ३० | ४३,९४७ |
| पंजाब | ३१ | ४,४६६ | २९ | ३२,१८२ | २३ | ३,५७७ |
| राजस्थान | ४३ | १७,४०३ | ३७ | ८,८६८ | २७ | १६,१०० |
| तामीळनाडू | ६० | ९,२६८ | ४२ | ६,७४६ | ४१ | ४,६९१ |
| तेलंगणा | ३४ | ३,९१५ | ३१ | ३,४६४ | १५ | ३,२५२ |
| उत्तर प्रदेश | ५३ | ८,८९६ | ९६ | १३,७२० | ६३ | ११,२३३ |
| पश्चिम बंगाल | २६ | ३,७३५ | २७ | ४,९३० | २८ | २,४६५ |
| **अखिल भारत** | **९१६** | **२,५०,०६४** | **९६८** | **२,७६,९२५** | **८२६** | **२,११,३१४** |

*आधार:* उद्योग व आंतरिक व्यापार संवर्धन विभाग, भारत सरकार यांचा आयईएम सांख्यिकी अहवाल, सप्टेंबर २०२५ + ऑगस्ट पर्यंत

८.८ **मॅग्नेटिक महाराष्ट्र :** गुंतवणूक आकर्षित करणे आणि रोजगार निर्मितीच्या उद्देशाने राज्यात जून २०२० मध्ये मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाअंतर्गत जून २०२० ते ऑक्टोबर २०२५ पर्यंत ₹ २६,८८,४०८ कोटी गुंतवणूकीच्या सुमारे २६.६९ लाख अपेक्षित रोजगार निर्मितीची क्षमता असलेल्या ३०३ प्रकल्पांचे सामंजस्य करार करण्यात आले.

८.९ **मोठे प्रकल्प :** राज्यात सन २००५ पासून मोठ्या प्रकल्पांच्या धोरणाची अंमलबजावणी होत आहे. राज्याने सुरवातीपासून डिसेंबर २०२५ पर्यंत ₹ १९,२७,१९७ कोटी प्रस्तावित गुंतवणूक आणि १३.८४ लाख अपेक्षित रोजगार असणाऱ्या १,१६९ मोठ्या प्रकल्पांना मान्यता दिली आहे. यापैकी ₹ २,०६,८९५ कोटी गुंतवणूक आणि सुमारे ३.३० लाख रोजगार अपेक्षित असलेल्या ९१२ प्रकल्पांना पात्रता प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

८.१० **थेट विदेशी गुंतवणूक:** भारत सरकारच्या उद्योग व आंतरिक व्यापार संवर्धन विभागाने (DPIIT) प्रकाशित केलेल्या माहितीनुसार, एप्रिल २००० ते सप्टेंबर २०१९ या कालावधीत राज्यात (दादरा व नगर हवेली तसेच दमण व दीव यांचा समावेश करून) झालेली थेट विदेशी गुंतवणूक (इक्विटी) ₹ ७,३९,३०६ कोटी इतकी होती, जी देशातील एकूण विदेशी गुंतवणूकीच्या च्या २९ टक्के होती. माहे ऑक्टोबर २०१९ ते मार्च २०२५ या कालावधीत महाराष्ट्रात झालेली विदेशी गुंतवणूक ₹ ६,९७,३०४ कोटी इतकी असून, ती देशातील एकूण विदेशी गुंतवणूकीच्या ३१ टक्के आहे व सर्व राज्यांमध्ये हा वाटा सर्वाधिक आहे. निवडक राज्यांमधील थेट विदेशी गुंतवणूक तक्ता ८.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.३ निवडक राज्यांमधील थेट विदेशी गुंतवणूक**

(₹ कोटी)

| राज्य | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | संचित (ऑक्टोबर २०१९ - मार्च २०२५) | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | संचित थेट विदेशी गुंतवणूक (इक्विटी) | देशातील एकूण थेट विदेशी गुंतवणूकीशी टक्केवारी |
| **महाराष्ट्र** | **१,१८,४२२** | **१,२५,१०१** | **१,६४,८७५** | **६,९७,३०४** | **३१** |
| कर्नाटक | ८३,६२८ | ५४,४२७ | ५६,०३० | ४,४५,५१३ | २० |
| गुजरात | ३७,०५९ | ६०,६०० | ४७,९४७ | ३,४७,५७२ | १६ |
| दिल्ली | ६०,११९ | ५३,९८० | ५१,५४० | २,९५,६१३ | १३ |
| तामीळनाडू | १७,२४७ | २०,१५७ | ३१,१०३ | १,१५,३४६ | ५ |
| हरियाणा | २०,७३५ | १५,७९७ | २६,६०० | १,०१,८६९ | ५ |
| तेलंगणा | १०,३१९ | २५,०९४ | २५,३५१ | ८६,२११ | ४ |
| राजस्थान | ७,२१८ | २,१९५ | ३,१७० | २१,२२२ | १ |
| झारखंड | ४४ | ९० | ६१ | १९,४४३ | १ |
| उत्तर प्रदेश | ३,३७३ | २,७६२ | ३,७०० | १६,३१६ | १ |
| **अखिल भारत** | **३,६७,४३५** | **३,६७,८९९** | **४,२१,९२९** | **२२,०८,५७८** | **१००** |

*आधार:* उद्योग व आंतरिक व्यापार संवर्धन विभाग, भारत सरकार

## सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम

८.११ सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांचे सक्षमीकरण करणे व त्यांना प्रोत्साहन देणे यासाठी राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहेत. योजनेच्या सुरुवातीपासून (जुलै २०२०) ते माहे डिसेंबर २०२५ पर्यंत, राज्यातील एकूण ६३.८५ लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची उद्यम नोंदणी पोर्टलवर नोंदणी झाली असून त्यातील रोजगार २५२.८४ लाख होता. विभागनिहाय उद्यम नोंदणी झालेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम तक्ता ८.४ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ८.४ विभागनिहाय उद्यम नोंदणी झालेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम**

(जुलै २०२० ते डिसेंबर २०२५)

| विभाग | सूक्ष्म उपक्रम* | | लघु उपक्रम* | | मध्यम उपक्रम* | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रोजगार (लाख) | संख्या | रोजगार (लाख) | संख्या | रोजगार (लाख) |
| कोकण (मुंबई वगळून) | ९,०६,४७८ | ३०.१७ | ४०,३५६ | २.०६ | १,१५१ | १.५२ |
| मुंबई# | ८,०७,५४८ | २५.१३ | ६०,६९८ | १.९६ | ४,०९५ | ३.९९ |
| नाशिक | ८,०६,९७४ | २०.२९ | १४,०८५ | १.५१ | १,१४६ | १.५७ |
| पुणे | १५,६१,७९९ | ५७.९१ | १८,५०३ | ५.३४ | ७,०६१ | ४.२८ |
| छत्रपती संभाजीनगर | ८,०२,०३० | २९.७२ | ८,२८८ | ८.१८ | २,०६४ | १.२३ |
| अमरावती | ४,८४,१०३ | १३.८१ | ४,०९२ | ३.१७ | ९२३ | १.०० |
| नागपूर | ८,४२,८६७ | ३५.८९ | ९,१६५ | २.०३ | १,६४८ | १.९८ |
| **एकूण** | **६२,११,७९८** | **२१२.९२** | **१,५५,१८७** | **२४.२८** | **१८,०८८** | **१५.६०** |

*आधार :* उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन    * अस्थायी    # शहर व उपनगर जिल्हे यांसह

## महाराष्ट्रातून निर्यात

८.१२ राज्य हे देशातील प्रमुख निर्यातदारांपैकी एक आहे आणि जागतिक निर्यातीत राज्याचा हिस्सा वाढविण्यासाठी विविध उपक्रमाद्वारे सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण २०२३, एक जिल्हा एक उत्पादन, जिल्हा हे निर्यातकेंद्र, राज्य व जिल्हा निर्यात प्रोत्साहन परिषद, इत्यादी राज्याने हाती घेतलेले काही महत्त्वाचे उपक्रम आहेत. रत्ने व आभूषणे, अभियांत्रिकी वस्तू, कृषी व संलग्न उत्पादने, रसायने, धातू व धातूजन्य उत्पादने, औषधे, इलेक्ट्रॉनिक्स व विद्युत उपकरणे, कापड व तयार कपडे, ही राज्यातून निर्यात होणारी काही प्रमुख उत्पादने आहेत. विविध क्षेत्रातील निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात ३७ विशेष आर्थिक क्षेत्रे (एसईझेड), आठ कृषी निर्यात क्षेत्रे आणि २७ निर्यात केंद्रित औद्योगिक पार्कस आहेत.

**आलेख ८.१ : सन २०२४-२५ मध्ये राज्यातून झालेली निर्यात**




८.१२.१ राज्यातून सन २०२४-२५ मध्ये ₹ ५,५७,२७० कोटी मुल्याची निर्यात करण्यात आली असून सन २०२५-२६ मध्ये नोव्हेंबर पर्यंत ₹ ४,००,६८५ कोटी मुल्यांची निर्यात झाली आहे. सन २०२४-२५ दरम्यान देशाच्या एकूण निर्यातीमध्ये १५ टक्के वाटा उचलत राज्य दुसऱ्या स्थानावर आहे.

**आलेख ८.२ : महाराष्ट्रामधून झालेली निर्यात**



८.१३ **'एक जिल्हा-एक उत्पादन' उपक्रम (ओडीओपी):** जिल्ह्यांच्या वैविध्यपूर्ण क्षमतांचा उपयोग, स्थानिक उद्योजकता व नवनिर्मितीस सहाय्य, सांस्कृतिक वारशाचे जतन आणि शाश्वत व सर्वसमावेशक विकास साध्य करणे, हे 'एक जिल्हा-एक उत्पादन' उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. या उपक्रमाअंतर्गत राज्याने ३६ जिल्ह्यांमधली ७२ उत्पादने निश्चित केली आहेत.

**राष्ट्रीय एक जिल्हा-एक उत्पादन पुरस्कार २०२४:**

- राज्यास ओडीओपी उपक्रमाअंतर्गत राष्ट्रीय सुवर्ण पुरस्कार प्राप्त
- जगप्रसिद्ध हापूस आंबा उत्पादनासाठी रत्नागिरी जिल्ह्यास कृषी श्रेणीत सुवर्ण पुरस्कार
- वैशिष्ट्यपूर्ण संत्रा उत्पादनासाठी नागपूर जिल्ह्यास रौप्य पुरस्कार
- संत्रा लागवडीतील योगदानाबद्दल अमरावती जिल्ह्यास कांस्य पुरस्कार
- द्राक्ष उत्पादनासाठी नाशिक जिल्ह्यास विशेष उल्लेखनीय पुरस्कार
- बिगर कृषी श्रेणीत कापूस जिनिंग व प्रेसिंग उद्योगासाठी अकोला जिल्ह्यास विशेष उल्लेखनीय पुरस्कार

## औद्योगिक विकासासाठी योजना/कार्यक्रम

८.१४ **सूक्ष्म आणि लघु उपक्रम-समुह विकास कार्यक्रम:** सूक्ष्म आणि लघु उपक्रमांच्या सर्वांगीण विकासासाठी भारत सरकार सन २००६ पासून हा कार्यक्रम राबवित आहे. राज्यात या कार्यक्रमांतर्गत ऑक्टोबर २०२५ पर्यंत ५३ सामायिक सुविधा केंद्रे उभारणीसाठी ₹ ४०९.४१ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले असून, त्यापैकी २८ सामाईक सुविधा केंद्रे कार्यरत आहेत.

८.१५ **महाराष्ट्र राज्य औद्योगिक समुह विकास कार्यक्रम:** राज्य शासनाद्वारे २०१४ पासून राज्यातील 'उद्योग विरहीत' जिल्हे आणि नक्षलग्रस्त भागात उद्योगांच्या विकासासाठी हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत २७९ क्लस्टर प्रकल्पांचा विकास सुरू करण्यात आला आहे. त्यापैकी १२८ क्लस्टर प्रकल्पांना सामायिक सुविधा केंद्रांच्या स्थापनेसाठी मान्यता देण्यात आली आहे. राज्यात माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत एकूण ८० सामायिक सुविधा केंद्रे कार्यान्वित असून त्यावर ₹ ३७६.०८ कोटी खर्च झाला.

८.१६ **सामूहिक प्रोत्साहन योजना:** समतोल प्रादेशिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि औद्योगिकदृष्ट्या कमी विकसित भागात उद्योगांचा प्रसार व्हावा याकरिता या भागातील नवीन किंवा विस्तारीत उद्योग घटकांसाठी राज्य शासन सामूहिक प्रोत्साहन योजना राबवित आहे. सामूहिक प्रोत्साहन योजनेचा तपशील तक्ता ८.५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ८.५ सामूहिक प्रोत्साहन योजनेचा तपशील**

(₹ कोटी)

| तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| **औद्योगिक प्रोत्साहन अनुदान** | | | |
| विशाल प्रकल्प | ३,७९१ | ३,५२३ | २,२७० |
| मोठे उद्योग | ५७८ | ४५८ | २२१ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | ९४३ | १,२४५ | १,०४३ |
| **इतर प्रोत्साहने** | | | |
| मोठे उद्योग | ३० | १६ | २७ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | २५६ | ३५७ | २७८ |
| इलेक्ट्रीक वाहन | १०० | ० | ० |
| **एकूण** | **५,७००** | **५,६००** | **३,८४०** |

*आधार:* उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन   + ऑक्टोबर पर्यंत

## संस्थात्मक पाठबळ आणि औद्योगिक पायाभूत सुविधा

८.१७ **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ:** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ही राज्याची औद्योगिक विकास व गुंतवणूकीसाठी प्रोत्साहन देणारी प्रमुख संस्था आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे १९ सामायिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, दोन सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, चार सामायिक धोकादायक कचरा प्रक्रिया, साठवणूक व विल्हेवाट सुविधा प्रकल्प आहेत. माहे नोव्हेंबर २०२५ पर्यंत एमआयडीसी कडे १.०१ लाख हेक्टरहून अधिक जमीन असलेली ३०० औद्योगिक संकुले (१५१ मोठी औद्योगिक क्षेत्रे, १०९ लघु-औद्योगिक क्षेत्रे आणि ४० विकास केंद्रे), आशियातील सर्वात मोठे पाणीपुरवठा जाळे (प्रतिदिन १,६९६ एम. एल. डी.), उद्योगांना वीज पुरवठ्यासाठी स्वतंत्र फिडर आणि वाइन पार्क, सिल्वर पार्क, फ्लोरीकल्चर पार्क, फुड पार्क, टेक्सटाईल पार्क, ४० आय. टी. पार्क आणि दहा विशेष आर्थिक क्षेत्रे (एसइझेड) अशा विशेष पायाभूत सुविधा आहेत.

८.१७.१ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रगत सुविधा आणि किफायतशीर किंमत रचनेसह परिपूर्ण रेडी-टू-मूव-इन असे कारखाना सुरू करण्यासाठीचे तयार वातावरण 'प्लग अँड प्ले पायाभूत सुविधे' अंतर्गत उपलब्ध करुन देत आहे. त्याचबरोबर उद्योगांची कमीत कमी वेळेत उभारणी करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ भाडेतत्वावर औद्योगिक शेडसाठी जागा देखील पुरवित आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक व व्यावसायिक घटकांची माहिती तक्ता ८.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.६ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक व व्यावसायिक घटकांची माहिती**

(दि. १ जानेवारी २०२० ते ३१ डिसेंबर २०२५)

| विभाग | घटक (औद्योगिक + व्यावसायिक) (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) | रोजगार (लाख) | विकसित भूखंड (औद्योगिक + व्यावसायिक) (संख्या) |
|---|---|---|---|---|
| कोकण# | ४५,४३८ | ६९,६०७ | ०.९९ | १५,४८६ |
| नाशिक | ९,८८६ | १३,५१८ | ३.४७ | १४,८९७ |
| पुणे | १५,४३२ | १,४९,७१७ | १.०६ | १९,८१९ |
| छत्रपती संभाजीनगर | ९,४२९ | ८,२५१ | २.६१ | ११,८८१ |
| अमरावती | ३,५५५ | ८,७१९ | ०.२८ | ७,७४४ |
| नागपूर | ४,३६१ | ८१,७६३ | १.९० | ८,५३५ |
| **एकूण** | **८८,१०१** | **३,३१,५७६** | **१०.३१** | **७८,३६२** |

*आधार*: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन # मुंबई शहर व उपनगर जिल्हा एकत्रित

८.१८ **दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर:** दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर हा दिल्ली आणि मुंबई दरम्यानचा नियोजित औद्योगिक विकास प्रकल्प आहे. या प्रकल्पाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्र आणि रायगड जिल्हयातील दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र यांचा समावेश आहे.

८.१८.१ शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्र (ऑरिक) ही एक अत्याधुनिक ग्रीनफील्ड औद्योगिक टाउनशिप छत्रपती संभाजीनगरमध्ये १०,००० हेक्टरवर विकसित केली जात आहे. या प्रकल्पात रस्त्यांचे एकात्मिक नेटवर्क, भूमिगत उपयुक्त सुविधा (वीज, पाणी, पुनर्वापर केलेले पाणी आणि सांडपाणी इ.), अखंड वीज पुरवठा आणि सांडपाणी प्रक्रिया सुविधा यासह सक्षम प्लग-अँड-प्ले पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. हा प्रकल्प शहरव्यापी वाय-फाय, केंद्रीय कमांड व कंट्रोल रूम आणि ई-गव्हर्नन्स सिस्टीम यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुविधांनी सुसज्ज असल्याने बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी एक पसंतीचे ठिकाण बनले आहे. माहे डिसेंबर २०२५ पर्यंत, ऑरिकने ५४,८२९ रोजगार निर्मिती क्षमता असलेली ₹ ९१,७२९ कोटी मुल्यांची गुंतवणूक आकर्षित केली असून, त्याकरीता १,३४२ हेक्टरपेक्षा जास्त भूखंड वाटप झाले आहे.

**राज्याचे प्रमुख महत्त्वाकांक्षी प्रकल्प**:

- रांजणगाव फेज ३ व तळेगाव येथे हायटेक ईएसडीएम पार्क २.०
- दिघी बंदर औद्योगिक क्षेत्रात बल्क औषध प्रकल्प व लेदर क्लस्टर
- शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्र (ऑरिक), दिंडोरी, सिन्नर, आणि तळोजा येथे मेगा फूड पार्क व हब
- मुंबई, नवी मुंबई आणि सिंधुदुर्ग येथे स्टार्टअप्स व डेटा सेंटर
- चाकण, तळेगाव, भिवंडी, नाशिक, जालना आणि नागपूर येथे एकात्मिक व मल्टी मोडल लॉजिस्टिक्स
- ट्रान्स ठाणे क्रीक (टीटीसी) औद्योगिक क्षेत्र व तळोजा आणि नवी मुंबई येथे जेम्स अँड ज्वेलरी पार्क
- अमरावती, जळगाव, नागपूर,नाशिक आणि पुणे येथे लघु व मध्यम उपक्रम वस्त्रोद्योग पार्क/पीएम-मित्रा टेक्सटाईल पार्क
- छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, पुणे आणि अमरावती येथे कौशल्य विकास केंद्रे
- रत्नागिरी व डोंबिवली येथे अविष्कार, नाविन्यता, इनक्युबेशन व प्रशिक्षण (सीआयआयटी) संस्था

८.१८.२ दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र प्रकल्प २,४५० हेक्टर क्षेत्रावर असून त्यात ₹ ३८,००० कोटी गुंतवणूकीची क्षमता असून सुमारे १.१४ लाख रोजगार निर्मितीची अपेक्षा आहे.

८.१९ **महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ:** महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लघु उद्योगांचा विकास करण्यासाठी उद्योजकांना मदत करते आणि सल्ला, समुपदेशन, पणन, प्रशिक्षण, आयात-निर्यात, उद्योजकता विकास कार्यक्रम यासारख्या पूरक सेवा देते. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाची वार्षिक उलाढाल तक्ता ८.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.७ महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाची वार्षिक उलाढाल**

(₹ कोटी)

| बाब | २०२३-२४ | २०२४-२५* | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| पणन सहाय्य | ६.३७ | ४.२८ | ४.६३ |
| इतर | ०.८७ | ०.७८ | ०.५७ |
| **एकूण** | **७.२४** | **५.०६** | **५.२०** |

* अस्थायी + डिसेंबर पर्यंत

*आधार*: महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ

८.२० **महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ:** राज्यामध्ये खादी व ग्रामोद्योग उपक्रमांचे संघटन, विकास व विस्तारासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळामार्फत पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, कारागीर रोजगार हमी योजना, इत्यादी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. राज्यातील खादी व ग्रामोद्योग घटकांना सन २०२४-२५ मध्ये ₹ ६२ कोटी तर सन २०२५-२६ मध्ये जानेवारी पर्यंत ₹ ७३.३८ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले. खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती तक्ता ८.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.८ खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती**

| वर्ष | सहाय्यित घटकांची संख्या (लाख) | उत्पादन मूल्य (₹ कोटी) | रोजगार निर्मिती (लाख) |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | १.८७ | १,९७८ | ४.०८ |
| २०२४-२५ | १.९३ | २,६९२ | ४.४५ |
| २०२५-२६+ | १.९५ | २,७२० | ४.५९ |

*आधार*: महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ + जानेवारी पर्यंत

८.२१ **स्टार्टअप, उद्योजकता व नाविन्यता उपक्रम:** नाविन्यता आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर आघाडीचे राज्य बनवण्याच्या उद्देशाने राज्यशासनाद्वारे 'महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता व नाविन्यता धोरण २०२५' घोषित करण्यात आले आहे. राज्यातील स्टार्टअप आणि नविन्यतेसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्था ही नोडल यंत्रणा म्हणून कार्यरत आहे. राज्याने तीन व्हेंचर फंडांच्या माध्यमातून स्टार्टअप आणि सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी ₹ ५०० कोटीच्या व्हेंचर फंडिंगची तरतूद केली आहे. निवडक राज्यातील स्टार्टअपची संख्या आणि त्यातील रोजगार तक्ता ८.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.९ निवडक राज्यांतील स्टार्टअपची संख्या व त्यातील रोजगार**

(संख्या)

| राज्य | दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी | |
|---|---|---|
| | स्टार्टअप | रोजगार |
| आंध्र प्रदेश | ३,८४६ | ४२,३०६ |
| बिहार | ४,५८५ | ५०,४३५ |
| छत्तीसगड | २,२१० | २४,३१० |
| गुजरात | १७,५८४ | १,९३,४२४ |
| कर्नाटक | २०,००४ | २,२०,०४४ |
| मध्य प्रदेश | ६,८२२ | ७५,०४२ |
| **महाराष्ट्र** | **३४,४७६** | **३,७९,२३६** |
| राजस्थान | ७,३८० | ८१,१८० |
| तामीळनाडू | १३,४६६ | १,४८,१२६ |
| तेलंगणा | ११,११८ | १,२२,२९८ |
| उत्तर प्रदेश | १९,७९५ | २,१७,७४५ |
| पश्चिम बंगाल | ६,५९१ | ७२,५०१ |
| **अखिल भारत** | **२,०१,०७४** | **२२,११,८१४** |

*आधार*: महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्था

८.२१.१ **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना:** महिलांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना स्वावलंबी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, रोजगार निर्मितीस प्रोत्साहन देऊन तसेच महिलांच्या स्टार्टअप्सच्या संख्येत राज्याला देशात अग्रस्थानी आणणे ही या योजनेची प्रमुख उद्दीष्ट्ये आहे. सन २०२४ मध्ये सुरु झालेल्या या योजनेअंतर्गत महिलांना स्टार्टअप्सच्या उलाढालीवर आधारित ₹ १ लाख ते ₹ २५ लाखांपर्यंत एकरकमी आर्थिक सहाय्य देण्यात येते. सर्वसमावेशकतेसाठी एकूण मंजूर निधीपैकी २५ टक्के निधी सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिला उद्योजकांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. या योजनेच्या सुरुवातीपासून जानेवारी २०२६ पर्यंत तीन टप्प्यांमध्ये एकूण ५२ विजेत्यांना ₹ २.३४ कोटी इतके आर्थिक सहाय्य वितरित करण्यात आले आहे.

८.२१.२ राज्यातील स्टार्टअपसाठी विविध उपक्रम/योजना तक्ता ८.१० मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ८.१० राज्यातील स्टार्टअपसाठी विविध उपक्रम/योजना**

(जानेवारी २०२६ पर्यंत)

| उपक्रम/धोरण | उपक्रम /धोरण यांची उद्दिष्ट व व्याप्ती | साध्य | |
|---|---|---|---|
| | | तपशील | संख्या |
| इनक्यूबेटर्सची स्थापना आणि विस्तार योजना | राज्यभरातील इन्क्युबेटर्सच्या कामगिरीचा वेळोवेळी आढावा घेवून पाच कोटी रुपयांचे अनुदान पाच वर्षांच्या कालावधीत वितरित करणे | इनक्यूबेटर्स | २९ |
| | स्टार्टअपची क्षमतावाढ आणि सक्षमीकरण याकरीता सार्वजनिक विद्यापीठांच्या भागीदारीत इनक्यूबेटरची स्थापना करणे | इनक्यूबेटर्स | १४ |
| | | महिला उद्योजकांसाठी इनक्यूबेटर्स | १ |
| | इनक्युबेटर्सच्या सहाय्याने विकसित स्टार्टअप्स | स्टार्टअप्स | ६०० |
| बौद्धिक संपदा हक्क आणि गुणवत्ता चाचणी आणि प्रमाणन योजना | राज्यातील सुरुवातीच्या टप्प्यातील स्टार्टअप्सना देशांतर्गत पेटंटसाठी ₹ दोन लाख, आंतरराष्ट्रीय पेटंटसाठी ₹ १० लाख आणि गुणवत्ता चाचणी आणि प्रमाणनासाठी ₹ दोन लाखांपर्यंत प्रतिपूर्ती सहाय्य करणे | पेटंटसाठी प्रतिपूर्ती केलेल्या स्टार्टअप | १२२ |
| | | गुणवत्ता चाचणी आणि प्रमाणपत्रासाठी प्रतिपुर्ती केलेल्या स्टार्टअप्स | २०० |
| महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज प्रोग्राम २०२३ | राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची उद्योजक होण्याची स्वप्ने सत्यात उतरविण्याकरिता त्यांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन देणे व व्यासपीठ उपलब्ध करुन देणे आणि आवश्यक पाठबळ देऊन त्यांना सक्षम करणे | संस्था | २,०१५ |
| | | वैशिष्ट्यपूर्ण इनोव्हेटर्स | ९,२३० |
| महाराष्ट्र स्टार्टअप गतीवृद्धी कार्यक्रम | अनुभवी मार्गदर्शक आणि माजी विद्यार्थ्यांच्या समुहामार्फत स्टार्टअप्स संस्थापकांना मार्गदर्शन करणे व त्यांचा व्यवसाय वाढविण्यात आणि अंततः एक शाश्वत व मोठा व्यवसाय उभारणीसाठी सहाय्य करणे | स्टार्टअप्स | १०० |
| | | समूह | ४ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्था

## माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा

८.२२ देशाच्या सॉफ्टवेअर निर्यातीत महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. संपूर्ण राज्यात माहिती तंत्रज्ञानाच्या संतुलित विकासासाठी आणि माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ राज्यात राबविले जात आहे.

८.२२.१ **माहिती तंत्रज्ञान संकुले**: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिडको व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स ऑफ इंडिया यांनी राज्यात सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान संकुले विकसित केली आहेत. सुमारे ₹ १८,५९५ कोटींची गुंतवणूक व सुमारे २.७ लाख रोजगारासह राज्यात एकूण ३७ सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान संकुले डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यरत आहेत.

८.२२.२ माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी खाजगी क्षेत्राच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यात आले आहे. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा या धोरणाच्या सुरुवातीपासून ऑक्टोबर २०२५ अखेर एकूण ६६९ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले मंजूर असून ती पुणे (२३२), मुंबई शहर व मुंबई उपनगर (२०७), ठाणे (२१३), नागपूर (५), नाशिक (६), छत्रपती संभाजीनगर (४), वर्धा (१) आणि रायगड (१) या जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहेत. माहे जानेवारी २०२६ पर्यंत राज्यातील सॉफ्टवेअर निर्यात ₹ १,७४,७९८ कोटी असून गुंतवणूक ₹ २,३८२ कोटी व रोजगार निर्मिती सुमारे ७.४६ लाख आहे.

८.२२.३ सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कस ऑफ इंडिया यांचेकडे नोंदणीकृत युनिट्सद्वारे झालेल्या सॉफ्टवेअर निर्यातीत राज्याचा वाटा देशात सुमारे २० टक्के असून कर्नाटकानंतर राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे. नोंदणीकृत युनिट्सनी राज्यातून सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कस ऑफ इंडियाद्वारे केलेली सॉफ्टवेअर निर्यात तक्ता ८.११ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.११ राज्यातून सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कस ऑफ इंडियाद्वारे नोंदणीकृत युनिट्सची सॉफ्टवेअर निर्यात**

(₹ कोटी)

| वर्ष | सॉफ्टवेअर निर्यात |
|---|---|
| २०१५-१६ | ६४,०६३.६ |
| २०१६-१७ | ६९,०१०.० |
| २०१७-१८ | ७४,५८०.२ |
| २०१८-१९ | ८५,५९५.४ |
| २०१९-२० | ९१,५१३.९ |
| २०२०-२१ | १,०१,५८१.४ |
| २०२१-२२ | १,२५,६८४.५ |
| २०२२-२३ | १,६५,७०१.५ |
| २०२३-२४ | १,८३,८४७.५ |
| २०२४-२५ | २,१२,७१०.० |
| २०२५-२६+ | १,७४,७९७.६ |

+ जानेवारी पर्यंत

*आधार :* सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कस ऑफ इंडिया, भारत सरकार

## खाणकाम

८.२३ राज्यात उत्पादनक्षम खनिज साठा असणारे सुमारे ५८ हजार चौ. किमी क्षेत्र असून ते राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या १९ टक्के आहे. उत्पादनक्षम खनिज साठा असणाऱ्या एकूण क्षेत्रापैकी ६० टक्के क्षेत्र नागपूर विभागामध्ये (भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, गोंदिया), १० टक्के क्षेत्र अमरावती विभागामध्ये (यवतमाळ), २० टक्के क्षेत्र कोकण विभागामध्ये (रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग), ५ टक्के क्षेत्र छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये, ३ टक्के क्षेत्र पुणे विभागामध्ये (कोल्हापूर) व २ टक्के क्षेत्र नाशिक विभागामध्ये आहे.

८.२३.१ राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी प्रमुख खनिजांच्या ११० खाणी होत्या व त्यामध्ये ७८,१८४ रोजगार कार्यरत होता. सन २०२४-२५ मध्ये उत्खनन केलेल्या खनिजांचे एकूण मुल्य ₹ २२,४४० कोटी होते. सन २०२४-२५ मध्ये सर्व खनिजांमध्ये कोळशाचे उत्पादन सर्वाधिक असून त्याखालोखाल चुनखडीचे उत्पादन होते. सन २०२४-२५ मध्ये ₹ १६,३३० कोटी मुल्याचा सुमारे ७०७.८१ लाख मेट्रिक टन कोळसा काढण्यात आला (खनिजांच्या एकूण मुल्याच्या सुमारे ७३ टक्के). राज्यातील खनिजांचे उत्पादन परिशिष्ट ८.१ मध्ये दिले आहे.

**आलेख ८.३ : राज्यातील सन २०२४-२५ मधील एकूण खनिज उत्पादनात प्रमुख खनिजांचा वाटा**




## वस्त्रोद्योग

८.२४ राज्याच्या रोजगार आणि अर्थव्यवस्थेत वस्त्रोद्योग क्षेत्राचे मोठे योगदान आहे. राज्यातील कापूस, सूत, अपारंपारिक रेशीम, टसर आणि तुती रेशीम, लोकर आणि बांबू, केळी, घायपात, अंबाडी आणि कॉयर यापासून अपारंपरिक धाग्याचे लक्षणीय उत्पादनामुळे वस्त्रोद्योगासाठी राज्यात अतिशय अनुकुल परिस्थिती आहे. याव्यतिरिक्त राज्यातील पारंपरिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील पैठणी, नारायण पेठ साड्या, हिमरू शाल, वारली कापड इत्यादी सुप्रसिध्द उत्पादनांना बाजारपेठेत चांगली मागणी आहे.

८.२४.१ **कापड गिरण्या:** राज्यात मार्च २०२५ पर्यंत ११.४६ लाख चाती स्थापित क्षमता असलेल्या एकूण २०६ सूतगिरण्या व संयुक्त कापड गिरण्या आहेत.

८.२४.२ **तंत्रज्ञान श्रेणीवर्धन निधी योजना:** नवीन व सुयोग्य तंत्रज्ञानाच्या वापरासह वस्त्रोद्योगाच्या आधुनिकरणास तसेच वस्त्रोद्योगास जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविण्यासाठी भारत सरकारने तंत्रज्ञान श्रेणीवर्धन निधी योजना सुरू केली. राज्य वस्त्रोद्योग धोरण, २०११-१७ आणि २०१८-२३ अंतर्गत एकूण ५,०९४ वस्त्रोद्योग प्रकल्प दीर्घकालीन कर्जावरील व्याजाच्या अनुदानासाठी राज्य तंत्रज्ञान श्रेणीवर्धन निधी योजनेशी संलग्न करण्यात आले आहे. या प्रकल्पांपैकी, सन २०२४-२५ मध्ये ४६९ प्रकल्पांना ₹ ४२३.६७ कोटींचे व्याज व भांडवली अनुदान देण्यात आले आणि सन २०२५-२६ दरम्यान नोव्हेंबरपर्यंत राज्यातील ५४५ प्रकल्पांना ₹ १९१.९९ कोटी अनुदान देण्यात आले.

८.२४.३ **वस्त्रोद्योग संकुले:** अनेक लघु व मध्यम वस्त्रोद्योग उद्योगांना त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी वस्त्रोद्योग संकुले हे माध्यम आहे. राज्यात हिंगणघाट (वर्धा), बसमत (हिंगोली), लातूर (लातूर), शिरपूर व देगाव (धुळे), भिवंडी (ठाणे), बारामती (पुणे), इस्लामपूर (सांगली) आणि इचलकरंजी -४ (कोल्हापूर) येथे १२ टेक्सटाईल पार्क आहेत. या टेक्सटाईल पार्कमध्ये एकूण ८८९ युनिट्स कार्यरत आहेत ज्यात डिसेंबर, २०२५ पर्यंत एकूण ४३,५९८ रोजगार आहेत.

# पर्यटन

८.२५ **महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४:** हे धोरण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व नैसर्गिक विविधतेचा लाभ घेत आणि शाश्वतता, सर्वसमावेशकता आणि आर्थिक विकासाला चालना देत महाराष्ट्राला पसंतीचे, शाश्वत, जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त पर्यटन स्थळ बनवण्यावर लक्ष केंद्रित करते. या धोरणात खालील उपक्रमांचा समावेश आहेः

- समुद्रपर्यटन आणि नदी पर्यटन : देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी राज्याच्या किनारपट्टीचा आणि नद्यांचा वापर करणे
- ग्रामीण पर्यटन प्रोत्साहन : ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देताना सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचा प्रचार करणाऱ्या गावांची निवड करण्यासाठी स्पर्धा.
- महाराष्ट्र विशेष पर्यटन क्षेत्र विकास कार्यक्रम : ५० विशेष पर्यटन स्थळे विकसित करण्यावर भर
- पर्यटन मित्र कार्यक्रम : प्रमुख पर्यटन स्थळांवर सुरक्षित आणि जबाबदार पर्यटनासाठी कृती दल तैनात करणे

८.२५.१ पर्यटन क्षेत्रासाठी उपक्रम/ धोरणांचा तपशील तक्ता ८.१२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.१२ पर्यटन क्षेत्रासाठी उपक्रम/धोरणांचा तपशील**

| उपक्रम/ धोरण | उपक्रम/ धोरणांची व्याप्ती व उद्देश | मंजूर अर्जाची संख्या+ |
|---|---|---|
| आदरातिथ्य क्षेत्रासाठी एक खिडकी क्लिअरन्स | परवानग्या/मंजूरींची संख्या ७० वरून १० पर्यंत कमी करून आदरातिथ्य क्षेत्रासाठी व्यवसाय सुलभतेला प्रोत्साहन देणे | २०६ |
| कृषी पर्यटन धोरण | कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण विकास, शेतमालाला बाजारपेठ मिळवून देणे, शेतीशी संबंधित व्यवसायाला प्रोत्साहन देणे आणि महिला व युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे, इत्यादी | ९८० |
| साहसी पर्यटन धोरण | ट्रेकिंग, पॅराग्लायडिंग, वॉटर रॅपलिंग, रिव्हर राफ्टिंग, बाइकिंग, रॉक क्लायम्बिंग, स्कूबा डायव्हिंग अशा २५ हून अधिक साहसी उपक्रमांचा यात समावेश आहे | ७८६ |
| कॅरॅव्हॅन पर्यटन धोरण | दुर्गम ठिकाणे, कोणत्याही कायमस्वरूपी बांधकामास मनाई असलेली राखीव ठिकाणे आणि समुद्र किनारा, ऐतिहासिक किल्ले, पर्वतरांगा इत्यादी ठिकाणी राहण्याची पुरेशी व्यवस्था नसलेल्या ठिकाणी पर्यटन विकसित करणे | ८ |
| बीच शॅक धोरण | कोकण किनारपट्टीलगत तात्पुरत्या पर्यावरणपूरक व कोस्टल रेग्युलेशन झोननुसार बीच शॅक, डेक बेड, छत्री आणि कॉमन बीच सुविधा केंद्रांची उभारणी. (प्रायोगिक प्रकल्पांसाठी केळवे, बोर्डी, दिवेआगर, वरसोली, आरे वारे, गुहागर, कुणकेश्वर आणि तारकर्ली यांची निवड करण्यात आली आहे) | - |
| 'आई' महिलाभिमुख पर्यटन धोरण | या धोरणानुसार पर्यटन व्यवसायातील महिला उद्योजकांना अधिकृत बँकांकडून घेतलेल्या ₹ १५ लाखपर्यंत कर्जावरील व्याजाची (१२ टक्क्यांच्या मर्यादेत) ₹ ४.५० लाखापर्यंत किंवा ७ वर्षांच्या कालावधीसाठी यापैकी जे आधी असेल त्याची प्रतिपूर्ती देण्यात येईल | ७८५ |

*आधार* :पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

८.२६ देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्रात पर्यटनाची मोठी क्षमता आहे. निसर्गरम्य थंड हवेची ठिकाणे, सुंदर समुद्र किनारे, निसर्ग आणि वन्यजीव अभयारण्ये, किल्ले, नैसर्गिक लेणी, युनेस्को वारसा स्थळे आणि ऐतिहासिक स्मारके, संग्रहालये व तीर्थक्षेत्रे आणि प्रार्थनास्थळे अशा विविध प्रकारची प्रेक्षणीय स्थळे राज्यात पर्यटकांना अनुभवता येतात. राज्याने नेहमीच देशांतर्गत आणि विदेशी पर्यटकांना आकर्षित केले आहे. 'भारत पर्यटन डेटा कंपेंडियम २०२५' अहवालानुसार, सन २०२४ मध्ये देशांतर्गत पर्यटक भेटींमध्ये राज्य सहाव्या आणि परदेशी पर्यटक भेटींमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. राज्यनिहाय पर्यटक भेटींची संख्या तक्ता ८.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१३ राज्यनिहाय पर्यटक भेटींची संख्या**

(लाख )

| राज्य | देशांतर्गत | | | विदेशी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२२ | २०२३ | २०२४ | २०२२ | २०२३ | २०२४ |
| आंध्र प्रदेश | १,९२७.७ | २,५४७.० | २,९०२.२ | १.७ | ०.६ | २.६ |
| बिहार | २५३.३ | ८१५.८ | ६५४.६ | ०.९ | ५.४ | ७.३ |
| छत्तीसगड | २३६.४ | २६०.२ | ३१४.८ | नगण्य | ०.०१ | ०.०३ |
| गुजरात | १,३५८.१ | १,७८०.६ | १,८४०.१ | १७.८ | २८.० | २२.७ |
| कर्नाटक | १,८२४.१ | २,८४१.२ | ३,०४५.६ | १.३ | ४.० | ४.८ |
| मध्य प्रदेश | ३५८.५ | १,११९.४ | १,३३१.७ | २.० | १.८ | १.६ |
| **महाराष्ट्र** | **१,११३.०** | **१,६१३.६** | **१,८९३.७** | **१५.१** | **३३.८** | **३७.०५** |
| राजस्थान | १,०८३.३ | १,७९०.५ | २,३००.८ | ४.० | १७.० | २०.७ |
| तामीळनाडू | २,१८५.८ | २,८६०.१ | ३,०६८.४ | ४.१ | ११.७ | ११.६ |
| तेलंगणा | ६०७.५ | ५८४.४ | ८८२.४ | ०.७ | १.६ | १.५ |
| उत्तर प्रदेश | ३,१७९.१ | ४,७८५.२ | ६,४६८.० | ६.५ | १६.० | २२.६ |
| पश्चिम बंगाल | ८४५.४ | १,४५६.६ | १,८४४.७ | १०.४ | २७.० | ३१.२ |
| **अखिल भारत** | **१७,३१०.१** | **२५,०८८.१** | **२९,४८१.९** | **८५.९** | **१९२.४** | **२०९.४** |

*आधार*: भारत पर्यटन डेटा कंपेंडियम २०२५ अहवाल

८.२६.१ 'भारत पर्यटन डेटा कंपेंडियम २०२५' अहवालानुसार, परदेशी पर्यटकांच्या आगमनाची दिल्ली विमानतळावर (३८.८ टक्के) सर्वाधिक व त्यानंतर मुंबई विमानतळावर (१७.८ टक्के) दुसऱ्या क्रमांकावर नोंद झाली आहे. सन २०२२-२३ ते सन २०२४-२५ या कालावधीत राज्यातील केंद्रीय संरक्षित व तिकीटे असलेल्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण स्मारकांना भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या तक्ता ८.१४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१४ केंद्रीय संरक्षित व तिकिट असलेल्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण स्मारकांना भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या**

('०००)

| तपशील | २०२२-२३ | | २०२३-२४ | | २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत |
| देशांतर्गत अभ्यागत | ७,६७५.२ | ४७,९०१.० | ८,३०७.६ | ५३,०९०.० | ८,८६५.६ | ५४,२३१.२ |
| विदेशी पाहुणे | ६४.६ | १,४४५.४ | ९८.४०२ | २,३१४.६ | १०७.४ | २,४१५.० |

*आधार*: भारत पर्यटन डेटा कंपेंडियम २०२५ अहवाल

८.२७ **महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी)**: राज्यभरात सुस्थापित पर्यटन निवासस्थाने आणि उपहारगृहाचे व्यवस्थापन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाद्वारे करण्यात येते. राज्यात निसर्गरम्य ठिकाणी एक कलाग्राम आणि एक नौकाविहार केंद्र आणि ३४ सुस्थापित पर्यटन निवासस्थाने स्थापित केलेले असून पर्यटकांना आदरातिथ्यासह स्वादिष्ट स्थानिक खाद्यपदार्थांचा समावेश असलेली भोजन सेवा उपहारगृहातून मधून दिली जाते. वारसास्थळांना भेटी, साहसी उपक्रम व जलक्रीडा यासारखे आकर्षक टूर पॅकेजेस देखील एमटीडीसी उपलब्ध करुन देते. या सर्व उपक्रमांमुळे राज्यातील पर्यटन समृद्धी अनुभवण्याची पर्यटकांना संधी मिळते.

८.२७.१ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या निवास व न्याहारी योजनेचा उद्देश पर्यटकांना होमस्टे सुविधा उपलब्ध करुन पर्यटनाला चालना देणे व त्याद्वारे स्थानिक रहिवाशांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा आहे. महाभ्रमण योजनेचा उद्देश या योजनेत नोंदणीकृत उद्योजकांमार्फत आयोजित केलेल्या मार्गदर्शित टुर्सच्या माध्यमातून राज्याचा समृद्ध वारसा व परंपरांचे दर्शन घडवून पर्यटकांना सांस्कृतिक अनुभव मिळवून देणे हा आहे. माहे डिसेंबर २०२५ पर्यंत राज्यात १,९५५ निवास न्याहारी उद्योजक आणि ६० महाभ्रमण उद्योजक होते.

८.२७.२ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तारकर्ली येथे इंडियन इन्स्टीट्युट ऑफ स्कुबा डायव्हींग अ‍ॅन्ड अ‍ॅक्वॅटीक स्पोर्ट (इसदा) विकसित केली असून देशातील अशी पहिली संस्था आहे. या संस्थेची महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड कडून स्कुबा डायव्हींग आणि जल क्रीडांच्या प्रशिक्षणासाठीची अधिकृत नामिकासूचीत यंत्रणा म्हणून नेमणूक केली आहे.

८.२७.३ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सातारा जिल्ह्यातील मुनावळे येथे कोयना जलपर्यटन केंद्र विकसित केले असून ते गोड्या पाण्यात असलेले देशातील मोठ्या जलपर्यटन केंद्रांपैकी एक आहे. हे केंद्र पर्यटकांसाठी मार्च २०२४ पासून खुले करण्यात आले आहे.

## वार्षिक उद्योग पाहणी

८.२८ वार्षिक उद्योग पाहणी ही औद्योगिक सांख्यिकीचा प्रमुख स्रोत असून वस्तुनिर्माण क्षेत्रातील नोंदणीकृत वाढ व संरचनात्मक बदलांचे मुल्यांकन करण्यात प्रमुख भुमिका बजावते. या पाहणीद्वारे नोंदणीकृत वस्तुनिर्माण क्षेत्रातील निविष्ठी, स्थिर व खेळते भांडवल, रोजगार, उत्पादन, मुल्यवृद्धी, इत्यादींबाबतचे अंदाज उपलब्ध होतात. वार्षिक उद्योग पाहणीत 'कारखाना अधिनियम, १९४८' च्या विभाग- दोन एम (i) आणि दोन एम (ii) अंतर्गत नोंदणी झालेल्या कारखान्यांचा आणि 'विडी व सिगारेट कामगार (रोजगाराच्या अटी) अधिनियम, १९६६' खाली नोंदणी झालेल्या विडी व सिगारेट कारखान्यांचा समावेश आहे.

➢ वार्षिक उद्योग पाहणी २०२३-२४ च्या निष्कर्षांनुसार, राज्याने अखिल भारताच्या निव्वळ मुल्यवृद्धी (१६.२ टक्के), स्थूल मुल्यवृद्धी (१५.९ टक्के), खेळते भांडवल (१४.६ टक्के) आणि एकूण वेतन (१७.५ टक्के) मधील योगदानामुळे देशातील पहिले स्थान कायम राखले आहे

८.२८.१ वार्षिक उद्योग पाहणीवर आधारित उद्योगांची मुख्य वैशिष्ट्ये तक्ता ८.१५ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ८.१५ वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत उद्योगांची मुख्य वैशिष्ट्ये**

(₹ कोटी)

| वैशिष्ट्ये | २०२१-२२ | | २०२२-२३ | | २०२३-२४ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारताशी टक्केवारी | महाराष्ट्र | अखिल भारताशी टक्केवारी | महाराष्ट्र | अखिल भारताशी टक्केवारी |
| कार्यरत उद्योग (संख्या) | २०,३७२ | १०.२ | २०,७३९ | १०.० | २१,१९६ | १०.० |
| स्थिर भांडवल | ४,५२,१२९ | १२.१ | ४,९३,४४४ | १२.० | ५,५२,२९१ | ११.९ |
| खेळते भांडवल | १,९८,९५८ | १४.७ | २,३५,१५७ | १४.७ | २,४८,११५ | १४.६ |
| गुंतवलेले भांडवल | ७,२६,२४७ | १३.१ | ८,०४,११८ | १३.१ | ८,८५,४८२ | १३.० |
| संयंत्र व यंत्रसामग्रीचे स्थूल मुल्य | ४,९४,०२० | १२.९ | ५,२७,१८२ | १२.७ | ५,८६,३१६ | १२.८ |
| एकूण कार्यरत मनुष्यबळ | २१,३८,३०४ | १२.४ | २३,७४,७११ | १२.८ | २५,३५,८४६ | १२.९ |
| एकूण वेतन | ९५,४६९ | १७.० | १,११,९२८ | १७.५ | १,२५२७१ | १७.५ |
| एकूण उत्पादन | १६,६६,५०८ | १४.० | २१,२२,२४२ | १४.६ | २२,१८,५०२ | १४.५ |
| एकूण निविष्ठी | १३,४५,६१२ | १३.६ | १७,६३,४१५ | १४.३ | १८,२६,४०५ | १४.२ |
| स्थूल मुल्यवृद्धी | ३,२०,८९६ | १५.७ | ३,५८,८२७ | १६.३ | ३,९२,०९७ | १५.९ |
| निव्वळ मुल्यवृद्धी | २,७८,८२२ | १५.९ | ३,१३,२७४ | १६.७ | ३,४१,४६० | १६.२ |

*आधार :* राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

८.२८.२ सन २०२३-२४ मध्ये एकूण उत्पादन मुल्यामध्ये मोटार वाहने, ट्रेलर व सेमी-ट्रेलर (१३.० टक्के), मूलभूत धातू (१२.२ टक्के), खाद्य उत्पादने (१२.० टक्के), रसायने व रासायनिक उत्पादने (८.९ टक्के), अवर्गीकृत यंत्रसामग्री व उपकरणे (८.४ टक्के) आणि कोक व शुद्ध पेट्रोलियम उत्पादने (८.३ टक्के) इ. हे राज्यातील प्रमुख उद्योग आहेत. सर्व उद्योग गटांच्या उत्पादन मुल्यामध्ये या उद्योग गटांचे एकूण उत्पादन मुल्याचे प्रमाण ६२.९ टक्के आहे, तर स्थिर भांडवलातील हे प्रमाण ६०.१ टक्के आहे. राज्यातील उद्योगांची निवडक वैशिष्ट्ये (वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत) परिशिष्ट ८.२ मध्ये दिली आहे तसेच वार्षिक उद्योग पाहणीवर आधारित निवडक संरचनात्मक गुणोत्तरे तक्ता ८.१६ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ८.१६ वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत निवडक संरचनात्मक गुणोत्तरे**

(₹ कोटी)

| तपशील | २०२१-२२ | | २०२२-२३ | | २०२३-२४ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत |
| **अ) प्रति कार्यरत कारखाना** | | | | | | |
| स्थिर भांडवलातील गुंतवणूक | २,२१९ | १,८५८ | २,३७९ | १,९९६ | २,६०६ | २,१७१ |
| उत्पादित वस्तू व सेवा यांचे मूल्य | ८,१८० | ५,९४६ | १०,२३३ | ७,०१५ | १०,४६७ | ७,१९६ |
| निव्वळ मुल्यवृद्धी | १,३६९ | ८७२ | १,५११ | ९११ | १,६११ | ९८७ |
| कामगार (संख्या) | ७६ | ६८ | ८३ | ७१ | ८७ | ७३ |
| **ब) प्रति कामगार** | | | | | | |
| निव्वळ मुल्यवृद्धी | १८.०० | १२.८५ | १८.१४ | १२.८६ | १८.४६ | १३.५५ |
| वार्षिक वेतन | २.४४ | १.९४ | २.५४ | २.०५ | २.६६ | २.१६ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

**आलेख ८.४ : वार्षिक उद्योग पाहणीवर आधारित उद्योगांचे एकूण उत्पादन, एकूण निविष्ठी, स्थूल मुल्यवृध्दी आणि निव्वळ मुल्यवृध्दी**




**आलेख ८.५ : वार्षिक उद्योग पाहणीवर आधारित उद्योगांचे स्थिर भांडवल, गुंतवलेले भांडवल, खेळते भांडवल**




## औद्योगिक उत्पादन निर्देशांक

८.२९ अखिल भारताचे औद्योगिक उत्पादन निर्देशांक उत्पादन स्तरातील बदलाचे मापन करतो आणि तो किंमतीत होणाऱ्या बदलांच्या प्रभावापासून मुक्त आहे. हा निर्देशांक अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील उत्पादन कार्यांचा मागोवा घेतो आणि शासनाला धोरण निश्चितीसाठी तसेच विविध संस्थांना देखील अत्यंत उपयुक्त आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार अखिल भारतीय स्तरावर मासिक औद्योगिक उत्पादन निर्देशांक परिगणित करते. गटनिहाय व वापर-आधारीत प्रकारनिहाय अखिल भारतीय औद्योगिक निर्देशांक उत्पादन तक्ता ८.१७ मध्ये दिले आहेत. भारतातील औद्योगिक निर्देशांकांची मालिका परिशिष्ट ८.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१७ गटनिहाय व वापर-आधारीत प्रकारनिहाय अखिल भारतीय औद्योगिक उत्पादन निर्देशांक**

(पायाभूत वर्ष २०११-१२=१००)

| बाब | भार | सरासरी औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक (एप्रिल-डिसेंबर) | | |
|---|---|---|---|---|
| | | २०२४-२५ | २०२५-२६++ | टक्केवारी बदल |
| सर्वसाधारण निर्देशांक | १००.०० | १५०.३ | १५६.१ | ३.९ |
| **गटनिहाय** | | | | |
| खाणकाम | १४.३७ | १२७.० | १२७.१ | ०.१ |
| वस्तुनिर्माण | ७७.६३ | १४८.५ | १५५.७ | ४.८ |
| वीज | ७.९९ | २०९.८ | २१०.८ | ०.५ |
| **वापर-आधारीत प्रकार** | | | | |
| प्राथमिक वस्तू | ३४.०५ | १५०.८ | १५२.१ | ०.९ |
| भांडवली वस्तू | ८.२२ | १०८.९ | ११६.९ | ७.३ |
| पुनर्निर्माण वस्तू | १७.२२ | १६२.३ | १७१.३ | ५.५ |
| पायाभूत/ बांधकाम वस्तू | १२.३४ | १८३.६ | २००.९ | ९.४ |
| टिकाऊ उपभोग्य वस्तू | १२.८४ | १२६.८ | १३३.९ | ५.६ |
| अल्पजीवी उपभोग्य वस्तू | १५.३३ | १५०.७ | १५१.० | ०.२ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार ++ माहे डिसेंबर २०२५ ची आकडेवारी शीघ्र अनुमानावर आधारीत

**आलेख ८.६ : औद्योगिक उत्पादनातील वर्ष-ते-वर्ष वाढ (सर्वसाधारण)**




**आलेख ८.७ : औद्योगिक उत्पादनातील वर्ष-ते-वर्ष क्षेत्रनिहाय वाढ**



# सहकार

८.३० सहकार चळवळ ही लोकांना संघटित करून व भांडवल उभारून, आर्थिक व सामाजिक कार्य एकत्रितरित्या करण्यासाठी सहकार हे एक माध्यम असून यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन रोजगाराची निर्मिती होते. परस्पर सहाय्य व लोकशाही कार्यपध्दतीच्या तत्वांवर आधारित सहकारी संस्था शेतकरी तसेच समाजातील दुर्बल घटकांना पाठबळ देतात. राज्यात सहकार चळवळीमुळे कृषी प्रक्रिया, दुग्ध, मत्स्य व्यवसाय, साठवणूक, विक्री, पणन, पतपुरवठा व बँकिंग, गृहनिर्माण इत्यादी क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे.

८.३१ सहकारी संस्थांची नोंदणी 'महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०' अंतर्गत करण्यात येते. दि. ३१ मार्च २०२५ रोजी राज्यात सुमारे २.३३ लाख सहकारी संस्था होत्या. त्यापैकी सुमारे ५७ टक्के सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या. राज्यातील सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.१८ मध्ये दिली आहे व राज्यातील सहकारी संस्थाचा तपशील परिशिष्ट ८.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.१८ राज्यातील सहकारी संस्थाची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२३ | २०२४ | २०२५* |
|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | २,२४,८४७ | २,२८,६१८ | २,३३,५१३ |
| सभासद (लाख) | ५९४ | ६०५ | ६१५ |
| भरणा भाग भांडवल (₹ कोटी) | २७,७३६ | २९,८१४ | ३०,६९४ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | २,५८० | २,६३६ | २,७१३ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ४,७३,९१७ | ५,०३,१४१ | ५,२८,८७० |
| ठेवी (₹ कोटी) | २,४०,५८२ | २,६३,११० | २,६६,९१८ |
| वितरीत कर्ज (₹ कोटी) | १,७८,८१३ | २,२३,२४८ | २,५१,३५५ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | ५७,३०९ | ५३,७१८ | ५३,११२ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ३९,९९० | ३३,९२९ | ३२,४३५ |
| येणे कर्ज (₹ कोटी) | २,०७,५३९ | २,३२,३१८ | २,४४,२६३ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

**आलेख ८.८ : सहकारी संस्था व खेळते भांडवल**




(दि.३१ मार्च २०२५ रोजी)




## शिखर व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका

८.३२ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित ही राज्यातील शिखर सहकारी बँक आहे. जिल्हास्तरावर एकूण ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कार्यरत आहेत. शिखर व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची माहिती तक्ता ८.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१९ शिखर व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२३ | २०२४ | २०२५* |
|---|---|---|---|
| **महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित** | | | |
| सभासद (संख्या) | १,९१४ | १,९१० | १,९०० |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ३८,०४७ | ४६,७१६ | ५१,४९३ |
| ठेवी (₹ कोटी) | १८,६१४ | २३,५८३ | २६,३५९ |
| वितरीत कर्ज (₹ कोटी) | २०,७९१ | ४७,२८० | ७०,३१२ |
| येणे कर्ज (₹ कोटी) | २६,४५० | ३३,६८२ | ३५,५८८ |
| थकीत कर्ज (₹ कोटी) | २,०९२ | २,४२८ | २,७०४ |
| **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (३१)** | | | |
| सभासद (लाख) | १.३६ | १.५० | १.५३ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | १,४६,३४३ | १,६१,६०० | १,७६,९५४ |
| ठेवी (₹ कोटी) | १,०६,४६५ | १,१७,३८० | १,२७,७३१ |
| वितरीत कर्ज (₹ कोटी) | ६०,५७८ | ७६,५४३ | ८०,०३७ |
| येणे कर्ज (₹ कोटी) | ७१,४०५ | ८३,७१७ | ८८,३७७ |
| थकीत कर्ज (₹ कोटी) | १५,५९१ | १८,४५७ | १८,७७२ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, मुंबई * अस्थायी

## प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था

८.३३ प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था प्रामुख्याने हंगामी कृषी कार्यांसाठी अल्प मुदतीचा कृषी पतपुरवठा करतात. राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी २१,२८४ प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था होत्या. यामध्ये २९ कृषक सेवा संस्था व ८७६ आदिवासी सहकारी संस्थांचा समावेश असून त्यांची सभासद संख्या अनुक्रमे सुमारे ०.६८ लाख व ७.१३ लाख होती. प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२० प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२३ | २०२४ | २०२५* |
|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | २१,०८२ | २१,२४२ | २१,२८४ |
| सभासद (लाख) | १५५ | १५६ | १५७ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | २५,८७७ | २६,५६५ | २७,२६९ |
| स्वनिधी (₹ कोटी) | ५,२७६ | ५,३५७ | ५,४०८ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | ३,७२८ | ३,८७६ | ४,०१६ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | ११.५० | १२.४३ | १३.०० |
| कर्जदार सभासद (लाख) | ३१.७५ | ३२.८८ | ३३.०० |
| *पैकी,* १) अत्यल्प भूधारक (एक हेक्टर पर्यंत) | ९.५० | ९.५५ | १०.०० |
| २) अल्प भूधारक (एक ते दोन हेक्टर पर्यंत) | ८.३२ | ८.८८ | ९.०० |
| वितरीत कर्ज (₹ कोटी) | १३,१४१ | १३,१७७ | १३,८८७ |
| *पैकी,* अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना वितरीत | ५,८४३ | ६,०६६ | ६,२५४ |
| येणे कर्ज (₹ कोटी) | २५,५०८ | २९,१६९ | ३२,३९० |
| कर्ज वसुली (₹ कोटी) | ८,६०५ | ९,०४९ | ८,८९० |
| थकीत कर्ज (₹ कोटी) | ६,३७४ | ६,१२२ | ६,१६४ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | १०,६५९ | १०,८५३ | ११,०२७ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | १०,०९८ | १०,१५२ | १०,२१३ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.३४ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी भारत सरकार 'प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण' प्रकल्प राबवित आहे. प्रकल्पाअंतर्गत सन २०२२-२३ ते सन २०२४-२५ या कालावधीत राज्यात कार्यरत १२,००० प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण करण्यात येणार असून त्यापैकी ११,९८७ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण दि. ३१ मार्च २०२५ रोजी पुर्ण झाले आहे. या प्रकल्पाअंतर्गत माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत ₹ २०२.६५ कोटी खर्च झाला.

## कृषी प्रक्रिया सहकारी संस्था

८.३५ राज्य शासन कृषी प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यासाठी सहकारी संस्थांना अर्थसहाय्य पुरविते. कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांमध्ये साखर कारखाने, कापूस पिंजणी व गासड्या बांधणी, सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग, दुग्ध, मत्स्यव्यवसाय, भात गिरण्या, तेल गिरण्या आणि इतर प्रक्रिया केंद्रे या संस्थांचा समावेश आहे. दि. ३१ मार्च २०२५ रोजी राज्यात २१,८१६ कृषी प्रक्रिया सहकारी संस्था कार्यरत असून त्यांची सभासद संख्या सुमारे ७२ लाख आहे.

८.३५.१ राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी १७२ नोंदणीकृत सहकारी साखर कारखाने होते. सहकारी साखर कारखान्यांची माहिती तक्ता ८.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२१ सहकारी साखर कारखान्यांची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२३ | २०२४ | २०२५* |
|---|---|---|---|
| नोंदणीकृत सहकारी कारखाने (संख्या) | १७२ | १७२ | १७२ |
| उत्पादन चालू असलेले कारखाने (संख्या) | १०६ | १०४ | ९९ |
| सभासद ('००) | २६,८२१ | २६,९९२ | २७,१२६ |
| राज्य शासनाचे भाग भांडवल (₹ कोटी) | १,३१५.७१ | १,३३४.६१ | १,३३५.५३ |
| प्रतिदिन सरासरी गाळप क्षमता (लाख मे. टन) | ८.८५ | ९.५१ | ९.७० |
| गाळप झालेला ऊस (लाख मे. टन) | १,०५३.९१ | १,०७६.१८ | ८५५.१० |
| साखर उत्पादन (लाख मे. टन) | १०५.३२ | ११०.१८ | ८१.०४ |
| सरासरी उतारा (टक्के) | ११.२८ | ११.०७ | ११.२९ |
| उसाची सरासरी किंमत (₹ प्रति मे. टन) | | | |
| अ) रास्त व किफायतशीर दर | २,५६८ | २,४८५ | २,७७२ |
| ब) कारखान्यांनी प्रत्यक्षात अदा केलेली | २,७२३ | २,८८८ | २,९९० |
| मळी (लाख मे. टन) | २२.५८ | २२.९४ | १७.८५ |
| कारखान्यांची संख्या | | | |
| अ) आसवनी प्रकल्प असलेल्या | ७७ | ७७ | ७७ |
| ब) सह वीज निर्मिती प्रकल्प असलेल्या | ६० | ६० | ६० |
| सह वीज निर्मिती क्षमता (मेगावॅट) | १,२३७.९० | १,२४३.४० | १,२४३.४० |
| नफ्यातील कारखाने (संख्या) | ३१ | ५२ | २५ |
| तोट्यातील कारखाने (संख्या) | ६२ | ६२ | २० |

*आधार* : साखर आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.३५.२ राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी ११,८३२ सहकारी दुग्ध संस्था व ८० सहकारी दुग्ध संघ होते. सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघाची माहिती तक्ता ८.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२२ सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघाची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | सहकारी दुग्ध संस्था | | सहकारी दुग्ध संघ | |
|---|---|---|---|---|
| | २०२४ | २०२५* | २०२४ | २०२५* |
| संस्था (संख्या) | १२,६०१ | ११,८३२ | ८१ | ८० |
| सभासद (लाख) | १०.०८ | ९.८० | १.२१ | १.१२ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | १३.६० | १४.८४ | ८२.७५ | ९०.३१ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | २५.९४ | २७.३० | ९०.८० | ९५.९२ |
| दूध खरेदी मुल्य (₹ कोटी) | ३३५.५५ | ३६१.४९ | ९८१.४० | १,०५१.१० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री मुल्य (₹ कोटी) | ५१०.६५ | ५५२.२७ | १,१६०.०० | १,२५७.१० |
| नफ्यातील संस्था (संख्या) | ६,२२४ | ६,००१ | ६४ | ६२ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ६,३७७ | ५,८३१ | १७ | १८ |

*आधार* : आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.३५.३ राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी ७९ कापूस पिंजणी व गासड्या बांधणी सहकारी संस्था आणि २०६ सहकारी सूत गिरण्या होत्या. कापूस पिंजणी व गासड्या बांधणी सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.२३ मध्ये तर सहकारी सूत गिरण्यांची माहिती तक्ता ८.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२३ कापूस पिंजणी व गासड्या बांधणी करणाऱ्या सहकारी संस्थांची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२४ | २०२५* |
|---|---|---|
| संस्था (संख्या) | ८१ | ७९ |
| *पैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ६० | ५८ |
| सभासद ('००) | १,१७३ | १,१५२ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | ७.६७ | ६.६८ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | ३.०५ | ३.०५ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ८१.४६ | ७०.७९ |
| पिंजणी केलेला कापूस (मे. टन) | ४८,०७७ | ३९,५२५ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | ४२ | ४२ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | २७ | २२ |

* अस्थायी

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ८.२४ सहकारी सूत गिरण्यांची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२४ | २०२५* |
|---|---|---|
| गिरण्यांची संख्या | २१२ | २०६ |
| *पैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ४७ | ४६ |
| सभासद ('००) | ६,३६२ | ६,२२० |
| भाग भांडवल (₹ कोटी) | २,४९३.८९ | २,५२८.५१ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | २,१८४.८९ | २,२००.५८ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ५,८७७.३९ | ५,६६०.२५ |
| चात्यांची संख्या (लाख) | १०.७६ | ११.४६ |
| उत्पादित सूताचे मूल्य (₹ कोटी) | २,३५७.७३ | १,१५९.३९ |
| नफ्यातील गिरण्या (संख्या) | २२ | ५ |
| तोट्यातील गिरण्या (संख्या) | ६१ | ३६ |

* अस्थायी

*आधार* : आयुक्त, वस्त्रोद्योग यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

८.३५.४ राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी ५५५ सहकारी हातमाग व १,७४७ सहकारी यंत्रमाग संस्था होत्या. सहकारी हातमाग व सहकारी यंत्रमाग संस्थांची माहिती तक्ता ८.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२५ सहकारी हातमाग व सहकारी यंत्रमाग संस्थांची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | हातमाग | | यंत्रमाग | |
|---|---|---|---|---|
| | २०२४* | २०२५* | २०२४* | २०२५* |
| संस्था (संख्या) | ५६० | ५५५ | १,६६८ | १,७४७ |
| सभासद ('००) | ५५५.०४ | ५५४.८७ | ८२९.९३ | ८८५.०६ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | ५.७५ | ५.७१ | १७५.८१ | १८१.५० |
| *पैकी,* राज्य शासनाचे | १.६१ | १.६१ | ५०.९५ | ५३.९५ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ६.७५ | ६.७१ | १,०४६.८१ | १,०७६.८१ |
| मागांची संख्या ('०००) | २.७८ | २.७८ | १४.२२ | १४.२१ |
| उत्पादन मूल्य (₹ कोटी) | २७.३० | २३.६९ | ७८.५१ | ७७.५० |
| नफ्यातील संस्था (संख्या) | १६५ | १७१ | १०० | १०५ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ३९० | ३८४ | १,५६८ | १,६४२ |

*आधार* : आयुक्त, वस्त्रोद्योग यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
* अस्थायी

## मच्छिमारी सहकारी संस्था

८.३६ राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी ३,४३४ प्राथमिक मच्छिमारी सहकारी संस्था, ३७ मच्छिमारी सहकारी संघ आणि एक सहकारी महासंघ कार्यरत होते. मच्छिमारी सहकारी संस्था, संघ आणि महासंघाची माहिती तक्ता ८.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२६ मच्छिमारी सहकारी संस्था, संघ आणि महासंघाची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | प्राथमिक मच्छिमारी सहकारी संस्था | | मच्छिमारी सहकारी संघ | | मच्छिमारी सहकारी महासंघ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२४ | २०२५* | २०२४ | २०२५* | २०२४ | २०२५* |
| संस्था (संख्या) | ३,३७६ | ३,४३४ | ३७ | ३७ | १ | १ |
| सभासद (लाख) | ४.५६ | ४.५३ | ०.०१ | ०.०१ | ०.०३ | ०.०३ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | ७८.०० | ८०.०० | ३७.०० | ४०.०० | १.४३ | १.४५ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | ६३.६८ | ६४.६१ | २३.०० | २५.०० | ०.२८ | ०.२९ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ३१०.०० | ३१५.०० | ५३०.०० | ५४०.०० | १३.८४ | १४.७० |
| मासे व मत्स्य उत्पादन विक्री (₹ कोटी) | - | - | - | - | - | - |
| नफ्यातील संस्था (संख्या) | २,१९० | २,३०४ | २५ | २६ | १ | १ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | १,१८६ | १,१३० | १२ | ११ | - | - |

*आधार :* आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
* अस्थायी

## सहकारी पणन संस्था

८.३७ राज्यात सहकारी पणन संस्थांची त्रिस्तरीय संघटनात्मक संरचना आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित ही शिखर संस्था असून जिल्हास्तरावर जिल्हा सहकारी पणन संस्था तर ग्रामस्तरावर प्राथमिक सहकारी पणन संस्था कार्यरत आहेत. सहकारी पणन संस्थांची माहिती तक्ता ८.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२७ सहकारी पणन संस्थांची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२४ | २०२५* |
|---|---|---|
| संस्था (संख्या) | १,७६२ | १,७५३ |
| सभासद (लाख) | १२.५० | १२.५४ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | १०८.०० | १०८.०० |
| *पैकी,* राज्य शासनाचे | २८.०० | ३०.०० |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | १,५४६ | १,७५१ |
| विक्री (₹ कोटी) | | |
| (अ) शेतमाल | ५,१२२ | ५,३४० |
| (ब) खते | १,१६६ | १,२६७ |
| (क) बियाणे | २३२ | २५५ |
| (ड) ग्राहकोपयोगी वस्तू | ४५८ | ४९५ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | ८२७ | ८७८ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ६७८ | ६८१ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था

८.३८ दि. ३१ मार्च २०२५ रोजी राज्यात २१,६४८ बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था असून त्यापैकी १४,८२४ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था, ६,३७६ पगारदार नोकरांच्या सहकारी पतपुरवठा संस्था व ४४८ नागरी सहकारी बँका होत्या. बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची माहिती तक्ता ८.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२८ बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२४ | २०२५* |
|---|---|---|
| संस्था (संख्या) | २१,३४५ | २१,६४८ |
| सभासद (लाख) | २९०.०७ | २९२.१० |
| ठेवी (₹ कोटी) | १,१९,२९१ | १,२२,५१२ |
| स्वनिधी (₹ कोटी) | २९,३३० | ३०,०३४ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | १३,१५० | १३,३८७ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | १.०० | १.०० |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | २,१२,६४७ | २,१५,८३७ |
| वितरीत कर्जे (₹ कोटी) | ८३,८८६ | ८४,७२५ |
| येणे कर्ज (₹ कोटी) | ८१,१९८ | ८२,६६० |
| कर्जे वसुली (₹ कोटी) | ५५,८८५ | ५५,६६१ |
| थकीत कर्जे (₹ कोटी) | १३,०४७ | १३,६४७ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | १५,६३६ | १५,६९९ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५,१५१ | ५,१८७ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय महाराष्ट्र शासन * अस्थायी

## सहकारी ग्राहक संस्था

८.३९ महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ ही शिखर संस्था असून ती जिल्हास्तरावर घाऊक सहकारी ग्राहक भांडारांच्या कार्यांवर नियंत्रण ठेवते. ही घाऊक सहकारी ग्राहक भांडारे प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांना माल वितरित करतात. राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी १२१ घाऊक सहकारी ग्राहक भांडारे व १,५४२ प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारे कार्यरत होती. सहकारी ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची माहिती तक्ता ८.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२९ ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | सहकारी ग्राहक महासंघ | | घाऊक सहकारी ग्राहक भांडार | | प्राथमिक सहकारी ग्राहक भांडार | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२४ | २०२५* | २०२४ | २०२५* | २०२४ | २०२५* |
| संख्या | १ | १ | १२७ | १२१ | १,३३८ | १,५४२ |
| सभासद ('००) | ७.०२ | ७.५१ | ३,९७९ | ३,६१८ | १२,४५५ | १५,२२० |
| भाग भांडवल (₹ कोटी) | ०.५१ | ०.५१ | २३.७५ | २३.२३ | ६६.९२ | ७७.१३ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | - | - | ४.०४ | ३.८९ | ३.९२ | ४.७६ |
| नफ्यातील ग्राहक भांडारे (संख्या) | ९ | ९ | ७४ | ७० | ७६१ | ८३४ |
| तोट्यातील ग्राहक भांडारे (संख्या) | २ | २ | ५१ | ५१ | ५४७ | ६२८ |

*आधार :* १) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
२) महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्या.

* अस्थायी

## इतर सहकारी संस्था

८.४० राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी ४४ लाख सभासद असलेल्या १,३३,४९० सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या. याव्यतिरिक्त दि. ३१ मार्च २०२५ रोजी ११,१८३ मजूर कंत्राट सहकारी संस्था असून सभासद संख्या सुमारे ५.६९ लाख होती. तसेच ०.७० लाख सभासद संख्या असलेल्या एकुण २९१ जंगल कामगार सहकारी संस्था आहेत.

## महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित

८.४१ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित ही राज्यातील गृहनिर्माण पतपुरवठा करणारी मध्यवर्ती संस्था आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित यांची माहिती तक्ता ८.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.३० महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादितची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२४ | २०२५* |
|---|---|---|
| सभासद (संख्या) | १०,२५५ | १०,२५२ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ८४.२९ | ८२.९२ |
| स्थूल वितरीत कर्ज (₹ कोटी) | ६४४.०० | ६४४.०० |
| येणे कर्ज (₹ कोटी) | ३५.१६ | ३४.७२ |
| कर्ज वसुली (₹ कोटी) | ३.४३ | ३.६१ |
| थकीत कर्ज (₹ कोटी) | ३४.४९ | ३४.७२ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित

* अस्थायी

## परवानाधारक सावकार

८.४२ कृषी व बिगर कृषी पतपुरवठा संस्थांव्यतिरिक्त परवानाधारक सावकारांना, वैयक्तिक कर्ज उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाने अनुमती दिली आहे. राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी ११,७११ परवानाधारक सावकार होते. परवानाधारक सावकारांची माहिती तक्ता ८.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.३१ परवानाधारक सावकारांची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२४ | २०२५* |
|---|---|---|
| सावकार (संख्या) | ११,७२५ | ११,७११ |
| कर्जदार (संख्या) | ९,१२,७३८ | ८,८१,१५५ |
| वाटप केलेले कर्ज (₹ कोटी) | २०५७.२९ | १,११५.६९ |

* अस्थायी

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

* * * * *

## परिशिष्ट ८.१

## राज्यातील खनिजांचे उत्पादन

(उत्पादन: '००० टनात)

(मूल्य: ₹ लाख)

| अ. क्र. | खनिज पदार्थ | उत्पादन/ मूल्य | १९६१$ | १९७१$ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०२०-२१ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १ | मीठ | उत्पादन | ३८४ | ४७२ | ५४० | २२९ | १४८ | १८० | ७० | -- | १२३ | -- |
| २ | कोळसा | उत्पादन | ८५६ | २,०८५ | ५,७७० | १६,८४८ | २८,७५४ | ३६,९३२ | ४७,४३४ | ६४,३६६ | ६९,२८२ | ७०,७८१ |
| | | मूल्य | १८६ | ७४५ | ६,६८१ | ४७,२४४ | २,१०,१९२ | ५,०८,२४९ | ९,२२,५८० | १०,५२,७४२ | १६,५३,७२९ | १६,३३,०४३ |
| ३ | क्रोमाईट | उत्पादन | १ | ३ | २ | -- | ०.६० | -- | -- | -- | -- | -- |
| | | मूल्य | १ | ५ | ५ | -- | ८ | -- | -- | -- | -- | -- |
| ४ | कच्चे लोखंड | उत्पादन | ३६२ | ६१३ | १,४५६ | ६४५ | २२ | १,०१८ | १,२३८ | ६,१०९ | १०,७०४ | ११,३५७ |
| | | मूल्य | ५१ | ६९ | ६५७ | ३८४ | ३१ | ७,१५४ | १७,१६७ | २,१३,२६३ | ४,१५,५७६ | ३,८७,७९९ |
| ५ | चुनखडी | उत्पादन | ५५ | ३६३ | ७१५ | ५,१३५ | ६,०६६ | १०,४३१ | १३,५८२ | १६,६५६ | १९,३२७ | २०,६८४ |
| | | मूल्य | २ | ३३ | १६३ | १,९६८ | ५,२६६ | १५,६४७ | ५५,५४९ | ३९,९७९ | ९८,७६२ | १,०८,५९३ |
| ६ | कच्चे मँगनीज | उत्पादन | १७९ | २१८ | २३२ | २७६ | ३६३ | ५८९ | १,०४२ | ७४० | १,०३० | १,१५२ |
| | | मूल्य | २०६ | १४८ | ५५३ | १,६१५ | ६,२८० | ५४,१०९ | १,५३,४६१ | ६७,२५१ | ९२,१११ | १,११,९५८ |
| ७ | केओलिन (नैसर्गिक) | उत्पादन | २ | ३ | ५ | ३ | ०.२० | -- | -- | -- | -- | -- |
| | | मूल्य | ०.१३ | ०.१६ | १ | १ | ०.२९ | -- | -- | -- | -- | -- |
| ८ | बॉक्साईट | उत्पादन | २७ | ३०२ | ३६५ | ५४३ | १,०२७ | २,४९२ | ४५३ | ८३१ | ८५० | १,१२३ |
| | | मूल्य | २ | २१ | १३७ | ४४३ | १,७०५ | ४,५८५ | ३,३६७ | ८,७२१ | ५,१७७ | २,४८८ |
| ९ | डोलोमाईट | उत्पादन | ६ | ५ | २७ | २८ | ६५ | ७९ | -- | -- | -- | -- |
| | | मूल्य | ०.३८ | १ | ८ | २७ | १४५ | ७१ | -- | -- | -- | -- |
| १० | सिलिका सँड | उत्पादन | ५ | २७ | ८९ | १९७ | १६८ | ३२७ | -- | -- | -- | -- |
| | | मूल्य | ०.३४ | ३ | ३ | ८७ | २२८ | ९८२ | -- | -- | -- | -- |
| ११ | फ्लोराईट (ग्रेडेड) | उत्पादन | -- | -- | -- | ३ | ३ | २८४ | १ | ०.९ | ०.८ | ०.६ |
| | | मूल्य | -- | -- | -- | -- | २४ | १२,४५७ | ९४ | ९५ | ४७ | २९ |
| १२ | लॅटेराईट | उत्पादन | -- | -- | -- | ८५ | ८३ | ४९ | -- | -- | -- | -- |
| | | मूल्य | -- | -- | -- | ७६ | १०७ | ५८ | -- | -- | -- | -- |
| १३ | कायनाईट | उत्पादन | -- | ५ | २२ | १५ | ०.२० | ३ | १ | ०.३ | २.० | २.० |
| | | मूल्य | -- | ११ | ५३ | ८५ | १ | २४ | ३६ | ८.४४ | ४३ | ५४ |
| १४ | इतर$$ | उत्पादन | -- | ४ | ५४४ | ९१२ | ३०६ | ४,०३४ | ५०८ | १०६ | १४७ | ५२ |
| | | मूल्य | -- | ०.३६ | २७ | १९६ | ४९ | ५,२५८ | १,१२६ | १९१ | ६,९२९ | १३१ |

$ आकडे कॅलेन्डर वर्षाकरिता आहेत

$$ सॅन्ड स्टोविंग व सिलीमानाईट हे इतर खनिजांमध्ये अंतर्भूत आहेत

*आधार* - (१) भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन

(२) सहाय्यक मीठ आयुक्त, केंद्र शासन (फक्त मीठाकरिता)

## परिशिष्ट ८.२

## राज्यातील उद्योगांच्या निवडक बाबी
## (वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत)

(₹ कोटी)

| | कार्य (दोन अंकी राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण २००८) | वर्ष | उद्योगांची संख्या | कार्यरत असलेल्या कारखान्यांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्ठी | निव्वळ मूल्यवृद्धि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| (१) | कापूस पिंजणी, सफाई इत्यादी (०१) | २०२१-२२ | ६०२ | ५३१ | १,२२५ | २,८२५ | ११० | २४,००४ | २०,५१७ | २३,०१२ | ८६५ |
| | | २०२२-२३ | ४९८ | ३७२ | १,४३३ | ३,२७० | ९५ | १८,३३१ | १५,३२४ | १७,३५८ | ८४७ |
| | | २०२३-२४ | ५५९ | ४१६ | १,२६८ | ४,८६२ | १३९ | ३८,९४४ | ३३,१८३ | ३६,४९७ | २,२६० |
| (२) | मीठ उत्पादन (०८) | २०२१-२२ | ११ | १० | २ | ३ | २ | ४ | ० | १ | ३ |
| | | २०२२-२३ | ११ | ९ | २ | ३ | २ | ५ | ० | २ | ४ |
| | | २०२३-२४ | ९ | ९ | २ | ४ | २ | ६ | ० | २ | ४ |
| (३) | खाद्य उत्पादने व पेये (१०, ११) | २०२१-२२ | २,७५५ | २,२४५ | ५६,२२२ | १८,७३२ | ३,८१० | २,०४,३४१ | १,५२,९०३ | १,८१,३४० | १९,२७४ |
| | | २०२२-२३ | २,८२० | २,४५१ | ६८,४८६ | ३०,४०० | ४,४४३ | २,६५,६६१ | १,९२,४३४ | २,३५,०२७ | २६,२३८ |
| | | २०२३-२४ | २,८९८ | २,३९२ | ८४,३२६ | २८,८०५ | ५,१२१ | २,९१,०८६ | २,०५,९४४ | २,५४,३७० | ३१,२७९ |
| (४) | तंबाखू उत्पादने (१२) | २०२१-२२ | ७० | ६२ | ९९४ | ७२३ | १९८ | ४,२०६ | १,२९८ | १,५३४ | २,५६७ |
| | | २०२२-२३ | ६७ | ६३ | ९३२ | ७५२ | २२८ | ५,०८४ | १,६७६ | १,९४५ | ३,०२९ |
| | | २०२३-२४ | ६४ | ५५ | ८४९ | ३१२ | २२७ | ५,२०६ | १,९१६ | २,१८३ | २,९१६ |
| (५) | वस्त्रे (१३) | २०२१-२२ | १,७६४ | १,२४६ | १४,४०४ | ५,९१४ | २,४७१ | ४९,५०५ | २९,२७१ | ३९,६९२ | ८,४०८ |
| | | २०२२-२३ | १,७०५ | १,२२१ | १६,८७९ | ६,०७३ | २,८०१ | ५२,२७० | २८,१६२ | ४१,९४० | ८,७७४ |
| | | २०२३-२४ | १,७२५ | १,२९२ | १८,६९८ | ९,११० | २,७८८ | ५९,७५८ | ३३,७२० | ४८,५८८ | ९,५११ |
| (६) | वस्त्र प्रावरणे (१४) | २०२१-२२ | ९९८ | ५७७ | १,६१० | २,८८२ | ५९७ | ९,६३८ | ४,१६७ | ७,३०५ | २,१५५ |
| | | २०२२-२३ | १,०५५ | ६७८ | २,५०० | २,६१६ | ७७४ | १३,४९१ | ७,१७५ | १०,३०९ | २,९३४ |
| | | २०२३-२४ | ९५० | ६३२ | २,११६ | २,४५२ | ७४७ | ११,२७९ | ५,४६८ | ८,५३६ | २,४९८ |
| (७) | चामडे व त्यासंबंधित उत्पादने (१५) | २०२१-२२ | ११७ | ७८ | ५१६ | ३९८ | ५० | १,१५९ | ५२५ | ८७९ | २५२ |
| | | २०२२-२३ | १३२ | १२४ | ४५३ | २९८ | ७३ | १,७०१ | ९१५ | १,३६५ | ३०४ |
| | | २०२३-२४ | १३७ | ११६ | ४४५ | २९६ | १०४ | १,४७३ | ७९९ | १,२१२ | २२८ |
| (८) | लाकूड व लाकडाची उत्पादने आणि बूच (फर्निचर वगळून) (१६) | २०२१-२२ | २०७ | १४६ | ५०७ | ९४९ | ४१ | १,१२० | ७४९ | ९२१ | १७६ |
| | | २०२२-२३ | २३२ | १६५ | ७९५ | १,१७९ | ५५ | ३,६७० | २,७८२ | ३,१४२ | ४८० |
| | | २०२३-२४ | १८२ | १७७ | १,०२६ | ७५२ | १५२ | ४,२९४ | ३,०८१ | ३,४९९ | ७३४ |
| (९) | कागद व कागदाची उत्पादने (१७) | २०२१-२२ | ८३३ | ६६१ | १०,४६७ | १,९८१ | ५६१ | २१,२१५ | १३,१२६ | १६,६७० | ३,९३८ |
| | | २०२२-२३ | ८६६ | ६६३ | ८,४९१ | १,९७९ | ६५५ | २८,२३० | १७,१६२ | २१,८२७ | ५,७०१ |
| | | २०२३-२४ | ८६९ | ७३५ | ८,१४३ | २,५५९ | ६८० | २६,३३३ | १५,९०५ | २०,५६४ | ५,०६३ |
| (१०) | छपाई व मुद्रित माध्यमांचे पुनरुत्पादन (१८) | २०२१-२२ | ६९४ | ४१२ | २,८६९ | ९५९ | ३४५ | ७,५३३ | ३,६५३ | ५,३७४ | १,८६८ |
| | | २०२२-२३ | ६८८ | ४०३ | १,७६२ | ६६६ | २९५ | ७,५२४ | ३,८६८ | ५,६७६ | १,५९१ |
| | | २०२३-२४ | ६०९ | ४५२ | ३,४२१ | २,०२२ | ३७८ | ९,३६८ | ४,६४० | ६,८५० | २,१७६ |
| (११) | कोळसा, शुद्ध पेट्रोलियम यांची उत्पादने (१९) | २०२१-२२ | १६५ | १४६ | २२,४७७ | ११,७६१ | ७९६ | १,३१,१०३ | १,०९,५६२ | १,१८,६९५ | १०,९६६ |
| | | २०२२-२३ | १८७ | १६६ | २५,२२० | १४,९७० | ८२४ | २,३२,४६७ | १,८९,८११ | २,०८,९०७ | २१,६३३ |
| | | २०२३-२४ | २१२ | १९२ | २४,८३३ | ९,७११ | ७७४ | १,८३,७७९ | १,५८,६४९ | १,६९,०३३ | १२,९१५ |
| (१२) | रसायने व रासायनिक उत्पादने औषध, वैद्यकीय रसायने व जैविक उत्पादने (२०,२१) | २०२१-२२ | २,६९२ | २,२१९ | ७०,२४३ | ४१,२६० | ४,४३४ | २,५९,०८७ | १,३१,७६८ | १,८४,७४९ | ६६,८०७ |
| | | २०२२-२३ | २,७३२ | २,२३६ | ७३,४५४ | ४९,६७७ | ५,१३० | २,७५,६३३ | १,४७,५७३ | २,१२,५८२ | ५६,४६८ |
| | | २०२३-२४ | २,७४६ | २,३२७ | ८९,३०४ | ४५,८४६ | ५,५३१ | २,७६,५६२ | १,४४,४९४ | २,०८,९३७ | ६०,०६२ |
| (१३) | रबर आणि प्लास्टिक उत्पादने (२२) | २०२१-२२ | १,६९१ | १,२९८ | २८,००० | ५,१६७ | २,१६८ | ७५,८६८ | ४५,७४५ | ५७,९९३ | १५,२०३ |
| | | २०२२-२३ | १,६८७ | १,३१५ | २७,४३२ | (-) ५,८७८ | २,२२६ | ७४,९६३ | ४६,०६९ | ५८,७७५ | १३,५४३ |
| | | २०२३-२४ | १,६८९ | १,४२३ | ३२,७७४ | (-) ६,६०१ | २,९१८ | ८७,८४२ | ५५,२५४ | ६९,७९१ | १४,०६६ |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.२ (समाप्त)

| | कार्य (दोन अंकी राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण २००८) | वर्ष | उद्योगांची संख्या | कार्यरत असलेल्या कारखान्यांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्ठी | निव्वळ मूल्यवृद्धि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| (१४) | इतर अधातू खनिज उत्पादने (२३) | २०२१-२२ | ९७६ | ६७७ | १४,९८४ | ७,९४९ | ७९७ | ३२,००३ | १५,१३१ | २३,४५१ | ७,१९९ |
| | | २०२२-२३ | ८२९ | ५९२ | १५,९५६ | ७,७८० | ७७१ | २७,१६६ | १२,८९६ | २०,८९० | ५,०७४ |
| | | २०२३-२४ | ९०३ | ५९२ | १७,६५७ | ६,४८३ | १,००० | ४२,८८० | २१,२६१ | ३२,८३६ | ८,४४८ |
| (१५) | मूलभूत धातू (२४) | २०२१-२२ | १,२४३ | ९७६ | ७८,४३६ | १०,५२२ | २,९७७ | २,१५,९२७ | १,४३,८३४ | १,७५,२७० | ३५,७९५ |
| | | २०२२-२३ | १,४०६ | १,१३८ | ७८,१६५ | (-) २,०१६ | ३,४६० | २,५८,५७३ | १,८८,८४२ | २,२७,८२६ | २५,१३७ |
| | | २०२३-२४ | १,४१३ | १,२२८ | ८१,९५५ | ३,१७७ | ३,९५० | २,७१,६१९ | १,९८,४५५ | २,३८,८७९ | २६,५५४ |
| (१६) | धातूच्या वस्तूंची उत्पादने यंत्रे व यंत्रसामग्री वगळून (२५) | २०२१-२२ | ३,०१३ | २,२०५ | १६,१६९ | १३,८९६ | २,३८९ | ५९,६५१ | ३६,२६६ | ४७,२७१ | १०,७६१ |
| | | २०२२-२३ | ३,१७६ | २,३१५ | २०,२५५ | २०,५०३ | ३,०४० | ८३,१९० | ४८,९८१ | ६५,३२६ | १६,०७९ |
| | | २०२३-२४ | ३,१८० | २,३६१ | १८,२९० | १४,७५६ | ३,३७६ | ८१,८८६ | ४९,४३६ | ६४,३८२ | १५,४०१ |
| (१७) | संगणक, विद्युत आणि ऑप्टीकल उत्पादने (२६) | २०२१-२२ | ४४९ | ४०७ | ५,७१० | ९,९४३ | ८४९ | ४४,३६६ | २४,२२५ | ३५,६०८ | ८,००९ |
| | | २०२२-२३ | ४९६ | ३९३ | ५,६८५ | ११,०४५ | ९५० | ५३,३९० | ३०,०११ | ३९,२६१ | १३,३६६ |
| | | २०२३-२४ | ५०१ | ४०३ | ७,३७१ | १८,३०१ | १,०९५ | ५८,९८० | ३७,१५६ | ४७,६२० | १०,२०३ |
| (१८) | विद्युत सामग्री (२७) | २०२१-२२ | १,३१२ | १,००९ | ११,६४२ | ९,२९१ | १,७०८ | ५८,०७५ | ३८,३५१ | ४५,२९० | ११,५२९ |
| | | २०२२-२३ | १,३४९ | १,१५२ | २०,९२५ | १६,१४८ | २,५३० | १,१३,५०९ | ५६,४८५ | ९२,१८८ | १९,४१७ |
| | | २०२३-२४ | १,३३३ | १,०५१ | १५,६०६ | १५,६२६ | २,७४३ | ९८,०३४ | ६४,६६८ | ७५,९९८ | २०,२५५ |
| (१९) | यंत्रे व यंत्रसामग्री (इतरत्र वर्गीकृत नसलेले), यंत्र व यंत्रसामग्रीची दुरुस्ती आणि उभारणी (२८,३३) | २०२१-२२ | २,४३१ | २,०४७ | ३१,१३९ | २७,२९४ | ४,४०५ | १,२७,८९९ | ७३,१५४ | ९८,०१७ | २६,४७९ |
| | | २०२२-२३ | २,२३७ | १,९२७ | ३२,१२३ | ३१,४१७ | ५,०४५ | १,६८,७१४ | १,०२,३२३ | १,३१,२१० | ३३,८३४ |
| | | २०२३-२४ | २,३६२ | १,९९५ | ३७,२४८ | ४३,५११ | ५,६३७ | १,९०,६१२ | १,१०,२६२ | १,४५,०५५ | ४१,३७३ |
| (२०) | मोटार वाहने, ट्रेलर्स व निम ट्रेलर्स (२९) | २०२१-२२ | १,४५५ | १,२७९ | ४९,७४९ | ९,२१८ | ५,३५८ | १,८६,२२४ | १,३४,७४४ | १,५७,१९५ | २१,७१२ |
| | | २०२२-२३ | १,३६७ | १,१६८ | ५२,७२४ | २०,१८४ | ६,२३६ | २,५७,६१४ | १,९२,६३२ | २,१७,२४९ | ३२,०५२ |
| | | २०२३-२४ | १,४२९ | १,२३१ | ६०,३०९ | २५,८२७ | ६,९११ | २,८९,४६८ | २,०९,१७७ | २,३९,६०८ | ४२,४१३ |
| (२१) | इतर परिवहन सामग्री (३०) | २०२१-२२ | ३७० | ३३५ | ८,९५७ | ५,२३८ | १,१८४ | ५६,४०३ | ३९,५५२ | ४४,३२७ | १०,८४० |
| | | २०२२-२३ | ३४९ | २९७ | १०,५३० | ५,५९२ | १,३८६ | ६५,२३५ | ४५,८९९ | ५१,३७८ | १२,४६८ |
| | | २०२३-२४ | ३२९ | २६० | १०,६२७ | ३९२ | १,३९९ | ६९,७१६ | ४८,०५१ | ५४,८०२ | १३,५८९ |
| (२२) | फर्निचर उत्पादने व इतर वस्तुनिर्माण (३१,३२) | २०२१-२२ | १,२०४ | ९१८ | ५,९६८ | ११,९५५ | १,८१० | ६६,७४८ | ४६,२०७ | ५७,९२३ | ८,१८९ |
| | | २०२२-२३ | १,२०४ | ९१५ | ६,०१५ | १४,३४४ | १,८६५ | ७५,३०५ | ५२,९०० | ६६,६६१ | ७,९७९ |
| | | २०२३-२४ | १,१४९ | ८५२ | ८,४९२ | १७,६८७ | २,३६३ | ७८,४१४ | ५३,३९६ | ६७,९२७ | ९,५४३ |
| (२३) | इतर (टाकाऊ वस्तुंचे संचयन, प्रक्रिया व विल्हेवाट संबंधी कार्य, वस्तुंचा पुनर्वापर, प्रकाशन कार्य, इतर उद्योग) (३८,५८, इतर) | २०२१-२२ | १,२९८ | ८८८ | १९,८३९ | ९६ | ८०६ | ३०,४२७ | ८,०७० | २३,०९६ | ५,८२६ |
| | | २०२२-२३ | १,३५३ | ९७६ | २३,२२८ | ४,१५५ | ९२६ | ४०,५१६ | १४,४६९ | ३२,५७० | ६,३२५ |
| | | २०२३-२४ | १,२९४ | १,००६ | २७,५३१ | २,२२४ | १,१४४ | ४०,९६४ | १३,६८६ | २९,२३४ | ९,९६७ |
| | **एकूण** | **२०२१-२२** | **२६,३५०** | **२०,३७२** | **४,५२,१२९** | **१,९८,९५८** | **३७,८६३** | **१६,६६,५०८** | **१०,७२,८१७** | **१३,४५,६१२** | **२,७८,८२२** |
| | | **२०२२-२३** | **२६,४४६** | **२०,७३९** | **४,९३,४४४** | **२,३५,१५७** | **४३,८०९** | **२१,२२,२४२** | **१३,९८,३८८** | **१७,६३,४१५** | **३,१३,२७४** |
| | | **२०२३-२४** | **२६,५३९** | **२१,१९६** | **५५,२२९१** | **२,४८,११५** | **४९,२५७** | **२२,१८,५०२** | **१४,६८,६०३** | **१८,२६,४०५** | **३,४१,४६०** |

*आधार* - वार्षिक उद्योग पाहणी, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

## परिशिष्ट ८.३
## भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष २०११-१२=१००)

| अ.क्र. | बाब | भार | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६++ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| **I** | **सर्वसाधारण निर्देशांक** | **१००.००** | **१२९.०** | **११८.१** | **१२८.८** | **१३८.५** | **१४६.७** | **१५२.६** | **१५६.१** |
| **II** | **खाणकाम** | **१४.३७** | **१०९.६** | **१०१.०** | **१०७.४** | **११९.९** | **१२८.९** | **१३२.८** | **१२७.१** |
| **III** | **वस्तुनिर्माण** | **७७.६३** | **१२९.६** | **११७.२** | **१२८.६** | **१३७.१** | **१४४.७** | **१५०.६** | **१५५.७** |
| | **उद्योग गट** | | | | | | | | |
| १ | खाद्य उत्पादने | ५.३० | १२३.७ | १२०.४ | १२१.७ | १३२.४ | १३४.५ | १३१.० | १२७.२ |
| २ | पेय | १.०४ | १०६.४ | ७८.९ | ८३.८ | १०५.५ | ११०.९ | ११४.५ | १०८.२ |
| ३ | तंबाखू उत्पादने | ०.८० | ९५.४ | ८१.८ | ८५.७ | ८८.४ | ८१.१ | ८४.५ | ९१ |
| ४ | कापड उत्पादने | ३.२९ | ११५.७ | ९१.१ | ११७.७ | १०७.५ | १०७.६ | १०९.३ | १०७.९ |
| ५ | वस्त्रप्रावरणे | १.३२ | १५४.६ | १०८.४ | १२८.४ | १२७.९ | १०९.९ | ११६.७ | ११०.३ |
| ६ | चामडे व संबंधित उत्पादने | ०.५० | १२२.७ | १००.६ | १००.४ | ९६.० | ९५.० | ९१.७ | ८८.४ |
| ७ | लाकुड व  लाकडाची उत्पादने आणि बूच (फर्निचर वगळता), काड्यापासून बनविलेल्या व मुलामा दिलेल्या वस्तु | ०.१९ | ११३.८ | ९१.५ | १०२.९ | १०४.५ | ९८.३ | १०३.९ | १११.८ |
| ८ | कागद आणि कागदाची उत्पादने | ०.८७ | ९०.८ | ६९.६ | ८१.७ | ८२.४ | ७९.४ | ७८.३ | ७८.१ |
| ९ | छपाई व मुद्रित माध्यमांचे पुनरुत्पादन | ०.६८ | ९०.७ | ६५.३ | ७०.६ | ९०.६ | ८९.३ | ८३.९ | ७७.९ |
| १० | कोळसा आणि शुध्द पेट्रोलियम  उत्पादने | ११.७७ | १२६.७ | १११.२ | ११८.२ | १२८.० | १३३.० | १३७.४ | १३८.४ |
| ११ | रसायने व रासायनिक उत्पादने | ७.८७ | ११८.५ | ११६.० | १२१.२ | १२९.३ | १२७.४ | १२९.३ | १२८.५ |
| १२ | औषध,वैद्यकीय रसायने व जैविक उत्पादने | ४.९८ | २१५.२ | २१८.७ | २२७.६ | २१६.२ | २३३.६ | २३१.० | २३५.८ |
| १३ | रबर आणि प्लॅस्टिक उत्पादने | २.४२ | १००.० | ९६.३ | १०३.६ | १०४.५ | १०९.१ | ११३.८ | ११३.२ |
| १४ | इतर अधातू खनिज उत्पादने | ४.०९ | १२१.३ | १०५.७ | १२१.५ | १३५.३ | १४४.१ | १५०.६ | १५४.६ |
| १५ | मूलभूत धातू | १२.८० | १५९.१ | १४९.८ | १७३.३ | १९१.९ | २१४.१ | २२८.४ | २४८.४ |
| १६ | धातूंच्या वस्तुंची उत्पादने (यंत्र व सामग्री वगळून) | २.६५ | ९०.६ | ७८.२ | ८४.७ | ८५.३ | ९२.४ | ९८.१ | १०२.६ |
| १७ | संगणक, विद्युत आणि ऑप्टिकल उत्पादने | १.५७ | १५१.० | १३२.० | १३८.६ | १३७.२ | १२१.७ | १३३.० | १३९.७ |
| १८ | विद्युत सामग्री | ३.०० | १०५.२ | ९२.३ | १०७.२ | ९९.३ | १०६.७ | १३०.६ | १४१.८ |
| १९ | यंत्रे व यंत्रसामग्री, इतरत्र वर्गीकृत नसलेले | ४.७७ | १०७.७ | ९२.५ | १००.० | ११३.५ | १२१.० | १२५.२ | १२८.६ |
| २० | मोटार वाहने, ट्रेलर्स आणि निमट्रेलर्स | ४.८६ | १००.२ | ८१.१ | ९१.५ | ११४.५ | १२७.८ | १३३.७ | १४५.२ |
| २१ | इतर परिवहन सामग्री | १.७८ | १३६.६ | ११२.० | १११.८ | १२७.० | १४४.७ | १६१.४ | १७३.३ |
| २२ | फर्निचर | ०.१३ | १९७.३ | १४२.२ | १६४.८ | २०४.१ | १९२.९ | २२५.३ | २३०.४ |
| २३ | इतर वस्तुनिर्माण | ०.९४ | ८१.२ | ६२.९ | ९०.० | ९०.९ | ८५.३ | ८१.४ | ७२.१ |
| **IV** | **वीज** | **७.९९** | **१५८.४** | **१५७.६** | **१६९.३** | **१८५.२** | **१९८.३** | **२०८.६** | **२१०.८** |

++ माहे एप्रिल २०२४ ते माहे डिसेंबर २०२५ या महिन्यांची सरासरी, माहे डिसेंबर २०२५ ची आकडेवारी शीघ्र अनुमानावर आधारित आहे

*आधार* - राष्ट्रीय सांख्यिकी  कार्यालय, भारत सरकार

## परिशिष्ट ८.४

## राज्यातील सहकारी संस्थांचा तपशील

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०२०-२१ | २०२३-२४ | २०२४-२५* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **१. सहकारी संस्थांची संख्या** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | २९ | ३१ | ३४ | ३४ | ३४ | ३३ | ३३ | ३३ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २०,४२०$ | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २०,८९७ | २१,२४२ | २१,२८४ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,९६४ | ५,४७४ | ११,२९१ | २२,०१४ | २३,४३४ | २१,००६ | २१,३४५ | २१,६४८ |
| (४) पणन संस्था | ४१० | ४२३ | ९३१ | १,११५ | १,७१९ | १,३७० | १,७६२ | १,७५३ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम @ | ६,८१० | १४,३२७ | २८,९५४ | ३९,०७० | ४८,८४८ | २६,४९१ | २२,२२९ | २१,८१६ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था @ | ११,९६४ | २१,९१५ | ४३,८४५ | ७५,२३२ | १,२८,७६० | १,४७,६१३ | १,६२,००७ | १,६६,९७९ |
| **एकूण** | **४२,५९७** | **६०,७४७** | **१,०४,६२०** | **१,५८,०१६** | **२,२४,२४६** | **२,१७,४१०** | **२,२८,६१८** | **२,३३,५१३** |
| **२. सभासदांची संख्या ('०००)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था$$ | ७० | १,०१४ | १,४८५ | १,३७१ | २४७ | २१२ | १६२ | १६५ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३,७९४ | ५,४१६ | ७,९४२ | १०,१२५ | १५,००१ | १५,३१४ | १५,६२८ | १५,७०७ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,४३८ | ३,७५९ | ९,३०२ | १८,४६७ | २१,६१८ | २८,०८५ | २९,००७ | २९,२१० |
| (४) पणन संस्था | २८२ | ४७१ | ७४५ | ८४० | १,३३७ | १,०४१ | १,२५० | १,२५४ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ९५९ | २,१२४ | ३,९७४ | ६,३३९ | ८,०१० | ६,५०८ | ६,३६० | ६,८४५ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १,०३८ | १,९९९ | ३,४५५ | ५,८८० | ६,८०९ | ६,९८९ | ८,०५२ | ८,३२३ |
| **एकूण** | **८,५८१** | **१४,७८३** | **२६,९०३** | **४३,०२२** | **५३,०२२** | **५८,१४९** | **६०,४५९** | **६१,५०४** |
| **३. खेळते भांडवल (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ६१३ | १,८३१ | ८,८०६ | ३९,२६७ | ८९,७१९ | १,६७,५७८ | २,०८,४०० | २,२८,५२० |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३४३ | ५२७ | १,८५१ | ६,९८८ | १८,९८७ | २४,१४५ | २६,५६५ | २७,२६९ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १६८ | १,२०९ | ७,५०८ | ६६,८८७ | १,०४,८१४ | २,०२,६६४ | २,१२,६४७ | २,१५,८३७ |
| (४) पणन संस्था | ३९ | १८८ | ३४० | १,५१८ | १,३०० | १,८९७ | १,५४६ | १,७५१ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | २१९ | १,०२९ | ४,५८८ | १३,२८८ | २८,७१७ | ४५,६९३ | ४५,६५५ | ४६,२१७ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १०७ | ४२६ | १,१९१ | ६,४९२ | ४,८९७ | ७,९८९ | ८,३२८ | ९,०७८ |
| **एकूण** | **१,४८९** | **५,२१०** | **२४,२८४** | **१,३४,४४०** | **२,४८,४३४** | **४,४९,९६६** | **५,०३,१४१** | **५,२८,६७२** |
| **४. स्थूल कर्ज (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ७५१ | १,५२८ | ९,०८५ | २८,७०९ | ४०,४३६ | ६३,८५१ | १,२४,४६७ | १,५०,९९३ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | १३३ | २५० | ८०० | ३,७३४ | ८,०६० | १२,९४१ | १३,१७७ | १३,८८७ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २०४ | १,१२९ | ५,१७८ | ३९,२६८ | ४९,९०७ | ८०,७२६ | ८३,८८६ | ८४,७२५ |
| (४) पणन संस्था | ३ | ३ | ८ | १८ | ११ | ५ | ६ | ६ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३ | १२ | १७ | १०३ | २,०५२ | २,३८५ | १,४६९ | १,४९५ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ४ | १२ | ६० | २३५ | २१५ | २२१ | २४३ | २४९ |
| **एकूण** | **१,०९८** | **२,९३४** | **१५,१४८** | **७२,०६७** | **१,००,६८१** | **१,६०,१२९** | **२,२३,२४८** | **२,५१,३५५** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.४ (समाप्त)

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०२०-२१ | २०२३-२४ | २०२४-२५* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **५. येणे कर्जे (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ४७८ | १,१३७ | ५,८८९ | २३,१२० | ४२,३८५ | ८७,१५८ | १,१७,४३४ | १,२३,९९९ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २८४ | ३८४ | १,३१० | ५,३०८ | १२,०२४ | १८,०१९ | २९,१६९ | ३२,३९० |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १०५ | ७३१ | ४,५९४ | ३५,९०८ | ४७,८६३ | ७५,७८८ | ८१,१९८ | ८२,६६० |
| (४) पणन संस्था | २ | ४ | ९ | १८२ | ५,०३२ | ३० | ३४ | ३५ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ६ | ३० | ६९ | २३६ | ३,७२४ | ६,१५८ | ४,०२३ | ४,५८३ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ८ | २५ | १९१ | २,८९९ | ८३४ | ४९८ | ४६० | ५९६ |
| **एकूण** | **८८३** | **२,३११** | **१२,०६२** | **६७,६५३** | **१,११,८६२** | **१,८७,६५१** | **२,३२,३१८** | **२,४४,२६३** |
| **६. उलाढाल-तयार मालाच्या विक्रीचे मूल्य (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ५१ | १४६ | २३९ | १,०१२ | ५९३ | ८४७ | ८८० | ९०७ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ३ | १० | -- | ३८ | ७६ | ला.ना. | ला.ना. | ला.ना. |
| (४) पणन संस्था | २१४ | ९७९ | २,६०२ | ३,२०५ | १,३६८ | ४,९५४ | ६,९७८ | ७,३५७ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १९४ | १,०३१ | ३,४६७ | ७,४९६ | ४६,११२ | ३४,१६० | ३५,१५९ | ४०,३०४ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ६९ | १८७ | ३३० | १,५८८ | ४,०७६ | ७,६७९ | ६,८८६ | ७,०३४ |
| **एकूण** | **५३१** | **२,३५३** | **६,६३८** | **१३,३३९** | **५२,२२५** | **४७,६४०** | **४९,९०३** | **५५,६०२** |

*अस्थायी    ला.ना. - लागू नाही

टीप - १९९०-९१ पर्यंतची आकडेवारी जून अखेरपर्यंतची आहे.

$ यात प्राथमिक कृषि पतसंस्था, प्राथमिक भू-विकास बँका आणि धान्य बँका यांचा १९७०-७१ पर्यंत समावेश आहे.

$$ नाममात्र सभासद वगळून

@ २०००-०१ या वर्षापासून उपसा सिंचन संस्थांचा समावेश उत्पादक ऐवजी सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था या प्रकारात करण्यात आला आहे.

*आधार* - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

# ९ पायाभूत सुविधा





# ९. पायाभूत सुविधा

९.१ राज्यातील ऊर्जा, परिवहन आणि दळणवळण क्षेत्रांतील प्रगतीद्वारे पायाभूत सुविधांचा लक्षणीय विकास घडून आला आहे. ऊर्जा क्षेत्रात, ग्रीडचे आधुनिकीकरण, नवीकरणीय ऊर्जा निर्मितीमध्ये वाढ आणि सुधारित पारेषणाचे जाळे यांसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे अधिक विश्वासार्हता आणि व्यापक ऊर्जा उपलब्धता सुनिश्चित झाली आहे. उन्नत महामार्ग, विस्तारित मेट्रो प्रणाली आणि सुधारित दळणवळण व्यवस्थापन जोडणी यांद्वारे राज्यातील वाहतूक व्यवस्थेला बळकटी मिळाली आहे. हे प्रयत्न सक्षम पायाभूत सुविधा निर्मिती, सर्वसमावेशक आणि शाश्वत औद्योगिकीकरणास चालना आणि नवोपक्रमाला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने महाराष्ट्राची वचनबद्धता अधोरेखित करतात.

### ऊर्जा

९.२ 'सर्वांसाठी किफायतशीर, विश्वासार्ह, शाश्वत आणि आधुनिक ऊर्जेची उपलब्धता' हे शाश्वत विकास ध्येयांपैकी एक ध्येय आहे. मोठ्या प्रमाणात ग्रामीण विद्युतीकरण, स्वच्छ ऊर्जेला प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांचा अवलंब आणि सौर ऊर्जा प्रकल्पांच्या लक्षणीय वाढीद्वारे नवीकरणीय ऊर्जा क्षमता वाढविणे यामुळे महाराष्ट्राने या ध्येयाच्या पूर्ततेकडे उल्लेखनीय प्रगती साध्य केली आहे. निती आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'शाश्वत विकास ध्येय भारत निर्देशक अहवाल २०२३-२४' नुसार महाराष्ट्राचा या उद्दिष्टासाठीचा शाश्वत विकास निर्देशक गुणांक वर्ष २०१८ मधील ६९ वरून वर्ष २०२४ मध्ये १०० पर्यंत वाढला आहे.

## विजेची स्थापित क्षमता

९.३ राज्यात दि. ३१ मार्च २०२५ रोजी पारंपरिक व अपारंपरिक स्त्रोतांद्वारे वीज निर्मितीची एकूण स्थापित क्षमता ४१,०१९ मेगावॅट असून त्यात खाजगी क्षेत्र, सार्वजनिक क्षेत्र आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी प्रकल्पाचा हिस्सा अनुक्रमे ६१.४ टक्के, ३३.८ टक्के आणि ४.८ टक्के होता. वीज निर्मिती मुख्यत: औष्णिक स्त्रोतांद्वारे केली जात असून राज्याच्या एकूण स्थापित क्षमतेत त्याचा हिस्सा ५१.३ टक्के आहे. स्त्रोतनिहाय स्थापित क्षमता तक्ता ९.१ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.१ : राज्यातील क्षेत्रनिहाय स्थापित क्षमता**




**तक्ता ९.१ स्त्रोतनिहाय स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्त्रोत | दि. ३१ मार्च रोजी | | | दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी |
|---|---|---|---|---|
| | २०२३ | २०२४ | २०२५ | |
| **राज्याअंतर्गत** | **३७,३६६** | **३८,६०१** | **४१,०१९** | **४३,६०२** |
| औष्णिक | २०,०६६ | २०,३६६ | २१,०२६ | १९,६७६ |
| नवीकरणीय | ११,४२० | १२,३५५ | १४,११३ | १८,०४६ |
| जलजन्य | ३,०६१ | ३,०६१ | ३,०६१ | ३,०६१ |
| नैसर्गिक वायुजन्य | २,८१९ | २,८१९ | २,८१९ | २,८१९ |
| **केंद्रीय क्षेत्राकडून वाटप** | **७,९४४** | **८,३२३** | **८,३२३** | **८,२८०** |

*आधार :* महानिर्मिती, महाऊर्जा, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या.

९.३.१ ‘महानिर्मिती’च्या भुसावळ औष्णिक ऊर्जा निर्मिती केंद्रात ६६० मेगावॅट क्षमता वाढीचा प्रकल्प फेब्रुवारी २०२५ मध्ये पूर्ण झाला आहे. कोराडी औष्णिक ऊर्जा निर्मिती केंद्रातील १,३२० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी वैधानिक मंजुरीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

**आलेख ९.२ : राज्यातील स्थापित क्षमता आणि औष्णिक व नवीकरणीय ऊर्जेचा हिस्सा (३१ मार्च रोजी)**




## वीज निर्मिती

९.४ सन २०२४-२५ मध्ये राज्यात १,४०,१७१ दशलक्ष युनिट वीज निर्मिती झाली तर, सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत राज्यात एकूण १,०५,७८८ दशलक्ष युनिट वीज निर्मिती झाली. सन २०२४-२५ मध्ये राज्यात झालेल्या वीज निर्मितीत खाजगी क्षेत्र, सार्वजनिक क्षेत्र आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी क्षेत्राचा हिस्सा अनुक्रमे ५५.२ टक्के, ४३.८ टक्के आणि १.० टक्के होता.

९.४.१ सन २०२४-२५ मध्ये झालेल्या एकूण वीज निर्मितीत औष्णिक, नवीकरणीय आणि इतर स्रोतांद्वारे निर्माण झालेल्या विजेचा हिस्सा अनुक्रमे ७७.८ टक्के, १५.१ टक्के आणि ७.१ टक्के होता. स्रोतनिहाय वीज निर्मिती तक्ता ९.२ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.३ : राज्यातील क्षेत्रनिहाय वीज निर्मिती**




**तक्ता ९.२ स्रोतनिहाय वीज निर्मिती**

(दशलक्ष युनिट)

| स्रोत | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|---|
| **राज्याअंतर्गत** | **१,३३,२७४** | **१,४१,०३९** | **१,४०,१७१** | **१,०५,७८८** |
| औष्णिक | १,०३,४२० | १,१०,४२६ | १,०९,११० | ८०,३८९ |
| नवीकरणीय$ | २१,४६८ | २१,३९२ | २१,११२ | १७,७६१ |
| जलजन्य | ५,९५६ | ५,२५१ | ५,१५५ | ४,०९४ |
| नैसर्गिक वायुजन्य | २,४३० | ३,९७० | ४,७९४ | ३,५४४ |
| **केंद्रीय क्षेत्राकडून प्राप्त** | **४३,९३३** | **४५,२७५** | **४५,००९** | **३०,८४०** |

टीप : १ युनिट = १ किलोवॅट तास  $ बंदिस्त विजेसह  + डिसेंबर पर्यंत

*आधार :* महानिर्मिती, महावितरण, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या.

आलेख ९.४ : राज्यातील वीज निर्मिती आणि औष्णिक व नवीकरणीय ऊर्जेचा हिस्सा




## वीज खरेदी

९.५ सन २०२४-२५ मध्ये महावितरणने खरेदी केलेल्या विजेचा प्रती युनिट सरासरी दर ₹ ५.७३ आणि बेस्टने खरेदी केलेल्या विजेचा प्रती युनिट सरासरी दर ₹ ६.१६ होता. महावितरण आणि बेस्ट यांनी खरेदी केलेल्या विजेचा तपशील तक्ता ९.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.३ महावितरण आणि बेस्ट यांनी खरेदी केलेल्या वीजेचा तपशील**

| वर्ष | महावितरण | | बेस्ट | |
|---|---|---|---|---|
| | खरेदी केलेली वीज (दशलक्ष युनिट) | एकूण किंमत (₹ कोटी) | खरेदी केलेली वीज (दशलक्ष युनिट) | एकूण किंमत (₹ कोटी) |
| २०२३-२४ | १,६६,९७० | ९३,५३४ | ४,९४४ | ३,१६६ |
| २०२४-२५ | १,६७,३२९ | ९५,८८१ | ५,०८२ | ३,१३१ |
| २०२५-२६+ | १,२१,६४० | ७०,७२४ | ३,८०१ | २,१८८ |

*आधार:* महावितरण, बेस्ट + डिसेंबर पर्यंत

## विजेचा वापर

९.६ सन २०२४-२५ मध्ये राज्यात विजेचा एकूण वापर १,६६,२२४ दशलक्ष युनिट होता तर, सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत राज्यात विजेचा एकूण वापर १,२६,४१४ दशलक्ष युनिट होता. राज्यातील क्षेत्रनिहाय विजेचा वापर तक्ता ९.४ मध्ये दिला आहे. विजेचा दरडोई अंतिम वापर तक्ता ९.५ मध्ये दिला आहे. राज्यातील विजेची स्थापित क्षमता, निर्मिती व वापर परिशिष्ट ९.१ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.४ क्षेत्रनिहाय विजेचा वापर**

(दशलक्ष युनिट)

| क्षेत्र | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|---|
| औद्योगिक | ५८,८४२ | ६२,६८७ | ६५,४५९ | ५१,९७३ |
| कृषि | ३७,४८१ | ४०,९२७ | ३८,४२८ | २५,८०६ |
| घरगुती | ३२,७७३ | ३४,९३५ | ३७,२११ | २९,००० |
| वाणिज्यिक | १४,३०३ | १५,६८७ | १६,३०२ | १२,६३१ |
| सार्वजनिक सेवा@ | ६,१११ | ६,४५० | ७,५०६ | ५,७३७ |
| रेल्वे | २४८ | ३५६ | ३८५ | ३७१ |
| इतर | १,००६ | १,०१२ | ९३३ | ८९६ |
| **सर्व** | **१,५०,७६४** | **१,६२,०५४** | **१,६६,२२४** | **१,२६,४१४** |

@ सार्वजनिक दिवाबत्ती व पाणी पुरवठा समाविष्ट + डिसेंबर पर्यंत

*आधार :* महावितरण, बेस्ट, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या.

आलेख ९.५ : वीज निर्मिती व वीज वापर यांचा वार्षिक कल




आलेख ९.६: वीज वापर




## तक्ता ९.५ विजेचा दरडोई अंतिम वापर

(युनिट)

| क्षेत्र | २०२२-२३ | | २०२३-२४ | | २०२४-२५* | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| **सर्व** | **१,१९६.७** | **९१६.०** | **१,२७६.५** | **९६७.५** | **१,२९९.४** | **१,०१०.६** |
| वाणिज्यिक | ११३.५ | ८४.९ | १२३.६ | ९२.२ | १२७.४ | ९५.१ |
| औद्योगिक | ४६७.१ | ३०२.५ | ४९३.८ | ३२२.६ | ५११.७ | ३४०.६ |
| कृषि | २९७.५ | १७६.६ | ३२२.४ | १९७.४ | ३००.४ | २०५.५ |
| घरगुती | २६०.१ | २५५.७ | २७५.२ | २६४.५ | २९०.९ | २७३.१ |

*आधार :* केंद्रीय विद्युत प्राधिकरण, महावितरण, बेस्ट, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. * अस्थायी



आलेख ९.७ : राज्यातील विजेचा दरडोई अंतिम वापर




## विजेची मागणी व पुरवठा

९.७ क्षमता वाढ, पारेषण व वितरण व्यवस्थेतील सुधारणा आणि ऊर्जा संवर्धनाच्या बाबतीत राज्याने केलेल्या विविध उपाययोजनांमुळे वीज पुरवठ्यात सुधारणा झाली आहे. सरासरी कमाल मागणीच्या वेळी वीज पुरवठा तक्ता ९.६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.६ सरासरी कमाल मागणीच्या वेळी वीज पुरवठा**

(मेगावॅट)

| वर्ष | सरासरी कमाल मागणी | पुरवठा | अधिशेष |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | २२,७७९ | २३,१६९ | ३९० |
| २०२३-२४ | २३,१०५ | २३,८११ | ७०६ |
| २०२४-२५ | २३,३७४ | २४,३३५ | ९६१ |
| २०२५-२६+ | २२,७६० | २४,९३९ | २,१७९ |

*आधार*: महावितरण + डिसेंबर पर्यंत



*आधार* : व्यापक वार्षिक मॉड्यूलर सर्वेक्षण (जुलै २०२२ - जून २०२३), महाराष्ट्र शासन

## वीज पारेषण व वितरणासंबंधी पायाभूत सुविधांचे जाळे

९.८ पारेषण व वितरणाच्या पायाभूत जाळ्यामध्ये सुधारणा ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असून त्यात अतिउच्च दाब उपकेंद्रांचे आधुनिकीकरण, सदोष मीटर बदलणे, अत्याधिक भार असलेल्या उच्च व कमी दाबाच्या वाहिन्यांवरील भार अतिरिक्त रोहित्रे पुरवून कमी करणे, नवीन उपकेंद्रे उभारणे व कार्यान्वित करणे यासह वीजचोरी विरुद्ध मोहिम अशा उपाययोजनांचा समावेश आहे.

९.८.१ मार्च २०२५ अखेर महापारेषणचे ५२,२९२ सर्किट किमीचे जाळे व ७५२ उपकेंद्रे यांसह पारेषण क्षमता सुमारे १,४१,९३८ मेगा व्होल्ट ॲम्पिअर (एमव्हीए) होती. पारेषण क्षमता डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत ५२,८३१ सर्किट किमीचे जाळे व ७६१ उपकेंद्रे यांसह १,४४,१८३ एमव्हीए वाढविण्यात आली. महापारेषण ची सन २०२३-२४ व सन २०२४-२५ साठी पारेषण हानी अनुक्रमे ३.२१ टक्के व ३.२६ टक्के होती.




९.८.२ राज्यात मुंबई शहर वगळता सर्वत्र महावितरणचे वितरण जाळे असून मुंबई शहरात बेस्टचे वितरण जाळे आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात महावितरणसह टाटा पॉवर कं. मर्या. व अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. यांचे वितरण जाळे आहे. राज्यातील वितरण जाळ्याचा तपशील तक्ता ९.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.७ राज्यातील वितरण जाळ्याचा तपशील**

(मार्च २०२५ पर्यंत)

| तपशील | वितरण कंपनी | | | |
|---|---|---|---|---|
| | महावितरण | बेस्ट | अदानी इलेक्ट्रीसिटी | टाटा पॉवर |
| उप केंद्रे (संख्या) | ४,२३० | २,६२४ | ७,३२७ | १,२१३ |
| वितरणाचे जाळे (किमी) | ११,८०,९२० | १२,५६२ | २६,२५६ | ५,६७६ |
| रोहित्रे (संख्या) | ९,७१,९६९ | ३,६५९ | ७,६९१ | १,२४० |

*आधार :* महावितरण, बेस्ट, अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या., टाटा पॉवर कं. मर्या.

९.८.३ सन २०२४-२५ मध्ये राज्यातील वीज वितरणात महावितरणचा हिस्सा ८७.३ टक्के असून, त्याखालोखाल अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. यांचा (६.३ टक्के), टाटा पॉवर कं. मर्या. यांचा (३.५ टक्के) आणि बेस्टचा (२.९ टक्के) हिस्सा होता. यंत्रणानिहाय वीज वितरण हानी तक्ता ९.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.८ यंत्रणानिहाय वीज वितरण हानी**

(टक्के)

| वितरण कंपनी | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|
| महावितरण | १४.५६ | १५.८० | १५.०६ |
| बेस्ट | ४.१८ | ४.१२ | ४.६४ |
| अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. | ५.८९ | ५.४५ | ६.५५ |
| टाटा पॉवर कं. मर्या. | १.१४ | १.१९ | ०.८५ |

*आधार :* महावितरण, बेस्ट,अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या., टाटा पॉवर कं. मर्या.



९.८.४ **सुधारित वितरण क्षेत्र योजना:** एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी तसेच सरासरी वीज पुरवठा खर्च व सरासरी प्राप्त महसूल यामधील तफावत कमी करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने सन २०२१ मध्ये सुधारणा अधिष्ठित आणि निष्पत्ती आधारित सुधारित वितरण क्षेत्र योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत मार्च २०२६ पर्यंत वीज वितरणाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, प्रिपेड स्मार्ट मिटरींग व इतर अनुषंगिक कामे करण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के अनुदान वितरण कंपन्यांना देण्यात येणार आहे. राज्यामध्ये ही योजना महावितरण व बेस्ट मार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत, डिसेंबर २०२५ पर्यंत महावितरण मार्फत २,४५१ कृषी फिडरचे विभाजन, ३,८९७ उच्च दाब वितरण प्रणाली रोहित्रे आणि ३०,८३८ एरियल बंच्ड केबल, १,१०२ स्वयंचलित पॉवर फॅक्टर करेक्शन पॅनेल आणि ५,४९४ कंडक्टरचे उन्नतीकरण पूर्ण करण्यात आले आहे. तसेच डिसेंबर २०२५ पर्यंत महावितरणने २.४० कोटी स्मार्ट मीटरच्या उद्दिष्टापैकी सुमारे ७८.६९ लाख स्मार्ट मीटर बसवले आहेत. बेस्टने डिसेंबर २०२५ पर्यंत १०.६ लाख स्मार्ट मीटरच्या उद्दिष्टापैकी सुमारे पाच लाख स्मार्ट मीटर बसवले आहेत.

## नियामक उपाययोजना व वीज दर

९.९ महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगास वीज दर नियमनाअंतर्गत वीज दराच्या सुसूत्रीकरणासाठी उपाययोजना राबविणे, आर्थिक व्यवस्थापन आणि ऊर्जा क्षेत्रातील सुधारणा करणे 'विद्युत अधिनियम, २००३' अन्वये अनिवार्य आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने एप्रिल २०२५ ते मार्च २०३० या कालावधीत वितरण कंपन्यांसाठी वर्षनिहाय प्रवर्गनिहाय दर निश्चित करण्याकरिता 'बहुवार्षिक दर नियमन, २०२४' अधिसूचित केले आहे. सन २०२५-२६ मधील सरासरी वीज दर तक्ता ९.९ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ९.९ सन २०२५-२६ मधील सरासरी वीज दर**

(₹ प्रति युनिट)

| ग्राहक गट | महावितरण | बेस्ट | अदानी इलेक्ट्रीसिटी | टाटा पॉवर |
|---|---|---|---|---|
| **लघु दाब - घरगुती/निवासी** | | | | |
| दारिद्र्य रेषेखालील | ३.०९ | ३.८६ | @ | @ |
| ० ते १०० युनिट | ७.३१ | ४.१३ | ६.७७ | ३.०७ |
| १०१ ते ३०० युनिट | १३.१७ | ८.१७ | १०.४९ | ६.७७ |
| ३०१ ते ५०० युनिट | १७.५६ | १२.६५ | ११.६८ | १२.८९ |
| ५०० युनिट पेक्षा अधिक | १९.१५ | १४.४५ | १२.२० | १४.५४ |
| **लघु दाब - व्यावसायिक/अनिवासी** | | | | |
| ० ते २० किलोवॅट भार | १३.०९ | ९.७३ | ९.३९ | ८.८७ |
| २० किलोवॅट पेक्षा अधिक आणि ५० किलोवॅट पर्यंत भार | १६.७८ | ९.५६ | ९.६३ | ९.४२ |
| ५० किलोवॅट पेक्षा अधिक भार | १९.०४ | ८.८१ | ९.२८ | ९.३८ |
| **लघु दाब - उद्योग** | | | | |
| ० ते २० किलोवॅट भार | ८.६४ | ८.५१ | ८.३४ | ८.०३ |
| २० किलोवॅट पेक्षा अधिक भार | १०.१७ | ९.६९ | ९.३५ | ९.२१ |
| **लघु दाब-कृषि** | | | | |
| कृषिपंप (मीटर सह) | ५.२४ | @ | @ | @ |
| इतर (मीटर सह) | ८.५० | @ | @ | @ |
| **लघु दाब - पथदिवे (सार्वजनिक दिवाबत्ती)** | | | | |
| ग्रामपंचायत आणि अ, ब, क वर्ग नगरपरिषद | ९.१९ | @ | @ | @ |
| महानगरपालिका क्षेत्रे | ११.२४ | # | # | # |
| **लघु दाब - सार्वजनिक सेवा** | | | | |
| शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये | ११.२२ | ८.२९ | ८.३२ | ७.९८ |
| **उच्च दाब - व्यावसायिक** | १६.८३ | ७.८६ | ७.७१ | ७.५८ |
| **उच्च दाब - उद्योग** | १०.७८ | ७.८८ | ७.५३ | ६.९२ |
| **उच्च दाब - रेल्वे/ मेट्रो/ मोनोरेल** | १०.२२ | ८.८९ | ८.३१ | ७.१२ |
| **उच्च दाब - सार्वजनिक सेवा** | | | | |
| शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये | १३.७९ | ७.८२ | ७.२६ | ७.७० |
| **उच्च दाब - कृषिपंप** | ७.२० | @ | @ | @ |
| **उच्च दाब - कृषि इतर** | ९.४९ | @ | @ | @ |

@ ग्राहकांची संख्या निरंक वा अत्यंत कमी असल्याने सरासरी दर दर्शविले नाहीत # लघु दाब पथदिवे, लघु दाब इतर सार्वजनिक सेवांमध्ये समाविष्ट

*आधार*: महाराष्ट्र वीज नियामक आयोग

## नवीकरणीय ऊर्जा

९.१० सन २०३० पर्यंत नवीकरणीय ऊर्जेचा हिस्सा मोठ्या प्रमाणात वाढवण्याकरिता, वीज निर्मितीच्या विद्यमान पारंपरिक स्रोतांना पर्याय म्हणून नवीकरणीय ऊर्जा स्रोतांचा वापर करणे आवश्यक झाले आहे. पवन, सौर, जल, जैविक, बायोगॅस, भरतीच्या लाटा, भू-औष्णिक इत्यादी स्वच्छ व पर्यावरणस्नेही नवीकरणीय ऊर्जेचे स्रोत आहेत. राज्यातील नवीकरणीय ऊर्जा स्रोतांचा प्रोत्साहन, प्रचार व विकासासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) ही प्राधिकृत संस्था आहे.

९.१०.१ सन २०२४-२५ मध्ये राज्याच्या एकूण स्थापित क्षमतेत नवीकरणीय ऊर्जेचा हिस्सा ३४.४ टक्के आहे. नवीकरणीय ऊर्जेच्या स्थापित क्षमतेनुसार राजस्थान आणि गुजरात नंतर राज्य देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य व स्थापित क्षमता तक्ता ९.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१० राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य व स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्रोत | संभाव्य क्षमता | स्थापित क्षमता | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | दि. ३१ मार्च रोजी | | | दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी |
| | | २०२३ | २०२४ | २०२५ | |
| पवन | ९८,२१० | ५,०११ | ५,२१४ | ५,२९१ | ५,८०६ |
| चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती | १,५८० | २,४०७ | २,५८२ | २,६९० | २,७३३ |
| सौर | ६४,३२० | ३,३७२ | ३,९१५ | ५,४८८ | ८,८५९ |
| लघुजल विद्युत प्रकल्प# | ७८६ | ३७० | ३७० | ३७० | ३७४ |
| कृषि अवशेष | २,६३० | २१५ | २१५ | २१५ | २१५ |
| औद्योगिक कचरा | ८९८ | ४२ | ४२ | ४२ | ४२ |
| शहरी घन कचरा | | ३ | १७ | १७ | १७ |
| **एकूण** | **१,६८,४२४** | **११,४२०** | **१२,३५५** | **१४,११३** | **१८,०४६** |

*आधार* : महाऊर्जा

# जलसंपदा विभागाने स्थापित केलेले २५ मेगावॅट पेक्षा कमी क्षमतेचे प्रकल्प

**आलेख ९.१० : राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची स्थापित क्षमता**




९.११ **नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन व नवीकरणीय ऊर्जा प्रमाणपत्रे पद्धती**: बांधील यंत्रणेद्वारे (वितरण कंपन्या, ग्रीडला जोडलेले बंदिस्त वीज निर्मिती प्रकल्प व वितरण मुक्त प्रवेश असलेले ग्राहक) वापर केलेल्या एकूण विजेपैकी विनिर्दिष्ट मर्यादेत नवीकरणीय ऊर्जा खरेदी करणे हे महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन (आरपीओ) अंतर्गत बंधनकारक केले आहे.

९.११.१ नवीकरणीय ऊर्जेस चालना देणे आणि उपलब्ध असलेले नवीकरणीय ऊर्जा स्रोत व बांधील यंत्रणांना साध्य करावयाचे 'आरपीओ' यांच्यातील तफावत दूर करण्याकरिता नवीकरणीय ऊर्जा प्रमाणपत्र (आरईसी) हे बाजाराधारीत साधन आहे. राज्याबाहेरील किंवा राज्यातील निर्मिती झालेल्या नवीकरणीय ऊर्जेच्या खरेदीस अनुसरून 'आरईसी' प्रमाणपत्र 'आरपीओ' च्या अनुपालनासाठी पात्र मानले जाते. 'आरईसी' पद्धती अंतर्गत ३१ डिसेंबर २०२५ अखेर महाऊर्जा कडून ३७१ नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना (एकूण क्षमता १,१८२.०२ मेगावॅट) मान्यता देण्यात आली आहे. 'आरपीओ' अंतर्गत साध्याचा तपशील तक्ता ९.११ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.११ 'आरपीओ' अंतर्गत साध्याचा तपशील**

(टक्के)

| वितरण कंपनी | सौर ऊर्जा | | इतर नवीकरणीय ऊर्जा | |
|---|---|---|---|---|
| | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२२-२३ | २०२३-२४ |
| **ऊर्जा खरेदी बंधन** | **८.०** | **१०.५** | **११.५** | **११.५** |
| महावितरण | ७.२ | ७.३ | ८.६ | ७.० |
| बेस्ट | १.८ | १.१ | ०.१ | ०.० |
| अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. | १४.१ | १७.३ | ११.५ | १३.२ |
| टाटा पॉवर कं मर्या. | १७.३ | १८.३ | ७.५ | ११.२ |

*आधार* : महाऊर्जा

९.११.२ महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या 'आरपीओ-आरईसी नियमन-२०१९' च्या फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या सुधारणेनुसार सन २०२४-२५ मध्ये बांधील यंत्रणांना त्यांच्या एकूण पारंपरिक वीज वापरामध्ये किमान पवन ऊर्जा ०.६७ टक्के, जलजन्य ऊर्जा ०.३८, सौर ऊर्जा १.५० टक्के व इतर नवीकरणीय ऊर्जा २७.३५ टक्के खरेदी करणे बंधनकारक आहे. 'आरपीओ' अंतर्गत वर्ष २०२४-२५ करिता साध्याचा तपशील तक्ता ९.१२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.१२ 'आरपीओ' अंतर्गत वर्ष २०२४-२५ करिता साध्याचा तपशील**

(टक्के)

| वितरण कंपनी | पवन | जलजन्य | वितरित | इतर |
|---|---|---|---|---|
| **वर्ष २०२४-२५ करिता ऊर्जा खरेदी बंधन** | **०.६७** | **०.३८** | **१.५०** | **२७.३५** |
| महावितरण | ०.१४ | ०.०० | २.८५ | १४.०६ |
| बेस्ट | ०.०० | ०.०० | ०.२७ | ६६.३१ |
| अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. | ०.०० | ०.०० | ३.७८ | २८.५८ |
| टाटा पॉवर कं मर्या. | ०.०० | ०.०० | ०.४८ | ३८.४५ |

*आधार* : महाऊर्जा

## नवीकरणीय ऊर्जेबाबत धोरणे

९.१२ शाश्वत ऊर्जा आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या वचनबद्धतेचा एक भाग म्हणून राज्य शासनाने नवीकरणीय ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक धोरणे राबवली आहेत. त्यापैकी महत्वाची धोरणे खाली दिली आहेत.

- **अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण, २०२०** - राज्य शासनाने पारेषण संलग्न व पारेषण विरहित प्रकल्पांसाठी नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्रोतांपासून १७,३६० मेगावॅट क्षमतेच्या वीज निर्मितीचे धोरण अंगिकारले आहे.
- **महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण, २०२३** - सन २०३० पर्यंत उद्योगांमध्ये कार्बन मुक्ततेला चालना देणे तसेच हरित हायड्रोजन क्षेत्रात निर्यातीला प्रोत्साहन देणे आणि ऊर्जा सुरक्षितता वाढविणे, यांकरिता राज्यात प्रतीवर्षी किमान ५०० किलोटन हरित हायड्रोजनची उत्पादन क्षमता निर्माण करण्याचे महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरणाचे उद्दिष्ट आहे.

## विद्युतीकरणा संबंधित योजना

९.१३ राज्यात दि. ३१ मार्च २०२५ अखेर एकूण ५१.२६ लाख कृषिपंपांचे विद्युतीकरण झाले आहे. सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत एकूण २,७४,६१४ कृषि पंपांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. कृषी क्षेत्र आणि घरगुती वापरासाठी विद्युतीकरणाबाबत राज्यात विविध योजना राबविल्या जात आहेत. विद्युतीकरणासंबंधी विविध योजनांचा तपशील तक्ता ९.१३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.१३ विद्युतीकरण संबंधी विविध योजनांचा तपशील**

(योजनेच्या सुरुवातीपासून डिसेंबर २०२५ पर्यंत)

| योजना | योजनेची उद्दिष्टे | योजनेची सुरुवात | बाब | साध्य |
|---|---|---|---|---|
| **कृषी क्षेत्रातील विद्युतीकरण योजना** | | | | |
| प्रधान मंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाभियान (पीएम कुसुम) | राज्यात पारेषण विरहीत सौर कृषी पंप स्थापित करणे | जुलै २०१९ | स्थापित सौर कृषी पंपांची संख्या | १,९६,७७३ |
| मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० | राज्यात १६,००० मेगावॅट सौर ऊर्जा क्षमता स्थापित करुन राज्यातील १०० टक्के कृषी पंप ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा करणे | मे २०२३ | स्थापित सौर ऊर्जा क्षमता (मेगावॅट) | २,८८७.८ |
| मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना | ७.५ एचपी पर्यंतच्या कृषी पंप वापरकर्त्यांना मोफत वीज पुरविणे | जुलै २०२४ | लाभार्थींची संख्या | ४५,०१,३७३ |
| उच्च दाब वितरण प्रणाली योजना | राज्यातील दि. ३१ मार्च, २०१८ अखेर वीज जोडणीकरिता आवश्यक शुल्क भरलेल्या व जोडणीसाठी प्रलंबित कृषीपंपांना वीज जोडणी देणे | मे २०१८ | वीज जोडण्यांची संख्या | १,३८,८३६ |
| **घरगुती वापरासाठी विद्युतीकरण योजना** | | | | |
| प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना | तीन किलोवॅट पर्यंत रुफटॉप सौर यंत्रणा बसवणाऱ्या ग्राहकांना अनुदान देऊन एक कोटी घरांना वीज पुरविणे | फेब्रुवारी २०२४ | स्थापित क्षमता (मेगावॅट) | १,४९३.९ |
| रुफटॉप सोलार प्रोग्राम | सर्व क्षेत्रातील वीज ग्राहकांसाठी रुफटॉप सौर यंत्रणा स्थापित करणे | फेब्रुवारी २०१६ | रुफटॉप सौर यंत्रणांची स्थापित क्षमता (मेगावॅट) | ४,६८९.० |
| अटल पुनरुज्जीवन आणि शहरी परिवर्तन अभियान (अमृत) | पाणीपुरवठा आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांसाठी सौर ऊर्जा प्रकल्पांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे | डिसेंबर २०१८ | स्थापित क्षमता (किलोवॅट) | १५,८०९ |
| **अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण, २०२० अंतर्गत योजना** | | | | |
| विकेंद्रीत सुक्ष्म पारेषण प्रकल्प | पारंपरिक पद्धतीने विद्युतीकरण होऊ न शकणाऱ्या राज्यातील अतिदुर्गम भागातील गावे/ पाडे यांमधील घरांना सौरऊर्जा अथवा अन्य अपारंपरिक ऊर्जेद्वारे शाश्वत व अखंडित वीज पुरवठा करण्याकरिता विकेंद्रीत सुक्ष्म पारेषण प्रकल्प स्थापित करणे | डिसेंबर २०२० | विकेंद्रीत सूक्ष्म पारेषण प्रकल्पांची स्थापित क्षमता (किलोवॅट) | ९१.२ |
| सौर ऊर्जेवर आधारीत शीतगृह | शेतमालाची साठवण करण्यासाठी प्रतीवर्षी सौर ऊर्जेवर आधारीत प्रत्येकी ४ किलोवॅट चे ८०० शीतगृहे स्थापित करणे | डिसेंबर २०२० | स्थापित शीतगृहांची संख्या | २२ |
| ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रम | महावितरण कंपनीला पुढील ५ वर्षांमध्ये ज्या गावे /वाड्या / पाड्यांचे पारंपारिक पद्धतीने विद्युतीकरण करणे शक्य होणार नाही अशा ठिकाणी महाऊर्जा मार्फत सौरऊर्जेवर आधारीत घरगुती दिवे व पंखा उपलब्ध करुन देणे. | डिसेंबर २०२० | विद्युतीकरण करण्यात आलेल्या घरांची संख्या | ७,९७७ |

*आधार:* महावितरण, महाऊर्जा

९.१३.१ **ऊर्जा संवर्धनाबाबत विविध उपाययोजना:** ऊर्जा संवर्धनास प्रोत्साहन देणाऱ्या विविध उपाययोजनांची माहिती तक्ता ९.१४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१४ ऊर्जा संवर्धनास प्रोत्साहन देणाऱ्या विविध उपाययोजनांची माहिती**

| बाब | | दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत (संख्या) | संभाव्य ऊर्जा बचत क्षमता (दशलक्ष युनिट) | प्रती वर्षी संभाव्य कार्बन कपात (मे. टन) |
|---|---|---|---|---|
| **नवीकरणीय ऊर्जेबाबत उपाययोजना** | | | | |
| अ) | ऊर्जा लेखा परीक्षण | २,३४४ | ९५.३३ | ७८,१७१.२२ |
| ब) | सहज ऊर्जा लेखा परीक्षण | ४,१८९ | ८.८० | ७,२४०.४६ |
| क) | शासकीय/निमशासकीय कार्यालयांच्या इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धन प्रात्यक्षिक प्रकल्प राबविणे | १७७ | १५.८३ | १२,९८१.३३ |
| ड) | महानगरपालिका/नगरपालिकांमध्ये ऊर्जा संवर्धन संयंत्रे बसविणे | ४० | २.४३ | १,९९२.६१ |
| **ब्युरो ऑफ एनर्जी एफीशिएन्सी अंतर्गत योजना** | | | | |
| अ) | आदर्श ऊर्जा कार्यक्षम गाव मोहीम | ४४ | २.६६ | २,१८८.०० |
| ब) | शासकीय शाळांमध्ये ऊर्जा कार्यक्षम उपक्रम राबविणे | ४६४ | १.८१ | १,४८९.५१ |
| क) | शासकीय/निमशासकीय रुग्णालयांमध्ये ऊर्जा संवर्धन प्रात्यक्षिक प्रकल्प राबविणे | ४६ | ०.३४ | २८६.४५ |
| ड) | नगरपालिकांमध्ये ऊर्जा संवर्धन प्रात्यक्षिक प्रकल्प राबविणे | २२ | १.७० | १,३९९.२७ |
| इ) | शासकीय इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धन प्रात्यक्षिक प्रकल्प राबविणे | २२ | ०.९० | ७४१.८२ |
| ई) | ऊर्जा क्लब | ५३३ | ला.ना. | ला.ना. |
| पवन मापन केंद्रे | | ४१४ | ला.ना. | ला.ना. |
| शासकीय इमारतीतील सौर ऊर्जा प्रकल्प | | ५,१७६ | ५५.९४ | ४५,८७७.६० |
| जैविक कांडी कोळसा (ब्रिक्वेटींग) प्रकल्प | | २१३ | ला.ना. | ला.ना. |
| प्रदर्शने | | ३६७ | ला.ना. | ला.ना. |

*आधार:* महाऊर्जा ला.ना. लागू नाही

## ऊर्जेचे इतर प्रकार

### पेट्रोलियम व नैसर्गिक वायू

९.१४ राज्यात पाईपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) जोडणी व कॅाम्प्रेस्ड नैसर्गिक वायू (सीएनजी) केंद्रे याकरिता महानगर गॅस मर्या., महाराष्ट्र नॅचरल गॅस मर्या. आणि गॅस ॲथॉरीटी ऑफ इंडिया मर्या. (गेल) या यंत्रणा कार्यरत आहेत. पीएनजी जोडणी व सीएनजी स्टेशन यांची माहिती तक्ता ९.१५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१५ पीएनजी जोडणी व सीएनजी स्टेशन यांची माहिती**

| तपशील | २०२२-२३ | | २०२३-२४ | | २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| सीएनजी स्टेशन (संख्या) | ७४१ | ५,६६६ | ९६४ | ६,८६१ | १,१२२ | ८,०६७ |
| सीएनजी विक्री ('००० मे.टन) | १,०२२ | ५,१०३ | १,१३० | ५,६६१ | १,३११ | ६,६९० |
| पीएनजी जोडणी ('०००) | २,८४६ | ११,०८४ | ३,६२३ | १२,९८३ | ४,२५७ | १५,१०७ |
| घरगुती | २,८४१ | ११,०२९ | ३,६१८ | १२,९२३ | ४,२५१ | १५,०४१ |
| औद्योगिक | ०.९ | १६.६ | १.० | १८.८ | १.२ | २०.५ |
| वाणिज्यिक | ४.७ | ३७.८ | ४.९ | ४१.४ | ५.३ | ४५.४ |

*आधार:* पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार

## पेट्रोलियम उत्पादनांचा वापर

९.१५ प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांच्या वापराचा तपशील तक्ता ९.१६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.१६ प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांच्या वापराचा तपशील**

('००० मे. टन)

| पेट्रोलियम उत्पादने | २०२३-२४ | | २०२४-२५* | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| नाफ्था | ३७७ | १३,८६४ | ३२८ | १३,०२८ |
| द्रवरुप पेट्रोलियम गॅस (एलपीजी) | ३,४२६ | २९,६५० | ३,५३३ | ३१,३२८ |
| मोटर स्पिरीट/गॅसोलिन (एमएस) | ४,०६८ | ३७,२१९ | ४,३७१ | ४०,००५ |
| उच्च दर्जाचे केरोसिन (एसकेओ) | ४ | ४७९ | ३ | ४०८ |
| एव्हीएशन टर्बाईन इंधन (एटीएफ) | १,४६८ | ८,२४७ | १,५६८ | ८,९८५ |
| हाय स्पीड डिझेल (एचएसडी) | ९,९३१ | ८९,६५३ | १०,४५० | ९१,४०७ |
| कमी प्रतीचे डिझेल ऑईल (एलडीओ) | १२२ | ७८३ | १२९ | ८३८ |
| फर्नेस ऑईल (एफओ) | ५४६ | ५,६४५ | ६४२ | ५,७२० |
| हॉट हेवी स्टॉक (एचएचएस)/ लो सल्फर हेवी स्टॉक (एलएसएचएस) | ७३३ | ८७३ | १९५ | ७७७ |
| लुब्रीकंट/वंगण | ४८७ | ४,०७६ | ५२१ | ४,५८१ |
| डांबर | ६१७ | ८,८३८ | ५९४ | ८,५८२ |
| इतर | ८०१ | ३३,९४३ | ७५४ | ३३,५६३ |
| **एकूण** | **२२,५८०** | **२,३३,२७०** | **२३,०८८** | **२,३९,२२२** |

*आधार* : पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार * अस्थायी

९.१५.१ उच्च दर्जाचे केरोसिन (एसकेओ)/ कमी प्रतीचे डीझेल ऑईल (एलडीओ) वितरक आणि एसकेओ/एलडीओ किरकोळ विक्री केंद्रे यांचा तपशील तक्ता ९.१७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.१७ एसकेओ/ एलडीओ वितरक आणि एसकेओ/एलडीओ किरकोळ विक्री केंद्रे**

| तपशील | २०२२-२३ | | २०२३-२४ | | २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| एसकेओ/एलडीओ वितरक (संख्या) | ७८६ | ६,४१४ | ७८६ | ६,३४४ | ७८६ | ६,३९५ |
| एसकेओ/एलडीओ किरकोळ विक्री केंद्रे (संख्या) | ८,०४५ | ८६,८५५ | ८,३५८ | ९०,०८४ | ८,७९८ | ९६,७२४ |
| सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी एसकेओ चे वाटप ('००० मे. टन) | १३ | ९६८ | ६ | ७५६ | २ | ३२४ |
| सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी एसकेओ ची उचल ('००० मे. टन) | ३ | ३०८ | १ | २९८ | १ | २३० |

*आधार*: पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार

९.१५.२ द्रवरूप पेट्रोलियम गॅस (एलपीजी) ग्राहक आणि वितरक यांचा तपशील तक्ता ९.१८ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.१८ एलपीजी ग्राहक आणि वितरक यांचा तपशील**

| तपशील | २०२२-२३ | | २०२३-२४ | | २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| एलपीजी सक्रिय घरगुती ग्राहक (लाख) | ३०४ | ३,१४० | ३११ | ३,२४२ | ३१७ | ३,२९७ |
| एलपीजी वितरक (संख्या) | २,२३१ | २५,३८६ | २,२३७ | २५,४८१ | २,२४० | २५,५६६ |
| स्वयंचलित एलपीजी वितरण केंद्रे (संख्या) | ५९ | ६४० | २७ | ४६८ | २१ | ४४० |
| बॉटलिंग प्लांट्स (संख्या) | २२ | २०८ | २२ | २१० | २२ | २११ |
| बॉटलिंग क्षमता (प्रति वर्ष हजार मे. टन) | २,६१० | २२,२२५ | २,६७० | २२,८४३ | २,६७० | २३,०८३ |

*आधार*: पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार

# वाहतूक व दळणवळण

९.१६ सामाजिक व आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी विश्वासार्ह, सुरक्षित व अखंडित वाहतूक व दळणवळण व्यवस्था आवश्यक आहे. वाहतूक व्यवस्थेमध्ये रस्ते, रेल्वे, जलमार्ग आणि हवाईमार्ग यांचा समावेश होतो तर दळणवळण व्यवस्थेमध्ये टपाल सेवा, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, इंटरनेट सेवा इत्यादी प्रमुख संपर्क माध्यमे आहेत. वाहतूक व दळणवळण क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीमुळे जलद संपर्क, सेवा पुरवठ्यात सुधारणा आणि उत्पादकतेत वाढ होते.

# रस्ते वाहतूक

९.१७ **रस्त्यांचे जाळे:** रस्त्यांच्या जाळयामध्ये महामार्ग, जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते व शहरांतर्गत रस्ते यांचा समावेश आहे. माहे मार्च २०२५ अखेर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची एकत्रित लांबी इतर यंत्रणांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी वगळता ३.४५ लाख किमी होती. वन विभागाच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी मार्च २०२५ अखेर १५,९६६.७१ किमी होती. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील राज्यातील रस्त्यांची प्रकारानुसार लांबी तक्ता ९.१९ मध्ये तर त्याची समयमालिका परिशिष्ट ९.२ मध्ये दिली आहे. जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण परिशिष्ट ९.३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ९.१९ राज्यातील रस्त्यांची प्रकारानुसार लांबी**

(दि. ३१ मार्च रोजी)

| वर्ष | रस्त्यांची लांबी (किमी) | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | |
| २०२१-२२ | १८,३६६ | २,६२२ | २९,२६५ | ६८,५३५ | ४५,३७१ | १,५९,७१४ | ३,२३,८७३ |
| २०२२-२३ | १८,३६६ | २,७१६ | ३०,४६५ | ७१,५७४ | ४३,२२९ | १,५९,१३९ | ३,२५,४८९ |
| २०२३-२४ | १८,३६६ | २,६९२ | ३०,९२२ | ७४,१७८ | ४२,०३९ | १,७१,६५१ | ३,३९,८४८ |
| २०२४-२५* | १८,३६६ | २,६९२ | ३१,५३२ | ७४,७९७ | ४२,२१७ | १,७६,२१८ | ३,४५,८२२ |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही *अस्थायी

*आधार* : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन

९.१८ **केंद्रीय रस्ते निधी योजना:** राष्ट्रीय महामार्ग, राज्य रस्ते (आंतरराज्य जोडणारे व आर्थिक दृष्ट्या महत्वाचे), ग्रामीण रस्ते यांचा विकास व देखभाल दुरुस्ती करणे तसेच रेल्वे रुळ ओलांडण्यासाठी रेल्वे रुळावरील उड्डाण पूल व भुयारी मार्ग बांधणे आणि कर्मचारी नसलेल्या रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी आवश्यक ती सुरक्षा यंत्रणा उभारणे यासाठी भारत सरकार सन २००१-०२ पासून केंद्रीय रस्ते निधी योजना राबवित आहे. केंद्रीय रस्ते निधी योजने अंतर्गत राज्यातील १,६९१ मंजूर कामांपैकी मार्च २०२५ अखेर ७७ टक्के कामे पूर्ण झाली आहेत.

९.१९ **प्रधान मंत्री ग्राम सडक योजना:** भारत सरकारकडून सन २००० मध्ये सुरू करण्यात आलेल्या प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेचा उद्देश ग्रामीण भागात ५०० व अधिक (आदिवासी भागात २५० व अधिक) लोकसंख्या असलेल्या तसेच रस्त्याने न जोडलेल्या वस्त्यांना बारमाही रस्त्यांनी जोडणे असा होता. ग्रामीण व्यापारी केंद्राच्या वाढीस सहाय्यकारी अशा आर्थिक दृष्ट्या महत्वाच्या निवडक ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करणे या उद्देशाने सन २०१३ मध्ये भारत सरकारने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ सुरू केली. माध्यमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि बाजार समिती केंद्रे यांना जोडणाऱ्या रस्त्यांची दर्जोन्नती करणे या उद्देशाने भारत सरकारने सन २०१९ मध्ये प्रधान मंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ सुरू केली. माहे डिसेंबर २०२५ अखेर प्रधान मंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत रस्त्यांनी जोडलेल्या वस्त्यांची संख्या १,४१७ होती. प्रधान मंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत बांधलेल्या व दर्जोन्नती केलेल्या रस्त्यांची लांबी तक्ता ९.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२० प्रधान मंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत बांधलेल्या व दर्जोन्नती केलेल्या रस्त्यांची लांबी**

(डिसेंबर २०२५ पर्यंत)

| टप्पा | मंजूर रस्त्यांची लांबी (किमी) | काम पूर्ण झालेल्या रस्त्यांची लांबी (किमी) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| टप्पा - १ | २४,२१०.८७ | २४,१७२.११ | ७,२९०.५६ |
| टप्पा - २ | २,५८५.९१ | २,५८५.९१ | १,४३७.३२ |
| टप्पा - ३ | ६,३३१.४७ | ४,८९५.११ | ४,०६८.८७ |
| **एकूण** | **३३,१२८.२५** | **३१,६५३.१३** | **१२,७९६.७५** |

*आधार :* ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन

९.२० **मुख्यमंत्री ग्राम सडक योजना:** प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेत समाविष्ट नसलेल्या, रस्त्यांनी न जोडलेल्या वस्त्यांना जोडणे व अस्तित्वात असलेल्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करणे याकरिता सन २०१५-१६ पासून राज्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजना राबविण्यात येत आहे. सन २०२१-२२ पासून राज्यातील इतर जिल्हा रस्ते व ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ राबविण्यात येत आहे. याव्यतिरिक्त रस्त्यांच्या बांधकामासाठी सन २०२३-२४ पासून सिमेंट काँक्रीट तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. माहे मार्च २०२४ पासून २३,००० किमी लांबीचे रस्ते आणि पूल बांधण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत बांधलेल्या व दर्जोन्नती केलेल्या रस्त्यांची लांबी तक्ता ९.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२१ मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत बांधलेल्या व दर्जोन्नती केलेल्या रस्त्यांची लांबी**

( डिसेंबर २०२५ पर्यंत)

| टप्पा | मंजूर रस्त्यांची लांबी (किमी) | काम पूर्ण झालेल्या रस्त्यांची लांबी (किमी) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| टप्पा-१ | ३०,९२२ | ३०,१२० | २१,६३०.०० |
| टप्पा-२ | १६,८८७ | २,४५० | २,३५०.०० |
| टप्पा-३ | २३,००० | - | - |

*आधार :* ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन

९.२१ **भारतमाला परियोजना:** भारत सरकार देशभरात मालवाहतूक व प्रवासी वाहतूकीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी तसेच पायाभूत सुविधांमधील उणिवा भरून काढण्यासाठी सन २०१५ पासून भारतमाला परियोजना हा कार्यक्रम राबवित आहे. राज्यामध्ये या कार्यक्रमा अंतर्गत ₹ ४६,१६४ कोटी किंमतीच्या ३५ प्रकल्पांचे काम सुरू असून त्यापैकी पूर्ण झालेले १७ प्रकल्प वाहतूकीस खुले झाले. या प्रकल्पात संत तुकाराम पालखी मार्ग, संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग, वडोदरा- मुंबई जलदगती महामार्ग यांचा समावेश आहे.

९.२२ **महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे प्रकल्प:** राज्यातील रस्ते व संलग्न पायाभूत सुविधांचा प्रामुख्याने खाजगी सहभागाच्या माध्यमातून विकास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कार्यरत असून महामंडळाद्वारे रस्ते प्रकल्प, उड्डाणपूल प्रकल्प, टोल वसुली अधिकार, इत्यादी कामे केली जातात. महामंडळाने हाती घेतलेले बहुतांशी प्रकल्प 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' या तत्वावर आहे. राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्य:स्थिती तक्ता ९.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२२ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्य:स्थिती**

(डिसेंबर २०२५ पर्यंत)

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्पाची अंदाजित किंमत (₹ कोटी) | खर्च (₹ कोटी) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|
| वर्सोवा - वांद्रे सागरी सेतू प्रकल्प | १८,१२०.९६ | ४,८१९.६४ | २०२८-२९ |
| मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गाचे आवर्धन | ७,१५५.०० | ७,५६०.४४ | २०२५-२६ |
| पुणे चक्राकार वळण रस्ता | ४२,२७७.७० | ११,१४१.४८ | २०२७-२८ |
| विरार - अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्ग | ५३,८६२.७४ | ३,४७९.१६ | २०२७-२८ |
| रेवस - रेडी किनारी रस्ता | २७,२९०.०० | ९८७.७३ | २०२७-२८ |
| कोकण हरित महामार्ग | ७१,२९८.०० | १७.३३ | २०२८-२९ |
| जालना - नांदेड महामार्ग | २४,७०२.९२ | १,७४७.४३ | २०२७-२८ |
| नागपूर - गोंदिया प्रवेश नियंत्रित शिघ्र संचार द्रुतगती महामार्ग | १६,२४५.८४ | ६२.६१ | २०२७-२८ |
| भंडारा - गडचिरोली प्रवेश नियंत्रित शिघ्र संचार द्रुतगती महामार्ग | १०,७४१.६६ | ८३.१८ | २०२७-२८ |
| नागपूर - चंद्रपूर प्रवेश नियंत्रित शिघ्र संचार द्रुतगती महामार्ग | २२,०३६.३१ | ०.७७ | २०२७-२८ |
| पुणे - नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्ग | १५,५०२.३८ | ३४.५५ | उ.ना. |
| पुणे ते औरंगाबाद ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्ग | - | ३.४४ | उ.ना. |
| नागपूर - गोवा महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग | - | ९३.०२ | उ.ना. |

*आधार :* महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ — उ.ना. - उपलब्ध नाही.

९.२२.१ **हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग** मुंबई आणि नागपूर यांना जोडणारा ७०१ किमी लांबीचा व १२० मी रुंदीचा आठ पदरी द्रुतगती महामार्ग असून १० जिल्हे, २६ तालुके व ३९२ गावांमधून जात आहे व त्याद्वारे २४ जिल्हे जोडले आहेत. संपूर्ण महामार्ग जून २०२५ पासून वाहतूकीसाठी खुला करण्यात आला.

९.२३ **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे प्रकल्प:** मुंबई महानगर प्रदेशात मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयांचे संपूर्ण क्षेत्र आणि ठाणे, रायगड व पालघर जिल्हयांतील काही भाग समाविष्ट आहे. या महानगर प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ ६,३२८ चौ. किमी असून त्यामध्ये नऊ महानगरपालिका, नऊ नगरपरिषदा, एक नगरपंचायत, ४४ गणना शहरे आणि सुमारे १,४२५ गावे समाविष्ट आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशात विविध पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची सद्य:स्थिती तक्ता ९.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२३ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची सद्य:स्थिती**

(दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी)

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची किंमत (₹ कोटी) | खर्च (₹ कोटी) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प: | | | | | |
| टप्पा - एक, दोन व तीन: रस्ते व उड्डाणपूल | २००७ | १०,७९३.४२$ | ९,१२०.२४ | - | काम प्रगतीपथावर |
| बाह्य रस्ते विकास योजना | २०१४ | १,७३०.०० | १,१०१.१७ | २०२६ | काम प्रगतीपथावर |
| सांताक्रूज-चेंबूर लिंक रोड कुर्ला ते वाकोला टप्पा एक | २०१६ | ६६९.५३ | ७२४.५४ | २०२५ | वाहतूकीस खुले |
| भारत डायमंड बोर्स ते वाकोला जंक्शन टप्पा दोन (सांताक्रूज चेंबूर लिंक रोड विस्तारांतर्गत) | २०१७ | २०७.१२ | ३२२.८० | २०२६ | ९६ टक्के काम पूर्ण |
| कलानगर जंक्शन, वांद्रे(पूर्व) येथे उड्डाणपुल मार्ग बांधणे | २०१७ | १०३.७३ | १०३.०८ | २०२४ | वाहतूकीस खुले |
| पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथे वाहतूक सुधार | २०१८ | २४९.२९ | २७२.३० | २०२४ | वाहतूकीस खुले |
| ठाणे ते बोरीवली भुयारी मार्गाचे बांधकाम | २०२३ | १६,६००.४० | ३,१९४.१४ | २०२८ | काम प्रगतीपथावर |
| शिवडी ते वरळी उन्नत जोडमार्ग प्रकल्प | २०२१ | २,२८३.५३ | १,४३६.४० | २०२६ | ६२ टक्के काम पूर्ण |
| मुंबई पारबंदर प्रकल्प ते मुंबई पुणे द्रुतगती मार्ग | २०२३ | १,१३६.०० | २७६.३४ | २०२७ | काम प्रगतीपथावर |
| छेडानगर, घाटकोपर ते ठाणे पर्यंत उन्नत पूर्व मुक्त मार्गाचे विस्तारीकरण | २०२४ | ३,३१४.०० | ३००.८७ | २०२७ | काम प्रगतीपथावर |
| मुंबई - वाढवण द्रुतगती जोडणी (उत्तन - विरार सागरी सेतू प्रकल्प) | - | ५८,७५४.७१ | ४२.८९ | २०३२ | पीपीआरचे काम प्रगतीपथावर |
| मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह, सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम | २०२४ | ८,७४२.०० | १,१७५.८२ | २०२८ | काम प्रगतीपथावर |
| बाळकुम ते गायमुख ठाणे कोस्टल रस्ता | २०२४ | ३,३६४.०० | ७४४.५४ | २०२८ | काम प्रगतीपथावर |
| ठाणे शहरातील आनंद नगर ते साकेत उन्नत मार्ग | २०२४ | २,१८८.०० | १२०.८० | २०२८ | काम प्रगतीपथावर |

$ प्रकल्प खर्चात इतर कामांच्या खर्चाचा समावेश

पीपीआर - प्राथमिक प्रकल्प अहवाल

*आधार* : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

## सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सुविधा

९.२४ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (मरामापम): हे महामंडळ राज्या अंतर्गत तसेच शेजारील राज्यांमध्ये सार्वजनिक प्रवासी वाहतूक सेवा पुरविते. मरामापम तर्फे प्रवासी बस सुविधा पुरविण्यात आलेल्या गावांची आणि लोकसंख्येची टक्केवारी तक्ता ९.२४ मध्ये दिली आहे तर वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२४ मरामापम तर्फे बस सुविधा पुरविण्यात आलेल्या गावांची आणि लोकसंख्येची टक्केवारी**

| बस सेवा | सुविधा पुरविण्यात आलेल्या गावांची टक्केवारी | | सुविधा पुरविण्यात आलेल्या लोकसंख्येची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२३-२४ | २०२४-२५ |
| थेट | ७७.४ | ७७.२ | ९२.३ | ९२.३ |
| ३ किमी पर्यंत | १४.८ | १५.२ | ५.४ | ५.५ |
| ३ ते ५ किमी पर्यंत | ४.५ | ४.४ | १.३ | १.३ |
| ५ किमी पेक्षा अधिक | ३.३ | ३.२ | १.० | ०.९ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## तक्ता ९.२५ मरामापम ची वाहतूक विषयक सांख्यिकी

| बाब | परिमाण | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|---|
| ताब्यात असलेली एकूण वाहने | संख्या | १५,७६० | १५,७१० | १६,१९९ |
| मार्गस्थ बसगाड्यांची प्रतिदिन सरासरी संख्या | संख्या | १४,१६० | १४,३६१ | १४,९२६ |
| एकूण कर्मचारी (दि. ३१ मार्च रोजी) | संख्या | ८७,६३९ | ८६,३१७ | ८६,९५६ |
| प्रतिदिन सरासरी सार्थ किमी | लाख | ४९.५४ | ५०.७६ | ५३.०६ |
| वाहतूक केलेल्या प्रवाशांची प्रतिदिन सरासरी संख्या | लाख | ५५.४९ | ५७.४५ | ५५.९० |
| वाहन उत्पादकता | किमी | ३१४.३४ | ३२३.१३ | ३२७.५७ |
| चालक-वाहक उत्पादकता | किमी | २१९.९४ | २२२.४५ | २२५.८७ |
| प्रति वाहन कर्मचाऱ्यांचे प्रमाण (मार्गस्थ वाहनांच्या आधारे) | - | ६.२४ | ६.०१ | ५.७१ |
| सरासरी आसन क्षमता | संख्या | ४२.७१ | ४२.८३ | ४२.४५ |
| भारमान (सवलतींच्या रकमा वगळून) | टक्के | ४६.७ | ४४.९ | ४१.७ |
| भारमान (सवलतींच्या रकमेसह) | टक्के | ८३.७ | ८३.८ | ७८.९ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ     + डिसेंबर पर्यंत

९.२४.१ विद्यार्थी, महिला, वरिष्ठ नागरिक (६५ वर्षांवरील वयाचे), कर्करोग रुग्ण, दिव्यांग, स्वातंत्र्यसैनिक, इत्यादी प्रवाशांना मरामापम बस भाड्यात विविध सवलती देते व सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून केली जाते. मरामापम मार्फत विविध योजने अंतर्गत दिलेल्या लाभाचा तपशिल तक्ता ९.२६ मध्ये दिला आहे.

## तक्ता ९.२६ मरामापम मार्फत योजने अंतर्गत दिलेल्या लाभाचा तपशिल

| योजना | बस भाडे सवलत (टक्के) | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी (लाख) | राज्य शासनाकडून प्राप्त सवलतीची रक्कम (₹ लाख) | लाभार्थी (लाख) | राज्य शासनाकडून प्राप्त सवलतीची रक्कम (₹ लाख) | लाभार्थी (लाख) | राज्य शासनाकडून प्राप्त सवलतीची रक्कम (₹ लाख) |
| अहिल्याबाई होळकर योजना | १०० | २०.३७ | ५४,६८१.१६ | २४.५६ | ७०,३११.१९ | १४.३१ | ४६,५३१.५७ |
| विद्यार्थी मासिक पास | ६६.६७ | ३२.४३ | २९,१६४.७५ | २९.४८ | २६,८०८.५३ | १७.५१ | १७,०५४.२७ |
| महिला सन्मान योजना | ५० | ५,९३९.१९ | १,६९,८८३.८८ | ६,३५७.१० | १,८१,३९७.२८ | ४,१३९.४० | १,३४,५१९.७२ |
| जेष्ठ नागरिक सवलत | ५० | ७४४.२१ | २२,८७७.९९ | ६८०.५१ | २०,५६०.०५ | ३९१.५३ | १३,६९४.७३ |
| अमृत जेष्ठ नागरिक सवलत | १०० | २,२५२.१७ | १,१६,०२५.५२ | २,६१८.८६ | १,३७,१७३.७० | १,८०१.२४ | १,०८,५०२.५० |
| इतर | - | ३२६.६० | २०,८७८.९० | ३६८.७१ | २३,५९६.२४ | २६१.५७ | १५,९६०.०२ |
| **एकूण** | **-** | **९,३१४.९८** | **४,१३,५१२.२१** | **१०,०७९.२२** | **४,५९,८४७.००** | **६,६२५.५५** | **३,३६,२६२.८१** |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ     + नोंव्हेबर पर्यंत

९.२५ **शहरी सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक:** शहरी सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सेवा विषयक सांख्यिकी तक्ता ९.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२७ शहरी सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सेवा विषयक सांख्यिकी**

(दि. ३१ मार्च रोजी)

| वाहतूक सेवा पुरविणारी यंत्रणा | मार्गस्थ वाहनांची प्रतिदिन सरासरी संख्या | | प्रतिदिन सरासरी प्रवासी वाहतूक (लाख) | | प्रतिदिन सरासरी सार्थ वाहतूक (लाख किमी) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२४ | २०२५ | २०२४ | २०२५ | २०२४ | २०२५ |
| मरामापम (शहर वाहतूक) | ७४ | ७५ | ०.३१ | ०.३५ | ०.१३ | ०.१४ |
| बेस्ट | २,९०३ | २,८६० | २९.३६ | २८.२८ | ४.६८ | ४.३६ |
| पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित | १,६५८ | १,५५८ | १२.०७ | ११.२५ | ३.३९ | ३.१९ |
| नवी मुंबई मनपा परिवहन | ३५४ | ३१७ | २.०१ | १.९३ | ०.७९ | ०.६७ |
| नागपूर मनपा परिवहन | ३६७ | ३९३ | १.१६ | १.०७ | ०.७५ | ०.८० |
| ठाणे मनपा परिवहन | ३०८ | ३५२ | १.८४ | २.४४ | ०.४९ | ०.५७ |
| वसई-विरार मनपा परिवहन | १०० | ११२ | ०.५५ | ०.५५ | ०.१५ | ०.१५ |
| कोल्हापूर मनपा परिवहन | ६२ | ६२ | ०.३६ | ०.३५ | ०.१४ | ०.१३ |
| सोलापूर मनपा परिवहन | २१ | १८ | ०.०४ | ०.०४ | ०.०१ | ०.०१ |
| कल्याण-डोंबिवली मनपा परिवहन | ६३ | ६१ | ०.४१ | ०.४२ | ०.११ | ०.१० |
| मिरा-भाईंदर मनपा परिवहन | ७७ | ९१ | ०.८२ | ०.८९ | ०.१५ | ०.१८ |
| अमरावती मनपा परिवहन | १२ | १७ | ०.१३ | ०.१३ | ०.०१ | ०.०२ |
| खोपोली नगरपरिषद परिवहन | ५ | ५ | ०.०२ | ०.०२ | ०.०१ | ०.०१ |
| लातूर मनपा परिवहन | १६ | १५ | ०.१२ | ०.१३ | ०.०३ | ०.०३ |
| अहिल्यानगर मनपा परिवहन | १५ | १५ | ०.०७ | ०.०६ | ०.०३ | ०.०३ |
| नाशिक मनपा परिवहन | २४४ | २४५ | ०.६६ | ०.६६ | ०.४५ | ०.४७ |
| उल्हासनगर मनपा परिवहन | - | ७ | - | ०.०५ | - | ०.०१ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बेस्ट, पुणे महानगर परिवहन महामंडळ व संबधित महानगरपालिका / नगरपरिषद

## मोटार वाहने

९.२६ राज्यात दि. १ जानेवारी २०२६ रोजी मोटार वाहनांची एकूण संख्या ५.२८ कोटी होती व ती मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ८.२ टक्क्यांनी जास्त आहे. राज्यात डिसेंबर २०२५ अखेर नोंदणीकृत बॅटरी इलेक्ट्रीक वाहनांची संख्या ९,२७,०६१ आहे. राज्यात दि. १ जानेवारी २०२६ रोजी रस्त्यांवरील (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभाली खालील) प्रति किमी वाहनांची सरासरी संख्या १५३ होती. राज्यातील मोटार वाहनांची संख्या तक्ता ९.२८ मध्ये आणि त्याची समयमालिका परिशिष्ट ९.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२८ राज्यातील मोटार वाहनांची संख्या**

('०००)

| वाहन प्रकार | दि. १ जानेवारी रोजी | | |
|---|---|---|---|
| | २०२५* | २०२६* | शेकडा बदल |
| दुचाकी (मोटार सायकली, स्कूटर्स, मोपेड्स) | ३५,४४२.९५ | ३७,८१७.५७ | ६.७ |
| ऑटो रिक्षा | १,२२२.८४ | १,२९६.४३ | ६.० |
| हलकी मोटार वाहने (कार, जीप्स, स्टेशन वॅगन्स व टॅक्सी) | ७,६५०.०६ | ८,२४४.६१ | ७.८ |
| बसेस$ | १८४.७८ | २०१.२६ | ८.९ |
| माल मोटारी$$ | २,४१४.३४ | २,९९२.९३ | २४.० |
| ट्रॅक्टर | १,२४७.६२ | १,५९३.४७ | २७.७ |
| ट्रेलर | ४९८.८५ | ५२०.०६ | ४.३ |
| रूग्णवाहिका | २४.४२ | २६.०० | ६.५ |
| इतर | १३९.२१ | १५७.२३ | १२.९ |
| **एकूण** | **४८,८२५.०७** | **५२,८४९.५६** | **८.२** |

$ स्टेज कॅरेजेस, कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस, शालेय बसेस व सार्वजनिक सेवा वाहने * अस्थायी

$$ आर्टीक्युलेटेड/मल्टी एक्सल वाहने, ट्रक्स व लॉरीज, टँकर्स, डिलीव्हरी व्हॅन्स (तीन व चार चाकी), इत्यादी

टिप : आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार :* परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र विद्युत वाहन धोरण २०२५**

- विद्युत वाहनांचा व्यापक प्रमाणावर स्वीकार आणि उत्पादनाला प्रोत्साहन
- शहरी व ग्रामीण भागात विद्युत वाहनांसाठी चार्जिंग पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यावर भर
- स्वच्छ व शाश्वत वाहतूकीच्या वापरास प्रोत्साहनसह वायुप्रदूषण तसेच हरितगृह वायू उत्सर्जनास आळा
- सार्वजनिक वाहतूकीच्या विद्युतीकरणास पाठबळ
- विद्युत वाहन क्षेत्रात राज्याला अग्रगण्य केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी संशोधन, नाविन्यता आणि कौशल्य विकासाला चालना

आलेख ९.११ : राज्यातील नोंदणीकृत बॅटरी इलेक्ट्रीक वाहने




## रस्ते सुरक्षा

९.२७ राज्यात दरवर्षी रस्ते सुरक्षितता या विषयाबाबत जनजागृती करण्यासाठी पथनाट्ये आणि व्याख्याने आयोजित केली जातात. नागरिकांमध्ये रस्ते सुरक्षा उपाय योजनांची माहिती पोहचविण्यासाठी जानेवारी महिन्यात रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात येतो. सन २०२५ मध्ये राज्यात प्रति दहा हजार वाहनांमागे अपघातांची संख्या सात होती. राज्यातील रस्ते अपघात आकडेवारी तक्ता ९.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२९ राज्यातील रस्ते अपघात आकडेवारी**

(संख्या)

| वर्ष | अपघात | मृत व्यक्ती | जखमी व्यक्ती |
|---|---|---|---|
| २०२३ | ३५,२४३ | १५,३६६ | २९,७६४ |
| २०२४ | ३६,११८ | १५,७१५ | ३०,५३५ |
| २०२५* | ३६,४५० | १५,५४९ | ३२,१४७ |

* अस्थायी

*आधार :* अतिरिक्त पोलिस महासंचालक (वाहतूक) यांचे कार्यालय गृह विभाग, महाराष्ट्र शासन

आलेख ९.१२ : राज्यातील प्रति दहा हजार वाहनांमागे अपघातांची संख्या




९.२७.१ राज्यात वाहतूक नियमांची अंमलबजावणी स्वयंचलित करण्यासाठी वन स्टेट वन ई-चलान प्रणाली राबविली जात आहे. वाहतूक नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर आवश्यक कारवाई करण्यासाठी राज्यात सुमारे ६,३०० ई-चलान उपकरणे आणि ९६ इंटरसेप्टर वाहने कार्यरत आहेत. ई-चलान आकडेवारी तक्ता ९.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३० ई-चलान आकडेवारी**

| वर्ष | एकूण | | प्राप्त | | अप्राप्त | | विना तडजोडपात्र प्रकरणे (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | चलान (लाख) | रक्कम (₹ कोटी) | चलान (लाख) | रक्कम (₹ कोटी) | चलान (लाख) | रक्कम (₹ कोटी) | |
| २०२३ | १६२.३८ | १,२५७.०९ | ६७.४१ | ४८७.४३ | ९०.८२ | ७६९.६७ | ३.२३ |
| २०२४ | १६८.७५ | १,५२६.९४ | ५४.२६ | ४३२.१६ | ११२.४४ | १,०९४.७७ | १.५३ |
| २०२५ | १६७.४६ | १,६३२.९४ | ३७.६९ | २८९.१४ | १२७.५२ | १,३४३.८० | १.९७ |

*आधार :* अतिरिक्त पोलिस महासंचालक (वाहतूक) यांचे कार्यालय गृह विभाग, महाराष्ट्र शासन

# रेल्वे

९.२८ रेल्वे ही प्रमुख सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. प्रवासी व मालवाहतूक हे रेल्वे वाहतुकीचे दोन प्रमुख भाग आहेत. दि. ३१ मार्च २०२५ रोजी कोकण रेल्वेसह राज्यातील लोहमार्गाची एकूण लांबी ६,२९६.४८ किमी असून भारतातील एकूण ६९,४३९.३१ किमी लांबीच्या ९.१ टक्के आहे. सन २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये मध्य रेल्वे कडून अनुक्रमे ८३३.९७ लाख मे. टन व ७७९.७० लाख मे. टन मालवाहतूक झाली. राज्यात सुरु असलेल्या मध्य रेल्वेच्या कामांची सद्य:स्थिती तक्ता ९.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३१ राज्यात सुरु असलेल्या मध्य रेल्वेच्या कामांची सद्य:स्थिती**

(दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी)

| मार्गाचे नाव | मार्गाची लांबी (किमी) | प्रकल्पाची एकूण किंमत (₹ कोटी) | भौतिक प्रगती (टक्के) |
|---|---|---|---|
| **मध्य रेल्वे** | | | |
| पुणे - मिरज - लोंढा (दुपदरीकरण) | २७९# | ६,४६३.४९ | ९८ |
| वर्धा - नांदेड, यवतमाळ - पुसद मार्ग (नवीन मार्गिका) | २८४ | ३,४४५.४८ | ६९ |
| इटारसी - नागपूर तिसरी मार्गिका | २७९ | २,४४९.९१ | ५१ |
| अहमदनगर - नारायणडोह-बीड-परळी वैजनाथ (नवीन मार्ग) | २६१ | ४,९५७.२७ | ९२ |
| दौंड-मनमाड (दुपदरीकरण) | २४८ | ३,०७४.८८ | ९२ |
| मनमाड - जळगांव तिसरी मार्गिका | १६० | १,५५८.७५ | ९४ |
| वर्धा - बल्लारशहा तिसरी मार्गिका | १३२ | १,३८४.७२ | ८६ |
| वर्धा - नागपूर तिसरी मार्गिका | ७६ | ५४०.०२ | ८८ |
| वर्धा - नागपूर चौथी मार्गिका | ७९ | ६३७.९५ | ८८ |
| कल्याण - कसारा तिसरी मार्गिका | ६७ | १,४३२.६१ | ६२ |
| बारामती - लोणंद फलटण मार्ग (नवीन मार्गिका) | ६४ | १,८४३.९० | ५०$ |
| धुळे (बोरविहीर) - धुळे - नरडाणा | ५१ | १,१५८.९९ | १५ |
| सोलापूर - तुळजापूर - उस्मानाबाद | ८४ | ३,२९५.७४ | १४ |
| इंदोर - मनमाड मालेगाव मार्ग | ३६८ | १६,३२०.५३ | ५ |
| पुणे - नाशिक | २६५ | २,४२५.०० | डिपीआर तयार |
| अंजठा लेणी रेल्वे जोडणी- जालना- जळगाव | १७४ | ५,८०४.३७ | ५ |
| जळगाव - भदली पाचवी मार्गिका | ९ | ११३.९२ | १० |
| भुसावळ - खांडवा तिसरी व चौथी मार्गिका | १३१ | ३,२८४.७८ | ५ |
| जळगाव - मनमाड चौथी मार्गिका | १६० | २,५७३.७२ | ५ |
| **दक्षिण पूर्व मध्य रेल्वे** $$ | | | |
| नागपूर - हावडा तिसरी मार्गिका | १८० | २,७९८.०० | काम प्रगतीपथावर |
| वडसा - गडचिरोली (नवीन मार्गिका) | ५२ | १,८८०.६१ | काम प्रगतीपथावर |

# दक्षिण पश्चिम रेल्वे मार्ग वगळून  डिपीआर - सविस्तर प्रकल्प अहवाल  $ फलटण ते लोणंद मार्ग कार्यान्वित

$$ दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजीची माहिती

*आधार:* मध्य रेल्वे, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

९.२९ **मुंबई उपनगरीय रेल्वे:** ही रेल्वे मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामधील सार्वजनिक वाहतूकीचे प्रमुख साधन आहे. मुंबईची उपनगरीय रेल्वे यंत्रणा पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वे द्वारे चालविली जाते. हार्बर मार्ग व ट्रान्स हार्बर मार्ग हे मध्य रेल्वेचे भाग आहेत. सन २०२४-२५ मध्ये रेल्वेच्या १३ वातानुकुलित लोकलसह एकूण २३८ लोकल गाड्यांच्या ताफ्याने दररोज ३,१०४ फेऱ्यामध्ये रेल्वे सेवा दिली त्यापैकी १७५ वातानुकुलित फेऱ्या होत्या. याद्वारे दररोज सरासरी ७५.९ लाख प्रवाशांनी वाहतूक सेवेचा लाभ घेतला.

९.२९.१ मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पातील रेल्वे मार्गाची कामे मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित मार्फत करण्यात येतात. मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा दोन, तीन व तीन अ मधील सुरू असलेल्या प्रकल्पांची सद्य:स्थिती तक्ता ९.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३२ मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा दोन, तीन व तीन अ मधील सुरू असलेल्या प्रकल्पांची सद्य:स्थिती**

(दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी)

| प्रकल्पाचे नाव | मार्गिकेची लांबी (मार्ग किमी) | अंदाजित किंमत (₹ कोटी) | खर्च (₹ कोटी) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | भौतिक प्रगती (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| **मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प २** | | | | | |
| मुंबई सेंट्रल - बोरीवली (अतिरिक्त सहावी मार्गिका) | २९.६३ | ९१८.५३ | ९६६.१९ | डिसेंबर २०२७ | ७० |
| सीएसएमटी - कुर्ला (अतिरिक्त पाचवी व सहावी मार्गिका) | १५.३९ | १,३६७.०० | ६५७.३६ | डिसेंबर २०२६ | ३० |
| **मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प ३** | | | | | |
| पनवेल - कर्जत मार्गावरील नवीन उपनगरीय मार्गिका | २९.६० | २,७८२.०० | २,८२९.६५ | मार्च २०२६ | ८३ |
| ऐरोली - कळवा (उन्नत) मार्गावरील नवीन उपनगरीय मार्गिका | ३.३० | ४७६.०० | २३६.३१ | - | ४५ |
| विरार - डहाणू रोड रेल्वे मार्गाचे चौपदरीकरण | ६४.०० | ३,५७८.०० | २,०५२.१२ | मार्च २०२७ | ४५ |
| मध्य व पश्चिम रेल्वेवरील मध्य मार्गावर बेकायदा प्रवेश नियंत्रण | - | ५५१.०० | ५८२.८७ | जानेवारी २०२६ | ९९ |
| **मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प ३ अ** | | | | | |
| कल्याण - बदलापूर (तिसरी व चौथी मार्गिका) | १४.०५ | १,५१०.०० | ६१७.३९ | मार्च २०२७ | ३० |
| बोरीवली - विरार (पाचवी व सहावी मार्गिका) | २६.०० | २,१८४.०० | ५२०.३१ | मार्च २०२८ | १८ |
| कल्याण - आसनगाव (चौथी मार्गिका) | ३२.२२ | १,७५९.०० | २९३.५३ | डिसेंबर २०२६ | १६ |
| गोरेगाव - बोरीवली मधील हार्बर मार्गाचा विस्तार | ७.०८ | ८२५.५८ | ८.५२ | डिसेंबर २०२७ | काम प्रगतीपथावर |

सीएसएमटी - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस

*आधार :* मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित

९.२९.२ **मुंबई उपनगरीय रेल्वेवरील सुरक्षा उपाय:** सुरक्षेसंबंधीच्या घोषणांव्यतिरिक्त, मुंबई उपनगरीय रेल्वेवरील अपघात टाळण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. यामध्ये उपनगरीय रेल्वे मार्गांवरील अनधिकृत प्रवेश रोखण्यासाठी पादचारी पूल, भुयारी मार्ग व संरक्षण भिंतींचे बांधकाम, अनधिकृत प्रवेश ठिकाणे बंद करणे, रेल्वे खांबांचे स्थलांतर करणे तसेच इतर संबंधित उपायांचा समावेश आहे. मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील अपघाती मृत्यू व जखमी व्यक्तींची संख्या तक्ता ९.३३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३३ मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील अपघाती मृत्यू व जखमींची संख्या**

| अपघाताचे कारण | २०२३ | | २०२४ | | २०२५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मृत्यू | जखमी | मृत्यू | जखमी | मृत्यू | जखमी |
| रेल्वे रुळ ओलांडतांना | १,२७७ | २४१ | १,१५१ | २३४ | १,०६३ | २३५ |
| रेल्वे व फलाट दरम्यान पडून | १० | १ | १४ | १० | ६ | ९ |
| रेल्वेमधून पडून | ५९० | १,२४१ | ५७० | १,३२९ | ५२५ | १,१८८ |
| रेल्वेच्या खांबाचा धक्का लागून | ४ | ४७ | ६ | ३८ | ६ | ५३ |
| अन्य $ | ७०९ | ९११ | ७२७ | १,०८६ | ६८७ | १,०६९ |
| **एकूण** | **२,५९०** | **२,४४१** | **२,४६८** | **२,६९७** | **२,२८७** | **२,५५४** |

$ विजेचा धक्का लागून, आत्महत्या, नैसर्गिक मृत्यू, न्यायवैद्यकीय विश्लेषणासाठी संदर्भित केलेली प्रकरणे, इत्यादींचा समावेश

*आधार :* मुंबई लोहमार्ग पोलिस आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## मेट्रो रेल्वे प्रकल्प

९.३० मेट्रो रेल्वे प्रकल्प रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी तसेच शहरी भागातील विद्यमान सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला सक्षम पर्याय म्हणून आखण्यात आले आहेत. महानगर क्षेत्रासाठी सुरक्षित, विश्वसनीय, कार्यक्षम, किफायतशीर, प्रवाशांकरिता सुलभ आणि पर्यावरणदृष्ट्या शाश्वत अशा शीघ्र सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी मुंबई, नवी मुंबई, पुणे आणि नागपूर या शहरात मेट्रो रेल्वे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. राज्यातील कार्यान्वित मेट्रो रेल्वे मार्गिकांचा तपशिल तक्ता ९.३४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.३४ राज्यातील कार्यान्वित मेट्रो रेल्वे मार्गिकांचा तपशिल**

| मेट्रो रेल्वेचे नाव | मार्ग | मेट्रो रेल्वे सुरु झाल्याचे वर्ष | लांबी (किमी) | प्रतिदिन सरासरी प्रवासी संख्या (लाख) |
|---|---|---|---|---|
| मुंबई मेट्रो रेल्वे | १ वर्सोवा ते घाटकोपर | जून २०१४ | ११.४० | ५.०० |
| | २अ दहिसर ते डि. एन. नगर | जानेवारी २०२३ | १८.६ | २.२ |
| | ७ अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) | जानेवारी २०२३ | १६.५ | |
| | ३ कुलाबा - वांद्रे - सीप्झ | ऑक्टोबर २०२५ | ३३.५ | ०.७८ |
| नवी मुंबई मेट्रो रेल्वे-१ | सीबीडी बेलापूर ते पेंधर | नोव्हेंबर २०२३ | ११.१० | ०.२२ |
| नागपूर मेट्रो रेल्वे टप्पा १ | उत्तर-दक्षिण मार्गिका -खापरी ते ऑटोमोटिव्ह चौक (ऑरेंज लाईन) | डिसेंबर २०२२ | २०.५४ | १.०५ |
| | पूर्व-पश्चिम मार्गिका - लोकमान्य नगर ते प्रजापती नगर (ॲक्वा लाईन) | डिसेंबर २०२२ | १९.४८ | |
| पुणे मेट्रो रेल्वे टप्पा १ | मार्गिका एक -पिंपरी चिंचवड ते स्वारगेट (पर्पल लाईन) | सप्टेंबर २०२४ | १७.५३ | १.९४ |
| | मार्गिका दोन- वनाज ते रामवाडी (ॲक्वा लाईन) | मार्च २०२४ | १५.७५ | |

*आधार* : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, नागपूर व पुणे, मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड

९.३०.१ **मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प:** मुंबई महानगर प्रदेशात सुरु असलेल्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांची सद्य:स्थिती तक्ता ९.३५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३५ मुंबई महानगर प्रदेशात सुरु असलेल्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांची सद्य:स्थिती**

| मेट्रो लाईन | प्रकल्पाचे नांव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची किंमत (₹ कोटी) | खर्च+ (₹ कोटी) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | सद्य:स्थिती+ |
|---|---|---|---|---|---|---|
| २ ब | डी. एन. नगर - मंडाळे (२३.६ किमी) | २०१८ | १०,९८६ | ७,५५२.१४ | मार्च २०२७ | ९० टक्के स्थापत्य कामे पूर्ण |
| ३ | कुलाबा - वांद्रे – सीप्झ (३३.५ किमी) | २०१६ | ३७,२७६ | ३४,५१४.०० | - | वाहतूकीस खुला |
| ४ | वडाळा - घाटकोपर - ठाणे - कासारवडवली (३२ किमी) | २०१८ | १४,५४९ | ५,७०८.१३ | नोव्हेंबर २०२७ | ८८ टक्के स्थापत्य कामे पूर्ण |
| ४ अ | कासारवडवली - गायमुख (२.७ किमी) | २०१९ | ९४९ | ७१६.५१ | एप्रिल २०२६ | ९६ टक्के स्थापत्य कामे पूर्ण |
| ५ | ठाणे - भिवंडी - कल्याण (२४.९ किमी) | २०१९ | ८,४१७ | १,७४७.२९ | जून २०३० | टप्पा १ चे ९७ टक्के स्थापत्य कामे पूर्ण |
| ६ | स्वामी समर्थ नगर - विक्रोळी (१४.५ किमी ) | २०१८ | ६,७१६ | २,३८०.१३ | मार्च २०२७ | ८३ टक्के स्थापत्य कामे पूर्ण |
| ७ अ | अंधेरी - छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (३.१ किमी) | २०१९ | ६,६०७ | ३,१७७.८० | एप्रिल २०२७ | ६६ टक्के स्थापत्य कामे पूर्ण |
| ९ | दहिसर (पु) ते मिरा भाईंदर (१०.४ किमी) | | | | डिसेंबर २०२६ | ९८ टक्के स्थापत्य कामे पूर्ण |
| १० | गायमुख - शिवाजी चौक (मिरा रोड) (९.२ किमी) | - | ४,४७६ | ११.१८ | मार्च २०३० | काम प्रगतीपथावर |
| ११ | आणिक डेपो - गेट वे ऑफ इंडिया (१२.७ किमी) | २०२६ | २३,४८७ | - | जानेवारी २०३२ | डिपीआरचे काम प्रगतीपथावर |
| १२ | कल्याण तळोजा (२०.७ किमी) | २०२३ | ५,८६५ | ७८३.९३ | डिसेंबर २०२७ | १५ टक्के स्थापत्य कामे पूर्ण |

*आधार* : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ    डिपीआर - सविस्तर प्रकल्प अहवाल    + नोव्हेंबर २०२५ पर्यंत

९.३०.२ **नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प:** नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प (टप्पा २) हा भारत सरकारने डिसेंबर, २०२२ मध्ये मंजूर केला असून यामध्ये टप्पा १ मधील दोन्ही कार्यान्वित मार्गिकांचा विस्तार करण्यात येणार आहे. एकूण ३२ स्थानकांचा समावेश असलेल्या या प्रकल्पाची लांबी ४३.८० किमी आहे. टप्पा - २ मध्ये उत्तर दक्षिण मार्गिका १ अ मिहान ते एमआयडीसी ईएसआर (१८.६५ किमी), उत्तर दक्षिण मार्गिका २ अ ऑटोमोटिव्ह स्क्वेअर ते कन्हान नदी (१३ किमी), पूर्व पश्चिम मार्गिका ३ अ लोकमान्य नगर ते हिंगणा (६.६५ किमी), पूर्व पश्चिम मार्गिका ४ अ प्रजापती नगर ते ट्रान्सपोर्ट नगर (५.५० किमी) यांचा समावेश आहे. या प्रकल्पाची किंमत ₹ ६,७०८ कोटी असून डिसेंबर २०२५ पर्यंत सुमारे ३१ टक्के काम पूर्ण झाले आहे.

९.३०.३ **पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प:** भारत सरकारने ऑक्टोबर २०२३ मध्ये या प्रकल्पातील टप्पा -१ ची उत्तर विस्तार मार्गिका पिंपरी चिंचवड ते निगडी (४.४१ किमी उन्नत) मंजूर केली असून प्रकल्प खर्च ₹ ९१०.१८ कोटी आहे आणि डिसेंबर २०२५ पर्यंत सुमारे ३३ टक्के काम पूर्ण झाले आहे. भारत सरकारने सप्टेंबर २०२४ मध्ये टप्पा - १ ची दक्षिण विस्तार मार्गिका स्वारगेट ते कात्रज (५.४६ किमी भूमीगत) मंजूर केली असून प्रकल्प खर्च ₹ २,९५४.५३ कोटी आहे आणि डिसेंबर २०२५ पर्यंत सुमारे ४ टक्के काम पूर्ण झाले आहे. भारत सरकारने जुलै २०२५ मध्ये दुसऱ्या टप्प्यात पश्चिम विस्तार मार्गिका २ अ-वनाझ ते चांदणी चौक आणि पूर्व विस्तार मार्गिका २ ब-रामवाडी ते वाघोली/विठ्ठलवाडी मंजूर केल्या आहेत. या प्रकल्पाची एकूण लांबी १२.७५ किमी असून यामध्ये १३ स्थानकांचा समावेश आहे. प्रकल्पाची किंमत ₹ ३,६३६.२४ कोटी असून प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

९.३०.४ **ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो प्रकल्प:** भारत सरकारने सप्टेंबर २०२४ मध्ये ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो प्रकल्प मंजूर केला आहे. हा प्रकल्प ठाणे शहराच्या पश्चिमेला असून एकूण लांबी २९ किमी (२६ किमी उन्नत व ३ किमी भूमीगत) असून यामध्ये २२ स्थानकांचा समावेश आहे. या प्रकल्पाचा खर्च ₹ १२,२००.१० कोटी असून प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

## मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्प

९.३१ भारत सरकारने मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पास डिसेंबर २०१५ मध्ये मंजूरी दिली असून या प्रकल्पाची एकूण लांबी ५०८ किमी असून त्यापैकी राज्यातील लांबी १५६ किमी आहे. प्रकल्पाचा अंदाजित खर्च ₹ १.०८ लाख कोटी असून नोव्हेंबर २०२५ पर्यंत राज्यातील ३५ टक्के काम पूर्ण झाले आहे. प्रकल्पा अंतर्गत खालील चार पॅकेजचे काम प्रगतीपथावर आहे.

- बांद्रा कुर्ला संकुल येथे भूमिगत हायस्पीड रेल्वे स्टेशनचे बांधकाम
- सुमारे २१ किमी लांबीच्या अंशत: समुद्राखालून जाणाऱ्या बोगद्याचे बांधकाम
- १३५ किमी लांबीचे हायस्पीड व्हायडक्ट, पूल आणि बोगद्याचे बांधकाम
- भिवंडी येथे रॉलिंग स्टॉक डेपोचे बांधकाम

## जलवाहतूक

९.३२ जलवाहतूक ही लांब पल्ल्याच्या अवजड वाहतूकीसाठी किफायतशीर व पर्यावरणस्नेही आहे. महाराष्ट्र सागरी विकास धोरण - २०२३ राज्यात ऑगस्ट २०२३ पासून राबविण्यात येत आहे.

९.३२.१ **मोठी बंदरे**: राज्यात मुंबई पोर्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ही दोन मोठी बंदरे आहेत. मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक आकडेवारी तक्ता ९.३६ मध्ये दिली आहे.

**महाराष्ट्र जहाजबांधणी, जहाज दुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर धोरण २०२५**

- सागरी जहाजबांधणी समूह, स्वतंत्र जहाजबांधणी यार्ड, विद्यमान/ आगामी बंदरामध्ये जहाजबांधणी यार्ड या तीन मॉडेल्स द्वारे खाजगी क्षेत्राच्या सहभागातून विकास
- भांडवली अनुदानांसह आर्थिक प्रोत्साहने
- कौशल्य विकास व संशोधन सुविधांसाठी खाजगी क्षेत्राला सहाय्य

**तक्ता ९.३६ मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक आकडेवारी**

| बाब | मुंबई पोर्ट | | जवाहरलाल नेहरू पोर्ट | |
|---|---|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२३-२४ | २०२४-२५ |
| **एकूण माल वाहतूक क्षमता (लाख मे. टन)** | **८३८.५०** | **८३८.५०** | **१,२५३.००** | **१,२५३.००** |
| **माल वाहतूक (लाख मे. टन)** | **६७२.६०** | **६८६.२५** | **८५८.१८** | **९२१.१५** |
| पैकी अ) आयात | ४९०.२६ | ५१७.९१ | ५०८.७१ | ५४४.३४ |
| ब) निर्यात | १८२.३४ | १६८.३४ | ३४९.४६ | ३७६.८१ |
| प्रवासी वाहतूक ('०००) | २७७.९० | २६४.६४ | ला.ना. | ला.ना. |
| बंदरात आलेल्या बोटी (संख्या) | ७,५१९ | ७,८७४ | ३,४९८ | ३,९२० |

*आधार*: मुंबई पोर्ट ट्रस्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट — ला.ना. लागू नाही

**आलेख ९.१३ : राज्यातील मोठ्या बंदरावरील मालवाहतूक**




९.३२.२ **लहान बंदरे:** राज्यात ४८ लहान बंदरे असून या बंदरांच्या परिसरात अनेक बंदिस्त व बहुउद्देशीय जेट्टी आहेत व त्या ठिकाणाहून देखील माल वाहतूक केली जाते. लहान बंदरांची वाहतूक विषयक आकडेवारी तक्ता ९.३७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३७ लहान बंदरांची वाहतूक विषयक आकडेवारी**

| बाब | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| **माल वाहतूक (लाख मे. टन)** | **७६८.७१** | **७०५.१६** | **४७२.५९** |
| *पैकी* अ) आयात | ५८१.४२ | ५५३.६३ | ३७३.६७ |
| ब) निर्यात | १८७.२९ | १५१.५३ | ९८.९२ |
| **प्रवासी वाहतूक (लाख)** | **१८६.७०** | **१८३.७६** | **१२८.६६** |
| *पैकी* अ) यांत्रिक बोटीतून | १८५.१७ | १८२.३६ | १२७.९१ |
| ब) बिगर यांत्रिक बोटीतून | १.५३ | १.४० | ०.७५ |
| **वाहन वाहतूक (लाख)** | **५.३२** | **३.१९** | **४.३१** |

*आधार* : महाराष्ट्र सागरी मंडळ + नोव्हेंबर पर्यंत

९.३२.३ **रो-रो सेवा:** नवीन भाऊचा धक्का (मुंबई) - मांडवा बंदर (रायगड), आगरदांडा-दिघी (रायगड), भाईंदर (ठाणे) - वसई (पालघर), बेलापूर (नवी मुंबई) - एलिफंटा (रायगड) आणि मालवण (सिंधुदुर्ग) - सिंधुदुर्ग किल्ला येथे रो-रो सेवा सुरु करण्यात आली आहे. मार्वे - मनोरी (मुंबई उपनगर), गोराई-बोरीवली (मुंबई उपनगर), भाऊचा धक्का (मुंबई) - काशीद (रायगड), भाऊचा धक्का (मुंबई) - मोरा (रायगड) या जलमार्गांवर रो-रो सेवा सुरु करण्यासाठी रो-रो जेट्टींची कामे प्रगतीपथावर आहेत.

९.३२.४ **सागरमाला कार्यक्रम:** या कार्यक्रमा अंतर्गत बंदराचे आधुनिकीकरण, नवीन बंदरे विकास, बंदर जोडणी, बंदर विकासा अंतर्गत औद्योगिकीकरण व समुदाय विकास या प्रकल्पांचा समावेश आहे. राज्यात या कार्यक्रमा अंतर्गत नोव्हेंबर २०२५ पर्यंत १३ प्रकल्प पूर्ण झाले आणि १५ प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून एकूण ₹ ७१५ कोटी खर्च झाला. सागरमाला कार्यक्रम अंतर्गत प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांचा तपशील तक्ता ९.३८ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.३८ सागरमाला कार्यक्रम अंतर्गत प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांचा तपशील**

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्पाची किंमत (₹ कोटी) |
|---|---|
| खाडवाडेश्री (पालघर) येथे रो-रो जेट्टी बांधणे | २३.६८ |
| नारंगी (पालघर) येथे रो-रो जेट्टीला पोच रस्ता बांधणे | २९.९२ |
| डोंबीवली (ठाणे) राष्ट्रीय जलमार्ग ५३, येथे रो-रो जेट्टी बांधणे | |
| काल्हेर (ठाणे) राष्ट्रीय जलमार्ग ५३, येथे रो-रो जेट्टी बांधणे | ११९.३७ |
| कोलशेत (ठाणे) राष्ट्रीय जलमार्ग ५३, येथे रो-रो जेट्टी बांधणे | |
| मिरा भाईंदर (ठाणे) राष्ट्रीय जलमार्ग ५३, येथे रो-रो जेट्टी बांधणे | |
| उत्तन, डोंगरी (ठाणे) येथे रो-रो जेट्टी बांधणे | ३०.८९ |
| बोरीवली (मुंबई उपनगर) येथे रो-रो जेट्टी बांधणे | ४६.०० |
| मनोरी (मुंबई उपनगर) येथे रो-रो जेट्टी बांधणे | ६.५९ |
| अर्नाळा किल्ला (पालघर) येथे पर्यटन सुलभ जेट्टी विकसीत करणे | १०.०० |
| रेडीओ क्लब, गेट वे ऑफ इंडिया, मुंबई जवळ नविन प्रवासी जेट्टीचे बांधकाम | २२९.२७ |
| मोरा (रायगड) येथे रो-रो जेट्टी बांधणे | ८८.७२ |
| काशिद (रायगड) येथे पर्यटन सुलभ जेट्टी विकसीत करणे | ११२.४६ |
| जंजिरा (रायगड) येथे जेट्टीचे बांधकाम करणे | १११.४१ |
| वेंगूर्ला (सिंधुदूर्ग) येथे पर्यटनासाठी जेट्टीचे बांधकाम करणे | ४३.११ |

*आधार* : महाराष्ट्र सागरी मंडळ

९.३२.५ **मरीना प्रकल्प:** मरीना प्रकल्प खाजगी क्षेत्राच्या सहभागाने बेलापूर, नवी मुंबई येथील बेलापूर खाडीमध्ये विकसित केला जात आहे आणि तो राज्यातील पहिला प्रकल्प आहे. हा प्रकल्प गेटवे ऑफ इंडिया येथे नांगरून ठेवलेल्या नौकांसाठी सुरक्षित थांबा, पार्किंग आणि देखभाल/दुरुस्ती सुविधा उपलब्ध करून देईल. पहिल्या टप्प्यात ३० नौकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित केल्या जातील आणि प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

## हवाई वाहतूक

९.३३ राज्यात १३ विमानतळे असून त्यापैकी सहा आंतरराष्ट्रीय विमानतळे कार्यान्वित आहेत. राज्यातील विमानतळ वाहतूक सांख्यिकी तक्ता ९.३९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३९ राज्यातील विमानतळ वाहतूक सांख्यिकी**

| विमानतळ | विमान उड्डाण संख्या | | प्रवासी वाहतूक (लाख) | | माल वाहतूक (मे. टन) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२३-२४ | २०२४-२५ |
| **अ) देशांतर्गत** | **३,६८,८१५** | **३,८२,०८१** | **५२४.७०** | **५४८.६१** | **२,७८,६९०** | **२,८७,५९२** |
| मुंबई | २,४१,८१३ | २,४०,३५१ | ३८५.०२ | ३९५.२४ | २,३१,६१६ | २,३५,१४४ |
| पुणे | ६२,६१६ | ६७,०४१ | ९३.५६ | १०२.०५ | ३७,८३३ | ४२,१५८ |
| जुहू (मुंबई) | २३,२९२ | २३,८६४ | १.५३ | १.३२ | ३१० | २५३ |
| नागपूर | २०,८१६ | २२,९१३ | २६.८४ | २७.९० | ७,९१३ | ८,८७० |
| शिर्डी | ६,०१५ | ६,७९१ | ७.२५ | ७.४२ | २४४ | ९६ |
| छत्रपती संभाजीनगर | ५,७५६ | ६,७४८ | ६.२० | ७.०० | ७२५ | ९१५ |
| नाशिक (ओझर एचएएल) | ४,२२६ | ४,४३९ | २.४२ | ३.४० | ४८ | १५७ |
| कोल्हापूर | ३,१७४ | ३,४३३ | १.६० | १.५९ | ० | ० |
| सिंधुदुर्ग | ३९७ | ५२२ | ०.१८ | ०.१५ | ० | ० |
| गोंदिया | २८७ | ८२४ | ०.०८ | ०.३२ | ० | ० |
| नांदेड | १९१ | २,९९३ | ०.०१ | १.३० | ० | ० |
| सोलापूर | १२० | ० | नगण्य | ० | ० | ० |
| जळगाव | ११२ | २,१६२ | ०.०१ | ०.९२ | ० | ० |
| **ब) आंतरराष्ट्रीय** | **८५,८८१** | **९२,९८२** | **१४६.०३** | **१५९.५७** | **५,९१,८६४** | **६,५९,१६४** |
| मुंबई | ८३,१७३ | ८९,७१२ | १४३.१९ | १५५.९९ | ५,९१,३६१ | ६,५४,७५६ |
| पुणे | १,४२३ | १,७८९ | १.७० | २.५३ | ८ | १३५ |
| नागपूर | १,१८६ | ९६३ | १.११ | १.०४ | ८० | १४९ |
| नाशिक (ओझर एचएएल) | ५४ | ५१६ | नगण्य | ०.०१ | ४१५ | ४,१२४ |
| छत्रपती संभाजीनगर | ४३ | ० | ०.०४ | ० | ० | ० |
| शिर्डी | २ | २ | नगण्य | नगण्य | ० | ० |
| **एकूण (अ + ब)** | **४,५४,६९६** | **४,७५,०६३** | **६७०.७३** | **७०८.१७** | **८,७०,५५४** | **९,४६,७५६** |

*आधार* : भारतीय विमानतळ प्राधिकरण एचएएल हिंदुस्थान ऐरोनॉटीक्स लिमिटेड

९.३३.१ नवी मुंबई येथे चार टप्प्यात सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित करण्यात येत आहे. हे विमानतळ वार्षिक ९ कोटी प्रवासी व ३२.५ लाख मे.टन माल वाहतूक क्षमतेचे नियोजन असणारे सर्वात मोठ्या हरितक्षेत्र विमानतळांपैकी एक आहे. या विमानतळाचे क्षेत्र १,१६० हेक्टर असून त्यावर दोन स्वतंत्र समांतर धावपट्ट्या कार्यान्वित असतील. वार्षिक २ कोटी प्रवासी आणि ८ लाख मे. टन क्षमतेच्या या प्रकल्पाचा टप्पा १ आणि २ चे काम पूर्ण झाले असून या विमानतळावरून डिसेंबर २०२५ पासून विमान उड्डाणे सुरू झाली. प्रकल्पाच्या पहिल्या दोन टप्प्याची अंदाजित किंमत ₹ १९,६४७ कोटी आहे.

९.३३.२ **उडे देश का आम नागरीक (उडान):** सेवा उपलब्ध नसलेल्या आणि अल्प सुविधा असलेल्या विमानतळांना जोडून प्रादेशिक क्षेत्रे व आंतरभागांना सेवा देणारा प्रादेशिक जोडणी योजना हा भारत सरकारचा एक प्रमुख कार्यक्रम आहे. जनतेला किफायतशीर दरात विमानसेवा उपलब्ध करुन देणे हे उडान योजनेचे उद्दिष्ट आहे. योजना सुरू झाल्यापासून डिसेंबर २०२५ पर्यंत प्रादेशिक कनेक्टिव्हिटी योजने अंतर्गत राज्यातील आठ विमानतळांवरून सुमारे ४५,००० विमान उड्डाणे झाली आणि सुमारे १७ लाख प्रवाशांनी लाभ घेतला आहे.

## दळणवळण

९.३४ टपाल, दूरध्वनी, दृकश्राव्य व माहिती दूरसंचार हे दळणवळण व्यवस्थेचे प्रमुख घटक आहेत. राज्यातील टपाल सेवेची माहिती तक्ता ९.४० मध्ये दिली आहे.

९.३५ माहे सप्टेंबर २०२५ अखेर राज्यात एकूण दूरध्वनी जोडण्यांची संख्या ८०.२९ लाख होती. प्रति लाख लोकसंख्येमागे दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्यांची संख्या अनुक्रमे ६,२२९ व ९८,६११ होती. राज्यात सप्टेंबर २०२५ अखेर इंटरनेट ग्राहकांची संख्या ११.३६ कोटी होती. राज्यातील दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्यांचा तपशील तक्ता ९.४१ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.४० राज्यातील टपाल सेवेची माहिती**

(संख्या)

| तपशील | क्षेत्र | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|
| टपाल कार्यालये | ग्रामीण | १२,४९७ | १२,५०५ |
| | नागरी | १,२७५ | १,२७२ |
| | **एकूण** | **१३,७७२** | **१३,७७७** |
| टपाल पेट्या | ग्रामीण | ३१,१२३ | ३०,४०४ |
| | नागरी | ६,२६३ | ६,३२१ |
| | **एकूण** | **३७,३८६** | **३६,७२५** |
| डिलिव्हरी पोस्टमन (टपाल सेवकांसह) | ग्रामीण | ९,३८१ | ९,४१७ |
| | नागरी | ५,९०४ | ७,४२७ |
| | **एकूण** | **१५,२८५** | **१६,८४४** |

*आधार* : जीपीओ, मुंबई

**तक्ता ९.४१ राज्यातील दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्यांचा तपशील**

(लाख)

| सेवा पुरवठादार | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी |
| एमटीएनएल | ११.८६ | २.४० | १०.४४ | २.०९ | ८.३४ | १.०६ |
| बीएसएनएल | ५.६१ | ५७.३० | ६.७५ | ५३.०१ | ६.४२ | ५३.०४ |
| भारती | १०.९६ | ३१७.९७$ | १२.४४ | ३२८.६२ | १२.५७ | ३३३.२६ |
| टाटा | ८.२१ | - | ८.४२ | - | ३६.६७ | - |
| वोडाफोन आयडीया | १.९९ | ३३२.३७ | २.०४ | ३१०.२१ | २.०५ | ३१२.४२ |
| रिलायन्स/जिओ | १२.४६ | ५६६.०२ | १३.१४ | ५६३.०३ | १३.८७ | ५७१.३३ |
| रिलायन्स कॉम | ०.४४ | ०.०० | ०.३९ | ०.०० | ०.३७ | ०.०० |
| **एकूण** | **५१.५४** | **१,२७६.०५** | **५३.६२** | **१,२५६.९६** | **८०.२९** | **१,२७१.११** |

$ भारती व टाटा टेली सर्व्हीसेस एकत्रित + सप्टेंबर पर्यंत

*आधार :* भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण

**आलेख ९.१४ : राज्यातील इंटरनेट ग्राहकांची संख्या**




९.३६ सार्वजनिक वाय-फाय हॉटस्पॉट या क्षेत्रामध्ये निशुल्क वाय-फाय इंटरनेट वापरता येते. हे क्षेत्र मॉल्स, कॅफे, विमानतळ, स्टेडियम, उद्याने, इत्यादी ठिकाणी आहे. राज्यात सप्टेंबर २०२५ अखेर ५,२७२ सार्वजनिक वाय-फाय हॉटस्पॉट , २४,२६७ ॲक्सेस पॉइंट आणि ६,९५,३५२ वाय-फाय वापरकर्ते आहेत.

९.३७ **भारतनेट:** भारतनेट टप्पा-१ मध्ये राज्यातील १५,३७९ ग्रामपंचायती ऑप्टीकल फायबर केबल द्वारे जोडल्या आहेत. भारतनेट टप्पा-२ (महानेट - १) हा प्रकल्प राज्यातील २६ जिल्हे, १५३ तालुके आणि सुमारे १२,५१३ ग्रामपंचायती मध्ये सुमारे ५६,०६७ किमी लांबीच्या ऑप्टीकल फायबर नेटवर्कद्वारे हाय स्पीड इंटरनेट जोडणी उपलब्ध करण्यासाठी राबविला जात आहे. माहे नोव्हेंबर २०२५ पर्यंत या प्रकल्पाचे सुमारे ७६ टक्के काम पूर्ण झाले आहे.

९.३८ **अर्बन महानेट:** राज्यात अर्बन महानेटद्वारे किफायतशीर दराने हाय स्पीड ब्रॉडबँड जोडणी पुरविण्यात येते. अर्बन महानेटद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसह राज्य शासनाच्या विविध कार्यालयांमधून जीरसी आणि जीरजी सारख्या ई-गव्हर्नन्स सेवा पुरविण्यात येत आहे. या प्रकल्पा अंतर्गत नोव्हेंबर २०२५ पर्यंत राज्यातील ३,८६३ ठिकाणी इंटरनेट जोडणी पुरविण्यात आली आहे.

* * * * *

## परिशिष्ट ९.१

## राज्यातील विजेची स्थापित क्षमता, निर्मिती व वापर

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०२०-२१ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **अ. स्थापित क्षमता (मेगावॅट)** | | | | | | | | |
| अ-१ राज्यातील स्थापित क्षमता- | | | | | | | | |
| (१) औष्णिक | ४७७$ | १,०६५$ | २,७७१ | ६,४६२ | ८,०७५ | ९,६६५ | २१,१७६ | २१,०२६ |
| (२) नवीकरणीय ऊर्जा | -- | -- | -- | -- | -- | ३,४०८ | ९,८४६ | १४,११३ |
| (३) जलजन्य | २८२ | ८४४ | १,३१७ | १,५५२ | २,८७४ | ३,०६६ | ३,०६१ | ३,०६१ |
| (४) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | ६७२ | १,८२० | २,७१४ | २,८१९ | २,८१९ |
| **एकूण (अ-१)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१२,७६९** | **१८,८५३** | **३६,९०२** | **४१,०१९** |
| अ-२ स्थापित क्षमतेत महाराष्ट्राचा हिस्सा | | | | | | | | |
| (१) राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २,०४८@ | ४,६८६ | ७,१३१ | ७,१३१ |
| (२) अणुशक्ती महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १३७ | ६९० | ६९० | १,०६९ |
| (३) नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्रालय | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १२३ | १२३ |
| **एकूण (अ-२)** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **२,१८५** | **५,३७६** | **७,९४४** | **८,३२३** |
| **एकूण (अ-१ + अ-२)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१४,९५४** | **२४,२२९** | **४४,८४६** | **४९,३४२** |
| **ब. निर्मिती (दशलक्ष युनिट)** | | | | | | | | |
| (१) औष्णिक | १,९०३$ | ३,३९२ | ११,४१६ | २८,०८५ | ४९,३७७ | ५२,७९६ | ८७,६९० | १,०९,११० |
| (२) नवीकरणीय ऊर्जा# | -- | -- | -- | -- | -- | ५,११८ | १५,८१३ | २१,११२ |
| (३) जलजन्य | १,३६५ | ४,५३३ | ६,४४८ | ५,६१५ | ४,८८९ | ६,३७४ | ५,५९३ | ५,१५५ |
| (४) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | २,७३० | ६,९४३ | १८,७२९ | ५,९६४ | ४,७९४ |
| **एकूण** | **३,२६८** | **७,९२५** | **१७,८६४** | **३६,४३०** | **६१,२०९#** | **८३,०१७** | **१,१५,०६०** | **१,४०,१७१** |
| **क. वापर (दशलक्ष युनिट)** | | | | | | | | |
| (१) औद्योगिक | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ४४,१०९ | ६५,४५९ |
| (२) घरगुती | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४६ | ३०,२२९ | ३७,२११ |
| (३) कृषी | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | ३३,९२४ | ३८,४२८ |
| (४) वाणिज्यिक | १९८ | ५४७ | ९४९ | २,०६८ | ४,१०५ | ११,५२७ | ९,४१५ | १६,३०२ |
| (५) रेल्वे | ३३९ | ४२१ | ७६६ | ९७० | १,५८१ | २,१८८ | १३५ | ३८५ |
| (६) सार्वजनिक पाणी पुरवठा | ३५ | १४६ | ३३० | उ.ना. | १,१९९ | १,९८३ | ६,०९० | ७,५०६ |
| (७) सार्वजनिक दिवाबत्ती | २० | ७४ | १५९ | २९१ | ५५१ | ८४६ | | |
| (८) इतर | -- | ६२ | १९८ | २६७ | ३७८ | ६३३ | ७८९ | ९३३ |
| **एकूण** | **२,७२०** | **७,६५०** | **१४,०३४** | **२९,९७१** | **४७,२८९** | **८७,३९६** | **१,२४,६९१** | **१,६६,२२४** |
| **ड. दरडोई विजेचा अंतिम वापर (युनिट)** | | | | | | | | |
| (१) औद्योगिक | ४६.८ | १०५.४ | १२९.५ | १९५.४ | १९१.२ | ३०७.२ | ३५५.८ | ५११.७ |
| (२) वाणिज्यिक | ५.० | १०.९ | १५.१ | २७.५ | ४२.७ | १०२.९ | ७६.० | १२७.४ |

टीप - (१) उपलब्ध आकडेवारी केवळ सार्वजनिक विद्युत व्यवसायी यंत्रणेची आहे

उ.ना. उपलब्ध नाही

(२) @ यात राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ व अणुशक्ती महामंडळाकडील वाटप न झालेला तसेच गोवा राज्याचा शिलकी ३२३ मेगावॅटचा अतिरिक्त हिस्सा समाविष्ट आहे

(३) # यात बंदिस्त वीज व नवीकरणीय ऊर्जेची (महावितरणला विकलेली) आकडेवारी समाविष्ट आहे

(४) $ यात तेलजन्य ऊर्जेची आकडेवारी औष्णिक ऊर्जेत समाविष्ट आहे

(५) टाटा पॉवर कं मर्या. व अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई मर्या. वगळून इतर खाजगी कंपन्यांची स्थापित क्षमता व निर्मिती सीइएच्या वेबसाईट अहवालानुसार दिली आहे

(६) १ युनिट = एक किलो वॅट तास

*आधार* - (१) केंद्रीय विद्युत प्राधिकरण (२) महानिर्मिती (३) महावितरण (४) बेस्ट (५) महाऊर्जा (६) टाटा पॉवर कं. मर्या. (७) अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई मर्या.

## परिशिष्ट ९.२

## राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी

## (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ.क्र. | वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | १९६५-६६ | २,३६४ | -- | १०,५२८ | १२,६२८ | ८,७४४ | १७,५२४ | ५१,७८८ |
| २ | १९७०-७१ | २,४४५ | -- | १४,२०३ | १७,६८४ | ११,०१२ | २०,०२० | ६५,३६४ |
| ३ | १९८०-८१ | २,९४५ | -- | १८,९४९ | २५,२३३ | २५,४०४ | ६८,६०० | १,४१,१३१ |
| ४ | १९९०-९१ | २,९५९ | -- | ३०,९७५ | ३८,९३६ | ३८,५७३ | ६१,५२२ | १,७२,९६५ |
| ५ | २०००-०१ | ३,६८८ | -- | ३३,२१२ | ४६,७५१ | ४३,६९६ | ८९,५९९ | २,१६,९४६ |
| ६ | २००६-०७ | ४,३६७ | -- | ३३,६७५ | ४९,१४७ | ४५,६७४ | १,००,८०१ | २,३३,६६४ |
| ७ | २००७-०८ | ४,३६७ | -- | ३३,८०० | ४९,३९३ | ४५,८८६ | १,०२,१४९ | २,३५,५९५ |
| ८ | २००८-०९ | ४,३६७ | -- | ३३,९३३ | ४९,६२१ | ४६,१४३ | १,०३,६०४ | २,३७,६६८ |
| ९ | २००९-१० | ४,३७६ | -- | ३४,१०२ | ४९,९०१ | ४६,८१७ | १,०४,८४४ | २,४०,०४० |
| १० | २०१०-११ | ४,३७६ | -- | ३४,१०३ | ४९,९३६ | ४६,८९७ | १,०६,४०० | २,४१,७१२ |
| ११ | २०११-१२ | ४,३७६ | -- | ३४,१५७ | ५०,२५६ | ४७,५२९ | १,०६,६०१ | २,४२,९१९ |
| १२ | २०१२-१३ | ४,३७६ | ६,६९४ | २७,५२८ | ५०,२५६ | ४७,५७३ | १,०६,७४५ | २,४३,१७२ |
| १३ | २०१३-१४ | ५,८५८ | ६,३३७ | ३३,९६३ | ५०,२३२ | ५२,७६१ | १,१४,५५७ | २,६३,७०८ |
| १४ | २०१४-१५ | ४,७६६ | ६,१६३ | ३३,८६० | ५०,५८५ | ५८,११५ | १,४५,८७९ | २,९९,३६८ |
| १५ | २०१५-१६ | ४,९०१ | ५,२४९ | ३३,६९५ | ५२,२७५ | ५६,५६४ | १,५३,४३५ | ३,०५,११९ |
| १६ | २०१६-१७ | ७,६८२ | ३,९७१ | ३०,७७६ | ५१,६२७ | ५६,३३६ | १,५३,९४६ | ३,०४,३३६ |
| १७ | २०१७-१८ | १०,१९५ | ३,२७२ | २९,१५१ | ५५,०३० | ५३,९२४ | १,५२,२७२ | ३,०३,८४३ |
| १८ | २०१८-१९ | १०,३०० | २,९६७ | २८,४६६ | ६०,५३१ | ४९,२०६ | १,५७,१२७ | ३,०८,५९७ |
| १९ | २०१९-२० | १७,७२६ | २,९६७ | २९,०३० | ६३,८८६ | ४७,३९८ | १,४८,३३५ | ३,०९,३४२ |
| २० | २०२०-२१ | १८,०८९ | २,९०० | २९,३८८ | ६८,३५० | ४६,४०८ | १,५७,९८० | ३,२३,११५ |
| २१ | २०२१-२२ | १८,३६६ | २,६२२ | २९,२६५ | ६८,५३५ | ४५,३७१ | १,५९,७१४ | ३,२३,८७३ |
| २२ | २०२२-२३ | १८,३६६ | २,७१६ | ३०,४६५ | ७१,५७४ | ४३,२२९ | १,५९,१३९ | ३,२५,४८९ |
| २३ | २०२३-२४ | १८,३६६ | २,६९२ | ३०,९२२ | ७४,१७८ | ४२,०३९ | १,७१,१५१ | ३,३९,८४८ |
| २४ | २०२४-२५* | १८,३६६ | २,६९२ | ३१,५३२ | ७४,७९७ | ४२,२१७ | १,७६,२१८ | ३,४५,८२२ |

* अस्थायी

टीप - (१) १९८७ पर्यंतच्या रस्ते लांबीची विभागणी १९६१-८१ रस्ते विकास योजनेनुसार आणि १९८७-८८ पासून ही विभागणी १९८१-२००१ रस्ते विकास योजनेनुसार केली आहे

(२) सन १९६५-६६ ते २०११-१२ करिता राज्य महामार्गात प्रमुख राज्य महामार्गाचा समावेश आहे

(३) सन २०१२-१३ पासून रस्ते लांबीची विभागणी २००१-२१ रस्ते विकास योजनेनुसार आहे

(४) सन २०२३-२४ पासून इतर जिल्हा रस्ते व ग्रामीण रस्त्यांची माहिती ग्रामविकास विभागाकडून

(५) आकडे संक्षिप्तात दिल्याने जुळतीलच असे नाही

*आधार* - १) सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

२) ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ९.३

## जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ. क्र. | जिल्हा | साध्य लांबी २०२४-२५* | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रूंदी (मीटर) | ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर$ | एकूण |
| (१) | (२) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | बृहन्मुंबई | २५ | ० | ० | ० | २५ |
| २ | ठाणे | ५९१ | २६५ | ६४४ | २,५५२ | ४,०५२ |
| ३ | पालघर | ८२१ | ७९१ | ३४८ | ५,१३९ | ७,०९८ |
| ४ | रायगड | १,१७० | ५६२ | ८५२ | ५,४९३ | ८,०७७ |
| ५ | रत्नागिरी | ८६८ | ७६८ | १,८७१ | ६,६२० | १,०१२८ |
| ६ | सिंधुदुर्ग | ३९२ | ८१३ | १,०२१ | ५,८८४ | ८,११० |
| | **कोकण विभाग** | **३,८६६** | **३,१९९** | **४,७३६** | **२५,६८८** | **३७,४८९** |
| ७ | अहिल्यानगर | १,६५७ | १,४९० | ३,७७१ | १३,८९२ | २०,८१० |
| ८ | नाशिक | १,९०९ | १,८७८ | २,७२९ | १३,९६३ | २०,४७९ |
| ९ | धुळे | १,०३० | ६९४ | १,०५६ | ४,०४७ | ६,८२८ |
| १० | नंदुरबार | ६१३ | ५३१ | ९९१ | ५,२६७ | ७,४०२ |
| ११ | जळगाव | १,१४० | १,५१३ | २,४१७ | ९,७४० | १४,८१० |
| | **नाशिक विभाग** | **६,३४९** | **६,१०७** | **१०,९६४** | **४६,९०९** | **७०,३२९** |
| १२ | पुणे | २,२४५ | १,६४० | ४,१६४ | १२,१६३ | २०,२१२ |
| १३ | सातारा | १,०४९ | १,०८८ | २,७६६ | ८,११२ | १३,०१५ |
| १४ | सांगली | १,०५५ | १,१२१ | २,५०६ | ७,९२२ | १२,६०३ |
| १५ | कोल्हापुर | १,२१३ | १,३४० | १,४५६ | ५,५१० | ९,५१९ |
| १६ | सोलापूर | १,६६८ | ८७७ | ३,७७३ | १०,६९५ | १७,०१४ |
| | **पुणे विभाग** | **७,२३०** | **६,०६६** | **१४,६६४** | **४४,४०२** | **७२,३६२** |
| १७ | छत्रपती संभाजीनगर | १,१२८ | ५५९ | १,९५६ | ६,९९९ | १०,६४२ |
| १८ | जालना | ९०२ | ४५५ | १,४२८ | ५,२०८ | ७,९९३ |
| १९ | परभणी | ६१६ | १७६ | ७७५ | ३,४७६ | ५,०४२ |
| २० | हिंगोली | ४९२ | १५४ | ९३२ | २,४४३ | ४,०२१ |
| २१ | नांदेड | १,९१२ | ७१८ | ३,३६९ | ६,८२७ | १२,८२६ |
| २२ | बीड | १,४८९ | ६४३ | २,४७३ | ८,५५६ | १३,१६१ |
| २३ | धाराशिव | ७९१ | ९५० | १,३०८ | ४,८८५ | ७,९३४ |
| २४ | लातूर | ९९३ | १,३५६ | १,९७५ | ४,३९१ | ८,७१६ |
| | **छत्रपती संभाजीनगर विभाग** | **८,३२४** | **५,०११** | **१४,२१६** | **४२,७८४** | **७०,३३५** |
| २५ | बुलढाणा | १,१४२ | ८४५ | २,४३१ | ५,१६७ | ९,५८५ |
| २६ | अकोला | ५३४ | २०३ | ७६८ | २,४९५ | ४,००० |
| २७ | वाशिम | ५५० | १७० | १,०२७ | ३,३०३ | ५,०५० |
| २८ | अमरावती | १,२८६ | ५३८ | १,७५१ | ७,२२७ | १०,८०२ |
| २९ | यवतमाळ | १,४२४ | ७७५ | १,०३९ | १०,०३० | १३,२६८ |
| | **अमरावती विभाग** | **४,९३५** | **२,५३१** | **७,०१६** | **२८,२२३** | **४२,७०५** |
| ३० | वर्धा | ७८१ | २८७ | ८६७ | ३,४६८ | ५,४०२ |
| ३१ | नागपूर | १,३२७ | ८७७ | १,७२९ | १०,६९३ | १४,६२६ |
| ३२ | भंडारा | ४३१ | २५७ | ६५६ | ४,८९८ | ६,२४३ |
| ३३ | गोंदिया | ४८१ | ३८४ | ८९८ | ५,७७९ | ७,५४१ |
| ३४ | चंद्रपुर | १,१७८ | ७०४ | १,७१७ | ६,१६५ | ९,७६५ |
| ३५ | गडचिरोली | ८३२ | ५५४ | १,२०७ | ६,४३३ | ९,०२६ |
| | **नागपूर विभाग** | **५,०३१** | **३,०६३** | **७,०७३** | **३७,४३६** | **५२,६०३** |
| | **महाराष्ट्र राज्य** | **३५,७३५** | **२५,९७७** | **५८,६६९** | **२,२५,४४२** | **३,४५,८२२** |

टीप: आकडे संक्षिप्तात दिल्याने जुळतीलच असे नाही     * अस्थायी

$ रस्त्यांच्या लांबीमध्ये इतर जिल्हा रस्ते आणि ग्रामीण रस्त्यांचा समावेश

*आधार* - १) सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

२) ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट ९.४

## राज्यातील मोटार वाहनांची संख्या

(१ जानेवारी रोजी)

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०२४* | २०२५* | २०२६* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मोटार सायकली, स्कूटर व मोपेड | ८३,९३० | ३,४६,८२६ | १६,९६,१५७ | ४४,०९,९०६ | १,२०,६०,९९० | ३,३३,२३,५२९ | ३,५४,४०,०८५ | ३,७८,१७,५७३ |
| २ | मोटार गाड्या, जीप आणि स्टेशन वॅगन्स | १,२२,५०८ | २,२४,७५२ | ४,२३,५०५ | ९,०१,२७८ | २३,८२,७८९ | ६६,८०,७४५ | ७१,७८,७५२ | ७७,१०,९५५ |
| ३ | टॅक्सी कॅब्ज | १७,८०६ | ३१,३०२ | ४३,१६८ | ८६,४३८ | १,८२,६७६ | ४,१९,९६४ | ४,७०,९१४ | ५,३३,६५१ |
| ४ | स्वयंचलित रिक्षा | ३,०४९ | २९,४७४ | १,२६,०४९ | ४,०७,६६० | ६,४४,०३७ | ११,६३,०१७ | १२,२२,८३८ | १२,९६,४३३ |
| ५ | स्टेज कॅरेजेस | १०,२५० | १३,७८९ | १८,२०३ | २७,२८६ | ३४,०६१ | ४६,०१५ | ४७,३९७ | ५०,९२४ |
| ६ | कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस | -- | १,४९८ | ३,९८० | १३,९७५ | ३१,४५९ | ७७,९६४ | ८४,४६३ | ९४,३७७ |
| ७ | मालमोटारी - | | | | | | | | |
| | (१) डिझेल इंजिन | ३४,९८७ | ८७,०७९ | १,८०,८८३ | ३,४१,३४४ | ८,७८,२३९ | २१,३७,०६१ | २२,१३,२४६ | २४,४१,९०५ |
| | (२) पेट्रोल इंजिन | २१,७९१ | १८,००५ | १३,७७४ | ५७,३१७ | ७७,१८९ | २७,७२० | ३१,८४६ | १,३८,२८८ |
| | (३) इतर (सीएनजी, एलपीजी, इ.) | -- | -- | -- | उ.ना. | उ.ना. | ९९,४८५ | १,६०,५८२ | ३,९३,४५४ |
| | (४) विद्युत | -- | -- | -- | -- | -- | ९३५ | १२,२३६ | १९,२८३ |
| ८ | रुग्णवाहिका | ४४१ | ९२५ | २,२३३ | ४,०२५ | ९,६०० | २२,५०६ | २४,४२३ | २६,००२ |
| ९ | शाळेच्या बसेस | ४९१ | ५९४ | १,०२५ | १,७१४ | ६,११७ | ३६,२३१ | ३८,४१० | ४०,८३६ |
| १० | खाजगी प्रवासी वाहने | ८१० | २,१७१ | ४,६२२ | ५,८१५ | ९,४२१ | १४,०९९ | १४,५०८ | १५,१२६ |
| ११ | जोड वाहने (ट्रेलर) | ७,०७५ | २३,१७३ | ६०,८५८ | १,६७,८५६ | २,८४,६९६ | ४,८३,८४४ | ४,९८,८०८ | ५,२०,०६३ |
| १२ | ट्रॅक्टर्स | ७,८२१ | २४,०७९ | ६१,०८८ | १,७२,५७८ | ३,५८,५५६ | ११,६१,२०८ | १२,४७,३८३ | १५,९३,४६७ |
| १३ | इतर | ८१० | १,३१९ | ५,०४० | ९,८७२ | २९,८२९ | १,१९,८०० | १,३९,१७६ | १,५७,२२५ |
| | **एकूण** | **३,११,७६९** | **८,०४,९८६** | **२६,४०,५८५** | **६६,०७,०६४** | **१,६९,८९,६५९** | **४,५८,१४,१२३** | **४,८८,२५,०६७** | **५,२८,४९,५६२** |
| | दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या | ६१८ | १,३०९ | ३,३५३ | ७,१८६ | १५,११९ | ३६,०८७ | ३८,१६६ | ४१,००० |
| | राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील असलेल्या दर किमी रस्ते लांबीमागे मोटार वाहनांची संख्या | ५ | ६ | १५ | ३१ | ७१ | १४१ | १४९ | १५३ |
| | दर लाख लोकसंख्येमागे रुग्णवाहिकांची संख्या | ०.९ | १.५ | २.८ | ४.४ | ८.५ | १८ | १९ | २० |

*आधार* - परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी उ.ना. उपलब्ध नाही

# १० सामाजिक क्षेत्र





# १०. सामाजिक क्षेत्र

१०.१ सामाजिक विकास शिक्षण व आरोग्य सेवेद्वारे व्यक्तींचे सक्षमीकरण, विषमता कमी करणे, सामाजिक न्याय वृद्धिंगत करणे आणि सर्वांसाठी समान संधीची सुनिश्चिती करणे यावर केंद्रित आहे. यामध्ये दारिद्र्य निर्मूलन, दर्जेदार शिक्षण, चांगले आरोग्य व कल्याण, सन्मानजनक उपजीविका, महिला व बालकल्याण, सर्वांसाठी मूलभूत सुविधा असलेली घरे उपलब्ध करून देणे आणि पर्यावरण संवर्धन यांचा समावेश होत असून ज्याद्वारे शाश्वत विकास साध्य करता येईल.

## शिक्षण

१०.२ शिक्षण हे सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक विकासासाठी एक महत्त्वाचे साधन आहे. 'सर्वांसाठी सर्व समावेशक व समन्यायी दर्जेदार शिक्षणाची सुनिश्चिती आणि सर्वांना आजीवन शिक्षणाच्या संधींना चालना देणे' हे शाश्वत विकास ध्येयांपैकी एक ध्येय आहे. सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शासन विविध उपक्रम राबवित आहे. दर्जेदार शिक्षणामुळे व्यक्तींचा सर्वांगीण विकास होऊन चिकित्सक विचारशक्ती विकसित होते आणि समाजाच्या प्रगतीस व सर्वांसाठी उज्वल भवितव्य घडविण्यास मदत होते.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

१०.३ संविधानात अपेक्षित असलेल्या समतापूर्ण, समावेशक आणि बहुविध समाजनिर्मितीसाठी सक्रिय, उत्पादक आणि योगदान देणारे नागरिक घडविणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे उद्दिष्ट आहे. देशातील शालेय व उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये परिवर्तनकारी सुधारणा घडवून शाश्वत विकास ध्येयांमधील नमूद लक्ष्ये साध्य करणे हा या धोरणाचा हेतू आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासन पुढील उपक्रम राबवत आहे:

१०.३.१ अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके

- बाल वाटिका ते इयत्ता बारावी पर्यंत शालेय शिक्षण अभ्यासक्रम निर्मितीची प्रक्रिया पूर्ण
- शालेय शिक्षण अभ्यासक्रमात सत्र पद्धती, स्थानिक कला व हस्तकला यांचा समावेश
- सर्व पाठ्यपुस्तके आणि शिक्षकांसाठी आवश्यक साहित्य मुद्रित स्वरूपात व ई-सामग्री स्वरूपात उपलब्ध

१०.३.२ पायभूत साक्षरता व संख्याज्ञान

- पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अंतर्गत शिक्षक प्रशिक्षण, क्षमता विकास, दिक्षा पोर्टलवरील ई-सामग्री तसेच सर्वांगीण प्रगती कार्ड यांचे विकसन
- निपुण भारत अंतर्गत खालील उपक्रम राबविण्यात येत आहेत
    - शाळा व्यवस्थापन समित्या आणि पालकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती समन्वय प्रशिक्षणांचे आयोजन
    - इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी पायाभूत संख्याज्ञान व अध्ययन निष्पत्ती विकासासाठी "करूया मैत्री गणिताशी" या कार्यपुस्तिकांची आठ भाषांमध्ये निर्मिती
- निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांच्या भाषा व गणितातील पायाभूत कौशल्यांचे मूल्यांकन करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ॲपचे विकसन

१०.३.३ डिजिटल शिक्षण व ई-संसाधने

- दिक्षा पोर्टलवर राज्यस्तरीय ई-संसाधने, हायब्रिड वर्ग तसेच शिक्षक व्यावसायिक विकास विषयक अध्ययन साहित्य उपलब्ध

१०.३.४ समता व सर्वसमावेशक शिक्षण

- विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसोबत कार्य करणाऱ्या शिक्षकांसाठी सर्वसमावेशक शिक्षक-प्रशिक्षण हस्तपुस्तिकांचे विकसन

१०.३.५ प्रशासन, गुणवत्ता व नियोजन

- शालेय गुणवत्ता मूल्यांकन आणि मान्यताप्रदान आराखडा विकसन

१०.३.६ व्यावसायिक शिक्षण व करिअर मार्गदर्शन

- इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन/ऑफलाइन करिअर-मार्गदर्शन प्रणालीचे विकसन
- सामाजिक कौशल्ये आणि उद्योजकता विषयक अभ्यासक्रमांची अंमलबजावणी
- दप्तरमुक्त दिवस आणि व्यावसायिक हस्तकला उपक्रमांसाठी मार्गदर्शक सूचना संच

१०.३.७. मूल्यमापन व परीक्षा सुधारणा

- वर्षातून ३ वेळा अध्ययन निष्पत्ती आधारित संकलित मूल्यमापन चाचण्यांचे आयोजन
- पायाभूत टप्प्यासाठी सर्वांगीण प्रगती कार्डचे विकसन
- इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत सर्व विषयांसाठी प्रश्नसंचाचे विकसन

१०.३.८. प्रौढ शिक्षण

- प्रौढ शिक्षणासाठी राज्य साक्षरता केंद्र कक्षाची स्थापना

१०.३.९. बहुभाषिकता व भाषा शिक्षण

- मातृभाषा/ स्थानिक भाषेचा अध्यापन माध्यम म्हणून वापर वाढविण्यासाठी शिक्षण सामग्रीचे विकसन

## समग्र शिक्षा

१०.४ विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी सन २०१८-१९ पासून समग्र शिक्षा हा व्यापक कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. शाश्वत विकास ध्येयामध्ये परिकल्पित केल्यानुसार शाळा पूर्व ते उच्च माध्यमिक स्तरापर्यंत सर्वसमावेशक आणि समन्यायी शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी या कार्यक्रम अंतर्गत सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान आणि शिक्षक प्रशिक्षण या तीन योजना अंतर्भूत आहेत. समग्र शिक्षाअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ २,४४०.०३ कोटी आणि सन २०२५-२६ मध्ये जानेवारी पर्यंत ₹ ८३८.८५ कोटी खर्च झाला.

## प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षण

१०.५ प्राथमिक शिक्षणासाठी राज्यात विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येतात. प्राथमिक (इयत्ता पहिली ते पाचवी) आणि उच्च प्राथमिक (इयत्ता सहावी ते आठवी) शिक्षणाबाबतचे काही महत्त्वाचे निर्देशक तक्ता १०.१ मध्ये दिले आहेत तर विभागनिहाय, शैक्षणिक स्तरनिहाय संस्था, पटसंख्या व शिक्षकांची संख्या परिशिष्ट १०.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१ प्राथमिक (इयत्ता पहिली ते पाचवी) व उच्च प्राथमिक (इयत्ता सहावी ते आठवी) शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक**

(दि. ३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|
| नोंदविलेल्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या | | १,०४,४९९ | १,०४,५२६ |
| ग्रामीण भागातील शाळांची टक्केवारी | | ७५.२ | ७५.१ |
| दर १० चौ किमी मागे शाळांची घनता | अ) प्राथमिक | ३.२ | ३.१ |
| | ब) उच्च प्राथमिक | १.७ | १.८ |
| दर हजार मुलांच्यामागे (६ ते ११ वर्षे वय) प्राथमिक शाळांची संख्या | | १०.१ | १०.० |
| दर हजार मुलांच्यामागे (११ ते १४ वर्षे वय) उच्च प्राथमिक शाळांची संख्या | | ९.३ | ९.४ |
| स्वअर्थसहाय्यित खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | | १२.४ | १२.८ |
| शाळेतील पटसंख्या (लाख) | | १४६.० | १४५.० |
| पटसंख्येतील मुलींची टक्केवारी | | ४७.७ | ४७.८ |
| एकूण पटसंख्या प्रमाण | अ) प्राथमिक | १०१.६ | १०४.५ |
| | ब) उच्च प्राथमिक | ९४.३ | ९६.५ |
| सरासरी विद्यार्थी - वर्गखोली प्रमाण (सर्व शाळा) | | २६ | २६ |
| शिक्षकांची संख्या (लाख) | | ४.८ | ४.९ |
| विद्यार्थी-शिक्षक प्रमाण | | ३१:१ | ३०:१ |
| सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी | | | |
| पिण्याचे पाणी | | ९९.५ | ९९.६ |
| मुलींकरिता कार्यरत शौचालय | | ९५.८ | ९९.५ |
| संरक्षक भिंत | | ८९.३ | ८५.६ |
| संगणक | | ७२.२ | ७३.१ |
| दिव्यांगांसाठी उतरता रस्ता | | ९४.१ | ९४.२ |
| खेळाचे मैदान | | ८७.० | ८७.४ |
| ग्रंथालय | | ९२.९ | ९३.२ |
| विद्युत जोडणी | | ९४.४ | ९४.७ |
| गळतीचे प्रमाण | अ) प्राथमिक | ०.०० | ०.०० |
| | ब) उच्च प्राथमिक | ०.६२ | ०.१९ |
| मुली मुले समानता निर्देशांक | अ) प्राथमिक | ०.९२ | ०.९३ |
| | ब) उच्च प्राथमिक | ०.८८ | ०.९० |

*आधार:* महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

१०.६ **'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९':** 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९' राज्यात एप्रिल, २०१० पासून लागू करण्यात आला आहे. या अधिनियमा अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये २,०९,०२८ आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला.

१०.६.१ या अधिनियमाअंतर्गत सहा ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक शाळाबाह्य बालकाला शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. सन २०२५-२६ नोव्हेंबरपर्यंत मध्ये एकूण २,४९७ शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्यात आला व त्यापैकी २,०६९ मुलांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले. उर्वरित ४२८ बालके सहा ते सात वर्षे वयोगटातील असून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्यवाही सुरु आहे.

## माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण

१०.७ माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी ते १२ वी) शिक्षणाबाबतचे काही महत्त्वाचे निर्देशक तक्ता १०.२ मध्ये दिले आहेत तर विभागनिहाय, शैक्षणिक स्तरनिहाय संस्था, पटसंख्या व शिक्षकांची संख्या परिशिष्ट १०.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२ माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) व उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी ते १२ वी) शिक्षणाबाबतचे काही महत्त्वाचे निर्देशक**

(दि. ३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|
| नोंदविलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या | | २८,९८६ | २९,६४१ |
| ग्रामीण भागातील शाळांचे प्रमाण | | ५८.२ | ५८.२ |
| दर १० चौ किमी मागे शाळांची घनता | (अ) माध्यमिक | ०.८ | ०.९ |
| | (ब) उच्च माध्यमिक | ०.४ | ०.५ |
| स्वअर्थसहाय्यित खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | | २८.६ | २९.८ |
| शाळेतील पटसंख्या (लाख) | | ६३.७ | ६३.६ |
| पटसंख्येतील मुलींची टक्केवारी | | ४७.० | ४७.२ |
| एकूण पटसंख्येचे प्रमाण | (अ) माध्यमिक | ९०.१ | ९३.६ |
| | (ब) उच्च माध्यमिक | ६८.३ | ७०.८ |
| सरासरी विद्यार्थी-वर्गखोली प्रमाण (सर्व शाळा) | | ४० | ४० |
| शिक्षकांची संख्या (लाख) | | २.५ | २.५ |
| विद्यार्थी - शिक्षक प्रमाण | | २६:१ | २६.१ |
| सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी | | | |
| पिण्याचे पाणी | | ९९.९ | ९९.९ |
| मुलींकरिता कार्यरत शौचालय | | ९८.७ | ९७.० |
| संरक्षक भिंत | | ९५.२ | ९५.३ |
| दिव्यांगांसाठी उतरता रस्ता | | ९१.२ | ९१.४ |
| खेळाचे मैदान | | ९५.२ | ९५.२ |
| ग्रंथालय | | ९६.४ | ९६.६ |
| विद्युत जोडणी | | ९८.९ | ९९.१० |
| संगणक | | ९४.९ | ९५.६ |
| संगणक व इंटरनेट | | ८३.४ | ८८.९ |
| गळतीचे प्रमाण | (अ) माध्यमिक | ५.४ | ५.७ |
| | (ब) उच्च माध्यमिक | ३.० | २.० |
| मुली मुले समानता निर्देशांक | (अ) माध्यमिक | ०.८८ | ०.८७ |
| | (ब) उच्च माध्यमिक | ०.८८ | ०.९ |

*आधार:* महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

१०.८ **स्वअर्थसहाय्यित शाळा**: 'महाराष्ट्र स्वअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व नियमन) अधिनियम, २०१२' राज्यात जानेवारी २०१३ पासून लागू आहे. स्वअर्थसहाय्यित शाळांची मंडळ आणि माध्यम निहाय संख्या तक्ता १०.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३ स्वअर्थसहाय्यित शाळांची मंडळ व माध्यम निहाय संख्या**

(दि. ३० सप्टेंबर रोजी)

| वर्ष | मंडळ | | | | | माध्यम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य मंडळ | सीबीएसई | राज्य मंडळ व सीबीएसई | आयसीएसई/आयजीसीएसई/ आयबी/ इतर | एकूण | मराठी | इंग्रजी | उर्दू/हिंदी/बंगाली/ गुजराती/कन्नड |
| २०२३-२४ | १३,६५५ | १,२०४ | १५ | ३७९ | १५,२५३ | २,०३५ | १२,९८६ | २३२ |
| २०२४-२५ | १३,५६८ | १,२६० | १ | ३८९ | १५,२१८ | २,०१० | १२,९९१ | २१७ |

सीबीएसई - सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन
आयसीएसई - इंडियन सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशन
आयजीसीएसई - इंटरनॅशनल जनरल सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशन
आयबी - इंटरनॅशनल बॅचलरेट
*आधार:* महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

१०.९ **सैनिकी शाळा:** राज्यात ३८ अनुदानित सैनिकी शाळा असून त्यापैकी चार शाळा केवळ मुलींसाठी आहेत. सन २०२५-२६ मध्ये या शाळांमध्ये एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या ११,९१५ आहे.

१०.१० **दिव्यांग समावेशक शिक्षण कार्यक्रम**: विशेष गरजा असलेल्या मुलांना मुख्य प्रवाहात सर्वसाधारण मुलांसोबत दर्जेदार शिक्षण मिळून त्यांची भावनिक उन्नती होण्यासाठी तसेच त्यांना समाजात सामावून घेण्यासाठी राज्यात दिव्यांग समावेशक शिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. विशेष गरजा असलेल्या मुलांची ओळख, वैद्यकीय मूल्यमापन करणे, ब्रेल लिपीतील पुस्तके, चष्मा, श्रवण यंत्रे व उपकरणे, भाषण प्रशिक्षक, इत्यादी शैक्षणिक आणि पुनर्वसन सहाय्य सेवा प्रदान करणे यांचा समावेश दिव्यांग समावेशक शिक्षण कार्यक्रमामध्ये आहे. 'दिव्यांगांसाठी सर्वसमावेशक शिक्षण' कार्यक्रमाचा तपशील तक्ता १०.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४ दिव्यांगासाठी सर्वसमावेशक शिक्षण कार्यक्रमाचा तपशील**

| शैक्षणिक स्तर | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| प्राथमिक (१ ली ते ८ वी) | १.९० | २.९२ | १.७६ | ७७.८५ | १.१७ | २९.६७ |
| माध्यमिक (९ वी ते १२ वी) | ०.५१ | १.२८ | ०.५५ | १९.४२ | ०.५२ | ७.४० |

*आधार*: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद + डिसेंबर पर्यंत

१०.११ **प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना:** प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची नोंदणी व उपस्थिती वाढवणे आणि त्यांच्या पोषण स्तरात सुधारणा करणे या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शिजवलेले अन्न दिले जाते. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचा तपशील तक्ता १०.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५ प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचा तपशील**

| इयत्ता | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाखात) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाखात) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाखात) | खर्च (₹ कोटी) |
| १ ली ते ५ वी | ६१.२८ | ८४४.२० | ५०.७७ | ९२१.७२ | ५१.५४ | २०८.७४ |
| ६ वी ते ८ वी | ४०.२२ | ६९०.७१ | ३१.२६ | ६१४.४८ | ३३.५९ | १३९.१६ |

*आधार*: प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबर पर्यंत

१०.१२ **आदर्श शाळा:** राज्यातील १,५०० शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यासाठी राज्य शासनाने आदर्श शाळा योजना सन २०२१ मध्ये सुरू केली. पहिल्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा, महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या शाळा, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, शासकीय विद्यानिकेतन व नागरी भागातील शाळा अशा एकूण ४८८ शाळांना आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यास मान्यता देण्यात आली. सन २०२४-२५ मध्ये २७९ आदर्श शाळांच्या बांधकामासाठी ₹ ३८.९९ कोटी खर्च झाला.

१०.१३ **शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या योजना:** विद्यार्थ्यांच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी आणि पालकांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी राज्य शासन विविध योजना राबवित आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनेचा तपशील तक्ता १०.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६ विद्यार्थ्यांना शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनेचा तपशील**

| योजनेचे नाव | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| शासकीय अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या इयत्ता १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत | २७.८० | ३.८५ | २७.८० | ५.०० |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील इयत्ता ११ वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण | १.३६ | ०.५० | १.३६ | ०.५० |

*आधार* : शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र शासन + नोव्हेंबर पर्यंत

१०.१४ **मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या योजना:** मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन अहिल्याबाई होळकर योजना (राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये मोफत प्रवास), अकरावी आणि बारावीत शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, इत्यादी योजना राबवित आहे. मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनेचा तपशील तक्ता १०.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७ मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनेचा तपशील**

| योजना | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| अहिल्याबाई होळकर योजना | २२.३३ | ५३८.५६ | २४.६० | ६७८.१८ | १४.३१ | ४६५.३२ |
| इयत्ता ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण | १२.९९ | २.०२ | १२.९९ | १.८८ | १२.९९ | ०.०० |
| कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय | ०.०४ | २०.६६ | ०.०४ | ३२.१७ | ०.०४ | १०.७६ |

*आधार:* १) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई + नोव्हेंबर पर्यंत
२) शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र शासन
३) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

१०.१५ **पीएम श्री शाळा:** पीएम श्री शाळा ही केंद्र पुरस्कृत योजना सन २०२२ पासून राबविण्यात येत आहे. निवडक विद्यमान शाळांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या सर्व पैलूंची अंमलबजावणी करतील अशा पीएम श्री शाळा म्हणून विकसित करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत देशातील १५,००० हून अधिक निवडक विद्यमान शाळा उत्कृष्ट पायाभूत सुविधा व पुरेशा संसाधनांसह आनंददायी, उत्साहवर्धक व शैक्षणिकदृष्ट्या अनुकूल शालेय वातावरणात उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सर्वसमावेशक उत्कृष्ट शाळा म्हणून विकसित केल्या जातील. माहे जानेवारी २०२६ पर्यंत राज्यात ८६० पीएम श्री शाळा आहेत.

## परख राष्ट्रीय सर्वेक्षण २०२४

१०.१६ परख (समग्र विकासासाठी ज्ञानाच्या कामगिरीचे मूल्यांकन, आढावा आणि विश्लेषण) राष्ट्रीय सर्वेक्षण २०२४ हे भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयामार्फत आयोजित करण्यात आले असून या सर्वेक्षणाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या क्षमतांचे मूल्यांकन, विश्लेषण व समृद्धीकरण करणे हे असून शैक्षणिक टप्प्यांच्या शेवटी म्हणजेच पायाभूत, प्रारंभिक आणि मध्यम स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कौशल्यांचे मूल्यमापन करणे आहे. हे सर्वेक्षण शालेय शिक्षण प्रणालीच्या परिणाम कारकतेचे प्रतिबिंब दर्शविते. परख राष्ट्रीय सर्वेक्षण २०२४ अंतर्गत समाविष्ट शाळा, शिक्षक व विद्यार्थ्यांची इयत्तानिहाय संख्या तक्ता १०.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८ परख राष्ट्रीय सर्वेक्षण २०२४ अंतर्गत समाविष्ट असलेल्या शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांची इयत्तानिहाय संख्या**

| तपशील | इयत्ता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तिसरी | | सहावी | | नववी | |
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| शाळांची संख्या | १,४९६ | २७,७४१ | १,५१५ | २६,९७३ | १,७२६ | ३१,४०६ |
| शिक्षकांची संख्या | ३,०७८ | ७१,४८२ | ४,१९४ | ७७,८४१ | ६,६५८ | १,२१,०९६ |
| विद्यार्थ्यांची संख्या | ३७,६४१ | ५,९९,०२६ | ३७,५५८ | ६,६३,१९५ | ४८,४६० | ८,५२,८०१ |

*आधार* : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

१०.१६.१ या सर्वेक्षणातून इयत्तानिहाय ‘भाषा’, ‘गणित’, ‘आपल्या सभोवतालचे जग’, ‘विज्ञान’ आणि ‘सामाजिक विज्ञान’ या विषयांच्या संबंधित प्रश्नांची अचूक उत्तर दिलेल्या विद्यार्थ्यांची सरासरी टक्केवारी निदर्शनास आली. परख राष्ट्रीय सर्वेक्षण २०२४ नुसार इयत्तानिहाय विविध विषयांचे गुणांकन तक्ता १०.९ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.९ परख राष्ट्रीय सर्वेक्षण २०२४ नुसार इयत्तानिहाय विविध विषयांचे गुणांकन**

(टक्के)

| इयत्ता | विषय | महाराष्ट्र | अखिल भारत |
|---|---|---|---|
| तिसरी | भाषा | ६९ | ६४ |
| | गणित | ६४ | ६० |
| सहावी | भाषा | ६२ | ५७ |
| | गणित | ५१ | ४६ |
| | आपल्या सभोवतालचे जग | ५५ | ४९ |
| नववी | भाषा | ५९ | ५४ |
| | गणित | ३८ | ३७ |
| | विज्ञान | ४२ | ४० |
| | सामाजिक शास्त्रे | ४३ | ४० |

*आधार:* शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार

१०.१६.२ इयत्ता तिसरी, सहावी व नववीसाठी जिल्ह्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन टक्केवारीच्या आधारावर केले असून त्यानुसार जिल्ह्यांचे उदित (७५ टक्केवारीपेक्षा जास्त टक्के), उदय (५० आणि ७५ दरम्यान टक्केवारी), उन्नत (२५ आणि ५० दरम्यान टक्केवारी), उद्भव (२५ पेक्षा कमी टक्केवारी) या चार गटांमध्ये वर्गीकरण केले आहे. इयत्तानिहाय प्रत्येक गटातील कामगिरीनुसार जिल्ह्यांची संख्या तक्ता १०.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१० इयत्तानिहाय प्रत्येक गटातील कामगिरीनुसार जिल्ह्यांची संख्या**

| इयत्ता | उदित (उत्कृष्ट कामगिरी करणारे जिल्हे) | उदय (प्रगतिशील जिल्हे) | उन्नत (विकसित होत असलेले जिल्हे) | उद्भव (उदयोन्मुख जिल्हे) |
|---|---|---|---|---|
| तिसरी | ६ | ८ | १३ | ९ |
| सहावी | ६ | १० | ८ | १२ |
| नववी | ८ | ९ | ९ | १० |

*आधार:* शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार

## उच्च व तंत्र शिक्षण

१०.१७ अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी, २०२३-२४ नुसार राज्यात ५७ राज्य विद्यापीठे (२८ सार्वजनिक, २८ खाजगी व एक मुक्त), २१ अभिमत विद्यापीठे (११ खाजगी व सात शासकीय व तीन अनुदानित), आठ राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था आणि एक केंद्रीय विद्यापीठ आहे. अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणीवर आधारित राज्यातील उच्च शिक्षणाची सांख्यिकी तक्ता १०.११ मध्ये दिली आहे. सन २०२४-२५ च्या अभ्यासक्रमाकरिता संस्थांची संख्या, त्यांची प्रवेश क्षमता आणि प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या परिशिष्ट १०.३ ते परिशिष्ट १०.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.११ अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवालावर आधारित राज्यातील उच्च शिक्षणाची सांख्यिकी**

(दि. ३० सप्टेंबर रोजी)

| तपशील | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|
| विद्यापीठे (संख्या) | ७८ | ८७ |
| महाविद्यालये (संख्या) | ५,७२५ | ५,५७९ |
| स्वायत्त संस्था (संख्या) | २,१८२ | २,४२६ |
| उच्च शिक्षणातील पटसंख्या | | |
| अ) सर्व संस्था (लाखात) | ४६.२१ | ४५.३१ |
| ब) विद्यार्थिनींची टक्केवारी | ४५.३६ | ४६.८६ |
| विद्यापीठातील व इतर संस्थांतील पटसंख्या | | |
| अ) सर्व संस्था (लाखात) | ९.०८ | ९.०३ |
| ब) विद्यार्थिनींची टक्केवारी | ४१.३७ | ४२.१७ |
| एकूण पटसंख्या प्रमाण (१८ ते २३ वर्ष) | | |
| अ) सर्व प्रवर्ग | ३७.१६ | ३६.८६ |
| ब) अनुसूचित जाती | ३८.३४ | ३६.९४ |
| क) अनुसूचित जमाती | १४.१९ | १४.४५ |
| स्त्री पुरुष समानता निर्देशांक (१८ ते २३ वर्ष) | | |
| अ) सर्व प्रवर्ग | ०.८३ | ०.८८ |
| ब) अनुसूचित जाती | ०.९० | ०.९८ |
| क) अनुसूचित जमाती | ०.८२ | ०.९० |
| शिक्षकांची संख्या (लाख) | १.७४ | १.६३ |
| विद्यार्थी-शिक्षक प्रमाण | २७ | २८ |

*आधार* : अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी २०२३-२४, भारत सरकार

## प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान

१०.१८ प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पी. एम. - उषा) राज्यात सन २०१३ पासून राबविण्यात येत आहे. अधिक कार्यक्षमता, पारदर्शकता, उत्तरदायित्व व प्रतिसादात्मकता यासह उच्च शिक्षणात उपलब्धता, समानता आणि गुणवत्ता यांची उच्चतर पातळी गाठणे हा या अभियानाचा उद्देश आहे. सन २०२५-२६ मध्ये नोव्हेंबर पर्यंत विद्यापीठे, महाविद्यालये व संस्थांना विविध घटकांतर्गत एकूण ₹ ६१४.२५ कोटी खर्च झाला आहे.

१०.१९ **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना:** आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी (वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹ आठ लाख) राज्यात राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा तपशील तक्ता १०.१२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१२ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा तपशील**

| शैक्षणिक प्रकार | वर्ष | लाभार्थी संख्या | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| उच्च शिक्षण (५९६ अभ्यासक्रम) | २०२२-२३ | १,५९,२८१ | १३२.१० |
| | २०२३-२४ | १,६३,३०१ | १५०.३८ |
| | २०२४-२५ | १,९२,३१४ | १९४.१६ |
| तंत्र शिक्षण (२८२ अभ्यासक्रम)+ | २०२२-२३ | २,३८,१९२ | ९०९.७२ |
| | २०२३-२४ | २,३३,२७० | ८९५.११ |
| | २०२४-२५ | २,७९,४४५ | १,४९९.७८ |
| वैद्यकिय शिक्षण व संशोधन (८ अभ्यासक्रम) + | २०२२-२३ | २१,९३९ | २४१.८० |
| | २०२३-२४ | २४,९५१ | ३०२.१० |
| | २०२४-२५ | १३,५९८ | १७०.८६ |
| कृषि (१९ अभ्यासक्रम) | २०२२-२३ | २४,५०० | ३३.२५ |
| | २०२३-२४ | २४,४१० | ३५.०० |
| | २०२४-२५ | २७,०४१ | ४५.०० |
| पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय (६ अभ्यासक्रम) | २०२२-२३ | ४३० | १.१७ |
| | २०२३-२४ | ४१९ | १.१३ |
| | २०२४-२५ | ४३० | १.३१ |

+ डिसेंबर पर्यंत

*आधार*: १) उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
२) उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन
३) वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, महाराष्ट्र शासन
४) महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषद
५) महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

## क्रीडा शिक्षण

१०.२० खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि क्रीडापटूंचे नैपुण्य विकसित करण्यासाठी राज्य शासनाने पुणे येथे शिवछत्रपती क्रीडापीठ स्थापन केले आहे. या क्रीडापीठाच्या अखत्यारीत आठ क्रीडा प्रबोधिनी स्थापन केल्या असून १६ क्रीडा प्रकारात प्रशिक्षण दिले जाते. सन २०२५-२६ मध्ये या क्रीडा प्रबोधिनींमध्ये एकूण ४९२ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत. आतापर्यंत प्रबोधिनीतील ३० विद्यार्थ्यांना राज्य शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त झाला आहे. क्रीडा प्रबोधिनीतील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या पदकांची संख्या तक्ता १०.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१३ क्रीडा प्रबोधिनीतील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या पदकांची संख्या**

| वर्ष | एकूण प्रशिक्षणार्थी | पदक | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आंतरराष्ट्रीय स्तर | | | | राष्ट्रीय स्तर | | | | राज्य स्तर | | | |
| | | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण |
| २०२३-२४ | ४७२ | ६ | ० | १ | ७ | ५८ | ३३ | ३१ | १२२ | ११३ | ६८ | ५८ | २३९ |
| २०२४-२५ | ६०९ | १ | ३ | ० | ४ | ११ | २२ | १८ | ५१ | १६३ | ९८ | ८९ | ३५० |
| २०२५-२६+ | ४९२ | १ | २ | ० | ३ | ४ | ६ | १७ | २७ | ५४ | ३३ | ४४ | १३१ |

*आधार*: क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

+ डिसेंबर पर्यंत

# सार्वजनिक आरोग्य

१०.२१ सार्वजनिक आरोग्य सर्व व्यक्तींचे कल्याण आणि त्यांचे एकूण जीवनमान सुधारण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. शाश्वत विकास ध्येय क्रमांक ३ 'सर्व वयोगटांतील नागरिकांचे आरोग्यदायी जीवन सुनिश्चित करणे व सर्वांच्या कल्याणास प्रोत्साहन देणे' या अंतर्गत निश्चित करण्यात आलेली उद्दिष्टये साध्य करण्यासाठी राज्य कटिबद्ध आहे. प्रत्येक व्यक्तीपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचेल याची सुनिश्चिती करण्यासाठी सुधारित पायाभूत सुविधा, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून राज्य आरोग्य व्यवस्थेचे सक्षमीकरण करत आहे. सर्वांना सुलभ आणि किफायतशीर आरोग्यसेवेची सुनिश्चिती करण्याकरिता शासन विविध आरोग्य विषयक योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी करीत आहे.

# सार्वजनिक आरोग्य - पायाभूत सुविधा

१०.२२ सर्वसमावेशक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी राज्यात त्रिस्तरीय पायाभूत आरोग्य सुविधा आहेत. उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामूहिक आरोग्य केंद्रे यांचा प्राथमिक स्तरामध्ये समावेश होतो. द्वितीय स्तरामध्ये उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा समावेश होतो तर तृतीय स्तरामध्ये वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न असलेली सुसज्ज रुग्णालये व सुपर स्पेशालिटी रुग्णालयांचा समावेश होतो.

१०.२२.१ उपकेंद्र स्तरावर आरोग्य सुविधा देण्याबरोबरच माता व बाल आरोग्य निगा, कुटुंब कल्याण, पोषण, लसीकरण, अतिसार आणि संसर्गजन्य आजार नियंत्रण याबाबत समुपदेशन केले जाते. प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग, सहा खाटांचा आंतररुग्ण विभाग, आपत्कालीन सेवा, शस्त्रक्रिया, प्रयोगशाळा व औषधे या सुविधा उपलब्ध असून कुटुंबनियोजन सेवा व उपकेंद्राद्वारे संदर्भित केलेल्या रुग्णांवर उपचार केले जातात. सामूहिक आरोग्य केंद्रे, उप जिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयांमध्ये अहोरात्र आरोग्य सेवा उपलब्ध आहेत. राज्य शासनाच्या आरोग्य सुविधा तक्ता १०.१४ मध्ये, राज्यातील उपलब्ध सार्वजनिक वैद्यकीय सुविधांची तपशीलवार मालिका परिशिष्ट १०.७ आणि जिल्हानिहाय उपलब्ध वैद्यकीय सुविधांची माहिती परिशिष्ट १०.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१४ राज्य शासनाच्या आरोग्य सुविधा**

(दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी)

| संस्थेचा प्रकार | संख्या |
|---|---|
| उपकेंद्र | १०,७८८ |
| प्राथमिक आरोग्य केंद्र | १,९५३ |
| सामूहिक आरोग्य केंद्र | ३७४ |
| प्राथमिक आरोग्य पथक | १२१ |
| फिरती वैद्यकीय पथक | ६६ |
| उपजिल्हा रुग्णालय | १०४ |
| जिल्हा रुग्णालय | २० |
| वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालय | २७ |
| वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न प्राथमिक आरोग्य केंद्र | ५ |
| सामान्य रुग्णालय | ८ |
| स्त्री रुग्णालय | २३ |
| मनोरुग्णालय | ४ |
| कुष्ठरोग रुग्णालय | २ |
| क्षयरोग रुग्णालय | ५ |
| विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी रुग्णालय) | २ |

*आधार* : आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

१०.२३ राज्यातील ॲलोपॅथी वैद्यकीय पदवी धारकांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांचेकडे नोंदणी करून दर पाच वर्षांनी परवाना नूतनीकरण करावे लागते. डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण २,१३,५५१ (१,०४,१३९ पदव्युत्तरसह) ॲलोपॅथीक डॉक्टरांनी नोंदणी केली होती.

१०.२३.१ शासनाने आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिध्द आणि होमिओपॅथी (आयुष) उपचार पद्धतीचा समावेश मुख्य आरोग्यसेवा यंत्रणेत केला आहे. माहे डिसेंबर २०२५ अखेर १,०५,९६६ आयुर्वेदिक डॉक्टर (१०,०२५ पदव्युत्तरसह) आणि ९,४६२ युनानी डॉक्टर (२१८ पदव्युत्तरसह) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन यांचेकडे नोंदणीकृत आहेत तर ९०,००६ होमिओपॅथी डॉक्टर (३,७६१ पदव्युत्तरसह) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीकडे नोंदणीकृत आहेत. एकूण नोंदणीकृत ॲलोपॅथिक डॉक्टर पैकी ८० टक्के उपलब्धता गृहीत धरून व एकूण आयुष डॉक्टर (२,०५,४३४) यांची उपलब्धता विचारात घेता राज्यातील डॉक्टर लोकसंख्या प्रमाण १:३४३ एवढे आहे.

## प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान

१०.२४ प्राथमिक, द्वितिय आणि तृतीय स्तरावर सुसज्ज सार्वजनिक आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी राज्यात ऑक्टोबर २०२१ पासून 'प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान' राबविण्यात येत आहे. सार्वत्रिक सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी तळागाळातील सार्वजनिक आरोग्य संस्थांचे बळकटीकरण, माहिती तंत्रज्ञान सहाय्यित रोग देखरेख यंत्रणांचा विस्तार आणि उभारणी करणे तसेच इतर संसर्गजन्य रोगांवरील संशोधन कार्याला प्रोत्साहन देणे ही या अभियानाची मुख्य उद्दिष्टे आहेत. या अभियानाअंतर्गत डिसेंबर २०२५ अखेर उपलब्ध / मंजूर एकात्मिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा व अत्यावश्यक सेवा इस्पितळ ब्लॉक्स खालीलप्रमाणे आहे :

- एकात्मिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा २५ जिल्हा रुग्णालये, आठ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व तीन सामान्य रूग्णालयांमध्ये
- १०० खाटांचे अत्यावश्यक सेवा इस्पितळ ब्लॉक पाच जिल्हा रूग्णालयांमध्ये
- ५० खाटांचे अत्यावश्यक सेवा इस्पितळ ब्लॉक १२ जिल्हा रूग्णालये, १६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व दोन सामान्य रूग्णालयांमध्ये

## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना

१०.२५ नागरी क्षेत्रातील मुख्यत: गरीब आणि झोपडपट्टीवासियांना आरोग्य सेवा पुरविणे तसेच विविध रोगांच्या प्रादुर्भावाचे निरिक्षण आणि नियंत्रण करण्याच्या उद्देशाने 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' राज्यात एकूण ६४५ ठिकाणी स्थापित करण्यात आला आहे. या दवाखान्याद्वारे बाह्य-रुग्ण तपासणी, मोफत औषधोपचार, मोफत प्रयोगशाळा चाचण्या, टेलीकन्सल्टेशन, गर्भवती महिलांची तपासणी इत्यादी आरोग्य सेवा पुरविल्या जातात .

१०.२५.१ माहे जानेवारी २०२६ पर्यंत १०२.७७ लाख बाह्य-रुग्ण सेवा, १३.६८ लाख मोफत प्रयोगशाळा तपासणी व ४.९६ लाख गर्भवती महिलांची तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमांवर सन २०२४-२५ मध्ये ₹ १९१.११ कोटी खर्च झाला तर सन २०२५-२६ मध्ये जानेवारी पर्यंत ₹ २८.९२ कोटी खर्च झाला.

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

१०.२६ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान आणि राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांचा समावेश असलेले राष्ट्रीय आरोग्य अभियान सन २०१३ मध्ये सुरु करण्यात आले आहे. ग्रामीण व नागरी भागातील आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करणे, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांचे नियंत्रण करणे आणि प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके व किशोरवयीन मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम राबविणे हे या अभियानाचे प्रमुख घटक आहेत.

१०.२६.१ **आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यक्रम:** सध्या अस्तित्वात असलेल्या उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रे यांचे आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये रूपांतर करुन सर्वसमावेशक पायाभूत आरोग्य सेवा पुरविणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. सध्याच्या आरोग्यवर्धिनी केंद्राचे नामकरण 'आयुष्मान आरोग्य मंदिर' असे करण्यात आले आहे. डिसेंबर २०२५ अखेर राज्यात एकूण १२,९३३ आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यरत आहेत.

१०.२६.२ **राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान:** ग्रामीण जनतेस विशेषत: महिला, मुले व वंचित घटकांना किफायतशीर, सुलभ व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करुन देऊन त्यांच्या आरोग्य विषयक गरजा भागविण्यासाठी राज्यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत डिसेंबर २०२५ अखेर पुरविल्या जाणा-या काही सुविधा खालीलप्रमाणे आहेत

- विशेषज्ञांसह एकूण १६,८०६ वैद्यकीय अधिकारी आणि ६४,८०४ आशा स्वयंसेविका यांचेमार्फत ग्रामीण जनतेला आरोग्य सेवा
- टेलिमेडीसीन सुविधा २३ जिल्हा रुग्णालये, ३९ उपजिल्हा रुग्णालये/सामूहिक आरोग्य केंद्रे व सहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये उपलब्ध
- सिकल सेल रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये सिकल सेल रोग नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी
- राज्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेसाठी आरोग्यविषयक सुविधा पुरविण्याकरिता स्वयंसेवी संस्था/रुग्ण कल्याण समिती या बाह्यस्थ संस्थांमार्फत २० फिरती वैद्यकीय पथके कार्यरत

१०.२६.२.१ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत राज्यामध्ये सन २०२४-२५ मध्ये ₹ २,६८३.४६ कोटी तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर ₹ २,२१२.१६ कोटी खर्च झाला. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत भौतिक प्रगती तक्ता १०.१५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१५ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत भौतिक प्रगती**

(संख्या)

| घटक | तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|---|
| आयुष | उपचार घेतलेले रुग्ण | | | |
| | बाह्यरुग्ण विभाग | ४७,७७,८४३ | ५५,३४,९०३ | ५६,६४,७५८ |
| | आंतररुग्ण विभाग | १,२१,४७१ | ९७,२४४ | ७८,४६५ |
| फिरते वैद्यकीय पथक | उपचार घेतलेले रुग्ण | १,९३,३५३ | १९,९१,४०१ | २१,५६,०७६ |
| | प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके आणि किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम | २४,७०३ | ५८,०१२ | ९०,६१२ |
| | प्रयोगशाळा तपासणी | ७५,७३६ | १,३७,१७३ | ४,३४,५८० |
| | भेटी दिलेली गावे | ४,४०८ | २५,७४० | ५७,९१८ |
| टेलिमेडीसीन | तज्ञ सेवा प्राप्त संदर्भित रुग्ण | १४,३२० | ३०,२४९ | २१,६४० |
| | आरोग्यवर्धिनी टेलिकन्सल्टेशन | २१,१०,९६१ | २८,५१,५५५ | १९,८५,५०९ |
| | इसंजिवनी ओपीडी | १,०२,०३९ | ३,४६,६०७ | ६५,५६९ |
| सिकल सेल आजार नियंत्रण कार्यक्रम | एकूण तपासण्या | १२,००,००७ | १८,३०,४५७ | २६,६८,७७९ |
| | बाधित रुग्ण | १६,०४३ | २,७६२ | ३,६४७ |
| | वाहक | १,२०,३४७ | २३,१०६ | ३२,९९४ |
| उपशमन निगा (पॅलिॲटिव्ह केअर) | उपचार घेतलेले रुग्ण | १,०४,०८७ | १,४८,६१५ | ६२,२६१ |
| संदर्भ सेवा वाहतूक सुविधा | गर्भवती महिलांकरिता | | | |
| | रुग्णालयीन प्रसुती | १२,००,००७ | ७,३४,६४५ | ५,४१,२८८ |
| | निवासस्थान ते रुग्णालय | २,९९,१५७ | ३,२१,९९९ | २,३३,००१ |
| | रुग्णालय ते रुग्णालय | १,४४,५८२ | १,५०,४७६ | १,१३,९३३ |
| | रुग्णालय ते निवासस्थान | ३,७५,५८३ | ३,९६,७८३ | २,८२,७२१ |
| | आजारी नवजात शिशुंकरिता | | | |
| | निवासस्थान ते रुग्णालय | ४१,२८८ | ४५,३०७ | ३३,४०० |
| | रुग्णालय ते रुग्णालय | ४२,४६५ | १९,९६७ | २३,०४१ |
| | रुग्णालय ते निवासस्थान | ६६,७०६ | ७३,९४२ | - |
| सार्वजनिक खाजगी भागिदारी | | | | |
| अ) आरोग्य सल्ला संपर्क केंद्र | एकूण कॉल्स | ९,२१,७३५ | ४,४७,९६८ | २,८४,१४७ |
| ब) वैद्यकीय व दंत शिबिरे | आयोजित शिबिरे | ६३ | २९ | ३५ |
| | उपचार केलेले रुग्ण | १२,८५,२०५ | ३४,३८३ | ८८,६९२ |
| | केलेल्या शस्त्रक्रिया | ४,३०७ | १,५४२ | २,५२३ |
| क) माहेरघर | लाभार्थी माता | २,७२९ | २,९६५ | १,९१९ |

*आधार :* आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन ई. ई. जी. इलेक्ट्रो इन्सेफेलो ग्राम + डिसेंबर पर्यंत

१०.२६.३ **राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान:** नागरी भागातील जनतेच्या प्रामुख्याने ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असणारी शहरे/नगरे यातील झोपडपट्ट्या व इतर सीमांतीक घटकांच्या आरोग्य विषयक गरजा भागविण्यासाठी राज्यात राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातील ९८ शहरांचा राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत समावेश आहे. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत डिसेंबर २०२५ पर्यंत राज्यामध्ये एकूण ८१४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व १० फिरती वैद्यकीय पथके कार्यरत असून १४,३८५ आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत. सुमारे १०,००० लोकसंख्या असलेल्या व प्राथमिक आरोग्य केंद्रे नसलेल्या झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी १० महानगरपालिका क्षेत्रात 'आपला दवाखाना' नावाने १०० चिकित्सालये मंजूर केली आहेत. या अभियानाअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ ३५२.०६ कोटी खर्च झाले तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर ₹ ३२४.४६ कोटी खर्च झाले.

१०.२६.४ **प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके आणि किशोरवयीन मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम:** बालकांच्या आरोग्याचा दर्जा उंचावून व लोकसंख्या स्थिर ठेवून त्याद्वारे माता मृत्यूप्रमाण, अर्भक मृत्यूदर व एकूण जननदर कमी करण्यासाठी प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके आणि किशोरवयीन मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येत आहे. काही आरोग्य निर्देशक तक्ता १०.१६ मध्ये दिले आहेत तर त्यांची मालिका परिशिष्ट १०.९ मध्ये दिली आहे.




आलेख १०.१ : निवडक आरोग्यविषयक निर्देशक




आलेख १०.२ : माता मृत्यूप्रमाण

**तक्ता १०.१६ निवडक आरोग्य निर्देशक**

| निर्देशक | २०२१ | २०२२ | २०२३ |
|---|---|---|---|
| जन्मदर | १४.७ | १४.७ | १४.० |
| मृत्यूदर | ७.४ | ६.६ | ६.१ |
| अर्भक मृत्यूदर | १५.० | १३.० | १४.० |
| नवजात शिशु मृत्यूदर | ११.० | ११.० | ११.० |
| पाच वर्षा खालील बालकांचा मृत्यूदर | १६.० | १६.० | १६.० |
| एकुण जननदर | १.५ | १.५ | १.४ |
| | (२०१९-२१) | (२०२०-२२) | (२०२१-२३) |
| माता मृत्यूप्रमाण | ३८.० | ३६.० | ३६.० |

*आधार :* नमुना नोंदणी पद्धती, भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

१०.२६.४.१ या कार्यक्रमांतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ ३८३.१६ कोटी तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर २०२५ पर्यंत ₹ १८६.८६ कोटी खर्च झाला. प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके आणि किशोरवयीन मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम या अंतर्गत काही योजनांचा तपशिल तक्ता १०.१७ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१७ प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके आणि किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम अंतर्गत योजनांचा तपशील**

| योजना | उद्दिष्ट | तपशील | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|---|
| जननी सुरक्षा योजना | संस्थात्मक प्रसुतीस चालना देण्यासाठी आणि दारिद्रय रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील बालमृत्यू व माता मृत्यू कमी करणे | लाभार्थी संख्या (लाख) | ३.७८ | २.१९ |
| | | खर्च (₹ कोटी) | ४४.१३ | २८.०८ |
| प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान | गर्भवती महिलांना प्रत्येक महिन्याच्या ठराविक दिवशी खात्रीशीर आणि गुणवत्तापूर्ण प्रसुतीपूर्व सेवा पुरविणे.आरोग्य सुविधा केंद्रात नियमित प्रसुतीपूर्व सेवांव्यतिरिक्त इतर सेवा मोफत देणे | प्रसुतीपूर्व सेवा मिळालेल्या गर्भवती महिलांची संख्या (लाख) | २.९७ | २.२७ |
| | | दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीत पहिल्यांदा प्रसुतीपूर्व सेवा मिळालेल्या गर्भवती महिलांची संख्या (लाख) | १.१९ | ०.९२ |
| | | अति जोखमीच्या गरोदरपणाचे निदान झालेल्या महिलांची संख्या (लाख) | ०.६६ | ०.५० |
| | | खर्च (₹ कोटी) | २.७३ | २.१९ |

**तक्ता १०.१७ प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके आणि किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम अंतर्गत योजनांचा तपशील**

| योजना | उद्दिष्ट | तपशील | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|---|
| नवसंजीवनी योजना | फिरत्या वैदयकिय पथकांच्या भेटी, दाई बैठका,मान्सूनपुर्व प्रतिबंधात्मक उपाय यासारख्या उपक्रमांदवारे आदिवासी लोकांच्या आरोग्याची स्थिती सुधारून आदिवासी भागातील माता मृत्यू आणि अर्भक मृत्यू कमी करणे | कार्यरत पथके (संख्या) | २६१ | २६५ |
| | | तपासणी केलेल्या गर्भवती महिला (संख्या) | १,११,२३८ | ८३,८७४ |
| | | तपासणी केलेली बालके (लाख) | ११.१४ | ८.६४ |
| | | खर्च (₹ कोटी) | १२.११ | ५.०७ |
| मातृत्व अनुदान योजना | आदिवासी भागातील गर्भवती महिलांची प्रसुतीपूर्व नोंदणी, नियमित आरोग्य तपासणी व आवश्यक औषधे यासारख्या आरोग्यसेवा पुरविणे | लाभार्थी संख्या (संख्या) | ९३,६८५ | ७२,०९७ |
| | | खर्च (₹ कोटी) | ३.८१ | १.३८ |

*आधार*: राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.२६.४.२ **सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम:** क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ, हिमोफिलस इन्फ्लुएंझा टाईप बी, काविळ-बी, गोवर, जपानी मेंदूज्वर, रोटा वायरस, इत्यादी आजारांपासून गर्भवती महिला, अर्भके व विविध वयोगटातील बालके यांना सुरक्षित ठेवण्यासाठी लसीकरण सेवा पुरविण्याच्या उद्देशाने राज्यामध्ये सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत लाभार्थ्यांची संख्या तक्ता १०.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१८ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत लाभार्थ्यांची संख्या**

(लाख)

| लस | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| बीसीजी | १९.०४ | १९.५२ | १९.१९ | १९.९१ | १९.१९ | ९.४७ |
| पोलिओ ० | १९.०४ | १६.४२ | १९.१९ | १७.४४ | १९.१९ | ८.२२ |
| पोलिओ १ | १९.०४ | १८.९० | १९.१९ | १९.१५ | १९.१९ | ९.०१ |
| पोलिओ २ | १९.०४ | १८.४३ | १९.१९ | १८.७५ | १९.१९ | ८.७५ |
| पोलिओ ३ | १९.०४ | १८.८३ | १९.१९ | १९.१८ | १९.१९ | ९.०५ |
| कावीळ बी ० | १९.०४ | ११.०९ | १३.७९ | १२.४५ | ६.१५ | ५.६१ |
| गोवर व रुबेला | १९.०४ | १८.८९ | १९.१९ | १९.४६ | १९.१९ | ९.३९ |
| एफ आय पी व्ही १ | १९.०४ | १८.७५ | १९.१९ | १९.०९ | १९.१९ | ८.९६ |
| एफ आय पी व्ही २ | १९.०४ | १८.६८ | १९.१९ | १९.१० | १९.१९ | ९.०२ |
| एफ आय पी व्ही ३ | १९.०४ | १८.३४ | १९.१९ | १९.२५ | १९.१९ | ९.३१ |
| डीपीटी (बुस्टर) | १८.७४ | १८.४७ | १८.८९ | १८.९५ | १८.८९ | ९.०९ |
| पोलिओ (बुस्टर) | १८.७४ | १८.५२ | १८.८९ | १९.०५ | १८.८९ | ९.१३ |
| डीपीटी (५ वर्ष) | २१.७५ | १६.३१ | २१.३६ | १६.२२ | २१.३६ | ७.७४ |
| टी. डी (१० वर्ष) | २२.१३ | १६.१५ | २२.३० | १६.४७ | २२.३० | ८.१४ |
| टी. डी (१६ वर्ष) | २५.३० | १५.०८ | २४.१२ | १५.५२ | २४.१२ | ७.६६ |
| टी. डी (गरोदर माता) | २१.१६ | १९.४५ | २१.३२ | २०.८० | २१.३२ | १०.३६ |
| पेंटाव्हॅलेंट ३ | १९.०४ | १८.८५ | १९.१९ | १९.१८ | १९.१९ | ९.०५ |
| रोटा व्हायरस ३ | १९.०४ | १८.७२ | १९.१९ | १९.१५ | १९.१९ | ८.९० |
| पीसीव्ही १ ला डोस | १९.०४ | १८.७० | १९.१९ | १९.१६ | १९.१९ | ८.९६ |
| पीसीव्ही २ रा डोस | १९.०४ | १८.६६ | १९.१९ | १९.१८ | १९.१९ | ९.१० |
| पीसीव्ही (बुस्टर) | १९.०४ | १८.५१ | १९.१९ | १९.३१ | १९.१९ | ९.३४ |
| पेंटाव्हॅलेंट १ | १९.०४ | १८.९७ | १९.१९ | १९.१४ | १९.१९ | १४.२९ |
| पेंटाव्हॅलेंट २ | १९.०४ | १८.५४ | १९.१९ | १८.७४ | १९.१९ | १३.७८ |
| रोटा व्हायरस १ | १९.०४ | १८.८९ | १९.१९ | १९.१० | १९.१९ | १३.९१ |
| रोटा व्हायरस २ | १९.०४ | १८.४६ | १९.१९ | १८.७२ | १९.१९ | १३.४० |
| जे. ई. १ | ४.४० | ३.९६ | ४.४० | ४.५६ | ७.०१ | ३.२२ |
| जे. ई. २ | ४.३४ | ३.८२ | ६.८९ | ४.३७ | ६.८९ | ४.३१ |

बीसीजी - बॅसिलस कॅल्मेट गुएरिन ओपीव्ही - ओरल पोलिओ वॅक्सीन + डिसेंबर पर्यंत

एफआयपीवी - फ्रॅक्शनल डोस ऑफ इनॲक्टीवेटेड पोलिओ वॅक्सीन टिडी - टिटॅनस डिप्थीरिया

जे. ई. - जॅपनीज एन्सेफॅलिटीस पीसीवी - पेनुमकॉकॅल कॉन्जुगेट वॅक्सीन डीपिटी - डिप्थीरिया पेर्ट्युसिस टिटॅनस

*आधार:* राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन

१०.२६.४.३ **पल्स पोलिओ कार्यक्रम:** पाच वर्षाखालील मुलांना पूर्वी कितीही वेळा पोलिओ डोस दिला असला तरी राष्ट्रीय लसीकरणाच्या दिवशी पोलिओ डोस देण्यात येतो. पल्स पोलिओ कार्यक्रमाचा तपशील तक्ता १०.१९ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१९ पल्स पोलिओ कार्यक्रमाचा तपशील**

| वर्ष | लसीकरण केलेल्या मुलांची संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०२३-२४ | १११.५२ | ११.६८ |
| २०२४-२५ | १६.९० | २.४० |
| २०२५-२६+ | २२.०१ | १.३५ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.२६.४.४ **राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम:** जन्माच्या वेळी उद्भवणारे दोष, मुलांचे आजार, न्युनता व अपंगत्व तसेच विलंबाने होणारी वाढ या चार दोषांचे लवकर निदान होऊन त्यावर उपचार करणे हा राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचा उद्देश आहे. अंगणवाडीच्या माध्यमातून सहा वर्षापर्यंतच्या शाळापूर्व बालकांची वर्षातून दोनदा नियमितपणे आरोग्य तपासणी करणे हा या कार्यक्रमाचा अविभाज्य घटक आहे. त्याचबरोबर ६-१८ वर्षे वयोगटातील शासकीय तसेच शासन अनुदानित शाळेत शिकणाऱ्या मुलांची देखील नियमित आरोग्य तपासणी केली जाते. या तपासणीत आजाराचे निदान झालेल्या बालकांना संदर्भसेवा व शस्त्रक्रियेसह वैद्यकीय उपचार मोफत मिळतात. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाची माहिती तक्ता १०.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२० राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची माहिती**

(संख्या)

| वर्ष | शाळा/अंगणवाडी | संख्या | विद्यार्थी (लाख) | | | केलेल्या शस्त्रक्रिया | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आरोग्य तपासणी केलेले | उपचार केलेले | संदर्भित केलेले | हृदया संबंधीत | इतर |
| २०२३-२४ | शाळा | ८४,४०२ | १२२.०६ | १०.४३ | ५.०९ | ३,३३४ | ३२,८०१ |
| | अंगणवाडी - टप्पा १# | १,०१,२८३ | ६४.२६ | ४.५० | १.५९ | | |
| | - टप्पा २## | १,०७,९६९ | ६७.४० | ४.७७ | २.२९ | | |
| २०२४-२५ | शाळा | ८५,४०४ | १२२.६५ | ११.९० | ६.५९ | ३,१५८ | ३९,५६० |
| | अंगणवाडी - टप्पा १# | १,१०,१७१ | ६७.६१ | ५.२० | २.१४ | | |
| | - टप्पा २## | १,१०,०७६ | ६७.७५ | ६.२२ | ३.२६ | | |
| २०२५-२६+ | शाळा | ५७,५६१ | ८५.२३ | ८.१९ | ४.६८ | १,६९५ | २१,०५० |
| | अंगणवाडी - टप्पा १# | ९१,२८५ | ५३.७८ | ४.४१ | २.११ | | |
| | - टप्पा २## | ४६,७१२ | २६.७० | २.७४ | १.८३ | | |

# एप्रिल ते सप्टेंबर ## ऑक्टोबर ते मार्च + डिसेंबर पर्यंत

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन

१०.२६.४.५ **कुटुंब कल्याण कार्यक्रम:** लोकसंख्या स्थिर ठेवणे हे कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. नसबंदी आणि दोन अपत्यांच्या जन्मात अंतर राखणे हे या कार्यक्रमाचे महत्वाचे घटक आहेत. मुखावाटे घ्यावयाच्या गोळ्या, तांबी, प्रसुतीपश्चात तांबी, पारंपरिक संतति प्रतिबंधक साधने याबरोबरच काही नवीन गर्भनिरोधनाच्या पद्धतींचा म्हणजेच गर्भनिरोधक इंजेक्शन, आठवडी सेंटक्रोमॅन गोळ्या, इत्यादी पद्धतींच्या प्रचार व प्रसारावर भर दिला जातो. कुटुंब कल्याण कार्यक्रमाची माहिती तक्ता १०.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२१ कुटुंब कल्याण कार्यक्रमाची माहिती**

('०००)

| वर्ष | नसबंदी | | | तांबी | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | | लक्ष्य | साध्य | |
| | | पुरुष | स्त्री | | | |
| २०२३-२४ | ५१० | ६.२० | २९६.७० | ४९० | ४४३.५० | ३१.५५ |
| २०२४-२५ | ५१० | ७.१० | २७९.६० | ४९० | ४४६.७० | २०.५९ |
| २०२५-२६+ | ५१० | ४.४० | १८७.१० | ४९० | ३२८.७० | १०.५४ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.२६.४.६ **किशोरवयीन मुला-मुलींसाठी आरोग्य कार्यक्रम:** राज्याच्या एकूण लोकसंख्येत किशोरवयीन मुला-मुलींचे (वय १०-१९ वर्षे) प्रमाण २३ टक्के पेक्षा जास्त आहे. किशोरवयीन मुला-मुलींचे प्रजनन आरोग्य सुधारणे, समुपदेशन पुरविणे व जागृती निर्माण करणे आणि सुरळीत व सुरक्षित गर्भपात संबंधीत सुविधा पुरवणे हा किशोरवयीन आरोग्य कार्यक्रमाचा उद्देश आहे. किशोरवयीन आरोग्य कार्यक्रमाची माहिती तक्ता १०.२२ मध्ये दिली आहे.

## तक्ता १०.२२ किशोरवयीन आरोग्य कार्यक्रमाची माहिती

(संख्या)

| वर्ष | एकुण नोंदणी झालेले किशोरवयीन मुले व मुली | आरोग्य चिकित्सा देण्यात आलेले किशोरवयीन मुले व मुली | समुपदेशन सेवा देण्यात आलेले किशोरवयीन मुले व मुली |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | १४,३१,५८४ | १३,३६,३७५ | १६,४६,१६९ |
| २०२४-२५ | १६,५४,७२३ | १५,३८,९७० | १९,०३,५३० |
| २०२५-२६+ | १४,६१,३२९ | १३,४६,६९५ | १५,७०,०९८ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.२६.५ **राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम:** किटकजन्य रोगांमुळे होणारे मृत्यू कमी करण्यासाठी व या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. किटकजन्य रोगनिहाय नोंदणी झालेले रुग्ण व मृत्यू संख्या तक्ता १०.२३ मध्ये दिली आहे.

## तक्ता १०.२३ किटकजन्य रोगनिहाय नोंदणी झालेले रुग्ण व मृत्यू संख्या

(संख्या)

| किटकजन्य रोग | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू |
| हिवताप | १६,७६० | २३ | २०,६४० | २६ | २०,७३५ | २७ |
| हत्तीरोग | ४२० | ० | २८८ | ० | ४०१ | ० |
| डेंग्यू | १९,६११ | ५५ | १९,३२४ | ३५ | १३,००० | २१ |
| मेंदुज्वर | ३ | ० | ५ | २ | ७ | १ |
| चिकुनगुनिया | १,९४३ | ० | ६,११६ | ० | २,८४७ | ० |
| एईएस/चंडीपुरा | १ | १ | ६ | ३ | १५ | ६ |

*आधार* : आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन एईएस : ॲक्यूट एन्सेफॅलिटीस सिंड्रोम + डिसेंबर पर्यंत

१०.२६.६ **राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रम:** वर्तन व जीवनशैली मध्ये बदल करुन असंसर्गजन्य रोगांवर नियंत्रण ठेवण्याकरिता, लवकर निदान व व्यवस्थापन करण्याकरिता तसेच निदान, उपचार आणि नियंत्रणासाठी आरोग्य सुविधांची क्षमता वाढविण्याकरिता राज्यात राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रम हा सन २०१० पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमावर सन २०२४-२५ मध्ये ₹ १६.७० कोटी खर्च झाला आणि सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ १२.३१ कोटी खर्च झाला. राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रमाचा तपशील तक्ता १०.२४ मध्ये दिला आहे.

## तक्ता १०.२४ राष्ट्रीय कार्यक्रम-असंसर्गजन्य रोगाचा तपशील

(संख्या)

| वर्ष | पुष्टी झालेल्या रुग्णांची संख्या | | | | | उपचार घेत असलेल्या रुग्णांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हृदय व रक्तवाहिन्या | पक्षाघात | क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी रोग | क्रॉनिक किडनी रोग | इतर कर्करोग | हृदय व रक्तवाहिन्या | पक्षाघात | क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी रोग | क्रॉनिक किडनी रोग | इतर कर्करोग |
| २०२३-२४ | २०,००२ | ७,१९८ | १८,१०१ | ६,८३९ | ८,०४१ | १९,६९० | ७,०१२ | १७,३१५ | ६,५५७ | ७,८१२ |
| २०२४-२५ | ३१,००९ | १३,२४७ | २९,३९३ | १०,२३८ | ८,०३१ | २७,९५४ | १०,१२९ | २८,४३१ | ९,९३२ | ७,९२१ |
| २०२५-२६+ | १९,८९९ | ७,६८३ | १७,३७८ | ५,०८२ | ३,२२० | १९,१५७ | ७,३९९ | १६,८४९ | ४,७३४ | ३,१६१ |

*आधार*: आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.२६ .७ **राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम:** या कार्यक्रमांतर्गत सर्व (खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील) क्षयरोग रुग्णांना मोफत क्षयरोग निदान, उपचार व उपचारात्मक पाठपुरावा या सेवा दिल्या जातात. निक्षय पोषण योजने अंतर्गत क्षयरोगाचे निदान झालेल्या, सूचित केलेल्या व क्षयरोगावरील उपचार घेत असलेल्या सर्व रुग्णांना १ नोव्हेंबर २०२४ पासून प्रति महिना ₹ १,००० भत्ता दिला जातो. या कार्यक्रमा अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ २६५.०६ कोटी आणि सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ १८७.५० कोटी खर्च झाला. राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमाची माहिती तक्ता १०.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२५ राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमाची माहिती**

(संख्या)

| तपशील | २०२३ | २०२४ | २०२५ |
|---|---|---|---|
| दर लाख लोकसंख्येमागे संशयित क्षयरोग रुग्णांची संख्या | २,०२७ | २,७०४ | ३,४७५ |
| रोग मुक्ततेचे प्रमाण (टक्के) | ८७ | ८९ | ८८ |

*आधार* : आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

१०.२६.८ **राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम:** मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया करणे आणि शाळेत जाणाऱ्या मुलांची तपासणी करून दृष्टीदोष आढळणाऱ्या विद्यार्थ्यांना चष्मा पुरविणे या उद्देशाने राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०२४-२५ मध्ये एकूण १०.७२ लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून ₹ ९.९० कोटी खर्च झाले तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबरपर्यंत एकूण ७.७५ लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या व ₹ ८.४१ कोटी खर्च झाला.

१०.२६.९ **राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम:** कुष्ठरोगाचे निर्मूलन करणे (सर्व जिल्ह्यांमध्ये दर १०,००० लोकसंख्येमागे एक पेक्षाही कमी कुष्ठरोगी आढळणे), कुष्ठरोग बाधित रुग्णाचे अपंगत्व प्रतिबंध व वैद्यकीय पुनर्वसन तसेच कुष्ठरोगाबाबतची कलंक भावना कमी करणे ही राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाची उद्दिष्टे आहेत. सन २०२४-२५ मध्ये नव्याने कुष्ठरोगाची लागण झालेल्या व उपचार पुर्ण केलेल्या कुष्ठरुग्णांची संख्या अनुक्रमे १९,९२७ व १९,८६२ होती आणि कुष्ठरोगाचे प्रमाण प्रति १० हजार लोकसंख्येमागे १.१३ होते. सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत नव्याने कुष्ठरोगाची लागण झालेल्या व कुष्ठरोगग्रस्त रुग्णांची संख्या अनुक्रमे १५,७५९ व १६,५९३ होती आणि कुष्ठरोगाचे प्रमाण प्रति १० हजार लोकसंख्येमागे १.२६ होते.

**आलेख १०.३ : कुष्ठरोगाचा प्रसार दर**




१०.२६.१० **राष्ट्रीय वृद्धापकाळ आरोग्य शुश्रुषा कार्यक्रम:** राष्ट्रीय वृध्दापकाळ आरोग्य शुश्रुषा कार्यक्रम हा जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्राद्वारे वृद्धांना प्रोत्साहनात्मक, प्रतिबंधात्मक, उपचारात्मक आणि पुनर्वसन सेवा प्रदान करण्याकरिता राबविण्यात येत आहे. सन २०२४-२५ मध्ये ₹ १.४५ कोटी खर्च झाला आणि सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ ०.२० कोटी खर्च झाला. राष्ट्रीय वृध्दापकाळ आरोग्य शुश्रुषा कार्यक्रमाची माहिती तक्ता १०.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२६ राष्ट्रीय वृध्दापकाळ आरोग्य शुश्रुषा कार्यक्रमाची माहिती**

(संख्या)

| पुरविण्यात आलेल्या सेवा | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| ओपीडी मधील वृध्द रुग्णांची संख्या | ४,२२,९१२ | ४७,९४,५०६ | १४,१०,०४७ |
| वॉर्डमध्ये दाखल रुग्णांची संख्या | २४,७७८ | २,८६,१६७ | ६१,७७४ |
| पुनर्वसन सेवा देण्यात आलेल्या रुग्णांची संख्या | १३,३९५ | १,१०,२८१ | ४७,२४४ |
| वृद्धांवर केलेल्या प्रयोगशाळा चाचण्यांची संख्या | १,८८,९७४ | २३,२१,३३९ | ६,२५,९६३ |
| गृहभेटी द्वारे काळजी घेण्यात आलेल्या वृद्धांची संख्या | ४,१३७ | ५३,६९६ | १६,४०८ |

*आधार*: आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.२६.११ **राष्ट्रीय कर्णबधिरता प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम:** रोग किंवा इजा झाल्यामुळे ऐकू न येणे या समस्येपासून वाचणे, कर्णबधिरता लवकर ओळखणे, निदान करणे व उपचार करणे आणि बहिरेपणाने पीडित असलेल्या व्यक्तींचे वैद्यकीय पुनर्वसन करणे याकरिता राष्ट्रीय कर्णबधिरता प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम सन २०१० पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमावर सन २०२४-२५ मध्ये ₹ ३.१६ लाख खर्च झाला आणि सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ ०.५७ लाख खर्च झाला. राष्ट्रीय कर्णबधिरता प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमाची माहिती तक्ता १०.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२७ राष्ट्रीय कर्णबधिरता प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमाची माहिती**

(संख्या)

| तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| बहिरेपणाची तपासणी केलेल्या व्यक्ती | ६८,४३० | ४७,७५४ | ६२,७३७ |
| केलेल्या शस्त्रक्रिया | २,२७२ | ३,१९५ | ३,५७६ |
| बसवलेली श्रवणयंत्रे | २,५७२ | २,१३५ | १,०९४ |
| पुनर्वसनासाठी शिफारस केलेल्या व्यक्ती | ५,९८३ | ८,७६३ | ७,४६७ |

*आधार*: आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.२६.१२ **राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम:** राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम हा राज्यामध्ये सर्वांसाठी, विशेषत: समाजातील सर्वात असुरक्षित आणि वंचित घटकांसाठी, किमान मानसिक आरोग्यसेवेची उपलब्धता व सुलभता सुनिश्चित करणे या मुख्य उद्देशाने राबविला जात आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमा अंतर्गत पायाभूत सुविधा आणि मुख्य कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत:

- एकूण ५,६९५ क्षमता असलेली चार प्रादेशिक मनोरुग्णालये
- पुनर्वसनासाठी १३ डे केअर केंद्रे
- स्मृतीभ्रंश बाधित रुग्णांसाठी ३४ क्लिनिक
- २४ तास टेली मानस सेवेद्वारे मानसिक आरोग्य सेवा (ऑक्टोबर २०२२ पासून ते डिसेंबर २०२५ पर्यंत २,५८,५७० हून अधिक कॉल्स प्राप्त)
- १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये प्रेरणा प्रकल्प ( शेतकरी समुपदेशन आरोग्य सेवा कार्यक्रम ) द्वारे मानसिक आरोग्य सेवा पुरवली जाते. नैराश्यग्रस्त लोकांचा शोध घेवून त्यांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्याकरीता आशा कार्यकर्त्या गावामध्ये सर्वेक्षण करतात.

१०.२६.१२.१ या कार्यक्रमा अंर्तगत सन २०२४-२५ मध्ये ₹ ७.१२ कोटी खर्च झाला तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ ०.५४ कोटी खर्च झाला. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमाची माहिती तक्ता १०.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२८ राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमाची माहिती**

(संख्या)

| तपशील | २०२३-२४ | | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम | प्रादेशिक मनोरुग्णालय | जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम | प्रादेशिक मनोरुग्णालय | जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम | प्रादेशिक मनोरुग्णालय |
| बाह्यरुग्ण संख्या | ९,१८,८७२ | १,८०,५४३ | १६,८८,२६१ | १,८८,०८० | १२,२९,८०० | १,३४,२०८ |
| आंतररुग्ण संख्या | १६,७४२ | ३१,४०६ | २३,३०८ | २७,००६ | २०,३०६ | ३१,३४३ |

*आधार*: आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

## राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम

१०.२६.१३ जनजागृती मोहीम राबवून मार्गदर्शन करणे आणि विशिष्ट गटातील लोकांचे प्रबोधन व देखरेख यावर राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाचा भर आहे. यामध्ये लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालयातील रुग्णांची व प्रसुतीपूर्व तपासणीसाठी आलेल्या गर्भवती महिलांची रक्ताच्या नमुन्याच्या तपासणीद्वारे संनिरिक्षण केले जाते. सन २०२४-२५ मध्ये ₹ १६४.९४ कोटी खर्च झाला तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ १२५.३२ कोटी खर्च झाला. एचआयव्ही/एड्सग्रस्त रुग्णांची माहिती तक्ता १०.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२९ एचआयव्ही/एड्स रुग्णांची माहिती**

| तपशील | २०२३ | २०२४ | २०२५ |
|---|---|---|---|
| जोखीम गटातील तपासणी केलेल्या व्यक्ती ('०००) | ७,४७० | ६,७१८ | ५,४९१ |
| तीन चाचणी पद्धतीवरुन एचआयव्ही बाधित ('०००) | १८ | १३ | १४ |
| एचआयव्ही बाधितांचे प्रमाण (टक्के)@ | ०.२४ | ०.२१ | ०.२५ |
| एड्स रुग्ण (संख्या) | १०,६९० | १०,७३० | १०,८३० |
| एड्सने मृत्यू (संख्या) | १,९५० | १,८३० | १,६८० |

@ जोखीम गटातील तपासणी केलेल्या व्यक्तींशी

*आधार* : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था

१०.२६.१४ **महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा:** महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेद्वारे रुग्णांना नजीकच्या रुग्णालयामध्ये पुढील उपचारार्थ दाखल करण्यासाठी प्राथमिक आरोग्यसेवेसह जीवरक्षक प्रणालीने सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात येते. ही मोफत आपत्कालीन सेवा १०८ या दूरध्वनी क्रमांकावर अहोरात्र उपलब्ध आहे. एकूण कार्यरत ९३७ रुग्णवाहिकांपैकी २३३ रुग्णवाहिका अत्याधुनिक जीवरक्षक प्रणालीने आणि ७०४ रुग्णवाहिका प्राथमिक जीवरक्षक प्रणालीने सुसज्ज आहेत. आपत्कालीन स्थितीत सेवा पुरविलेल्या रुग्णांची संख्या तक्ता १०.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३० आपत्कालीन स्थितीत सेवा पुरविलेल्या रुग्णांची संख्या**

(संख्या)

| आपत्कालीन स्थिती | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| रुग्णवाहिके मध्ये झालेली प्रसुती | १,१३५ | ९९५ | ६०४ |
| गरोदरपणा | १,३५,५२२ | १,००,८९३ | ७१,८४७ |
| वैद्यकीय | ९,०६,१७४ | ७,७६,२७८ | ४,८०,८२८ |
| अपघात (वाहनांमुळे) | २५,८२७ | १७,७२१ | ९,१०८ |
| प्राणघातक हल्ला | ६,७६५ | ९,२८६ | ८,७१६ |
| भाजणे | २,१८५ | १,८९५ | १,४१४ |
| हृदयविकार | २४,०९२ | १८,९०७ | १५,३१६ |
| पडून अपघात | ५,४५४ | ९६१ | १४२ |
| विषप्राशन/ विषबाधा | २३,४२१ | २३,६५६ | १७,९८७ |
| मोठी दुर्घटना | २,८२२ | २,४१३ | १,३९७ |
| बहुविध आघात | ९७,०३९ | १,०८,७५३ | ७६,३५० |
| लाइटनिंग/इलेक्ट्रोक्युशन | ३१६ | ३१३ | २५१ |
| आत्महत्या/स्वहानी | ६७५ | ७८० | ५५८ |
| इतर | २८,७०१ | २७,६५३ | १८,०५९ |
| **एकूण** | **१२,६०,१२८** | **१०,९०,५०४** | **७,०२,५७७** |

*आधार :* आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

## एकात्मिक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना

१०.२७ राज्यामध्ये १ जुलै २०२४ पासून एकात्मिक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही विस्तारीत स्वरूपातील योजना राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे अंगीकृत रूग्णालयांमार्फत निवडक आजारांच्या उपचारांसाठी रोख रक्कम विरहीत दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली जाते. एकात्मिक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यातील सर्व कुटुंबांसाठी लागू असून प्रति कुटुंब प्रति वर्ष ₹ पाच लाख आरोग्य संरक्षण दिले जाते व या योजनेअंतर्गत एकूण १,३५६ शस्त्रक्रिया/ उपचारांचा समावेश आहे. माहे डिसेंबर २०२५ पर्यंत राज्यात ३.७६ कोटी आयुष्मान कार्ड वितरीत करण्यात आली आहेत. दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी योजनेअंतर्गत एकूण २,४८३ अंगीकृत रुग्णालयांचा समावेश असून, त्यापैकी ६७९ शासकीय रुग्णालये आणि १,८०४ खासगी रुग्णालये आहेत.

१०.२७.१ सन २०२४-२५ मध्ये ६.५२ लाख लाभार्थ्यांवर ₹ २,८०३.९७ कोटी इतका खर्च झाला असून सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत ६.५० लाख लाभार्थ्यांवर ₹ २,७९७.४३ कोटी खर्च झाला.

## राज्य रक्त संक्रमण परिषद

१०.२८ सुरक्षित रक्ताचा व रक्तघटकांचा पुरेसा पुरवठा वाजवी दरात करणे हे राज्य रक्त संक्रमण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे. सन २००० पासून सिकलसेल ग्रस्त बालके तसेच थॅलेसीमिया व हिमोफिलियाने पीडित रूग्णांना मोफत रक्तपुरवठा केला जातो. रक्त संकलनाबाबतची माहिती तक्ता १०.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३१ रक्त संकलनाबाबतची माहिती**

| वर्ष | रक्त संकलन केंद्रे (संख्या) | एकूण संकलन (लाख युनिट) | पैकी, स्वेच्छेने रक्तदान केलेले (लाख युनिट) | कार्ड वितरीत केलेल्या रुग्णांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सिकलसेल | थॅलेसीमिया | हिमोफिलिया |
| २०२३ | ३७५ | २०.४४ | २०.३६ | ९०९ | ५६६ | १४८ |
| २०२४ | ३९३ | २१.५९ | २१.४९ | १,५३९ | १,१११ | ३१५ |
| २०२५ | ४०९ | २३.६९ | २३.५९ | ८९२ | ५१४ | १९९ |

*आधार* : राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र शासन

## साथरोग नियंत्रण कार्यक्रम

१०.२९ कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार, संसर्गजन्य काविळ, विषमज्वर, इत्यादी जलजन्य आजार यांचा उद्रेक व अधूनमधून होणारा उद्भव यांचे संनियंत्रण साथरोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत केले जाते. या आजारांमुळे होणारी लागण व मृत्यू कमी करण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. जलजन्य आजारांमुळे लागण झालेल्या व्यक्तींची व मृत्यूंची संख्या तक्ता १०.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३२ जलजन्य आजारांमुळे लागण झालेल्या व्यक्तींची व मृत्यूंची संख्या**

(संख्या)

| आजार | २०२३ | | २०२४ | | २०२५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लागण झालेले | मृत्यू | लागण झालेले | मृत्यू | लागण झालेले | मृत्यू |
| कॉलरा | २२ | ०१ | १,०२८ | ०४ | २०३ | ३ |
| गॅस्ट्रो | २७,७५७ | ०० | २७,५८२ | ०४ | २३,६८८ | ० |
| अतिसार | ३,२५,९२७ | ०० | ३,६५,१९२ | ०६ | ३,६८,७८७ | ० |
| संसर्गजन्य काविळ | २,४०३ | ०० | ३,१६६ | ०१ | ३,४५९ | ३ |
| विषमज्वर | ३८,६१४ | ०० | ४५,७०७ | ०० | ४३,०४७ | ० |
| लेप्टोस्पायरोसिस | १,४८४ | ०८ | ९५३ | २६ | ८५८ | २१ |

*आधार* : आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## मानवी अवयव प्रत्यारोपण

१०.३० मानवी उपचारांकरिता मानवी अवयव काढणे, जतन करणे, प्रत्यारोपण करणे तसेच मानवी अवयवांचे व्यापारीकरण रोखणे याबाबत नियमन करण्याकरिता भारत सरकारने 'मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम, १९९४' लागू केला आहे. राज्यात डिसेंबर २०२५ अखेर २८० अवयव प्रत्यारोपण केंद्रांची नोंदणी करण्यात आली असून त्यापैकी १३३ केंद्रे विशिष्ट अवयव प्रत्यारोपणासाठी व १४७ केंद्रे बहुविध अवयवांच्या प्रत्यारोपणासाठी आहेत. तसेच ४९ केंद्रांची नोंदणी प्रत्यारोपणाशिवाय अवयव काढण्याचे केंद्र म्हणून झाली आहे. या व्यतिरिक्त नेत्रदान, नेत्रपेढी व बुब्बुळ प्रत्यारोपणासाठी एकूण ३०० केंद्रे आहेत. अवयव प्रत्यारोपणांची संख्या तक्ता १०.३३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३३ अवयव प्रत्यारोपणांची संख्या**

(संख्या)

| अवयव | २०२३ | २०२४ | २०२५ |
|---|---|---|---|
| जीवित | | | |
| अ) मूत्रपिंड | ५९३ | ६६१ | १,२३९ |
| ब) यकृत | २९५ | २९१ | ४७२ |
| मृतवत | | | |
| अ) मूत्रपिंड | ६९ | ८९ | २२३ |
| ब) यकृत | ५८ | ५७ | १३१ |
| क) हृदय | १० | ०७ | २३ |
| ड) फुफ्फुस | १० | १८ | २२ |
| ई) बुब्बुळ | १,७५९ | २,७३६ | २,८०५ |

*आधार*: आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

# महिला व बाल विकास

१०.३१ महिला सक्षमीकरण आणि बालकांचा विकास हे समतोल, प्रगत आणि सक्षम समाज घडविण्यासाठी अत्यावक्षक आहेत. महिलांना सन्मान, सुरक्षा, संधी आणि आपली पूर्ण क्षमता साकारण्याचे स्वातंत्र्य मिळायला हवे. संगोपन, निगा, संरक्षण, शिक्षण यासह बालकांच्या शारीरिक, भावनिक, बौद्धिक व सामाजिक वाढीस सहाय्य करणारे पोषक वातावरण मिळणे आवश्यक आहे.

## महिला विकास

१०.३२ महिलांना त्यांच्या पूर्ण क्षमता ओळखण्यातील अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने शासन सातत्याने पूरक धोरणे व योजनांद्वारे लिंग-प्रतिसादात्मक नियोजनाचे बळकटीकरण करत आहे.

१०.३३ **लिंगभाव अर्थसंकल्प:** लिंगभावाच्या दृष्टीकोनातून आर्थिक धोरणांचे मुल्यमापन करणे आणि लिंगभाव समानता या तत्वाला अर्थसंकल्पामध्ये अंतर्भूत करणे हे लिंगभाव अर्थसंकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिला, पुरुष आणि इतर लिंगभाव असलेल्या व्यक्ती यांच्यामध्ये उत्पन्न, आरोग्य, शिक्षण, पोषण व राहणीमानात असलेली तफावत दूर करण्याचे हे एक साधन आहे. सन २०२४-२५ (सु.अं.) आणि सन २०२५-२६ (अं.अं.) च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार एकूण राज्याच्या अर्थसंकल्पात लिंगभाव अर्थसंकल्पाचा हिस्सा अनुक्रमे ८.६ टक्के आणि ८.५ टक्के आहे.

आलेख १०.४ : राज्याचा लिंगभाव अर्थसंकल्प




१०.३४ **मिशन शक्ती:** महिलांची सुरक्षा, संरक्षण व सक्षमीकरण याकरिता 'मिशन शक्ती' हा भारत सरकारचा एकात्मिक महिला सक्षमीकरण कार्यक्रम सन २०२२-२३ पासुन राज्यात राबविण्यात येत आहे. महिलांची सुरक्षा व संरक्षण याकरिता 'संबल' आणि महिला सक्षमीकरणाकरिता 'सामर्थ्य' या मिशन शक्तीच्या दोन उपयोजना आहेत. या उपयोजना ६७ सखी वन स्टॉप सेंटर्स, २१ शक्ती सदन आणि ९५ सखी निवास यांच्यामार्फत राबविण्यात येत आहेत. 'संबल' उपयोजनेची राज्यातील प्रगती तक्ता १०.३४ मध्ये आणि 'सामर्थ्य' उपयोजनेची राज्यातील प्रगती तक्ता १०.३५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३४ 'संबल' उपयोजनेची राज्यातील प्रगती**

| योजनेचे घटक | उद्दिष्ट्ये | लाभार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| सखी वन स्टॉप सेंटर | • हिंसाचाराने पीडित महिलांना एकाच छताखाली आधार व सहाय्य पुरविणे<br>• महिलांना वैद्यकीय, कायदेशीर, मनोवैज्ञानिक व समुपदेशन सहाय्यासह आपत्कालीन व सर्वसाधारण स्थितीत तातडीने मदत करणे | ७,०५७ | ६,२९५ |
| महिला हेल्पलाइन | • संकटात सापडलेल्या महिलांना २४x७ तातडीची मदत उपलब्ध करून देणे | २,६८६ | २,६९८ |
| बेटी बचाओ बेटी पढाओ | • मुलींच्या जीविताची, सुरक्षिततेची व शिक्षणाची खात्री देणे आणि लिंग निदानास प्रतिबंध करणे | - | - |

*आधार* : महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

**तक्ता १०.३५ 'सामर्थ्य' उपयोजनेची राज्यातील प्रगती**

| योजनेचे घटक | उद्दिष्ट्ये | लाभार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| शक्तिसदन | • जन जागृती निर्माण करून महिला व बालकांची लैंगिक शोषणासाठी केली जाणारी तस्करी रोखणे<br>• अडचणीच्या परिस्थितीतील महिलांना अन्न, वस्त्र, निवारा, देखभाल, शिक्षण, समुपदेशनासह वैद्यकीय उपचार, कायदे विषयक मदत, मार्गदर्शन व व्यवसाय प्रशिक्षण यासारख्या प्राथमिक गरजा पुरवून त्यांचे पुनर्वसन करणे | १,६७२ | १,३८७ |
| सखी निवास | • नोकरी करणाऱ्या महिलांना त्यांच्या मुलांसाठी डे-केअर सुविधेसह सुरक्षित आणि सोयीस्कर निवासस्थान उपलब्ध करून देणे | ४,४११ | ४,७४५ |

*आधार* : महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.३४.१ **महिला सक्षमीकरण केंद्र:** महिला सक्षमीकरण केंद्राचे उद्दीष्ट असे सक्षम वातावरण निर्माण करणे आहे ज्यामध्ये महिला विविध केंद्रीय, राज्य आणि जिल्हास्तरीय योजना आणि कार्यक्रमांचे एकत्रीकरण करून त्यांच्या पूर्ण क्षमतेची जाणीव करू शकतील. आरोग्यसेवा, दर्जेदार शिक्षण, व्यवसाय आस्थापना, व्यावसायिक समुपदेशन, आर्थिक नियोजन, उद्योजकता, मागास आणि प्रगत संबंध, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा, सामाजिक सुरक्षा आणि डिजिटल साक्षरता यासारख्या क्षेत्रांमध्ये संस्थात्मक मार्गदर्शनाच्या माध्यमातून राज्यभरातील महिलांचे सक्षमीकरण आणि विकास करणे हा यामागचा उद्देश आहे.

१०.३५ राज्यात विविध महिला केंद्रीत योजना राबविण्यात येत आहेत. निवडक महिला केंद्रीत योजनांची प्रगती तक्ता १०.३६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३६ निवडक महिला केंद्रीत योजनांची प्रगती**

| योजना | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | खर्च (₹ कोटी) | लाभार्थ्यांची संख्या | खर्च (₹ कोटी) |
| शासकीय महिला वसतिगृहे/ संरक्षण गृहे/राज्य गृहे | ५,९५१ | १५.३८ | ४,८५० | १२.२४ |
| आधार गृह | १,६६३ | ०.०० | ९१६ | ०.१३ |
| महिला समुपदेशन केंद्रे | १८,३२२ | १.३२ | १३,७०० | २.१५ |
| मनोधैर्य योजना | ४२२ | १९.४८ | २,६४३ | १४.९९ |
| कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण | ९,७०४ | २४.६३ | ७,५८७ | २२.३१ |
| मुख्यमंत्री - माझी लाडकी बहिण योजना (लाभार्थी संख्या कोटीत) | २.४७ | ३२,४७० | २.३८ | २९,५७० |

*आधार* : महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.३६ **निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग:** अठराव्या लोकसभेत (२०२४-२०२९) राज्यातील ४८ विद्यमान खासदारांपैकी सात महिला खासदार आहेत तर राज्यसभेत महाराष्ट्रातील १९ विद्यमान खासदारांपैकी पाच महिला खासदार आहेत.

१०.३६.१ राज्यातील पंधराव्या विधान सभेत (२०२४-२०२९), विद्यमान २८६ सदस्यांपैकी २२ महिला सदस्य आहेत तर राज्याच्या विधान परिषदेत १ जानेवारी २०२६ रोजी ५५ विद्यमान सदस्यांपैकी सहा महिला सदस्य आहेत.

१०.३६.२ 'बॉम्बे ग्रामपंचायती आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (सुधारणा) अधिनियम, २०११' नुसार पंचायत राज संस्थांमध्ये एकुण जागांपैकी पन्नास टक्के जागा महिलांसाठी राखीव आहेत. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांसाठीच्या राखीव जागा तक्ता १०.३७ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता १०.३७ राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांसाठी राखीव जागांची माहिती**

(१ जानेवारी २०२६ रोजी)

| स्थानिक स्वराज्य संस्था | संख्या | एकूण जागा | महिलांसाठी राखीव जागा |
|---|---|---|---|
| महानगरपालिका | २९ | २,८६९ | १,४४२ |
| नगरपरिषद | २४७ | ६,१४५ | ३,०७२ |
| नगरपंचायत | १४७ | २,४९९ | १,२५० |
| जिल्हा परिषद# | ३४ | ८३६ | ४२२ |
| पंचायत समिती# | ३५१ | १,६७२ | ८३६ |
| ग्रामपंचायत | २७,८२९ | २,४०,२५० | १,३३,६०४ |
| **एकूण** | | **२,५४,२७१** | **१,४०,६२६** |

# दि. १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत १४ जिल्हा परिषदा व १४० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकीतील एकूण जागा व महिलांसाठी आरक्षित जागा दिलेल्या आहेत

टिप : २० जिल्हा परिषदा व त्यातील पंचायत समित्यांच्या निवडणूका मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घेण्यात येतील

*आधार :* राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

१०.३६.३ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचा माहितीकोष (सार्वजनिक उपक्रम व स्थानिक स्वराज्य संस्था वगळून) नुसार दिनांक १ जुलै २०२५ रोजी एकूण ४,८७,३७३ भरलेल्या पदांपैकी २६ (अस्थायी) टक्के महिला होत्या.

१०.३७ **महिला स्वयंसहायता गट:** बचत गट ही प्रामुख्याने महिलांची एक लहान स्वयंसेवी संघटना आहे, ज्यामध्ये त्या नियमितपणे बचत करण्यासाठी, कर्ज मिळवण्यासाठी आणि परस्पर सहकार्यातून आपली सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी एकत्र येतात. स्वयंसहायता गटाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:

- महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणे.
- बचत आणि आर्थिक समावेशनास प्रोत्साहन देणे.
- महिलांचा सामाजिक दर्जा सुधारणे.

१०.३७.१ राज्यात मार्च २०२५ पर्यंत, अनुसूचित व्यावसायिक बँकांमध्ये खाती असलेल्या १७,१३,२३४ बचत गटांपैकी १४,५८,७४५ बचत गट (८५ टक्के) केवळ महिलांसाठी होते.

१०.३८ **महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम):** राज्यातील स्वयंसहायता गटांमार्फत विविध महिला सक्षमीकरण योजना राबविणारी ही एक नोडल एजन्सी आहे. माविम ची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

- स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून महिलांचे एकत्रीकरण, महिलांचे क्षमतावर्धन, महिलांमध्ये आत्मविश्वास वाढविणे, उद्योजकता विकास करणे, रोजगारांच्या संधी निर्माण करणे
- महिलांना समान संधी आणि शासनामध्ये सहभाग
- स्वयंसहायता गटांना बाजारपेठ मिळवून देणे, तसेच महिलांमधील नेतृत्व गुण व प्रशासकीय क्षमता वृध्दींगत करण्यासाठी प्रशिक्षण आयोजीत करणे

१०.३८.१ माविम संलग्न महिला स्वयंसहायता गटांची माहिती तक्ता १०.३८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३८ माविम संलग्न महिला स्वयंसहायता गटांची माहिती**

(३१ डिसेंबर २०२५ रोजी)

| तपशील | ग्रामीण | नागरी | एकूण |
|---|---|---|---|
| माविम अंतर्गत गावे व शहरे (संख्या) | ९,१०७ | २५९ | ९,३६६ |
| स्वयंसहायता गटांची संख्या | ९३,०१४ | ७३,६१६ | १,६६,६३० |
| सदस्य संख्या (लाख) | १०.४६ | ७.८४ | १८.३० |
| वित्तीय संस्थेकडून प्राप्त कर्जे (आवर्ती) (₹ कोटी) | ९,०२०.९४ | ३,१५८.७७ | १२,१७९.७१ |
| अंतर्गत कर्ज (₹ कोटी) | ३,२३२.९२ | ९४७.७६ | ४,१८०.६८ |
| बचत (₹ कोटी) | १,०७७.४९ | ५१७.१३ | १,५९४.६२ |

*आधार :* महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन

१०.३८.२ **लोकसंचलित संसाधन केंद्र:** लोकसंचलित संसाधन केंद्र हा 'सोसायटी अधिनियम, १८६०' अंतर्गत नोंदणीकृत असलेला गट असून सुमारे २५ किमीच्या परिघात येणाऱ्या २० ते २५ गावांतील २५० ते ३०० स्वयंसहायता गटांचा समूह आहे. महिलांच्या उदरनिर्वाहासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, बँक जोडणी, उत्पादित वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे यांसारख्या प्राथमिक सेवा स्वयंसहायता गटांना पुरविणे हे लोकसंचलित संसाधन केंद्रांचे कार्य आहे. राज्यात डिसेंबर २०२५ अखेर राज्यात २९६ लोकसंचलित संसाधन केंद्रे कार्यरत आहेत.

१०.३८.३ **तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस:** अति गरीब व कर्जबाजारी महिलांना कर्जमुक्त करण्यासाठी तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस ही कर्जपुर्ती योजना स्वयंसहायता गटांमार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सुरुवातीपासून (सन २०१८-१९) डिसेंबर २०२५ पर्यंत, १,२५,६७४ महिलांना एकूण ₹ १७३.८५ कोटी कर्ज वितरित करण्यात आले.

१०.३८.४ **नव तेजस्विनी:** गरीब व गरजू महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंटच्या सहाय्याने नव तेजस्विनी ग्रामीण महिला विकास प्रकल्प राज्यात जानेवारी, २०२१ पासून सुरु करण्यात आला आहे. या प्रकल्पात मुख्यत्वे बाजाराभिमुख उद्योगांना प्रोत्साहन, सहाय्यक सेवा उपलब्ध करणे व संस्थात्मक विकास आणि प्रकल्प व्यवस्थापन यावर लक्ष केंद्रीत केले आहे. या प्रकल्पाद्वारे महिलांच्या नेतृत्वाखालील शेतकरी उत्पादक संस्था, सूक्ष्म उद्योजक, लोकसंचलित संसाधन केंद्रामार्फत राबविले जाणारे शेती उपक्रम, बिगरशेती उपक्रम आणि शेतीशी संलग्न उपक्रमांना सहाय्य करण्यात येते. सन २०२४-२५ मध्ये १.९० लाख महिलांना ₹ १,१९८.८९ कोटी रुपयांचे आणि सन २०२५-२६ मध्ये डिसेंबरपर्यंत १.२० लाख महिलांना ₹ ८९५.३९ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले.

**नियतकालिक श्रमबल पाहणी**: राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकारने केलेल्या नियतकालिक श्रमबल पाहणी (पीएलएफएस) नुसार, महिलांसाठी (१५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील) सामान्य स्थितीनुसार बेरोजगारीचा दर शहरी भागात सन २०१७-१८ मध्ये ११.४ टक्क्यांवरून सन २०२३-२४ मध्ये ६ टक्क्यांपर्यंत आणि ग्रामीण भागात २०१७-१८ मध्ये २.८ टक्क्यांवरून १.१ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे.

**आलेख १०.५ : सामान्य स्थितीनुसार (मुख्य+दुय्यम कार्यस्थिती) १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील महिलांचा बेरोजगारी दर**



१०.३९ **महाराष्ट्र राज्य महिला आयोग:** महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही एक वैधानिक संस्था असून ती पीडित महिलांनी दाखल केलेल्या तक्रारींवर नियमितपणे सुनावण्या/ सार्वजनिक जन सुनावण्या घेते, मोफत कायदे विषयक सेवा व समुपदेशन पुरविते. स्व-संरक्षण कार्यक्रम, स्त्री-पुरूष समानतेविषयी जागरुकता, कायदेविषयक साक्षरता, सायबर गुन्हे, 'कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५', 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३' यांची अंमलबजावणी, ॲसिड हल्ल्याने पीडित महिलांचे पुनर्वसन, पाळणा घरासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे, इत्यादी महिलांशी निगडीत विविध मुद्यांवर कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम व चर्चासत्रे आयोगामार्फत आयोजित करण्यात येतात. या उपक्रमांवर सन २०२४ -२५ मध्ये ₹ ४१.३७ लाख तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबरपर्यंत ₹ १.२७ कोटी खर्च झाला. २०२४-२५ या वर्षात प्रलंबित तक्रारींसह एकूण १५,४३९ तक्रारी दाखल झाल्या होत्या, त्यापैकी १३,२६८ तक्रारींचे निराकरण करण्यात आले.

१०.४४ **महिला सुरक्षा:** महिलांवर शारीरिक किंवा मानसिकरित्या केल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष क्रूर कृत्यांना महिलांवरील अत्याचार असे संबोधले जाते. एनसीआरबी (राष्ट्रीय गुन्हे अभिलेख ब्युरो) च्या अहवालानुसार, २०२३ या वर्षात प्रति लाख महिला लोकसंख्येमागे महिलांवरील गुन्ह्यांची संख्या ७७ होती, तर २०२४ मध्ये ती ७८ (अस्थायी) होती. महिलांवरील अत्याचारांचे नोंदवलेले गुन्हे तक्ता १०.३९ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.३९ महिलांवरील अत्याचारांचे राज्यात नोंदविलेले गुन्हे**

(संख्या)

| गुन्हे शीर्ष | २०२३ | २०२४ | २०२५ |
|---|---|---|---|
| बलात्कार | ७,५२४ | ७,९४० | ८,६४३ |
| अपहरण व पळवून नेणे | ९,३६१ | ८,८८३ | १०,१५५ |
| हुंडाबळी | १७० | १३९ | १३८ |
| पती व नातेवाईकांकडून झालेली क्रूर कृत्ये | ११,२२६ | १०,५३९ | ११,५७९ |
| विनयभंग/लैंगिक अत्याचार | १७,३२८ | १७,६७१ | १८,२९४ |
| अनैतिक व्यापार | २११ | १५९ | २९७ |
| इतर | १,२०९ | ९८९ | १,२४४ |
| **एकूण** | **४७,०२९** | **४६,३२०** | **५०,३५०** |

*आधार* : विशेष पोलीस महानिरिक्षक, (महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग) यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

१०.४०.१ राज्यात महिलांच्या सुरक्षेसाठी महिला अत्याचार प्रतिबंधक सेल, भरोसा सेल, फास्ट ट्रॅक कोर्ट, १,१९,३५३ (शासकीय + खाजगी) तक्रार निवारण समित्या इ. गठित करण्यात आल्या आहेत.

## बाल विकास

१०.४१ बालकांच्या शारीरिक, भावनिक व आकलनात्मक वाढीसाठी पोषक वातावरण पुरविणे तसेच सर्व बालकांसाठी दर्जेदार शिक्षण आणि शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देणे हे शासनाचे प्राधान्यक्रम आहेत. प्रत्येक बालकाला संरिक्षत वातावरणात क्षमता विकसित करण्याची समान संधीची सुनिश्चिती करण्यासाठी 'बाल धोरण २०१४' राज्यात राबविण्यात येत आहे.

१०.४१.१ **बाल अर्थसंकल्प:** बालप्रतिसादात्मक अर्थसंकल्पाच्या माध्यमातून बालकांसाठी समतोल विकासास प्राधान्य देणाऱ्या पद्धतीने संसाधनांचे नियोजन करणे शासनास शक्य होते. सन २०२४-२५ (सु.अं.) आणि सन २०२५-२६ (अं.अं.) च्या अर्थसंकल्पिय अंदाजानुसार राज्याच्या एकूण अर्थसंकल्पात बाल अर्थसंकल्पाचा हिस्सा अनुक्रमे १२.९ आणि १३.३ टक्के आहे.

**आलेख १०.६ : राज्याचा बाल अर्थसंकल्प**




### एकात्मिक बाल विकास सेवा योजना

१०.४२ एकात्मिक बाल विकास सेवा योजना (एबावियो) चे उद्दिष्ट सहा वर्षांखालील मुलांचा सर्वांगीण विकास आणि गर्भवती व स्तनदा मातांचे आरोग्य आणि पोषण सुधारणे होय. एकूण ५५३ बालविकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या १,१०,६६४ अंगणवाड्यांमार्फत ही योजना राबविण्यात येते. एबावियो अंतर्गत पूरक पोषण, लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा, पोषण व आरोग्य शिक्षण आणि अनौपचारिक पूर्व-प्राथमिक शिक्षण यांसारख्या सेवा प्रदान केल्या जातात.

१०.४२.१ **पोषण कार्यक्रम:** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सहा वर्षाखालील बालके, गर्भवती महिला आणि स्तनदा माता यांच्या किमान पोषण गरजा भागविण्यासाठी व त्यांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी पूरक पोषण कार्यक्रम राबविला जातो. दुर्गम व संवेदनशील भागातील कुपोषण नियंत्रित करून अर्भक मृत्यू कमी करणे हे सुध्दा या योजनेचे एक उद्दिष्ट आहे. सन २०२४-२५ मध्ये ७४.२१ लाख लाभार्थ्यांवर ₹ १,५७८.०२ कोटी खर्च झाला तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबरपर्यंत ६१.२८ लाख लाभार्थ्यांवर ₹ ७४२.४७ कोटी खर्च झाला. राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांची पोषण श्रेणी निहाय टक्केवारी तक्ता १०.४० मध्ये दिली आहे.

**आलेख १०.७ : निवडक आरोग्यविषयक निर्देशक**




**तक्ता १०.४० राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांची पोषण श्रेणी निहाय टक्केवारी**

| महिना | क्षेत्र | वजन केलेली बालके (संख्या) | बालकांची टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सर्वसाधारण वजनाची | मध्यम कमी वजनाची | तीव्र कमी वजनाची |
| मार्च २०२४ | ग्रामीण | ३४,२३,६९४ | ९४.२ | ५.० | ०.९ |
| | आदिवासी | ८,११,२८९ | ८१.३ | १५.२ | ३.५ |
| | नागरी | १५,२१,४१६ | ९३.४ | ६.१ | ०.६ |
| | **एकूण** | **५७,५६,३९९** | **९१.१** | **६.७** | **१.२** |
| मार्च २०२५ | ग्रामीण | ३२,४९,३०९ | ९४.४ | ४.८ | ०.८ |
| | आदिवासी | ७,७४,५०७ | ८१.१ | १५.५ | ३.४ |
| | नागरी | १४,९०,४०६ | ९३.९ | ५.७ | ०.४ |
| | **एकूण** | **५५,१४,२२२** | **९२.४** | **६.६** | **१.१** |
| नोव्हेंबर २०२५ | ग्रामीण | ३२,९५,७९० | ९४.९ | ४.४ | ०.६ |
| | आदिवासी | ७,४४,७४० | ८१.१ | १५.६ | ३.३ |
| | नागरी | १३,८४,६१५ | ९५.२ | ४.५ | ०.३ |
| | **एकूण** | **५४,२५,१४५** | **९३.१** | **६.०** | **०.९** |

*आधार* : एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

१०.४२.२ **प्रधान मंत्री मातृवंदना योजना**: माता आणि बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी पौष्टिक आहार घेण्यास प्रोत्साहन देण्याकरिता राज्यात १ जानेवारी २०१७ पासून 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत, शासकीय रुग्णालयात नोंदणी केलेल्या गर्भवती महिलांना पहिल्या जीवित अपत्याकरिता ₹ ५,००० बँक खात्यात जमा केले जातात. सन २०२५-२६ मध्ये डिसेंबरपर्यंत १.८४ लाख लाभार्थ्यांवर ₹ ५६.३९ कोटी खर्च झाला.

१०.४२.३ **पोषण ट्रॅकर:** हे बालकांमधील खुंटलेली वाढ, कुपोषण आणि कमी वजनाचे प्रमाण दर्शविणारे आणि पोषण सेवा वितरणाचे शेवटच्या टप्प्यापर्यंत ट्रॅकिंग करणारे मोबाईल-आधारित ॲप्लिकेशन आहे. अतितीव्र कुपोषित, मध्यम तीव्र कुपोषित आणि वाढ खुंटलेल्या बालकांचा तपशील तक्ता १०.४१ मध्ये दिला आहे.

**तक्ता क्र. १०.४१ अतितीव्र कुपोषित, मध्यम तीव्र कुपोषित आणि वाढ खुंटलेल्या बालकांचा तपशील**

(टक्के)

| महिना | उंची व वजन मोजले गेलेली सक्रिय बालके (संख्या) | अतितीव्र कुपोषित | मध्यम तीव्र कुपोषित | अतितीव्र खुंटलेली वाढ | मध्यम तीव्र खुंटलेली वाढ |
|---|---|---|---|---|---|
| मार्च २०२५ | ४८,१०,३०२ | ०.६ | ३.१ | २३.१ | २०.८ |
| नोव्हेंबर २०२५ | ४४,९९,३५८ | ०.७ | २.७ | १४.४ | १८.० |

*आधार* : एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

१०.४२.४ **ग्राम बाल विकास केंद्र:** कुपोषणास आळा घालण्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा कार्यक्रमा अंतर्गत गाव/अंगणवाडी स्तरावर ग्राम बाल विकास केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. अतितीव्र कुपोषित बालकांना या केंद्रामध्ये कुपोषण निर्मूलनासाठी खास तयार केलेल्या उर्जायुक्त पौष्टीक आहारासह वैद्यकीय सल्ला दिला जातो.

१०.४२.५ **पोषण अभियान:** एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत पोषण अभियानाची सर्व जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानाची मुख्य उद्दिष्टे (i) कुपोषण सहा टक्क्यांनी कमी करणे, (ii) अर्भक, किशोरवयीन मुली व स्त्रियांमधील रक्तक्षयाचे प्रमाण नऊ टक्क्यांनी कमी करणे आणि (iii) जन्माच्या वेळी कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण सहा टक्क्यांनी कमी करणे ही आहेत. सन २०२५-२६ मध्ये डिसेंबरपर्यंत या अभियानावर ₹ ५२.३३ कोटी खर्च झाला.

१०.४३ **राज्य बाल हक्क संरक्षण आयोग:** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग हा बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५ या कायद्यान्वये स्थापित आयोग आहे. या आयोगामध्ये सदर अधिनियमाच्या तरतूदीनुसार बाल हक्क भंग संबंधित तक्रारीच्या संदर्भात अर्धन्यायिक स्वरूपाचे कामकाज पार पाडले जाते. तसेच बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ चे कलम १०९ अन्वये, पोक्सो ॲक्ट २०१२ चे कलम ४४ अन्वये आणि बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम २००९ चे कलम ३१ अन्वये सदर अधिनियमांचे अंमलबजावणीवर देखरेख करण्याचे उत्तरदायित्व आयोगाकडे आहे.

१०.४४ **बालविकासाच्या योजना:** मुलींचा जन्मदर वाढिवणे, अर्भक मृत्यूदर कमी करणे, शिक्षणास प्रोत्साहन देणे व त्यांच्या आरोग्याची स्थिती सुधारणे इ. साठी राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहेत. बालविकासाच्या विविध योजनांचा तपशील तक्ता १०.४२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.४२ बालविकासाच्या विविध योजनांचा तपशील**

| योजनेचे नाव | उद्दिष्ट | लाभाचा प्रकार | वर्ष | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| माझी कन्या भाग्यश्री योजना | मुलींच्या जन्मदरात वाढ करणे, गर्भलिंग निदान चाचणी प्रतिबंध, मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन व हमी देणे, मुलींच्या आरोग्याचा दर्जा सुधारणे | आर्थिक मदत | २०२४-२५<br>२०२५-२६+ | ५,२८०<br>३९७ | १३.२०<br>१.०० |
| लेक लाडकी योजना | मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींचा मृत्यूदर कमी करणे, कुपोषण कमी करणे, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शून्यावर आणणे आणि बालविवाह रोखणे | आर्थिक मदत | २०२४-२५<br>२०२५-२६+ | १,४०,३००<br>२८,७६६ | ७०.१५<br>१४.३८ |
| बेबी केअर किट | नवजात बालकांचे बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा शासकीय रूग्णालयात प्रसुती होणाऱ्या मातांना प्रथम नवजात बालकांसाठी ₹ २,००० पर्यंतच्या बेबी केअर किट बॅग उपलब्ध करून देण्यात येतात | बेबी केअर किट बॅग्स | २०२४-२५<br>२०२५-२६+ | ६,००,६००<br>१,०२,४५२ | १२०.००<br>२०.४७ |
| किशोरवयीन मुलींसाठी योजना | आकांक्षित जिल्ह्यांमध्ये निवडक किशोरवयीन मुलींना (१४-१८ वर्षे) आरोग्य व पोषण स्थिती सुधारण्यासाठी पोषण सहाय्य देणे, लोह व फोलिक ॲसिड गोळया पुरविणे, आरोग्य तपासणी व संदर्भ सेवा, पोषण व आरोग्य शिक्षण, कौशल्य विषयक प्रशिक्षण देणे | पोषण व पोषणेतर सहाय्य | २०२४-२५<br>२०२५-२६+ | १,१०,१२५<br>१,०५,३०५ | ३४.०३<br>१५.०४ |
| भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजना | अनुसूचित क्षेत्रांमध्ये आणि अतिरिक्त आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्रात उष्मांक आणि प्रथिने यांच्या अभावामुळे निर्माण झालेले कुपोषण कमी करणे. ही योजना राज्यातील १६ जिल्ह्यातील १११ प्रकल्पातील १४,३२२ अंगणवाड्यांमार्फत राबविण्यात येते | पोषण सहाय्य:<br>i) गरोदर महिला आणि स्तनदा माता<br>ii) बालके<br>पोषण सहाय्य:<br>i) गरोदर महिला आणि स्तनदा माता<br>ii) बालके | २०२४-२५<br><br><br>२०२५-२६+ | १,२३,४६९<br>६,८०,६७६<br>१,१४,९३०<br>६,४४,९९७ | २०३.००<br><br><br>१२७.०५ |
| क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना | अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्थांमार्फत अनाथ, निराधार, गरजू व बेघर बालकांना कौटुंबिक जीवन प्रदान करणे | | २०२४-२५<br>२०२५-२६+ | ९६,०७१<br>१,४५,०९३ | २०१.४६<br>१०१.४६ |

*आधार* : एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.४४.१ **चाचा नेहरू बाल महोत्सव:** शासकीय/अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्थांमध्ये दाखल झालेल्या सर्व मुलांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्यात बंधुत्व व संघभावना निर्माण व्हावी यासाठी चाचा नेहरू बाल महोत्सव राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात व प्रादेशिक विभागात दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आयोजित करण्यात येतो. या योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ १.७६ कोटी तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबरपर्यंत ₹ २.०९ कोटी खर्च झाला.

## मिशन वात्सल्य योजना

१०.४५ बिकट परिस्थितीतील तसेच इतर असुरक्षित बालकांसाठी शासन व नागरीक यांच्या भागीदारीतून सुरक्षित वातावरण निर्मिती करणे हा मिशन वात्सल्य योजनेचा उद्देश आहे. बाल न्याय मंडळे, राज्य बाल संरक्षण संस्था, जिल्हा बाल संरक्षण संस्था, शासकीय/अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्थांची बालगृहे, निरीक्षण गृहे, अनुरक्षण गृहे, खुली निवारा गृहे, विशेष दत्तक स्रोत संस्था, बाल कल्याण समित्या इत्यादी मिशन वात्सल्य योजनेत समाविष्ट करण्यात आले आहेत. मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत लाभार्थ्यांवर झालेला घटकनिहाय खर्च तक्ता १०.४३ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.४३ मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत घटकनिहाय खर्च**

| घटक | संस्थांची संख्या | क्षमता | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|
| | | | लाभार्थी संख्या | खर्च (₹ लाख) |
| शासकीय | | | | |
| निरीक्षण गृहे | १८ | ५५० | २१३ | ५१७.८० |
| बालगृहे | ३४ | ९७५ | ४४३ | ७७६.७० |
| अनुरक्षण गृहे | ६ | ६०० | १२५ | १३२७.१२ |
| खुली निवारा गृहे | ६ | ३९१ | २०४ | १०.२० |
| दत्तक संस्था | १६ | १७७ | २१८ | ४६.९९ |
| अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्था | | | | |
| निरीक्षण गृहे | ३९ | १,९८४ | १,११३ | - |
| बाल गृहे | ३२३ | १३,५३४ | ७,५५४ | ४,४२४.२६ |
| एचआयव्ही बाल गृहे | १० | ६५५ | ३७२ | ३७.५९ |
| प्रायोजकत्व योजना | ला.ना. | ला.ना. | ३५,५२० | - |

*आधार*: महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन ला.ना. - लागू नाही + डिसेंबर पर्यंत

१०.४६ **बालकांची सुरक्षा:** बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे किंवा ज्या गुन्ह्यात बालके पीडित असतात त्यांना बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे म्हणून संबोधले जाते. बालकांवरील अत्याचारांचे राज्यातील नोंदविलेले गुन्हे तक्ता १०.४४ मध्ये दिले आहेत.

१०.४६.१ मुलांच्या सुरक्षेसाठी पोक्सो कायदा, बाल न्याय कायदा, बाल संरक्षण युनिट्सची स्थापना, बाल कल्याण समित्या, विशेष बाल पोलिस युनिट्स, बाल न्याय मंडळे, जागरूकता मोहिमा, बाल सुरक्षा शिक्षण आणि क्षमता बांधणी अशा उपाययोजना राज्यात केल्या जात आहेत.

**तक्ता १०.४४ बालकांवरील अत्याचारांचे राज्यातील नोंदविलेले गुन्हे**

(संख्या)

| गुन्हे शीर्ष | २०२३ | २०२४ | २०२५ |
|---|---|---|---|
| खून | ९० | ८४ | ७० |
| अर्भक हत्या | ९ | ११ | ६ |
| भ्रूण हत्या | ४ | ३ | ६ |
| बालकांवरील बलात्कार | ४,७०४ | ४,७५५ | ५,३३० |
| अपहरण व पळवून नेणे | १२,२५२ | १२,६७१ | १४,४०४ |
| परित्याग | १०१ | ४५ | ३३ |
| इतर | ५,३३४ | ५,१९८ | ५,३८५ |
| **एकूण** | **२२,४९४** | **२२,७६७** | **२५,२३४** |

*आधार*: विशेष पोलीस महानिरिक्षक, (महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग) यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

# रोजगार व दारिद्र्य

१०.४७ सर्व समावेशक आणि शाश्वत विकासासाठी रोजगार निर्मिती आणि दारिद्र्य निर्मूलन हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. आर्थिक वाढ असूनही बेरोजगारी व असंघटित क्षेत्रातील रोजगार आव्हाने जीवनमानावर परिणाम करत आहेत. या पार्श्वभूमीवर रोजगाराच्या संधी वाढविणे, समता आणि दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य यावर विशेष भर देण्यात येऊन उपजीविका सुधारणे व दारिद्र्य निर्मूलन करणे यासाठी शासन विविध धोरणे व कल्याणकारी योजना राबवीत आहे.

## रोजगार

१०.४८ जनगणना, आर्थिक गणना, नियतकालिक श्रमबल पाहणी, असंघटित क्षेत्रातील उपक्रमांचे वार्षिक सर्वेक्षण, नोंदणीकृत कारखान्यांकडून मिळणारे अनिवार्य अहवाल, ई-श्रम पोर्टल, रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम, इत्यादी रोजगार बेरोजगारी विषयक आकडेवारीचे प्रमुख स्त्रोत आहेत.

### रोजगाराची स्थिती

१०.४९ **जनगणनेनुसार रोजगाराची स्थिती:** जनगणना २०११ नुसार, राज्यातील एकूण कामगारांची संख्या ४.९४ कोटी होती, त्यापैकी ४.३८ कोटी मुख्य कामगार व ०.५७ कोटी सीमांतिक कामगार होते. मुख्य कामगारांमध्ये स्त्रियांचे प्रमाण ३१.५ टक्के तर सीमांतिक कामगारांमध्ये ते ५३.६ टक्के होते. देशाकरिता कामगार लोकसंख्या गुणोत्तर ३९.८ टक्के होते तर ते राज्यासाठी जास्त असून ४४.० टक्के होते. जनगणनेनुसार राज्यातील कामगारांची टक्केवारी तक्ता १०.४५ मध्ये दिली आहे. जनगणना २०११ नुसार कामगारांचे आर्थिक कार्यानुसार वर्गीकरण परिशिष्ट १०.१० मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.४५ जनगणनेनुसार राज्यातील कामगारांची टक्केवारी**

(टक्के)

| कामगारांचे वर्गीकरण | जनगणना | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
| मुख्य कामगार | | | | | |
| अ) कृषि व संलग्न कार्ये | | | | | |
| शेतकरी | ३५.५ | ३१.९ | ३०.० | २४.८ | २३.२ |
| शेतमजूर व मासेमारी | ३०.९ | २६.० | २५.९ | २०.३ | २२.९ |
| ब) बिगर कृषि व संलग्न कार्ये | | | | | |
| खाणकाम व दगडकाम | ०.३ | ०.३ | ०.३ | ०.४ | ०.२ |
| वस्तुनिर्माण | १३.१ | १२.७ | १२.१ | ११.० | १०.५ |
| बांधकाम | १.५ | २.० | २.४ | ३.४ | ४.१ |
| व्यापार | ६.७ | ६.५ | ७.८ | ७.१ | ६.४ |
| वाहतूक व साठवण, दळणवळण | ३.० | ३.० | ३.४ | ४.३ | ५.८ |
| इतर | ९.० | ८.६ | ९.५ | १३.० | १५.५ |
| सीमांतिक कामगार | @ | ९.० | ८.६ | १५.७ | ११.५ |
| एकूण कामगार | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार*: भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय, भारत सरकार

@ सीमांतिक कामगार असे वर्गीकरण नाही

१०.५० **नियतकालिक श्रमबल पाहणी नुसार रोजगाराची स्थिती:** श्रमबलाबाबत वेळोवेळी लागणारी माहिती उपलब्ध व्हावी यासाठी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने सन २०१७ पासून नियतकालिक श्रमबल पाहणी सुरु केली. या पाहणीद्वारे संकलित केलेल्या माहितीच्या आधारे श्रमशक्तीचे प्रमुख निर्देशक श्रमशक्ती सहभाग दर, कामगार लोकसंख्या प्रमाण, बेरोजगारी दर सामान्य कार्यस्थिती (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) आणि चालू साप्ताहिक कार्य स्थिती यांच्या आधारे अंदाजित केले जातात. सन २०२३-२४ चा नियतकालिक श्रमबल पाहणीसाठीचा वार्षिक अहवाल उपलब्ध आहे.

- श्रमशक्ती सहभाग दर : लोकसंख्येमधील श्रमबलातील व्यक्तींची टक्केवारी
- कामगार लोकसंख्या प्रमाण: लोकसंख्येमधील रोजगारीत व्यक्तींची टक्केवारी
- बेरोजगारी दर : श्रमबलातील बेरोजगार व्यक्तींची टक्केवारी

**आलेख १०.८ : नियतकालीक श्रमबल पाहणीनुसार राज्यात सामान्य स्थितीनुसार (मुख्य+दुय्यम कार्य स्थिती) १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील व्यक्तींसाठी श्रमशक्ती सहभाग दर, कामगार लोकसंख्या प्रमाण आणि बेरोजगारी दर - ग्रामीण**




**आलेख १०.९ : नियतकालीक श्रमबल पाहणीनुसार राज्यात सामान्य स्थितीनुसार (मुख्य+दुय्यम कार्य स्थिती) १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील व्यक्तींसाठी श्रमशक्ती सहभाग दर, कामगार लोकसंख्या प्रमाण आणि बेरोजगारी दर - शहरी**




**आलेख १०.१० : नियतकालीक श्रमबल पाहणीनुसार राज्यात काम करणाऱ्या व्यक्तींची क्षेत्रनिहाय टक्केवारी**




१०.५०.१ जनगणना २०११ आणि नियतकालिक श्रमबल पाहणी २०२३-२४ नुसार क्षेत्रनिहाय कामगारांची टक्केवारी तक्ता १०.४६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४६ जनगणना २०११ आणि नियतकालिक श्रमबल पाहणी २०२३-२४ नुसार क्षेत्रनिहाय कामगारांची टक्केवारी**

(टक्के)

| बाब | जनगणना २०११ | नियतकालिक श्रमबल पाहणी २०२३-२४ |
|---|---|---|
| कृषि व संलग्न कार्ये | ५२.१ | ४३.२ |
| खाणकाम व दगडकाम | ०.३ | ०.२ |
| वस्तुनिर्माण | ११.८ | १२.७ |
| वीज, वायू आणि पाणी पुरवठा | ०.४ | ०.७ |
| बांधकाम | ४.६ | ७.० |
| व्यापार, दुरूस्ती, वाहतूक व साठवण, दळणवळण | १३.७ | १८.१ |
| वित्तीय सेवा आणि स्थावर मालमत्ता | १.९ | २.३ |
| लोक प्रशासन आणि संरक्षण | ५.३ | १.६ |
| इतर | ९.९ | १४.२ |
| **एकूण कामगार** | **१००.०** | **१००.०** |

*आधार:* १. भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय, भारत सरकार २. नियतकालिक श्रमबल पाहणी

१०.५१ **असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण:** राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय यांचेद्वारे असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण दरवर्षी केले जाते. उत्पादन, व्यापार आणि इतर सेवा क्षेत्र (बांधकाम क्षेत्र वगळून) यामध्ये कार्यरत असलेल्या असंघटित गैरकृषी आस्थापनांच्या आर्थिक व कार्यात्मक बाबींचे मोजमाप करणे हा या सर्वेक्षणाचा मूळ उद्देश आहे. राज्यातील असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षणातील काही महत्त्वाचे निष्कर्ष तक्ता १०.४७ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.४७ राज्यातील असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षणातील काही महत्त्वाचे निष्कर्ष**

| बाब | असंघटित क्षेत्रातील उद्योग वार्षिक सर्वेक्षण २०२२-२३ | | | | असंघटित क्षेत्रातील उद्योग वार्षिक सर्वेक्षण २०२३-२४ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पादन | व्यापार | इतर सेवा | सर्व | उत्पादन | व्यापार | इतर सेवा | सर्व |
| आस्थापनांची अंदाजित संख्या (लाख) | १५.७१ | २२.३१ | २२.९६ | ६०.९७ | १५.५५ | २२.२६ | २६.६३ | ६४.४५ |
| कामगारांची अंदाजित संख्या (लाख) | २९.३९ | ४२.७४ | ४३.३९ | ११५.५१ | २९.२७ | ४३.९४ | ४८.२७ | १२१.४८ |
| प्रति नियुक्त कामगार अंदाजित वार्षिक वेतन (₹ लाख मध्ये) | १.२४ | १.१५ | १.६५ | १.४१ | १.४४ | १.४० | १.६३ | १.५२ |
| प्रति आस्थापना अंदाजित वार्षिक स्थूल मूल्यवृद्धी (लाख) | २.३८ | २.९३ | ३.७६ | ३.१० | २.५८ | ३.२८ | ३.९३ | ३.३८ |
| प्रति कामगार अंदाजित वार्षिक स्थूल मूल्यवृद्धी (लाख) | १.२७ | १.५३ | २.०१ | १.६४ | १.३७ | १.६६ | २.१८ | १.७९ |
| एकूण अंदाजित स्थूल मूल्यवृद्धी मध्ये स्थूल मूल्यवृद्धीचा हिस्सा | १९.८ | ३४.४ | ४६.० | १००.० | १८.४ | ३३.५ | ४८.२ | १००.० |
| मालकी हक्कांच्या आस्थापनांपैकी महिलांच्या मालकीच्या आस्थापनांची टक्केवारी | ५०.६ | १३.७ | १२.९ | २२.९ | ५५.३ | १६.५ | २०.६ | २७.५ |

*आधार :* वार्षिक असंघटित क्षेत्रातील उद्योग सर्वेक्षण अहवाल, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार

१०.५२ **आर्थिक गणनेनुसार रोजगाराची स्थिती:** सहाव्या आर्थिक गणनेत (२०१३) पीक उत्पादन व लागवड, लोक प्रशासन, संरक्षण, अनिवार्य सामाजिक सुरक्षा सेवा, घरगुती कामगाराचे मालक म्हणून कुटुंबांचे कार्य, विदेशी संघटना व संस्थाचे कार्य तसेच अनधिकृत कार्ये वगळता सर्व आस्थापनांचा समावेश करण्यात आला होता. पाचव्या आणि सहाव्या आर्थिक गणनेनुसार राज्यातील आस्थापनांची संख्या व त्यामधील रोजगार तक्ता १०.४८ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.४८ पाचव्या व सहाव्या आर्थिक गणनेनुसार राज्यातील आस्थापनांची संख्या व त्यामधील रोजगार**

| तपशील | पाचवी आर्थिक गणना २००५@ | सहावी आर्थिक गणना २०१३ |
|---|---|---|
| एकूण आस्थापना (लाख) | ४१.५३ | ६१.३७ |
| शेतकी आस्थापना (टक्के) | १४.५ | २५.९ |
| बिगर शेतकी आस्थापना (टक्के) | ८५.५ | ७४.१ |
| एकूण आस्थापनेतील कार्यरत कामगारांची संख्या (लाख) | १०५.२७ | १४५.१२ |
| शेतकी आस्थापनेतील कार्यरत कामगार (टक्के) | १०.० | १८.२ |
| बिगर शेतकी आस्थापनेतील कार्यरत कामगार (टक्के) | ९०.० | ८१.८ |

@ पाचव्या व सहाव्या आर्थिक गणनेच्या अर्थपूर्ण तुलनेसाठी पाचव्या आर्थिक गणनेतील लोक प्रशासन, संरक्षण व अनिवार्य सामाजिक सुरक्षा सेवा ही कार्ये विचारात घेण्यात आलेली नाही

*आधार:* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.५३ **रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमानुसार रोजगार:** रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील रोजगाराच्या संरचनेबाबतची माहिती उपलब्ध करून रोजगाराच्या स्तरांतील बदलांबाबतचे संनियंत्रण करणे आहे. या कार्यक्रमाअंतर्गत सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांची संख्या व त्यामधील रोजगार यांची त्रैमासिक आकडेवारी संकलित केली जाते. या कार्यक्रमाअंतर्गत बृहन्मुंबई क्षेत्रासाठी २५ किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांचा समावेश असून राज्याच्या उर्वरित भागात १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांचा समावेश असतो. रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमानुसार रोजगार तक्ता १०.४९ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.४९ रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमानुसार रोजगार**

( ०००)

| वर्ष | सार्वजनिक क्षेत्र | | | खाजगी क्षेत्र | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| २०२३ | १,७०५ | ६४६ | २,३५२ | ४,३५५ | १,७६४ | ६,११९ | ६,०६० | २,४११ | ८,४७१ |
| २०२४ | १,७१८ | ६५९ | २,३७७ | ४,४९५ | १,८२९ | ६,३२४ | ६,२१३ | २,४८८ | ८,७०१ |
| २०२५+ | १,७१९ | ६६२ | २,३८१ | ४,५८० | १,८६१ | ६,४४१ | ६,२९९ | २,५२३ | ८,८२२ |

*आधार:* कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबर पर्यंत

## कारखान्यातील रोजगार

१०.५४ राज्यात कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत नोव्हेंबर २०२५ पर्यंत ३९,१८७ नोंदणीकृत कारखाने कार्यरत होते व त्यातील सरासरी दैनिक रोजगार सुमारे ३४.६३ लाख होता. एकूण कार्यरत कारखान्यांपैकी ५० किंवा त्यापेक्षा कमी कामगार असणाऱ्या कारखान्यांचे प्रमाण ६९.७ टक्के होते. राज्यातील विविध उद्योगातील सरासरी दैनिक रोजगार परिशिष्ट १०.११ मध्ये दिला असून राज्यातील कार्यरत कारखाने व त्यातील रोजगार परिशिष्ट १०.१२ मध्ये दिला आहे.

**आलेख १०.११ : उद्योग प्रकार निहाय सरासरी दैनिक रोजगाराची टक्केवारी**




१०.५५ **राज्य शासनाच्या सेवेतील कर्मचारी:** राज्य शासकीय कर्मचारी (सार्वजनिक उपक्रम व स्थानिक स्वराज्य संस्था वगळून) यांची गणना दरवर्षी एक जुलै हा संदर्भ दिनांक धरुन करण्यात येते. दि. १ जुलै २०२५ रोजी राज्य शासनाच्या सेवेमध्ये गट अ ते ड गटातील एकूण ७.३६ लाख मंजूर पदे होती व त्यापैकी ३०.६ टक्के पदे रिक्त होती. राज्य शासनाच्या सेवेतील गटनिहाय कर्मचाऱ्यांची संख्या तक्ता १०.५० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५० राज्य शासनाच्या सेवेतील गटनिहाय कर्मचाऱ्यांची संख्या**

(लाख)

| गट | पदे* (दि. १ जुलै २०२५ रोजी ) | | |
|---|---|---|---|
| | मंजूर | भरलेली | रिक्त |
| अ | ०.४६ | ०.३० | ०.१६ |
| ब | ०.७५ | ०.५० | ०.२५ |
| क | ५.०४ | ३.७४ | १.३० |
| ड | १.११ | ०.५७ | ०.५४ |
| **एकूण अ ते ड** | **७.३६** | **५.११** | **२.२५** |
| इ# | ला.ना. | २.२९ | ला.ना. |

# वेतन श्रेणीतील कंत्राटी कर्मचारी आणि एकत्रित मानधनावरील कंत्राटी कर्मचारी ला.ना. लागू नाही * अस्थायी

*आधार:* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता

१०.५६ कामाच्या शोधात असणाऱ्या व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगार संबंधित बाबींमध्ये, मार्गदर्शन आणि सहाय्य करण्यासाठी राज्यात कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत राज्यात अशी ४४ केंद्रे कार्यरत असून, त्यापैकी ३६ केंद्रे जिल्हा स्तरावर आहेत आणि आठ केंद्रे विशेषत: आदिवासी उमेदवारांकरिता आहेत. प्रत्येक जिल्हा स्तरावरील केंद्रात दिव्यांगांसाठी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

१०.५६.१ माहे ऑक्टोबर २०२५ अखेर या केंद्रांच्या चालू नोंदवहीत नोंद झालेल्या व्यक्तींची संख्या ७३.७४ लाख होती. माहे ऑक्टोबर २०२५ मध्ये या केंद्रात नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या ४.५० लाख होती. अधिसूचित रिक्त पदे, भरण्यात आलेली पदे आणि चालू नोंदवहीत असलेल्या व्यक्तींचा शैक्षणिक पात्रतेनुसार तपशील अनुक्रमे परिशिष्ट १०.१३ व परिशिष्ट १०.१४ मध्ये दिला आहे.

१०.५७ **रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम:** राज्य शासनामार्फत रोजगार प्रोत्साहनाकरिता खालील कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

- ➢ शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण कार्यक्रम: शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण देऊन उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविणे
- ➢ उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम: सुशिक्षित बेरोजगार युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रेरीत व प्रशिक्षित करणे रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमाचा तपशील तक्ता १०.५१ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५१ रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमाचा तपशील**

| कार्यक्रम | लाभार्थी (संख्या) | | | खर्च (₹ लाख) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण | ४०,०१२ | ६५,६८६ | ३९,५०७ | १,८७०.३४ | २,०८३.६६ | १,६९४.२८ |
| उद्योजकता विकास प्रशिक्षण | ३१,३६८ | ३२,११४ | २०,९१९ | १,०२६.२१ | १,०९४.०२ | ६६०.७६ |

*आधार*: १) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत
२) उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.५८ कुशल कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे तसेच उद्योगांसाठी मनुष्यबळाची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने राज्य शासनामार्फत सन २००९-१० पासून सर्व जिल्ह्यांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करण्यात येत आहेत. रोजगार मेळाव्यांचा तपशील तक्ता १०.५२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५२ रोजगार मेळाव्यांचा तपशील**

(संख्या)

| तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| रोजगार मेळावे (संख्या) | ५८१ | ७६७ | ३१२ |
| सहभागी उद्योजक | ५,३७७ | ७,२७३ | २,३६१ |
| रोजगार मेळाव्यासाठी उपस्थित उमेदवार | २,५६,६६६ | १,२७,३५७ | ५८,६०५ |
| प्राथमिक निवड झालेले उमेदवार | ९५,४७८ | ३८,५१२ | २१,४२० |

*आधार*: कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबर पर्यंत

१०.५९ राज्यातील सर्व कौशल्य विकास उपक्रमांचे नियोजन, समन्वय, अंमलबजावणी आणि संनियंत्रण करण्यासाठी कौशल्य विकास सोसायटी प्रमुख संस्था म्हणून कार्यरत आहे. विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व कौशल्य विकास योजनांची एकसंघ व प्रभावी अंमलबजावणीची सुनिश्चिती करण्यासाठी कौशल्य विकास सोसायटीमार्फत व्यवस्थितपणे आणि एकत्रितपणे राबविल्या जात आहेत. कौशल्य विकास योजनांची माहिती तक्ता १०.५३ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.५३ कौशल्य विकास योजनांची माहिती**

(संख्या)

| योजना | २०२४ | | २०२५ | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणीकृत उमेदवार | प्रशिक्षित उमेदवार | नोंदणीकृत उमेदवार | प्रशिक्षित उमेदवार |
| प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान | १,१३,६१५ | १,०७,६२१ | ७८,९३७ | ६७,२९५ |
| प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र | १६,२६९ | ९,६८८ | २१,२६९ | ४,९०९ |
| आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र | ३०,८२४ | ८,२६० | २८,६७८ | २,७८२ |
| प्रधान मंत्री विश्वकर्मा सम्मान योजना | ६८,७१३ | ६६,५२९ | १२,१२४ | ११,९१४ |
| किमान कौशल्य विकास कार्यक्रम | २६,०९० | १९,५९८ | ३४,९०४ | ६,१२० |

*आधार*: महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र शासन

## रोजगार निर्मिती योजना

१०.६० **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र:** 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम-२००५' अंतर्गत उपजीविका सुरक्षिततेत सुधारणा करण्यासाठी प्रत्येक आर्थिक वर्षात ग्रामीण भागातील अकुशल काम करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या कुटुंबातील प्रौढास किमान १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात येते. प्रति लाभार्थी कुटुंबाच्या १०० दिवसांपर्यंतच्या रोजगाराचा खर्च भारत सरकारमार्फत करण्यात येतो तर १०० दिवसांवरील अतिरिक्त रोजगाराचा खर्च राज्य शासनामार्फत केला जातो. राज्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा तपशील तक्ता १०.५४ मध्ये दिला आहे. कामाच्या वर्गीकरणानुसार पूर्ण झालेल्या कामांची संख्या व त्यावर झालेला खर्च परिशिष्ट १०.१५ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.५४ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा तपशील**

| तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या (लाख) | २४.४६ | ३०.०७ | ३३.३७ |
| त्यापैकी | | | |
| १०० किंवा कमी दिवस (रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या (लाख) | २१.७२ | २६.०४ | ३१.४५ |
| १०० पेक्षा जास्त दिवस (रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या (लाख) | २.७५ | ४.०३ | १.९२ |
| १०० पेक्षा जास्त दिवस रोजगार पुरविण्यासाठी आलेला खर्च (₹ कोटी) | २,०४५.९० | २,२६८.६५ | २,२९९.१६ |
| रोजगार निर्मिती (कोटी मनुष्य दिवस) | ११.६० | १६.२१ | १३.०० |
| प्रति कुटुंब सरासरी रोजगार (दिवस) | ४७ | ५४ | ३९ |
| रोजगारातील हिश्शाची टक्केवारी | | | |
| अनुसूचित जाती | ६.९ | ६.१ | ५.३ |
| अनुसूचित जमाती | १७.४ | १५.९ | १७.८ |
| महिला | ४३.९ | ४४.७ | ४५.७ |
| पूर्ण झालेल्या कामांची संख्या | ३,३७,७६४ | ४,३५,७१८ | ५,५६,३६९ |
| एकूण खर्च (₹ कोटी) | ४,४६०.८३ | ५,९७२.२८ | ५,९७४.७९ |
| एक दिवसाच्या रोजगार निर्मितीचा खर्च (₹) | ३८५ | ३६८ | ४६० |

*आधार*: नियोजन विभाग (रोजगार हमी योजना), महाराष्ट्र शासन + २ फेब्रुवारी पर्यंत

१०.६०.१ संसदेने "विकसित भारत-रोजगार व आजीविका मिशन हमी अभियान (ग्रामीण)" (VB-G RAM G) अधिनियम - २०२५, संमत केला असून सदर अधिनियमान्वये 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम - २००५' (MGNREGA) निरसित करण्यात येणार आहे. ग्रामीण कुटुंबास अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देवून त्याद्वारे 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय उद्दिष्टांशी सुसंगत असा ग्रामीण विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. या अधिनियमाअंतर्गत, समृद्ध आणि सशक्त भारताची निर्मिती सुनिश्चित करण्यासाठी, ज्या कुटुंबातील प्रौढ सदस्य स्वत:हून काम करण्यासाठी तयार असतील अशा प्रत्येक ग्रामीण कुटुंबास १२५ दिवसांच्या अकुशल रोजगाराची हमी देण्यात आली आहे.

१०.६१ **महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान:** दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) राज्य शासनामार्फत राबविण्यात येते आहे. या अभियानाअंतर्गत शाश्वत शेती व पशुपालन, गौण वनोत्पादन आणि मत्स्य व्यवसाय या संलग्न कार्यांवर भर दिला आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची (उमेद) प्रगती तक्ता १०.५५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५५ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची (उमेद) प्रगती**

| तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| स्थापन झालेले स्वयंसहायता गट (संख्या) | ५६,८३२ | ३६,८३६ | १०,८२६ |
| स्वयंसहायता गटांतील सदस्य (संख्या) | ७,७८,०५५ | ४,९७,२१६ | १,२०,२१८ |
| प्राप्त अनुदान (₹ कोटी) | १,४७३.३८ | १,८०७.२१ | ८८२.९७ |
| खर्च (₹ कोटी) | १,३०४,.८७ | १,८८०.१४ | ८५२.०१ |
| कर्ज देण्यात आलेले स्वयंसहायता गट (संख्या) | २,८४,८९३ | २,८८,१०४ | १,३८,१२३ |
| पत पुरवठा (₹ कोटी) | ८,९५०.०० | १०,७८६.०० | ५,२७०.०० |

*आधार*: ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन. + ऑक्टोबर पर्यंत

१०.६२ **पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम:** पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम हा राज्यात सन २००८-०९ पासून राज्य खादी व ग्रामोद्योग आयोगामार्फत राबविण्यात येतो. पारंपरिक कारागीर व बेरोजगार युवकांना स्वयंरोजगारासाठी नवीन उपक्रम सुरु करण्यास संधी निर्माण करणे व त्याद्वारे नागरी भागात होणारे स्थलांतर कमी करणे हा या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश आहे. हा कार्यक्रम राज्यात खादी व ग्रामोद्योग, आयोग मार्फत राबविण्यात येत आहे. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा तपशील तक्ता १०.५६ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.५६ पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा तपशील**

| तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|
| प्रकल्प (संख्या) | २,७२७ | १,८३७ | २,१५४ |
| वितरीत मार्जिन निधी (₹ कोटी) | ११९.०६ | १०३.०३ | ११५.७७ |
| रोजगार निर्मिती (संख्या) | २१,८१६ | १४,६९६ | १७,२३२ |

*आधार:* उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

१०.६३ **मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम:** सूक्ष्म व लघु उद्योगांद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्यात सन २०१९ पासून या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत प्रकल्प किंमतीच्या १५ ते ३५ टक्के अर्थसहाय्य कर्ज संलग्न अनुदान म्हणून दिले जाते. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा तपशील तक्ता १०.५७ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.५७ मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा तपशील**

(₹ लाख)

| वर्ष | प्रकल्प (उद्दीष्टे) | मंजूर | | वितरीत | | रोजगार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रकल्प संख्या | मार्जिन निधी | प्रकल्प संख्या | मार्जिन निधी | |
| २०२२-२३ | २५,६०० | १२,३२६ | २७,६५७.०० | ५,१४७ | १४,२६०.०० | १४,३०० |
| २०२३-२४ | २५,००० | १९,८०० | ४३,८३३.४४ | ९,५६३ | २५,३५०.८१ | २५,४०० |
| २०२४-२५ | २५,००० | २२,८४३ | ४८,९८०.०७ | ४,६१९ | १५,२५१.०० | १५,२५० |
| २०२५-२६+ | ५०,००० | १३,९४२ | ४१,८००.०० | ४,०५८ | १३,९०५.०० | १३,९०५ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + १३ जानेवारी पर्यंत

१०.६४ **मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना:** युवकांना रोजगार प्रशिक्षण व व्यवहारिक अनुभव प्रदान करून शिक्षण व रोजगार यातील अंतर कमी करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने जुलै २०२४ मध्ये ही योजना सुरू केली आहे. या योजनेचा उद्देश दरवर्षी १० लाख रोजगार प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून युवकांच्या रोजगार क्षमतेत वाढ करणे व उदमशीलतेच्या संधीमध्ये सुधारणा करणे हा या योजनेचा उद्देश आहे. पात्र उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार ₹ ६,००० ते ₹ १०,००० दरम्यान विद्यावेतन मिळते. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा तपशील तक्ता १०.५८ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.५८ मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा तपशील**

(संख्या)

| तपशील | २०२५-२६+ | | |
|---|---|---|---|
| | शासकीय | खाजगी | एकूण |
| प्रशिक्षणार्थी नोंदणी संख्या | | - | १,५६,१०८ |
| नोंदणीकृत आस्थापना | १६,६०२ | ९,७१८ | २६,३२० |
| कार्य प्रशिक्षण पदांसाठी केलेले अर्ज | २,२२,८६२ | २,१९,२१२ | ४,४२,०७४ |
| कार्य प्रशिक्षण संधी उपलब्ध केलेल्या आस्थापना | १०,५६१ | ५,४९० | १६,०५१ |
| कार्य प्रशिक्षणासाठी रुजू झालेले उमेदवार | ८७,८५५ | ४७,४९५ | १,३५,३५० |

*आधार:* कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + ८ फेब्रुवारी पर्यंत

## कामगार कल्याण

१०.६५ **कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेअंतर्गत नोंदणीकृत कर्मचारी:** कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना २० पेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना लागू होते. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेअंतर्गत नोंदणीकृत कर्मचाऱ्यांची संख्या तक्ता १०.५९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५९ कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेअंतर्गत नोंदणीकृत कर्मचाऱ्यांची संख्या**

(लाख)

| वर्ष | महाराष्ट्र | अखिल भारत |
|---|---|---|
| २०२३-२४ | २८.४६ | १३१.४८ |
| २०२४-२५ | २८.६२ | १२९.७८ |
| २०२५-२६+ | १४.४४ | ६९.०३ |

*आधार*: कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, भारत सरकार + जुलै पर्यंत

१०.६६ **ई-श्रम पोर्टल:** असंघटीत कामगारांना सामाजिक सुरक्षा सेवा देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय माहितीकोष तयार करण्यासाठी श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांनी हे पोर्टल विकसित केले आहे. दि. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत राज्यातील १.८३ कोटी असंघटीत कामगारांची नोंदणी ई-श्रम पोर्टलवर झाली असून त्यापैकी ५५.८ टक्के स्त्रिया आहेत. एकूण नोंदणीकृत असंघटीत कामगारांपैकी ५१.७ टक्के कामगार १८ ते ४० वर्षे वयोगटातील आहेत तर २६.८ टक्के कामगार ४० ते ५० वर्षे वयोगटातील आहेत. राज्यातील ई-श्रम पोर्टलवर नोंदणी केलेल्या कामगारांचा तपशील तक्ता १०.६० मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.६० राज्यातील ई-श्रम पोर्टलवर नोंदणी केलेल्या कामगारांचा तपशील**

(लाख)

| व्यवसाय क्षेत्र | संख्या+ |
|---|---|
| कृषि | ९७.९१ |
| बांधकाम | १४.१६ |
| घरेलू कामगार | ८.५१ |
| चर्मोद्योग | ८.१४ |
| वस्त्रोद्योग | ११.३८ |
| वाहने व वाहतूक | ६.४७ |
| भांडवली वस्तू व उत्पादन | ३.१६ |
| प्रशासन | ३.८४ |
| पर्यटन व आदरातिथ्य | ३.०६ |
| इलेक्ट्रॉनिक्स व हार्डवेअर (आयटी) | २.२० |
| आरोग्यसेवा | २.५८ |
| सौंदर्य व निरोगीपणा | १.७२ |
| शिक्षण | १.५५ |
| किरकोळ व्यापार | १.१७ |
| इतर | १७.५९ |

आधार: ई-श्रम पोर्टल + जानेवारी २०२६ पर्यंत

१०.६७ इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या रोजगार व सेवाशर्तीचे नियमन करण्याच्या उद्देशाने तसेच सुरक्षा, आरोग्य व कल्याणासाठीच्या उपाय योजना करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सन २०२४-२५ मध्ये नोंदणीकृत बांधकाम कामगारांची संख्या २६.६७ लाख होती, तर सन २०२५-२६ मध्ये माहे ऑक्टोबर पर्यंत ती १५.४३ लाख होती. सन २०२४-२५ विविध योजनेत लाभार्थ्यांची संख्या ७०.५८ लाख होती, तर सन २०२५-२६ मध्ये सप्टेंबरपर्यंत एकुण ५१.९७ लाख लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ मिळाला.

१०.६८ **प्रधानमंत्री श्रमयोगी मान-धन योजना:** असंघटीत कामगारांना वृद्धापकालीन सुरक्षा व सामाजिक सुरक्षा देण्यासाठी सन २०१९ पासून ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत १८ ते ४० वर्षे वयोगटातील दरमहा ₹ १५,००० किंवा त्यापेक्षा कमी मासिक उत्पन्न असलेले आणि अन्य कुठल्याही निवृत्ती वेतन योजनेत सहभागी नसलेले असंघटीत कामगार पात्र आहेत. या पात्र कामगारांना त्यांच्या वयानुसार दरमहा ₹ ५५ ते २०० वर्गणी भरावी लागेल व वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर दरमहा ₹ ३,००० निवृत्ती वेतन मिळेल. या योजनेंतर्गत राज्यात जानेवारी २०२६ पर्यंत ६,२६,६६२ असंघटीत कामगारांची नोंदणी झाली आहे.

## बाल कामगार प्रतिबंध

१०.६९ 'बाल कामगार (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम १९८६' चा उद्देश १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालकांना रोजगारास प्रतिबंध करणे आहे. बालकांच्या आरोग्यासाठी धोकादायक आणि मनावर विपरित परिणाम करणाऱ्या १६ व्यवसाय व ६५ प्रक्रियांमध्ये बालकांना कामावर ठेवण्यात या अधिनियमान्वये प्रतिबंध करण्यात आला आहे. अधिनियमातील सन २०१६ च्या सुधारणेनुसार वयाची १४ वर्षे पूर्ण झालेल्या परंतु १८ वर्षे पूर्ण नसलेल्यांना किशोरवयीन संबोधले असून धोकादायक व्यवसायांमध्ये त्यांना रोजगारास प्रतिबंध केला आहे. सन २०२५ मध्ये एकुण ३८१ ठिकाणी धाडी टाकण्यात येऊन १०१ बाल कामगार व १५६ किशोरवयीन कामगारांची सुटका करण्यात आली आणि २८२ आस्थापनांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

## औद्योगिक संबंध

१०.७० सन २०२५ मध्ये राज्यात कामबंद (संप आणि टाळेबंद) झालेली प्रकरणांची संख्या ७ होती त्यामुळे १,६५० कामगार बाधित झाले आणि ४.२२ लाख मनुष्य दिवस वाया गेले. राज्यातील औद्योगिक विवादांचे तपशील परिशिष्ट १०.१६ मध्ये दिला आहे.

# दारिद्र्य

१०.७१ दारिद्र्य निर्मूलनतासाठी शासन अन्नधान्य वितरण, आर्थिक मदत, कौशल्य विकास, आरोग्य सुविधा, शिक्षणाच्या संधी, इत्यादी विविध कल्याणकारी योजना राबवित आहे.

## बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक

१०.७२ पारंपारिक आर्थिक दारिद्र्यच्या मापदंडात समावेश नसलेल्या व गरीबांना भेडसावणाऱ्या बहुविध आणि परस्पर व्याप्त वंचिततेचा अंतर्भाव नीति आयोगामार्फत परिगणित बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकांमध्ये आहे. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकांमध्ये आरोग्य, शिक्षण आणि राहणीमानाचा दर्जा हे तीन समभारीत आयाम असलेले १२ निर्देशक आहेत.

१०.७२.१ 'राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक-२०२३' अहवालानुसार राज्यासाठी सन २०१९-२०२१ मध्ये बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक ०.०३३ होता तर सन २०१५-१६ मध्ये तो ०.०६५ होता. राज्यात सन २०१५-१६ मधील बहुआयामी गरीब लोकसंख्या १४.८ होती ती सन २०१९-२१ मध्ये ७.८ इतकी कमी टक्के झाली. राज्यातील जिल्हानिहाय शिरगणती गुणोत्तर, दारिद्र्य तीव्रता आणि बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक यांचे तपशील परिशिष्ट १०.१७ मध्ये दिले आहेत. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाच्या प्रत्येक निर्देशकानुसार बहुआयामी गरीब व वंचित लोकसंख्येची टक्केवारी तक्ता १०.६१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६१ बहुआयामी गरीब व वंचित लोकसंख्येची टक्केवारी**

(टक्के)

| परिमाण | निर्देशक | ग्रामीण | | शहरी | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | २०१९-२०२१ | २०१५-१६ | २०१९-२०२१ |
| आरोग्य | पोषण | १८.७ | ९.३ | ५.० | २.६ |
| | बालक आणि पौगंडावस्थेतील मृत्यू | ०.९ | ०.७ | ०.७ | ०.३ |
| | माता आरोग्य | १०.५ | ६.१ | ३.१ | १.७ |
| शिक्षण | शालेय शिक्षणाचे वर्षे | ६.३ | ३.९ | १.९ | १.३ |
| | शाळेतील उपस्थिती | ४.२ | १.७ | १.५ | ०.८ |
| राहणीमानाचा दर्जा | स्वयंपाकाचे इंधन | २१.४ | ८.६ | १.९ | ०.९ |
| | स्वच्छता | १९.४ | ७.७ | ४.३ | २.२ |
| | पिण्याचे पाणी | ८.९ | ४.० | ०.५ | ०.२ |
| | वीज | ५.२ | १.५ | ०.८ | ०.२ |
| | गृहनिर्माण | १७.२ | ८.७ | १.८ | १.१ |
| | मालमत्ता | १०.८ | ५.० | १.८ | ०.९ |
| | बँक खाते | ५.१ | १.५ | २.२ | ०.९ |

*आधार*: राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक-२०२३, नीति आयोग, भारत सरकार

# गृहनिर्माण

१०.७३ सामाजिक कल्याण आणि आर्थिक विकासासाठी गृहनिर्माण क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे असून, राहणीमान सुधारणा, रोजगारनिर्मिती तसेच शहरी व ग्रामीण पायाभूत सुविधा बळकट करून हे क्षेत्र सर्वसमावेशक विकासाला चालना देते. शासन दुर्बल घटकांना परवडणारी व पुरेशी घरे उपलब्ध करून देण्यासाठी विविध गृहनिर्माण योजना व धोरणात्मक उपक्रम राबवित आहे. संलग्न उद्योगांशी असलेल्या मजबूत संबंधांमुळे गृहनिर्माण क्षेत्र आर्थिक क्रियाकलापांना गती देणारे महत्त्वाचे क्षेत्र ठरते.

# नागरी गृहनिर्माण

१०.७४ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ मर्यादित (महाहौसिंग) आणि शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) या राज्यातील शहरी भागात परवडणाऱ्या दरात मोठयाप्रमाणावर गृहनिर्माण प्रकल्प विकसित करण्यासाठी नियुक्त केलेल्या शासकीय संस्था आहेत. तर शहरी भागातील झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (झोपू) नियुक्त संस्था आहे.

१०.७५ महाराष्ट्र शासनाने 'सर्वांसाठी घर' आणि झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट यांच्यावर भर देत महाराष्ट्र गृहनिर्माण धोरण, २०२५ जाहीर केले आहे. 'माझं घर, माझा अधिकार' हे २०३० पर्यंतचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाने एक सर्वसमावेशक आराखडा स्वीकारला असून, त्याद्वारे महाराष्ट्रातील गृहनिर्माण क्षेत्रात परिवर्तन घडवून आणून प्रत्येक नागरिकाला सन्मानपूर्वक राहणीमान उपलब्ध करून देण्याची सुनिश्चिती केली आहे.

**राज्य गृहनिर्माण धोरण-२०२५ ची उद्दिष्टे:**

- गृहनिर्माण सुलभता
- आर्थिक वृद्धीस चालना
- पूरक व शाश्वत गृहनिर्माण
- परवडणारी घरे
- झोपडपट्टी पुनर्वसन
- शहरी नियोजन आणि पायाभूत एकात्मिक शहरी व पायाभूत सुविधांचा विकास
- नियमन आणि अंमलबजावणी
- भाडेतत्वावरील गृहनिर्माणास चालना
- सर्वसमावेशक गृहनिर्माण
- आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब

### प्रधानमंत्री आवास योजना (नागरी)

१०.७६ भारत सरकारची ही महत्वकांक्षी योजना राज्यात सन २०१५ पासून अंमलात आणली जात आहे. "सर्वांसाठी निवारा" या अभियानांतर्गत शहरी भागातील लाभार्थ्यांना मूलभूत नागरी सुविधा व सामाजिक पायाभूत सुविधांसह पक्की घरे उपलब्ध करून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. मार्च २०२२ पर्यंत मंजूर झालेल्या घरांची पूर्तता करण्यासाठी भारत सरकारने या योजनेची मुदत दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविली आहे.

१०.७६.१ भारत सरकारने राज्यातील ४०९ शहरांत १९.४० लाख घरे बांधण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. या योजनेअंतर्गत राज्य यंत्रणा, स्वत: लाभार्थी आणि सार्वजनिक व खाजगी संस्थांची भागीदारी यांच्या मार्फत घरे बांधण्यात येत आहेत. माहे डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण १०.१५ लाख घरांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी ८.७५ लाख घरे पुर्ण झाली आहेत.

१०.७६.२ भारत सरकारने सन २०२४-२५ पासून पुढील पाच वर्षांसाठी शहरी गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना परवडणाऱ्या दरात घर बांधण्यासाठी, खरेदी करण्यासाठी किंवा भाड्याने घेण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री आवास योजना - शहरी २.० सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत एक कोटी कुटुंबांना राज्ये/केंद्रशासित प्रदेश/प्राथमिक कर्ज संस्था यांच्या माध्यमातून सहाय्य देण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजना - शहरी २.० ही योजना पुढील चार घटकांद्वारे राबविण्यात येत आहे:

- लाभार्थी-आधारित बांधकाम
- भागीदारीतील परवडणारे गृहनिर्माण
- परवडणारे भाडे गृहनिर्माण
- व्याज अनुदान योजना

लाभार्थी-आधारित बांधकाम व भागीदारीतील परवडणारे गृहनिर्माण या घटकांतर्गत प्रति घर ₹ २.५० लाख इतके शासकीय सहाय्य देण्यात येते, ज्यामध्ये केंद्र-राज्य ६०:४० असा खर्च वाटपाचा नमुना आहे. व्याज अनुदान योजना घटकांतर्गत पात्र लाभार्थ्यांना गृहकर्जावरील व्याजासाठी कमाल ₹ १.८० लाखांचे अनुदान पाच वार्षिक हप्त्यांमध्ये दिले जाते. याशिवाय, राज्य शासनाकडून सौरऊर्जा, हरितगृहे, सामाजिक व तंत्रज्ञानातील नवसंकल्पना इत्यादी उपक्रमांसाठी अतिरिक्त अनुदान दिले जाते.

१०.७६.३ प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत माहे डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण ३,२१,८३१ इतक्या लाभार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या योजने अंतर्गत भारत सरकारने ₹ २४६.९३ कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

१०.७७ **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण:** राज्यात परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी म्हाडा या राज्य नोडल यंत्रणेवर आहे. स्थापनेपासून नोव्हेंबर २०२५ पर्यंत म्हाडाने एकूण ५,२७,९६३ निवासी सदनिका/ घरकुले (पुनर्विकासासह) बांधल्या आहेत. म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या सदनिका/ घरकुलांचा तपशील तक्ता १०.६२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.६२ म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या सदनिका/ घरकुलांचा तपशील**

(संख्या)

| वर्ष | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | सदनिका | एकूण | संक्रमण शिबिरे | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०२२-२३ | ६,९३५ | ९८४ | ६५९ | १४ | ० | ८,५९२ | ५३ | १,८७३.८४ |
| २०२३-२४ | १०,४७१ | ४०८ | ७९३ | ५३ | ० | ११,७२५ | ३३४ | २,६६५.४७ |
| २०२४-२५ | ६,२१४ | ३९८ | ३७३ | १६३ | २९२ | ७,४४० | ० | १,१६८.४४ |
| २०२५-२६+ | ८,८३५ | १,१०८ | ६४२ | १७७ | ३,९५९ | १४,७२१ | ० | ४,८७२.१५ |

*आधार:* महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण + नोव्हेंबर पर्यंत

१०.७८ **शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित:** सिडको हे राज्यात नियोजनबद्ध गृहनिर्माण विकास कार्यक्रम राबवित आहे. स्थापनेपासून डिसेंबर २०२५ पर्यंत सिडकोने एकूण २,३०,९६४ सदनिका/घरकुले बांधली आहेत. सिडकोने बांधलेल्या सदनिका/ घरकुले यांचा तपशील तक्ता १०.६३ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.६३ सिडकोने बांधलेल्या सदनिका/ घरकुले यांचा तपशील**

(स्थापनेपासून डिसेंबर २०२५ पर्यंत) (संख्या)

| शहर | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| नवी मुंबई | ८८,११८ | २६,३८० | ३३,२८५ | २८,६९३ | १,७६,४७६ |
| नाशिक | २१,३४३ | ० | २,६१९ | ५८२ | २४,५४४ |
| छत्रपती संभाजीनगर | १९,५०१ | ० | २,१२७ | ४३२ | २२,०६० |
| नांदेड | ७,७५८ | ० | १२६ | ० | ७,८८४ |
| **एकूण** | **१,३६,७२०** | **२६,३८०** | **३८,१५७** | **२९,७०७** | **२,३०,९६४** |

*आधार* : शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको)

१०.७८.१ प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत सिडकोने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट लाभार्थ्यांकरिता मार्च २०२४ पर्यत २३,१५७ सदनिका बांधल्या आहेत. तसेच प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत सप्टेंबर २०१९ मध्ये ८६,९६१ सदनिका बांधकामाच्या निर्धारित उद्दिष्टास अनुसरून सिडकोने डिसेंबर २०२५ अखेर २३,५८४ सदनिका बांधून पूर्ण केल्या आहेत.

१०.७९ **झोपडपट्टी पुनर्वसन योजना:** या योजनेअंतर्गत झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबांना सदनिका पुरविण्यात येत आहेत. योजनेच्या सुरुवातीपासून डिसेंबर २०२५ पर्यंत मुंबईमध्ये एकूण २,५४५ प्रकल्प पूर्ण झाले आहेत आणि झोपडपट्टीत राहणाऱ्या २,८३,९५५ कुटुंबांचे सदनिकांमध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे. तसेच ठाणेमध्ये एकूण ५१ प्रकल्प पूर्ण झाले आहेत आणि झोपडपट्टीत राहणाऱ्या ७,८१५ कुटुंबांचे सदनिकांमध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे.

## ग्रामीण गृहनिर्माण

१०.८० ग्रामीण भागातील आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या घराची गरज पूर्ण करणे हे ग्रामीण गृहनिर्माणाचे उद्दिष्ट आहे. शासनामार्फत ग्रामीण गृहनिर्माणासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. विविध योजनाचा तपशील तक्ता १०.६४ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.६४ ग्रामीण गृहनिर्माणाच्या विविध योजनांचा तपशील**

(स्थापनेपासून डिसेंबर २०२५ पर्यंत)

| योजनेचे नाव | लाभाचा प्रकार | तपशील | २०२५-२६ |
|---|---|---|---|
| प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) | ग्रामीण भागातील बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांना २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधकामाकरीता सर्वसाधारण क्षेत्रात ₹ १.२० लाख तर नक्षलग्रस्त व डोंगरी भागातील लाभार्थ्यांना ₹ १.३० लाख अनुदान | मंजूर घरकुलांची संख्या<br>पुर्ण घरकुलांची संख्या<br>खर्च (₹ कोटी) | ४१,३७,३५७<br>१६,०५,०७७<br>३१,७१३.१७ |
| रमाई आवास योजना | ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या कुटुंबांकरिता २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रातील लाभार्थ्याला ₹ १.२० लाख, नक्षलग्रस्त व डोंगरी भागातील लाभार्थ्याला ₹ १.३० लाख अनुदान | मंजूर घरकुलांची संख्या<br>पुर्ण घरकूलांची संख्या<br>खर्च (₹ कोटी) | ६,१०,०२५<br>४,६१,४४९<br>६,०१०.०५ |
| शबरी आदिवासी घरकुल योजना | ग्रामीण भागातील सर्वसाधारण क्षेत्रातील अनुसूचित जमातीतील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या कुटुंबांकरिता २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रातील लाभार्थ्याला ₹ १.२० लाख, नक्षलग्रस्त व डोंगरी भागातील लाभार्थ्याला ₹ १.३० लाख अनुदान | मंजूर घरकुलांची संख्या<br>पुर्ण घरकूलांची संख्या<br>खर्च (₹ कोटी) | २,८४,७०१<br>१,९९,०८९<br>२,७४४.३९ |
| यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत/ वैयक्तिक घरकुल योजना | ग्रामीण भागातील ₹ १.२० लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या विमुक्त जाती आणि भटक्या जमातीतील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या कुटुंबांकरिता २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी सर्व साधारण क्षेत्रातील लाभार्थ्याला ₹ १.२० लाख तर नक्षलग्रस्त व डोंगरी भागातील लाभार्थ्याला ₹ १.३० लाख अनुदान | मंजूर घरकुलांची संख्या<br>पुर्ण घरकूलांची संख्या<br>खर्च (₹ कोटी) | ४३,९९३<br>२१,५४१<br>३५६.७२ |
| पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना | ग्रामीण भागातील ₹ १.२० लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या धनगर समाजातील भटक्या जमाती 'क' प्रवर्गातील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या कुटुंबांकरिता २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रातील लाभार्थ्याला ₹ १.२० लाख तर नक्षलग्रस्त व डोंगरी भागातील लाभार्थ्याला ₹ १.३० लाख अनुदान | मंजूर घरकुलांची संख्या<br>पुर्ण घरकूलांची संख्या<br>खर्च (₹ कोटी) | २४,४५०<br>६,०८९<br>१३४.०४ |

*आधार* : राज्य व्यवस्थापन कक्ष (ग्रामीण)

१०.८१ **मोदी आवास घरकुल योजना:** प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व राज्याच्या अन्य ग्रामीण घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित असलेल्या इतर मागास वर्गातील व विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी राज्य शासनामार्फत सन २०२३-२४ पासून 'मोदी आवास घरकुल योजना' सुरू केली आहे. योजनेच्या सुरुवातीपासून डिसेंबर २०२५ पर्यंत २,९९,२९९ घरकुल बांधकामास मंजुरी देण्यात आली असून १,९८,६४३ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तसेच ₹ २,९३४.०१ कोटी निधी खर्च झाला.

१०.८२ **पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना:** प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व राज्याच्या अन्य ग्रामीण घरकुल योजनेअंतर्गत पात्र परंतु जागेअभावी घरकुलाच्या लाभापासून वंचित असलेल्या दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांसाठी 'पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून शासकीय जमीन विनामुल्य उपलब्ध करुन देणे अथवा ५०० चौ. फूट जागा खरेदीसाठी ₹ एक लाख मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते. योजनेच्या सुरुवातीपासून डिसेंबर २०२५ पर्यंत ३७,६८१ लाभार्थ्यांना घरकुलासाठी मोफत जागा उपलब्ध करून दिली व ४,७२३ लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी ₹ २३.६१ कोटी अर्थसहाय्य देण्यात आले.

## महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण

१०.८३ 'स्थावर संपदा (विनियम आणि विकास) अधिनियम, २०१६' कायद्याअंतर्गत राज्य शासनाने स्थावर संपदा क्षेत्राचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) ची स्थापना केली असून त्यामध्ये पारदर्शकता, वित्तीय शिस्त, नागरिक केंद्रितता, उत्तरदायित्व आणि सलोखा व अर्ध-न्यायिक यंत्रणेद्वारे तक्रारींचे जलदगतीने निराकरण या बाबी अंतर्भूत आहेत. माहे डिसेंबर २०२५ पर्यंत महारेराकडे एकूण ५३,०१२ प्रकल्पांची नोंदणी करण्यात आली. महारेराच्या स्थापनेपासून ३२,३७७ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी २६,०११ तक्रारींचा निपटारा करण्यात आला.

# पाणी पुरवठा आणि स्वच्छता

१०.८४ पाणी हे अत्यावश्यक नैसर्गिक संसाधनांपैकी एक असून पाण्याचे संवर्धन व व्यवस्थापन कार्यक्षमतेने करणे गरजेचे आहे. सुरक्षित व पुरेसा पाणी पुरवठा आणि स्वच्छता सुविधा प्रदान करणे हे लोकांच्या आरोग्यासाठी, दर्जेदार जीवनासाठी आणि कल्याणासाठी आवश्यक आहे. कार्यक्षम पाणी पुरवठा व स्वच्छता सेवा शाश्वत विकास ध्येय - ६, 'सर्वांसाठी पाणी व स्वच्छता यांची उपलब्धता व शाश्वत व्यवस्थापन यांची सुनिश्चिती करणे साध्य करण्यासाठी मदत करतात'.

## पाणी पुरवठा

१०.८५ राज्यातील सर्व कुटुंबांच्या किमान गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशा प्रमाणात शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे.

## जल जीवन अभियान

१०.८६ राज्यातील ग्रामीण भागात सप्टेंबर २०२० पासून 'हर घर नल से जल' या उद्दिष्टाने जल जीवन अभियानाची अंमलबजावणी केली जात आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास कार्यात्मक घरगुती नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिन गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे हे जल जीवन अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या अभियानाअंतर्गत सन २०२८ पर्यंत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंब, शाळा, ग्रामपंचायत इमारत, आरोग्य केंद्र, अंगणवाडी इत्यादींना वैयक्तिक नळ जोडणी पुरविण्यात येणार आहे. या अभियानाअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ ५,८८३.७ कोटी आणि सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ ३,४८०.८ कोटी इतका खर्च झाला. जल जीवन अभियानाअंतर्गत नळ जोडणी बाबत प्रगती तक्ता १०.६५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६५ जल जीवन अभियानाअंतर्गत नळ जोडणी बाबत प्रगती**

(दि. ६ जानेवारी २०२६ रोजी)

| प्रकार | उद्दिष्ट | साध्य | टक्के |
|---|---|---|---|
| कुटुंब | १,४६,७८,३९७ | १,३२,५८,०९८ | ९०.३ |
| शाळा | ७७,७२५ | ७६,५४८ | ९८.५ |
| ग्रामपंचायत इमारत | १७,६२७ | १४,३३३ | ८१.३ |
| आरोग्य केंद्र | ६,१९० | ५,१६७ | ८३.५ |
| अंगणवाडी | ९०,६६१ | ८३,००३ | ९१.६ |

*आधार* : जल जीवन अभियान, भारत सरकार

**जल जीवन अभियानाची साध्ये**

- नळाद्वारे पाणी पुरवठा होत असलेल्या कुटुंबांचे प्रमाण सन २०१९ मधील ३३ टक्क्यांवरून जानेवारी २०२६ मध्ये ९०.३ टक्के
- जल जीवन अभियानाच्या सुरवातीस (२०२०) गुणवत्ता प्रभावित भागात राहणाऱ्या ३१,९०५ ग्रामीण कुटुंबांना नळाद्वारे सुरक्षित पाणी पुरवठा
- फ्लोराईड-बाधित वस्त्यांमधील ४११ कुटुंबांना सुरक्षित पाणी पुरवठा
- जल गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा - १७८

## पेयजल टंचाई निवारण कार्यक्रम

१०.८७ पेयजल टंचाईग्रस्त गावे व वाड्यांमध्ये दरवर्षी ऑक्टोबर ते जून या कालावधीत पेयजल टंचाई निवारण कार्यक्रम राबविण्यात येतो. या कार्यक्रमाअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ ७४३.२ कोटी तर सन २०२५-२६ मध्ये जानेवारी पर्यंत ₹ ९० कोटी इतका खर्च झाला. पेयजल टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असलेली गावे व वाड्यांची संख्या तक्ता १०.६६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६६ पेयजल टंचाई निवारण कार्यक्रमाअंतर्गत समाविष्ट असलेल्या गावे व वाड्यांची संख्या**

| कामाचे स्वरूप | गावे | | वाड्या | |
|---|---|---|---|---|
| | २०२३-२४@ | २०२४-२५$ | २०२३-२४@ | २०२४-२५$ |
| विंधण विहिरी/कूपनलिका घेणे | १,८४८ | १,४८० | १,१८९ | १,०७१ |
| तात्पुरता नळ पाणी पुरवठा–विशेष दुरुस्ती | ८३६ | १,३०१ | ४६२ | ४२२ |
| विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती | १,५४९ | ३०७ | २,२४१ | १३६ |
| तात्पुरती पूरक नळ जोडणी | ८४ | ६४ | १३ | ५० |
| टँकर / बैलगाडीने पाण्याचा पुरवठा | ३,३२९ | २,२२१ | ८,३७१ | ६,२११ |
| खाजगी विहिरींचे अधिग्रहण | ५,०९४ | २,७७२ | २,८७३ | १,०१९ |
| प्रगतीपथावर असलेल्या पाणी पुरवठा प्रकल्पांचे काम पूर्ण करणे | - | २०८ | - | ४८ |
| विहिरी खोलीकरण / गाळ काढणे | ४४३ | ३४९ | ३५८ | २६५ |

*आधार*: पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन @ ऑक्टोबर २०२३ ते जून २०२४ $ ऑक्टोबर २०२४ ते जून २०२५

## अटल भूजल योजना

१०.८८ शाश्वत भूजल व्यवस्थापन सुलभ करण्याच्या उद्देशाने जागतिक बँक अर्थसहाय्यित अटल भूजल योजना राज्यामध्ये सन २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत राबविण्यात आली. या योजनेच्या सुरवातीपासून राज्यात माहे ऑक्टोबर २०२५ पर्यंत ₹ ६२६.५ कोटी खर्च झाला.

- अटल भूजल योजनेअंतर्गत सिमेंट आणि मातीचे नालाबांध, नाला खोलीकरण कामे, नवीन आणि दुरुस्त केलेले पाझर तलाव, सलग समतल चर, रिचार्ज शाफ्ट, शेततळी आणि कोल्हापूर पद्धतीचा बंधारा यांसारख्या एकूण ३३,९२२ संरचनांची कामे पूर्ण
- एकूण २.६३ लाख हेक्टर क्षेत्रात पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याच्या पद्धतीचे अवलंबन
- एकूण ७३ पाणलोट क्षेत्रांपैकी ६६ पाणलोट क्षेत्रांमध्ये भूजल उपसा टक्केवारीमध्ये घट नोंदवली आणि ४४ पाणलोट क्षेत्रांच्या भूजल मूल्यांकन वर्गवारीमध्ये सकारात्मक बदल
- भूजल उपसाची वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे : ≤ ७०% - सुरक्षित, >७०% आणि ≤ ९०% - अंशतः शोषित, > ९०% आणि ≤ १००% - शोषित, > १००% - अतिशोषित

## अटल पुनरुज्जीवन व नागरी परिवर्तन अभियान (अमृत)

१०.८९ सन २०१५-१६ पासून या अभियानाची अंमलबजावणी राज्यातील ४४ शहरांमध्ये करण्यात येत आहे.

**अमृत अभियानाची साध्ये (माहे जानेवारी २०२६ पर्यंत)**

- एकूण ३७ मंजूर पाणी पुरवठा प्रकल्पांपैकी ₹ ३,०२६ कोटी किंमतीचे २८ प्रकल्प पूर्ण झाले
- एकूण ३० मंजूर मलनिःसारण प्रकल्पांपैकी ₹ १,९६६ कोटी किंमतीचे १८ प्रकल्प पूर्ण झाले
- ₹ १७९ कोटी किंमतीचे सर्व १२८ मंजूर हरितक्षेत्र (अमृतवन) प्रकल्प कार्यान्वित झाले

१०.९० अमृत २.० अभियान सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीमध्ये राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत ₹ २७,१६२ कोटी किंमतीच्या २७५ प्रकल्पांना भारत सरकारने मान्यता दिली आहे.

# नगरोत्थान महाभियान

१०.९१ राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याच्या अनुषंगाने नगरोत्थान महाभियान सन २०१० पासून राबविण्यात येत आहे. नगरोत्थान महाभियानाचा तपशील तक्ता १०.६७ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.६७ नगरोत्थान महाभियानाचा तपशील**

(जानेवारी २०२६ पर्यंत)

| बाब | मंजूर प्रकल्प (संख्या) | किंमत (₹ कोटी) | पूर्ण केलेले प्रकल्प (संख्या) | किंमत (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|
| पाणी पुरवठा योजना | २४४ | १२,५५६ | ६४ | २,६७९ |
| मलनिःसारण / पर्जन्य जलवाहिनी / घनकचरा व्यवस्थापन | १०३ | ११,४१० | १८ | १,१६३ |
| इतर (रस्ते / उड्डाणपूल / जमीन अधिग्रहण इत्यादी) | १५२ | ११,४९२ | ५१ | ३,७२४ |

*आधार :* नगर विकास विभाग , महाराष्ट्र शासन

# स्वच्छता

१०.९२ सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण आणि रोगांचा प्रसार रोखण्यासाठी स्वच्छता आवश्यक आहे. स्वच्छ पाणी, शौचालय सुविधा आणि कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट यामुळे जीवनाची गुणवत्ता सुधारून समाजासाठी एक आरोग्यदायी वातावरण निर्माण होते. स्वच्छता सुविधा पुरवण्यासाठी राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहेत.

## स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)

१०.९३ राज्यात दि. २ ऑक्टोबर २०१४ पासून स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागात स्वच्छता राखणे, उघड्यावर मलविसर्जन करण्याच्या सवयीस प्रतिबंध करणे, कुटुंबांसाठी वैयक्तिक शौचालये बांधणे व त्याच्या वापरात सातत्य राखणे ही या अभियानाची उद्दिष्टे आहेत. हागणदारीमुक्त दर्जा टिकविणे, घन व द्रव कचऱ्याचे व्यवस्थापन आणि सर्व गावांचे हागणदारी मुक्त वरून हागणदारी मुक्त प्लस मॉडेलमध्ये रूपांतरण याव्दारे संपूर्ण स्वच्छता साध्य करण्याच्या उद्देशाने स्वच्छ भारत अभियान ग्रामीण - टप्पा २ राज्यात सन २०२०-२१ पासून राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ ३८४.९ कोटी तर सन २०२५-२६ मध्ये जानेवारी पर्यंत ₹ ४५०.३ कोटी खर्च झाला. स्वच्छ भारत अभियान ग्रामीण - टप्पा २ चा तपशील तक्ता १०.६८ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.६८ स्वच्छ भारत अभियान ग्रामीण-टप्पा २ चा तपशील**

(योजनेच्या सुरुवातीपासून दि. २० जानेवारी २०२६ पर्यंत)

| घटक | तपशील (संख्या) | उद्दिष्ट | साध्य |
|---|---|---|---|
| घन कचरा व्यवस्थापन | गावे | ४०,२४७ | ३५,५६७ |
| द्रव कचरा व्यवस्थापन | गावे | ४०,२४७ | ३८,३८१ |
| प्लास्टिक कचरा व्यवस्थापन | युनिट | २७९ | १७५ |
| गोबरधन प्रकल्प | युनिट | ३४ | ३२ |
| वैयक्तिक कुटुंब शौचालये बांधणे | कुटुंबे | ८,३८,४४६ | ७,६३,९४७ |
| सामुदायिक स्वच्छता संकुल | संकुले | २१,७९८ | १७,४०३ |
| खुली हागणदारी मुक्त प्लस मॉडेल | घोषित गावे | ४०,२४७ | ३४,५८४ |

*आधार :* पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग ,महाराष्ट्र शासन

## स्वच्छ भारत अभियान (नागरी)

१०.९४ स्वच्छ भारत अभियान (नागरी) हा देशातील सर्व वैधानिक शहरांमध्ये स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि आरोग्य रक्षण सुनिश्चित करण्यासाठी दि. २ ऑक्टोबर २०१४ रोजी सुरू केलेला भारत सरकारचा प्रमुख उपक्रम आहे. स्वच्छ भारत अभियान (नागरी) (२.०) चा दुसरा टप्पा भारत सरकारने दि. १ ऑक्टोबर २०२१ रोजी सुरू केला, ज्याचा उद्देश कचऱ्याच्या सर्व घटकांचे वैज्ञानिक व्यवस्थापन करून 'कचरा मुक्त' शहरे निर्माण करणे हा आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० हे स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० च्या धर्तीवर राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्यात येत आहे.

**आलेख १०.१२ : स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत प्रगती**



**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत संचित प्रगती**




## स्वच्छ सर्वेक्षण (नागरी)-२०२४-२५

१०.९५ स्वच्छ सर्वेक्षण हे स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत आयोजित केले जाणारे एक प्रमुख वार्षिक स्वच्छता सर्वेक्षण आहे. स्वच्छ सर्वेक्षणाचा उद्देश शहरांमधील स्वच्छतेचा स्तर आणि स्वच्छता उपक्रमांची परिणामकारकता तपासणे हा आहे. कचरा व्यवस्थापन पद्धतींमध्ये चक्रीयतेच्या महत्त्वावर भर देणारे स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ हे ‘कमी वापर, पुनः वापर आणि पुनर्वापर’ या संकल्पनेवर आधारित होते. राष्ट्रीय स्तरावर आयोजित स्वच्छ सर्वेक्षण (नागरी) २०२४-२५ मध्ये देशातील ५८ कटकमंडळांसह एकूण ४,५८९ शहरांनी भाग घेतला, त्यापैकी ४१४ शहरे राज्यातील होती.

**साध्ये**

- राज्यातील (नवी मुंबई, मिरा-भाईंदर, पिंपरी-चिंचवड, लोणावळा, विटा, सासवड, देवळाली प्रवरा, पाचगणी, पन्हाळा आणि कराड) या एकूण दहा शहरांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त
- मिरा-भाईंदर महानगरपालिकेस अखिल भारतीय क्रमवारीत प्रथम क्रमांक प्राप्त ( ३ ते १० लाख लोकसंख्येच्या श्रेणीत)
- कराड नगरपालिकेस अखिल भारतीय क्रमवारीत द्वितीय क्रमांक प्राप्त (५० हजार ते ३ लाख लोकसंख्येच्या श्रेणीत)
- एकूण १४८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कचरा मुक्त शहरे स्टार रेटिंग प्रमाणपत्रे प्राप्त त्यापैकी नवी मुंबई आणि पिंपरी-चिंचवडला सात स्टार प्रमाणपत्र, ४ शहरांना (मिरा-भाईंदर, पुणे, लोणावळा आणि विटा ) यांना पंचतारांकित प्रमाणपत्र, २२ शहरांना ३ स्टार प्रमाणपत्र आणि १२० शहरांना १ स्टार प्रमाणपत्र प्राप्त
- सात शहरांना (नवी मुंबई, लोणावळा, विटा, सासवड, देवळाली प्रवरा, पाचगणी आणि पन्हाळा) स्वच्छ सर्वेक्षणामध्ये वर्षानुवर्षे स्वच्छतेच्या बाबतीत असामान्य कामगिरीसाठी “सुपर स्वच्छ लीग” अंतर्गत पुरस्कार प्राप्त

## घनकचरा व्यवस्थापन (नागरी)

१०.९६ राज्यात दररोज सरासरी २५,५३४ मे. टन कचरा निर्माण होत असून त्यापैकी ९९.३ टक्के कचरा घरोघरी जाऊन गोळा केला जातो. गोळा केलेल्या कचऱ्यापैकी ९९.५ टक्के कचरा उदगामांच्या ठिकाणी ओला व सुका असा विलगीकृत केला जातो आणि त्यापैकी ८८ टक्के कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया केली जाते. सद्यस्थितीत राज्यातील ४११ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी ३५६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांना मान्यता प्राप्त असून त्यांची अंमलबजावणी विविध स्तरावर सुरु आहे.

१०.९६.१ विलगीकरण केलेल्या ओल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करुन कंपोस्ट खताची निर्मिती केली जाते. या खताच्या विक्री व विपणनासाठी राज्याने ‘हरित महासिटी’ कंपोस्ट ब्रँड ची नोंदणी केली आहे. राज्यातील एकूण २७९ शहरांना कंपोस्ट खताच्या विक्रीसाठी ‘हरित महासिटी’ कंपोस्ट ब्रँड वापर करण्यास परवानगी दिली आहे.

# पर्यावरण संवर्धन

१०.९७ भावी पिढ्यांसाठी पृथ्वी राहण्यायोग्य राहते हे सुनिश्चित करण्यासाठी पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि शाश्वत पर्यावरणीय विकासाला चालना देणे महत्त्वाचे आहे. औद्योगिक वाढ, शहरी विस्तार, जागतिक तापमान वाढ आणि जंगलतोड यांच्या वाढत्या दबावामुळे पर्यावरणाचा सतत ऱ्हास होत आहे म्हणून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी पर्यावरणपूरक शाश्वत धोरणे स्वीकारणे निकडीचे आहे. संवर्धन आणि जैवविविधतेचे महत्त्व समजून घेऊन, संयुक्त राष्ट्रांनी पर्यावरण संरक्षण हा शाश्वत विकास उद्दिष्टांचा मध्यवर्ती स्तंभ बनवला आहे. या जागतिक प्रयत्नांच्या अनुषंगाने, राज्याने पुढे-विचार करणारी धोरणे विकसित केली आहेत, नाविन्यपूर्ण आणि सर्वसमावेशक हरित उपक्रम स्वीकारले आहेत आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) मार्फत पर्यावरणविषयक कायद्यांची सक्रियपणे अंमलबजावणी केली आहे.

## प्रदुषण नियंत्रण

१०.९८ **हवा प्रदूषण:** हवेतील प्रदूषण ही मानवी आरोग्य आणि पर्यावरण विषयक गंभीर समस्या आहे. वाहनांमधून तसेच उद्योगांमधून होणारे वायू उत्सर्जन, बांधकामे, रस्त्यावरील धूळ आणि उघड्यावर जाळला जाणारा कचरा हे हवेच्या प्रदूषणास मुख्यत्वे कारणीभूत आहेत. हवेचे प्रदूषण प्रतिबंधित, नियंत्रित व कमी करण्यासाठी राज्यात 'हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१' ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राष्ट्रीय हवा गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत हवेच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी सल्फर डायऑक्साइड ($SO_2$), नायट्रोजन ऑक्साईड्स ($NO_x$) आणि रेस्पीरेबल सस्पेंडेड पार्टिक्युलेट मॅटर (RSPM/PM10) या तीन प्रमुख हवा प्रदूषकांचे नियमित निरीक्षण केले जाते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे राज्यातील ६९ ठिकाणी निरंतर वातावरणीय हवा गुणवत्ता निरिक्षण पद्धतीद्वारे हवा प्रदूषण स्थितीचे मूल्यांकन केले जाते.

१०.९९ कार्बन डायऑक्साईड वायू प्रामुख्याने डिझेल, पेट्रोल व नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांच्या ज्वलनामुळे उत्सर्जित होतो. हवा प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी शासनाद्वारे अल्प प्रमाणात गंधक असलेले डिझेल, शिसेरहित पेट्रोल, एलपीजी/ सीएनजी यांचा पर्यायी इंधन म्हणून वापर यासह इत्यादी विविध उपाययोजना शासनाद्वारे राबविल्या जात आहेत. याव्यतिरिक्त प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राची (पीयूसी) अनिवार्यता, १५ वर्षे जुन्या वाहनांवर बंदी, आठ वर्षे जुनी वाहने एलपीजी/सीएनजी मध्ये रुपांतरित करणे आणि विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन देणे अशा महत्वाच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. सन २०२५-२६ डिसेंबर पर्यंत, ८.८ टक्के एलपीजी/सीएनजी आणि ८.३ टक्के वीजेवर चालणारी वाहने होती. राज्यातील नोंदणीकृत वाहनांची संख्या तक्ता १०.६९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६९ राज्यातील नोंदणीकृत वाहनांची संख्या**

(संख्या)

| वर्ष | एकूण | त्यापैकी | |
|---|---|---|---|
| | | एलपीजी / सीएनजीवर चालणारी | विजेवर चालणारी |
| २०२०-२१ | १७,२८,६८८ | ६४,८७१ | ९,४०६ |
| २०२१-२२ | १८,७९,७३१ | ८८,७८७ | ५१,४४९ |
| २०२२-२३ | २४,१५,६७३ | १,३२,५८६ | १,४३,३७६ |
| २०२३-२४* | २५,८२,६८७ | १,५५,००२ | १,८६,४८० |
| २०२४-२५* | २९,०५,५०१ | २,७६,५१० | २,५९,०४१ |
| २०२५-२६*+ | २४,९७,९०४ | २,१९,०८९ | २,०६,८३७ |

* अस्थायी + डिसेंबर पर्यंत

*आधार:* परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन

१०.१०० **ध्वनी प्रदूषण:** ध्वनी प्रदूषणामुळे कमी ऐकू येणे, कायमस्वरुपी बहिरेपणा, मानसिक विकार, भयगंड इत्यादी आरोग्य विषयक विविध समस्या उद्भवतात. रस्त्यावरील वाहनांची वरदळ, औद्योगिक उपक्रम, बांधकाम क्रियाकलाप आणि उत्सव, सण, विवाह किंवा धार्मिक कार्यक्रम ही ध्वनी प्रदूषणाची प्रमुख कारणे आहेत. ध्वनी प्रदूषणाचा प्रभाव जाणून घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रमुख शहरांमध्ये प्रतिवर्षी 'परिवेशीय ध्वनी स्तर नियंत्रण कार्यक्रम' राबविते. निवासी, व्यावसायिक आणि शांतता क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी ध्वनीपातळी मोजली जाते. 'ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०००' नुसार निवासी भागाकरिता महत्तम ध्वनी पातळी मर्यादा दिवसा ५५ व रात्री ४५ डेसिबल आहे. निवडक शहरांमधील सन २०२४ व सन २०२५ मधील दिवाळी दरम्यान दिवसा व रात्रीचे ध्वनी स्तराचे प्रमाण तक्ता १०.७० मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.७०   निवडक शहरांमधील सन २०२४ व २०२५ मधील दिवाळी दरम्यान दिवस व रात्रीचे ध्वनी स्तराचे प्रमाण**

(डेसिबल)

| ठिकाण | २४ ऑक्टो, २०२४ | | १ नोव्हें, २०२४ | | १३ ऑक्टो, २०२५ | | २० ऑक्टो, २०२५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री |
| मुंबई (शिवाजी पार्क-दादर) | ७३.४ | ६६.९ | ७९.८ | ६३.९ | ७७.३ | ६८.४ | ८१.७ | ७५.९ |
| मुंबई (चेंबूर) | ६६.८ | ६३.७ | ७७.० | ६०.७ | ६८.३ | ६५.३ | ७६.६ | ७३.७ |
| ठाणे (गोखले रोड) | ६९.९ | ६९.२ | ५८.० | ६२.० | ६९.७ | ६७.९ | ७१.७ | ६४.९ |
| ठाणे (वागळे इस्टेट) | ८२.५ | ६७.१ | ६५.९ | ६०.९ | ७३.७ | ६५.७ | ७२.४ | ६६.५ |
| पुणे (स्वारगेट) | ७५.८ | ६६.४ | ७४.९ | ७२.२ | ७४.९ | ६९.५ | ७५.७ | ७३.२ |
| पुणे (लक्ष्मी रोड) | ७७.४ | ६५.५ | ८३.२ | ७५.५ | ७५.० | ५८.२ | ८२.१ | ७४.२ |
| नाशिक (मुख्य बस स्थानक ) | ६९.८ | ६५.४ | ७०.९ | ६२.९ | ६७.० | ६१.१ | ७९.६ | ७८.२ |
| नाशिक  (बीटको पॉईंट) | ७२.० | ६५.६ | ७२.२ | ६५.३ | ६७.६ | ५६.७ | ७७.७ | ७०.२ |
| छत्रपती संभाजीनगर (सिटी चौक) | ६४.३ | ४८.८ | ७७.० | ६०.७ | ५८.४ | ५०.० | ६८.१ | ५७.६ |
| छत्रपती संभाजीनगर (क्रांती चौक) | ७१.३ | ५८.४ | ७९.२ | ६८.६ | ६२.९ | ५३.५ | ६७.६ | ५७.० |
| नागपूर  (सदर) | ६७.९ | ५४.२ | ६८.३ | ६५.० | ६६.५ | ५५.४ | ७०.४ | ६४.८ |
| नागपूर  (सिव्हील लाईन) | ७०.२ | ५७.८ | ६७.९ | ६७.० | ६८.३ | ५७.४ | ६८.९ | ६९.५ |
| अमरावती  (राजकमल चौक) | ७३.१ | ६०.८ | ७३.९ | ७२.५ | ७४.७ | ६६.८ | ७८.० | ६९.८ |
| अकोला (जिल्हाधिकारी कार्यालय) | ७३.७ | ६४.१ | ८०.८ | ७२.३ | ७८.२ | ५९.९ | ८०.७ | ६५.१ |

*आधार*: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

१०.१०१  **जल प्रदूषण:** जल प्रदूषण ही नद्या, तलाव, जलसाठे, भूजल आणि किनारी भाग प्रभावित करणारी गंभीर समस्या आहे. जल प्रदूषणाच्या प्रमुख स्रोतांमध्ये औद्योगिक सांडपाणी, शेतीतून वाहून जाणारे खते व किटकनाशक मिश्रित पाणी, सांडपाणी, इत्यादींचा समावेश होतो. यामुळे विविध जलजन्य रोग उद्भवतात आणि मातीची गुणवत्ता देखील खालावते. राज्यात जल प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रणासाठी तसेच जल गुणवत्ता राखणे किंवा पूर्ववत करण्यासाठी 'जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४' ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राष्ट्रीय जल गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नियमितपणे २७२ संनियंत्रण केंद्रांवर पाण्याच्या गुणवत्तेचे परीक्षण करते. या २७२ सनियंत्रण केंद्रांमधील. भूपृष्ठावरील जलस्रोत (नद्यांवरील १७७, समुद्र/खाड्यांवरील/नाला/गटार ४५) आणि ५० भूजल जलस्रोतांमधून पाण्याचे नमुने गोळा केले जातात. नऊ मुख्य बाबी व १९ सामान्य बाबींसाठी भूपृष्ठावरील पाण्याच्या नमुन्याचे दरमहा विश्लेषण केले जाते, तर धातू व किटकनाशकांचे अंश शोधण्यासाठी भूजल नमुन्यांची सहामाही चाचणी केली जाते. जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील राज्यातील १७७ केंद्रांवरील जल गुणवत्ता तक्ता १०.७१ मध्ये दिली आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीची राज्यातील भूपृष्ठावरील निवडक नद्यांवरील संनियंत्रण केंद्रांतील जल गुणवत्ता तक्ता १०.७२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७१ सन २०२५ मधील राज्यातील १७७ केंद्रांवरील जल गुणवत्ता**

(डिसेंबर पर्यंत)

| बाब | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सामु (pH मूल्य ) | | जैव-रासायनिक प्राणवायूची मागणी | | विरघळलेला प्राणवायू | | फिकल कॉलिफॉर्म | | नायट्रेट | |
| ६.० ते ९.०# | | ३ मि ग्रॅ/लि# पेक्षा कमी | | ४ मि ग्रॅ/लि# पेक्षा जास्त | | एमपीएन/१०० मि लि# | | ४५ मि ग्रॅ/लि-पेक्षा कमी | |
| विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने | | स्थाने |
| अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी | ० | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी | ० | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी | २३ | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी | ० | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी | ० |
| अनुज्ञेय मर्यादेत | १७६ | अनुज्ञेय मर्यादेत | ३३ | अनुज्ञेय मर्यादेत | १५४ | अनुज्ञेय मर्यादेत | १७५ | अनुज्ञेय मर्यादेत | १७७ |
| अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त | ० | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त | १४४ | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त | ० | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त | २ | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त | ० |
| कोरडी नदी | १ | - | - | - | - | - | - | | - |

मिग्रॅ/लि  मिलिग्रॅम / लिटर    # केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे जल गुणवत्तेचे निकष, वर्ग क एमपीएन प्रोबेबल नंबर

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**तक्ता १०.७२ जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीची राज्यातील भूपृष्ठावरील निवडक नद्यांवरील संनियंत्रण केंद्रांतील जल गुणवत्ता**

| संनियंत्रण केंद्र | सामु (pH मूल्य) | विरघळलेला प्राणवायू (मि ग्रॅ/लि) | बी.ओ.डी. (मि ग्रॅ/लि) | सी.ओ.डी. (मि ग्रॅ/लि) | नायट्रेट (मि ग्रॅ/लि) | फिकल कॉलीफार्म (मि ग्रॅ/लि) |
|---|---|---|---|---|---|---|
| कृष्णा नदी वरील राजापूर बंधारा | ८.० | ६.३ | ३.० | १४.२ | १.७ | ६.५ |
| गोदावरी नदी वरील जायकवाडी धरण - पैठण | ८.४ | ७.० | ३.० | १२.४ | ०.६ | १.८ |
| मुळा-मुठा नदी वरील मुंढवा पूल | ७.४ | ३.३ | १३.२ | ३९.१ | २.४ | ८६.६ |
| कन्हान नदी वरील मेसर्स विदर्भ पेपर मिल्सच्या उतारावर | ८.२ | ६.१ | ४.० | १७.४ | २.२ | १०४.९ |
| पुर्णा नदी वरील धुपेश्वर येथे मलकापूर वॉटर वर्क्स च्या वरील बाजूस | ८.३ | ६.० | ४.७ | १७.२ | २.१ | ८१.६ |
| दारणा नदी वरील दारणा धरण-अस्वली | ८.३ | ५.८ | ३.१ | ९.३३ | ०.८ | ९.७ |
| सावित्री नदी वरील मुठावली गाव | ७.७ | ६.० | ८.४ | ११४.५ | १.१ | ७.८ |
| मिठी नदी वरील बांद्रा, मुंबई नजीकच्या पुलाजवळ | ७.२ | ०.५ | ४२.८ | १०१.८ | १.३ | १,८८२.२ |

*आधार :* महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ  बी.ओ.डी. जैव-रासायनिक प्राणवायूची मागणी  सी.ओ.डी. रासायनिक प्राणवायूची मागणी

१०.१०२ **कारखान्यांमुळे होणारे प्रदूषण:** सन २०२५-२६ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यकक्षेत डिसेंबर पर्यंत एकूण १,४३,५४८ कारखाने होते. प्रदूषण निर्देशकांवर आधारित सन २०२५-२६ मधील कारखान्यांचे वर्गीकरण तक्ता १०.७३ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.७३ प्रदूषण निर्देशाकांवर आधारित सन २०२५-२६ मधील कारखान्यांची संख्या**

(संख्या) (डिसेंबर पर्यंत)

| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विभाग | कारखाने | | | | | | | | | धवल | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लाल | | | नारिंगी | | | हिरवा | | | | |
| | मोठे | मध्यम | लहान | मोठे | मध्यम | लहान | मोठे | मध्यम | लहान | | |
| मुंबई | ७०४ | ६६ | ७९० | ७४९ | २९३ | १,७६८ | ४२ | ५० | २,७३८ | २३७ | ७,४३७ |
| ठाणे | ३६५ | ७८ | १,२२१ | २९३ | ८१ | १,६९७ | ५३ | ५५ | २,४९५ | ९७४ | ७,३१२ |
| कल्याण | २५५ | ९० | २,३४० | १७२ | ११० | २,०७४ | ४४ | ४६ | २,४३३ | १,३०८ | ८,८७२ |
| नवी मुंबई | २७५ | ७० | १,१८६ | २१४ | १४२ | १,५३४ | ८२ | ८६ | २,४३५ | १,२९५ | ७,३१९ |
| रायगड | ३६० | ७६ | ६२४ | १७५ | ६९ | १,१७६ | ६५ | ४८ | ९२२ | २४१ | ३,७५६ |
| पुणे | २,३०९ | ३२४ | २,९४९ | १,८७२ | ६११ | ७,१८३ | ७४३ | ५३३ | ९,५६० | ४,५९८ | ३०,६८२ |
| कोल्हापूर | ३४९ | ९४ | १,४४८ | १२४ | १४९ | ५,८७२ | ५४ | ४२ | ८,६५२ | ६,१४१ | २२,९२५ |
| नाशिक | ६४३ | १३९ | १,७५५ | ३२० | २४१ | ४,७७० | १९१ | १५४ | ६,८६९ | ५,४०६ | २०,४८८ |
| छत्रपती संभाजीनगर | ३६४ | ४६ | ६७३ | २१३ | १५९ | ३,६४२ | ११९ | ११४ | ६,७०० | १,४८७ | १३,५१७ |
| अमरावती | ३७ | ७ | १३० | ३७ | २५ | २,५३१ | ११ | २० | ५,२७८ | १,१०२ | ९,१७८ |
| नागपूर | ३४१ | ४१ | १,०५९ | १६५ | १४९ | ३,६२८ | ३० | ५२ | ३,४७५ | ७३६ | ९,६७६ |
| चंद्रपूर | १६६ | ४२ | १२४ | २१ | ३७ | ७०५ | ११ | ५ | ९०८ | ३६७ | २,३८६ |
| **एकूण** | **६,१६८** | **१,०७३** | **१४,२९९** | **४,३५५** | **२,०६६** | **३६,५८०** | **१,४४५** | **१,२०५** | **५२,४६५** | **२३,८९२** | **१,४३,५४८** |

लाल : प्रदूषण निर्देशांक ६० किंवा जास्त  नारिंगी : प्रदूषण निर्देशांक ४१ ते ५९ च्या दरम्यान  हिरवा : प्रदूषण निर्देशांक २१ ते ४० च्या दरम्यान

धवल : प्रदूषण निर्देशांक २० किंवा कमी

*आधार :* महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

१०.१०२.१ लघु उद्योगांमध्ये निर्माण होणाऱ्या घातक व अघातक घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे यासाठी प्रदूषण नियंत्रण उपकरणे बसविण्याकरिता सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्र योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य दिले जाते. सन २०२५-२६ मध्ये २६ औद्योगिक वसाहतींमध्ये ७,८८५ कारखान्यांसाठी सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे कार्यान्वित केली असून डिसेंबर पर्यंत प्रति दिन सरासरी १,७३१ लाख लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात आली.

## कचरा व्यवस्थापन

१०.१०३ **घन कचरा:** घन कचऱ्यामध्ये घरगुती कचरा, बांधकाम व पाडलेल्या बांधकामाचा मलबा, औद्योगिक कचरा, ड्रेनेज मलबा आणि निवासी व वाणिज्यिक संकुलातील कचरा यांचा समावेश होतो. सन २०२५ मध्ये एकूण निर्मित घन कचऱ्यापैकी प्रतिदिन सरासरी ८१.८ टक्के घन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली. घन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी ४०० स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ४५६ सेंद्रिय खत निर्मीती, ११२ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १४५ गांडूळखत प्रकल्प, ४५ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५७ जैव मिथेन निर्मीती प्रकल्प, १५ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २३ कचरा आधारित इंधन प्रकल्प आणि कचऱ्यापासून वीज निर्मितीचे २९ मेगा वॅट क्षमतेचे चार प्रकल्प कार्यरत आहेत. राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील सन २०२५ मध्ये घनकचरा निर्मिती व प्रक्रिया तक्ता १०.७४ मध्ये दिली आहे.

**आलेख १०.१३ : प्रदूषण निर्देशांकावर आधारित कारखान्यांची संख्या २०२५-२६ (डिसेंबर २०२५ पर्यंत)**




**आलेख १०.१४ : घनकचरा निर्मिती व शास्त्रीयरीत्या प्रक्रिया**




**तक्ता १०.७४ राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील सन २०२५ मधील घनकचरा निर्मिती व प्रक्रिया**

| स्थानिक संस्था | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (संख्या) | घनकचरा निर्मिती (मे. टन प्रतिदिन) | घनकचरा प्रक्रिया (मे. टन प्रतिदिन) | प्रक्रिया केलेल्या घनकचऱ्याची टक्केवारी (%) |
|---|---|---|---|---|
| महानगर पालिका | २९ | २०,०८१ | १६,३३४ | ८१.३ |
| नगर पालिका | | | | |
| अ वर्ग | १५ | ९६८ | ७५४ | ७७.९ |
| ब वर्ग | ७७ | १,३८५ | १,२१२ | ८७.५ |
| क वर्ग | १५५ | १,१३२ | १,००५ | ८८.८ |
| नगर पंचायत | १४७ | ५८१ | ४३७ | ७५.२ |
| कटक मंडळे | ७ | १५० | १३२ | ८८.० |
| **एकूण** | **४३०** | **२४,२९७** | **१९,८७४** | **८१.८** |

*आधार :* महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

१०.१०४ **घातक कचरा:** मानवी आरोग्यास तसेच पर्यावरणास हानीकारक असणारा कचरा म्हणजे घातक कचरा होय. या कचऱ्याच्या व्यवस्थापनाकरिता ‘घातक व इतर कचरा (व्यवस्थापन व सीमापार वाहतूक) नियम, २०१६’ राज्यात लागू आहे. राज्यात सन २०२४-२५ मध्ये, ४.४१ लाख मेट्रिक टन घातक कचरा सामाईक सुविधा केंद्रांकडे पाठविण्यात आला. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ३५० घातक कचरा वाहतुकदारांना प्राधिकृत केले असून घातक कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांचा मागोवा घेण्यासाठी वाहनांवर जागतीक स्थान निर्धारण (जीपीएस) स्थापित करणे अनिवार्य केले आहे. राज्यात तळोजा (रायगड), महापे (ठाणे), रांजणगाव (पुणे) आणि बुटीबोरी (नागपूर) येथे घातक कचरा व्यवस्थापनासाठी सामाईक सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. राज्यातील सामाईक सुविधा केंद्रांची भूभरणाकरिता क्षमता एकूण ४.९२ लाख मेट्रिक टन असून भस्मीकरणाकरीता ८८,४८० मेट्रिक टन प्रतिवर्ष आहे. सामाईक सुविधा केंद्रांमधील घातक कचरा संकलन व प्रक्रिया बाबत माहिती तक्ता १०.७५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७५ सामाईक सुविधा केंद्रांमधील घातक कचरा संकलन व प्रक्रिया बाबत माहिती.**

(लाख मे. टन)

| वर्ष | घातक कचरा संकलन | | | | | प्रक्रिया | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड, तळोजा (रायगड) | ट्रान्स ठाणे वेस्ट मॅनेजमेंट असोसिएशन, महापे (ठाणे) | महाराष्ट्र एन्व्हायरो पॉवर लिमिटेड, रांजणगाव (पुणे) | विदर्भ एन्व्हायरो प्रोटेक्शन लिमिटेड, बुटीबोरी (नागपूर) | एकूण | भूभरणा | भस्मीकरण |
| २०२२-२३ | २.५६ | ०.१८ | १.०७ | ०.२२ | ४.०३ | ३.३३ | ०.७० |
| २०२३-२४ | २.८३ | ०.२३ | १.२१ | ०.२४ | ४.५१ | ३.८८ | ०.६३ |
| २०२४-२५ | २.८३ | ०.१९ | १.१३ | ०.२६ | ४.४१ | ३.८२ | ०.५९ |

*आधार*: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

१०.१०५ **इलेक्ट्रॉनिक कचरा:** मोडीत काढलेले विद्युत तसेच इलेक्ट्रॉनिक उपकरणे व त्यांचे सुटे भाग इलेक्ट्रॉनिक कचरा (ई - कचरा) म्हणून ओळखले जाते. सन २०२४-२५ मध्ये 'ई-कचरा व्यवस्थापन नियम, २०१६' अंतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणास अनुकुल तंत्रज्ञान असलेल्या ३१४ उद्योगांना ई-कचऱ्याचे भाग सुटे करणे/पुनश्चक्रण करणे यासाठी मान्यता दिली असून त्यांची एकूण क्षमता प्रतिवर्ष ६,५४,०६२ मे. टन आहे.

१०.१०६ **जैव-वैद्यकीय कचरा:** जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार जैव-वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) आरोग्यसेवा संस्थांना अधिकृतता प्रदान करते. सन २०२४ या वर्षात राज्यात एकूण ७६,६४५ आरोग्यसेवा संस्था MPCB च्या कार्यक्षेत्रात होत्या. राज्यात दररोज सरासरी ७७.७० मेट्रिक टन (MT) जैव-वैद्यकीय कचरा निर्माण होत असून त्यावर ३४ सामायिक जैव-वैद्यकीय कचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्रांमध्ये (CBWTFs) प्रक्रिया करण्यात येत होती आणि सर्व केंद्रे जाळणी (इन्सिनरेशन) पद्धतीवर कार्यरत आहेत.

१०.१०७ **प्लास्टिक कचरा:** प्लास्टिक व थर्माकोल कचऱ्याचे संकलन, विलगीकरण व विल्हेवाट लावण्याच्या अयोग्य पद्धतींमुळे पर्यावरण विषयक अनेक समस्या निर्माण होत आहेत. जैव-विघटनशील नसणाऱ्या प्लास्टिक कचऱ्यामध्ये होत असलेली वाढ पर्यावरण व आरोग्याच्या हानीस कारणीभूत ठरत आहेत. काही प्रकारच्या प्लास्टिक आणि थर्माकोल उत्पादनांच्या उत्पादन व वापरावर बंदी घालण्याकरीता राज्य शासनाने 'महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकोल उत्पादने (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवण) अधिसूचना, २०१८' जारी केली आणि वेळोवेळी सुधारित केली आहे. सन २०२५-२६ मध्ये एकूण २.८१ लाख आस्थापनांची तपासणी करण्यात आली, ९२९ मेट्रिक टन प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले आणि प्रतिबंधित प्लास्टिक/थर्मोकोल उत्पादनांच्या वापरासाठी १५,३८३ आस्थापनांकडून ` ६.५९ कोटी दंड वसूल करण्यात आला.

१०.१०७.१ राज्यात ४३० नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ५१३ सामग्री पुनप्राप्ती सुविधा केंद्रे असून तेथे सुक्या कचऱ्यातून प्लास्टिक, कागद, लोखंड, इलेक्ट्रॉनिक साहित्य वेगळे करून पुनर्प्रक्रियेकरीता पाठविले जाते. नोव्हेंबर २०२५ अखेर राज्यात एकूण प्रति वर्ष १९.९९ लाख मे. टन क्षमतेचे ३५३ प्लास्टिक पुनर्प्रक्रिया उद्योग आहेत. राज्यातील नागरी भागात निर्मित, संकलित आणि विल्हेवाट लावलेल्या प्लास्टिक कचऱ्याची माहिती तक्ता १०.७६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७६ राज्यातील नागरी भागात निर्मित, संकलित आणि विल्हेवाट लावलेल्या प्लास्टिक कचऱ्याची माहिती**

(लाख मे. टन)

| वर्ष | निर्मित | संकलित | विल्हेवाट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आरडीएफसाठी | सहप्रक्रियेसाठी | ग्रॅन्युल तयार करण्यासाठी | पायरोलिसीस साठी | रस्ते बांधणीसाठी | भूभरण सुविधेसाठी |
| २०२२-२३ | ३.९५ | २.८७ | १.७१ | ०.०२ | ०.५७ | ०.०५ | ०.१३ | ०.१४ |
| २०२३-२४ | ४.२७ | ३.६१ | २.१५ | ०.१० | ०.७२ | ०.०९ | ०.०९ | ०.१८ |
| २०२४-२५ | ५.४४ | ४.३८ | २.७२ | ०.०२ | ०.२१ | ०.०५ | ०.३३ | १.०३ |

*आधार*: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आर. डी. एफ.- रिफ्यूज डिराइव्ड फ्यूएल

१०.१०८ **सांडपाणी प्रक्रिया:** सांडपाणी प्रक्रियेद्वारे सांडपाणी दूषित पदार्थ काढून टाकून पुनर्वापरासाठी योग्य अशा पाण्याची निर्मिती करुन जल प्रदूषण प्रतिबंधित केले जाते. राज्यात एकूण ७,३३५ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेची १७१ सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे (STP) बसवण्यात आली आहेत. राज्यात सन २०२५-२६, डिसेंबर पर्यंत एकूण निर्माण झालेल्या सांडपाण्यापैकी ५१.४ टक्के पाण्यावर प्रक्रिया करण्यात आली. सन २०२५-२६ मधील राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील सांडपाणी निर्मिती व प्रक्रिया याबाबत माहिती तक्ता १०.७७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७७ सन २०२५-२६ मधील राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील सांडपाणी निर्मिती व प्रक्रिया बाबत माहिती.**

(डिसेंबर पर्यंत)

| स्थानिक संस्था | माहिती देणाऱ्या नागरी स्वराज्य स्थानिक संस्था (संख्या) | प्रक्रिया केंद्रे (संख्या) | सांडपाणी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | निर्मिती (दशलक्ष लिटर प्रतिदिन) | प्रक्रिया (दशलक्ष लिटर प्रतिदिन) | % (प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची निर्माण झालेल्या सांडपाण्याशी) |
| महानगर पालिका | २९ | १३४ | ७,४६३ | ४,६२० | ६१.९ |
| नगर पालिका | | | | | |
| अ वर्ग | १५ | १२ | ३२० | ९६ | ३०.० |
| ब वर्ग | ७७ | १४ | ५८४ | ८८ | १५.० |
| क वर्ग | १५५ | ७ | ५६९ | ३३ | ५.८ |
| नगर पंचायत | १४७ | १ | ४०६ | ४ | १.० |
| कटक मंडळे | ७ | ३ | १२८ | २२ | १७.२ |
| **एकूण** | **४३०** | **१७१** | **९,४७०** | **४,८६३** | **५१.३** |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## संवर्धन

१०.१०९ **सरोवर संवर्धन योजना:** राज्यात सरोवर व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीय संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी कोराडी तलाव, नागपूर व धर्मवीर संभाजी तलाव, सोलापूर या दोन तलावांच्या कामास भारत सरकारने ₹ ५५.९० कोटीची मान्यता दिली असून, या दोन तलावांच्या कामांवर डिसेंबर २०२५ पर्यंत ₹ ३८.३२ कोटी निधी खर्च करण्यात आला आहे.

१०.१०९.१ राज्य सरोवर संवर्धन योजने अंतर्गत राज्य शासनामार्फत अवनत तलावांच्या पर्यावरण संवर्धनाकरीता डिसेंबर २०२५ पर्यंत २०७ तलाव संवर्धनाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

१०.११० **नदी संवर्धन योजना:** राज्यातील प्रमुख नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांचे शुद्धीकरण करण्याकरीता शहरातून निघणारे सांडपाणी नदीत ज्या ठिकाणी सोडले जाते तेथून संकलित करणे, अडविणे, वळविणे व सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा तयार करणे, इत्यादी कामे राष्ट्रीय नदी कृती योजनेअंतर्गत केली जात आहेत. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा शेती, उद्योग, बाग-बगीचे इत्यादींमध्ये पुनर्वापर व पुनर्चक्रण शक्य होण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारण्यात येते. पुणे शहरातील मुळा-मुठा नदीसाठी डिसेंबर २०२५ पर्यंत ₹ ८४३.९८ कोटी निधी खर्च करण्यात आला आहे.

१०.११०.१ राज्यातील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांचे शुद्धीकरण करण्यासाठी राज्य नदी संवर्धन योजना सन २०१४ पासून राबविण्यात येत आहे. चंद्रभागा नदीच्या संवर्धनासाठी नमामी चंद्रभागा मिशन अंतर्गत डिसेंबर २०२५ पर्यंत ₹ ६.९२ कोटी खर्च करण्यात आला.

१०.१११ **माझी वसुंधरा अभियान:** राज्य शासनाकडून हवामान बदल आणि पर्यावरणीय समस्यांबद्दल नागरिकांना जागरूक करण्यासाठी आणि पर्यावरणाच्या सुधारणेच्या दिशेने जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने माझी वसुंधरा अभियान राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राचा शाश्वत विकास सुनिश्चित करणे आणि राज्य पातळीवर हवामानासंबंधी ठोस कारवाई करणे हे देखील या अभियानाचे उद्दीष्ट आहे. माझी वसुंधरा अभियान सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीत सहा टप्प्यात राबविण्यात येत आहे. सन २०२५-२६ मध्ये माझी वसुंधरा ६.० अंतर्गत सर्व ४२३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि २७,९०४ ग्रामपंचायती सहभागी होत आहेत.

**आलेख १०.१५ : माझी वसुंधरा अभियानातील सहभागी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामपंचायत**



माझी वसुंधरा अभियानाची पाच वर्षातील प्रगती खालीलप्रमाणे आहे:

- ४५६.५९ लाख वृक्ष लागवड
- ५३,९४२ हरित क्षेत्राची निर्मिती आणि जतन
- ३०७.५२ मेगा वॅट अपारंपरिक ऊर्जा निर्मिती क्षमता निर्माण केली
- राज्यभरात ४३,०१७ हून अधिक पाझर खड्डे निर्माण केले
- पाझर खड्डे बांधल्यामुळे सुमारे ३२४ कोटी घन मीटर जलसंधारण क्षमता निर्माण झाली
- ३,४८७ पेक्षा अधिक जलस्त्रोत पुर्नजीवित केले आहेत
- ८ लाख टन कार्बन उत्सर्जन टाळले
- सुमारे १९,३१,१९४ जनजागृती कार्यक्रम आयोजित केले

१०.११२ **सागरतटीय विनियमन:** भारत सरकारने 'पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६' अंतर्गत सागरी किनारा क्षेत्रातील पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन आणि विकास कामांचे नियमन करण्यासाठी 'सागरतटीय विनियमन क्षेत्र अधिसूचना' जारी केली आहे. भारत सरकारने सागरतटीय विनियमन क्षेत्र अधिसूचनांची योग्य तऱ्हेने अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण नियुक्त केले आहे. उच्चतम भरती रेषा व राज्यातील सात तटीय जिल्ह्यांचे सागरतटीय व्यवस्थापन नकाशांस केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. राज्य शासनाने सागरतटीय विनियमन क्षेत्र अधिसूचने अंतर्गत दिलेल्या मान्यतांचा तपशील तक्ता १०.७८ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७८ राज्य शासनाने सागरतटीय विनियमन अधिसूचने अंतर्गत देण्यात आलेल्या मान्यतांचा तपशील**

(संख्या)

| वर्ष | नविन इमारत बांधकाम प्रकल्प | इमारत पुनर्बांधकाम प्रकल्प | पायाभूत सुविधा जसे जेट्टी, धूपप्रतिबंधक बंधारे, पाईपलाईन, पूल, रस्ते, पाणी पुरवठा, इलेक्ट्रीक उपकेंद्र इत्यादि | सीआरझेड | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २०२३ | ९७ | ६७ | १७९ | ६ | ३४९ |
| २०२४ | ८६ | ७६ | ५९ | ९ | २३० |
| २०२५ | ६४ | ४८ | १४२ | १ | २५५ |

*आधार*: पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन

१०.११३ **पर्यावरणविषयक मान्यता:** भारत सरकारने 'पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६' जारी केलेली असून त्याअंतर्गत नवीन बांधकाम प्रकल्प, विद्यमान प्रकल्पांचे/क्रियाकलापांचे विस्तार किंवा आधुनिकीकरण करण्यासाठी पूर्व पर्यावरणीय अनुमती घेणे बंधनकारक करण्यात आली आहे. पर्यावरणविषयक अनुमती देण्यासाठी राज्य पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरण गठीत करण्यात आले आहे. राज्य शासनाने मंजूर केलेल्या पर्यावरण विषयक मान्यतांचा तपशील तक्ता १०.७९ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७९ राज्य शासनाने मंजूर केलेल्या पर्यावरण विषयक मान्यतांचा तपशील**

| वर्ष | इमारत बांधकाम प्रकल्प | उद्योग उभारणी प्रकल्प | खाणकाम प्रकल्प | एकूण |
|---|---|---|---|---|
| २०२३-२४ | १,११७ | ८७ | ९४७ | २,१५१ |
| २०२४-२५ | १,५७७ | १२६ | १,४३२ | ३,१३५ |
| २०२५-२६+ | १,७५१ | १५६ | १,५४६ | ३,४५३ |

\+ डिसेंबर पर्यंत

*आधार*: पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन

# सामाजिक न्याय

१०.११४ सामाजिक न्यायामुळे समावेशक व समताधिष्ठित समाजाची निर्मिती होते, ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला न्याय्य वागणूक, समान संधी आणि सन्मानजनक जीवनमान प्राप्त होते. दुर्बल व सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचा शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक स्तर बळकट करून त्यांचा सर्वसमावेशक विकास साधणे हे सामाजिक न्यायाचे मुख्य उद्दिष्ट आहे. अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT), इतर मागास वर्ग (OBC), अल्पसंख्याक, दिव्यांग व्यक्ती तसेच इतर लिंगभाव समुदाय इत्यादी दुर्बल व सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांच्या उन्नतीसाठी शासन (GoM) शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांतील लक्षित उपक्रमांना प्राधान्य देत आहे.

## अनुसूचित जाती घटक कार्यक्रम

१०.११५ सन २०२५-२६ मध्ये अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाअंतर्गत राज्यात एकूण २२९ योजना (१५९ राज्यस्तरीय आणि ७० जिल्हास्तरीय) राबविण्यात येत आहेत. अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाअंतर्गत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व झालेला खर्च तक्ता १०.८० मध्ये आहे.

**तक्ता १०.८० अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाअंतर्गत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | |
|---|---|---|---|---|
| | खर्च | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च+ |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **९,७९२.४४** | **९,१७२.१०** | **१९,६५८.००** | **५,४२६.६३** |
| कृषि व संलग्न कार्ये | ८८.४४ | १२७.१४ | २८५.५५ | ४१.२१ |
| ग्रामविकास | १९९.९७ | ४४७.५४ | २,०५२.६६ | ४१०.९६ |
| ऊर्जा | ५६.०० | १३०.८५ | १००.०० | ६०.०० |
| उद्योग व खनिजे | ९०.८० | ३८.०० | १०५.१५ | १९.६० |
| वाहतूक व दळणवळण | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| सामान्य आर्थिक सेवा | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| सामाजिक व सामूहिक सेवा | ९,१६४.०३ | ८,०१३.१७ | १२,४५८.०२ | ४,६८४.७१ |
| सामान्य सेवा | ४२.६५ | २१७.२१ | ३७५.०० | २.३२ |
| इतर कार्यक्रम | १५०.५५ | १९८.१९ | ४,२८१.६२ | २०७.८३ |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **२,८७८.३०** | **२,९९९.१८** | **३,०००.००** | **८०८.८६** |
| कृषि व संलग्न कार्ये | २५६.२० | २८०.२४ | २८०.७० | ८८.५३ |
| ग्रामविकास | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ऊर्जा | १७०.१२ | १३०.८७ | १७७.१६ | ४३.८६ |
| उद्योग व खनिजे | ५.२९ | ५.५२ | ५.३७ | ०.२२ |
| वाहतूक व दळणवळण | ५३.६४ | ५८.२२ | ६१.०४ | ५.८८ |
| सामाजिक व सामूहिक सेवा | २,३०८.६८ | २,४१८.७६ | २,३६३.१० | ६४९.४२ |
| नाविन्यपूर्ण योजना (इतर कार्यक्रम) | ७६.६६ | ९१.५१ | १९.४८ | ५.१३ |
| सामान्य सेवा | ७.७१ | १४.०६ | ९३.१५ | १५.८२ |
| **एकूण (अ + ब)** | **१२,६७०.७४** | **१२,१७१.२८** | **२२,६५८.००** | **६,२३५.४९** |

टीप :आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही + डिसेंबर अखेर

*आधार:* सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन

१०.११५.१ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारतात व परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्य शासन विविध योजना राबवित आहे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाला प्रोत्साहित करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती तक्ता १०.८१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८१ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजनांची माहिती**

| योजनेचे नाव | उद्दिष्टे | तपशील | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|---|---|
| देशाअंतर्गत उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना | अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशाअंतर्गत उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देणे | लाभार्थी (संख्या) | १२३ | ६९ |
| | | खर्च (₹ कोटी) | ४.८९ | ३.७७ |
| परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना | अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देणे | लाभार्थी (संख्या) | १९१ | १३३ |
| | | खर्च (₹ कोटी) | ५८.४४ | २९.८१ |
| भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना | वसतिगृहामध्ये प्रवेश मिळू न शकलेल्या विद्यार्थ्यांना त्यांची शैक्षणिक शाखा व निवासाचे ठिकाण विचारात घेऊन अर्थसहाय्य केले जाते | लाभार्थी (संख्या) | ५२,०८३ | २६,८२३ |
| | | खर्च (₹ कोटी) | २४९.६३ | १३६.७९ |
| अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांकरीता शासकीय वसतिगृहे | अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाची सोय व्हावी याकरिता राज्य शासन तालुका, जिल्हा व विभाग स्तरावर शासकीय वसतिगृहांची सुविधा उपलब्ध करुन देते. निर्वाह भत्ता इत्यादींची रक्कम विद्यार्थ्यांना देण्यात येते | वसतिगृह (संख्या) | ४४१ | ४४९ |
| | | प्रवेश क्षमता (संख्या) | ४२,८७३ | ४४,६७८ |
| | | खर्च (₹ कोटी) | २१९.४८ | २६९.५५ |
| अनुदानित वसतिगृहे | शिक्षणक्रम पुर्ण करता यावा व ग्रामीण भागामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यामधील शाळा गळतीचे प्रमाण कमी व्हावे याकरीता अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांची या योजनेअंतर्गत निवास व भोजनाची मोफत सोय केली जाते | वसतिगृह (संख्या) | २,३८८ | २,३८८ |
| | | प्रवेश क्षमता (संख्या) | ९९,२५२ | ९९,२५२ |
| | | खर्च (₹ कोटी) | २४७.६२ | ७९.८० |

*आधार:* समाजकल्याण आयुक्तालय, पुणे, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

१०.११५.२ ग्रामीण भागात, महानगरपालिका क्षेत्रात तसेच नगरपालिका क्षेत्रातील निवडक प्रभागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांचा विकास करण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांच्या विकासासाठीच्या विविध योजनांचा तपशील तक्ता १०.८२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८२ अनुसूचित जाती आणि नवबौद्ध वस्तीच्या विकासासाठी विविध योजनांची माहिती**

| योजनेचे नाव | उद्दिष्टे | खर्च (₹ कोटी) | |
|---|---|---|---|
| | | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| ग्रामीण भागात अनुसूचित जाती आणि नवबौद्ध वस्तींचा विकास | या योजनेअंतर्गत मलनिस्सारण सुविधा, रस्ता, समाज मंदिर इत्यादींचे बांधकाम, वीज व पिण्याच्या पाण्याच्या सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा ग्रामीण भागातील अनुसूचित व नवबौद्ध घटकांच्या एकूण ३७,६०४ सूचीबद्ध वस्त्यांमध्ये उपलब्ध करून देणे | ८६२.५७ | २५९.४९ |
| साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना | या योजनेअंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील सूचीबध्द २४९ प्रभाग व नगरपालिका क्षेत्रातील निवडक १,३२९ प्रभागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये मूलभूत नागरी सुविधांचा विकास करणे | १,३६८.२४ | ३३६.३२ |

*आधार:* समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

१०.११५.३ **स्टँड-अप इंडिया योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध नवउद्योजकांसाठी मार्जिन मनी:** ही योजना भारत सरकार (GoI) यांनी २०१५ मध्ये अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) व महिलांमधील नवउद्योजकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुरू केली. या योजनेअंतर्गत नवउद्योजकांना एकूण प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के रक्कम स्वत: उभारावी लागते, तर उर्वरित ७५ टक्के रक्कम लघु उद्योग विकास बँक ऑफ इंडिया (SIDBI) यांच्या हमीवर कर्ज स्वरूपात उपलब्ध करून दिली जाते. महाराष्ट्र शासन (GoM) अनुसूचित जाती व नवबौद्ध उद्योजकांना मार्जिन मनी सहाय्य देत आहे. एकूण प्रकल्प खर्चाच्या २५ टक्क्यांपैकी लाभार्थ्यांकडून १० टक्के स्वहिस्सा देण्यात येतो, तर उर्वरित १५ टक्के मार्जिन मनी राज्य शासनाकडून दिला जातो. सन २०२४-२५ मध्ये पाच नवउद्योजकांना ₹ ०.३५ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर पाच नवउद्योजकांना ₹ ०.५१ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले.

१०.११५.४ **विकास महामंडळे:** अनुसूचित जाती आणि नवबौद्ध समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी राज्य शासनाने विविध विकास महामंडळे स्थापित केली आहेत. ही महामंडळे राष्ट्रीय अनुसूचित जाती व वित्त विकास महामंडळाच्या विविध आर्थिक सहाय्य योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून काम करतात. विकास महामंडळांचा तपशील तक्ता १०.८३ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८३ विकास महामंडळांचा तपशील**

| विकास महामंडळ | भाग भांडवल (₹ कोटी) | राज्य शासन हिस्सा (%) | केंद्र शासन हिस्सा (%) | २०२४-२५ | | २०२५-२६⁺ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लाभार्थी (संख्या) | आर्थिक सहाय्य (₹ कोटी) | लाभार्थी (संख्या) | आर्थिक सहाय्य (₹ कोटी) |
| महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित | १,००० | ५१ | ४९ | ३५,१६७ | ६८.९९ | ६,८७३ | १४.५५ |
| साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित | १,००० | ५१ | ४९ | १,१५० | १५.४१ | १,०३२ | २६.५१ |
| संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादित | १,००० | १०० | ० | ४४१ | १.१२ | ३६४ | १.४५ |

*आधार* : १) महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबर अखेर
२) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकासमहामंडळ मर्यादित
३) संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

१०.११५.५ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)** ही अनुसूचित जाती आणि नवबौद्ध समाजाच्या सामाजिक आर्थिक विकासासाठी कार्य करणारी राज्य शासनाची स्वायत्त संस्था आहे. बार्टी अंतर्गत राबविण्यात येणारे विविध कार्यक्रमांची माहिती तक्ता १०.८४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८४ बार्टी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती**

| कार्यक्रम | २०२४-२५ | | २०२५-२६⁺ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
| अनुसूचित जातीच्या बेरोजगार तरुणांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम | १,८४४ | ६.१७ | १,९८५ | १.७१ |
| केंद्रीय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | ६९९ | ९.८७ | ७०७ | ९.०८ |
| महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | २,३७६ | ८.१६ | २,९९७ | १६.९० |
| जेईई/नीट/एनईईटी/ आयबी पी एस-बँक इत्यादी स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | ५,५२४ | ४०.८५ | ५,३७४ | १४.७४ |
| पोलिस आणि लष्करी सेवेसाठी भरतीपूर्व प्रशिक्षण | २,७८४ | १५.३६ | २,७८४ | २०.८४ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती/पीचडी | २,९३० | ७७.३२ | २,९३० | ६०.०२ |
| इतर प्रशिक्षण व कार्यक्रम | ४६,९२८ | ३२.९५ | ३७,४३६ | १७.८६ |

*आधार:* डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

## आदिवासी घटक कार्यक्रम

१०.११६ सन २०२५-२६ मध्ये आदिवासी घटक योजनेअंतर्गत राज्यात एकूण २९९ योजना (१५६ राज्यस्तरीय व १४३ जिल्हास्तरीय) राबविण्यात येत आहेत. आदिवासी घटक कार्यक्रमाअंर्तगत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व झालेला खर्च तक्ता १०.८५ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८५ आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|
| | खर्च | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **११,७१५.८१** | **१२,०८२.३९** | **१८,७६०.३१** | **८,७६८.६९** |
| कृषि व संलग्न कार्ये | ६४.३३ | ६५.३६ | १२९.९६ | ४५.२३ |
| ग्रामविकास | १३०.८१ | ७७१.१२ | २४७९.९२ | १०१२.२६ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | ०.०० | ०.२९ | ०.२९ | ०.०० |
| ऊर्जा | २५५.१७ | ७७५.९९ | १५८०.०० | ६१९.२५ |
| उद्योग व खनिजे | ८.१४ | ३.५० | ४.०० | ०.०० |
| वाहतूक व दळणवळण | १,८४८.७१ | १,३४७.६९ | ६००.०० | ०.०० |
| सामाजिक व सामूहिक सेवा | ९,४०८.६५ | ९,११८.४४ | १३,९६६.१४ | ७,०९१.९५ |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **२,१४९.३८** | **२,३५३.९४** | **२,७३४.६९** | **४७१.११** |
| कृषि व संलग्न कार्ये | ३५९.३५ | ४५७.४२ | ५५०.६८ | ७५.२० |
| ग्रामविकास | २८१.६६ | २७६.९५ | २७९.२६ | ११३.१२ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ऊर्जा | १३५.९९ | १४६.६६ | १६६.३४ | १४.९२ |
| उद्योग व खनिजे | १.०९ | १.०७ | १.१९ | १.५० |
| वाहतूक व दळणवळण | २०६.२९ | २३१.५० | २८१.८१ | ४१.७७ |
| सामाजिक व सामूहिक सेवा | १,१६४.९९ | १,२४०.३४ | १,४५५.४१ | २२४.६० |
| **एकूण (अ + ब)** | **१३,८६५.१९** | **१४,४३६.३३** | **२१,४९५.००** | **९,२३९.८०** |

टीप: आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही + डिसेंबर अखेर

*आधार:* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

१०.११६.१ **अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांकरीता आश्रमशाळा:** अनुसूचित जमातींतील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने राज्यातील आदिवासी भागात आश्रमशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांकरीता सुरु असलेल्या आश्रमशाळांचा तपशील तक्ता १०.८६ मध्ये दिला आहे.

१०.११६.२ आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने शासन विविध योजना/कार्यक्रम राबवित आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती तक्ता १०.८७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८६ अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांकरीता सुरु असलेल्या आश्रमशाळांचा तपशील**

| तपशील | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|
| **शासकीय आश्रमशाळा** | | |
| आश्रमशाळा (संख्या) | ४९७ | ५०० |
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | १,९९,९५५ | २,०४,१७५ |
| खर्च (₹ कोटी) | १,७६६.०७ | ९८०.५४ |
| **अनुदानित आश्रमशाळा** | | |
| आश्रमशाळा (संख्या) | ५५६ | ५५६ |
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | २,५३,११८ | २,६१,८३६ |
| खर्च (₹ कोटी) | १,९६२.५९ | १,२३४.२४ |

*आधार:* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

**तक्ता १०.८७ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती**

| योजनचे नाव | उद्दिष्टे | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
| नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण | राज्य शासनाकडून दरवर्षी प्रति विद्यार्थी कमाल ₹ ७०,००० पर्यंत अनुदान देण्यात येते. | ४४,३५७ | ४३८.४३ | ३७,६५१ | ९२.५३ |
| अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना देशाअंतर्गत उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना देशाअंतर्गत उच्च शिक्षण घेण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून शिष्यवृत्त्या देण्यात येतात. | | | | |
| भारत सरकार पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती | | १,५५,९७५ | १५७.०८ | ३५,०१८ | १४८.८६ |
| शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क प्रदाने | | ६,९४२ | ६७.०४ | १,२९५ | २६.५४ |
| वैद्यकीय अभ्यासक्रम व तत्सम अभ्यासक्रमासाठी शुल्क प्रतिपूर्ती | | २,६७३ | ४४.३० | ९०३ | १८.९३ |
| अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्चशिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर केली जाते | १० | ४.७८ | १३ | ५.८० |
| आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहे | राज्य शासनाकडून आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी तालुका, जिल्हा व विभागस्तरावर शासकीय वसतिगृहांची सुविधा उपलब्ध करुन देणे (वसतीगृहे संख्या-४९०) | ५५,८६५ | २३७.३६ | ५७,४७४ | १५४.९७ |
| पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम योजना | इयत्ता बारावी नंतरच्या उच्च शिक्षणाकरिता प्रवेश घेतलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना ₹ ६०,००० पर्यंत आर्थिक सहाय्य पुरविण्यात येते. | ३८,५२३ | १९४.२२ | २६,८३० | ८०.०० |

*आधार*: आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

१०.११६.३ **पेसा ५% थेट अबंध निधी योजने अंतर्गत ग्रामपंचायतींना थेट निधी:** 'पेसा कायदा, १९९६' अंतर्गत अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना विकासाची कामे करण्यासाठी आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत एकूण अर्थसंकल्पित निधीच्या पाच टक्के निधी वितरीत करण्यात येतो. पेसा कायद्याअंतर्गत अनुसूचित क्षेत्रातील ३,००५ ग्रामपंचायतींना थेट अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ २७०.१४ कोटी खर्च झाला असून सन २०२५-२६ डिसेंबर अखेर ₹ १४९.०१ कोटी खर्च झाला.

१०.११६.४ **भारतरत्न डॉ. ए .पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना:** राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांमधील अनुसूचित क्षेत्रांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत, अनुसूचित जमातीतील गरोदर स्त्रियांना गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीत व स्तनदा मातांना प्रसूतीनंतरच्या पहिल्या तिमाहीत 'एक वेळचा चौरस आहार' पुरविण्यात येतो. अनुसुचित जमातीमधील सात महिने ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना आठवड्यातून चार वेळा अंडी किंवा केळी पुरविण्यात येतात. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेचा तपशील तक्ता १०.८८ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८८ भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेचा तपशील**

| तपशील | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | ८,०४,१४५ | ७,८५,८२१ |
| खर्च (₹ कोटी) | २०५.४१ | ६२.१८ |

*आधार*: आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

१०.११६.५ **ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम:** या योजनेअंतर्गत आदिवासी वस्त्यांमध्ये लहान मात्र कायमस्वरुपी सामूहिक विकासाची कामे घेतली जातात. या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ ३७४.८३ कोटी इतका खर्च झाला आहे. तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर ₹ १२.८७ कोटी खर्च झाला आहे.

१०.११६.६ **आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था:** ही अनुसूचित जमातीच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व संशोधनात्मक विकास संवर्धनासाठी कार्य करणारी राज्य शासनाची स्वायत्त संस्था आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती तक्ता १०.८९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८९ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती**

| योजनेचे नाव | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
| केंद्रीय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | १९७ | ५.५० | ३०० | ८.९३ |
| अनुसूचित जमाती उमेदवारांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुख्य परीक्षा तयारीसाठी प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य | ३ | ०.०२ | ५० | ०.१९ |
| महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा पूर्व प्रशिक्षण (राजपत्रित व गट क) | १,६८१ | २४.२२ | १,७०० | २५.२५ |
| पोलीस व लष्करी भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण | २२,६३५ | २७६.१४ | १८,००० | २१९.६० |
| बँक, रेल्वे भरती, नाबार्ड, एलआयसी ऑफ इंडिया इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी पूर्व प्रशिक्षण | १,६९७ | १७.७५ | ७०० | ८.१८ |
| अनुसूचित जामातीच्या उमेदवारांना पीएचडी अभ्यासक्रमासाठी संशोधन अधिछात्रवृत्ती | २६९ | २१.७१ | २६९ | ९.८२ |

*आधार*: आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

# इतर मागास बहुजन यांचे कल्याण

१०.११७ इतर मागास बहुजन [इतर मागास वर्ग (इमाव)], विशेष आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (विआमाप्र), विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज) आणि विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र)) या समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. सन २०२४-२५ मध्ये ₹ ९,४७६.७४ कोटी खर्च झाला तर सन २०२५-२६ मध्ये जानेवारी अखेर, ₹ ४,६१५.०१ कोटी खर्च झाला.

१०.११७.१ इतर मागास बहुजन [इतर मागास वर्ग (इमाव)], विशेष आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (विआमाप्र), विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज) आणि विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र)) या प्रवर्गांतील विद्यार्थ्यांना देशात व परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने विविध योजना राबविल्या आहेत. इतर मागास बहुजन प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती तक्ता १०.९० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९० इतर मागास बहुजन विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती**

| योजनेचे नाव | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
| इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देशाअंतर्गत शालेय व उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती | | | | |
| इमाव विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | ६,१८,१२९ | ९३६.६८ | ५,३३,१९१ | ७४५.९९ |
| शिक्षण व परीक्षा शुल्काचे प्रदाने | ७१,७७७ | ४१४.२४ | ५५,८३३ | ३८८.८९ |
| इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना | ९९,२४० | २९.९४ | ०.०० | ०.०० |
| इतर मागास बहुजन विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती ( दरवर्षी ७५ विद्यार्थी) | ७५ | २७.४० | ७५ | ४६.६३ |

*आधार :* इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन +जानेवारी अखेर

१०.११७.२ **वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना:** या योजनेचा मुख्य उद्देश विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास वर्ग प्रवर्गाच्या तांडे/ वाडा/ वस्त्यांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे हा आहे. योजनेअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ २७२.२२ कोटी खर्च झाला तर सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर ₹ ६०.०८ कोटी खर्च झाला.

१०.११७.३ **महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादित**: राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली. हे महामंडळ राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ₹ २५०.०० कोटी असुन भरणा केलेले भागभांडवल ₹ २३२.९९ कोटी आहे. हे महामंडळ बीजभांडवल, थेट कर्ज योजना, प्राप्त सहाय्यक अनुदानातून वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा, महिला स्वयंसिध्दी व्याज परतावा योजना व कौशल्य विकास प्रशिक्षण योजना राबवितात. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादितची माहिती तक्ता १०.९१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९१ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादितची माहिती**

| तपशील | २०२४-२५ | २०२५-२६+ |
|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | ५,९५६ | ३,३१७ |
| खर्च (₹ लाख) | १,६६४.८८ | १,५७५.४३ |

+ डिसेंबर अखेर

*आधार*: महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.११७.४ **महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती)**: ही इतर मागासवर्ग, विमुक्त जाती - भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील लक्षित घटकांच्या सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी राज्य शासनाची स्वायत्त संस्था आहे. महाज्योती संस्था अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती तक्ता १०.९२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९२ महाज्योती अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती**

| कार्यक्रम | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
| केंद्रिय लोकसेवा आयोग स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण | ९९५ | ३२.२६ | १०० | ३.१७ |
| महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण | ७५० | १९.७० | २०० | ५.२५ |
| जेईई/नीट/एमएचटी/पूर्व परीक्षा प्रशिक्षण | १४,००० | २२.७९ | ३,५०० | २७.९३ |
| बँका/रेल्वे भरती/ भारतीय आयुर्विमा महामंडळ इत्यादींच्या स्पर्धात्मक परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण, | ६,३०० | ९५.७१ | ४,७०० | ६८.९३ |
| व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षण | २० | ०.२७ | २० | ११.३६ |
| स्पर्धा परीक्षा अर्थसहाय्य | ४,२९३ | ७.६७ | ६,१७० | ९.९८ |
| कौशल्य विकास प्रशिक्षण | ४६,५५८ | ८६.८१ | २७,४१९ | ६२.७१ |
| महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती | २,७७९ | ८९.६१ | १,७११ | १०६.०६ |

आधार: महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, (नागपूर) + डिसेंबर अखेर

१०.११८ **छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी**: राज्यातील मराठा, कुणबी, मराठा - कुणबी व कुणबी - मराठा या गटातील समाजाच्या सामाजिक-आर्थिक विकासाकरिता राज्य शासनामार्फत सारथी संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. सारथी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती तक्ता १०.९३ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.९३ सारथी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती**

| कार्यक्रम | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
| केंद्रीय लोकसेवा आयोग पूर्व आणि मुख्य परीक्षा प्रशिक्षण | १,२९२ | ९.६५ | १,१७८ | १३.११ |
| महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा पूर्व प्रशिक्षण | १,६२० | ७.१७ | ४,४७९ | १२.३० |
| सेट परीक्षा, नेट परीक्षा, आयबीपीएस परीक्षा, स्टाफ सिलेक्शन कमिशन इत्यादींच्या स्पर्धात्मक परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण | ७२२ | २.५० | २,५०० | १०.११ |
| कौशल्य विकास व इतर प्रशिक्षण | ४९,६९४ | ६४.४७ | २६,४७३ | ४२.३४ |
| राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती | १,७४३ | ६२.८५ | २,४८७ | १०७.५० |
| इतर शिष्यवृत्ती | ४२,१५० | ४४.४३ | १५ | ०.३० |
| डॉ. पंजाबराव देशमुख-सारथी देशाअंतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती | ४१६ | ६.७६ | ३५३ | ६.७५ |
| महाराजा सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती | ४० | ६.४२ | १०८ | १३.१९ |

*आधार*: छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे + डिसेंबर अखेर

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित

१०.११९ राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागास सुशिक्षित बेरोजगार तरूणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादितची स्थापना केली आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादितची माहिती तक्ता १०.९४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९४ अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादितची माहिती**

| तपशील | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
| वैयक्तिक कर्ज व्याज परतावा | ३४,७८४ | ३७,४६४.७४ | ४१,०५९ | ५२,०६८.१७ |
| गट कर्ज व्याज परतावा | ३५८ | १,२०६.८४ | २९८ | १,१०७.०० |

*आधार:* अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित + जानेवारी अखेर

## अल्पसंख्याक विकास

१०.१२० अल्पसंख्याक क्षेत्र विकास कार्यक्रम, अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी बहुक्षेत्रीय विकास योजना, अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांसाठी सहाय्यक अनुदाने इत्यादी विविध योजना राज्यात अल्पसंख्याक विभागाकडून राबविण्यात येत आहेत. सन २०२४-२५ मध्ये ₹ ६०२.९२ कोटी खर्च झाला आणि सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर ₹ २४०.६२ कोटी खर्च झाला.

१०.१२०.१ महाराष्ट्र शासनाने राज्यातील अल्पसंख्याक समुदायासाठी उच्च शिक्षणास प्रोत्साहन देणे तसेच अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांमधील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी विविध योजना राबविल्या आहेत. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा तपशील तक्ता १०.९५ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.९५ अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना/ कार्यक्रमाची माहिती**

| योजनेचे नाव | उद्दिष्टे | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| अल्पसंख्याक विद्यार्थ्यासाठी उच्च शिक्षण शिष्यवृत्ती | वैद्यकीय, तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गुणवत्ताधारक विद्यार्थी आणि इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते | २८,४७६ | १३६.३४ | ७,३५५ | ४१.५९ |
| अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतिगृहे | २५ जिल्हयांतील ४३ शहरांमध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतिगृहे सुरु केली आहेत. विद्यार्थिनींना वसतीगृह शुल्क पूर्णपणे माफ असते तसेच आहार भत्ता देण्यात येतो | १,५०६ | ९.०८ | १,४६४ | २.८१ |
| परदेशात पदव्युत्तर पदवी व पी. एच. डी. अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजना | परदेशात उच्च शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून शासनाकडून प्रतिवर्षी अल्पसंख्याक समुदायातील ७५ विद्यार्थ्यांसाठी परदेश शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. | ६६ | २.२७ | ७५ | १०.६९ |

*आधार* : अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

१०.१२०.२ अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती तक्ता १०.९६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९६ अल्पसंख्यांक बहुलभागामध्ये पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती**

| योजनेचे नाव | खर्च (₹ कोटी) | |
|---|---|---|
| | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम | ३३.३३ | १०८.३३ |
| अल्पसंख्याक समाजासाठी वस्ती/क्षेत्र विकास योजना | | |
| ग्रामीण भागातील | १३८.०७ | ३१.१४ |
| नागरी भागातील | १४६.६३ | २४.५२ |

*आधार*: अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

१०.१२०.३ **मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित:** राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी या महामंडळाची स्थापना करण्यात आली. हे महामंडळ राष्ट्रीय अल्पसंख्याक वित्त व विकास महामंडळाची राज्य वाहिनीकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ७००.०० कोटी असून, भरणा केलेले भाग भांडवल ₹ ६७१.५९ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). स्थापनेपासून ४०,४०४ विद्यार्थ्यांना ₹ ३३५.७८ कोटी रक्कमेचे शैक्षणिक कर्ज व ११,४५४ लाभार्थ्यांना ₹ १५५.९८ कोटी रक्कमेचे मुदत कर्ज देण्यात आले. अल्पसंख्याक समाजासाठी शैक्षणिक कर्ज व मुदत कर्ज माहिती तक्ता १०.९७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९७ अल्पसंख्याक समाजासाठी शैक्षणिक कर्ज व मुदत कर्ज माहिती**

| तपशिल | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
| शैक्षणिक कर्ज | २,५०९ | ३१.५० | २,१८१ | ३०.५० |
| मुदत कर्ज | २,२६६ | ७१.८६ | ०१ | ०.०५ |

*आधार :* अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

१०.१२०.४ **डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना:** ही योजना पारंपारिक मदरशामध्ये धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने राज्यात राबविण्यात येत आहे. ही योजना मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ. ९ वी, इ. १० वी, ११ वी व १२ वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती प्रदान करते. या योजनेअंतर्गत पायाभूत सुविधा, ग्रंथालय व शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ ७.८८ कोटी खर्च झाला.

## दिव्यांगांचे कल्याण

१०.१२१ दिव्यांगांच्या क्षमता ओळखून त्यांचा कौशल्य विकास करणे, समान संधी देणे व त्यांच्या अधिकारांचे रक्षण याद्वारे सक्षमीकरण करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी राज्य शासन विविध योजना राबवित आहे.

१०.१२१.१ **महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्यादित:** ही दिव्यांग व्यक्तीच्या कल्याणासाठी राज्यात स्थापन करण्यात आली आहे. सदर महामंडळ राष्ट्रीय विकलांग वित्त व विकास महामंडळाची राज्य प्राधिकृत वाहिनी म्हणून कार्यरत आहे. महामंडळाचे अधिकृत भागभाडंवल ₹ ५०० कोटी असून भरणा केलेले भाग भांडवल ₹ १०५.९२ कोटी आहे. सन २०२४-२५ मध्ये ६० लाभार्थ्यांना ₹ २७.१२ लाख रक्कमेचे थेट कर्ज, ४५७ लाभार्थ्यांना ₹ ९०३.४९ लाखाचे मुदत कर्ज आणि हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरण स्नेही फिरत्या वाहनावरील दुकान योजनासाठी ६९८ लाभार्थ्यांना ₹ २,६०३.५४ लाख खर्च झाला. सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर अखेर १२ लाभार्थ्यांना ₹ ५.७० लाख रक्कमेचे थेट कर्ज, १६४ लाभार्थ्यांना ₹ ४०६.५८ लाख मुदत कर्ज आणि हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरण स्नेही फिरत्या वाहनावरील दुकान योजनाअंतर्गत पाच लाभार्थ्यांना ₹ १८.६५ लाख खर्च झाला.

## राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम

१०.१२२ राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमाअंतर्गत राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहेत. राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमाअंतर्गत निवडक योजनांची माहिती तक्ता १०.९८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९८ राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमअंतर्गत निवडक योजनांची माहिती**

| योजनेचे नाव | २०२४-२५ | | २०२५-२६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| संजय गांधी निराधार अनुदान | १७.२ | २,९४७.५२ | १५.९८ | २,४९८.७५ |
| श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन | ३०.२८ | ५,३६७.९६ | २०.८८ | ४,७३८.१४ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन | ११.३७ | २५४.७५ | १०.२३ | १८४.१६ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन | ०.९९ | २४.९८ | ०.९९ | २६.९३ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन | ०.०१ | ३.१७ | ०.०९ | २.५६ |
| राष्ट्रीय कुटुंब लाभ | ०.०५ | १९.९५ | ०.०५ | ९.९३ |

*आधार:* सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

१०.१२३ **इतर लिंगभाव असलेल्या व्यक्ति** : इतर लिंगभाव व्यक्तींना आजही भेदभाव, पूर्वग्रह आणि अत्यावश्यक सेवांपर्यंत मर्यादित प्रवेश यांना सामोरे जावे लागत आहे. तृतीयपंथी समुदायास भेडसावणाऱ्या प्रमुख समस्या म्हणजे सामाजिक बहिष्कार, भेदभाव, बेरोजगारी, शैक्षणिक सुविधांचा अभाव, बेघरपणा, वैद्यकीय सुविधांचा अभाव, नैराश्य इत्यादी, इतर लिंगभाव कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी, राज्य व प्रादेशिक पातळीवर 'तृतीयपंथी हक्क संरक्षण व कल्याण राज्य मंडळ' स्थापन करण्यात आले आहे.

१०.१२३.१ भारत सरकारने "The Transgender Persons (Protection of Rights) Act, 2019" या कायद्यातंर्गत निर्गमित केलेले नियम "Transgender Persons (Protection of Rights) Rules, 2020" राज्य शासनाने काही बदल न करता स्वीकृत केले आहे. तृतीयपंथीयांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने तृतीयपंथीयासाठीचे धोरण- २०२४ जाहिर केले आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये तृतीयपंथीयांच्या समस्यांच्या/तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे.

# मानव विकास आणि शाश्वत विकास ध्येये

१०.१२४ व्यक्तींच्या कल्याणात सुधारणा आणि त्यांचा क्षमता विकास म्हणजे मानव विकास होय. मानव विकासात आरोग्यदायी जीवन, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि दर्जेदार राहणीमान यांवर भर दिला जातो. भावी पिढीच्या स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमानाच्या गरजा भागवित असताना विकास साधणे म्हणजे शाश्वत विकास. सर्वांसाठी शाश्वत कल्याण साध्य करण्याच्या समान हेतूचे मानव विकास आणि शाश्वत विकास ध्येये प्रतिनिधित्व करतात.

# मानव विकास

१०.१२५ **मानव विकास निर्देशांक (माविनि)**: माविनि हा आरोग्य संपन्न दिर्घायुष्य, ज्ञानार्जनाची संधी व दर्जेदार राहणीमान या मानव विकासाच्या तीन मूलभूत आयामांच्या मापदंडांच्या दिर्घकालीन प्रगतीचे मूल्यांकन करणारा संयुक्त निर्देशांक आहे. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमद्वारे प्रकाशित मानव विकास अहवाल, २०२५ नुसार सन २०२३ मधील ०.६८५ माविनिसह भारत १३० व्या क्रमांकावर होता. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम-उप राष्ट्रीय मानव विकास निर्देशांक अहवाल-२०२२ (V८.४) नुसार महाराष्ट्राचा माविनि ०.६९५ होता. महाराष्ट्र मानव विकास अहवाल, २०१२ नुसार जिल्हानिहाय माविनि 'परिशिष्ट १०.१८ मध्ये दिला आहे.

१०.१२६ **मानव विकास कार्यक्रम:** महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम राज्यातील १२५ अतिमागास तालुक्यांमध्ये राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेतील सुधारणांवर भर देणाऱ्या विविध योजना राबविल्या जात आहेत. तालुक्यांची सामाजिक-आर्थिक व भौगोलिक परिस्थिती आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन ‘जिल्हा/तालुका स्पेसिफिक योजना’ आखल्या जातात आणि अंमलबजावणी केली जाते.

१०.१२६.१ या कार्यक्रमांतर्गत सन २०२४-२५ मध्ये ₹ १०२.५० कोटी खर्च झाला तर, सन २०२५-२६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ ८.६९ कोटी खर्च झाला. महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची भौतिक प्रगती तक्ता १०.९९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९९ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची भौतिक प्रगती**

| योजना | लाभार्थी प्रकार | लाभार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६+ |
| **शिक्षण** | | | | |
| अ) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील अभ्यासिका (२,८८९ अभ्यासिका) | विद्यार्थी | १,१५७ | ४,३६० | ० |
| ब) ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना मोफत बस सेवा (९६६ बसेस) | विद्यार्थीनी | ८६,४४३ | ८५,०३२ | ८३,०९३ |
| क) बालभवन विज्ञान केंद्रे (१२४ केंद्रे) | भेट दिलेले विद्यार्थी | ८९१ | ६,२२४ | ० |
| ड) इयत्ता आठवी ते बारावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या व शाळेपासून पाच किमी अंतरापर्यंत राहाणाऱ्या गरजू मुलींना सायकलींचे वाटप | विद्यार्थीनी | ७८,३६६ | ६६,३८६ | ० |
| **आरोग्य** | | | | |
| अ) गर्भवती महिला, स्तनदा माता व ० ते ६ महिने वयोगटातील बालकांकरिता आरोग्य शिबिरे | गर्भवती महिला, स्तनदा माता व बालके | ८,०३,०३५ | ९,६१,३५४ | ४,०९,४६७ |
| ब) अजा, अज, दारिद्रय रेषेखालील गर्भवती महिलांना बुडीत मजुरी | गर्भवती महिला | १,१९,७७१ | १,१०,९४३ | ० |
| **उत्पन्न निर्मिती** | | | | |
| अ) माती परिक्षण फिरती प्रयोगशाळा | मातीचे तपासलेले नमुने | ३,५६९ | ४,१२२ | ५,१७० |
| ब) जिल्हा/तालुका स्पेसिफिक योजना | | | | |
| १) रोजगार निर्मितीकरिता ‘विशेष योजना’ | लाभार्थी समूह | ३,३४४ | ० | ० |
| २) माविमच्या माध्यमातून मायक्रो फायनान्स - तेजश्री फायनान्शियल सर्व्हिसेस योजना | i) अति गरीब महिला | १८,३९९ | २२,१४३ | १३,३९१ |
| | ii) कर्जबाजारी स्वयंसहाय्यता गट | १२६ | ९८ | २२ |
| | iii) कर्जबाजारी महिला | १,०२८ | ३१ | १९ |

*आधार* : मानव विकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन   + जानेवारी पर्यंत

# शाश्वत विकास ध्येये

१०.१२७ जागतिक स्तरावर शाश्वत आणि उज्वल भविष्य साध्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्राकडून स्वीकृत 'शाश्वत विकासासाठी अजेंडा २०३०' मध्ये १७ शाश्वत विकास ध्येये आणि संलग्नित १६९ लक्ष्यांचा समावेश आहे.

१०.१२७.१ शाविध्ये साध्यतेच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी विविध स्तरांवर संनियंत्रण आराखडे तयार करण्यात आले आहेत

- जागतिक निर्देशक आराखडा : जागतिक स्तरावरील शाश्वत विकास ध्येय प्रगतीच्या संनियंत्रणाकरिता
- राष्ट्रीय निर्देशक आराखडा : राष्ट्रीय स्तरावरील शाश्वत विकास ध्येय प्रगतीच्या संनियंत्रणाकरिता
- राज्य निर्देशक आराखडा : राज्य स्तरावरील शाश्वत विकास ध्येय प्रगतीच्या संनियंत्रणाकरिता
- जिल्हा निर्देशक आराखडा : जिल्हा स्तरावरील शाश्वत विकास ध्येय प्रगतीच्या संनियंत्रणाकरिता
- पंचायत अ‍ॅडव्हान्समेंट निर्देशांक : पंचायत स्तरावरील शाश्वत विकास ध्येय प्रगतीच्या संनियंत्रणाकरिता

१०.१२८ **जागतिक निर्देशक आराखडा:** जागतिक स्तरावर शाश्वत विकास ध्येयांच्या संनियंत्रण आणि अंमलबजावणीसाठी २३४ निर्देशक अंतर्भूत असलेला 'शाश्वत विकास ध्येय अहवाल-२०२५' संयुक्त राष्ट्राकडून प्रकाशित झाला आहे. या अहवालानुसार १६७ देशांच्या सूचीमध्ये भारत ६७.० गुणांकासह ९९ व्या क्रमांकावर आहे. तर 'शाश्वत विकास अहवाल-२०२४' नुसार १६७ देशांपैकी भारत ६४.० गुणांकासह १०९ व्या क्रमांकावर होता.

१०.१२९ **राष्ट्रीय निर्देशक आराखडा:** राष्ट्रीय स्तरावर शाश्वत विकास ध्येयांच्या संनियंत्रण आणि अंमलबजावणीसाठी २८४ निर्देशक अंतर्भूत असलेला 'राष्ट्रीय निर्देशक आराखडा प्रगतीमापन अहवाल-२०२५' सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालया मार्फत प्रकाशित केला आहे.

१०.१३० **शाविध्ये भारत निर्देशांक:** शाश्वत विकास ध्येयांची राष्ट्रीय आणि उप-राष्ट्रीय स्तरावरील प्रगती मोजण्याचे देशातील प्रमुख साधन असलेली 'शाश्वत विकास ध्येये-भारत निर्देशांक अहवाल २०२३-२४' (V४.०) ही चतुर्थ आवृत्ती निती आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आली आहे. शाश्वत विकास भारत निर्देशांक २०२३-२४ (V४.०) हे १६ ध्येये, ७० लक्ष्ये आणि ११३ निर्देशकांवर आधारित आहे. या अहवालानुसार, महाराष्ट्र ७३ गुणांसह १२ व्या क्रमांकावर आहे.

१०.१३१ **राज्य निर्देशक आराखडा:** राष्ट्रीय निर्देशक आराखड्याच्या धर्तीवर राज्यस्तरावर शाश्वत विकास ध्येयांच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी राज्याने २३७ निर्देशकांचा समावेश असलेला राज्य निर्देशक आराखडा तयार केला आहे. निवडक निर्देशकां-मधील राज्याची कामगिरी तक्ता १०.१०० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०० निवडक निर्देशकांमधील राज्याची कामगिरी**

| निर्देशक | शाविध्ये क्रमांक | वर्ष | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | २०२२-२३ | २०२३-२४* |
| नळाद्वारे पाणी पुरवठा होणाऱ्या कुटूंबांची टक्केवारी (ग्रामीण) | १ | ३५.९ | ८७.१ | ९८.४ |
| पाच वर्षाखालील कमी वजनाच्या बालकांची टक्केवारी | २ | १०.३ | ७.९ | ७.७ |
| ई-मार्केट अंतर्गत नोंदणी झालेल्या कृषी बाजारांची टक्केवारी | २ | ९.८# | ३८.६ | ४३.६ |
| माता मृत्यु प्रमाण (प्रती लाख जीवित जन्मांमागे) | ३ | ५५$ | ३६$$ | ३६$$ |
| निव्वळ पटसंख्या प्रमाण - प्राथमिक शाळा | ४ | ८८.९ | ७९.७ | ८१.४ |
| निव्वळ पटसंख्या प्रमाण - उच्च प्राथमिक शाळा | ४ | ७८.४ | ७०.७ | ७३.९ |
| निव्वळ पटसंख्या प्रमाण - माध्यमिक शाळा | ४ | ५८.८ | ५९.५ | ६१.६ |
| बँकेशी जोडणी झालेल्या स्वयंसहायता गटांपैकी केवळ महिलांसाठी असलेल्या स्वयं सहायता गटांची टक्केवारी | ५ | ८८.४ | ८८.५ | ९१.२ |
| घराच्या आवारात सुरक्षित आणि पुरेसे पिण्याचे पाणी असलेल्या लोकसंख्येची टक्केवारी (ग्रामीण) | ६ | ८६.० | ८१.१ | ९२.३ |
| एकूण स्थापित वीज निर्मिती क्षमतेत नवीकरणीय ऊर्जेचा वाटा | ७ | २२.७ | ३०.६६ | ३२.११ |
| एकूण निर्माण झालेला कचऱ्यापैकी पुनर्वापर केलेला कचऱ्याची टक्केवारी | ८ | ३०.६ | ८२.३ | ८७.३ |
| बारमाही रस्त्यांनी जोडल्या गेलेल्या ग्रामीण वस्त्यांची टक्केवारी | ९ | ९४.८ | ९९.५ | ९९.६ |
| निर्माण होणाऱ्या घातक कचऱ्यापैकी प्रक्रिया होणाऱ्या घातक कचऱ्याची टक्केवारी | १२ | २७.४ | ६६.४५ | ६४.२६ |

# २०१६-१७ आकडेवारी, $- नमुना नोंदणी अहवाल २०१५-१७, $$- नमुना नोंदणी अहवाल २०२१-२३ *अस्थायी

*आधार:* अर्थ व सांख्यिकी संचालनालय

१०.१३२ **जिल्हा निर्देशक आराखडा:** जिल्हा स्तरावर शाश्वत विकास ध्येयांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी, राज्याने जिल्हा निर्देशक आराखडा तयार केला आहे, ज्यामध्ये १२० निर्देशकांचा समावेश आहे. सद्यस्थितीत, राज्यातील सर्व जिल्ह्यांनी २०१५-१६ ते २०२२-२३ या कालावधीचा 'प्रगतीमापन अहवाल' प्रसिद्ध केला आहे. हे सर्व अहवाल अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१०.१३३ **पंचायत ॲडव्हान्समेंट निर्देशांक:** शाश्वत विकास ध्येये स्थानिक पातळीवर राबविणे आणि तळागाळातील प्रशासन बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पंचायतराज मंत्रालयाने 'पंचायत ॲडव्हान्समेंट निर्देशांक' सुरू केला आहे. हा निर्देशांक भारतातील २.५ लाखांहून अधिक ग्रामपंचायतींच्या प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी एक परिवर्तनकारी साधन आहे. ॲडव्हान्समेंट निर्देशांका अंतर्गत स्थानिकीकरण केलेल्या शाश्वत विकास ध्येयांच्या ९ विषयांमध्ये ग्रामपंचायतींच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाते. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणे आखण्यास मदत करण्याकरिता हे विषय जागतिक ध्येये आणि ग्रामीण वास्तव यांचा मेळ घालतात:

१. दारिद्रय मुक्त आणि वर्धित उपजीविका पंचायत

२. निरोगी पंचायत

३. बालस्नेही पंचायत

४. जलसमृद्ध पंचायत

५. स्वच्छ आणि हरित पंचायत

६. स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा असलेली पंचायत

७. सामाजिक न्याय आणि सामाजिक सुरक्षा असलेली पंचायत

८. सुशासन असलेली पंचायत

९. महिला स्नेही पंचायत

पंचायत राज मंत्रालयाने 'पंचायत ॲडव्हान्समेंट निर्देशांक आधाररेषा अहवाल २०२२-२३' प्रसिद्ध केला आहे. एकूण ५०८ स्थानिक निर्देशकांवर (३८४ अनिवार्य व १२४ ऐच्छिक) आधारित संमिश्र निर्देशांक आहे. या निर्देशकांमध्ये राष्ट्रीय निर्देशक आराखड्याशी सुसंगत ९ विषयांमधील एकूण ५६६ स्वतंत्र माहिती बिंदूचा समावेश आहे. या अहवालासाठी एकूण २७,६५५ ग्रामपंचायतींनी माहिती सादर केली आहे. 'पंचायत ॲडव्हान्समेंट निर्देशांक आधाररेषा अहवाल २०२२-२३' अहवालानुसार महाराष्ट्राची सद्य:स्थिती तक्ता १०.१०१ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.१०१ महाराष्ट्राची सद्यस्थिती:**

| श्रेणी | वर्णन | एकूण ग्रामपंचायती |
|---|---|---|
| अ+ | साध्य (९०+) | ० |
| अ | आघाडीवर (७५-९०) | ७ |
| ब | उत्कृष्ट कामगिरी (६०-७५) | १३,४५५ |
| क | आकांक्षित (४०-६०) | १३,९९५ |
| ड | प्रारंभकर्ता (०-४०) | १९८ |

*आधार*: पंचायत ॲडव्हान्समेंट निर्देशांक -आधाररेषा अहवाल, २०२२-२३.

* * * *

# परिशिष्ट १०.१

## माध्यम व शैक्षणिक स्तरनिहाय शाळांची संख्या, शिक्षकांची संख्या व विद्यार्थी संख्या

| माध्यम | शासकीय | | शासकीय अनुदानित | | विना अनुदानित | | इतर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२३-२४ | २०२४-२५ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| शाळांची संख्या | | | | | | | | | | |
| प्राथमिक (१ ली ते ८ वी) | ४२,५९२ | ४२,३४६ | ३,१५३ | ३,१५७ | ४,०३२ | ३,९५९ | १२९ | १६ | ४९,९०६ | ४९,४७८ |
**अर्भक मृत्यू दर :** दिलेल्या लोकसंख्या व कालावधीमध्ये दर हजार जीवित जन्मांमागे अर्भकांच्या (एक वर्ष किंवा त्यापेक्षा लहान) मृत्यूंची संख्या.

$$\textbf{अर्भक मृत्यू दर} = \frac{\text{एका वर्षातील एक वर्ष किंवा त्यापेक्षा लहान अर्भकांच्या मृत्यूंची संख्या}}{\text{त्याच वर्षातील जीवित जन्मांची संख्या}} \times १,०००$$

**पाच वर्षाखालील बालकांचा मृत्यूदर :** दिलेल्या लोकसंख्या व कालावधीमध्ये दर हजार जीवित जन्मांमागे ५ वर्षाखालील मुलांच्या मृत्यूंची संख्या.

$$\textbf{पाच वर्षाखालील बालकांचा मृत्यूदर} = \frac{\text{एका वर्षातील पाच वर्षाखालील मुलांच्या मृत्यूंची संख्या}}{\text{त्याच वर्षातील जीवित जन्मांची संख्या}} \times १,०००$$

**एकूण जनन दर :** स्त्रीच्या संपुर्ण प्रजनन कालावधीमध्ये स्त्रीला होणारी सरासरी मुले

**जन्माच्या वेळी आयुर्मान :** दिलेल्या भौगोलिक क्षेत्रामध्ये व्यक्तीच्या जन्माच्या वेळी अस्तित्वात असलेल्या लिंग आणि वयोमानानुसार असलेल्या मृत्यू दरास अनुसरुन, नवजात बालकाची अपेक्षित जीवनाची सरासरी वर्षे म्हणजे जन्माच्या वेळी आयुर्मान होय.

**मुख्य कामगार :** संदर्भ कालावधीत सहा महिन्यांपेक्षा जास्त दिवस (१८० दिवस) काम केलेल्या व्यक्तींना मुख्य कामगार असे संबोधतात.

**सीमांतिक कामगार :** संदर्भ कालावधीत सहा महिन्यांपेक्षा कमी दिवस (१८० दिवस) काम केलेल्या व्यक्तींना सीमांतिक कामगार असे संबोधतात.

**स्त्री पुरुष प्रमाण :** लोकसंख्येतील स्त्रियांची दर १,००० पुरुषांच्या प्रमाणात असलेली संख्या अशी स्त्री पुरुष प्रमाणाची व्याख्या करण्यात आली आहे.

$$\textbf{स्त्री पुरुष प्रमाण} = \frac{\text{स्त्रियांची संख्या}}{\text{पुरुषांची संख्या}} \times १,०००$$

**बालकांमधील मुलामुलींचे प्रमाण (० ते ६ वर्षे) :** लोकसंख्येतील '० ते ६ वर्षे वयोगटातील मुलींची त्याच वयोगटातील दर १००० मुलांच्या प्रमाणात असलेली संख्या' अशी बालकांमधील मुलामुलींच्या प्रमाणाची व्याख्या करण्यात आली आहे.

$$\textbf{बालकांमधील मुलामुलींचे प्रमाण (० ते ६ वर्षे)} = \frac{\text{० ते ६ वर्षे वयोगटातील मुलींची संख्या}}{\text{० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांची संख्या}} \times १,०००$$

**साक्षरता दर :** वाचू व लिहू शकतील असे ७ वर्षे आणि त्यापेक्षा जास्त वय असलेल्या लोकसंख्येचे त्याच वयोगटातील एकुण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी म्हणजे साक्षरता दर होय.

$$\textbf{साक्षरता दर} = \frac{\text{एकूण साक्षर (७ वर्षे आणि त्यावरील )}}{\text{एकूण लोकसंख्या (७ वर्षे आणि त्यावरील)}} \times १००$$

**कार्य सहभाग दर :** एकूण काम करणाऱ्यांची (मुख्य + सीमांतिक) (जनगणना २०११ नुसार) एकूण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी म्हणजे कार्य सहभाग दर होय.

$$\textbf{कार्य सहभाग दर} = \frac{\text{एकूण काम करणारे (मुख्य + सीमांतिक)}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १००$$

**स्थूल देशांतर्गत उत्पन्न** : कोणत्याही भौगोलिक सीमांकित क्षेत्रातील विशिष्ट कालावधीमध्ये (साधारणपणे एक वर्ष निर्माण) झालेल्या सर्व वस्तू व सेवांचे (द्विरुक्ती टाळून) मूल्याच्या स्वरुपात केलेले मोजमाप. जर भौगोलिक क्षेत्र देश असेल तर त्यास स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, जर भौगोलिक क्षेत्र राज्य असेल तर त्यास स्थूल राज्य उत्पन्न आणि जर भौगोलिक क्षेत्र जिल्हा असेल तर त्यास स्थूल जिल्हा उत्पन्न असे संबोधले जाते.

**स्थूल देशांतर्गत उत्पन्न (बाजार किंमतींनुसार) :** प्रत्येक उद्योगापासून तयार करण्यात आलेल्या मूळ किमतींनुसार स्थूल मूल्यवृद्धी + आयात शुल्कांसह उत्पादनावरील कर वजा उत्पादनावरील अनुदान

निव्वळ उत्पन्नाची जसे निव्वळ देशांतर्गत उत्पन्न, निव्वळ राज्य उत्पन्न व निव्वळ जिल्हा उत्पन्न परिगणना करतांना संबंधित स्थूल उत्पन्नातून स्थिर भांडवलाचा घसारा वजा करण्यात येतो.

**स्थूल मूल्यवृद्धी (मूळ किंमतींनुसार) (उत्पन्न पध्दत) :** कर्मचाऱ्यांची भरपाई + व्यवस्थापन अधिक्य / मिश्र उत्पन्न स्थिर + भांडवलाचा घसारा + उत्पादन करवजा उत्पादन अर्थसहाय्य.

**स्थूल मूल्यवृद्धी (मूळ किंमतींनुसार) (उत्पादन पध्दती) :** उत्पादनाचे स्थूल मूल्य वजा निविष्ठा

**स्थूल राष्ट्रीय उत्पन्न :** स्थूल देशांतर्गत उत्पन्नात विदेश व्यवहारातील देवाण - घेवाणातील फरकाचा समावेश करुन स्थूल राष्ट्रीय उत्पन्न परिगणित करण्यात येते.

**निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न :** स्थूल राष्ट्रीय उत्पन्नामधून स्थिर भांडवलाचा घसारा वजा करुन निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न परिगणित करण्यात येते. यास राष्ट्रीय उत्पन्न असेही संबोधले जाते.

**दरडोई उत्पन्न :** दरडोई राष्ट्रीय उत्पन्न दरडोई, राज्य उत्पन्न आणि दरडोई जिल्हा उत्पन्न हे संबंधित भौगोलिक क्षेत्राच्या निव्वळ उत्पन्नाला मध्यावधी लोकसंख्येने भागून परिगणित करण्यात येते .

**पूर्वानुमान:** उपलब्ध अनुरुप/प्रतिनिधिक निर्देशक वापरुन केलेले अंदाज.

**ग्राहक वस्तू :** स्वत:च्या व कुटुंबाच्या वापरासाठी ग्राहकांनी खरेदी केलेल्या वस्तू.

**प्रक्रियेअंतर्गत माल :** वस्तू निर्मितीकरिता निविष्ठी म्हणून वापरण्यात येणाऱ्या वस्तू.

**भांडवली वस्तू :** वस्तू निर्मितीकरिता वापरण्यात येणा-या यंत्र सामग्री सारख्या वस्तू.

**स्थूल उत्पादन :** लेखा वर्षात उत्पादित झालेली उत्पादने व उप उत्पादने यांचे प्रत्यक्ष करविरहित मूल्य (म्हणजे विक्रीवरील कर व शूल्क वगळून आणि असल्यास अनुदान समाविष्ट करुन) आणि अर्ध निर्मित कार्यप्रगतीपर वस्तुंचे निव्वळ मूल्य, स्वत:साठी केलेल्या बांधकामाचे मूल्य, पुरविण्यात आलेल्या औद्योगिक व बिगर-औद्योगिक सेवांपोटी प्राप्त जमा, यंत्र व यंत्रसामग्री आणि इतर स्थावर मालमत्ता यांचे भाडे, खरेदी केलेल्या वस्तुंची आहे त्या मूळ स्थितीत केलेल्या विक्रीद्वारे मिळणारी निव्वळ शिल्लक आणि निर्मिती करुन विक्री केलेल्या विजेचे मूल्य यांचा स्थूल उत्पादनामध्ये समावेश होतो.

**निव्वळ मूल्यवृद्धी :** स्थूल उत्पादनातून एकूण निविष्ठीचे मूल्य व घसारा वजा केल्यावर निव्वळ मूल्यवृद्धी प्राप्त होते.

**ग्राहक किंमती निर्देशांक :** ग्राहक किंमती निर्देशांक हे प्रतिनिधिक स्वरूपातील निवडक वस्तू आणि सेवांच्या ग्राहक किंमतीमधील काळानुरुप झालेले एकूण बदल दर्शवितात.

**घाऊक किंमती निर्देशांक :** घाऊक किंमती निर्देशांक ठराविक कालावधीमधील निवडक घाऊक वस्तूंच्या किंमतीतील सरासरी बदल दर्शवितात.

**प्राथमिक तूट :** प्राथमिक तूट म्हणजे राजकोषीय तुटीमधून व्याज प्रदाने वगळल्यावर येणारी रक्कम होय.

**राजकोषीय तूट :** राजकोषीय तूट म्हणजे शासनाची भांडवली जमेतील कर्जे व इतर दायित्वे आणि अर्थसंकल्पीय आधिक्य/तूट यांतील फरक होय.

**अर्थसंकल्पीय तूट :** अर्थसंकल्पीय तूट म्हणजे अर्थसंकल्पातील एकूण जमा व एकूण खर्च यांतील फरक होय.

**महसुली तूट :** महसुली तूट म्हणजे अर्थसंकल्पातील एकूण महसुली जमा व एकूण महसुली खर्च यांतील फरक होय.

**कर्जाचा दर :** कर्जाचा दर हा चालू वर्षातील व्याज प्रदानांचे मागील वर्षातील एकूण ऋणभाराशी असलेली टक्केवारी होय.

**महसुली खर्चाचे भांडवली नियतव्ययाशी प्रमाण (रेको) :** रेको म्हणजे महसुली खर्चाचे भांडवली नियतव्ययाशी असलेले प्रमाण होय.

**पिकांची सघनता :** एकूण पिकांखालील क्षेत्राचे निव्वळ पेरणी क्षेत्राशी प्रमाण

**सूक्ष्म उपक्रम :** संयंत्र व यंत्रसामग्री किंवा उपकरणांमधील गुंतवणूक ₹ २.५ कोटींपर्यंत व वार्षिक उलाढाल ₹ १० कोटींपर्यंत
**लघु उपक्रम :** संयंत्र व यंत्रसामग्री किंवा उपकरणांमधील गुंतवणूक ₹ २५ कोटींपर्यंत व वार्षिक उलाढाल ₹ १०० कोटींपर्यंत
**मध्यम उपक्रम :** संयंत्र व यंत्रसामग्री किंवा उपकरणांमधील गुंतवणूक ₹ १२५ कोटींपर्यंत व वार्षिक उलाढाल ₹ ५०० कोटींपर्यंत
**दरडोई विजेचा अंतिम वापर :** विजेच्या अंतिम वापरास मध्यावधी लोकसंख्येने भागून परिगणित करण्यात येते
विजेचा अंतिम वापर म्हणजे ग्राहकांनी प्रत्यक्षात वापरलेली वीज (किंवा ग्राहकांना विकलेली वीज) होय.

**उर्जा - एकके :**
१ मेगावॅट = १,००० किलोवॅट
१ युनिट = १ किलो - वॅट - तास
१ दशलक्ष युनिट्स = १०,००,००० कि.वॅ.तास
१ एमव्हीए = १ दशलक्ष व्होल्ट ॲम्पिअर

$$\textbf{वाहन उत्पादकता} = \frac{\text{प्रतिदिन सरासरी सार्थ किमी (लाख)}}{\text{एकूण सरासरी वाहने}} \times १,००,०००$$

$$\textbf{चालक - वाहक उत्पादकता} = \frac{\text{एकूण सार्थ किमी (लाख)}}{\text{एकूण कामगिरीवरील चालक दिवस}} \times १,००,०००$$

$$\textbf{भारमान टक्के} = \frac{\text{प्रत्यक्ष प्रवासी उत्पन्न}}{\text{अपेक्षित प्रवासी उत्पन्न}} \times १००$$

**दूरध्वनीची घनता :** संदर्भ क्षेत्रामधील दर शंभर लोकसंख्येमागे दूरध्वनी जोडण्यांची संख्या

$$\textbf{एकूण पटसंख्येचे प्रमाण} = \frac{\text{विशिष्ट शैक्षणिक स्तरामधील विद्यार्थ्यांची पटसंख्या}}{\text{विशिष्ट शैक्षणिक स्तराकरिता अधिकृत वयोगटातील लोकसंख्या}} \times १००$$

$$\textbf{स्त्री-पुरूष समानता निर्देशांक} = \frac{\text{मुलींच्या एकूण पटसंख्येचे प्रमाण}}{\text{मुलांच्या एकूण पटसंख्येचे प्रमाण}}$$

**विशेष गरजा असलेली मुले :** दृष्टीदोष, श्रवणदोष, हालचाल दोष, आकलनदोष, सेरेब्रल पाल्सी किंवा मतिमंदत्व असलेली मुले म्हणजे विशेष गरजा असलेली मुले होत.

**गळतीचे प्रमाण :** संदर्भित शैक्षणिक वर्षात एखाद्या शाळेच्या पटावर नोंद झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या व त्यापुढील शैक्षणिक वर्षामध्ये त्या शाळेच्या पटावर अद्याप नोंदणी न झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या यांचे प्रमाण म्हणजे गळतीचे प्रमाण होय.
**नवजात शिशू मृत्यू दर :** एका वर्षातील जीवित जन्मांमागे २८ दिवसांपेक्षा कमी वय असलेल्या नवजात शिशूंच्या मृत्यूंची संख्या.

$$\textbf{नवजात शिशू मृत्यू दर} = \frac{\text{एका वर्षातील २८ दिवसांपेक्षा कमी वय असलेल्या नवजात शिशुंच्या मृत्यूंची संख्या}}{\text{त्याच वर्षातील जीवित जन्मांची संख्या}} \times १,०००$$

**माता मृत्यू :** कोणत्याही स्त्रीचा मृत्यू गरोदरपणात किंवा गरोदरपणाची समाप्ती झाल्यानंतर ४२ दिवसांच्या आत, गरोदरपणाच्या कालावधीचा व गर्भधारणेची जागा याचा विचार न करता गरोदरपणाशी संबंधित कारणाने किंवा ज्याची गरोदरपणामुळे किंवा त्याच्या व्यवस्थापनामुळे तीव्रता वाढेल अशा कारणाने अपघाती किंवा प्रासंगिक कारणे वगळून झालेला मृत्यू म्हणजे माता मृत्यू होय.

**माता मृत्यू प्रमाण :** संबंधित वर्षामध्ये गरोदरपणाची गुंतागुंत किंवा प्रसुती दरम्यान गुंतागुंत निर्माण झाल्यामुळे प्रति लाख जीवित जन्मांमागे त्या वर्षातील स्त्रियांच्या मृत्यूंची संख्या म्हणजे माता मृत्यू प्रमाण होय.

$$\textbf{माता मृत्यू प्रमाण} = \frac{\text{एका ठराविक कालावधीमध्ये झालेले एकूण माता मृत्यू}}{\text{त्याच कालावधीतील जीवित जन्म}} \times १,००,०००$$

$$\text{डॉक्टर लोकसंख्या प्रमाण} = \frac{\text{एकूण नोंदणीकृत ॲलोपॅथिक डॉक्टरांपैकी ८० टक्के डॉक्टर + एकूण आयुष डॉक्टर}}{\text{एकूण अंदाजित लोकसंख्या}}$$

**Z स्कोअर** - सरासरीच्या मागे किंवा पुढे असलेले प्रमाणित विचलन.

**कमी वजन :** जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) बालकांच्या वाढीच्या मानकांनुसार कमी वजनाच्या बालकाचा वयानुसार वजनाचा Z-स्कोअर सरासरीच्या खाली प्रमाणित विचलन किमान दोन असते.

**मध्यम कमी वजन :** जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) बालकांच्या वाढीच्या मानकानुसार वयानुसार वजन हे (-२) ते (-३) प्रमाणित विचलनाच्या मध्ये असते.

**अतितीव्र कमी वजन :** जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) बालकांच्या वाढीच्या मानकानुसार वयानुसार वजन हे अतिशय कमी असते. (Z स्कोअर < -३ प्रमाणित विचलन)

**मध्यम तीव्र कुपोषण :** जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) बालकांच्या वाढीच्या मानकानुसार उंचीच्या प्रमाणात वजन हे (-२) ते (-३) प्रमाणित विचलनाच्या मध्ये असते.

**अतितीव्र कुपोषण :** जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) बालकांच्या वाढीच्या मानकानुसार उंचीच्या प्रमाणात वजन हे अतिशय कमी असते. (Z स्कोअर < -३ प्रमाणित विचलन)

**खुंटलेली वाढ म्हणजे :** ०-५९ महिने वयोगटातील मुलांची वाढ आणि विकास खुंटणे, ज्याचे वैशिष्ट्ये म्हणजे जागतिक आरोग्य संघटनेच्या बाल वाढीच्या मानकांनुसार, उंची-वयानुसार असलेल्या Z स्कोअर मध्यकाच्या तुलनेत उणे दोन मानक विचलनांपेक्षा (-२ प्रमाणित विचलन) कमी असते.

**मध्यम स्वररुपाची खुंटलेली वाढ :** ज्या मुलांची उंची-वयानुसार (-२ प्रमाणित विचलन) पेक्षा कमी असते, त्याला मध्यम स्वरुपाची खुंटलेली वाढ मानले जाते.

**तीव्र स्वरुपाची खुंटलेली वाढ :** उंची वयानुसार (-३ प्रमाणित विचलन) पेक्षा कमी असणे, ही तीव्र स्वरुपाची वाढ खुंटल्याचे दर्शवते.

**संस्थात्मक कुटुंब :** 'संस्थात्मक कुटुंब' म्हणजे संस्थेत वास्तव्य करणारे आणि सामायिक स्वयंपाकगृहात भोजन घेणा-या परस्पर असंबंधित व्यक्तींचा समूह होय. या प्रकारच्या कुटुंब संस्थेत बोर्डींग गृह, खानावळी, वसतिगृहे, हॉटेल्स, बचाव गृहे, निरीक्षण गृहे, भिक्षेकरी गृह, कारागृह, आश्रम, वृद्धाश्रम, बालगृहे, अनाथालये, इत्यादींचा समावेश होतो.

**कामाच्या शोधात किंवा कामासाठी उपलब्ध व्यक्ती (बेरोजगार) :** कामाची कमतरता असल्याने काम केलेले नाही तथापि, रोजगार विनिमय केंद्र, मध्यस्थ, मित्र अथवा नातेवाईक यांच्यामार्फत किंवा संभाव्य नियोक्त्यांकडे अर्ज करुन सद्य:स्थितीतील उपलब्ध काम व त्याचा मेहनताना विचारात घेऊन कामाची मागणी करीत आहे किंवा काम करण्याची इच्छा किंवा कामासाठी उपलब्धता दर्शविली आहे, अशा व्यक्तींना कामाच्या शोधात किंवा कामासाठी उपलब्ध व्यक्ती म्हणून संबोधले जाते.

**श्रमबल :** काम करणाऱ्या (रोजगारीत असलेल्या) व कामाच्या शोधात किंवा कामासाठी उपलब्ध असणाऱ्या (बेरोजगार) व्यक्ती मिळून श्रमबल तयार होते.

**कार्यशक्ती (रोजगार असलेले) :** कोणत्याही आर्थिक कार्यात गुंतलेल्या (रोजगारीत असलेल्या) व्यक्ती मिळून कार्यशक्ती तयार होते.

**स्त्रियांचा कार्य सहभाग दर :** एकूण काम करणाऱ्या स्त्रिया (मुख्य + सीमांतिक) (जनगणना २०११ नुसार) एकूण स्त्री लोकसंख्येशी असलेली टक्केवारी म्हणजे स्त्रियांचा कार्य सहभाग दर होय.

$$\textbf{स्त्रियांचा कार्य सहभाग दर} = \frac{\text{एकूण काम करणाऱ्या स्त्रिया (मुख्य + सीमांतिक)}}{\text{एकूण स्त्री लोकसंख्या}} \times १००$$

**श्रमशक्ती सहभाग दर$ :** श्रमबलामध्ये असलेल्या व्यक्तींची (रोजगार असलेले किंवा रोजगाराच्या शोधात असलेले किंवा रोजगारासाठी उपलब्ध असलेले) एकूण लोकसंख्येशी टक्केवारी म्हणजे श्रमशक्ती सहभाग दर.

$$\textbf{श्रमशक्ती सहभाग दर} = \frac{\text{(काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या + बेरोजगार व्यक्तींची संख्या )}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १००$$

**कामगार लोकसंख्या प्रमाण$ :** रोजगारावर असलेल्या व्यक्तींची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी म्हणजे कामगार लोकसंख्या प्रमाण होय.

$$\textbf{कामगार लोकसंख्या प्रमाण} = \frac{\text{रोजगारावर असलेल्या व्यक्तींची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १००$$

**बेरोजगार दर$ :** बेरोजगार व्यक्तींची श्रमबलातील एकूण व्यक्तीशी टक्केवारी म्हणजे बेरोजगार दर होय.

$$\textbf{बेरोजगार दर} = \frac{\text{बेरोजगार व्यक्तींची संख्या}}{(\text{काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या + बेरोजगार व्यक्तींची संख्या})} \times १००$$

($ नियतकालिक श्रम बल पाहणीच्या वार्षिक अहवालामध्ये वापरलेल्या संज्ञेनुसार)

**कार्य स्थिती :** विशिष्ट संदर्भ कालावधीमध्ये व्यक्ती ज्या कार्यामध्ये जास्त वेळ कार्यरत असेल त्यानुसार व्यक्तीची कार्यस्थिती ठरविली जाते.

**सामान्य कार्य स्थिती :** सर्वेक्षणाच्या दिनांकाच्या आधीच्या ३६५ दिवसांमध्ये व्यक्ती ज्या कार्य स्थितीमध्ये व्यस्त असेल ती व्यक्तीची सामान्य कार्य स्थिती समजली जाते.

**मुख्य कार्य स्थिती :** सर्वेक्षणाच्या दिनांकाच्या आधीच्या ३६५ दिवसांमध्ये व्यक्तीने ज्या आर्थिक कार्यात तुलनेने जास्त वेळ व्यतित केला ती व्यक्तीची नेहमीची मुख्य कार्य स्थिती समजली जाते.

**दुय्यम कार्य स्थिती :** सर्वेक्षणाच्या दिनांकाच्या आधीच्या ३६५ दिवसांच्या संदर्भ कालावधीमध्ये व्यक्तीने ३० दिवस किंवा त्याहून अधिक काळ मुख्य कार्य स्थितीसह इतर ज्या आर्थिक कार्यात व्यस्त असेल तर अशा आर्थिक कार्यांना व्यक्तीची दुय्यम कार्य स्थिती समजण्यात येते.

**चालू आठवड्याची स्थिती :** सर्वेक्षणाच्या दिनांकाच्या मागील सात दिवसांच्या संदर्भ कालावधीमध्ये व्यक्तीची असलेली कार्य स्थिती त्या व्यक्तीची चालू आठवड्याची स्थिती समजण्यात येते.

**असंघटित कामगार :** घरगुती उद्योगांमधील, स्वयंरोजगारीत किंवा असंघटित क्षेत्रातील मजुरीवरील कामगार तसेच संघटित क्षेत्रातील कामगार ज्यांना सामाजिक सुरक्षा लाभ मिळत नसतील तर अशा कामगारांना असंघटित कामगार समजण्यात येते.

**बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक:** आरोग्य, शिक्षण आणि राहणीमानाचा दर्जा या तीन समान भारित आयामाच्या बारा निर्देशकांद्वारे परिगणित केले जातात.

| आयाम | निर्देशक | वंचितता असेल जर |
|---|---|---|
| आरोग्य | पोषण | कुटुंबातील ० ते ५९ महिने वयोगटातील कोणतेही मूल किंवा १५ ते ४९ वर्षे वयोगटातील महिला किंवा १५ ते ५४ वर्षे वयोगटातील पुरुष कुपोषित असल्याचे आढळले |
| | बाल किशोर मृत्युदर | कुटूंबामध्ये एखादी १८ वर्षाखालील बालक/ किशोरवयीन व्यक्ती पाहणीपूर्वीच्या पाच वर्षाच्या कालावधीत मृत्यु पावली असल्यास |
| | माता आरोग्य | सर्वेक्षणापूर्वीच्या ५ वर्षांमध्ये कुटुंबातील कोणत्याही महिलेने बाळाला जन्म दिला हे, आणि अगदी अलीकडील बाळंतपणासाठी किमान ४ प्रसूतीपूर्व सुविधा घेतल्या नाहीत, किंवा सर्वात अलीकडील बाळंतपणादरम्यान प्रशिक्षित कुशल वैद्यकीय कर्मचाऱ्यांकडून मदत मिळाली नसेल |
| शिक्षण | शालेय शिक्षणाची वर्षे | कुटुंबातील १० वर्ष व त्यावरील एकाही व्यक्तीने शालेय शिक्षणाची सहा वर्षे पूर्ण केलेली नसतील |
| | शालेय उपस्थिती | कुटुंबातील शालेय वयाचा विद्यार्थी इयत्ताआठवीचे शिक्षण पूर्ण करण्याच्या वयापर्यंत शाळेत गेला नसेल |
| राहणीमानाचा दर्जा | स्वयंपाकाचे इंधन | शेण, कृषी पिके, झुडपे, लाकूडकिंवाकोळसा वापरून कुटुंबात स्वयंपाक केला जात असेल |
| | स्वच्छता | कुटुंबाकडे सुधारीत स्वच्छतेच्या सुविधा नाहीत किंवा सुविधाच नाही किंवा सुधारलेल्या आहेत परंतु इतर कुटुंबांसोबत सामायिकपणे वापरल्या जात असतील |
| | पिण्याचे पाणी | कुटुंबाकडे पिण्याच्या पाण्याची सुधारीत सोय उपलब्ध नाही किंवा स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी घरापासून किमान ३० मिनिटांच्या अंतरावर पायी जावे लागत (एक फेरी) असेल |
| | वीज | कुटूंबाकडे वीज नसेल |
| | गृहनिर्माण | कुटूंबाकरिता अपुरी निवास व्यवस्था, घराची जमीन नैसर्गिक सामग्रीने बनविलेली असेल किंवा छत, भिंत अविकसित साहित्यापासून बनलेल्याअसतील |
| | मालमत्ता | कुटुंबाकडे यापैकी एकापेक्षा जास्त वस्तू नसेल : रेडिओ, टीव्ही, टेलिफोन, संगणक, जनावरांचा वापर करुन बनविलेली गाडी, सायकल, मोटारसायकल किंवा रेफ्रिजरेटर; तसेचत्यांच्या मालकीची कार किंवा ट्रक नसेल |
| | बँक खाते | कुटूंबातील कोणत्याही व्यक्तीकडे बँक खाते किंवा पोस्ट ऑफिस खाते नसेल |

**ग्राहक वस्तू :** स्वत:च्या व कुटुंबाच्या वापरासाठी ग्राहकांनी खरेदी केलेल्या वस्तू.

**पूनर्निर्माण वस्तू:** वस्तू निर्मितीकरिता निविष्ठी म्हणून वापरण्यात येणाऱ्या वस्तू.

**भांडवली वस्तू :** वस्तू निर्मितीकरिता वापरण्यात येणा-या यंत्र सामग्री सारख्या वस्तू.

$$\textbf{प्रति आस्थापना वार्षीक स्थूल मूल्यवृध्दी} = \frac{\text{वार्षीक स्थूल मूल्यवृध्दी}}{\text{आस्थापनांची अंदाजित संख्या}}$$

$$\textbf{प्रति कामगार वार्षीक स्थूल मूल्यवृध्दी} = \frac{\text{वार्षीक स्थूल मूल्यवृध्दी}}{\text{कामगारांची अंदाजित संख्या}}$$

$$\textbf{प्रति कामगार वार्षीक वेतन} = \frac{\text{एकूण वेतन}}{\text{कामगारांची अंदाजित संख्या}}$$

**खुली हागणदारी मुक्त गाव :** ज्या परिसर/गावात दृश्य स्वरूपात विष्ठा आढळत नाही आणि प्रत्येक कुटुंब, सार्वजनिक आणि सामुदायिक संस्था विष्ठेची विल्हेवाट लावण्यासाठी सुरक्षित तंत्रज्ञानाचा पर्याय वापरत आहेत अशा गावास खुली हागणदारी मुक्त गाव असे अधिसूचित /घोषित केले जाऊ शकते.

**खुली हागणदारी मुक्त शहर :** दिवसाच्या कोणत्याही वेळी एकही व्यक्ती उघडयावर शौच करीत असलेली आढळली नाही अशा शहर/ प्रभागास खुली हागणदारी मुक्त शहर असे अधिसूचित / घोषित केले जाऊ शकते.

**खुली हागणदारी मुक्त + शहर :** दिवसाच्या कोणत्याही वेळी एकही व्यक्ती उघडयावर शौच / लघवी करीत असलेली आढळली नाही व जेथे सामुदायिक व सार्वजनिक शौचालय कार्यरत व सुस्थितीत आहेत अशा शहर/ प्रभागास खुली हागणदारी मुक्त + शहर असे अनुसुचित/ घोषित केले जाऊ शकते.

**खुली हागणदारी मुक्त ++ शहर :** दिवसाच्या कोणत्याही वेळी एकही व्यक्ती उघडयावर शौच/ लघवी करीत असलेली आढळली नाही व जेथे सामुदायिक व सार्वजनिक शौचालय कार्यरत व सुस्थितीत आहेत आणि ज्यामध्ये मलमुत्र, सांडपाणी हे नाले, जलस्त्रोत / मोकळ्या जागेत यामध्ये न सोडता त्यांचेवर प्रक्रिया करून त्यांचे व्यवस्थापन करण्यात येते अशा शहर/ प्रभागास खुली हागणदारी मुक्त + + शहर असे अनुसुचित / घोषित केले जाऊ शकते.

**वॉटर + शहर :** जेव्हा घरे, व्यावसायिक आस्थापनांमधील सांडपाणी, गटार व नाला याद्वारे सोडले जाणारे सर्व सांडपाणी पर्यावरणात सोडण्यापूर्वी समाधानकारक पातळीवर (केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मानकांनुसार) प्रक्रिया करुन शाश्वत पध्दतीने सोडण्यात येईल तेंव्हा शहर / प्रभाग / मंडळ/ परिमंडळ हे वॉटर + म्हणून घोषित केले जाऊ शकते.

**राज्य व जिल्हा मानव विकास निर्देशांक मापनासाठी पद्धती (राज्य मानव विकास अहवाल-२०१२) :**

आरोग्य, शिक्षण व उत्पन्न या आयामांचे निर्देशांक खालील सुत्राने परिगणित करण्यात आले आहेत.

$$I_x = \text{'X' आयामाचा निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य - लघुत्तम मूल्य}}{\text{महत्तम मूल्य - लघुत्तम मूल्य}}$$

शिक्षणाच्या निर्देशांकाची परिगणना साक्षरतेला दोन-तृतीयांश व पटनोंदणी दराला एक-तृतीयांश भारांक (weight) देऊन करण्यात आली आहे.

घटक निर्देशांक काढल्यानंतर जिल्ह्यांच्या मानव विकास निर्देशांकासाठी घटक निर्देशांकाची साधी सरासरी घेण्यात आली आहे.

घटक निर्देशांक अनुमानित करण्यासाठी खाली दिल्याप्रमाणे महत्तम व लघुत्तम मूल्ये ठरविण्यात आली.

| घटक | महत्तम | लघुत्तम |
|---|---|---|
| अर्भक जीवितत्व दर | १,००० | ० |
| साक्षरता दर | १०० | ० |
| स्थूल पटसंख्या प्रमाण | १०० | ० |
| दरडोई निव्वळ अंतर्गत उत्पन्न (चालू किंमतीनुसार) (₹) | १,५०,००० | १०,००० |

**मानव विकास निर्देशांक** म्हणजे आरोग्य, शिक्षण आणि राहणीमान या निर्देशांकांचे भौमितिक मध्य होय. या निर्देशांकांसाठी वापरण्यात येणारी गोलपोस्ट खालीलप्रमाणे आहे —

| आयाम | निर्देशक | किमान | कमाल |
|---|---|---|---|
| आरोग्य | आयुर्मान (वर्षे) | २० | ८५ |
| शिक्षण | शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे (वर्षे) | ० | १८ |
| | शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे (वर्षे) | ० | १५ |
| राहणीमानाचा दर्जा | दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (२०१७ पीपीपी$) | १०० | ७५,००० |

* * * * *

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक






## क. भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| राज्य | भौगोलिक क्षेत्र (लाख चौ. किमी) | लोकसंख्या (लाख) | लोकसंख्येची घनता (प्रति चौ. किमी) | नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | राज्याच्या लोकसंख्येची देशाच्या लोकसंख्येशी टक्केवारी | लोकसंख्येतील दशवर्षीय वाढ (टक्के) | स्त्री -पुरुष प्रमाण | बालकांमधील मुलामुलींचे प्रमाण (०-६ वर्षे वयोगट) | एकूण कुटुंबे (लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संदर्भ वर्ष /दिनांक | (२०११) | (२०११) | (२०११) | (२०११) | २०११) | (२००१-११) | (२०११) | (२०११) | (२०११) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| आंध्र प्रदेश | १.६३ | ४९५.७७ | ३०४ | २९.४७ | ४.०९ | ९.२१ | ९९७ | ९४४ | १२७.१९ |
| अरुणाचल प्रदेश | ०.८४ | १३.८४ | १७ | २२.९४ | ०.११ | २६.०३ | ९३८ | ९७२ | २.७१ |
| आसाम | ०.७८ | ३१२.०६ | ३९८ | १४.१० | २.५८ | १७.०७ | ९५८ | ९६२ | ६४.०६ |
| बिहार | ०.९४ | १,०४०.९९ | १,१०६ | ११.२९ | ८.६० | २५.४२ | ९१८ | ९३५ | १८९.१४ |
| छत्तीसगड | १.३५ | २५५.४५ | १८९ | २३.२४ | २.११ | २२.६१ | ९९१ | ९६९ | ५६.५१ |
| दिल्ली | ०.०१ | १६७.८८ | ११,३२० | ९७.५० | १.३९ | २१.२१ | ८६८ | ८७१ | ३४.३६ |
| गोवा | ०.०४ | १४.५९ | ३९४ | ६२.१७ | ०.१२ | ८.२३ | ९७३ | ९४२ | ३.४४ |
| गुजरात | १.९६ | ६०४.४० | ३०८ | ४२.६० | ४.९९ | १९.२८ | ९१९ | ८९० | १२२.४८ |
| हरियाणा | ०.४४ | २५३.५१ | ५७३ | ३४.८८ | २.०९ | १९.९० | ८७९ | ८३४ | ४८.५८ |
| हिमाचल प्रदेश | ०.५६ | ६८.६५ | १२३ | १०.०३ | ०.५७ | १२.९४ | ९७२ | ९०९ | १४.८३ |
| झारखंड | ०.८० | ३२९.८८ | ४१४ | २४.०५ | २.७२ | २२.४२ | ९४९ | ९४८ | ६२.५५ |
| कर्नाटक | १.९२ | ६१०.९५ | ३१९ | ३८.६७ | ५.०५ | १५.६० | ९७३ | ९४८ | १३३.५७ |
| केरळ | ०.३९ | ३३४.०६ | ८६० | ४७.७० | २.७६ | ४.९१ | १,०८४ | ९६४ | ७८.५४ |
| मध्य प्रदेश | ३.०८ | ७२६.२७ | २३६ | २७.६३ | ६.०० | २०.३५ | ९३१ | ९१८ | १५०.९३ |
| **महाराष्ट्र** | **३.०८** | **१,१२३.७४** | **३६५** | **४५.२२** | **९.२८** | **१६.००** | **९२९** | **८९४** | **२४४.२२** |
| मणिपूर | ०.२२ | २८.५६ | १२८ | २९.२१ | ०.२४ | २४.५० | ९८५ | ९३० | ५.५८ |
| मेघालय | ०.२२ | २९.६७ | १३२ | २०.०७ | ०.२५ | २७.९५ | ९८९ | ९७० | ५.४८ |
| मिझोराम | ०.२१ | १०.९७ | ५२ | ५२.११ | ०.०९ | २३.४८ | ९७६ | ९७० | २.२३ |
| नागालँड | ०.१७ | १९.७९ | ११९ | २८.८६ | ०.१६ | (-) ०.५८ | ९३१ | ९४३ | ३.९६ |
| ओडिशा | १.५६ | ४१९.७४ | २७० | १६.६९ | ३.४७ | १४.०५ | ९७९ | ९४१ | ९६.३८ |
| पंजाब | ०.५० | २७७.४३ | ५५१ | ३७.४८ | २.२९ | १३.८९ | ८९५ | ८४६ | ५५.१३ |
| राजस्थान | ३.४२ | ६८५.४८ | २०० | २४.८७ | ५.६६ | २१.३१ | ९२८ | ८८८ | १२७.११ |
| सिक्कीम | ०.०७ | ६.११ | ८६ | २५.१५ | ०.०५ | १२.८९ | ८९० | ९५७ | १.२९ |
| तामीळनाडू | १.३० | ७२१.४७ | ५५५ | ४८.४० | ५.९६ | १५.६१ | ९९६ | ९४३ | १८५.२५ |
| तेलंगणा | १.१२ | ३५०.०४ | ३१२ | ३८.८८ | २.८९ | १३.५८ | ९८८ | ९३२ | ८३.०४ |
| त्रिपूरा | ०.१० | ३६.७४ | ३५० | २६.१७ | ०.३० | १४.८४ | ९६० | ९५७ | ८.५६ |
| उत्तर प्रदेश | २.४१ | १,९९८.१२ | ८२९ | २२.२७ | १६.५० | २०.२३ | ९१२ | ९०२ | ३३४.४८ |
| उत्तराखंड | ०.५३ | १००.८६ | १८९ | ३०.२३ | ०.८३ | १८.८१ | ९६३ | ८९० | २०.५७ |
| पश्चिम बंगाल | ०.८९ | ९१२.७६ | १,०२८ | ३१.८७ | ७.५४ | १३.८४ | ९५० | ९५६ | २०३.८० |
| **भारत$** | **३२.८७** | **१२,१०८.५५** | **३८२** | **३१.१४** | **१००.००** | **१७.७०** | **९४३** | **९१८** | **२,४९५.०२** |

$ केंद्रशासित प्रदेश समाविष्ट

## भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| स्त्री प्रमुख कुटुंबे (लाख) | शेतकऱ्यांची संख्या (लाख) | पिण्यायोग्य / स्वच्छ पाण्याची सुविधा उपलब्ध असलेल्या कुटुंबांची टक्केवारी | अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | दिव्यांग लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | झोपडपट्टीतील लोकसंख्येची (सर्व शहरे) नागरी लोकसंख्येशी टक्केवारी | एकूण लोकसंख्येशी मुख्य कामगारांची टक्केवारी | कृषि विषयक काम करणाऱ्यांची एकूण काम करणाऱ्यांशी टक्केवारी | स्त्री कार्य सहभाग दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (२०११) | (२०११) | (२०११) | (२०११) | (२०११) | (२०११) | (२०११) | (२०११) | (२०११) | (२०११) |
| (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) |
| १९.०९ | ३३.४० | ९०.५^ | १७.०८ | ५.५३ | २.४६ | ३८.३२ | ३८.९६ | ६२.३६ | ३४.६५ |
| ०.३५ | ३.०३ | ७८.६ | - | ६८.७९ | १.९३ | ४.९० | ३४.६० | ५७.६७ | ३५.४४ |
| ८.५३ | ४०.६२ | ६९.९ | ७.१५ | १२.४५ | १.५४ | ४.४८ | २७.८४ | ४९.३५ | २२.४६ |
| १९.७५ | ७१.९६ | ९४.० | १५.९१ | १.२८ | २.२४ | १०.५३ | २०.५२ | ७३.५५ | १९.०७ |
| ७.३५ | ४०.०५ | ८६.३ | १२.८२ | ३०.६२ | २.४५ | ३१.९८ | ३२.२६ | ७४.६८ | ३९.७० |
| ३.९५ | ०.३३ | ९५.० | १६.७५ | - | १.४० | १०.९१ | ३१.६१ | १.३० | १०.५८ |
| ०.८० | ०.३१ | ८५.७ | १.७४ | १०.२३ | २.२६ | २.८९ | ३२.६४ | १०.०७ | २१.९२ |
| १२.३५ | ५४.४८ | ९०.३ | ६.७४ | १४.७५ | १.८१ | ६.५३ | ३३.७० | ४९.६१ | २३.३८ |
| ५.६६ | २४.८१ | ९३.८ | २०.१७ | - | २.१६ | १८.८० | २७.६७ | ४४.९६ | १७.७९ |
| ३.०५ | २०.६२ | ९३.७ | २५.१९ | ५.७१ | २.२६ | ८.९० | ३०.०५ | ६२.८५ | ४४.८२ |
| ६.८२ | ३८.१५ | ६०.१ | १२.०८ | २६.२१ | २.३३ | ४.७० | २०.६७ | ६२.९९ | २९.१० |
| २२.६९ | ६५.८१ | ८७.५ | १७.१५ | ६.९५ | २.१७ | १३.९३ | ३८.३० | ४९.२८ | ३१.८७ |
| १९.८३ | ६.७० | ३३.५ | ९.१० | १.४५ | २.२८ | १.२७ | २७.९३ | १७.१५ | १८.२३ |
| १५.०४ | ९८.४४ | ७८.० | १५.६२ | २१.०९ | २.१४ | २८.३५ | ३१.२६ | ६९.७९ | ३२.६४ |
| **३१.३६** | **१२५.६९** | **८३.४** | **११.८१** | **९.३५** | **२.६४** | **२३.३२** | **३८.९४** | **५२.७१** | **३१.०६** |
| ०.८३ | ५.७४ | ४५.४ | ३.४१ | ४०.८८ | १.८९ | उ ना | ३३.२६ | ५२.८१ | ३९.८८ |
| १.२७ | ४.९५ | ४४.७ | ०.५८ | ८६.१५ | १.४९ | ९.६४ | ३१.०६ | ५८.४५ | ३२.६७ |
| ०.३७ | २.३० | ६०.४ | ०.११ | ९४.४३ | १.३८ | १३.७४ | ३७.८३ | ५५.७६ | ३६.१६ |
| ०.५३ | ५.३८ | ५३.८ | - | ८६.४८ | १.५० | १४.४२ | ३७.४६ | ६१.६६ | ४४.७४ |
| १२.०२ | ४१.०४ | ७५.३ | १७.१३ | २२.८५ | २.९६ | २२.२८ | २५.५१ | ६१.८२ | २७.१६ |
| ७.९६ | १९.३५ | ९७.६ | ३१.९४ | - | २.३६ | १४.०४ | ३०.४६ | ३५.५९ | १३.९१ |
| ११.७७ | १३६.१९ | ७८.१ | १७.८३ | १३.४८ | २.२८ | १२.१३ | ३०.७२ | ६२.१० | ३५.१२ |
| ०.१७ | १.१७ | ८५.३ | ४.६३ | ३३.८० | २.९८ | २०.४३ | ३७.७३ | ४६.५३ | ३९.५७ |
| २९.६५ | ४२.४८ | ९२.५ | २०.०१ | १.१० | १.६४ | १६.६१ | ३८.७३ | ४२.१३ | ३१.८० |
| १२.१८ | ३१.५१ | - | १५.४५ | ९.०८ | २.९९ | ३३.७२ | ३९.२० | ३६.२० | उ.ना. |
| १.२१ | २.९६ | ६७.५ | १७.८३ | ३१.७६ | १.७५ | १४.५४ | २९.३२ | ४४.२० | २३.५७ |
| ४०.०७ | १९०.५८ | ९५.१ | २०.७० | ०.५७ | २.०८ | १४.०२ | २२.३४ | ५९.२५ | १६.७५ |
| ३.९३ | १५.८० | ९२.२ | १८.७६ | २.८९ | १.८४ | १६.०० | २८.४६ | ५१.२३ | २६.६८ |
| २६.१५ | ५१.१७ | ९२.२ | २३.५१ | ५.८० | २.२१ | २२.०६ | २८.१४ | ४४.०४ | १८.०८ |
| **३२७.८३** | **१,१८८.०९** | **८५.५** | **१६.६३** | **८.६३** | **२.२१** | **१७.३७** | **२९.९४** | **५४.६१** | **२५.५१** |

उ.ना. उपलब्ध नाही ^ तेलंगणा समाविष्ट

## भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| राज्य | वित्तविषयक निर्देशक | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्याची दरडोई महसूली जमा (₹) | एकूण महसूली जमेत राज्याच्या स्वत:च्या कर महसूलाचा हिस्सा (टक्के) | केंद्रीय करांतील दरडोई हिस्सा (₹) | केंद्राकडून प्राप्त दरडोई अनुदान (₹) | एकूण खर्चातील विकास खर्चाचा हिस्सा (टक्के) | महसूली तूट (+)/ आधिक्य (-) ची राज्यांतर्गत स्थूल उत्पन्नाशी टक्केवारी | वित्तीय तूट (+)/आधिक्य (-) ची राज्यांतर्गत स्थूल उत्पन्नाशी टक्केवारी | राज्य शासनाच्या थकित दायित्वांची राज्यांतर्गत स्थूल उत्पन्नाशी टक्केवारी |
| संदर्भ वर्ष /दिनांक | (२०२४-२५) | | | | | | | |
| (१) | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) | (२७) | (२८) |
| आंध्र प्रदेश | ३२,९३५ | ५३.९ | ९,७४४ | ४,११० | ६८.५ | ३.० | ४.६ | ३५.५ |
| अरुणाचल प्रदेश | २,११,९१६ | ८.८ | ४,२३० | ४३,७७१ | ७३.६ | (-) १६.३ | ७.५ | ५५.४ |
| आसाम | ३०,९६० | ३०.४ | ११,१०७ | ७,९८८ | ६१.५ | ०.८ | ५.७ | २७.७ |
| बिहार | १८,८५२ | २२.२ | ९,९८२ | ४,११७ | ७१.० | ४.१ | ९.२ | ३८.० |
| छत्तीसगड | ३९,४४८ | ३८.१ | १४,३२१ | ४,३९४ | ७६.५ | १.३ | ४.१ | २९.२ |
| दिल्ली | २८,६६९ | ९३.९ | लागू नाही | १,४६५ | ७४.१ | (-) ०.७ | ०.१ | ०.९ |
| गोवा | १,३४,०९९ | ४३.६ | ३१,३०० | ६,९३४ | ६३.७ | (-) १.० | ३.४ | २९.१ |
| गुजरात | ३१,७७४ | ६३.८ | ६,१४२ | २,५८५ | ६४.८ | (-) ०.८ | १.९ | १७.८ |
| हरियाणा | ३६,५८४ | ७२.८ | ४,५६९ | २,५४८ | ६०.५ | १.५ | २.७ | ३०.२ |
| हिमाचल प्रदेश | ५८,०६३ | ३०.९ | १४,९११ | २०,२८१ | ५८.६ | २.८ | ६.९ | ४३.६ |
| झारखंड | २७,४११ | ३०.७ | १०,५७३ | ३,४६० | ७०.८ | (-) २.३ | २.२ | २५.५ |
| कर्नाटक | ३७,७११ | ७०.० | ६,८६५ | २,३४० | ६५.६ | ०.९ | २.९ | २५.४ |
| केरळ | ३६,९२२ | ६१.४ | ७,०९७ | २,१८० | ३९.६ | २.३ | ३.६ | ३६.२ |
| मध्य प्रदेश | २९,७०२ | ३६.७ | ११,४५२ | ४,८७२ | ६७.५ | (-) ०.१ | ४.२ | ३०.८ |
| **महाराष्ट्र** | **४१,९३५** | **६८.५** | **६,३५५** | **४,५१०** | **६४.७** | **०.६** | **२.९** | **१८.६** |
| मणिपूर | ७४,६०७ | ७.७ | २८,१५९ | ३९,८१० | ५५.२ | (-) ८.५ | ४.० | ४०.७ |
| मेघालय | ७०,८०० | १६.८ | २९,०८२ | २७,६११ | ६८.८ | (-) ७.३ | २.५ | ३९.८ |
| मिझोराम | १,०५,४२३ | १०.१ | ५०,७६२ | ३५,०३७ | ६३.९ | ०.२ | ५.१ | ३५.० |
| नागालँड | ७६,१७९ | १०.४ | ३२,३४३ | ३३,१८३ | ५०.३ | (-) २.७ | ८.१ | ४९.४ |
| ओडिशा | ४५,७८९ | २८.० | १२,४६८ | ८,०७३ | ७६.० | (-) ३.१ | ३.३ | २०.६ |
| पंजाब | ३३,४१४ | ५५.८ | ७,४९१ | ३,७७६ | ५१.८ | ३.४ | ४.४ | ४६.९ |
| राजस्थान | ३१,८६९ | ४५.९ | ९,४१० | ४,५७२ | ६९.४ | १.९ | ४.१ | ३७.० |
| सिक्कीम | १,५७,९१० | १८.० | ७२,२६५ | ४३,०९५ | ६१.३ | (-) २.० | ६.१ | ३६.३ |
| तामीळनाडू | ३८,०६० | ६५.६ | ६,७९८ | २,६६० | ५५.९ | १.५ | ३.३ | ३०.२ |
| तेलंगणा | ५२,६८३ | ६४.० | ७,०५१ | ५,१७१ | ७७.७ | (-) ०.४ | २.९ | २७.३ |
| त्रिपूरा | ५८,३२४ | १३.७ | २५,३३५ | २३,८९४ | ५८.४ | (-) २.२ | ५.८ | २९.३ |
| उत्तर प्रदेश | २२,८६७ | ३८.२ | ९,६४० | ३,९४२ | ५७.२ | (-) २.१ | ३.४ | ३०.० |
| उत्तराखंड | ५०,०९८ | ३७.४ | १२,१६८ | १५,३३९ | ५६.७ | (-) ०.८ | २.५ | २५.३ |
| पश्चिम बंगाल | २२,७९५ | ४३.९ | ९,६१६ | २,८४८ | ६५.८ | २.४ | ४.० | ४०.० |
| **भारत$** | **३२,५५६** | **४८.७** | **९,१५१** | **४,८८७** | **६४.२** | **०.६** | **३.५** | **२८.४** |

$ केंद्रशासित प्रदेश समाविष्ट      उ.ना. उपलब्ध नाही

## भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न* (₹) | अनुसूचित वाणिज्यिक बँका | | | | | राष्ट्रीय पेंशन प्रणाली अंतर्गत नोंदणी धारकांची संख्या | वार्षिक पर्जन्य (मिमी) | वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दर लाख लोकसंख्येमागे बँक कार्यालयांची संख्या@ | दरडोई ठेवी @ (₹) | दरडोई कर्ज@ (₹) | कर्ज-ठेवी प्रमाण (टक्के) | प्राधान्य क्षेत्राच्या पत-पुरवठ्याचा एकूण पतपुरवठ्या-मधील हिस्सा (टक्के) | | | |
| (२०२४-२५) | (दि. ३१ मार्च, २०२५ रोजी) | | | | | (२०२४-२५) | (२०२४) | (२०१५-१६) |
| (२९) | (३०) | (३१) | (३२) | (३३) | (३४) | (३५) | (३६) | (३७) |
| २,६६,२४० | १४.९ | ९८,९६० | १,४९,५०७ | १५१.१ | ५०.५ | ६५,६१३ | १,०५९.४ | ०.९४ |
| २,४६,८१३ | १४.३ | २,०८,२६१ | ६४,६१२ | ३१.० | २५.८ | ३९६ | २,१९२.८ | ३.३५ |
| १,५९,१८५ | ८.६ | ६४,३३७ | ४०,३६२ | ६२.७ | ३९.१ | १४,९७४ | १,८५८.५ | १.०९ |
| ६९,३२१ | ६.२ | ४३,६०४ | २२,४०७ | ५१.४ | ४७.५ | ४०,०२० | ९१६.७ | ०.३९ |
| १,६२,८७० | १०.१ | ८६,८७६ | ६८,८५२ | ७९.३ | ४०.२ | १३,०१९ | १,३६४.१ | १.२४ |
| ४,९३,०२४ | १७.२ | ९,३५,१६४ | ८,३७,६१७ | ८९.६ | १७.१ | ३४,२५९ | ७३२.७ | १.३९ |
| ७,६४,३९२ | ४२.४ | ७,५८,४०६ | २,०२,६६३ | २६.७ | ३६.२ | २,९१२ | ४,९०६.६ | १.१० |
| ३,२७,१९५ | १२.७ | १,७३,८५३ | १,३८,५२७ | ७९.७ | ५८.४ | ४९,८९५ | १,११४.२ | १.८८ |
| ३,५३,१८२ | १७.८ | २,८७,२९४ | १,९५,९०१ | ६८.२ | ३८.८ | ३६,७१६ | ४७६.१ | २.२२ |
| २,५६,१३७ | २३.५ | २,१५,५०१ | ८१,४२२ | ३७.८ | ५२.२ | ७,७६५ | ९७९.० | ०.९५ |
| १,१६,६६३ | ८.४ | ९०,७९४ | ३५,७१८ | ३९.३ | ४४.४ | २१,००७ | १,१८३.० | १.१० |
| ३,८०,९०६ | १६.३ | २,७५,५७१ | १,८६,५६९ | ६७.७ | २६.६ | १,१०,८९६ | १,३०३.७ | १.३६ |
| ३,०८,३३८ | १९.८ | २,४८,१३७ | १,७०,७०४ | ६८.८ | ४०.६ | २४,८३६ | २,७९५.४ | ०.१८ |
| १,५२,६१५ | ८.८ | ७५,९७८ | ५९,४७० | ७८.३ | ५३.४ | ३१,३२९ | १,२२४.४ | १.५७ |
| **३,१७,८०१** | **११.२** | **४,०७,८३९** | **३,९३,६०९** | **९६.५** | **३०.६** | **१,४४,७३९** | **१,३८५.३** | **१.३४** |
| उ.ना. | ७.६ | ५१,२०६ | ३९,२०० | ७६.६ | ६५.३ | ९२० | १,३०३.९ | १.१४ |
| १,५७,१४१ | ११.३ | १,१०,७८९ | ४४,६९५ | ४०.३ | २१.३ | १,२३९ | ३,४४६.४ | १.२९ |
| उ.ना. | १८.९ | १,३८,४७९ | ७१,२६८ | ५१.५ | १७.० | ७७० | १,८८६.५ | १.२५ |
| उ.ना. | १०.१ | ८२,६२५ | ४३,०६० | ५२.१ | २१.४ | ८५० | १,३६२.३ | ४.८७ |
| १,६८,९६६ | १२.४ | १,२४,६१९ | ५९,९८७ | ४८.१ | ४३.२ | ३१,७३० | १,३७२.९ | ०.९५ |
| २,२१,१९७ | २१.८ | २,१४,९०६ | १,२५,७१२ | ५८.५ | ५३.९ | २७,५३४ | ३९१.५ | ३.६२ |
| १,८५,०५३ | १०.५ | ८९,५७८ | ७९,३६३ | ८८.६ | ५५.३ | ५१,९६२ | ७१०.० | २.७३ |
| उ.ना. | २५.९ | २,३२,०५६ | १,००,६६३ | ४३.४ | २५.८ | ३५२ | २,७९९.२ | १.२७ |
| ३,६१,६१९ | १६.७ | १,८९,२२४ | २,१७,९०३ | ११५.२ | ४३.२ | ६७,०८८ | १,१७२.७ | ०.७५ |
| ३,८७,६२३ | १५.९ | २,२५,६१३ | २,५१,७०५ | १११.६ | २९.५ | ३५,८९९ | १,११३.५ | १.०० |
| १,९२,८४२ | १४.८ | ९९,८१० | ४३,१६५ | ४३.२ | ३६.६ | २,५४२ | २,२८२.९ | ०.४९ |
| १,०८,५७२ | ७.९ | ७९,४२४ | ४०,४२९ | ५०.९ | ४०.३ | ९१,१३१ | ७९४.१ | ०.७३ |
| २,७४,०६४ | १९.२ | २,०७,१८४ | ८५,९८२ | ४१.५ | उ. ना. | १०,७४१ | १,४८६.२ | ०.८५ |
| १,६३,४६७ | ९.९ | १,२२,४७७ | ६३,१२६ | ५१.५ | ४६.१ | ५६,८१९ | १,८७३.४ | ०.७६ |
| **२,०५,३२४** | **११.६** | **१,६५,९३४** | **१,३१,९५०** | **७९.५** | **३७.४** | **९,९२,१८४** | **१,२०६.६** | **१.०८** |

@ १ मार्च, २०२५ रोजीची प्रक्षेपित लोकसंख्येनुसार  * अस्थायी  उ.ना. उपलब्ध नाही

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| राज्य | प्रति शंभर व्यक्तींमागे पशुधनाची संख्या | दरडोई दुधाची उपलब्धता (ग्रॅम/दिवस) | दरडोई अंडी उपलब्धता (संख्या/वर्ष) | दरडोई मांस उपलब्धता (किलो/वर्ष) | प्रति हेक्टर उत्पादकता (किलोग्रॅम) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | तृणधान्ये | कडधान्ये | अन्नधान्ये | तेलबिया | कापूस (रुई) | ऊस (टन) |
| संदर्भ वर्ष /दिनांक | (२०१९) | (२०२४-२५) | (२०२४-२५) | (२०२४-२५) | त्रैवार्षिक सरासरी (२०२२-२३ ते २०२४-२५) | | | | | |
| (१) | (३८) | (३९) | (४०) | (४१) | (४२) | (४३) | (४४) | (४५) | (४६) | (४७) |
| आंध्र प्रदेश | ६५.०३ | ७१६ | ५१४ | २१.३३ | ४,१२५ | ९३० | ३,१९७ | ९५२ | ३८२ | ८२ |
| अरुणाचल प्रदेश | ७६.८६ | ४६ | ३३ | ११.६५ | १,६८८ | १,०९४ | १,६५४ | १,०६४ | - | २२ |
| आसाम | ५२.४२ | ९२ | १८ | १.९३ | २,४३० | ७८१ | २,३१५ | ७७७ | ८४ | ४४ |
| बिहार | ३०.३१ | २८५ | २९ | ३.२७ | ३,२०३ | ८९५ | ३,०४७ | १,१५३ | - | ६१ |
| छत्तीसगड | ५४.८३ | १९४ | ८१ | २.११ | २,५५७ | ७२९ | २,३३६ | ६७२ | ३१२ | ५७ |
| दिल्ली | १.८० | ५२ | ० | ०.०० | ३,८४९ | २,००० | ३,८४८ | १,५२५ | - | - |
| गोवा | ८.५७ | ११७ | २८ | ४.९४ | २,६८९ | ९३२ | २,५०५ | १,६६२ | - | ५८ |
| गुजरात | ३९.२७ | ७३० | २८ | ०.५३ | २,६५२ | १,४२५ | २,३०२ | २,२९२ | ५६३ | ७३ |
| हरियाणा | २४.३७ | ११२८ | २९९ | २३.८७ | ४,०३३ | ८८२ | ३,९८० | १,८७७ | ४१४ | ८२ |
| हिमाचल प्रदेश | ६०.२३ | ६६६ | १३ | ०.७२ | २,२९७ | १,७०१ | २,२७२ | ७२७ | - | १५ |
| झारखंड | ६२.६१ | २१४ | २७ | २.३२ | १,८०२ | १,०६५ | १,५६५ | ८३३ | - | २५ |
| कर्नाटक | ४३.८९ | ५५९ | १४६ | ६.६३ | २,४६२ | ६०५ | १,७६४ | १,०२९ | ५०० | ८५ |
| केरळ | ८.२६ | १९५ | ७० | १४.५५ | २,९२५ | १,००२ | २,९०९ | ८५७ | ११७२ | १०३ |
| मध्य प्रदेश | ४९.०२ | ७०७ | ३५ | १.७६ | २,७९५ | १,१५३ | २,३४५ | १,०६२ | ४६१ | ६४ |
| **महाराष्ट्र** | **२६.९३** | **३५८** | **६५** | **९.५४** | **१,८५४** | **९४७** | **१,४६७** | **१,२५९** | **३२२** | **८८** |
| मणिपूर | १७.६६ | ४१ | ४४ | ९.७८ | २,१४३ | १,००४ | २,००७ | ८२५ | - | ५४ |
| मेघालय | ६२.९४ | ७६ | ३७ | १७.२५ | २,४६५ | १,४६९ | २,४०४ | १,०६९ | १४४ | - |
| मिझोराम | ३०.०३ | ५२ | ३४ | १२.०५ | १,५५० | १,१९९ | १,५२२ | ९४८ | २०७ | २६ |
| नागालँड | २५.६३ | ६० | २० | १०.८६ | १,७५० | १,१९४ | १,६८८ | १,०९७ | ६०० | ४३ |
| ओडिशा | ४०.२० | १५९ | ८४ | ५.२९ | २,१८४ | ५९९ | १,९१२ | ९४६ | ५६५ | ५४ |
| पंजाब | २३.५० | १३१८ | १६४ | ८.६८ | ४,६८३ | ९४४ | ४,६५६ | १,६२३ | ४१४ | ८३ |
| राजस्थान | ७२.९६ | १२२९ | ३९ | २.९२ | २,१२५ | ६६५ | १,५९० | १,४९५ | ५०२ | ८४ |
| सिक्कीम | ४१.१३ | ३५२ | १७ | ७.२४ | १,६६७ | ९७२ | १,५८८ | ८९१ | - | - |
| तामीळनाडू | ३२.२८ | ४०७ | ३०२ | १०.४ | ३,४६६ | ५५७ | २,८९८ | २,१९१ | ३३१ | १०६ |
| तेलंगणा | ८७.४० | ४२५ | ५०६ | २८.७८ | ३,७२४ | १,११५ | ३,५५४ | १,८१० | ५०४ | ९६ |
| त्रिपूरा | ३२.८५ | १७३ | ८४ | १४.१५ | ३,१७० | ८३५ | २,९११ | ८६३ | १९४ | ५६ |
| उत्तर प्रदेश | ३०.०० | ४४७ | २६ | ५.३८ | ३,१६७ | १,०६० | २,८९३ | १,१७३ | ३६८ | ८१ |
| उत्तराखंड | ३९.४७ | ४५६ | ५४ | २.१८ | २,६२७ | ९७१ | २,४९८ | १,०३४ | - | ८२ |
| पश्चिम बंगाल | ३८.५४ | २१९ | १६१ | १३.१४ | ३,२३८ | ९७९ | ३,०७८ | १,३१३ | ८४६ | ७० |
| **भारत$** | **३९.९८** | **४८५** | **१०६** | **७.५** | **२,९६९** | **९०३** | **२,५३७** | **१,३६५** | **४४०** | **८२** |

$ केंद्रशासित प्रदेश समाविष्ट

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| दरडोई अन्नधान्यांचे उत्पादन (कि.ग्रॅ) | दर हेक्टर पिकांखालील क्षेत्रामागे खतांचा वापर (कि.ग्रॅ) | दर हेक्टर पिकांखालील क्षेत्रामागे खतांचा वापर (कि.ग्रॅ) | एकूण सिंचित क्षेत्राची पिकाखालील एकूण क्षेत्राशी टक्केवारी* | निव्वळ पेरणी क्षेत्राची एकूण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी* | पिकांची सघनता* | वनाच्छादित क्षेत्राची + एकूण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | झाडांनी आच्छादलेल्या क्षेत्राची ++ एकूण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (२०२४-२५) | (२०२२-२३) | (२०२३-२४) | (२०२३-२४) | (२०२३-२४) | (२०२३-२४) | (२०२३) | (२०२३) |
| (४८) | (४९) | (५०) | (५१) | (५२) | (५३) | (५४) | (५५) |
| २१९.३ | २६२.३ | २९९.८ | ५७.० | ३०.४ | ११५.९ | १८.५ | ३.३ |
| २४८.३ | १.० | १.२ | १८.१ | ३.१ | १३४.९ | ७८.७ | १.४ |
| १५२.७ | ६३.४ | ६५.२ | १४.९ | ३५.१ | १४९.६ | ३६.१ | २.७ |
| १६४.८ | २२५.१ | २२५.५ | ८०.० | ५६.४ | १४७.५ | ८.० | २.५ |
| ३७०.५ | १२६.९ | १४९.४ | ३४.३ | ३४.१ | ११९.७ | ४१.३ | ४.८ |
| ४.८ | ३१२.३ | ३७५.७ | ९३.६ | १८.९ | १६७.९ | १३.२ | ११.९ |
| ५०.५ | १९.२ | १९.१ | ३३.१ | ३४.३ | ११४.२ | ६१.२ | ७.० |
| १४३.८ | १२९.५ | १२६.५ | ७०.६ | ५०.१ | १५१.३ | ७.७ | ३.४ |
| ६१४.० | २०४.१ | २०८.३ | ९१.९ | ७९.५ | १९६.३ | ३.७ | ३.८ |
| २०८.४ | ६५.२ | ५९.९ | २२.९ | ९.३ | १६९.६ | २८.० | १.५ |
| १२५.२ | १५४.७ | १६८.१ | १७.२ | ११.३ | १४३.५ | २९.८ | ४.६ |
| २१४.० | १३९.६ | १४४.५ | ४३.३ | ५५.८ | १२५.८ | २०.५ | ४.१ |
| १४.४ | ६१.४ | ५९.९ | २१.० | ५०.८ | १२८.५ | ५६.८ | ७.५ |
| ५२८.६ | ९३.१ | १००.९ | ६०.२ | ५०.७ | १९३.५ | २५.० | २.८ |
| **१४६.५** | **१११.३** | **१२०.५** | **उ. ना.** | **५३.९** | **१४६.२** | **१६.५** | **४.७** |
| १५२.७ | ५६.६ | ३७.८ | १४.९ | ९.६ | १७७.७ | ७४.३ | ०.९ |
| ९९.९ | - | ७.१ | ३५.२ | १२.२ | १२०.४ | ७५.६ | ३.२ |
| ३७.२ | २६.७ | २९.२ | १०.० | ९.४ | १०१.५ | ८५.३ | २.७ |
| २१८.० | ०.५ | ०.८ | २५.४ | २२.१ | १३१.४ | ७३.७ | २.४ |
| २२२.५ | १०८.० | ११६.५ | ३२.३ | २७.७ | १२०.० | ३३.७ | ४.० |
| १,०५५.९ | २२७.४ | २३७.२ | ९३.५ | ८१.६ | २०१.१ | ३.७ | २.९ |
| ३१०.३ | ६४.८ | ६८.७ | ४६.८ | ५३.२ | १५२.२ | ४.८ | ३.२ |
| ९८.० | - | - | ९.४ | ११.७ | १६७.५ | ४७.३ | ०.७ |
| १४१.५ | १६३.१ | १७४.७ | ६२.७ | ३६.६ | १२८.६ | २०.३ | ४.१ |
| ५६३.९ | १८४.६ | २०८.१ | ७४.१ | ४९.६ | १५२.५ | १८.९ | ३.१ |
| १८१.९ | ३२.५ | २६.८ | २४.३ | २४.३ | १८९.४ | ७२.३ | २.४ |
| २६६.६ | १८६.१ | १७९.३ | ८२.८ | ६७.९ | १८२.० | ६.२ | ३.७ |
| १४५.२ | १४८.१ | १६१.४ | ५९.९ | १०.३ | १६४.६ | ४५.४ | २.३ |
| १९८.८ | १६१.९ | १४२.५ | ७२.९ | ५९.१ | १९३.२ | १९.० | ३.३ |
| **२५४.१** | **१३६.१** | **१४०.६** | **५९.९** | **४२.३** | **१५६.८** | **२१.८** | **३.४** |

उ.ना. उपलब्ध नाही * अस्थायी

+ मालकी व न्यायिक दर्जा लक्षात न घेता १० टक्क्यांपेक्षा जास्त झाडांच्या छताच्या घनतेसहीत एक हेक्टरपेक्षा जास्त जमीन (फळबाग, बांबू व पाम समाविष्ट)

++ किमान नकाशाच्या क्षेत्रापेक्षा (एक हेक्टर) कमी व वन क्षेत्राव्यतिरिक्त अभिलिखीत वनक्षेत्राबाहेरील झाडांचे पट्टे

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| राज्य | वनातील कार्बन साठा (टन/हेक्टर) | वार्षिक उद्योग पाहणी | | | | श्रमशक्ती सहभाग दर# (१५ वर्षे व त्यावरील वयोगटातील व्यक्तींसाठी) | | कामगार लोकसंख्या प्रमाण# (१५ वर्षे व त्यावरील वयोगटातील व्यक्तींसाठी) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कार्यरत कारखान्यांची संख्या | कामगार ('०००) | प्रति कामगार एकूण उत्पादन ( ₹'०००) | प्रति कामगार निव्वळ मूल्यवृद्धी (₹'०००) | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी |
| संदर्भ वर्ष /दिनांक | २०२३ | (२०२३-२४) | | | | (२०२३-२४) | | | |
| (१) | (५६) | (५७) | (५८) | (५९) | (६०) | (६१) | (६२) | (६३) | (६४) |
| आंध्र प्रदेश | ७७.६५ | १२,३०५ | ६३६ | १०,७५१ | १,२५९ | ६४.२ | ५१.३ | ६२.० | ४८.२ |
| अरुणाचल प्रदेश | १५५.०० | १८२ | ३ | ४,८९८ | ७५१ | ७५.५ | ६०.५ | ७१.७ | ५२.८ |
| आसाम | ९६.१८ | ५,०४१ | २०१ | ६,३४८ | १,२०६ | ६८.५ | ५५.८ | ६६.१ | ५१.६ |
| बिहार | ७७.५९ | २,६९२ | ११७ | ११,२४१ | १,१९१ | ५४.३ | ४३.४ | ५२.८ | ४०.३ |
| छत्तीसगड | ९०.४२ | ४,९२१ | २३९ | १३,९६६ | १,४८० | ७५.२ | ५७.० | ७४.१ | ५२.६ |
| दिल्ली | ६२.४२ | २,०९७ | ६८ | ६,४१३ | ९४८ | ५२.५ | ४६.३ | ४९.४ | ४५.४ |
| गोवा | ११२.६० | ६८१ | ६६ | १०,५०८ | २,२३३ | ५२.० | ५१.६ | ४७.४ | ४७.४ |
| गुजरात | ७२.१३ | २६,६६३ | १,९७९ | १३,३३९ | १,४७१ | ७१.५ | ५५.४ | ७१.३ | ५४.१ |
| हरियाणा | ६४.८९ | ८,१८० | ९४७ | ११,७०५ | १,४३२ | ५०.० | ४८.६ | ४८.५ | ४६.७ |
| हिमाचल प्रदेश | १६३.६८ | १,९८० | १७३ | ९,४७४ | २,०५० | ७६.० | ६३.२ | ७२.२ | ५७.५ |
| झारखंड | ७८.४५ | २,२५३ | १९१ | १३,६९९ | २,५०० | ६८.७ | ४४.५ | ६८.४ | ४१.९ |
| कर्नाटक | १०४.०१ | ११,७४४ | ९६९ | १०,१७२ | १,६६८ | ५९.८ | ५१.७ | ५८.७ | ४९.६ |
| केरळ | ९७.०५ | ६,९८२ | २८३ | ९,३३६ | १,२२८ | ५८.६ | ५३.७ | ५४.१ | ५०.१ |
| मध्य प्रदेश | ७८.९३ | ४,५८७ | ३८५ | ११,७४२ | १,७१३ | ७४.५ | ५३.४ | ७४.२ | ५१.९ |
| **महाराष्ट्र** | **९१.३६** | **२१,१९६** | **१,८५०** | **११,९९४** | **१,८४६** | **६३.०** | **५३.६** | **६१.६** | **५०.९** |
| मणिपूर | १०६.०८ | २४४ | ४ | १,२५८ | २०७ | ६०.५ | ५७.५ | ५७.२ | ५३.१ |
| मेघालय | १०७.९९ | १८८ | ११ | १०,८१० | १,५७८ | ८०.८ | ५७.९ | ७६.७ | ४९.८ |
| मिझोराम | ९३.६५ | २०४ | १ | ८२८ | १७१ | ५५.७ | ५२.५ | ५४.९ | ५०.७ |
| नागालँड | १०८.५१ | १८९ | ५ | १,१२६ | १८५ | ७७.१ | ६४.० | ७२.७ | ५६.८ |
| ओडिशा | ८६.५२ | २,९४७ | ३१४ | १६,६४४ | १,८६१ | ६७.१ | ५३.२ | ६५.४ | ४९.६ |
| पंजाब | ७३.६३ | ११,३१६ | ६२७ | ६,४९५ | ८३० | ५७.४ | ५२.९ | ५४.३ | ४९.९ |
| राजस्थान | ६६.५७ | ९,७६० | ५९७ | १०,१९१ | १,४७० | ६९.१ | ५२.४ | ६७.० | ४८.३ |
| सिक्कीम | १६९.२० | ८७ | २१ | १५,१६२ | ७,३४२ | ८१.९ | ५७.० | ८०.१ | ५५.३ |
| तामीळनाडू | ८२.२५ | ३२,००० | २,४७६ | ६,२५८ | ८६४ | ६५.२ | ५१.३ | ६३.१ | ४९.२ |
| तेलंगणा | ७६.३५ | १०,५०३ | ७७३ | ५,३०४ | ९२१ | ६७.१ | ५४.४ | ६४.८ | ५०.४ |
| त्रिपूरा | ९७.८५ | ६९० | २१ | १,१२९ | १८७ | ६६.० | ४९.९ | ६५.१ | ४८.३ |
| उत्तर प्रदेश | ७९.८५ | १८,८२७ | १,२८१ | ८,६०७ | १,१३८ | ५९.५ | ४७.७ | ५८.१ | ४४.५ |
| उत्तराखंड | १५४.९६ | २,४६१ | ३५२ | ७,९८७ | १,६०५ | ६४.५ | ४९.५ | ६१.९ | ४६.६ |
| पश्चिम बंगाल | ९१.७१ | ८,४१६ | ६०९ | ९,९४७ | १,०९७ | ६३.७ | ५५.४ | ६२.२ | ५३.५ |
| **भारत$** | **१०१.८५** | **२,१२,९९०** | **१५,५२०** | **९,८७६** | **१,३५५** | **६३.७** | **५२.०** | **६२.१** | **४९.४** |

$ केंद्रशासित प्रदेश समाविष्ट

# सामान्य स्थितीनुसार (मुख्य +दुय्यम कार्यस्थिती) व नियतकालिक श्रमबल पाहणी वार्षिक अहवाल (जुलै २०२३-जून २०२४) च्या आकडेवारीवर आधारित

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| बेरोजगारीचा दर# (१५ वर्षे व त्यावरील वयोगटातील व्यक्तींसाठी) | | आर्थिक गणना | | दर लाख लोकसंख्येमागे विजेची स्थापित क्षमता* (मेगावॅट) | दरडोई विद्युत निर्मिती* (किलो वॅट तास) | एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | नागरी | दर लाख लोकसंख्येमागे आस्थापनांची संख्या | दर लाख लोकसंख्येमागे आस्थापनांमधील रोजगारांची संख्या | | | |
| (२०२३-२४) | | सहावी आर्थिक गणना (२०१३) | | (३१-०३-२०२५) | (२०२४-२५) | (२०२३-२४) |
| (६५) | (६६) | (६७) | (६८) | (६९) | (७०) | (७१) |
| ३.४ | ५.९ | ८,५५८ | १७,३२९ | ४७.९२ | १,४९०.२१ | १२.०५ |
| ५.१ | १२.८ | २,६३२ | ७,८७३ | ९.८२ | १.१९ | ४४.५६ |
| ३.५ | ७.४ | ६,५०५ | १२,६६९ | १.६९ | ७१.२५ | १४.०३ |
| २.६ | ७.३ | १,६४० | ३,११६ | ०.४२ | ३.४३ | २०.३२ |
| १.५ | ७.६ | ३,०२९ | ७,२८६ | ५८.०५ | ३,५८५.३७ | १५.८८ |
| ६.० | २.० | ५,२१४ | १७,९८८ | १२.५२ | ३४५.७१ | ६.८६ |
| ८.९ | ८.२ | ६,६२२ | १९,७९२ | ६.७१ | ४०.६२ | ८.३० |
| ०.४ | २.३ | ६,५७३ | १५,८९७ | ७०.६८ | १,७३६.११ | ९.१२ |
| ३.१ | ४.० | ४,५९५ | १२,७६७ | २४.२६ | ९७२.०५ | ११.३० |
| ५.० | ९.० | ६,००५ | १४,२३५ | ५६.१९ | १,८६८.११ | १०.९८ |
| ०.५ | ५.८ | १,९३६ | ४,४०६ | ६.४७ | ३७८.७७ | ३१.१७ |
| १.९ | ४.२ | ४,७१५ | ११,६९६ | ४५.८४ | १,१७८.६४ | १२.०१ |
| ७.७ | ६.७ | १०,०४३ | २०,७११ | ११.४९ | २५४.५६ | ८.८२ |
| ०.५ | २.८ | २,९६४ | ६,२६२ | २४.०८ | ९९०.४३ | २३.२८ |
| **२.१** | **५.२** | **५,४६२** | **१२,९१४** | **३२.०६@** | **१,०९५.७०$** | **२२.८०** |
| ५.५ | ७.५ | ८,९४२ | १५,९३६ | १.६९ | २.६६ | १३.४१ |
| ५.० | १४.० | ३,५५८ | ९,७५५ | ११.६४ | ३०१.१९ | १७.५१ |
| १.३ | ३.४ | ५,२३९ | ११,१४० | ६.०४ | ६१.७५ | ३४.८५ |
| ५.७ | ११.३ | ३,०८० | ८,१७९ | १.५८ | ४३.५६ | ४७.११ |
| २.६ | ६.८ | ४,९७७ | १०,२८७ | १६.८४ | ९०७.११ | १९.५३ |
| ५.४ | ५.६ | ५,४५४ | १३,१४५ | ३३.३२ | १,५४०.९४ | १०.९६ |
| ३.१ | ७.७ | ४,२२३ | ९,१३६ | ५५.५१ | १,४७४.२३ | २२.०८ |
| २.२ | ३.० | ६,०९६ | १४,९५० | १३३.७२ | २,४३८.२९ | २७.८४ |
| ३.१ | ४.१ | ६,९७१ | १६,२१० | ४४.७७ | १,०४३.६० | ११.३९ |
| ३.५ | ७.३ | ५,९६४ | १५,८१८ | ४१.७५ | १,१६०.०८ | १९.१७ |
| १.४ | ३.२ | ६,४४५ | १०,९९७ | ३.२७ | ४३.९१ | २४.२२ |
| २.२ | ६.७ | ३,३४५ | ७,०६६ | ९.२६ | ३८८.८० | १६.१८ |
| ३.९ | ५.८ | ३,९०८ | १०,४१६ | ३३.३२ | ९४९.७४ | १४.६५ |
| २.२ | ३.३ | ६,४७० | १३,०४१ | ८.७० | ५३५.६७ | १६.८६ |
| **२.५** | **५.१** | **४,८३२** | **१०,८४६** | **३३.७५** | **१,२३१.७५** | **१६.१२** |

# सामान्य स्थितीनुसार (मुख्य +दुय्यम कार्यस्थिती ) व नियतकालिक श्रमबल पाहणी वार्षिक अहवाल (जुलै २०२३-जून २०२४) च्या आकडेवारीवर आधारित * अस्थायी

@ महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. (महानिर्मिती), महाउर्जा, टाटा पॉवर कं मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या., केंद्रीय विद्युत प्रधिकरण

$ महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. (महानिर्मिती), टाटा पॉवर कं मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या., महावितरण, केंद्रीय विद्युत प्रधिकरण

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| राज्य | वार्षिक दरडोई विजेचा अंतिम वापर* (किलो वॅट तास) | | | | | दर लाख लोकसंख्येमागे मोटर वाहनांची संख्या* | प्रति शंभर चौ. किमी. क्षेत्रामागे एकूण रस्त्यांची लांबी (किमी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | घरगुती | औद्योगिक | कृषि | वाणिज्यिक | | |
| संदर्भ वर्ष /दिनांक | (२०२४-२५) | | | | | (३१-३-२०२०) | (३१-३-२०१९) |
| (१) | (७२) | (७३) | (७४) | (७५) | (७६) | (७७) | (७८) |
| आंध्र प्रदेश | १,३३९.०१ | ३३८.७० | ४२४.१५ | २९८.९६ | ११२.६९ | २४,८८८ | १०८ |
| अरुणाचल प्रदेश | ४५९.२० | १५८.७७ | २०२.९८ | ०.०५ | ६८.७५ | १५,०८२ | ६६ |
| आसाम | २९४.३० | १३९.३९ | ३४.९७ | २.०७ | ४६.५९ | १२,४९३ | ५०९ |
| बिहार | ३५१.६८ | १४५.४४ | ३८.१८ | ६१.१३ | ३०.१६ | ८,०९५ | ३१७ |
| छत्तीसगड | १,१५९.१० | २२५.०६ | ४६४.७० | २६१.३१ | ६९.५७ | २३,८१७ | ७८ |
| दिल्ली | १,५००.६८ | ८४१.४२ | १३७.९८ | १.८१ | ३८४.८४ | ५८,२५८ | १,०९० |
| गोवा | ३,१२५.३२ | ९७४.०६ | १,५३८.११ | २८.६८ | ५४८.५५ | ९३,७४६ | ५०५ |
| गुजरात | १,८६४.२९ | २५५.१० | १,१२१.७५ | ३१४.०९ | ११०.९६ | ३८,६६९ | १२७ |
| हरियाणा | १,९२३.५४ | ५५९.७० | ८२२.९४ | ३१७.९६ | ८६.३० | २९,३३६ | ११४ |
| हिमाचल प्रदेश | १,५५३.९८ | ३७१.६९ | ९०६.७८ | १०.९६ | ९८.४६ | २३,२१६ | १३२ |
| झारखंड | ८२७.९४ | १५४.२० | ५७६.७३ | २.४८ | ३३.५२ | १३,२४२ | १०२ |
| कर्नाटक | १,२०१.४२ | २५२.०१ | १९६.७५ | ४८९.२५ | १३०.१९ | ३९,२०० | १८७ |
| केरळ | ७८९.३८ | ३९५.५१ | १४८.२७ | १३.३१ | २०८.०५ | ४०,०५४ | ६६९ |
| मध्य प्रदेश | ८८३.८८ | २२३.३८ | १९०.४५ | ३३६.४० | ६०.५५ | २१,३२८ | ११८ |
| **महाराष्ट्र** | **१,२९९.४०** | **२९०.९०** | **५११.७०** | **३२२.४०** | **१२७.४०** | **३०,४८२** | **२०७** |
| मणिपूर | २८०.८७ | १६८.६२ | १४.७४ | २.०६ | ४७.२७ | ११,४९५ | १४५ |
| मेघालय | ५१३.९६ | १८२.०३ | १५५.८० | ०.०६ | ४२.५८ | ११,१८० | १७९ |
| मिझोराम | ४१६.२७ | २५९.०८ | ११.२९ | १.४० | ४३.४० | २२,०९५ | ७७ |
